म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८०९६
१९६६
REFBK-0016592

[illegible]
[illegible]
৪০০৩৮
২৫/১২/৬৮
১৮৩৩

संपादन व प्रस्तावना
सौ. कृष्णाबाई मोटे

# लग्नानंतरचे पहिले वर्ष

REFBK-0016592
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. १६५९२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

विश्वकर्मा साहित्यालय
टिळक पथ, पुणे ९

प्रकाशक
सौ. मालती माटे
विश्वकर्मा साहित्यालय
३९५ टिळक पथ, पुणे ९

© सौ. कृष्णाबाई मोटे

पहिली आवृत्ती
२६ ऑगस्ट १९६८

मूळ मूल्य नऊ रुपये
दि. ३१-१०-६८ पर्यंत
सवलतीचे मूल्य सहा रुपये

मुखपृष्ठ : सालकर

मुद्रक
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय (प्रा) लि.
४०५ नारायण पेठ, पुणे २

दा. क. १६५८२
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. संस्था
नमुना ५०८६७ वि: निबंध
स्थान ७५६६ नों: दि: २८/१२/६८

## प्रकाशिकेचे निवेदन

लग्नानंतरचे पहिले वर्ष या स्पर्धेकरिता आलेले लेख व त्या निमित्ताने लिहिलेली निरीक्षण रूप प्रस्तावना आज वाचकांचे हाती देताना मला आनंद होत आहे.

आपल्या समाजातील निरनिराळ्या थरावरील वैवाहिकजीवनाचा एक छेदच घेऊन या पुस्तकातील लेखाद्वारे तो वाचकांपुढे विचारा करिता ठेवण्यात आला आहे.

स्त्रियांच्या वैवाहिक जीवनाचे स्त्रियांनी स्वतः होऊन लिहिलेले, इतके वस्तुस्थिती निदर्शक चित्रण फारच क्वचित पाहावयास मिळते. त्यामुळे या पुस्तकाला सामाजिकदृष्टीने एक वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे.

या पुस्तकात प्रसिद्ध केलेले सर्व लेख ' महाराष्ट्र टाईम्स 'च्या स्पर्धेकरिता आलेल्या लेखातून संपादिकेने निवडून घेतले आहेत. पुस्तकाचा विस्तार मर्यादेच्या बाहेर वाढू लागल्याने, स्थळ संकोचास्तव संपादिकेला काही लेखांना थोडीशी कात्री लावावी लागली असली तरी लेखाचा आशय व गोडी यांना यत्किंचितही धक्का न लावण्याची संपादिकेने पूर्ण खबरदारी दाखविली आहे.

लेख छापतानाही मूळ लेख व भाषापद्धती शक्यतोवर तसेच राखण्याचीही आम्ही पूर्ण काळजी घेतली आहे.

स्पर्धेकरिता असा जीवनस्पर्शी विषय निवडण्याचे सारे श्रेय ह्या विभागाचे त्या काळचे संपादक श्रीयुत शंकर सारडा यांच्याकडे जाते हे निश्चितरित्या कळते. स्त्रीजीवनाच्या गाभ्याला हात घालणारा असा विषय निवडून इतक्या लेखिकांना बोलते व लिहिते केल्याबद्दल श्रीयुत सारडा यांचे मी मनःपूर्वक आभार मानून त्यांना धन्यवाद देते.

त्याचप्रमाणे स्पर्धेकरिता आलेले सर्व लेख संपादिकेला उपलब्ध करून दिल्याबद्दल व छापलेल्या लेखांचे पुनर्मुद्रण करण्याची मला परवानगी दिल्याबद्दल 'महाराष्ट्र टाईम्स' चे माजी संपादक श्रीयुत द्वा. भ. कर्णिक व आजचे संपादक श्रीयुत गोविंद तळवलकर यांची मी अत्यंत कृतज्ञ आहे.

हे पुस्तक तयार करून देण्याबाबत सौ. कृष्णाबाई मोटे यांनी जे सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचे आभार मानणे औपचारिक होईल व त्यांना आवडणार नाही म्हणून मी येथे मानीत नाही, तथापि हे पुस्तक अशा रीतीने प्रकाशात आणण्याची मूळ कल्पना त्यांचीच एवढेच मी वाचकांना कळवू इच्छिते.

लेखांचे पुस्तक रूपाने मुद्रण करण्याचे ठरविल्यावर जो पत्रव्यवहार करावा लागला त्यावरून यातील लेखिकांच्या सत्यसृष्टीतील अस्तित्वाची आमची पक्की खात्री झाली.

या पुस्तकात समाविष्ट केले आहेत यापेक्षा किती तरी लेख-साहित्य आमचे जवळ अजून शिल्लक आहे. पण ते प्रसिद्ध करणे न करणे हे वाचकांनी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून राहील. एवढं सांगून मी माझं निवेदन पुरे करते.

**मालती माटे**

□

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम.................... दि: ..................
क्रमांक .................... नोंद दि ..................

### ' लग्नानंतरचे पहिले वर्ष ' या स्पर्धा लेखांच्या निमित्ताने

१९६७ साली 'महाराष्ट्र टाईम्स'ने खास स्त्रियांसाठी म्हणून 'लग्नानंतरचे पहिले वर्ष' या शीर्षकाखाली एक स्पर्धा आयोजित केली. ते शीर्षक मोठे चटकदार व काहीसे गुदगुल्या करणारे, त्यातून स्पर्धक व्यक्ती साऱ्या स्त्रिया, यामुळे वाचकांची उत्सुकता चांगलीच वाढली. त्यातही या स्पर्धेतील बक्षिसाचे व इतर काही लेख 'महाराष्ट्र टाईम्स'ने जेव्हा प्रसिद्ध केले, तेव्हा त्यांनी वाचकांचे लक्ष चांगलेच खेचून धरले.

वैवाहिक आयुष्यातले इतके वैयक्तिक अनुभव स्त्रिया इतक्या मोकळेपणी लिहितात तर ! असाही विचार मनात आल्यावाचून राहिला नाही.

हे लेख पाहावयाला मिळाल्यास आपल्याकडील वैवाहिक जीवनावर चांगलाच प्रकाश पडेल असे माझ्या मनाने घेतले व ती पत्रे–लेख मला पाहावयास मिळतील का, अशी मी श्री. द्वा. भ. कर्णिक, त्या वेळचे संपादक, यांना विचारणा केली. त्यानी मोठ्या मनाने ते सारे लेख मला उपलब्ध करून दिले.

प्रसिद्ध झालेले दहा व अप्रसिद्ध ५०८ मिळून एकंदर ५१८ लेख मला वाचावयास मिळाले.

ते वाचल्यावर त्यातील अनुभव, लेखनाचा मनमोकळेपणा व लेखिकांची ऋजुता पाहून मी अगदी भारावून गेले. काही क्षण वाटले, हे लेख नाहीतच; उसळलेल्या मनाचे बांध फुटून सुहृदांशी केलेले ते एक हितगुज आहे. कधी आनंदाचे, कधी दु:खाचे, कधी निराशेचे, तर कधी विझलेल्या मनाचे असे. पण प्रत्यक्षात अनुभविलेल्या जीवनाचे ते खरेखुरे स्पंदन होते ! त्यामुळे एकदम हृदयाला जाऊन भिडणारे.

येथे, प्रत्येकीला आपल्यापाशी काहीतरी सांगण्याजोगे आहे असे वाटत होते, ते इतरांपेक्षा वेगळे आहे, अशी जाण होती आणि या जाणिवेतूनच सारे लेख स्फुरले होते. निरनिराळ्या अनुभवछटांनी भरलेले ते सारे जीवनालेख साकल्याने एकत्र पाहणे, हा अनुभव काहीसा विलक्षण व मोलाचा होता.

या स्पर्धेत ७३ वर्षांच्या वृद्धेपासून तो जिचे लग्न झाल्याला उणेपुरे वर्षही लोटले नाही अशा षोडश वर्षाच्या मुग्धेपर्यंत सर्वच वयाच्या भगिनींनी भाग घेतला आहे. स्पर्धकांच्या कक्षा पण, वर हृषिकेशपासून तो खाली मद्रासपर्यंत, पूर्वेकडे कलकत्त्यापासून तो पश्चिमेकडे थेट अहमदाबादपर्यंत, अशा विस्तारलेल्या आहेत. भारताच्या चारी कोपऱ्यांना विखुरलेल्या मराठी भाषिकांकडून आलेल्या प्रतिसादाचे मला इतके आश्चर्य वाटत नाही. कारण परप्रांतात असता मराठीची जपणूक जास्त जाणीवपूर्वक होते. पण या ठिकाणी महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यात वसलेल्या खेड्यांतून राहणाऱ्या भगिनींनी दिलेला प्रतिसाद मला फारच मोलाचा वाटतो. कारण शहरी जीवनाप्रमाणे खेड्यातून आलेल्या या लेखांतून खेड्यातील साध्या व रांगड्या जीवनाचे खरेखुरे रंगही येथे पाहावयास मिळतात.

स्पर्धेतील लेखांतून आढळणारे समाजाच्या निरनिराळ्या थरांचे वैचित्र्यही काही कमी नाही. जिन्याखाली लहानशा जागेत जीवन कंठणाऱ्या श्रमजीवी भगिनीपासून तो मुंबईच्या मरीन-ड्राईव्हवरील निवासस्थानात किंवा बाहेरगावी सुंदर, सुशोभित, सुसज्ज बंगल्यात जीवन व्यतीत करणाऱ्या सुसंपन्न वर्गातील भगिनीपर्यंत सर्वांनी आपले जीवनानुभव या स्पर्धेकरिता लिहून पाठविलेले आहेत. त्यामुळे निरनिराळ्या वर्गांच्या सुखी संसाराच्या कल्पना यांचे एक विविध रंगी प्रदर्शन या लेखांतून होत आहे. अर्थात् बहुसंख्य भगिनी पांढरपेशा, मध्यम वर्गातून आलेल्या असल्याने त्यांच्याच जीवनरंगाचा ठसा येथे प्रामुख्याने दिसतो.

हे सर्व लेख वाचीत असता आपल्याकडील वैवाहिक जीवनाचा, साठ वर्षांचा जणू एक चित्रपटच माझ्यापुढे उलगडला जात होता. एका टोकाला १९०७ साली वयाच्या १३ व्या वर्षी लग्न झालेली, अडखळत मराठी वाचू शकणारी, सारा जन्म भीत भीत काढलेली वृद्धा होती, तर दुसऱ्या टोकाला १९६६ साली तिशीच्या सुमारास स्वतः होऊन विवाहबद्ध झालेली, जगावेगळे लग्न करणारी, अद्ययावत चट्ट पोषाख करणारी व परस्परांवरील प्रेमावर विश्वासून दोन प्रादेशिक संस्कृतींचा मेळ शोधणारी तरुणी उभी होती. या दोन्ही टोकांत आमच्या वैवाहिक जीवनात जो काय अंतर्बाह्य बदल झाला आहे, त्याचे चित्रण होते.

हा बदल घडून येण्यास, प्रथम दर्शनी तरी दोन बाह्य गोष्टी कारणीभूत दिसतात—एक म्हणजे बदलत्या कल्पनांनुसार समाजात होत असलेला शिक्षण-प्रसार व दुसरी म्हणजे विवाहकालीन वाढते वय.

या दोन्हीही गोष्टींशी आपण परिचित आहोत. पण त्याचा एखाद्या प्रदे-

शातील निरनिराळ्या वर्गांवर होत चाललेला परिणाम येथे साकल्याने एकदम दिसत असल्याने तो मनावर जास्त ठसतो व फरक जाणवतो. ३० वर्षांपूर्वी अशी स्पर्धा कोणी ठेवली असती तर ग्रामीण विभागातील व शहरांतीलही अशिक्षित वर्ग त्यात अभावानेच तळपले असते, किंबहुना त्यांचे समाजातील अस्तित्वही जाणवते ना. पण १९६७ साली ही स्थिती राहिलेली नाही. ग्रामीण भाग व एके काळी मागासलेले, अडाणी म्हणून गणले जाणारे शहरातील वर्ग यांनीही येथे स्पर्धेत भाग घेतलेला दिसतो. कदाचित् तो लेख लिहावयाला अशा भगिनींना चांगलीच मेहनत करावी लागली असेल. पण त्यांनी ती केली व स्पर्धेत भाग घेतला हेच केवढे महत्त्वाचे आहे.

या ठिकाणी स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या भगिनींना लिहिता-वाचता आल्याखेरीज स्पर्धेत भाग घेणे अशक्य होते. त्यामुळे, बहुजनसमाजापैकी अद्यापही बराच मोठा वर्ग येथे बाद होतो हे लक्षात घेऊनसुद्धा स्पर्धकांच्या चौकटीत बसणाऱ्या लेखिकात जे शिक्षणवैचित्र्य दिसून आले ते काही कमी नाही.

**शिक्षण :**

स्पर्धक भगिनीत लग्नापूर्वी निरक्षर असलेल्या वधूपासून तो उच्च शिक्षण पुरे करून अखेरची पदवी घेणाऱ्या सर्व प्रकारच्या वधू आहेत. एकंदर लेखिकांपैकी काही वधूंनी विवाहपूर्व आपले उच्च शिक्षण संपवून पदवी किंवा सर्वोच्च पदवी प्राप्त करून घेतली होती. काही लेखिकांनी लग्न झाल्यावर आपले शालेय शिक्षण किंवा पदवी शिक्षण पुरे केले होते. काही मुली मॅट्रिक किंवा प्राथमिक शिक्षिकेचे प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण झाल्या होत्या. काही उपवर वधू व्ह. फा. झालेल्या होत्या. काहीजणी लग्नाच्या वेळी प्राथमिक शाळेत शिकत होत्या किंवा ४ थी पूर्ण झालेल्या होत्या. तरीही पूर्वीप्रमाणे शाळा सुटल्यानंतर त्यांची व शिक्षणाची फारकत झालेली नसून, त्या आपले मनोगत कागदावर उतरविण्यास समर्थ अशा राहिल्या होत्या. काही वधूंच्या शिक्षणाची पायरी माध्यमिक शाळेपासून ११ वी पर्यंत कोठेतरी मध्येच होती, असे निश्चित दिलेले होते. बऱ्याचशा लेखिकांनी मात्र आपल्या शिक्षणाचा काहीच उल्लेख केला नसला तरी त्या आपले विचार व मनोगत कागदावर चांगल्या प्रकारे व्यक्त करण्यास समर्थ होत्या. त्या विचाराभिव्यक्तीवरून त्या हायस्कूलपासून कॉलेजपयत कोठेही निरनिराळ्या पायरीवर बसण्याजोग्या होत्या असे त्यांच्या लेखांवरून मानण्यास हरकत नाही.

**विवाहकालीन वय :**

वधूच्या विवाहकालीन वयासंबंधी विचार करू लागले तरीही शिक्षणासारखाच अनुभव यतो. पुढारलेल्या शहरी समाजातून मुलींची वये वाढल्याला बरीच वर्षे होऊन गेली, पण ग्रामीण भागात ती स्थिती नव्हती. ती गेल्या २५ वर्षांतच पालटू लागली आहे. स्वातंत्र्यानंतर गेल्या काही वर्षात, महाराष्ट्रात

तरी पाळण्यातील लग्ने जाऊन वधूचे वय पंधरा-सोळापर्यंत येऊन ठेपले आहे. मुलगी वयात आल्याशिवाय तेथेही आता लग्नाचा विचार होत नाही. शहरातील, पूर्वी अडाणी, अशिक्षित असलेल्या समाजातूनही, आता मुलीचे वय १६ ते १८, कित्येक वेळा याहूनही जास्त आढळते. अर्थात् फार झाल्यास चोरून सांगितले जाते ती गोष्ट वेगळी. पण मुलीचे वय चोरणे ही प्रथा सर्व वर्गात सापडते.

शहरातून, विशेषतः पांढरपेशा वर्गातून हे वयाचे प्रमाण सर्वसाधारणपणे पुढेच गेलेले आहे, अशा समाजातून मुलीचे लग्नाचे वेळचे सरासरी वय बहुशः १८–१९ ते २५–२६ पर्यंत आढळते, काही मुली ३०–३२ वयापर्यंत कुमारिका राहिलेल्या दिसतात. पण त्याचे प्रमाण एकंदरीने कमीच––अपवादात्मक असेच. या वर्गात सर्वसाधारण मुलीचे लग्नवय आता १८ ते २४ च्या दरम्यान असते. शहरे व खेडेगावे यातून मुलीचे शिक्षण व वय वाढू लागले की मूलतः वधूवरामध्येच बदल होत जातो.

जेव्हा मुलींची वये लहान, म्हणजे १२–१३ वर्षांची असताना, विवाह होत, तेव्हा मुलामुलींच्या परस्परपसंतीचा प्रश्नच नसे. लग्न म्हटले की, " मज्जाच मज्जा ! उंची वस्त्रे, दागदागिने घालायचे, पंचपक्वान्नांची जेवणे, हिरवा-चुडा, वरात, लाजणे, मुरकणे, उखाणे घेणे," एवढीच लग्नाविषयी मुलींची कल्पना असे. " त्यापलीकडे काही आम्हाला कळत नव्हते व माहीतही नव्हते." ज्यांची लग्ने बऱ्याच काळापूर्वी लहान वयात झालेली आहेत त्यांनी असेच उद्गार काढलेले दिसतात; पण मुली मोठ्या झाल्या, तारुण्याचा उंबरठा चढत यौवनात प्रवेश करू लागल्या की मुलींच्या मनाची ही स्थिती राहिलेली नसते.

**वधूंचें भावविश्व :**

यौवनाने मुलीचे शरीर व मन बहरून येत असता त्यात एक अस्फुट कुजबुज उमटते. आतापावेतो अपरिचित असलेली ' स्त्री-पुरुष ' ही जाणीव रक्तात स्फुरू लागते. जीवनाच्या जोडीदाराचे, आपल्या लहानशा, स्वतंत्र घरट्याचे एक धूसर, अस्पष्ट रेखाचित्र तिच्या मनात उमटू लागते. मन आणि डोळे, सभोवती किंवा स्वप्नात, अशा जोडीदाराचा शोध घेऊ लागतात. काही वेळेला भोवतालच्या जगात त्याला प्रतिसाद मिळतो. दोन मने एकत्र येतात. काही वेळेला प्रतिसाद मिळाला नाही, तरी, वर म्हणून पुढे येणाऱ्या पुरुषाशी नवयुवती कळत नकळत, आपले मानसचित्र ताडून पाहते, व ओळख पटली की अपरिचित असताही " प्रथमदर्शनीच आम्ही एकमेकांना मनोमन पसंतीची पावती दिली " किंवा " ते स्मित माझ्याचकरिता होते हे मला पाहताच उमगले, मी ते अद्यापही विसरू शकत नाही, " असे निरनिराळे उद्गार हा वैवाहिक जीवनपट उलगडत असता पुढच्या कालखंडात ऐकू येतात. कित्येक वेळेला तर एखादी मुंबईची मुलगी, कऱ्हाडचा

मुलगा वडिलांनी पाहिल्यामुळे मुंबई सोडावी लागणार या कल्पनेने नाखूष होऊन, " वधूपरीक्षेत वराला चकणा डोळा दाखवून नापसंत करून घ्यावयाचे " या ईर्षेने गेली असता " पहिल्याच दृष्टभेटीत नजरेला नजर भिडल्याबरोबर मी माझे स्वतःचे सारे व्यक्तिमत्त्वच हरवून बसले, " असे लिहून जाते. हे सारे उद्‌गार वाढत्या वयातील वधूमनाच्या परिवर्तनाचे आहेत. वधू-वरांचे आंतरिक विश्व–भावविश्व बदलल्याचे द्योतक आहेत.

**कथा–कादंबऱ्यादिकांचा परिणाम**

मुलामुलींचे हे भावविश्व घडत असता कथा-कादंबऱ्या, काव्य, रजतपटावरील चलच्चित्रे व आकाशवाणीवरून प्रसारित होणारी गाणी, भावगीते यांचा परिणाम लेखांतून पावलोपावली दिसतो. एका लेखात तर नववधू म्हणते, " घरात इतक्या माणसांची गर्दी असता कथाकादंबऱ्यातील प्रणय सत्यसृष्टीत कोण आणि कसा अनुभवणार ? ते काही नाही, तो प्रणय साकार करायचा असला तर आम्ही वेगळेच राहिले पाहिजे, माझ्या मनाने घेतले व वेगळे बिऱ्हाड करण्याचा मी 'कुमारांच्या' पाठीमागे लकडा लावला " पुढे कुमार ( नवरा ) आजारी पडल्याने तिच्या सर्वच चित्राला निराळी कलाटणी मिळाली ती गोष्ट वेगळी.

पतिपत्नींच्या प्रणयजीवनासंबंधी वधू-वरांचे कल्पनाविश्व घडविण्यात सुप्रसिद्ध कादंबरीकार ना. सी. फडके व वि. स. खांडेकर हेच अग्रगण्य आहेत असे दिसते. कारण इतर कोणाही कादंबरीकारांचा या लेखांतून उल्लेख नाही. त्यांच्या कादंबऱ्यांतील वचने व अवतरणे मात्र जागोजागी आहेत. काव्यात प्रामुख्याने गोविंदाग्रज, ग. दि. माडगूळकर, तांबे व बोरकर, शांता शेळके, इंदिरा संत, मंगेश पाडगावकर (बहुधा हे सर्व आकाशवाणीवर प्रसारित केल्या जाणाऱ्या कवितांनी असावे) इत्यादि कवींचा, क्वचित् प्राचीन कालिदासादि संस्कृत कवी, यांचाही उल्लेख आहे. पण, साधारण–शिक्षित असलेल्या बहुसंख्य लेखांतून आकाशवाणीवरून प्रसारित होणारी भावगीते: " निघाले आज तिकडच्या घरी ", "उंबरठ्यावरि", "कराया तुझीच रे चाकरी " " मैत्रिणींनो सांगू नका नाव घ्यायला, " " तुझी माझी प्रीत । सांगू नको साजणी, " इत्यादि गाणीच वधूंच्या भावविश्वात गर्दी करून बसलेली दिसतात. त्यानंतर सिनेमातील गाणी व प्रसंग हे अगदी तोंडपाठ असलेलेही काही वेळा आढळते. सिनेमा, कादंबऱ्या इत्यादिकांचा हा परिणाम तात्कालिक किंवा उपेक्षणीय नाही. कारण कित्येक मुली या 'स्वप्निल' दुनियेत वावरतात. त्यांची मने याच चित्रांनी भारून गेलेली असतात. अशा वेळी विवाहानंतर, वास्तव जगात त्या उतरल्या की प्रेमाच्या प्रत्यक्ष अनुभूतीच्या अभावी केवळ पुस्तकी कल्पना किंवा सिनेमातील कल्पना घेऊन त्या वावरू पाहतात. तसेच खेळकर, फुलपाखरू जीवन मिळेल अशी अपेक्षा करतात, व अखेर स्वप्नभंगाने कष्टी होतात, असे आढळून येते. असे अपेक्षाभंगाचे उद्‌गार मला पदोपदी आढळले.

**वरसंशोधन व परस्पर पसंती**

वास्तविक उपवर वधूंचे ( त्याबरोबरच वरांचेही ) कल्पनाविश्व किंवा आंतरिक भावविश्व असे बदलत असता साहजिकच पाश्चिमात्यांच्या मधुचंद्राच्या प्रथेबरोबरच प्रेमविवाह किंवा परिचयपूर्वक विवाह करून जीवनाचा साथीदार निवडण्याची जबाबदारी स्वत:कडे घ्यावयाची ही प्रथा आपलेकडे बऱ्याच प्रमाणात दिसून यावयाला पाहिजे होती. पण तसे मात्र झालेले दिसत नाही. मुली कितीही शिकल्या तरी सर्वसाधारणपणे त्या अखेर रुळलेल्या मार्गानेच जातात असे दिसून येते. " आईवडील करतील ते चांगले," असे धरून त्या चालतात व विवाहाला अनुमती देतात. आपल्या वडीलमंडळींनाही आता वधूवरांची ( यात वराची संमती नसेल तर लग्नच होऊ शकत नाही; तथापि काही वेळा वरालाही वडीलमंडळींचा शब्द मोडवत नाही किंवा अन्य कारणाने त्याला नियोजित विवाह पसंत नसतो. तो केवळ जबरदस्तीचा रामराम म्हणून विवाहाला उभा राहतो व एकंदरीत सर्व तऱ्हेनेच नाखूष असतो. अशा वेळी नववधूला विनाकारण मानसिक ताप भोगावा लागतो.) पसंती व अनुमती घेतली पाहिजे ही जाणीव प्रकर्षाने झालेली आहे. तथापि काही मागासलेल्या व ग्रामीण वडीलमंडळीत ही गोष्ट विसरली जाते आणि तरुण वधूवरांना ते चांगलेच खटकते, " आम्ही दोघे सुशिक्षित असताही ( असे म्हणणारी वधू १० वीत होती. ) मला त्यांचा फोटोसुद्धा दाखविण्यात आला नाही, ही गोष्ट मला लग्नाचे वेळी चांगलीच ' खटकत ' राहिली. लग्नाचे वेळी अंतरपाट काढला तेव्हा मी यांना पाहिल्याने पाहिले. " अर्थात् सर्व ठिकाणी ही परिस्थिती नसते. सूज्ञ आईबाप वराप्रमाणे वधूचीही संमती किंवा अनुमती घेतात. तरीसुद्धा बदललेल्या काळाचे चिन्ह म्हणून या वर्गातून येणारी ही तक्रार लक्षात ठेवण्याजोगी आहे.

तरुण मनात एकीकडे आपल्याला मनपसंत जोडीदार मिळावा अशी कल्पना रुजू लागली असता, आपली तरुण मुली–मुले अजूनही पूर्णपणे परतंत्र, म्हणजे जन्माचा जोडीदार पाहताना वडील मंडळीवर का अवलंबून राहतात हा प्रश्न पडतो. आधीच आपल्या तरुण मुलामुलींना परस्परांची नीट ओळख व्हावी, परिचय वाढवावा, अशी संधी आपल्या समाजात क्वचितच मिळते. जेथे मिळते असे वाटते तेथे पाण्यात राहून कोरडे राहण्याची सर्वसामान्य तरुण तरुणींची वृत्ती असते. एवढेच नव्हे तर, अत्यंत आधुनिक म्हणून मिरवणाऱ्यांचीही असते. पोषाखात व इतर बाबतीत पाश्चिमात्य मुलामुलींचे अनुकरण करू पाहणारी आधुनिक तरुण मंडळी कित्येक वेळा वागण्यात ' बेताल ' मोकळेपणा घेतात, असे दिसत असताही ' प्रेम करणे ' ही गोष्ट वेगळी व ' लग्न करणे ' ही गोष्ट वेगळी अशी दुटप्पी वृत्ती ठेवून वावरतात असे दिसून येते. कारण लग्नाची वेळ आली असता परस्परांवर प्रेम करणारी मुले-मुली अखेर प्रियकराशी किंवा प्रियसखीशी विवाहबद्ध न होता,

लग्न करून देण्याची सारी जबाबदारी वडील माणसांवर टाकून तिसऱ्याशीच विवाहबद्ध होतात.

हे का, या कूट प्रश्नाचे थोडेसे उत्तर मला एक-दोन लेखात आढळले ते विचार करण्याजोगे आहे. ती भगिनी लिहिते, "प्रेम हा छंद आहे आणि लग्न व्यवहार आहे. प्रेमात माणूस बेहिशेबी असतो. केवळ बेहोषीत धुंद असतो. व्यवहारात तो जपून, हिशेबाने पावले टाकतो." या भगिनीच्या बाबतीत सुदैवाने तिला दोन्ही एकत्र जुळविता आली. तथापि बहुतेक ठिकाणी प्रेम आणि व्यवहार एकत्र जुळतीलच असा भरवसा नाही. तरुण वयामुळे मुलामुलींना 'प्रेमाचा छंद' पाहिजे असतो. पण तेथे नेहमी व्यवहाराचा मेळ जुळतोच असे नाही. येथे एक उदाहरण देण्याचा मोह आवरत नाही.

एकदा, प्रेमात पडलेल्या तरुण-तरुणींनी लग्न करावयाचे ठरविले. स्वतःचे बिऱ्हाड थाटायचे म्हणून तो तिला एक १५ हजारापर्यंत असलेला, मालकीचा होईल, असा फ्लॅट दाखवायला घेऊन गेला. त्यानंतर त्याने तिच्या वडिलांपाशी ते पैसे त्यांनी द्यावे, अशी मागणी केली. ती पुरवणे वडिलांना शक्य नव्हते. या मुद्यावर ते लग्न मोडले व फ्लॅट घेऊन देणाऱ्या दुसऱ्याच मुलीशी त्याचे लग्न झाले. अशी उदाहरणे पाहिली की जन्माचा जोडीदार आपला आपण निवडावा या इच्छेपेक्षा "लग्न साऱ्या जन्माचा प्रश्न आहे" म्हणून अखेर काही ठिकाणी व्यवहारबुद्धीच बलवत्तर ठरते असे दिसते. साहजिकच अशा प्रसंगी "वडील माणसे करतील ते हिताचे," असे म्हणून वधू-वर-संशोधनाचे काम वडील मंडळींवर सोपवले जाते.

या बरोबरच कथाकादंबऱ्यांतून, नेहमीच्या गावगप्पांतून "प्रेम हे आंधळे असते, त्याला जात, कुल, शील, गोत्र इत्यादिकांचे तारतम्य नसते", "भावनेच्या भरात विवाह घडून आले तरी अंती ते सुखद ठरत नाहीत, त्यांची शोकांतिकाच होते," इत्यादी उद्‌गार वारंवार कानी पडत असल्याने "प्रेम करून विवाह करणे हा एक प्रकारचा अविचार, तो आपल्याला पचणारा खेळ नव्हे," अशी सर्व साधारण तरुण-तरुणींची समजूतही वधूवर संशोधनाचे काम वडील मंडळींवर सोपविण्यास एक कारण होत असावे. काही वेळा "अखेर विवाहातही तडजोडच करावी लागते ना, मग ती करीत असता सून म्हणून घरात येणारी मुलगी घरच्या माणसांच्या पसंतीची असली तर सर्वात चांगले, तितके खटके कमी," अशी मनोभावनाही व्यक्त केली जाते. कारण लग्न झाल्यावरही 'माझे स्वतंत्र घर, माझा संसार' अशी बहुसंख्य लोकात अजून आपलेकडे भावना नाही.

आपल्याकडे मुलामुलींची लग्ने करून देणे ही वडील मंडळींची जबाबदारी, अशीच समजूत पिढयान् पिढया चालत आली असल्याने अद्याप समाजाचा

पाहण्याचा दृष्टिकोणही तोच असतो. मुलामुलींची लग्ने योग्य वयात झाली नाहीत तर त्याबद्दलचा ठपका बहुधा वडील मंडळींवर येतो. 'अर्थोऽहि कन्या परकीय एव' या वचनाप्रमाणे एकदा मुलीचे लग्न करून दिले की आपण आपल्या जबाबदारीतून सुटलो, असे वडील मंडळीनाही वाटते. त्यामुळे थोडेसे प्रेमविवाह सोडून दिले तर, पूर्वापार रूढीप्रमाणे वधू-वर संशोधनाचे काम अजूनही वडील मंडळींवरच पडते. अशा वेळी वधूवरांच्या परस्पर पसंतीपेक्षा मुलीचे रूप, हुंडा, मानपान, देणीघेणी इत्यादी अनेक बाह्य गोष्टींनाच महत्त्व चढते व लग्न जुळवण्याला एक प्रकारे बाजारी सौद्याचे स्वरूप येते. हे स्वरूप अद्यापही बिलकुल कमी झालेले नाही. मुलाचे लग्न करताना, "आम्ही त्याचा भाव शक्य तितका वाढवून हुंडा घेतो. कारण आम्हाला पुढे मुलीकरिता तोच हुंडा देऊन चांगले स्थळ मिळवावयाचे असते," असा सरळ 'एकीकडे घेणे व दुसरीकडे देणे,' असा व्यवहारी हिशेब लग्नसंबंध ठरविताना होत असतो.

बऱ्याच लेखांतून असे उद्गार मिळतात,की त्यामुळे, मुलींना वधूपरीक्षेच्या निमित्ताने "बाजारात उभे करून प्रदर्शन केल्यासारखे वाटते," म्हणून वधू-परीक्षा "नको वाटते." "मला पाहणार तर मीही वराला पाहणार व नाही म्हणण्याचा हक्क मलाही आहे" असा आग्रहही धरला जातो. एवढेच नव्हे तर केव्हा केव्हा तो बजावलाही जातो. रूप सामान्य असल्यास वधूला फारच वाईट वाटते. तिला या सर्व प्रकारांना मान तुकविण्याखेरीज गत्यंतर नसते. दुसरेपणावर जायची तयारी ठेवावी लागते. लग्न न झाल्यास समाज आपल्याकडे ज्या दृष्टीने पाहील त्याला तोंड द्यावयाची मुलींची तेवढी तयारी नसते, म्हणून वधू परीक्षा, हुंडा, मानपान, देणी-घेणी, इत्यादी सर्व गोष्टी सध्यांची वधू काहीशा अनिच्छेने पण रूढीमुळे अपरिहार्य म्हणून स्वीकारते, "असे चालायचेच," असे धरून चालते. त्याबरोबरच पुष्कळ वेळा देणी-घेणी, मानपान इ. न झाल्यास सर्व जन्मभर तिला सासरी टोमणे ऐकावे लागतात. काही वेळा छळही होतो. अशी उदाहरणे पाहिली की, विवाहात वधूवरांच्या पसंतीला पूर्वपरिचयाने महत्त्व आल्याशिवाय, वधूवरांनी स्वपसंतीची जबाबदारी घेतल्याशिवाय आमच्या विवाहातील सौद्याचे हे बाजारी स्वरूप थांबेल असे वाटत नाही.

अलीकडे, विशेषतः सुशिक्षित वधूवर असताना, लग्न ठरविल्यानंतर-वाङनिश्चय झाल्यावर, त्यांना परिचयाची संधी दिली जाते. येथे वधूवरांची अनुमती तर घेतलेली असते. पण जोपर्यंत परस्पर परिचयाने वधूवरांना आपण होऊन विवाहबद्ध व्हावे, असे वाटू लागलेले नसते, तोपर्यंत हा सारा नुसता देखावाच होय. तो बदलेल, पण खुद्द वधूवर आपल्या पसंतीचा आग्रह धरतील व परिणामांची जबाबदारी घ्यावयास सिद्ध होण्याइतक्या त्यांच्या भावना प्रखर असतील तेव्हा.

एकंदरीत पाहता, आमच्या वधूवरसंशोधनपद्धतीत पूर्वीपेक्षा बदल होतो आहे असे दिसले तरी तो बदल फारच मंद गतीने होतो आहे.

या दृष्टीने, स्पर्धेकरता आलेले लेख पाहिल्यास ५०८ लेखांतील ६० विवाहात वधू आणि वर ही दोघेही लग्नाआधी नुसती प्रेमबद्ध, नव्हे वचनबद्ध झालेली होती; १७ विवाहात वराला मुलगी कोठेतरी अन्यत्र दिसली असता तिला पाहून किंवा तिचा परिचय होऊन त्याने स्वत: मागणी घातली होती. अशा मागणींत वधूची पसंती पुष्कळ वेळा गर्भित असतेही. पण त्याचबरोबर अशा मागणीतून काही वेळा 'काझी–प्रकरण' निघण्याचाही अलीकडे संभव उत्पन्न झाला आहे, हे नाकबूल करून चालणार नाही. २४ विवाहात वधूवर चांगले एकमेकांच्या परिचयाचे किंवा नात्यातले होते. एकमेकांचे स्वभाव, घरची मंडळी ह्या गोष्टींची परस्परांना चांगली माहिती होती. बाकीच्या सर्व विवाहात, म्हणजे ४०७ विवाहात वधूवर परस्परांना संपूर्णतया अपरिचित होते. केवळ धार्मिक संस्कारांनी विवाहबद्ध होऊन त्यांनी संसारात पदार्पण केले होते.

ही आकडेवारी पाहता प्रेमविवाह किंवा परिचयपूर्वक विवाहांचे प्रमाण दिवसानुदिवस पूर्वीपेक्षा वाढत चालले आहे यात संशय रहात नाही. तथापि अशा विवाहांकडे, विशेषत: वधूवरांनी जुळवलेल्या प्रेमविवाहाकडे सर्वसाधारणपणे अजूनही नाक मुरडून पाहिले जाते असे दिसते. त्यामुळे काही वेळा, "आमचा विवाह बसस्टॉपवर किंवा कथा-कादंबऱ्यांप्रमाणे नेत्रमीलन होऊन झालेला नाही, वडील मंडळींनी पाहूनच झाला," असे काही लेखांतून आवर्जून सांगितलेले दिसते.

स्पर्धालेखातील सारे नोंदणीविवाह बव्हंशी प्रेमविवाहच आहेत व ते दोन्ही पक्षांतील वडील मंडळींच्या विरोधामुळे किंवा त्यांना कळल्यास ते आडकाठी आणतील या भीतीने तसे झालेले आहेत. एके ठिकाणी तर वधू स्पष्टच लिहिते की, "मी निवडलेला वर स्वजातीय होता, मिळवता होता, निर्व्यसनी होता, अशा वेळी घरच्या मंडळींचा माझ्या विवाहाला विरोध का असावा, हे मला कधीच कळले नाही. बहुधा जीवनातील एका महत्त्वाच्या नाजुक प्रसंगी आपल्याला न विचारता आम्ही निर्णय घेतला व नंतर कळवले, ही गोष्ट त्यांना आवडली नसावी."

या तक्रारीत अजिबात तथ्य नाही असे म्हणता येणार नाही. काही सूज्ञ वडील मंडळी मुला-मुलींनी असा निर्णय घेतल्यावर त्याला विरोध न करण्याचा शहाणपणा दाखवतात पण बहुतेक ठिकाणी विरोधच होतो. काही तरी खटकते हे खरेच. कदाचित बाहेरून येऊन मुलाच्या मनात एक तिऱ्हाईत मुलगी अग्रस्थान पटकावून बसली हेही खटकत असेल.

आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय प्रेमविवाहात, वडील माणसांची विरोधाची

भूमिका प्रेमिकांना कळू शकते व तितकेच दृढ प्रेम असल्यास त्याला तोंड द्याव-याची त्यांनी तयारीही केलेली असते. उलट अशा वेळी सहानुभूती मिळाल्यास ते जोडपे, विशेषत: वधू, अगदी भारावून जाते. अशी दोन तीन उदाहरणे आढळली.

प्रेमविवाहांना प्रथमारंभी विरोध असला तरी दोघांचे नीट चालले आहे असे दिसताच त्या विरोधाची धार पुष्कळच बोथट होते व मूल झाल्यावर तर ती जवळ जवळ नाहीशीच होते, असे वारंवार अनुभवास येते. मात्र विरोधाची आधीची उग्रता इतकी प्रखर असते की, "उमा म्हणे यज्ञी माझे जळाले माहेर," असे म्हणण्याची पाळी मुलीवर येते. पण या बदलत्या काळात स्वत:च्या प्रेमापायी काही नव तरुण–तरुणी तेवढेही धाडस करतात, असे स्पर्धेत आलेल्या थोड्या तशा प्रकारच्या लेखांवरूनही दिसून येते.

**विवाहविधि व इतर रूढ धार्मिक संस्कार :**

आपल्याकडील वरसंशोधनाची पूर्वापार पद्धत काहीशी बदलली असली तरी विवाहातील वधवरांचा अपरिचितपणा अजूनही पूर्वीसारखाच आहे. अशा वेळी साहजिकच कित्येक वेळा एक प्रश्न उभा रहातो तो हा की, पूर्वी मुलगे व मुली लहान असत तेव्हा ठीक होते. पहिली एक-दोन वर्षे सतत एकमेकाला पाहत असल्याने ती एकमेकांना अपरिचित रहात नसत. पण वाढत्या वयात परस्परांना संपूर्णपणे अपरिचित असलेले वधूवर, पति-पत्नी म्हणून एकत्र कसे येऊ शकतात ? त्यांच्यात इतकी जवळीक कशी निर्माण होते, याचे उत्तर शोधायचे झाले तर विवाहविधीच्या धार्मिक संस्कारांकडेच वळले पाहिजे. वधूवरांवर त्यांचा किती व कसा परिणाम होतो हे स्पर्धालेखांवरून चांगलेच अजमावता येते. निदान मुलींच्या बाबतीत तरी काय होते याचे साद्यंत वर्णन वारंवार या लेखांतून पाह्यला मिळते.

गौरीहरापासून विवाहवेदीवर चढणारी वधू काहीशी बावरलेल्या मन:-स्थितीतच वरमाला घेऊन येते. पुढच्या क्षणापासून तिच्यात आमूलाग्र बदल होणार याची तिला तीव्रपणे जाणीव होते. आतापावेतो आपली म्हटलेली माणसे तोडून आता आपल्याला जावयाचे आहे. नव्या ठिकाणी जमले तर ठीक, नाही तर ? अशी मनातल्या मनात खोल दडलेली भीती तिला अस्वस्थ करीत असते. किंबहुना ती अगदी घाबरून, बावचळून जाते. प्रेमविवाहातही अदृष्ट भविष्याची ही भीती नष्ट होत नाही. मात्र तेथे तिला आपल्या जोडीदारा-वरचा विश्वास व प्रेम यांची जाणीव आधार देते. अशा मन:स्थितीत धार्मिक विवाहमंत्रांनी जो मानसिक परिणाम होतो तो अत्यंत आश्चर्यजनक असतो. मंगलाष्टके, 'शुभमंगल सावधान,' इत्यादी संस्कारपूर्ण असलेले परिचित शब्द उच्चारून भटजींनी मधला अंतरपाट सोडून वधूवरांनी एकमेकांच्या गळ्यात माळ घातली की कशी जवळीक उत्पन्न होते हे सांगताना एक लेखिका लिहिते,

" वास्तविक ज्याची ओळखदेख नाही अशा परक्या पुरुषाच्या गळयात माळ घालायची. किती क्षुल्लक कार्यक्रम; पण मंत्रांचे सामर्थ्यच असे असते की त्यात एक नव्या जवळिकेची भावना येते." होमहवन, सप्तपदी, या सर्वच विधि-संस्कारांनी वधू–वर विशेषत: वधू – अगदी मंत्रमुग्ध होऊन जाते; "देवा-ब्राह्मणांसमोर आपण आता एकत्र झालो", "दोघांचे शतजन्मांचे अतूट नाते जडले", इत्यादी धर्मसंस्कारांनी होणाऱ्या परिणामांची रसाळ वर्णने; त्या नंतर होणारा, "तो अनोखा पण आपुलकीचा नवा स्पर्श", "ती विश्वास देणारी आपुलकीची नजर", यांची वर्णने जवळ जवळ सगळ्या लेखांतून सापडतात. हा परिणाम पाहिला की विवाहाच्या मानवी बंधनाला धार्मिक संस्काराची जोड देण्याची कल्पना काढणाऱ्या पूर्वसूरींचे मनुष्यस्वभावाचे ज्ञान किती अचूक होते हे कळून मन थक्क होते. कारण याच संस्कारांनी उत्पन्न होणाऱ्या भावनांनी दोन जीवांतील मानवी बंधन दृढ होते व संसारातील वाऱ्यावादळातही ते चटकन् तुटून जात नाही. लग्नातील ' सावधान ', शव्द, अंतरपाट फिटणे, नंतर होणारा होम, सप्तपदी इत्यादी संस्कारांचा वधूच्या मनावर होत असलेला सखोल परिणाम कितीतरी लेखांतून जाणवतो. त्यानंतर होणारा ' गृहप्रवेश 'ही असाच परिणाम करणारा आहे.

नोंदणी-विवाहात हे सर्व परिचित संस्कार होत नसल्याने आपल्या संस्कृतीत वाढलेल्या हिंदू मुलीला विवाह संस्कारात काही तरी उणीव राहिली असे सदैव वाटत रहाते. धार्मिक संस्कारांची नेहमीची पुटे न चढल्याने खरे समाधान वाटत नाही. त्यामुळे काही जण वैदिक संस्कारांनी लग्न करतात. त्याने धर्मसंस्कार झाल्याचे समाधान मिळते.

आमच्या नवविवाहित वधूंची नवी नवलाई विवाहविधीबरोबरच संपत नाही. त्यानंतरचे सारे वर्षच लग्नानंतरचे सण, व्रत-वैकल्ये इत्यादी धार्मिक, सामाजिक समारंभात जात असते. त्या काळात नववधू सारखी सासर-माहेरच्या खेपा करीत दोन्ही घरांचा जोड सांधते.

पूर्वीच्या काळी, कदाचित्, या साऱ्या समारंभांनी अल्पवयीन वधूचे पहिल्या वर्षी रुळायला आवश्यक असणारे सासर, माहेर लवकर होई. तिच्या मनाच्या हौशी पुरत व ती सासरी हळू हळू रुळत जाई. पण आता आमच्या नवविवाहिता अगदी लहान नसल्या तरी सासरी पूर्णपणे रुळून जाण्यापूर्वी प्रौढ वधूंनाही अशा रीतीची थारेपालट हवी असते. यौवनाच्या प्रांगणांत विहार करू पाहणारी वधू बाल्याची आठवण विसरलेली नसते. प्रौढ गृहिणीची नवभूमिका सादर करीत असता, हे प्रौढपणाचे ओझे फेकून अजूनही तिला बाल्यात रमावेसें वाटत असते. तिला माहेरची, भावंडांची, मैत्रिणींची, त्या निष्काळजी जीवनाची आठवण येते. त्यात चांगलेच मन रमते. ज्येष्ठी पौर्णिमा, मंगळागौरी, शिवामूठ,

गौरी-गणपती, दिवाळसण, संक्रांत इत्यादी दिवसांनिमित्ताने ती सारखी सासर-माहेर करते. त्या निमित्ताने खास तिचे असे कौतुक होते. त्यामुळे सासर-माहेर-कडून हे समारंभ नीट साजरे झाले नाहीत तर, आपल्या वैवाहिक जीवनात एक उणीव राहिली, "आपली हौस-मौज-कौतुक काहीच झाले नाही" याची तिला मोठी खंत वाटते. धार्मिक भावनांबरोबरच हे दिवस साजरे करण्यात नववधूच्या कौतुकाचा भाग असतो व तो तिला मनापासून हवासा असतो.

ज्येष्ठांतील आंबेवाणे, दागिने घालून, नटून थटून, शालू नेसून, नाकात नथ घालून, मिरवत, हातात पूजेचे तबक घेऊन केलेली वटपूजा, सासरी-माहेरी साजऱ्या झालेल्या मंगळागौरी, त्या वेळी केलेली पत्री-फुलांची आरास –नववधूंनी जोडप्याने केलेली पूजा, वशेळचांचे मौन व्रताचे जेवण, संध्याकाळी पुरुष मंडळींना बाहेर घालवून मनसोक्त खेळलेले खेळ, लाजत-लाजत घेतलेले उखाणे इत्यादी सर्व समारंभांचा, हौसेमौजेचा वधूच्या मनावर किती सखोल परिणाम होत असतो याचे चित्रण नवविवाहितांच्याच नव्हे, तर ज्यांच्या विवाहाला बराच काळ लोटला आहे, जीवनाच्या उतरणीला लागल्या आहेत अशा भगिनींनीसुद्धा फारच रंगून केलेले आहे. जेथे असे समारंभ झाले नसतील तेथे नवविवाहितेला वाटणारी खंत पण तिने तितक्याच तीव्रतेने व्यक्त केली आहे.

दिवाळी हा तर मोठा आनंदाचा सण. अशा वेळी माहेरी होणारे कौतुक, मानपान पण बहुतेक जणींनी अभिमानाने सांगितले आहेत. माहेरची स्थिती चांगली नसली किंवा माहेरी दोघांना बोलावणारे असे कोणी नसलेच तर मुली तितक्याच खट्टू होतात. सासरची माणसे समजूतदार नसली तर मुलीला टोमणे मारायचा तो एक विषय होऊन बसतो. त्या खेदाचीही वर्णने आहेत. दिवाळसणाला जावयाला काही दिलेच पाहिजे ही गोष्ट इतकी सरावाची होऊन बसली आहे की, एखाद्या जावयाने काही नको सांगितल्यास ते खरे न वाटता, तो रुसून मनाप्रमाणे न मिळाल्याने असे म्हणतो, अशी समजूत होते.

संक्रांतीच्या सणाच्या वेळी हलव्याचे दागदागीने करून ते वधूवरांना सासरहून-माहेरून पाठवावयाचे, ही चाल अलिकडे १५–२० वर्षांतच पडली असावी. कारण त्या पूर्वीच्या अनुभवलेखांतून "आमच्या वेळी फक्त वाणे देणे होई व काही तरी नववधूच्या हातून लुटवीत. ही हलव्याच्या दागिन्यांची पद्धत नव्हती" असेच उल्लेख सापडतात.

या सर्व समारंभाच्या मागे असलेल्या धार्मिक भावनांपेक्षा त्यात वाटणाऱ्या हौसे-मौजेमुळेच हे समारंभ फिरून अत्यंत हौसेने व उत्साहाने, नवविवाहितेच्या कौतुकाचा भाग म्हणून आताही साजरे केले जातात. त्यामागील धार्मिक भावना अद्यापही नष्टप्राय झालेली नाही. तरी काही वेळेला तेथेही प्रश्नचिन्ह उमटतेच. वटपूजेच्या वेळी पतीला आयुष्य मागायचे असते. 'जन्मोजन्मी हाच पती लाभो'

असा वर मागायचा असतो. पण नवऱ्याला नकोशी झालेली एक नवविवाहिता वटपूजा करीत असतानाच तिचे प्रौढ, दु:खी मन बंड करून उठते व ती स्वत:लाच विचारते, " यांना मी नकोशी झाले असता जन्मोजन्मी यांचीच गाठ असूं दे " असे मागण्याचा मला तरी काय अधिकार ? दुसरी एक सुशिक्षित वधू शिवामूठ वाहात असता, " निदान एक वर्षतरी आम्हाला मूल नको, जरा मजा करू दे," असे मनात इच्छित असल्याचे तिच्याकडून शिवामुठीविषयी लिहिताना कळून आले. काही असले तरी हे सर्व समारंभ हिंदू-नवविवाहितेच्या प्रथम वर्षाचे एक अविभाज्य भाग म्हणून होऊन बसले आहेत. कालांतराने त्यांचे स्वरूप बदलले आहे पण मनुष्याच्या उत्सवप्रियतेमुळे त्यांची लोकप्रियता कमी होईल असे वाटत नाही. शिवाय नव्या घराच्या, भोवतालच्या समाजात, नववधू अशा समारंभांनीच लोकांशी परिचित केली जाते, हेही त्या समारंभाचे कार्य नाकारता येत नाही.

**श्वशुरगृही :**

आपल्याकडे लग्नानंतर आपली नववधू अजून तरी प्रथम गृहप्रवेश करते ती वराच्या कुलात, श्वशुरगृही म्हणजे सासरी. स्वत:च्या घरी नव्हे. उंबरठ्यावरचे माप ओलांडून नव्या कुलात ती गृहलक्ष्मी म्हणून येत असते. म्हणूनच " विवाह म्हणजे दोन जीवांचे मीलन असले तरी दोन भिन्न कुटुंबांना जोडणारा एक नाजुक रज्जू, फार ताणला असता तुटणारा, नाही तर अनेक मने जोडणारा धागा, " अशीच सर्वसामान्य आपल्या वधूंची कल्पना असते, असे बहुसंख्य लेखांवरून दिसून येते. एकीने वधूच्या त्या वेळच्या मन:स्थितीचे चांगले वर्णन केले आहे. ती लिहिते, " उंबरठ्यावरचे माप ओलांडून दुसऱ्या कुळांत आल्यावर स्त्रीचा एक प्रकारे पुनर्जन्मच होत असतो. 'गृहप्रवेशा'ने घरात शिरल्याबरोबर प्रथम तिचे नवे नाव तांदुळात लिहिले जाते—आणि तेथून सारी नवीन माणसे, नवीन नाती जडतात. पहिले स्वच्छंदी, मोकळे जीवन संपते व आता ती कोण्या एकाची पत्नी, कोणाची सून, कोणाची काकी, कोणाची मामी, वहिनी, जाऊ अशा तिच्या नव्या भूमिका सुरू होतात. " दुसरी एक लिहिते, " येथून बाल्य संपते आणि जबाबदारीचे जीवन सुरू होते. आता आपण मोठ्या झालो असे वाटू लागते." थोडक्यात, आपल्याकडील नववधू तारुण्याच्या भावविश्वात " असावे आपुले घरटे छान " असे स्वप्न पाह्यची सबळ इच्छा करीत असली तरी ते स्वप्न दूर-दूरवरच्या क्षितिजावरचे—काही कालांतराने झाले तर साकार होणारे, अशीच तिची भावना असते. सुशिक्षित-अशिक्षित कशीही वधू असली तरी प्रथम आपल्याला या नव्या घरी आता समरस व्हावयाचे आहे—एकरूप व्हावयाचे आहे, ही जाणीव घेऊनच येते. हा नवीन सांधा जोडणे—परक्या घराशी एकदम एकरूप होणे—हे मात्र तितके सोपे नसते.

पूर्वीच्या काळी मुली लहान, अगदी कोवळ्या वयात सासरी येत असल्याने त्या नव्या घराचे वळण लवकरच घेत. पण आता मुली मोठ्या असतात. त्यांच्या मानसिक, शारीरिक संवयींना एक विशिष्ट आकार आलेला असतो. म्हणून साऱ्या प्रौढ मुलींना विवाहबंधनाने नव्या घरी येताना, " आपले कसे होणार, काय होणार ", याची भीती वाटते. या जाणिवेने त्या चांगल्याच अस्वस्थ होतात. शिवाय सासर या शब्दाभोवती परंपरागत चालत आलेल्या कथांनी असे काही एक कल्पनाजाल विणले गेलेले आहे की, त्याने उत्पन्न होणारी दहशत काही अनुभव येण्यापूर्वीच प्रत्येक वधूला घाबरवून सोडते. " अस्सं सासर । वाइट बाई । कोंडूनी मारिते । " इ. सासरच्या भीतीची गाणी मुलींना लहानपणापासूनच परिचित असतात. सासरच्या प्रत्येक माणसाला कसे भ्याले पाहिजे, कसे अहो-जाहो म्हटले पाहिजे, हे सांगून एक वधू म्हणते, " काय सांगू, सासरचे कुत्रे भेटले तरी काम करणाऱ्या वधूला, " अहो ' हडा ' । टाकिते सडा । उडेल शिंतोडा ।।" असे त्याला सुद्धा जपून सांगावे लागते. " आणखी एकीने तर सासर म्हणजे सहा सुऱ्या ( सासू, सासरा, नणंद, दीर, जाऊ आणि पती ) असेच सासरचे वर्णन करून " माझ्या सुदैवाने मला इतकी प्रेमळ माणसे मिळाली होती की यातील एकाही सुरीने माझ्यावर कधी वार केला नाही. " असे पुढे सांगितले आहे. दुसऱ्या एकीने माहेर-सासर यांना एकमेकांना कधी न मिळणाऱ्या रेल्वेच्या रुळांची उपमा दिली आहे. ती म्हणते, " वास्तविक माझे सासर माझ्या परिचयाचे– नात्यातलेच होते. सून म्हणून पसंत करून त्यांनीच मला आणली होती. पण एकदा आल्यावर मला हे रूळ समांतर रेषांप्रमाणे एकमेकांना कधी न भेटणारे आहेत, असे आढळले. अनुभवांनी मला माहेर पूर्णपणे विसरूनच सासरशी समरस व्हावे लागले. "

या भीतीत बरेच तथ्य आहे असे निरनिराळ्या लेखातून वर्णिलेली वस्तुस्थिती पाहता म्हणता येते. आणि त्याचे कारण उघड आहे. एक पती सोडला तर इतर नाती अशी असतात की, त्यांनी नववधूचे परकेपण विसरून जावे असे जबरदस्त दुसरे काही आकर्षण नसते. उलट एक परक्या घरची मुलगी येऊन मुलाजवळ हक्काची जागा घेत असते. गृहस्वामिनी होते. घरच्या पोरी परक्या ठरतात. एवढेच नव्हे, कालांतराने सासूही बाजूला सरते. त्यामुळे अशा परक्या मुलीकडे पाहण्याचा दृष्टिकोण जर विरोधाचा राहिला तर नवल नाही. अशी सर्व प्रथम महत्त्वाची व्यक्ती म्हणजे सासू, दुसरी नणंद, तिसरी जाऊ व इतर मोठी माणसे. सासरच्या लहान मुलांत मात्र ही जाणीव नसते. पण ती वातावरण पाहून वागू लागतात. प्रथम तरी त्यांना समारंभाने वाजत-गाजत आलेली नववधू एकदमच आवडू लागते.

सर्वसामान्यपणे नवी वधू ज्याप्रमाणे सासरच्या प्रत्येक माणसाला जाणून घ्यावयाचा प्रयत्न करीत असते, त्याचप्रमाणे सासरचीही लहानमोठी माणसे

नववधू कशी आहे, कशी वागते, हे बारकाईने पाहात असतात. प्रत्येक घरचें वळण अखेर निराळेच असतें ते आत्मसात करायला वेळ लागतो. तोपर्यंत ती निराळेपणेच उठून दिसते. आधीच दहा- जणांच्या दहा नजरा सारख्या लागल्याने ती अगदी बोलण्या चालण्यापासून बुजरेपणाने वागू लागते. त्यात काही चुका होतातही. त्याशिवाय नव्या वातावरणाशी समरस होऊन जाण्याच्या आड कितीतरी बारक्याबारक्या गोष्टी येत असतात ! भाषा वेगळी असली तर होणारा गोंधळ सोडा, पण मराठीच भाषा असली तरी, "पिंजऱ्यातून दूध आण किंवा चहा मांड," असे म्हटले तर पुण्याची नागपूरला दिलेली नववधू चांगलीच गांगरते. नाशिकची बोली अहमदनगरला कळत नाही. याशिवाय प्रादेशिक भिन्नतेने येणाऱ्या चाली-रीतींचा वेगळेपणा, स्वयंपाकातील रुचिभिन्नता, सोवळे-ओवळे आणि यांच्या जोडीला नववधूचे स्वयंपाकांतील अज्ञान,. यामुळे चांगलाच गोंधळ उडतो. अशा वेळी सासरचे वातावरण मनमोकळे, असल्यास हसून थोडीशी चेष्टा होऊन पण मनाला बोचकारे न उठता वर उडालेला धुरळा खाली बसतो. पण तसे नसेल तर मात्र तो अखेर नववधूच्या डोळयात शिरून डोळयातून पाणी पडले तरी खुपतच रहातो. नवी सून टीकेचा एक विषय होऊन बसते.

लग्नानंतरच्या पहिल्या वर्षाच्या अशा गंमती किंवा रुतलेली शल्ये बऱ्याच लेखांतून आढळली. कोकणातून देशावर आलेल्या मुलीला बऱ्याचशा भाकरी किंवा पोळया भाजण्याचा प्रसंग आला तर तिची तिरपीट उडते व जावेला किंवा नणंदेला मदतीला यावे लागते. मुंबईसारख्या शहरात वाढलेल्या मुलीला, दळण-कांडण, विहिरीचे पाणी काढणे, उष्टी शेण करणे माहीत नसते. काही वेळा सोवळे-ओवळे, शिवाशिव यांचीही फारशी कल्पना नसते. अशा वेळी उडालेल्या त्रेधेचे वर्णन जवळ जवळ साऱ्या लेखांतून वाचायला मिळाले. सासरच्या साऱ्या-चालीरीती अंगवळणी पडून वधू तरबेज होईपर्यंत काही काळ जावा लागतो व तोपर्यंत बहुतेक जणींनी म्हणल्याप्रमाणे, "अरे संसार, संसार । जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके, मग मिळते भाकर ।। " अशी स्थिती झाल्याशिवाय रहात नाही. सध्याच्या दिवसात तरी बरेच वेळा एकदमच स्वतंत्र घरे होत असल्याने वधूला स्वयंपाक येत नसला तर चांगलेच नडते. अशा नववधूची त्रेधा पानोपानी वाचायला मिळाली. पण त्याबरोबरच कधी चहासुद्धा न केलेली मुलगी एकदा का "आपल्या माणसाला एखादी गोष्ट आवडते" असे कळले की, कधी ईर्षेने, किंवा कधी नव्या आपुलकीने प्रेमाने हे ज्ञान किती लवकर आत्मसात करते, हे पाहिले की, अखेर स्त्री सुशिक्षित असो, अशिक्षित असो, आपुलकीची भावना आली की त्यापायी ती स्वतःला किती बदलून घेते याचेही प्रत्यंतर पाह्यला मिळाले. पुष्कळ लेखातून अशा वेळी सासूने प्रथम

कडक अशी दिसत असतानाही नव्या सुनेला स्वयंपाक कसा शिकवला, सर्वांत मोठी असल्याने घरच्या चालीरीती, कुलाचार यांचे कसे वळण लावले याचेही वर्णन सापडते. सासरच्या अशा समजूतदार वागणुकीने मुलीलाही घराचा अभिमान वाटतो व दोन कुटुंबांचा सांधेजोड विनासायासे जमतो.

नवखेपणाच्या या भिन्नतेपेक्षा जेव्हा लग्नातील मानपान, देणीघेणी यावरून किंवा दोन्ही घरच्या आर्थिक परिस्थितीत पडणाऱ्या तफावतीमुळे नव्या सुनेला बरेच टोमणे मारले जातात, अधिक उणी बोलणी बसतात किंवा तिच्या माहेरचा अपमानास्पद उद्धार केला जातो, तेव्हा मात्र जाणत्या मुलींच्या मनाला घरे पडतात–मनाला चांगलेच तडे जातात. या वेळी नवऱ्यालाही फारसे बोलता येत नाही.

असे प्रसंग नाही म्हटले तरी घराघरातून केव्हाना केव्हा येतातच. तेव्हा "कोणी बोलले तरी उलट बोलू नये, उलट उत्तर करू नये", "सासरच्या माणसांना प्रेमाने आणि कामसूपणे जिंकावे," अशी माहेरची शिकवण मनात ठेवून मुलीने काही काळ कळ सोसली तर बहुतेक घरातून लवकरच सारे पारडे बदलते आणि आधी 'फणकारणारी' सासूही तिची कड घेऊन बोलू लागते. घराशी वधू चांगलीच समरूप होते.

काही वर्षांपूर्वी सुशिक्षित मुली, विशेषतः प्रेमविवाह झाला असता, पटकन् वेगळ्या होतात अशी सर्वसाधारण लोकांची कल्पना असे. पण बऱ्याच लेखांतून ईर्षेने किंवा आपण सुशिक्षित म्हणून घरात फूट पाडायला कारणीभूत न होता यशस्वी संसार करून दाखवावा या जिद्दीने त्यांनी सासरी सर्वांची मने जिंकण्याचे अवघड काम केले, असे मला आढळून आले. त्यांचे काही अनुभवजन्य उद्गार येथे दिल्याशिवाय राहावत नाही. "संधिकालात संयमाने वागणे बरे, विजेच्या मेघांचा गडगडाट व्हावयाचाच, त्याने मन झाकळून देता उपयोगी नाही." "नववधूच्या आयुष्यातले पहिले वर्ष परिक्षेचेच असते. इतर परीक्षांप्रमाणे तीतून पार पडले तर $\frac{3}{4}$ लढाई जिंकली म्हणायला हरकत नाही." "अनोळखी घरात आपुलकी निर्माण करणे हेच तर स्त्रीचे पहिले कर्तव्य." ही वर्णने वाचली की 'सर्वच सुशिक्षित मुली घरे फोडतात,' हा आरोप तितका खरा नाही, असे म्हणावेसे वाटते.

बरेच लेख वाचीत असता सुशिक्षित मध्यम वर्गातून तरी सासरच्या सासुरवासाची दाहकता गेल्या काही वर्षात बरीच कमी झाली आहे असे खास म्हणता येईल. पूर्वीही समजूतदार घराण्यातून–मग ती खेड्यातील असो वा शहरातील असो, चांगली वागणूक मिळत असे. पण अलीकडे तर नव्या सुनांना पूर्वीइतका जाच होत नाही. त्या बऱ्याच मोकळ्या वागू शकतात.

पूर्वी सासुरवाशीण ओटीवरसुद्धा फारशी येऊ शकत नसे. वडील किंवा

भाऊ भेटण्यास आले तरी त्यांच्याशी मोकळे बोलू शकत नसे. तिचे सारे आयुष्य स्वयंपाकघर व माजघर व मागले अंगण यात जाई. पण आता अगदी जुनी घरे सोडली, तर शहरातून, सासरी असतानाही नववधूचा इतका कोंडमारा होत नाही. ती घरच्या मुलीप्रमाणे दिराशी, बाहेरच्या पुरुषमाणसाशी, माहेरच्या पुरुषमाणसांशी मोकळे बोलू शकते, बाहेर जाऊ शकते. स्वतंत्र संसारात तर पतीच्या मित्रांशीही ती मोकळेपणी गप्पा मारू शकते. अर्थात हे बरेचसे नवऱ्याच्या आवडीनिवडीवर अवलंबून रहाते. त्याचा संशयी स्वभाव असल्यास तिला या मोकळेपणाला मुरड घालावी लागते. पण तसे नसेल तर गृहिणी म्हणून ती चांगली मोकळेपणी वागू शकते. एवढेच काय, परिचयोत्तर विवाहात बरेच ठिकाणी सासू-सासरे इत्यादी वडील माणसांच्या देखत नाही, तरी बरोबरीच्या नणंदा, जावा, दीरांच्या समोर नववधूने पतीला ये–जा म्हणण्याची, नावाने हाक मारण्याची प्रथा वाढत चालली आहे. अशा मोकळ्या वातावरणात पाश्चात्यांप्रमाणे मुलींचे अगदी स्वतःचे वेगळे घर नसले तरी सासर-माहेर हा भेद निघून जातो असे लेखांवरून दिसतेच. पण एरवीही दिसून येते. मात्र एकात्मतेची ही सांधेजोड चटकन् होत नाही. उभयपक्षी, विशेषतः मुलींनी जरा संयम राखला व प्रयत्न केला तरच मिळून घेता येते असे दिसून येते. काही घरी तर सासूला आई म्हणणे, सासऱ्यालाही पती किंवा नणंदा हाक मारतात अशी हाक मारणे अशी प्रथा सुरू झालेली दिसते. थोडक्यात, सासर हे पूर्वीसारखे 'नववधूचा कोंडवाडा' असे त्याचे स्वरूप बरेच ठिकाणी राहिलेले नाही.

या समंजसतेला अपवाद अजूनही सापडतात. दोन्ही घरे चांगली श्रीमंत असता मानपान, देणी घेणी, अशा बाबींवरून मुलीला टोमणे मारणे, छळणे, विशेषतः स्वतःच्या मुलाचे न्यून झाकण्याकरिता मुलगी वाईट, वाईट पायगुणाची असा सारखा बभ्रा करीत रहाणे, हे अजूनही १९६४–६५ मध्ये झालेल्या सुखवस्तू कुटुंबातील लग्नातही सापडते. तेव्हा मात्र "स्वभावो दुरतिक्रमः" असे म्हणण्याची पाळी येते. या घरात होणारा मुलींचा सासुरवास, छळ, हाल, कोंडमारा पाहिला की अगदी जुन्या काळाची, हरिभाऊ आपटयांच्या कादंबऱ्यांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही.

स्वातंत्र्यानंतर हिंदु-कोड-बिलाने आपले विवाहबंधनही अखेर मानवी बंधनच आहे, असे म्हणून त्याच्यातून सुटका करून घेण्याची मुभा ठेवली असतानाही या आमच्या वधू, 'केव्हा तरी हृदयपरिवर्तन होईल,' अशी वाट पहात, हवा तो छळ, जाच कोणत्या जोरावर सहन करतात व का हा प्रश्न पडतो. माहेरची माणसे तरी अशी परिस्थिती असता गप्प कशी बसतात, याचेच आश्चर्य वाटते. एवढे खरे की बरेच वेळा माहेरीही हा छळ कळत नाही. चांगल्या घरातील मुली आत्यंतिक, शारीरिक, मानसिक छळही परिसीमा होईपर्यंत सहन करतात,

कोणालाच सांगत नाहीत. ही सहनशक्ती लोकापवादाच्या भीतीमुळे येत असते का ? की . . . " तुला आता सासरच्या घरी दिली, तेथून बाहेर पडायचे तर, एक मानाने, नाहीतर मरणाने, " . . . अशी आमची जुनी समजूत अजूनही आहे ? की मुलांचा विचार वेगळे होण्याच्या आड येतो ? अशा वेळी, " लग्न म्हणजे जुगार ! आपला डावच खोटा पडला—आपण कमनशिबी ठरलो, " ही वधूची प्रामाणिक समजूत असते आणि अशा परिस्थितीत कधी कधी स्वतःच्या पायावर उभे रहाण्याची ताकद नसल्याने, तर कधी लोकापवादाकरिता, वधू सगळे सहन करीत राहते—आत्मयज्ञ करीत राहते—हेही दिवस जातील म्हणून वाट पाहते.

ही अपवादात्मक उदाहरणे सोडली तर स्पर्धालेख वाचीत असता आमच्या मुलींना सासुरवास होत नाही, असे जरी म्हणता आले नाही तरी तो कमी झाल्याचे प्रत्यंतर येते. परक्या घरची मुलगी स्वतःच्या घरात सामावून घेत असता त्या सांधेजोडात, मनुष्य स्वभावानुसार काही काळ थोडीशी करकर ऐकू आली तरी परिचयाने ते सांधे घासले जाऊन एकमेकात चांगले बसतात व विशेषतः मूल झाल्यावर तर चांगलेच बसतात, असा अनुभव दिसतो. याला कदाचित खालील कारणे असावीत. एक तर वधू लग्नाआधीच वयात आलेली असल्याने ती पूर्वी-सारखी संपूर्ण एकटी अशी पडत नाही. पतीला ती आपल्याकडे सहज वळवून घेऊ शकते. दुसरे म्हणजे आपल्याकडे पूर्वीसारखी ' एकखांबी ' एकत्र कुटुंब-पद्धती राहिलेली नाही. पूर्वी लवकर लग्ने होत असल्याने नवरेही लग्न झाले तरी शिकत असत व मुलीला सासरी सासूच्या हाताखाली दिवस काढावे लागत. तो प्रकार आता राहिलेला नाही. पांढरपेशा मध्यम वर्गातून व वरच्या वर्गातूनच नव्हे, तर ग्रामीण, अर्धशिक्षित, श्रमजीवी वर्गातूनही नवरा मुलगा मिळवता झाल्याखेरीज लग्न न करण्याची प्रथा वाढत चाललेली आहे. शिवाय महाराष्ट्रात तरी मिळवते होणे म्हणजे शेकडा ९० टक्के नोकरी करणे, असाच अर्थ होत असल्याने मुलाची बदली होऊन किंवा बाहेरच नोकरी लागल्याने सून व मुलगा कायद्याने विभक्त झाले नसले तरी वेगळे बिऱ्हाड करून राहण्याचा बराच संभव असतो. एकत्र रहात असतानाही वयात आलेला व स्वतंत्रपणे मिळवू लागलेला मुलगा अगदी निमूटपणे आईबापांच्या म्हणण्याला मान तुकवील असा नेम नसतो. अशा वेळी मनुष्यस्वभावानुसार जी काय थोडीशी करकर होईल ती सोडली तर त्यापेक्षा एकतंत्री सुलतानशाही चालवणे अंती हिताचे नव्हे, हे ओळखण्याइतका सूज्ञपणा साधारणपणे समजूतदार मंडळीत येतोच. काही वेळा मुलींची अर्थार्जनक्षमताही सारेच पारडे बदलण्यास कारणीभूत होते.

आता, वाढत्या वयातील मुलीही तितक्याच समजूतदार असतात. " पती हा जरी आपल्या जीवनातील मुख्य देव असला तरी मुख्य देवळाभोवती

असणाऱ्या इतर देवांना ज्याप्रमाणे आपण डावलून न जाता पै-पैसा, तांदूळ त्यांच्यापुढे ठेवून नमस्कार करतोच, तसेच संसारातही आहे, " अशी मुलीला जाणीव होते. म्हणून सासूसासरे यांनीही अखेर ही नवी मुलगी आपल्या हक्काची, घरची, आपल्या वंशाचा दिवा लावणारी, म्हणून तिला प्रेमळपणाची वागणूक दिल्याची बरीच उदाहरणे दिसून आली. काही वेळा तर नव्या सुनेने, " देवा, माझी पुढच्या जन्मी इथेच गाठ घालणार असलास तर याच सासूबाई दे, " म्हणून देवाजवळ प्रार्थना केल्याचेही काही लेखातून आढळले.

खेड्यातून व मागासलेल्या वर्गातून मात्र सुनेला उपाशी ठेवणे, छळणे, मारणे असे प्रकार अजूनही चालत नाहीत असे म्हणता येत नाही. पण तेथेही मुलीचे वय–शिक्षण वाढलेले असल्याने विभक्त होण्याची संभाव्यता वाढलेली असल्याने व मुलगा कमवता असल्याने काहीसा पायबंद पडलेला आहे. शिवाय तेथेही माणुसकी म्हणून अखेर असतेच. तथापि लग्न म्हटले की आधी सासर व सासरी वास ही जोडी आमच्या मनात साहचर्याने इतकी दृढ बसलेली असते की स्पर्धा-लेखिकांपैकी काहींनी तर " मी अखेर सासरची मने कशी जिंकली व त्यामुळे मला जीवनाची $\frac{3}{4}$ लढाई जिंकल्याचा कसा आनंद झाला, " हे वर्णन करण्यातच लेखाचा बराचसा भाग खर्ची घातलेला आहे. तेथे पतीलाहि फारसे स्थान नाही.

स्पर्धेकरिता आलेल्या लेखांतून नववधूंचे असे तारेवरची कसरत करणारे चित्र दिसत असले तरी गेल्या काही वर्षात सासरच्या घरी अजिबात मिसळून न जाता पाहुण्यासारखे राहून स्वतःचे घर थाटणाऱ्या नववधूंची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे, हे दृष्टीआड करता येत नाही. जेथे, सासर-माहेर या दोन घरात किंवा खुद्द सासरीही, मुलाच्या चांगल्या नोकरीमुळे किंवा धंद्याने, परिस्थितीत सांपत्तिक तफावत होत जाते, किंवा जुन्यानव्या विचारांचा, रीती-भातींचा फरक पडतो, तेथे संपन्न घरातील मुली, सासर हे कधीच स्वतःचे घर मानीत नाहीत असे दिसते. कधी काळी जावे लागले तरी पाहुण्यासारख्या वागून त्या परततात. सासू-सासरा किंवा इतर संबंधीयांशी त्यांची आपुलकी कधीच जडत नाही. विवाहाच्या पूर्वकल्पनेप्रमाणे दोन घराण्यांचाही येथे ‘ स्नेहसंबंध ’ फारसा घडून येत नाही. एवढे खरे की, विभक्त राहणी असल्याने आपसात वितुष्टही फारसे येत नाही. आपल्याकडील शेतकीप्रधान संस्कृतीवर अवलंबून असलेली एकत्र कुटुंबपद्धती बदलत जात असून नव्या औद्योगिक यंत्रयुगीन संस्कृतीची पावले भराभर चाल करून येत आहेत असे दिसते. पण अद्याप आपले कल्पनाविश्व मात्र मागेच रेंगाळते ( कल्चरल लॅग ) आहे.

**पतिभेट मधुचंद्र व पतिपत्नी संबन्ध**

पूर्वीच्या लग्नात जेव्हा मुली वयातही आलेल्या नसत तेव्हा लग्नानंतर

पतिभेटीचा प्रश्नच नसे. सासू किंवा घरातील वडील स्त्री नव्या नवरीला पुढे घेऊन निजत अथवा समवयस्क नणंदात तिचा बिछाना घातला जाई आणि वयात आल्यावर धर्मविधिपूर्वक पतिपत्नींची भेट केली जाई. गेल्या काही काळात या पद्धतीत झपाटयाने बदल होत चालला आहे. आता मुली वयात आलेल्या असल्या तरी काही जुन्या घरातून, लग्नानंतर विधिपूर्वकच पहिली भेट केली जाते, असे दिसून येते.शहरातून, विशेषत: शिकलेल्या सुशिक्षित वर्गांतून अशा विधिपूर्वक पहिल्या भेटीला जाणीवपूर्वक फाटा दिला जातो. या वधूवरांना अशा बाबतीत कसलाच गाजावाजा नको असतो. विधिपूर्वक भेट नसली तरीही पहिल्या भेटीच्या दिवशी फुलांनी शेज शृंगारणे, मेवामिठाई ठेवणे वगैरे प्रकार होतात, नाही असे नाही. कारण तो एक उत्सवप्रियतेचा भाग असतो. मात्र पूर्वीइतके अगदी गाजावाजापूर्वक दोघांना कोंडले जात नाही.

व्यक्तिस्वभावानुसार काही वर वधूंची प्रथम भेट होण्याकरिता पाहुणे वगैरे मंडळींची गर्दी कमी होईपर्यंत थांबतात. तर काही ताबडतोब दुसरेच दिवशी नोकरीवर रुजू व्हावयाचे म्हणून किंवा अन्य कारणाने अधीर होतात. एका लेखात होमहवनाच्या वेळीं वधूचे सुंदर डोळे धुराने लाल होतात, धूर तिला त्रास देतो हे पाहून आपुलकीचा कटाक्ष टाकून स्पर्श करणारा वर " आज रात्री नाही तर उद्या, मी याची भरपाई करीत अं, " असे काही तरी हळूच वधूच्या कानात कुजबुजल्या कारणाने ती लाजून अधोमुख होते, असे वर्णन आहे. वराने काढलेले असे सूचक उद्‌गार, नजर यांचे वर्णन बरेचदा सापडते. एकंदरीत आपल्या लग्नगर्दीत वधूवरांची खूप चेष्टा केली जाते. उखाणे, घांस, लवंगा ( ह्या गोष्टी एके काळी बंद झाल्या होत्या; पण फिरून येऊ पहात आहेत. ) इ. रूढ प्रकारांनी त्यांच्या मनोभावना फुलविल्या जातात. पण दोघांना आवश्यक असलेला एकांत मिळणे मात्र कठीणच असते. व मिळाला तरी भोवतालच्या गर्दीने व मनात उदित झालेल्या नव्या अपरिचित जाणिवेने वधू आणि काही वेळेला वरही इतके संकोचून गेलेले असतात की, त्यांना ओळखीच्या माणसांतून कुठेतरी दूर जावेसे वाटते. एका वधूने या मन:स्थितीचे वर्णन फारच स्पष्ट शब्दात केले आहे. ती लिहिते, " लग्नाचा सोहळा संपला. त्या रात्री घरात खूप गर्दी होती. आम्हाला एक वेगळी खोली देण्यात आली होती. पण सगळी माणसे, बरोबरीच्या मैत्रिणी जमल्या असता, त्यातून उठून त्या खोलीत जाणे मला अगदी नको होते. ठरल्याप्रमाणे आम्ही कुठे खजुराहो किंवा अशाच दूरच्या ठिकाणी जावे, असे माझ्या मनात फार होते. पण यांना लगेच कामावर रुजू व्हावयाचे होते. ते शक्य नव्हते. मीही लगेच त्यांच्याबरोबर जाणार नव्हते. . . .इ. त्यामुळे मी अगदी संकोचून गेले. . ." दुसऱ्या एका मुंबईच्या वधूने लिहिले, " अखेर आम्हाला हवा असलेला एकांत एकदाचा मिळाला. आमची व्यवस्था पाठीमागल्या गॅलरीत केली होती. गॅलरी चांगलीच

प्रशस्त होती, पण लगेच आतल्या खोलीत दीर, एका बाजूच्या खोलीत सासरे-सासूबाई व इतर माणसे यामुळे ऐकू जाईल या भीतीने आणि लाजेने आम्हाला धड मोकळेपणी बोलता सुद्धा येत नव्हते. यांच्या मनात हनीमूनला जायचे होते, पण ते तेवढे झेपणारे नव्हते. ''

अशी वर्णने वाचली की, परस्परांचा परिचय होऊन जवळीक होण्यास आवश्यक असणारे मोकळे वातावरण आपल्या घरातून तितके मिळत नसल्यानेच पाश्चात्यांची मधुचंद्राची प्रथा आपलेकडे आता चांगली रूढ होत चालली आहे. १९४०–४२ पर्यंत वरच्या श्रीमंत, सुशिक्षित, सुधारक वर्गातच ही प्रथा दिसे. पण ती उदाहरणे अपवादात्मकच होती. त्या काळच्या बहुतेक साऱ्या लेखिकांनी आमच्या वेळी आताची मधुचंद्राची प्रथा नव्हती, असाच उल्लेख केला आहे. तथापि तदनंतर मधुचंद्राच्या प्रथेचे आपल्या समाजात चांगलेच मूळ धरू लागले. मुंबईसारख्या शहरातून तर, जागेच्या अडचणीमुळे, हवा तो एकांत व मोकळेपणा मिळणे दुरापास्त होत चालल्याने लग्न झाल्याबरोबर लगेच वधूवरांनी मधुचंद्राला जायची प्रथा आता चांगलीच वाढू लागली. स्पर्धेच्या लेखांवरून या कल्पनेचे लोण खाली खेडेगावापर्यंत पोहोचले आहे, असे दिसून येते. खेड्यातील काही तरुणींच्या लेखातून मधुचंद्राचा उल्लेख सापडतो. पण तो मात्र त्याचा अर्थ समजल्याशिवाय. मंगळागौर, ज्येष्ठी पौर्णिमा, यांसारखेच ते काहीतरी असावे अशी त्यांची कल्पना झालेली असते. मुलाने मधुचंद्राला जायचे घरात कळविल्याबरोबर, "आमच्या वेळी नव्हती बाई असली खुळं. '' असे उद्‌गार काढणाऱ्या सासूला नाराज करू नये म्हणून सासूला खूष करण्याच्या इच्छेने एकदोन दिवसाची नववधू आपल्या पतीला म्हणते, " मग तो तुमचा मधुचंद्र की काय तो मला इथेच दाखवा ना, त्यासाठी सासूबाईंना नाखूष करून आपण कशाला मुद्दाम बाहेर जायचं ?'' मी असे म्हटल्यावर ते हसले व 'दाखवीन अं', असं म्हणाले. पण दुसऱ्या दिवशी आम्ही यांच्या हट्टाप्रमाणे बाहेरगावी गेलोच.त्यांचे हे मधुचंद्र म्हणजे काय प्रकरण आहे हे तेव्हा मला कळले. अजूनही कोणी मधुचंद्राचे नाव काढले की मला त्या प्रसंगाची आठवण होऊन लाज वाटते. '' दुसऱ्या एका भगिनीने, " पौर्णिमेच्या रात्री बरसणाऱ्या चांदण्यात बगिच्यातील ( तो सार्वजनिक होता ) त्या हिरवळीवर बसून मनसोक्त गप्पा केल्या व आमचा मधुचंद्र साजरा केला, '' असे उद्‌गार काढले आहेत.

मधुचंद्र अनुभवलेल्या बहुतेक लेखांतून त्या दिवसात वधूवरांना मिळालेला मोकळेपणा, स्वातंत्र्य, एकमेकांचा अष्टौप्रहर सहवास याने " आम्ही कसे धुंद होऊन गेलो. त्या धुंदीत संकोच कसा गळून पडला. एकमेकांच्या स्वभावाचा चांगलाच परिचय झाला '' व एक वेगळीच " दोन जीवांची नवी जवळीक '' घेऊन " आम्ही कसे परतलो, '' याची वर्णने सापडतात.

सासरी, घरी राहूनच पतिभेट झाली असता त्या जीवनाचे वर्णनही काहींनी

फार खुमासदार केले आहे. " त्याच दिवशी रात्री आमचे बिछाने वर घातले होते. रात्र झाली तशी वन्संनी हसतहसत पाण्याचा तांब्या घेऊन मला वर जायला सांगितले. छाती धडधडत होती. मी वर गेले. हे माझी वाट पहातच होते. दुसऱ्या दिवशी सकाळीच मी खाली आले ती संकोचूनच. आल्याबरोबर जाऊबाईंनी माझ्याकडे हसून पाहिले आणि मला विचारतात, " का, रात्री झोप आली का ? " जवळच मोलकरीण भांडी घाशीत होती. तीही हसू लागली. मी तर इतकी लाजून गेले की मला मान वर करावीशी वाटेना. मनात आले, " ही कसली बाई थट्टा ?" " अर्थात् दिवसा आम्ही इतक्या माणसात बोलत नसू. सारे काम नेत्रपल्लवीवर चाले. " मी तरी या बाबतीत फारच जपत असे. वाटे उगीच नको टीका. हे जवळ येतात असे वाटले की, पटकन् काहीतरी काम काढून मी तेथून सटकायचीच. " अगदी अपरिचित असलेल्या वधूवरांचे ' दहा माणसात ' जे असे लपंडावी प्रेम चालते व त्यामुळे त्याला " जी काय अपूर्व लज्जत येते ती अलिकडच्या प्रेमविवाहात नसते, " असे बऱ्याच वयस्कर भगिनींनी आपले विवाह व आपल्या मुलांचे प्रेमविवाह पाहून उद्‌गार काढलेले आहेत. त्यांच्या मते प्रेमविवाहात लग्नाआधीच त्यातला गोडवा संपतो. एकजण लिहिते, " सध्याच्या विवाहात सोडावॉटरच्या बाटलींतील फसफसाटाप्रमाणे सारा फसफसाट आधीच होऊन प्रणयाची माधुरी संपून गेलेली असते. " दुसऱ्या एका लेखात एक भगिनी लिहिते, " आमच्या काळी वधूवरांना इतका मोकळेपणा नसल्याने त्यांच्यातील शारीरिक मानसिक आकर्षण लग्नानंतरच सुरू होई व दहा माणसात असल्याने, मोकळेपणी वागता येत नसल्याने त्यातील गोडी पुष्कळ दिवस टिके. " दुसरी एक लिहिते, " अशा विवाहात २० टक्के होणारे दुर्दैवाचे अपघात सोडले तर त्या वेळेला ८० टक्के तरी विवाह यशस्वी होत असत. "

वरील समजुतीला प्रेमविवाह झालेल्यांच्या वर्णनावरून तरी आधार मिळत नाही. प्रेमविवाह म्हणजे सुखी जीवनाची किंवा सुखी संसाराची गुरुकिल्ली असे समीकरण मांडणे बरोबर नाही. कारण अशा विवाहातही प्रथम एकमेकांच्या सहवासाकरिता आतुर असलेले वधूवर काही दिवसांनी छत्तिसाच्या आकड्यांचा पवित्रा घेऊन बसलेले दिसतात. त्याचप्रमाणे " लग्नाआधी काही तास येऊन भेटणारा प्रियकर विवाहाने चिरप्रवासाचा साथी झाला की, त्याच्या वृत्तींत महदंतर पडलेले जाणवते. " हे जरी खरे असले तरी, येथे आलेल्या एकंदर ६० प्रेमविवाहात दोन विवाह थोड्याच दिवसात अयशस्वी झाल्याचे दिसून आले त्यावरून अशा विवाहातील गोडी लवकर संपते, असा निष्कर्ष काढणे धाष्टर्याचे होईल. उलट दोन प्रेमी जीव विवाहबंधनाने, शरीर-मनाने एकत्र आल्यावर त्यांच्यात आधीच उत्पन्न झालेली एकात्मतेची भावना अधिक दृढ होते, परस्परांकरिता सर्वस्व समर्पण करण्याची इच्छा उत्कटतेला पोहोचते, असेच दिसते. एकदोघींनी तर या पहिल्या दिवसात

' अद्‌भुत आनंदाचा साक्षात्कार " झाल्याचा," शब्दांपलीकडील काहीतरी अव्यक्त, उत्कट, गवसल्याचा " आनंद व्यक्त केला आहे. हे अद्‌भुत, उत्कट काय आहे हे जरी नेमके सांगता आले नाही तरी एवढे खरे की, अशा विवाहातून एकमेकांच्या सहवासाने आपले जीवन पूर्ण करण्याकरिता एकमेकांची उत्कट गरज भासते. एकमेकांवरील अनुरागाने, गाढ विश्वासाने, आता आपण दोघे नसून एक आहोत व जगातील कोणत्याही संकटांना जोडीने तोंड देण्यास समर्थ आहोत, असे तीव्रतेने वाटत राहते. सारे जीवन विकसते आहे असे वाटते. इतर विवाहातूनही ही जाणीव येते पण ती यावयाला काही कालावधी लोटावा लागतो. येथे ती पहिल्यापासूनच असते. विवक्षित व्यक्ती आपल्या जीवनाचा जोडीदार म्हणून मिळाली तरच जीवन फुलून येईल, नाहीतर जीवनरस सुकून जाईल अशी भावना येथे असते. जीवनातील ही जाण व गरज सारे जीवन मोहरून टाकीत असल्याने आपल्याकडे प्रेमविवाह करणाऱ्या व्यक्तींना अजूनही आपण काही जगावेगळे विशेष केले असे वाटत असल्याचे पुष्कळ वेळा दिसते.

नवविवाहितांच्या जीवनासंबंधी खेडेगावातील एका भगिनीने सादर केलेला अनुभव, त्यांचा किती कोंडमारा करून त्यांना अगदी खालच्या पातळीवर नेऊन व्यवहार करायला लावणारा आहे, याची कल्पना येथे जो एक लेख उद्‌धृत केला आहे त्यावरून येईलच. ती लिहिते, " नवऱ्याने गुपचूप येऊन सारा कारभार करून जायचा. " बायका म्हणतात, " पाच पोरे झाली तरी आम्ही नवऱ्याचे तोंडसुद्धा पाहिले नाही. " " मला तर काही वेळा सगळ्या अंगावर पुलकित होऊन कळ्या याव्या नी लगेच गळून पडाव्यात असे होई. " त्यावरून ' आंबेवनातील ' लावणी-वाङ्मयाच्या प्रणयातील शृंगार आणि खराखुरा वास्तवातील शृंगार किती दोन टोकांवर चालत होता किंवा चालतो याची कल्पना येते.

खेडेगावतील ही परिस्थितीही दिवसानुदिवस मुली शिकल्या व वयाने वाढू लागल्या की बदलत जाईल. कारण मध्यमवर्गातून किंवा शहरातूनही विवाह-सौख्याच्या बाबतीत पूर्वी हीच परिस्थिती होती. पूर्वी त्यात मोकळेपणा असा केव्हाच नव्हता. पण आता स्त्रीपुरुषांच्या पूर्वीपेक्षा मोकळेपणी वागण्याने ती परिस्थिती बदलत चालली आहे. समुद्राला भरती यावी किंवा चंद्राला वेध लागावे त्याप्रमाणे केवळ कामपूर्तीची परिसीमा गाठण्यापूर्वी दोघांनी एकत्र फिरायला जाणे, सिनेमा, वगैरे गोष्टींनी अशा पूर्तीला जी रंगत चढत जायला पाहिजे असते ती घेण्याइतका मोकळेपणा दिवसानुदिवस तरुणतरुणींना मिळू लागला आहे. स्त्री-पुरुष संबंध पूर्वीइतके दबलेले, कोंडलेले न राहाता जरा जास्त मोकळे, जास्त खुले होऊ लागले आहेत हेही बदलत्या काळाचेच चिन्ह आहे.

**" वैवाहिक " सुखाची तृप्ति**

विवाहानंतरच्या पहिल्या दिवसात पतिपत्नीच्या रंगलेल्या जीवनतृप्तीची

वर्णने लिहिणे पूर्वीच्या काळी शक्यच नव्हते. पण आता या लेखातून काही तरुण व काहीशा अर्धशिक्षित लेखिकांनी ती वर्णने फारच मोकळेपणी व रंगवून केलेली आहेत. बहुतेकांनी संयम वापरला आहे. तथापि त्या संयमातून सुद्धा या दिवसातील तृप्तीने बहरलेल्या मनाचा तृप्ति-हुंकार शब्दांनी साकार करण्यात त्यांनी कमालीचे यश मिळविलेले आहे, यात शंका नाही. एक लेखिका लिहिते, "ग्रीष्माने तप्त झालेली पृथ्वी वर्षामेघांच्या जलधारांनी तृप्त होऊन पल्लवित व्हावी तसे माझे शरीर व मन सारे जीवन पल्लवित झाले होते." तर एका ठिकाणी दुसरी म्हणते, "मंगळागौरीला मी माहेरी निघाले तेव्हा यांनी 'लौकर यायचं अं' असे मी जाणार म्हणन किंचित रुष्ट होऊनच मला बजावले. मला तर मी माहेरी जाणार, फिरून भावंडे, मैत्रिणी यांच्यात निश्चिंत मनाने, प्रौढपणाचे ओझे फेकून देऊन वावरणार म्हणून कोण आनंद झाला होता ! पण प्रत्यक्षात माहेरी गेल्यावर मी माहेरी रमत असताही मला एखादेवेळी एकदम सासरची ओढ लागे. यांचे शब्द आठवत व किती तरी गोड आठवणींनी शरीर पुलकित होऊन मी क्षणभर स्वतःला विसरून जाई. मन माहेरी असताही सासरची ओढ घेई." गरीबी, श्रीमंती, सासु-सासरे व इतर लोक यांची गर्दी, जागेच्या अडचणी, या सर्व अडचणी अनुभवीत असताही अशी वर्णने वाचली की, तेथे दोघांतील सुखी, तृप्त जीवनाची साक्ष पटते. तर काही वेळा सारे वर्णन वाचून विवाहसौख्य, विवाहसौख्य म्हणतात ते सौख्य म्हणजे पुरुषाने स्त्रीकडून तिच्या मनाची परवा न करता, तिला न खुलवता केवळ ओरबाडून घ्यावयाची त्याची तृप्ती असे म्हणण्याची पाळी येते. अशा वेळी, 'स्त्री म्हणजे भोग्या' 'वैषयिक पूर्तीचे एक साधन' या पलीकडे तिला अस्तित्व नसते. तिच्या समाधानाचा तर प्रश्नच नसतो, अशी वर्णने आढळली.

या स्पर्धालेखांतून पूर्वीच्या मानाने स्त्रियांनी किती तरी मोकळेपणे आपले अनुभव शब्दांनी साकार केलेले असले तरी कुठे तोल सुटलेला नाही. काही ठिकाणी तर नववधूंनी आपले अज्ञान दिलखुलास सांगितलेले आहे. ते वाचून करमणूक झाल्याशिवाय राहात नाही. अशा संपूर्णतया अजाण वधू फारच थोड्या आहेत. एकजण लिहिते, "मला तोपर्यंत स्त्रीपुरुषसंबंधाचे तसे काही ज्ञान नव्हते. माहेरी आईही नव्हती. त्यामुळे विधिपूर्वक आमची भेट ठरल्यावर मला सासूबाईंनी जसे सांगितले तशी मी वागले." दोन नवोढांना तर "पती असा का वागतो" याचेच कोडे पडले. पती कामाकुल होऊन पत्नीला जवळ घेऊ पाहात असता ती एकदम दूर सरते व "तुम्हाला काय झाले" म्हणून विचारते. दुसऱ्या एका विवाहात "प्रथम भेटीच्या वेळी मला माझ्या आतेवहिनीने एकंदर कल्पना दिलेली होती. म्हणूनच मी यांच्या मर्जीनुसार साथ देऊ शकले," असा स्पष्ट उल्लेख केलेला सापडतो. यावरून या ज्ञानाच्या बाबतीत अजूनही बरीच मुग्धता धरली जाते असे दिसते.

मराठी ग्रंथ सं

काही वेळा लेखिकांनी केलेले सुखी-समाधानी जीवनाचे वर्णन वाचीत असताही शब्दांतून मध्येच असा थिजलेला सूर लागतो की, येथे काही तरी खटकत आहे. खरे समाधान नाही अशी शंका मनाला चाटून जाते. " लग्न म्हणजे जीव घेणारा करार." अजूनही " लग्न म्हटले की, माझ्या पोटात भीतीचा गोळा उठतो " इत्यादी उद्‌गार त्या खटकण्यापायीच निघतात असे वाटू लागते. अशा ठिकाणी लग्नाबाबत भीती किंवा पूर्वग्रहाने कडवटलेले मन तर या जीवनातील रंगत बिघडून टाकीत नाहीना अशीही शंका येते.

अर्थात ही पहिली भेट ज्या ठिकाणी संपूर्णतया निरर्थकच झाली आहे असे नववधूंना अनुभवास येते, त्या ठिकाणी अत्यंत संयमपूर्वक शब्दात सांगितले असताही त्या शब्दातून नववधूंची होणारी दारुण निराशा, समोर पसरणारा अथांग अंधार मनाला चटका लावून जातो. अशा विवाहातून होणारी वधूची कुचंबणा फारच अस्वस्थ करून सोडते.

काही उदाहरणात, आधी एकाच्या प्रेमात असता दुसऱ्याशी विवाहबद्ध होण्याचा प्रसंग आल्याने पहिल्या भेटीच्या वेळी नववधूंची काय मन:स्थिती होते, विवाह-शपथांनी बद्ध झाल्यावर एकनिष्ठ राहण्याची इच्छा असताही ' उष्टावल्या '-ची खंत कसा मनोभंग करते किंवा लग्नपूर्व प्रेमाची ओढ, विवाह झाल्यावरही ताठरपणे उभी राहून वधू कशी विरोधी भूमिका घेते, याची प्रत्यक्ष अनुभूतीची वर्णने वाचीत असता, रहस्य कथेप्रमाणे आता काय होणार असे मनात आल्याशिवाय राहात नाही. अशा वेळी वरपक्षाने दाखविलेली उदारमनस्कता व समजूत पतिपत्नीसंबंधातही बदलत्या काळाची पावले पडत असल्याची जाणीव करून देते. त्याशिवाय ' अनाघ्रातं पुष्पं । किसलयमलूनं कररुहै: ' अशी अपेक्षा करणाऱ्या वरांकडून एवढा समजूतदारपणा दाखवून जीवनाचा डाव अखेर जिंकायचा सूज्ञपणा दिसून आला नसता.

पतीने किंवा पत्नीने आपली पूर्वीची प्रेमप्रकरणे मोकळ्या मनाने सांगून एकमेकांना विश्वासात घ्यावयाचे हे खरोखरच स्त्रीपुरुषसंबंधातील वाढत्या मनमोकळेपणाचे, निरोगी मनाचे व नीतिमूल्यें वास्तवाच्या पायावर येत असल्याचे द्योतक आहे. पूर्वीच्या काळी हे कधीच दिसून आले नसते.

दिवसानुदिवस स्त्रीपुरुषसंबंधात असा काहीसा मोकळेपणा येत असला तरी, या संबंधातील शारीरिक बाजू म्हणजे हीन दर्जाची, ती केवळ विषयवासना, ते पाप, ही पिढयान् पिढया असलेली समजूत अजूनही मूळ धरून आहे–नाहीशी झालेली नाही, असाच प्रत्यय येतो. प्रेमविवाहातील एक वधू लिहिते, " XXX सालपर्यंत म्हणजें लग्न होईपर्यंत आमचे प्रेम पवित्र होते. " दुसऱ्या एका उदाहरणात वधू बाप वारल्याने आईकडून इतक्या सोवळ्या व आश्रमीय वातावरणात वाढविली गेली होती की, तिच्या मनात स्त्रीपुरुषांचे असे संबंध म्हणजे पाप

अशी भावना दृढमूल झाली होती. विवाह झाल्यावर पतीची पहिली भेट झाली असता ती मलगी रंगून वागू शकली. पण नंतर पूर्ववयातील संस्कारानुसार आपल्या हातून पाप झाले, अशी तिच्या मनाने एवढी खंत घेतली की, दुसऱ्या दिवशी उठल्या पासून देवापुढे जाऊन सारखा नमस्कार करणे तिने सुरू केले. काही झाले तरी ती देवघर सोडीना. अखेर ती मुलगी वेडी झाली व नवऱ्याने टाकली. ही उदाहरणे अपवादात्मक आहेत. वास्तविक आपल्याकडे कामपूर्तीलाही धर्माचे अधिष्ठान दिल्याने मूलतः ती पापी वासना अशी समजूत नाही. तथापि बुद्धानंतर स्त्री हे पापाचे मूळ, शरीरवासना ही पापपूर्ण ही समजूत पिढ्यान्‌पिढ्या इतकी दृढ झालेली आहे की, त्यातून वर यायला अजूनही काही काळच लोटला पाहिजे.

**आर्थिक परिस्थिती व संसार**

आतापर्यंत आपण आपले वैवाहिक जीवन अंतर्बाह्य कसे नकळत बदलत चालले आहे, कोणत्या गोष्टी त्यावर परिणाम करतात हे पाहिले. तथापि सुखी संसार व्हावयाचा असेल तर परस्परांवरील प्रेम व विश्वास याबरोबरच काही एका विवक्षित मर्यादेपर्यंत तरी आर्थिक स्थैर्य हे पाहिजेच असते. ते नसेल तर पेटणाऱ्या आगीत प्रेमिकांची मने सुद्धा करपून निष्प्रेम जीवन होण्याचा संभव असतो. मग इतरांची काय कथा ! पण त्या बाबतीत सुद्धा फरक होऊ लागलेला आहे.

ज्या ठिकाणी पतीची प्राप्ती चांगली असेल किंवा घरची सुस्थिती असेल तेथे कसलाच प्रश्न येत नाही. नववधू घरी येते, ती एका कोंदणात बसते, घराची शोभा वाढविते. पण अलीकडच्या काळात मध्यम व खालच्या वर्गाची स्थिती पूर्वीसारखी राहिलेली नाही. आर्थिक दृष्ट्या तेथे खूपच ओढाताण होते. एकट्याची प्राप्ती महागाईच्या संसारात पुरी पडत नाही. लहान भावंडांच्या शिक्षणाच्या अथवा आईबापांच्या जबाबदाऱ्या, वाढलेली भाडी, जागेची अडचण, शिक्षणामुळे वाढलेल्या किमानपक्षी राहणीच्या अपेक्षा, पुढे येणाऱ्या जबाबदाऱ्यांची वाढत्या वयामुळे प्रकर्षाने होणारी जाणीव या गोष्टींनी पतीची प्राप्ती पुष्कळच वेळा पुरेशी होत नाही.

जुन्या काळात अशा वेळी स्त्री कसलाच हातभार लावू शकत नसे. फार तर घरात काटकसरीने संसार करून कोंड्याचा मांडा करून दाखविण्याचे कौशल्य ती अंगी बाणवून घेई. अजूनही मध्यमवर्गात स्त्रीने नोकरी करणे हे पतीला कमी-पणाचे वाटते. तीही पुरुषाप्रमाणे शिकत असल्याने तिचीही ती एक मानसिक गरज असेल अशी कल्पनाही त्याला करवत नाही. म्हणून एखादेवेळी ‘ करमत नाही ’ किंवा ‘ वेळ जाण्याकरिता मी नोकरी करू का ’ असे नववधूने विचारले तर ‘ हो, तू आता नोकरी कर, मी घरी स्वयंपाक करतो. ’ असे म्हणून शक्यतो तिला नकार दिला जातो. तथापि दैनंदिन खर्चाचे मानच इतके वाढले आहे की, पत्नीला पतीची ओढाताण, डोळे झाकून स्वस्थ बसून पाहवत नाही.

तिच्यात अर्थार्जनक्षमता आलेली असल्याने अशा वेळी कधी पतीच्या संमतीने, तर कधी प्रथम पतीला न कळविता ती संसाराला हातभार लावू पाहाते. असे करताना नवविवाहितेवर चांगलाच कामाचा ताण पडतो. पण दोघात चांगली 'दिल जमाई' असेल तर अशाही संसाराची गोडी कमी होत नाही. उलट, 'एकेक काडी काडी जमवून चिमणाचिमणी जसे घरटे बांधतात' त्याप्रमाणे संसारांत नव्याने पदार्पण केलेले नवविवाहित जोडपे संसाराची एकेक गोष्ट आणून जेव्हा आपले घरटे सजवतात, बांधतात तेव्हा 'अक्षरशः आम्ही दोघांनी संसार उभा केल्याचा' एक अपूर्व आनंद त्यांच्या जीवनात येतो.

लग्नानंतर पहिल्या वर्षाच्या जीवनानुभवाची चित्रे वाचीत असता हा फरक १९४०–४२ नंतरच्या जीवनातून चांगलाच जाणवला. तोपर्यंत नवविवाहिता एका आधीच मांडलेल्या संसारात जाऊन बसे व नोकरीमुळे नवऱ्याची बदली मुख्य घरापासून दूर झाल्यासच तिला आपले घरटे सजविण्याचा आनंद मिळे. पण त्यानंतर नोकरीमुळे, जागेच्या अडचणींमुळे, विभक्त संसारांचे प्रमाण वाढू लागले. अशा वेळी नवविवाहिताही अर्थार्जनाबाबत संसाराला मदत करू लागल्या. आता मुंबईसारख्या शहरातून तर हे दृश्य सर्वसामान्य झाले आहे. इतर शहरातून, तालुका-गावातूनही अशा जीवनाची चित्रे कमी दिसत नाहीत. मात्र अशा वेळी दोघांच्या नोकऱ्या दोन गावी असल्या की, नवविवाहित जोडप्याची मोठी ओढाताण होते. कित्येक वेळा सासर एकीकडे, वधू एकीकडे व नवरा तिसरीकडे अशी त्रिस्थळी यात्रा होते. आणि काही दिवसांनी का होईना, विवाहित स्त्रीला जीवन अशक्यप्राय होऊन नोकरी सोडणे भाग पडते. अशा उदाहरणातील वधू बहुधा लग्न-पूर्वकाळापासून नोकरी करीत असते. दोघांची नोकरी एकाच गावी असल्यास मात्र दोघांचाही सुरळित संसार सुरू होतो. त्याला आर्थिक स्थैर्य प्राप्त होते.

स्पर्धेच्या लेखातून परिस्थितीचे असे 'आव्हान' स्वीकारून सकाळी ५ पासून तो रात्री ११–३० पर्यंत [ सकाळी ५ पासून ६–३० पर्यंत घरकाम, नंतर ७–१० ची गाडी गाठून सकाळचे कॉलेज, त्यानंतर १०–४५ ला घरी येऊन जेवण, ११–३० ला शाळेतील नोकरी. ६ ला घरी परतल्यानंतर स्वयंपाक-पाणी-जेवणे ९ पर्यंत व तद्नंतर अभ्यास ] कष्ट करीत अखेर परिस्थितीवर मात करणारी अलीकडच्या काळातील जीवनचित्रे थोडी असली तरी उठून दिसतात.

शिक्षणाने मुलींच्यात आलेल्या अर्थार्जनक्षमतेमुळे, कुमारिकांनी माहेरी असता पुरुषाप्रमाणे संसाराची सर्व जबाबदारी, स्वतःच्या लग्नाला लागणाऱ्या पैशासकट उचलली होतीच; पण लग्न झाल्यावरही त्यांनी मानपान, देणीघेणी, यात काही कमी पडून दिले नाही, असे दिसून येते. नवविवाहितांच्या या अर्थार्जनामुळे पत्नी, सून या नात्याने घरात प्राप्त होणाऱ्या स्थानातही निःसंशय बदल झालेला दिसतो. मुलाची नोकरी गेली ती सुनेच्या पायगुणाने गेली, असे म्हणून सुनेला

दोष देणारी सासू सुनेने संसाराचा भार उचलून धरला तर कुरकुर करीत नाहीशी होते. सुखवस्तू श्रीमंत घरात, गरीब घरातून आलेल्या सुनेच्या माहेरचा पदोपदी होणारा उद्धार तेच घराणे खालावून गेले असता सुनेच्या नोकरीपायी सावरले कीं तीच सून चांगली म्हणून सर्वजण गौरवू लागतात. अर्थार्जनक्षमतेमुळे विवाहितेला पतीच्या किंवा सासरच्या संसारात व कुमारिका असताना माहेरच्या संसारात प्राप्त होणारे हे नवे स्थान गेल्या २०।२२ वर्षातच उठावाने मिळू लागले. यामुळे सुनांकडे, पत्नीकडे पाहण्याच्या दृष्टिकोणातही काही ठिकाणी त्याने फरक पडला. आता स्त्री म्हणजे परतंत्र, दुबळी, विनाश्रया न शोभणारी लता, ही समजूत बदलत जाऊन वेळ पडली तर पुरुषाप्रमाणेच संसाराचा गाडा ओढणारी असाही दृष्टिकोण येत चालला आहे. या समसमानतेमुळे स्त्रीपुरुषांच्या काम करण्याच्या वेगळ्या कक्षा पण अलीकडे, पूर्वीइतक्या, काटेकोरपणे पाळल्या जात नाहीत. नवविवाहितांनी मांडलेल्या स्वतंत्र ‘ कोऱ्या ’ संसारात ‘ काडी काडी जमवून त्यांनी घर कसे सजविले, ’ किंवा अगदी ‘ शून्यातून आपला संसार कसा उभा केला ’ याचे चित्र गेल्या २०–२५ वर्षात पुष्कळदा पाह्यला मिळू लागले आहे.

**दोघांचे सहजीवन व संसार :**

परिचयपूर्वक असो वा नसो एवढे खरे की, विवाहाच्या पहिल्या दिवसात असणारी नवजीवनाची धुंद थोड्या दिवसात उतरते व मगच खऱ्या सहजीवनाच्या संसाराला सुरुवात होते. खरे स्वभाव कळू लागतात. त्यातील खटके उघडे पडतात, कच्चे रंग उडून जातात व खाली राहतात ते पक्के रंग, कधी सुंदर, गडद, कधी विटके दिसणारे.

स्पर्धेकरिता आलेल्या लेखातून सुखी-दुःखी संसाराचा मी काहीसा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला. त्या निरीक्षणावरून मला जी काय थोडीशी अनुमाने काढता आली, ती पुढे देत आहे.

‘ लग्नानंतरचे पहिले वर्ष ’ असे शीर्षक असले तरी यातील अगदी पहिले वर्षच लोटलेले असे लेख अत्यंत कमी आहेत. बहुतेक लेखांमागे ३ पासून ६० वर्षांची अनुभूती आहे. त्यावरून काढलेली ही अनुमाने वाचताना त्यात नेत्रदीपक किंवा नवे असे काही नाही असे वाटेल, तथापि त्यामागील प्रत्यक्ष जीवनानुभूती आहे, ती नाकारता येणार नाही.

विवाह ज्याकरिता करतात ते वैवाहिक सुख किंवा रतिसुख, विवाहात मिळण्याचा अजिबात संभव नसेल तर ते विवाह सुखी होणेच अशक्य. खऱ्या दृष्टीने ते विवाहच नव्हेत. पण असे विवाह होतात मात्र. अजूनही होतात. असे चार विवाह माझ्या वाचनात आले. त्यातील दोन निश्चितपणे वरील स्वरूपाचे होते. एका विवाहातील वर, जरठ होता. जवळ जवळ परलोकीच्या यात्रेलाच निघाला होता व लवकरच गेलाही. एकाने लग्नानंतर पहिल्याच भेटीला आपली शय्या वेगळ्या खोलीत घालून घेतली, व “ हे असेच राहणार आणि ते कोणाला सांगायचे

नाही, " असे वधूला बजावले. असे विवाह दुःखी होते हे सांगण्याची गरज नाही.

यापेक्षा अगदीच निराळे पण परिणामी काही दिवस तरी असेच, असे काही थोडेसे विवाह दिसून आले. यातील वरांना प्रेम-भंगामुळे किंवा पुढे शिकायची इच्छा असल्याने अथवा त्यांच्या मनात त्यांनी वधूंचे जे रेखाचित्र उभे केले होते, त्याशी वधू मिळतीजुळती नसल्याने किंवा अशाच इतर काही कारणांनी, लग्न करायची इच्छा नसते. पण वडील मंडळींचा शब्द मोडायचा नाही म्हणून ते लग्न होते. आणि काही काळ तरी वधूला वैवाहिक जीवनाचे खोटे नाटक करावे लागते. अशा वेळी वधूला अत्यंत मानसिक त्रास होतो. इतका की, कित्येक वेळा तिला पळून जावे किंवा जगाचा कायमचा निरोप घ्यावा अशीही इच्छा होऊ लागते.

अशी उदाहरणे थोडी असतात. पुष्कळ वेळा पुढे ही परिस्थिती वदललेलीही दिसते. पण त्याकरिता वधूला करावी लागणारी तपश्चर्या किती कठोर ! ते पाहिले की, असे वर लग्नाला उभे का राहतात याचेच आश्चर्य वाटू लागते.

सर्वसाधारणपणे जे विवाह होतात त्यातील दुःखी विवाहाप्रमाणेच प्रथम-पासूनच सर्वथैव सुखी अशा विवाहांचेही प्रमाण कमीच. बाकी सर्व विवाह एकदम सुखी न झाले तरी कालान्तराने दोन मनांची सांधेजोड चांगली बसून ते समाधानकारक होतात, असे दिसून येते. ही दिलजमाई होण्याच्या काळात नववधूंच्या संसारात खटकणाऱ्या गोष्टी कोणत्या आढळून आल्या त्यांची मी एक यादीच तयार केली. त्यातील काही वारंवार दिसणाऱ्या गोष्टी प्रथम येथे घेते व मग यादी देते.

वास्तविक लग्न म्हणजे दोन भिन्न जीवाचे एकत्र येणे . ही विभिन्नता कितीतरी प्रकारची असू शकते. आवडी-निवडी, रुची, स्वभाव, चालीरीती, अशा एक ना अनेक गोष्टी पहिल्या प्रथम संसारात चांगल्याच खटकतात. अशा वेळी जमवून घेण्याची जबाबदारी बहुशः स्त्रीवर जास्त पडते. व बहुतांश उदाहरणात पड खाऊन ती जमवून घेतेही. पण एकदा का ती रुळली की अशी विभिन्नता तितकी खटकेनाशी होते. याला आहारभिन्नता ( शाकाहार-मांसाहार ) स्वभावभिन्नताही अपवाद नाहीत. सासर-माहेरांतील गरीबी-श्रीमंतीमुळे पडणारी तफावत प्रथम चांगलीच बोचकारे काढणारी असते. पण अखेरीला पतीचे घर ते आपले घर–हक्काचे घर असे आपली वधू मानीत असल्याने तेथेही ती जुळवून घेते व त्याची फारशी खंत करीत बसत नाही. शहर व खेडे विशेषतः मुंबईसारखे शहर आणि कोकणातले वा देशावरचे खेडेगाव यात सारेच जीवन इतके निराळे होते की, वधूला प्रथम चांगलाच त्रास पडतो. काही दिवस कमालीचे जड जाते. पण अखेरीला सगळे अंगवळणी पडते. संवय सारे सावरते.

अलीकडे कित्येकदा जागेच्या अडचणीमुळे, शिक्षणामुळे, नोकरीमुळेही नव-विवाहित स्त्रीला पतिसहवास मिळणेच दुरापास्त होते. अशा वेळी दोघांची होणारी तारांबळ वधूवरांच्या मनाला त्रास देणारी असते. मुंबईसारख्या शहरी, जागेपायी,

काही वर्षे एकत्र राहता न आलेली जोडपी काही कमी नसतात. ही गोष्ट संसारात चांगलीच खटकते.

एकीकडे संसारात पतिसहवास मिळत नाही. म्हणून खटकल्याची उदाहरणे पाहत असता दुसरीकडे पत्नीभोवती पती सारखा पिंगा घालीत असल्याने वधू बेजार होते असेही दिसते. एकत्र कुटुंबात तर अशा वेळी ती टीकेचा विषयच होऊन बसते. तिलाही राग येतो. लाज वाटते. पण अशी पराकोटीला गेलेली उदाहरणे क्वचित असतात आणि असली तरी थोड्याच दिवसात ती निवळतात.

पतीचे आदर्शवादी जीवन किंवा विश्वसंसारी वृत्तीसुद्धा संसारात चांगलेच खटके उत्पन्न करते. एकीने तर अशा पतीशी हौसेने लग्न केल्यावर संसाराची वाऱ्यावर उधळमाप होऊ नये म्हणून पतीला सावरता सावरता तिची काय दमछाक झाली याचे चांगले वर्णन दिले आहे. अशा संसाराला आदर्शवादाची झालर असते एवढेच त्यात समाधान.

अशी आदर्शवादाची, विश्वकुटुंबाची, समाजसेवेची कोणतीच झालर नसता काही वरांना संसाराच्या सहजीवनातील साध्यासाध्या गोष्टीत पत्नी-बरोबर रमताच येत नाही. त्यांच्या वागणुकीत पत्नीबद्दलची अनुरक्ती, आपुलकी, कधीच व्यक्त होत नाही. इतर जबाबदाऱ्यामुळे किंवा कधी इतर गोष्टीतील हव्यासामुळे प्रेम असताही बायकोखेरीज नवरा, सर्वांच्या वाट्याला येतो. फक्त तीच दरवेळी बाजूला सरते व तिला समजुतीने घ्यावे लागते. विहीरीकाठी बसून तहानलेले राहावे अशी तिची स्थिती होते. लग्नाच्या पहिल्या काही वर्षात तरी रतिसुखाचे एक साधन या पलीकडे नवऱ्याच्या मनात आपल्याला काही तरी जास्त आपुलकीचे स्थान आहे, तो आपुलकीने सहजीवनाच्या लहान लहानशा गोष्टीत आपल्याशी सहभागी होतो आहे, असे वाटले तर नववधूच्या जीवनात रंग भरतो. तिला पतिजवळ इतरांपेक्षा काही निराळे असे आपले स्थान मिळाल्याची साक्ष पटते. पण पुष्कळ उदाहरणातून हे सहभागीत्व ही सहजीवनाची आपुलकी पतीकडून कधी कोठेच व्यक्त होत नाही. अशा वेळी मात्र नवविवाहिता मनातल्या मनात विझून थंड होते. " भावनांची उत्कटता विझून तिचा कर्तव्याचा संसार सुरु होतो. " हे शल्य संसारात बरेच दिवस बोचत राहाते.

अत्यंत सुखी असलेल्या संसाराची चित्रे पहात असता पतीची पत्नीशी या बारक्या बारक्या गोष्टीत रमण्याची, काही निमित्ताने दोघेच बाहेर जाण्याची, सहजीवनाची प्रवृत्ती चांगलीच आढळून आली. कालांतराने या गोष्टींना आपोआप मुरड पडते व पत्नीचीही तितकी अपेक्षा राहात नाही. पण आरंभी तरी जीवनाच्या बारक्या बारक्या गोष्टीतील दोघांचे सहभागीत्व संसाराच्या रंगतीकरता आवश्यक असते. जेथे ते नसेल तेथे वधू झुरत राहते. अशी उदाहरणे बरीच दिसतात.

सहजीवनात पाऊल टाकल्यावर कथा कादंबऱ्यातील काल्पनिक चित्रे मनात

ठसल्यामुळे नवविवाहितांचा विशेषतः वधूंचा कसा अपेक्षाभंग होतो याचे वर्णन पूर्वी दिलेलेच आहे. पण त्याबरोबरच अलिकडच्या काळात विशेषतः वधूला स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची जाणीव झाली असता त्याला योग्य साथ मिळाली नाही तर संसारात पडल्यावर नुसता अपेक्षाभंग होऊन थांबत नाही , आपल्या व्यक्तिमत्त्वाचा कोंडमारा होतो आहे असे वाटते. ती अत्यंत खट्टू होते. सुगृहिणीबरोबरच आपण सुशिक्षित पदवीधर गृहिणी असावे, समाजात आपल्यालाही आपले असे एक विशिष्ट स्थान प्राप्त व्हावे, आपल्या अंगी असणाऱ्या नैसर्गिक शक्ती विकसित व्हाव्यात, त्यात जीवनाच्या जोडीदाराचे सहाय्य मिळावे असे एक स्वप्न अलिकडील वधू पहात असते. अशा वेळी सासरच्या मंडळींची किंवा पतीची तिला साथ मिळाली तर तिला चांगले समाधान लाभते. पण बऱ्याच ठिकाणी साथ मिळण्याऐवजी तिला नाउमेद केले जाते, विरोध होतो व ते शल्य संसाराचा जम बसल्यावरही सलत राहते. काही वेळा भावविवश वधूचे मन अत्यंत खिन्न होते. पंख कापल्याची भावना होते. सोबत दिलेल्या एका लेखात अशा कोंडलेल्या व्यक्तिमत्त्वाची तडफड किती तीव्र असते ती पाह्यला मिळेलच, तथापि येथे खालील ओळी उद्धृत केल्याशिवाय राहवत नाही.

" आणि कळले तेव्हाच । जीवनाला अर्थ आला ।
जीव माझा जळणारा । राख होऊन हंसला ।
राख होऊनी हसला । "

असा संसार दिसायला मोठा सुंदर असतो पण मने विझलेली असतात.

कित्येक वेळा सांपत्तिक स्थिती चांगली वरच्या दर्जाची असताही काही काळाने पती आपल्या कामात दंग होऊन जात आहे, मुलेही आईच्या सान्निध्याची गरज नाहीशी होऊन मित्र-मैत्रिणीत गुंग झालेली आहेत व प्रौढ विवाहिता मात्र आयुष्याच्या ऐन मध्यावर एकाकी पडली आहे. आणि त्याचो तिला खंत वाटत आहे अशी उदाहरणे दिसतात. आयुष्यात अशा प्रकारची पोकळी उत्पन्न झाल्याची जाणीव सांगणारे लेख स्पर्धालेखात अत्यंत थोडेच असले तरी वरच्या सधनवर्गात ही पोकळीची जाणीव जास्त प्रमाणात दिसून येते आहे असे अलिकडे दिसते. त्यांचा संसारातील खटका मात्र अजून तेवढा तीव्र झालेला नाही.

विवाहात खटकणाऱ्या जीनवचित्रांबरोबरच अत्यंत सुखी म्हणून दिसणारे जीवनालेख मी जेव्हा पाहिले तेव्हा पतिपत्नींच्या आवडीनिवडीची सदैव एकता असते किंवा दोघात सदैव स्वभाव साधर्म्य असते असे आढळून आलेले नाही. पुष्कळ वेळा दोघांत चांगलीच भिन्नता होती व त्याची दोघांनीहि जाणीव होती. तथापि अशा संसारात स्वतंत्र असता किंवा एकत्र कुटुंबात असताही, पती-पत्नीमध्ये परस्परांविषयी अनुरक्ती, ओढ, एकप्रकारचा मोकळेपणा आणि परस्परांविषयी गाढ विश्वास व आदर या गोष्टी प्रकर्षत्त्वाने दिसून आल्या. त्याबरोबरच मागे

उल्लेखिलेले बारक्या बारक्या गोष्टीतील सामाजिक सहजीवनहि चांगलेच दिसून आले. असे सुखी संसार होण्यास सधनतेचा पायाच आवश्यक आहे, अशातील प्रकार नाही. "शून्यातून संसार" उभा करणारे दोन श्रमजीवी गरीब जीवही असा संसार खुलवतात व सुखी होतात. पण अनुरक्ती आदि वरील गोष्टी मात्र तेथे पाहिजेत.

आता स्पर्धेच्या लेखातून संसारात पतिपत्नीमध्ये खटका उत्पन्न करणाऱ्या गोष्टी कोणत्या आढळल्या त्याची येथे यादी देत आहे. यातील सहज समजून येणाऱ्या गोष्टी मी वर चर्चेकरिता घेतल्या नाहीत.

( अ ) खटकणाऱ्या बाह्य गोष्टी:—आर्थिक ताण; आवडीनिवडी, भाषा, रुची, चालीरीती, आहार, धर्म इत्यादिकातील भिन्नता; शहर, खेडे जीवनातील भिन्नता; गरिबी-श्रीमंतीचा दोघातील फरक.

( ब ) सासरच्या व इतर माणसांकडून खटकणाऱ्या गोष्टी :— मानपान, हुंडा, पायगुण, देणी-घेणी, शिक्षण इत्यादिंवरून वधूंचे जिणे अपमानित करण्याचे प्रयत्न; छळ; नातेवाईक-शेजाऱ्यांची काकदृष्टी किंवा वक्रदृष्टी; नव्याजुन्यांचा संघर्ष; अपत्यहीनता; कडक, बोचणारे, आग्रही व्यक्तिमत्त्व.

( क ) पतिविषयक: —पौरुषहीनता; पत्नीविषयी उदासीनता; पति-सहवास न मिळणे; (जागा, शिक्षण वगैरेंमुळे), आधीची किंवा नंतरची प्रेमप्रकरणे; दारू, जुगार इत्यादि व्यसने; मारहाण; संशयपिशाच्च; भ्रमरवृत्ती; स्त्रीभोवती पिंगा किंवा असाधारण लैंगिक भूक; पतीची विश्वसंसार वृत्ती; पतीचे शिक्षण चालू ( ही गोष्ट पूर्वीच्या काळी बऱ्याच प्रमाणात होती ) ; पतीचा व्यवसाय व घराबाहेर गुंतून घेण्याचा हव्यास; आजारीपण; संसारातील साधारण हौस-मौजेतून लक्ष नसणे; संसारातील पूर्वींच्या (भाऊ बहिणी वगैरे ) जबाबदाऱ्या; दुराग्रही व्यक्तिमत्व; अपत्यहीनता.

( ड ) वधूच्या स्वतःच्या :— स्त्री-पुरुष संबंधांचे अज्ञान किंवा चुकीच्या कल्पना; लग्नाबद्दलची अढी व लहानपणी झालेले पूर्वग्रह; सासरी मोकळेपणा अथवा स्वातंत्र्याचा अभाव; अपेक्षाभंग; व्यक्तिमत्त्वाचा कोंडमारा; जीवनातील एकाकीपणा; नवऱ्याने काही कमवावे अशी इच्छा; स्वतःचे शिक्षण; नोकरी; स्वयंपाकाचे अज्ञान; दैवी अपघात किंवा कोप; पूर्वींची प्रेमप्रकरणे; सारखे आजारी-पण दुराग्रही व्यक्तिमत्त्व. मूल नसणे.

ही यादी अपूर्ण आहे ही मला जाणीव आहे. तथापि संसारात कशाकशाने खटका येतो, हे पाहण्याचा तो एक प्रयत्न आहे.

या स्पर्धालेखात स्वतंत्र विचारांच्या, बंडखोर किंवा निरनिराळ्या व्यावसायिक क्षेत्रात कामे करणाऱ्या भगिनी फारच कमी आढळल्या. त्याचप्रमाणे समाजातील स्वयंमन्य किंवा स्वतःला उच्चभ्रू समजून बहुजनसमाजापासून अलिप्त राहू

इच्छिणाऱ्या भगिनीही मला येथे दिसल्या नाहीत. सर्वसाधारणपणे चाकोरीतील सामान्य जीवन जगू पाहणाऱ्यांचे येथे जीवनालेख आहेत. पण ते लेख मात्र सामान्य नाहीत. आजवर अनेक साहित्यिकांनी जे स्त्रीजीवन रंगविण्याकरता आपली लेखणी झिजवली तीच स्त्री येथे स्वत: बोलकी होऊन तिने आपले मनोगत पारदर्शक काचेतून पुढे ठेवावे तसे आपल्यासामोर मांडले आहे. अनुभवाच्या जिवंतपणामुळे त्यातील कित्येक लेखातून अभावितपणे सुंदर साहित्यहि प्रकट झालेले आहे. त्यामुळे सर्वच लेख एक प्रकारच्या सहज सुंदरतेने, विविधतेने, फुलले आहेत. जीवनाच्या सुखदु:खांनी भरलेले हे फिक्के गहिरे रंग पाहत असता किती विविध अंगांनी आपल्याकडील स्त्रीचे मला दर्शन होत होते! प्रथमदर्शनी तरी फारसे न शिकलेली, कमकुवत व्यक्तिमत्त्वाची, दुबळी, अशी असलेली ही सामान्य स्त्री पाहून तिला मी केवळ गतानुगतिक म्हणून बाजूला सारते न सारते तोच तिच्यातील काही गोष्टींनी मला आश्चर्यचकित करून सोडले. पातिव्रत्यादि तिच्या जीवननिष्ठांना धक्का लागताच लव्हाळ्यापेक्षांही लवते घेण्याची तिची सहजप्रवृत्ती सोडून एकदम रणचंडीच्या आवेशाने ती आपल्या जीवननिष्ठांची जपणूक करण्यास उफाळून उठलेली मला दिसे तर कधी "नको तो केवळ अनिच्छेने बांधलेल्या बंधनाचा, खोटचा नावाचा पैसा" म्हणून नवऱ्याच्या मोठ्या इस्टेटीतील पैही न ठेवता संपूर्ण दान करून ती स्वत:च्या कष्टावर जीवन घालविणे पसंत करी. कधीं संसारांत पाऊल टाकल्याबरोबर एकदम चोहोबाजूंनीं काळेकुट्ट ढग जमून सारे जीवनाकाश गडद मेघांनी अंधेरून गेलें असताही केवळ आंतरिक निष्ठेची शांत आत्मज्योत तेवत ठेवून असीम त्यागानें, तपश्चर्येनें ती देवाला व दैवालाही इतकें हलवून सोडी की तिच्या आत्मयज्ञाच्या दीप्तीने ते काळेकुट्ट मेघहि अखेर सुंदर सोनेरी कडांनी असे उजाळून निघत की तिकडे पहातच रहावे. अशा प्रसंगी 'फत्तरदिल' पतीचे चित्तही विरघळू लागे व हृदयपरिवर्तन झाल्याचा साक्षात्कार पाह्यला मिळे. अशी दृश्ये पाहात असता 'दुबळी', 'कमकुवत', म्हणून उच्चारण्याकरता उघडलेल्या ओठांतून ते शब्द बाहेर पडण्यापूर्वीच विरून जात व मन भरून येई. वास्तविक आपली स्त्री दुबळी नाही, पण अजूनही परंपरेचे, संस्कारांचे जोखड तिच्या मानेवर इतके रुतून बसलेले असते की, त्यातून सहजासहजी तिची सुटका होऊन ती स्वतंत्र व मोकळी वावरूच शकत नाही. तिचे सारे सामर्थ्य तसाच प्रसंग येईपर्यंत दडपलेले राहाते व व्यक्तिमत्त्वही पुरे खुलत नाही. आपल्या स्त्रीचे असे विविधदर्शन घेत मी गेले कित्येक दिवस ५०० वर असलेल्या या भगिनींच्या सहवासात सारखी वावरत होते.

शिवाय स्पर्धेचा विषयच असा होता की तेथे मानवी संबंधात—विशेषत: पतिपत्नीसंबंधात – वधू म्हणून आलेल्या स्त्रीच्या मनातील गाभ्यात ठसून राहिले तेवढेच बाहेर यावे. आलेल्या लेखांतून त्याची वर्णने वाचीत असता अखेर सुशिक्षित-

अशिक्षित, गरीब-श्रीमंत हे सारे भेद या संबंधात किती वरवरचे असतात व परिस्थितीला साद देणारे किंवा तिच्याशी झगडणारे मानवी मन समाजातील संस्कारांनी अखेर कसे एकच होते याची साक्ष पटते. हे सारे पाहात असता त्यातील काही भगिनींनी मला रडविले, काहींनी हसविले, काहींनी तारुण्याचा पुन:प्रत्यय आणून दिला व जीवनाच्या विविध अनुभूतीचे वास्तव दर्शन घडविले. याबद्दल ह्या सर्वांची मी सदैव ऋणी राहीन.

जाता जाता हे स्पष्ट करणे जरूर आहे की, हे माझे निरीक्षण म्हणजे काही प्रश्नपत्रिका काढून किंवा मुलाखती घेऊन किंवा ' प्रातिनिधीक विश्व ' ठरवून शास्त्रविहित मार्गाने केलेली सामाजिक पाहणी नाही. स्पर्धेकरता आलेल्या लेखांना जीवनानुभूतीचा खराखुरा स्पर्श झालेला आहे, असे दिसून आल्याने त्या लेखांतील अनुभव टिपण्याचा व ह्या द्वारे आपल्या एकंदर वैवाहिक जीवनाचा मागोवा घेण्याचा तो एक प्रयत्न आहे.

वरील मागोवा घेत असता भोवतालची परिस्थिती दिसत असल्याने नाना विचारतरंग मनात उठत होते—प्रश्न उभे राहात होते. त्याचा प्रत्यक्ष स्पर्धालेखांशी संबंध नाही. तरी त्यातील वर्ण्य विषय—स्त्री—पुरुषाचे कौटुंबिक व सामाजिक संबंध, विवाह—यांशी ते प्रश्न निगडित असल्याने तत्संबंधी एकदोन गोष्टी येथे मांडल्या तर अस्थानी होणार नाही असे वाटते. उलट झाली तर विचारविनिमयास मदतच होईल.

वास्तविक विवाह व तदनंतरची ही कौटुंबिक, सामाजिक जबाबदारी योग्य रीतीने स्त्रीला पेलता यावी याकरता आमच्यातील सुधारकांनी स्त्री-शिक्षणाचा अट्टाहास केला. स्त्री ही समाजपुरुषाचे अर्धे अंग असल्याने ते विकल, अडाणी राहून उपयोगी नाही, तीही पुरुषाच्या बरोबरीने सुशिक्षित व समर्थ व्हायला पाहिजे असे प्रतिपादिले. बालविवाहाचा नुसता निषेध करूनच ते थांबले नाहीत तर कायद्याने मुलामुलींचे विवाहवय वाढावे याकरताही खटाटोप केला. आता या साऱ्या प्रयत्नांमुळे मुलांप्रमाणे मुलींचेही शिक्षण वाढले आहे, मुली जाणत्या होऊ लागल्या आहेत. खेडयापासून शहरापर्यंत या बाबतीत बरेच परिवर्तनही झालेले आहे. अशा वेळी पहिला प्रश्न येतो की आमच्या या वाढत्या शिक्षणाने व वाढत्या वयाने समाजद्रष्टयांच्या मनातील हेतू साध्य झाला आहे का ? स्त्रीपुरुषातील संबंध खरोखरी बदलले आहेत काय ? स्त्री माणूस म्हणून जगू शकते काय ?

याला होय आणि नाही असेच उत्तर द्यावे लागेल. कारण समाजाच्या खालच्या थरापर्यंत व खेडयाकडे पाहता ही जागृतीची लाट निश्चितपणे तेथपर्यंत आता पोहोचली आहे असे अनुभवास येते. येथे परिस्थिती बदलली नसली तरी सुधारत आहे—जाग येत आहे—असे म्हणण्याला कितीतरी वाव आहे.

ज्या व्यवसायधंद्यात खेडेगावातील किंवा आर्थिकदृष्टचा खालच्या थरावरील स्त्रियांचा भरणा होतो त्यांच्यात शिक्षण वाढलेले दिसते. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टि-कोणही बदललेला दिसतो. कारण अशा व्यवसायधंद्याकरता लागणारे प्रशिक्षण घेण्याकरिता, किंवा त्यात प्रवेश मिळविण्याकरिता,ज्या विवाहित स्त्रिया आपली घरेदारे सोडून येतात त्यांच्या जीवनकहाण्या ऐकल्या की त्या थरावरील स्त्री-पुरुषसंबंधात व एकंदरीत तेथील स्त्रीजीवनावर चांगलाच विदारक प्रकाश पडतो, पण त्यातही समा-धान एवढेच की कोणाच्या तरी सहानुभूतीने, कोणाचा तरी आधार घेऊन त्या स्त्रिया जीवनाच्या कोंडमाऱ्यातून सुटका करून घेण्याचा मार्ग शोधतात, माणूस म्हणून जगू पाहतात व काही प्रमाणात तसे जगून स्वतःचा स्वाभिमान व स्वत्व तेवते ठेवण्यास समर्थ होतात. त्यामुळे शिक्षणाने झालेल्या परिवर्तनाच्या लाटेने येथे हळूहळू का होईना, निश्चितपणे जाग येत आहे असे म्हणता येते व ते शुभचिन्ह आहे.

हा थर सोडला व वरच्या स्तरांकडे पाहू लागले तर इतर बदल पुष्कळच आहे. पण अजून आमच्या शेकडा ८० टक्के मुलींना लग्नाच्या बाजारात उभे रहावे लागते, तेही २–५–१० हजाराची वरदक्षिणा किंवा हुंडा घेऊन, ही गोष्ट स्त्रीच्या माणुसकीला काळिमा आणणारी वाटते.. या बाबतीत मागोवा घेताना बरेच लिहिले आहे. म्हणून जास्त चर्चा करीत नाही. आता मुली जाणत्या असतात. जीवनाच्या जोडीदाराविषयी त्यांच्या कल्पनाही बदलत चाललेल्या आहेत. " ते स्वामी-धनी, मी त्यांच्या पायाची दासी–ते शरीर–मी त्यांची केवळ सावली–" ही भावनाही नाही किंवा ते इतके आत्मसमर्पण राहिलेले नाही. पती किंवा पत्नी म्हणजे जीवनपथावरील एकमेकांची जोडीदार–सहचर–ही भावना बळावत आहे, अशा वेळी समाजाजिक जीवनात करावयाच्या या महत्त्वाच्या टप्प्यावर स्वतःचा निर्णय स्वतः घेणे–इतका जाणतेपणा, मानसिक प्रौढपणा दाखविणे याच गोष्टीला खरे महत्त्व आहे. पण येथेच, मनात एक, वागायचे एक, असे आम्ही वागतो व त्याने स्वतःचे स्वत्व खच्चीकरून बसतो. आपल्या-कडील जीवनात या द्विधा वृत्तीचे प्रत्यंतर सारखे येत असते.

आता हा प्रश्न बाजूस सारून विवाहानंतरच्या आयुष्यात तरी स्त्री-पुरुषांचे परस्पर संबंध किती मोकळेपणाचे–विशेषतः स्त्रीच्या बाजूने–किती स्वाधीनतेचे झाले आहेत ते पाहू. या दृष्टीने पाहता समाजात निरनिराळे आकृतिबंध ( पॅटर्नस् ) झालेले दिसतात.

एका प्रकारात सांपत्तिक दृष्टचा काही अंशी कमी, पण शिक्षणाने, संस्काराने कमी नसलेल्या मध्यम वर्गात, स्त्रीपुरुषांना, विशेषतः स्त्रियांना चांगलीच जाग आलेली दिसते. अनेकदा त्यांना प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढा-वयाचा असल्याने त्यांचा स्वाभिमान, स्वत्व चांगलेच जोपासले जाते. त्यांच्या अंगी परिस्थितीला टक्कर देऊन आपला मार्ग काढण्याचे सामर्थ्य व आत्म-

विश्वास येत असलेला दिसतो. अशा रीतीने धडपडत वर येणारे स्त्री पुरुष विवाहाच्या बाबतीत बहुधा स्वयंनिर्णय घेताना दिसतात. पति-पत्नी म्हणून संसार करू लागताना त्यांची धडपड नाहीशी झालेली नसते. ती दोघेही संसाराची जबाबदारी घेऊन जीवनातील बौद्धिक किंवा सांपत्तिक वरची पातळी चढू पाहतात. परस्पर सहकार्याने धडपड चालू असल्याने दोघांचे संबंध बरोबरीचे, देवघेवीचे, मोकळेपणाचे असे होतात. स्त्री, पुरुषाच्या जीवनातील खरी सहचरी झालेली दिसते. भिन्न भिन्न अर्थांने दोघेही परस्परांवर अवलंबून असतात. एक-मेकांना तसे मानतात. नैसर्गिक ओढ ही असतेच. रूढार्थाने येणारी, खालीवर ही भावना तेथे फारशी दिसत नाही व दोघेही जीवनात जोडीने चाल करीत जात आहेत, असे मनाला सुखविणारे दृश्य दिसते.

दुसरे ठिकाणी स्त्रीची धडपड विशेष असते. कारण तिच्यातील नैसर्गिक बुद्धिमत्ता किंवा निसर्गदत्त देणगी शिक्षणाने चांगल्याच विकसित होऊन तिच्या-पुढे तिचे स्वतःचे असे एक कर्तृत्वक्षेत्र तयार होते. ते तिला आव्हान देते. भुरळ पाडते. पण त्याचबरोबर तिला, लग्न स्वतःचा संसार हीही पाहिजे असतात. तिच्या कर्तृत्वक्षेत्राचे आव्हान बाजूला सारण्याची तिची तयारी नसल्याने जीवनात ती दोघांचाही मेळ खालू पहाते.

कित्येक वेळा पती म्हणून जीवनात येणारा जोडीदार तिच्या या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाने तिच्याकडे आकर्षित झालेला असतो. ठरवून लग्न झाले असल्यास तिची ती धडपड , आच पाहून बरेचदा पुढे व्यवसाय चालू ठेवण्यास सहृदयतेने संमती देतो. तिचा जिवंतपणा त्यालाही प्रभावित करतो.

तिसऱ्या प्रकारच्या आकृतिबंधात स्त्री समजूतदार, बुद्धिमान् असते पण विवाह होताना तरी तिच्या अंतर्यामी कोणती धडपड जागी झालेली नसते. येथे पुरुषाचे व्यक्तिमत्त्व प्रखर असते. त्याला त्याच्या कार्यात, आशा–आकांक्षात अत्यंत निकटवर्ती जोडीदाराची गरज असते, तोही जीवनापासून केवळ सुखाने जगण्यापेक्षा अधिक काही तरी घेऊ पहात असतो. त्याला त्याची स्वप्ने साकार करावयाची असतात. विवाहाआधी किंवा नंतर ज्या रीतीने विवाह झाला असेल त्याप्रमाणे तो पत्नीला आपली ही भूमिका समजावून सांगतो. जोडीने जाण्याची अपेक्षा करतो. कधी कधी प्रथमतः पत्नी या धडपडीला फारशी तयार नसली तरी त्याच्या बरोबर भाग घेऊ लागते. कार्यप्रवणही होते. त्यात हळू हळू रमू लागते. तिच्यातील सुप्त कर्तृत्व जागृत होते. कसाला लागते व त्याच्यासारखीच त्या जीवनात तिलाही गोडी लागते, एक प्रकारचे समाधान लाभते. अशा रीतीने कधी एकमेकांचे पूरक होऊन एकत्र, तर कधी गरज पडली तर असता अगदी दोन दिशांना मार्ग आक्रमण करण्याइतकी त्यांची आंतरगाठ पक्की बसते. दोघे एकमेकांना खरी पूरक होतात.

या तिन्हीही प्रकारात एक गोष्ट दिसते. ती ही की, धडपडणारे जीव विवाहाने एकमेकांजवळ आलेले असतात. जीवनात बायकामुले स्वतःचा संसार यापेक्षा ते अधिक काही तरी साधू पहातात. त्यामुळे स्त्रीचे कार्यक्षेत्र म्हणजे चूल आणि मूल ही जुनी समजूत त्यांना पटत नाही. विवाह झाला की स्त्रीच्या आयुष्याची इतिकर्तव्यता झाली असे ते समजत नाहीत. उलट विवाह म्हणजे जीवन-हेतू-पूर्तीचे एक साधन ( साध्य नव्हे ) अशी त्यांची विवाहाकडे पहाण्याची दृष्टी असते. त्यामुळे त्यांचे संसार म्हणजे सध्या तरी स्त्रीचे कार्यक्षेत्र व कर्तव्य-क्षेत्र ( स्त्री, माता, पत्नी या नात्याने येणारी जबाबदारी ) या दोहोंची नीट सांगड घालणारी एक प्रयोगशाळाच बनते. ते प्रयोग होत असता दोघांना कधी आनंद होतो, कधी दोघेही धडपडतात, एकमेकांवर चरफडतात, पण परस्परांतील ओढीला शिळेपणा येत नाही की ती विझून थंड– मृतवत् होत नाही.

वरील तिन्हीही प्रकारांपेक्षा वेगळा असा एक आकृतीबंध समाजात दिसतो. त्यात बहुसंख्य स्त्रीपुरुष समाविष्ट असतात, म्हणून, त्याला महत्त्व आहे. याचे वैशिष्टच म्हणजे या गटात मी व माझे यापलीकडे पहाण्याची फारशी वृत्ती नसते. या गटातील स्त्री-पुरुष बुद्धिमानही असतात, कर्तबगार असतात; पण लग्न करावे, आयुष्य छान, चांगले सुखात, ऐषारामात घालवावे हेच त्यांचे स्वप्न असते. यापलीकडे जाणिवेच्या कक्षा ते उंचावू इच्छित नाहीत. त्यामुळे जीवनात ‘ मी ’ व ‘ माझे ’ याकरता लागणाऱ्या धडपडीपलीकडे धडपडही नसते. स्त्रीच्या बाबतीत तर मी व माझे हे क्षेत्र आता स्वतःचा पती व दोन-तीन मुले इतके आकुंचित झाले असल्याने पूर्वीच्या गृहिणीवर जी एक जबाबदारी असे किंवा त्यांना जे बघावे लागे, ते या गृहिणीला मुळीच करावे लागत नाही. पूर्वी घराच्या व्याख्येत सध्याच्या भाषेत बोलायचे तर कुटुंबातील इतर जबाबदाऱ्या, वार्धक्याश्रम, सूतिकागृह, अनाथालय, घरगुती उद्योगधंदे– शाळा इ. साऱ्यांचा समावेश होत असल्याने गृहिणीवर फारमोठी जबाबदारी असे व तिची गृहिणी म्हणून कर्तृत्वशक्ती खरोखरीच चांगलीच कसास लागे. आता तो प्रकार उरला नाही. शहरातून तर नाहीच नाही. त्यामुळे लग्न झाल्यावर पैशाने सुस्थित असतील तर पुरुषाला स्त्रीने काम करावे असे वाटत नाही. पण रूढीप्रमाणे पती मात्र आपल्या व्यवसायाला लागतो. आपल्या संसाराचे एक भूषण म्हणून तो पत्नीकडे पहातो. तरुण वधू घरी राहू लागते. कधी दोघांच्या स्वतंत्र संसारात, तर कधी सासरी चार माणसांत. स्त्री असल्याने नव्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास तिला पतीपेक्षा जास्त वेळ लागतो. त्यात काही काळही जातो. तेवढ्यात तिचे पूर्वीचे धागे-दोरे, संबंध विसरले जातात–पुष्कळ वेळा नव्या जागी आल्याने गळून पडतात. अशा वेळी सासरी चार माणसात तरुणी वावरत असेल तर तिचा बाह्य जगाशी थोडाबहुत

इतर नात्याने परिचय होतो. पण तसे नसून दोघांच्याच स्वतंत्र संसारात मुंबई-सारख्या ठिकाणी ती ब्लॉकमध्ये रहात असेल तर तिचा बाहेरच्या जगाशी संबंध तुटतो. पण त्याचे तिला फारसे वाटत नाही. पतीशी एकरूप होण्याच्या कल्पनेने तीही भारलेली असते. शिवाय तारुण्य, भोवतालचे नवे वातावरण, भावनारम्य 'स्वप्नील' वृत्ती व पहिल्या दिवसात स्त्रीची पुरुषावरील शक्तीची झालेली नवी जाणीव यामुळे कळी सुगंधाने कोंदाटून स्वतःतच मग्न होऊन डुलत राहते तशी तिची अवस्था असते. ती स्वतःत– पतीत मग्न असते. केव्हा केव्हा तर गर्भाशयात वाढणारे मूल अन्नपानादि सारे रस मातेच्या द्वारे घेत रहाते त्याप्रमाणे स्वतःचे वेगळे अस्तित्व न ठेवता तिचे सारे सामाजिक संबंध पतीसमवेत, पतीच्या द्वारे चालावेत अशी तिची इच्छा असते. पतीशिवाय ती एकटी कुठे जाऊ शकत नाही, किंबहुना जाऊ इच्छितच नाही. पत्नीच्या या वृत्तीने संसाराच्या सुरवातीला जरी पती सुखावत असला तरी पुढे या आग्रही वृत्तीने दोघांच्या मनावर भलताच ताण पडत जातो. हळू हळू दोघांत खटके उडू लागतात. त्यातून पतीची नोकरी असल्यास किंवा कामाचे तास ठराविक असल्यास ऑफिसातून आल्यावर ती दोघे सहजीवन रमवू शकतात, पण तसे नसेल, धंदा असेल, तर, किती तरी वेळा पत्नी घराच्या चार भिंतीत राहून अक्षरशः कुढत राहाते, कष्टी होते. पुरुष मात्र काम धंदा, नोकरी करीत असल्याने कार्यप्रवण असतो, जीवनात तो ताजा राहातो. इतकेच नाही, अंगीकृत काम करीत असता त्याच्या जीवनाच्या कक्षा विस्तारत राहतात.

त्याच्याच बरोबरीने ती शिकलेली असते. लग्नाआधी तितक्याच मोकळेपणी वागलेली असल्याने हे सारे तिला दिसते. पण ती मात्र आपल्या जीवनाच्या कक्षा स्वतः होऊन इतक्या आकुंचित करीत आणते की, तिचा स्वभाव हौशी, समाजप्रिय नसल्यास तिच्या जीवनाला एक प्रकारचा शिळेपणा, साचाऊपणा येऊ लागतो व लवकरच त्याचीही चीड ती नकळत पतीवर काढू पहाते. अशा वेळी प्रथम स्वातंत्र्याच्या –बरोबरीच्या नात्याच्या गप्पा मारणारी हीच का ती तरुणी असे विचारावेसे वाटते. लग्नानंतरच्या पहिल्या काही वर्षात अशा चिडलेल्या – वितवितलेल्या पत्नीची उदाहरणे कमी दिसत नाहीत. आमच्या बहुसंख्य स्त्रियांना अजूनही तरूला बिलगून त्याच्या आधारेच आपले जीवन विस्तारणाऱ्या वेलीचीच भूमिका मनापासून आवडते, नव्हे पाहिजे असते. त्यामुळेच आपण आपल्या पतीशी एकरूप होतो असा त्यांचा खोटा समज होऊन बसतो पण यातच कित्येक वेळा त्या स्वतःलाही हरवून बसतात. अखेर त्यांच्या जीवनात एक प्रकारची पोकळी भिरभिरू लागते.

सर्वसामान्यपणे अपत्यजन्मानतर ही पोकळी बरीचशी नाहीशी होते. तदनंतर मुलांमुळे ती फिरून समाजात ओढली जाते व तिचे असे वेगळे जग ती

निर्माण करू लागते. ते अतिशय लहान असते पण जीवनाला येणारा शिळेपणा, सांचाऊपणा त्याने पुष्कळसा कमी होतो. शिवाय वाढत्या कुटुंबातील कामाने, काळज्यानी ती इतकी संसारात व्यग्र होते की, तिला अखेर कसलाच विचार करायला फुरसतच राहात नाही.

पण त्याच प्रकारात मोडणारा समाजात एक सुसंपन्न वर्ग असा असतो की, अपत्यजन्मानंतर त्यांचे काम काहीसे वाढले तरी जीवनात येणारी पोकळी भरून काढण्या इतके काम नसते. शिवाय संपन्नता व शिक्षण यांचा अभिमान येऊन त्या बायका बहुजन समाजापासून स्वतःला अलिप्त ठेवतात. शहरातून तरी घरची कामे कमी झाल्याने किंवा ती करवून घेण्यास नोकर-चाकर ठेवावयाचे सामर्थ्य असल्याने अशा घरातील बाईला खूप वेळ मिळतो. पूर्वीच्या श्रीमंत घरातून जी कामे, घरकामे असत तीही राहिलेली नसतात. कुटुंब अगदी सुटसुटीत, नवरा-बायको-मुले, असेच असल्यास इतर कुटुंबियांची काळजी, व्याप मागे नसतो. संसाराचीही घडी बसत आली असल्या कारणाने फारशी नवलाई, हौस राहिलेली नसते. अशा वेळी मिळणाऱ्या रिकामपणाचे काम करावे हे न कळल्याने या सुसंपन्न थरातील सुशिक्षित तरुणी काही वेळा १० ते १।। किंवा २।। ते ५।।–६ असे एकमेकींच्या घरी आळीपाळीने अड्डे भरवून त्यात ‘ रमी ’च्या धुंदीची नशा चढवू लागलेल्या पाहिल्या की, सुशिक्षित असतानाही जीवनहेतू न सापडल्याने स्वत्व हरवून बसलेल्या जीवनात भिरभिरणारी पोकळी भरून काढण्याकरिता तर हा सारा प्रयत्न नाही ना , असा प्रश्न पडतो.

ही पोकळी, सांचाऊपणा आधी उल्लेखिलेल्या गटात दिसत नाही. त्यांची धडपड चालू असते त्यात जगण्याचा, जीवनातून काही तरी घेण्याचा, साध्य करण्याचा प्रयत्न दिसतो. पण शेवटी उल्लेखिलेल्या या गटातील विभागात स्त्री एकटी पडते व फार दिवस गॅरेजमध्ये न चालवता पडून राहिलेल्या मोटरची बॅटरी उतरून जावी, त्याप्रमाणे स्वतःच्या आयुष्यातील धडपड, वाढ शिक्षणाने जिवंत ठेवण्याचे सामर्थ्य असतानाही ते न वापरल्याने या स्त्रियांच्या जीवनाची बॅटरी इतकी उतरून जाते की मुलायम वेषभूषा, शृंगार यातूनही त्याच्या छटा स्पष्ट जाणवल्याशिवाय राहात नाहीत.

वैवाहिक आयुष्याचे असे दृश्य दिसत असता, मन विषण्ण होते. आमच्या सुधारकांनी स्त्रियांना सुशिक्षित करून अखेर हेच का साधले असे विचार मनात येऊ लागतात. ज्या बुद्धिजीवी मध्यमवर्गाने समाजाचे तारू आतापर्यंत पुढे नेले त्याच मध्यम वर्गातील स्त्रिया सुशिक्षित झाल्यावर सुखासीनतेने निष्क्रिय व्हावयाला नको, असा समाजसुधारकी थाटाचा विचारही क्षणभर डोकावून जातो. पण लगेच आठवते की समाजात फक्त हाच आकृतिबंध नाही. मागे उल्लेखिलेले तिन्ही आकृतिबंध याच समाजात वावरत आहेत. हे लक्षात आले की, आशा वाटू लागते.

अखेर याच साऱ्या संघर्षातून, नव्या जुन्या संस्कारांच्या मंथनातून रूढीची व हजारो वर्षांच्या संस्कारांची जबरदस्त पकड असलेले आमच्या स्त्री–पुरुषांचे कौटुंबिक, सामाजिक जीवन नवा आकार घेणार आहे. तोपर्यंत शिक्षणाने जागे झालेले चैतन्य– पेटलेली ज्योत मात्र विझू न देण्याची आम्ही खबरदारी घ्यावयास पाहिजे.

▭

## ▭ थोडेसे संपादनाविषयी ▭

या पुस्तकात घेतलेले ७५लेख निवडून त्यांचा अनुक्रम लावताना मला चांगलाच प्रश्न पडला. निवड करताना साहित्यिक गुणांपेक्षा अनुभूतीच्या विविधतेवर व लिहिणाऱ्या भगिनींच्या निरनिराळ्या सामाजिक स्तरांवरच मी लक्ष दिले.

त्याचप्रमाणे जीवनातील साठ वर्षांच्या कालखंडाचा जीवनपट पाहण्याचा हेतू मनात धरल्याने मला लग्न वयाला लोटलेल्या कालानुसारच अनुक्रम घेणे सोयीचे होईल असे वाटले. तो क्रम लावताना मी दोन विभाग पाडले. एक साठपासून १० वर्षेपर्यंतच्या लग्नाच्या कालावधीचा व दुसरा १ पासून दहा वर्षेपर्यंतच्या कालावधीचा. पहिल्या कालखंडात कालानुक्रम शक्यतोवर राखला आहे. दुसऱ्या कालखंडात मात्र कालानुक्रम नाही. लेखाचे शीर्षक ' लग्नानंतरचे पहिले वर्ष ', असल्याने मला निश्चित माहितीची काही टिपणे करताना बरेच जड गेले. काहींनी आपले वय, शिक्षण दिले होते, पण काहींनी दिले नव्हते. ती सर्व माहिती ' मंगळसूत्राच्या उलटया वाटचा ' अशा तऱ्हेच्या लेखांतील आंतरिक खुणांवरून निश्चित करण्याचा मी प्रयत्न केला. तो येथे शेवटी टिपणी रूपाने दिला आहे. ही टिपणे फक्त सामाजिक कालनिदर्शक अशीच राहतील, यापेक्षा निश्चितपणा त्यात मिळणे कठीण.

येथे आणखीही एका गोष्टीचा उल्लेख करणे जरूर वाटते. महाराष्ट्र टाईम्समध्ये प्रसिद्ध झालेले दहा लेख माझी सर्व टिपणे झाल्यावर माझे हाती आले त्यामुळे टिपणे करताना मी फक्त ५०८ लेखांचाच अंतर्भाव केला आहे.

▭

## काही निरीक्षण टिपणे

**स्पर्धालेखांवरील टिपणे :**

मला मिळालेल्या ५०८ पत्रांपैकी २० लेखांवरचे पत्ते फाटले गेले असल्याने मला ते कोठून आले हे कळले नाही. बाकीचे ४८८ लेख १०२ ठिकाणाहून आले होते. त्यातील ४२ लेख महाराष्ट्राबाहेरच्या दिल्ली, कलकत्ता, मद्रास, हृषिकेश, इंदूर, भोपाळ, खांडवा, बेळगाव, हैद्राबाद इ. २० ठिकाणाहून होते. ४४ लेख महाराष्ट्रातील खेडेगावे, किंवा तालुक्याहून लहान असलेल्या गावातून होते. २४० लेख महाराष्ट्रातील पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, मालवण, कऱ्हाड इ. शहर गावे व तालुका गावे यातून होते. १६२ लेखमुंबई (बृहन्मुंबई)तून होते.

**शिक्षण—**

५०८ लेखिकांपैकी ज्यांनी आपल्या शिक्षणाचा उल्लेख केला होता तेवढ्यांचीच संख्या येथे देत आहे.

पदवीधर—७७

| | |
|---|---|
| कॉलेजात शिक्षण होताना विवाह झालेल्या— | ८६ |
| मॅट्रिक किंवा प्राथमिक शिक्षिकेचे प्रशिक्षण घेतलेल्या— | ८८ |
| ११ वीत विवाह झालेल्या— | १७ |
| १० वीत विवाह झालेल्या— | ६ |
| ८ वीत विवाह झालेल्या— | ३ |
| व्ह. फा. होऊन विवाह झालेल्या— | ७ |
| मराठी ५ वीत विवाह झालेल्या— | ५ |
| इंग्रजी ५ वीत विवाह झालेल्या— | २ |
| मराठी ४ थीपर्यंत विवाह झालेल्या— | १० |
| लग्नाआधी निरक्षर व मग शिकलेल्या— | १ |
| लग्नाआधी 'श्रीराम' लिहिता येत होते. पुढे स्वतः होऊन शिकली— | १ |

वरील ३०३ लेखिकांनी स्वतःच्या शिक्षणाचा उल्लेख केला आहे. बाकी २०५ लेखिकांनी शिक्षणाचा उल्लेख केला नसला तरी लेखांतील विचाराभिव्यक्तीवरून त्यांना प्राथमिक वर्गापासून तो पदवीपूर्ण शिक्षणाच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर बसविता येत होते.

यातील ३० वधूंनी लग्नानंतरही आपले शिक्षण चालू ठेवले होते.

**विवाह–जुळणी—**

४०७ विवाह वडील मंडळींनी पाहून

२४ विवाहात दोघांची ओळख होती किंवा नात्यातली होती.

१७ विवाह वराने मागणी घालून

६० प्रेम विवाह ( यातील ८ आंतरजातीय; २ आंतरधर्मीय. )

**विवाह पद्धती—**

या सर्व विवाहांपैकी फक्त १८ नोंदणी पद्धतीने असे स्पष्ट .उल्लेखिलेले होते. ७ वैदिक पद्धतीने केल्याचा उल्लेख होता.

**अर्थार्जन—**

४६ मुली लग्नपूर्व नोकरी करीत होत्या.

५७ वधू लग्नानंतरही नोकरी करीत होत्या, किंवा काहींनी लग्नानंतरच नोकरी धरली.

त्यातील फक्त एकीला १९४२ च्या लढ्यानंतर पुरुष माणसे तुरुंगात गेल्याने संसाराची जबाबदारी घ्यावी लागली. त्यानंतर १९४७ साली नोकरी करीत असलेली एक आहे. पण बाकी सर्व त्यानंतरच्या काळातील आहेत.

**एकत्र की वेगळे—**

५०८ पैकी २४२ वधू एकत्र कुटुंबात राहत होत्या. २६६ वधूंनी नवऱ्याच्या नोकरीनिमित्ताने, जागेची अडचण किंवा न पटल्याने वेगळी बिऱ्हाडे केली होती. त्यातील न पटल्याने विभक्त झालेली बिऱ्हाडे फक्त १४ होती.

**मातृत्व—**

१७५ भगिनींनी लग्नानंतरच्या पहिल्या वर्षी मातृत्व आल्याचा उल्लेख केला होता.

६४ भगिनींना दुसऱ्या वर्षी मातृत्व प्राप्त झाले होते. बाकीच्या भगिनी माता होत्या. पण स्पष्ट काहीच उल्लेख नव्हता.

२ भगिनींना माता न होत असल्याची रुखरुख लागली असावी, असे जाणवले.

**कुटुंब नियोजन—**

१९४२ नंतरच्या काळात काही भगिनींना लग्नाच्या पहिल्या वर्षात मूल नको होते असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. लग्नानंतर सर्वसाधारणपणे पहिल्या वर्षी मोकळे रहावे, अशी बऱ्याच वधूंची इच्छा दिसली. एकंदरीत ३६ जणींनी जाणीवपूर्वक कुटुंबनियोजन केले असल्याचा उल्लेख मिळाला. दोघींचे कुटुंबनियोजन फसले असा त्यांनी उल्लेख केला. ३४ जणींनी

प्रथमापत्यानंतर कुटुंबनियोजन सुरू केले. यांतील तिघींची बिजवरांशी लग्ने झाली होती व त्यांना मुले झाली नाहीत. अपत्याची हौस त्यांनी सावत्र मुलांवरच भागविली.

**लग्नवय—**

विवाहकालीन सर्वांत लहान वय ११ आढळले व सर्वांत मोठे ३२ आढळले. ११ पूर्ण झाल्याबरोबर लग्न झालेल्या वधूचा विवाह १९२० सालीं झाला होता. १२ वर्षे वयाची वधू एकच मिळाली. तिचा विवाह १९१७ साली झाला होता.

१३ व्या वर्षी लग्न झालेल्या ३ वधू होत्या. त्यांचे विवाह १९०७ साली, २३ साली, ३० साली झाले होते.

१९६४ साली लग्न झालेल्यात एकच १४ वर्षांची होती. पण रूपाने सुंदर असल्याने वराने तिला मागणी घातली व लग्न झाले. पण ह्याच वेळी तिच्या भोवतालच्या मुलींत १९ पर्यंत लग्नाचा विचार होत नाही, याची तिला जाणीव होती. ३२ वयाला लग्न झालेल्या वधूचा विवाह १९६६ साली झाला होता. मुलीचे लग्न करून टाकण्याची खटपट १५ ते २० वयापर्यंत जास्त केली जाते. शिक्षित मुलीत हेच वय १५ ते १८ पडते. १९ ते २३ वयाच्या दरम्यान जास्त लग्ने होतात.

**सुखी दुःखी विवाह**

स्पर्धेसाठी आलेल्या लेखात फक्त १८ विवाह निरनिराळ्या कारणाने पूर्णपणे दुःखी झालेले होते. तसेच पहिल्यापासून सुखी असलेले विवाहही कमीच होते. बाकी सर्वांत वधूवरांचा कटु-गोड अनुभवानंतर जीवनमेळ जुळला होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
५००३९ दि. १०।८।६९
१७६३ नों दि. २८।१२।४८

दा. क.

१

## सौ. राधाबाई परांजपे

आम्ही संध्याकाळी शाळेतून आल्यावर खेळत होतो. इतक्यात माझे वडील वामनराव आपल्या स्नेह्याबरोबर घरी आले आणि त्यांचे पुढील वाक्य माझ्या कानावर पडले.

स्नेही, " कसं काय वामनराव, तुमच्या मुलीचे लग्न ठरले असे काल ऐकले, झालात एकदा मुलीच्या जबाबदारीतून मोकळे. " हे त्यांचे शब्द मी खेळत असता ऐकले बरीक आणि जे मला रडू आले की आता आपण या घरात फार दिवस रहाणार नाही. लग्न ठरले म्हणजे ते महिन्यापंधरा दिवसात होणारच. बारा तेरा वर्षांचे वय म्हणजे भविष्य काळाचा विचार नाहीच. आपण आई-बापांना बहीण-भावांना आता सोडून जाणार म्हणून भुई थोडी झाली मला, रडून रडून.

माझे अज्ञान किती आहे हे माझ्या बालिश वयाला कळत नव्हते. प्रथम आई वडिलांची बोलणी घरात चालत, पण मला वाटे लग्न झाले तरी माझे मुख्य रहाणे नेहमी माहेरीच. केव्हातरी सासरी जायचे त्यात वाईट काय आहे? साठ वर्षापूर्वीचा काळ, वय लहान, शिक्षण म्हणजे जेमतेम मराठी अडखळत वाचता येत होते. कुठले उच्च विचार ? आईची दोन कामे करायची व भरपूर खायचे, चार उडया मारायच्या, इतकेच आपल्या जीवनाचे क्षेत्र. ठरल्याप्रमाणे लग्न उद्यावर येऊन ठेपले. घरचे केळवण होते. पाव्हणेमंडळी जमली होती. उत्तम पक्वान्नाचा सैंपाक केला होता. केशर, वेलचीचे वास दरवळले होते. आम्ही सर्व जेवायला बसलो होतो. जेवताजेवता माझे वडील म्हणाले "आक्का आता सावकाश जेव. आमच्या घरचे हे शेवटचे जेवण तुझे. पुन्हा सासरची मंडळी पाठवेपर्यंत, " पुढे त्यांचा गळा दाटून आला. आणि लगेच विषय बदलून

ते माझ्या भावाला म्हणाले, " वाजंत्री केव्हा येतो म्हणाले रे, आचाऱ्यांना निरोप दिला का ?" वगैरे बोलणे सुरू केले. आई मात्र आठ दिवस रडत होती. तिला वाटे आपल्या मुलीला सासरची मंडळी नीट वागवतील की नाही ही काळजी, मुलगी हे परक्याचे धन असे म्हणतात. केव्हा तरी लग्न हे केलेच पाहिजे. हे तिला कळत होते तरी ती आईच.

लग्नसोहळा उत्तम पार पडला आणि आम्ही आमच्या गावी आलो. घर-प्रवेश झाला. दुसरे दिवशी सर्व पाव्हणेमंडळी गावाला गेली. आईने सांगितले होते सासुबाई देतील तेवढेच खायचे, मागायचे नाही, आपल्या हाताने विचारल्या-शिवाय घ्यायचे नाही.

माझे सासर मध्यम स्थितीचे होते पण माहेर मात्र खाऊन-पिऊन सुखी होते. तरी पण अन्नवस्त्राला कधीच कमी नव्हते.

लग्न झाले की स्त्रीचे जीवनाला खरी सुरवात होते. कोणाला श्रीमंत सासर मिळेल तर कोणाला गरीब सासर मिळेल. ज्याच्या त्याच्या नशीबानेच ह्या गाठी पडलेल्या असतात. एकदा लग्न झाले की स्त्रीने आपली जबाबदारी, कर्तव्य ओळखूनच वागले पाहिजे. आणि त्यातच सुख असते.

माझ्या वडलांनी मला एक उपदेश केला होता की, " सासरच्या कोणत्याही माणसांच्याकडून तुझ्याबद्दल काही तक्रार आली तर मी तुझे कधी तोंड पहाणार नाही. त्याप्रमाणे कसे वागायचे ते ठरव. " तेव्हापासून माझ्या मनावर भीतीचे दडपण बसले. सारा जन्म सगळ्यांना भिण्यात गेला.

माझ्या सासरची मंडळी चांगली होती. एकच सून म्हणून माझ्या सासऱ्यांना माझे कौतुक होते. परंतु जुना काळ, सनातनी वातावरण, भिक्षुकांचे घराणे, त्यामुळे त्यांच्या रीतीरिवाजाप्रमाणेच मला वागावे लागले. अर्थात ते आपल्या हिताचेच होते.माझे सासूसासरे स्वभावाने फार शांत होते. मला त्यांनी सुनेप्रमाणे वागवले नाही. माझ्याकडून काही चुका झाल्या तर ते संभाळून घेत. सासर म्हणजे वाईट अशी जुन्या काळापासून म्हणण्याची पद्धत होती त्याप्रमाणे मला पण वाटे. आपले सासरदेखील माझ्या मनासारखे कुठे आहे; त्यावेळच्या वागण्याची पद्धत म्हणजे सुनेबरोबर कामापुरतेच बोलायचे. परके घर, माझी ओळख अजून झाली नव्हती म्हणून मला ते सर्व आपले आहेत असे वाटत नव्हते. आमचे हे तर आई-बापांच्या आज्ञेत वागणारे, कर्तव्य निष्ठ, जबाबदारी घेऊन वागणे व आईच्या इच्छेप्रमाणे सर्व चालले पाहिजे अशा मताचे. त्यामुळे ते माझे असे एक वर्षभर नव्हतेच. केव्हा तरी त्यांना वाटे माझ्याबरोबर दोन शब्द बोलावे पण त्या काळात नवऱ्याबरोबर बोलणे, हसणे म्हणजे घरातील मंडळींचा अपमान करणे अशा जुन्या समजुती. माझ्याशी बोलण्याचा ते खूप प्रयत्न करीत पण त्याबाबतीत मी खूप अज्ञानी होते. त्यामुळे ते सैपाघरात आले की मी पुढच्या

दा. क्र. १६५९२

ओसरीवर, व ते ओसरीवर आले की मी सैंपाकघरात असे लपंडावी वागणे बरेच दिवस चालले होते.

पहिल्यांदा सासरी गेले तेव्हा माझ्या मनाविरुद्ध अशा पुष्कळ गोष्टी होत्या. आमचे घर मोठे होते पण घरात खूप अंधार होता. मला खूप उजेडाच्या बंगल्यात राहण्याची सवय होती त्यामुळे आमचे जुने घर म्हणजे मला अंधेरी कोठडीच वाटत होते. मातीने सारवलेल्या भिंती, विहिरीचे पाणी ओढणे, मातीच्या जमिनी असल्यामुळे सैंपाघर व देवघर रोज शेणाने सारवावे लागे. गावच्या वहिवाटीप्रमाणे खाण्यात व सैंपाकात बदल ह्यामुळे मला थोडे जड गेले. सांगितलेले काम करावे व रिकामा वेळ असेल तेव्हा परसातील दरवाजात बसून माहेरची आठवण काढून रडावे. तसेच झोपते वेळी डोक्यावरून पांघरूण घेऊन मनोसोक्त रडावे, व आपल्याला माहेरचे केव्हा बोलावणे येईल अशी वाट पहात पोस्टमन येण्याची वाट पहावी अशात दिवस घालवायचा. मला सासरी राहाण्याची स्थिरता अजून वाटत नव्हती.

माहेरी काम करण्यास नोकर असे परंतु सासरी मला सर्वच कामे करावी लागत. केरवारे, दिवाबत्ती, भांडी घासणे, सोवळे-ओवळे, देवधर्म, पूजेचे करणे वगैरे कामे व सैंपाक. त्याचप्रमाणे निवडणे, पाखडणे, सडणे, दळणे. इतक्या कामाची सवय मला कधीच नव्हती. ही कामे मला आवडत होती असे नाही. पण मला हे सर्व केले पाहिजे अशी जाणीव होती. ह्यांत माझ्या मनासारखे असे काही नव्हते.

माझ्या सासूबाई गरिबीतून वर आल्या होत्या. प्रथम मला त्यांचे काटकसरीचे रहाणे आवडत नसे. मला न्हावयास खूप शिकेकाई लागत असे म्हणून मी खूप शिकेकाई भिजत घालीत होते. ते त्यांनी पाहिले. आणि मला शिकवण्याच्या सुरात त्या म्हणाल्या, " इतकी शिकेकाई घेऊ नये.आपल्याला वर्षभर ती पुरली पाहिजे. " असे त्यांनी सहज व सौम्य शब्दांत सांगूनदेखील मला ते आवडले नाही. त्यांच्या पश्चात जेव्हा माझा प्रपंच सुरू झाला व पैसे कमी पडू लागले त्या वेळी त्यांच्या उपदेशाची पूर्ण कल्पना आली. आपला काटकसरीचा प्रपंच, त्यात दोन पैसे राखावेत हा हेतू, कमी पडू नये व वाया जाऊ नये असे त्यांचे तत्त्व असे. त्या नेहमी म्हणत नीटनेटके चांगले पदार्थ करा पोटभर खा पण गोड लागला म्हणून आवडला म्हणून हवा तितका खाऊन आपल्याला कसे परवडेल? खाण्याला रीत हवी, त्या वेळी मला जरी राग येत होता तरी आता मला ते सर्व पटते. त्या वेळी मी भिऊन वागले, किंवा नम्रतेने वागले व आहे त्या परिस्थितीला तोंड दिले व आनंदाने प्रपंच केला व माझ्या सासूसासरे व पती ह्या सर्वांनी माझ्या गुणदोषावर मायेचे पांघरूण घालून मला वागवले व मीही त्यांच्या मनाप्रमाणे वागले व नेहमी हसत मुखाने राहिल्यामुळे त्यांच्या आशीर्वादांनी माझे माझ्या प्रपंचातील स्थान उच्च राहिले

हेच माझे भाग्य. ह्या सर्वांचे श्रेय माझ्या पतींना दिले पाहिजे. प्रत्येक स्त्री आहे त्यात सुखासमाधानाने आपला प्रपंच करील तर तिचेही स्थान उंचावेल.

सासूबाईंनी सांगितलेले संसाराचे सूत्र आम्ही दोघांनी गिरवले. कोणतेही कमी पडू द्यायचे नाही असे ह्यांचे व सासूबाईंचे सूत्र होते. आपण दोन घास कमी खावेत पण दुसऱ्यांना आपले दैन्य कधी दाखवू नये. आणि ह्या त्यांच्या सूत्रापासून दूर न जाण्याची आम्ही खबरदारी घेत होतो, ह्याच्यापासून आपण दूर चाललो आहोत ह्याची खूण ह्यांनी सांगून ठेवली होती ती ही की, महिन्याच्या अखेरीस, उधारी ठेवण्याची, कर्ज काढण्याची किंवा शिलकीला हात लावण्याची पाळी येता कामा नये.

आणि तशीच वेळ आली तर आम्ही सावध होऊन हात आखडता घेत होतो. जर एखादा मोठा आजार घरात कोणाला आला तरच शिलकीला आमचा हात लागत असे, म्हणून आमचा संसार शेवटपर्यंत बिनकर्जाचा, काटकसरीचा व सुखासमाधानाचा झाला.

२

## सौ. जानकी कालेलकर

लग्नाच्या पहिल्या वर्षाच्या आठवणी जरी मी लिहावयास घेतल्या आहेत तरी त्या मला कितपत आठवतील ते सांगता येत नाही. व मीही त्या आठवणी गमतीने म्हणून सांगत आहे. कारण हल्ली १०० टक्के लग्ने लव्ह मॅरेजेस् होतात. त्यामुळे त्यातील गोडवा लग्न ठरू घातल्यापासून नंतर साखरपुड्यापासून सुरू होतो. रुसवा, समजूत काढणे. एकांत ठिकाणी फिरणे, गुंजन करणे, सिनेमा पाहणे यातच मला वाटतो तो गोड मसाला बराचसा संपतो. पण पूर्वी लग्नानंतरच प्रेमाला सुरुवात व ती ८० टक्के यशस्वी होतात. काही जोडपी प्रथमपासूनच दुर्दैवी होतात ही गोष्ट वगळली तर बहुतेक जोडपी सुखी राहत होती. ह्या आजपर्यंतच्या पाहिलेल्या गोष्टी होत. मला आता ४७ वर्षे मागे जावे लागत आहे. कारण माझे लग्न १९२० साली झाले. त्या वेळी मी २० वर्षांची होते व आज माझे वय ७० वर्षांचे आहे. तरी ४७वर्षे मागे जाऊन त्यातील गोड कडू आठवणी लिहीत आहे. त्या माझ्या भगिनींना आवडतील ना ?

तर मी काय सांगत होते, की आमचे लग्न अगदी जुन्या पद्धतीने झाले व तेही आमच्या उभयतांच्या आईवडिलांचे संमतीने. मी सावळी असल्यामुळे हे मग थट्टेने आपल्या आप्तात म्हणायचे की, " जेव्हा आमचेमधील अंतरपाट काढला

तेव्हा मी माळ घालताना एकदम बेशुद्ध पडलो." कारण स्वारी सुंदर व गोरी आहे म्हणूनच हे मला खिजवणे!

लग्नानंतर आम्ही २६ दिवसांनी होम पद्धतीने एकत्र आलो पण No बोलणे No फिरणे ( मला थोडे इंग्लिश पण येते वाचू व लिहू शकते ). त्यापूर्वीची मी एक आठवण सांगते. मी सासूबाईंच्या बरोबरच स्वयंपाक पाणी करू लागले. कारण त्या घरात एकटचा व नणंद माहेरपणास आलेल्या. एक दिवस गंमत झाली. स्वैपाक तयार झाला. सासूबाई बाहेर येऊन मामंजींकडे बोलत बसल्या. ह्यांना कोठेतरी लवकर जायचे होते. स्वैंपाकखोलीत २।४ फेऱ्या घातल्या ( आमचा ब्लॉक ५ खोल्या व एक हॉल असा होता). शेवटी हे स्वैपाकखोलीत आले. "जेवण झालंय तर वाढा."माझी जी तारांबळ उडाली,मी लगबग सासूबाईंकडे गेले व हळूच म्हणाले, "जेवायला वाढायला सांगताहेत". तशा सासूबाई – हो सांगण्यास विसरले. – माझ्या सासूबाई म्हणजे साक्षात देवता होत्या. – एकदम म्हणाल्या, "मग का नाही वाढलंस– जा ना वाढ त्याला." मी चटकन" आपणच वाढावे ना त्यांना" असे म्हणून दूर उभी राहिले. मात्र काही वेळाने माझ्या कानावर मामंजींचे शब्द सासूबाईंना सांगताना कानी पडले" सूनबाईला माहेरचे वळण छान आहे बरे, नाचरी नाही. मला ऐकून धन्य वाटले.

दुसरी गोष्ट. लग्नानंतर ८।१० दिवसांनी घरच्या मंडळींनीं सिनेमाला जाण्याचे ठरविले.सासूबाई, आम्ही दोघे.सख्ख्या वन्स व दुसऱ्या मावस नणंद,धाकटा दीर एवढे निघालो. थिएटरमध्ये शिरताच जणू सगळयांनी कट करून शेवटच्या दोन खुर्च्या रिकाम्या ठेवल्या. मला धडधडत शेजारी बसणे भाग पडले व थोडे बहूत आवडले बर का भगिनीनो? सिनेमा सुरू झाला. प्रसंग रडण्याचा होता. त्यांनी काय केले माहीत आहे? भगिनींनो अगदी दचकू नका. हळूच रुमाल माझ्या मांडीवर ठेविला. मी तो भीत भीत उचलला. हे आमच्या सख्ख्या वन्सनी पाहिले होते असे मग कळले. दुसऱ्या दिवशी त्या कशा म्हणतात, "वैनी तुझेकडे एखादा रुमाल आहे का, मी बाहेर जात आहे." मी पटकन तो रुमाल त्यांना दिला. त्यांनी हातात घेऊन भावाला हाक मारली व म्हणाल्या, "अरे हा रुमाल वैनीकडे कसा?" त्यांचा व माझा चेहरा खारकन् उतरला. तशा त्या म्हणाल्या, "अरे चालायचेच असे. अरे मी तुझे ते गोड पराक्रम काल पाहिले होते. अरे आम्ही तर लव्ह मॅरेज केल्यामुळे खूप फिरलो, गप्पा केल्या.चोरून सिनेमा बघितला." हे ऐकून त्यांचा व माझा चेहरा खुलला. माझ्या ह्यांचा स्वभाव फारच गोड व मायाळू पण आहे. सासूबाईंबरोबर व वन्संच्याबरोबर बोलताना मला वाटे जणू मी माहेरीच आहे. हे कधी रागे मला बोलले नाहीत की मी पण कधी त्यांना टाकून बोलले नाही. व आता तर दोघेही वृद्ध झालो आहोत. दोघे दीरही माझ्याबरोबर खेळीमेळीने वागत. वन्सं तर एवढचा खेळकर व गोड होत्या (त्या ९ वर्षांपूर्वी आम्हांस सोडून गेल्या ).

की पुरुष आफिसात गेले की आमचे दोघींचे हितगुज व गमती चालत. आमच्या वन्सं काय की सासूबाई बिछान्यात टेकताच १ मिनिटात बोलता बोलता झोपत. अशीच एक वन्सांची आठवण सांगते.

लग्नानंतर ८।१० दिवसांची गोष्ट. त्या व मी बिछान्यावर झोपलो. त्या दोन दिवस वीरधवल कादंबरी वाचीत. त्या दिवशी पडल्या पडल्या मी विचारले " काहो, वन्सं, थोरल्या वन्सांच्या मुलांची नावे काय ? ( कारण त्या लग्न होताच बाहेरगावी गेल्या होत्या. ) तेव्हा त्या म्हणाल्या " एक मंगेश, एक रमाकांत, एक यशवंती आणि मग मोंगल सैन्य आले." मी एकदम दचकले व म्हणाले, " वन्स कुठले मोगल सैन्य जाग्या आहात ना ?" तशा एकदम डोळे उघडून म्हणाल्या " अग, मला बोलता बोलता झोप लागली. " दुसरे दिवस सासुबाईनी ही गोष्ट मामंजीना सांगितली. ते एवढ्या मोठ्याने हसले की त्या १०।१२ दिवसात मी असे हसताना पाहिले नव्हते. माझे मामंजी १९३० साली वारले व वयाच्या ९४ वर्षी, १९५८ सालीआम्हांस पू. सासूबाई सोडून गेल्या. माझे दोघेही प्रिय दीर पण मला सोडून गेले.

मी प्रथमच पहिल्या बाळंतपणासाठी माहेरी निघाले. गाडी आली व मला मग रडूच आले. सासूबाईंनी पोटाशी घेतले. व त्याही अश्रू ढाळू लागल्या. हे दृश्य विलोभनीय होते. मामंजी तेथे होतेच. " सूनबाई माहेरी जाताना रडताना मी पहिल्यानदा पाहतो. रडू नकोस. जा आनंदाने व भरल्या ओटीने ये."व त्यांच्या आशीर्वादाने आज आम्ही पूर्ण सुखात आहोत" मला मोठे मोठे तीन वैभवशाली सद्‌गुणी मुलगे व दोन मुली आहेत. माझ्यासाठी जीव टाकतात. साऱ्या मुलांची लग्ने होऊन त्यांना मुले आहेत. आज आम्ही दोघे त्यांच्या समवेत सुखाने आहोत.

□

## ३

## सौ. शांता हसबनीस

□

आजचा महिला विभागातील विषय वाचला. हसायलाच आलं मला. ' कित्येक दिवसांत मी लिहिलं नाही, ' हे माझ्यापेक्षा आमच्या ह्यांनाच जाणवतं. मला हा मजकूर दाखवीत आमचे हे कसं म्हणतात–' शांता, या निमित्तानं तरी एकदा लिहीना तू. ' म्हटलं, विवाहाच्या पहिल्या वर्षात जर तुम्ही म्हटलं असतं ना तर लिहिलही असतं मी; पण ते दिवस संपले, महाराजा ! म्हणून तो विषय डोक्याबाहेर घालवला–पण पण मन महाखटचाळ–आज त्यानं मला नकळतच सारे ४४ वर्षांचे पडदे दूर करून २३ सालात डोकावण्याची धडपड केलीच.

२८ डिसेंबर १९२३ हा आमचा विवाहदिन. आज वय १६ धोक्याचं मानलं जात असलं तरी वयाच्या बाराव्या वर्षीच वाग्दत्त वधू म्हणून वावरायला मी सुरुवात केली. चौदा पूर्णला विवाहबद्धही झाले. विवाह या शब्दाचा अर्थही मला कळत नव्हता. फक्त मुलीचं लग्न होतच असतं एवढीच जाणीव होती.

श्री. हसबनीस हे बालपणापासून पोरके, आईवडिलांचं छत्र नाही. एका मातृहृदयी बाईने त्यांचा संभाळ केला होता. त्यांचा खरा धंदा स्वयंपाक्याचा पण त्या आमच्या घरच्या रक्षणकर्त्या 'आई' बनल्या. त्या इतिहासाचे हे स्थान नाही. पण मी गृहप्रवेश केला तेव्हा या सासूबाई ( यांना मी आईच म्हणत असे ), आमच्या एक विवाहित वन्सं, त्यांचा एक छोटा मुलगा एवढीच माणसं होती. वन्सं सासरीच असत त्यामुळे खास स्वभाव व आईची मर्जी सांभाळणं एवढीच माझ्यावर जबाबदारी होती.

खरा झगडा होता तो प्रतिकूल परिस्थितीशी. त्या काळात पदवीधरांना नोकरी मिळे ती ३५ रुपयांवर–त्यांनी तर सरकारी नोकरी न करण्याची प्रतिज्ञा केलेली. तेव्हा शाळाखात्याशिवाय इलाज नव्हता–जामनेरला ( जळगाव जिल्ह्यातील छोटा तालुका ) मुख्याध्यापक म्हणून छोटया शाळेत रु. ६० वर–नेमणूक स्वीकारली. दिवस पुष्कळच वेगळे असल्याने तेवढा पगार भरपूर वाटायचा; कारण राहणीच तशी होती ना !

छोटया गावात एका तळघराची जागा बिऱ्हाडाला मिळाली होती. हवा-उजेडाला बराचसा मज्जाव–मातीचं घर त्यामुळे सारवण्याचे कष्ट, आणि नळाची सोय नाही त्यामुळे पाण्यासाठी स्वावलंबन अवलंबावे लागे.

वास्तविक माझ्या माहेरी सर्व समृद्धी होती आणि इथं तर कधी न केलेले कष्ट करावे लागत. विहिरीचे पाणी आणायचे तर खोलच खोल विहिरी. पंधरावीस पायऱ्या चढून पाणी काढून जरा लांबूनच आणावे लागे. नदीवर जावे तर काढायचा त्रास वाचे पण साठएक पायऱ्या चढून आणावे लागे. नवा अनुभव, नवी उमेद म्हणून हे श्रम मी करीत असे. भांडीसुद्धा घरीच घासावी लागत.

खेडेगावातील जीवन जवळून पहायला मिळाले. ब्राह्मणाच्या स्त्रियाही जळणासाठी गोवऱ्या लावीत. मीही शेण गोळा करून गोवऱ्या लावू लागले. नदीवर धुणं धुवायला रोज जात असे. तेथे तेथील सासुरवाशिणी येत–सासूचा जाच–नणंदाकडून होणारा छळ–पतिराजांकडून क्वचित होणारे कौतुक व रागही मोकळेपणाने सांगत. रसिकतेने आपले नवे अनुभव कथन करीत. मलाही खोदून खोदून विचारीत–मी गप्पच बसे; साऱ्याच गोष्टी का बोलायच्या अन् लिहायच्या असतात ?

इतरांच्या मानानं माझं शिक्षण थोडंसं इंग्रजी वाचण्याइतपत झाल्यानं लोक कौतुकाने माझ्याकडे पहात–त्या काळात बरोबर फिरायला जाणं, सर्वांच्या समोर

पतिपत्नीनं बोलणं, इतपतही प्रथा नव्हती. त्यामुळे मला वाटायचं–कसं आपलं आयुष्य जायचं कुणास ठाऊक ! कारण आमच्या सासूबाई फार जाणत्या म्हणून थोडंच बोलायच्या अन् हेही क्वचितच–रात्री दोन तास विठोबाच्या देवळात त्या भजनाला जायच्या–संधी साधून हे थोडंसं बोलायचे. मग भीतभीत का होईना हळूहळू आमचा परिचय झाला. आणि मला वाचायला काही तरी आणून देत चला म्हणून आग्रहाने सांगितले–पत्नीने कपडा–अलंकार इ. न मागता वाचनासाठी पुस्तक आणा सांगितलं म्हणून हे तर आश्चर्याने माझ्याकडे पाहातच राहिले. मला म्हणाले ‘ उद्या तू म्हणशील मी शाळेत जाते म्हणून ’. म्हटलं आजच सांगते ना मला शिकायचं आहे म्हणून. एवढी माझी शिकायची हौस जबर होती.

आमच्या आईला माझ्या लग्नाची भलतीच गर्दी झाली होती. कारण आमच्या वडलांच्या पश्चात चार मुली उजवून मुलाचे शिक्षण करायचे होते. आमच्या दोघांमध्ये वयाचे अंतर ९–१० वर्षांचे. त्यामुळे बरोबरीचे संबंध कसे निर्माण होणार ! अजूनही आपल्या वयाचा दिमाख हे दाखवतातच. पण आता तो मानायला मी तयार नसते. मीही त्यांना मी सहा मुलांची आई, चौदा नातवंडांची आजी आहे म्हणते ! पण तेव्हा त्या पहिल्या वर्षात ऐकावं लागे हो–माझा शिकण्याचा हट्ट मी किती धरला असेल–पण रामा-शिवा-गोविंदा–पुढे तीन मुले झाल्यावर भावी पिढीच्या कल्याणासाठी आग्रहाने मी फायनलपासून परीक्षा द्यायला सुरुवात केली, त्यात यश आले. आज आ. बं. विद्यालयातून मी निवृत्त व्हायची वेळ आली आहे– आणि त्यांचं पाऊल तर सत्तरीच्या उंबरठ्यावर आहे.

आमच्या संसारात माणसांचा दुष्काळ तसाच वस्तूंचाही दुष्काळ. साध्या साध्या गोष्टी ठेवायला डबे, बाटल्या काही नव्हते. शेवटी शेजाऱ्या पाजाऱ्याकडून तीन आण्याला रॉकेलची बाटली, अडीच आण्याला चहाचा डबा असा जुना बाजार विकत घ्यायला सुरुवात केली. आणलेले धान्य व इतर पदार्थ पुरचुंड्या करून जुन्या ट्रंकेत भरायच्या. त्यावर लिहावेही लागायचे नाही. स्पर्शानेच ओळखू येत.

खेडेगावातील संडासही पेवाचे असत. संडास असणं हेच भाग्याचे–कारण शेते-नदीतीर-हेच लोकांचे खरे स्थान. संडास-घरे मातीतून बांधलेली. उंदीर, घुशी यांचे प्राबल्य. मला तर उंदीर एकदोनदा चावलेही आहेत.

आमच्या सासूबाईंचे सोवळे ओवळे भरपूर. पण मला त्याचा त्रास जाणवला नाही. आजोबांच्या घरी बाल्य गेल्याने पुष्कळ माहिती होती. आजच्या आमच्या सुनांना ते शास्त्र ( थिअरीही ) कळायचे नाही मग वागणे दूरच.

मंगळागौर-दिवाळीनिमित्त कुणीतरी माहेरचे न्यायला येई, केवढा आनंद होत असे मला, अगदी त्या दिवसाची वाट पाही मी; कथा कादंबऱ्यातली विरह-व्यथेची वर्णनं असंभवनीयच वाटत. अहो, कितीतरी गोष्टीतून सुटका होई त्यामुळे. आमच्या वयातल्या मुलींनाच हा अनुभव यायचा म्हणा.

मला चांगलं वाचता येतं हे सासूबाईंना माहीत होतं. कारण वधूपरीक्षेच्या वेळेस केसरी वाचून दाखवला होता ना मी त्यांना ! शिवपूजा हा त्यांच्या प्रीतीचा, निष्ठेचा विषय होता. पहिल्याच वर्षाच्या महाशिवरात्रीला त्या म्हणाल्या, 'मुली, तू जर उपास करून मला सबंध शिवलीलामृताचं पारायण करून ऐकवशील ना तर मी तुला एक रुपया ( चांदीचा हं ) बक्षीस देईन.'

आमचे हे हल्लीच्या मुलांसारखे पगार काही मला द्यायचे नाहीत. सर्व खर्च स्वतःच करायचे. पैन पै हिशेब मांडायचे. अजूनही सुरूच आहे म्हणा हिशेब मांडायचे काम. पण मला एक रुपया मिळणार म्हणून खूप आनंद झाला. प्रामाणिपणाने मी त्यांना पोथी वाचून दाखवली; त्यांच्याबरोबर पोथी ऐकायला—यमाबाई, ठकुबाई, सीताबाई, या बायाही आल्या होत्या. सर्वांनी माझी पाठ थोपटली आणि सासूबाईंनी तर आपल्या आशीर्वादासह मला तो रुपया बक्षीस दिला आणि आपल्या चिरंजीवाला म्हणाल्या सुद्धा की 'बघ, किती छान वाचलंन तिनं' त्या वेळचं ह्यांचं ते मिष्किल बघणं अन् हसणं अजूनही आठवतं मला.

आमच्या घरात भांड्यांचाही असाच उन्हाळा. त्या वेळेस चहा—कॉफीचे प्रस्थ नव्हते. आम्ही दूधच घेत असू. एका भांड्यात ते तापवून दुसऱ्या भांड्यात ओतायचे आणि मग त्यात भात टाकायचा. कित्येक अडचणींना तोंड देऊन आम्ही दिवस काढीत होतो.

घराला कपाटे नाहीत, त्यामुळे सामान ठेवायची अडचण. भिंतीला एक खिळा बसेल तर शपथ. घरात सामान नव्हते ही एक सोयच होती म्हणा ना ! हसबनीसांचा व्यवस्थितपणा पराकोटीचा. इथली वस्तू तिथं दिसली, वाळत घातलेल्या धोतराला वळी पडली तर चढलाच पारा. ह्यांचं पूर्वीचं जीवन एकाकी म्हणून हे सारे प्रस्थ. पण मी समृद्धीत दहा माणसांत वाढलेली. वाटायचं थोडा पसारा व्हायचाच !

या दोघांच्या मूळ स्वभावात अजूनही फारसा बदल नाही म्हणा. पण मला अजूनही वाटतं माणसानं फारही व्यवस्थित नसावं.

लहानपणापासून स्वतः पदार्थ करून घ्यायची ह्यांना सवय असल्याने गंमत म्हणून, हौस म्हणून काही वेळा हे स्वयंपाकघरावर आक्रमण करीत. प्रथम प्रथम ह्यांची ही लुडबुड मला बिलकूल आवडायची नाही. एक तर माझ्या हक्कावर आक्रमण. दुसरं कुणी पाहिलं तर ते काय म्हणतील हा संकोच आणि तिसरं कारण 'बघ. माझा पदार्थ किती छान होतो. म्हणून प्रौढी मिरवायला यांना संधी दिल्यासारखं होई. अजूनही ही सवय ठाण मांडून आहेच म्हणा.

नव्या नवलाईचं वर्ष म्हणजे केवढेतरी लिहायला पाहिजे. अमर्याद कुतूहल असीम निष्ठा—भाव—भावनांचा कल्लोळ घेऊन प्रत्येक वधू गृहप्रवेश करते ती

उज्ज्वल भविष्याचं चिंतन करीत. या साऱ्यांना मिळालेले पडसाद पहिल्याच वर्षात ऐकू येतात.

पहिला स्पर्श–पहिले चुंबन–पहिले मूल–साऱ्याच पहिल्या गोष्टींना आपण महत्त्वाचे स्थान देतो. तसेच हे पहिले वर्ष असते.

आज मी स्वतःच्या समृद्ध घरात वावरते. सर्व आधुनिक सोयींनं घर सुसज्ज आहे. मुलं तर मोठ्या बंगल्यात वास्तव्य करतात. कुणी परदेशी जातात. पण माझं पहिल्या वर्षाचं घरकुल मला आठवलं की स्मृती चाळवतात. मी मुद्दाम त्या गावी जाऊन त्या तळघरातल्या काळोखाशी गुजगोष्टी करून येते.

□

## ४

## सौ. सिंधू कदम

□

अर्थातच मला माझ्या आयुष्यात चवेचाळीस वर्षे पाठीमागे जाणे भाग आहे.

तारीख २२ जून सन १९२३ इसवी रोजी गोरज मुहूर्तावर माझा विवाह एका सरदाराशी त्यांच्या संस्थानिकांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्याच बंगल्यात यथाविधी पार पडला. माझे वडील माझ्या वयाच्या १२ बाराव्या वर्षीच निधन पावल्यामुळे माझ्या चुलत्याच्या मदतीने श्रीमंतांनीच लग्न सोहळा पार पाडला. व मला मुलगी म्हणून माझ्या पतींना सांगून नीट काळजी घेण्यास सांगितले. माझे पती हे या संस्थानिकांचे ए. डी. सी. व मानकरी होते. मानकऱ्यांचे पहिले लग्न होऊन बारा वर्षे पुरी झाली होती. पण मूल नाही. आणि याकरताच त्यांनी हा खास विवाह जमवला. या नंतर मी सासरी गेले तेथे काय दिसले. 'मोठ्या बाई' त्या खरोखरच मोठ्या होत्या. त्यांचे वजन त्या वेळी १६० पौंड असावे. वय अवघे तेवीस–चोवीसचे आसपास व स्थूल देह. त्यांना पाहून मला त्यांची कीव आली. माझे डोके फिरू लागले. मी त्या बाईच्या दुःखाला कारणीभूत झाले म्हणून मन तळमळू लागले. दुसऱ्याच्या सुखात माती कालवण्याचा घोर अपराध माझ्याकडून व्हावा अशी माझी इच्छा नव्हती. पण दैवाने ते घडवून आणले होते. रात्रंदिवस मी याच विचाराने तडफडू लागले. तशातच एक दिवस हे मला विचारतात, तुम्ही स्वतंत्र राहणार काय ? तुमची स्वतंत्र व्यवस्था करू काय ? मला याचेही नवलच वाटले. खरंच सखी-पार्वतीप्रमाणे आम्ही दोघी रहात होतो व यांची सेवा करणे हेच आम्हा दोघींचे एकमेव कर्तव्य समजत होतो. कोणीही त्याबद्दल नाखूष नव्हतेच. मग स्वतंत्र राहण्याचा विचार कुठला शिवायला. मी त्यांना सांगितले, तसे काही नको. आम्हा

दोघींना सारखेच आणि एके ठिकाणीच राहू द्यावे. लग्नात मला जवळ जवळ शंभर तोळे सोन्याचे दागिने, तन्मणी, चिंचपेटी वगैरेंनी मला त्यांनी मढवून टाकले होते. सर्व सुखसोयी होत्या. पण माझे शिक्षण मराठी ६ वी व इंग्लिश २ री इतकेच होते. माझे मन शिक्षणाकरता तडफडत होते.

पहिली मंगळागौर थाटाने पार पडली. स्वत: श्रीमंत सरकार, राणीसाहेब युवराज व राजकन्येसह येऊन त्यांनी माझ्या पूजेची सांगता केली. मला कोणी कशालाच कमी पडू देत नसत. घोडयाची गाडी, मोटरशिवाय आम्ही बाहेर जात नव्हतो. दागिन्यांप्रमाणेच उंची उंची कपडे, लव्हेंडर अत्तर, कशालाच कमी नव्हते. गंधाच्या वेळी केशर वापरत होतो. आणि आता मुलांना दाखवायला साधी केशर काडी मिळत नाही.

श्रीगणपतीची पूजा होऊन दसरा, दिपवाळी, पेशवाई थाटात पार पडली. दसऱ्याचे सोने, दिपवाळीची भाऊबीज श्रीमंतांकडून आलीच, ते वेगळे सांगण्याची जरूर नाहीच. माझे कौतुक किती करावे आणि किती नाही. बोटिंगला जाऊन आलो. मला सर्व काही नवे नवेच वाटत असे. पण मी स्वस्थपणे पहात असे.

बालगंधर्व त्यावेळी एकच प्यालयामध्ये सिंधूची भूमिका इतक्या तन्मयतेने करीत की त्या सिंधूसारखी आपली पत्नी असावी असे कुठल्याही पुरुषाला वाटे. आणि म्हणून बहुतेक लोक सिंधू नाव ठेवू लागले होते. त्याचेच प्रत्यंतर म्हणून माझे नाव पण सिंधूच ठेवण्यात आले. आणि मी कायमची सिंधू झाले. 'स्त्रीचे दैवत पती होय' या दृढ कल्पनेने आम्ही भारवलो होतो. व त्यांची आम्ही मनोभावे पूजा करत होतो. खरोखरच 'आदर्श घर' म्हणून बोट दाखविण्यासारखा आमचा नवा संसार चालला होता.

त्याच वेळी श्रीमंत युवराज व राजकन्येचे लग्न ठरले. लग्नाची तयारी राजधानीत चालू झाली. दागदागिने, कपडे, कलाकुसरीचे सामानाच्या तयारी-करता कारागीर येऊ लागले. याप्रमाणे राजधानी शृंगारली. आम्ही सर्वजण पुणे-मुंबईस जाऊन सामान खरेदी केले. श्रीगणपतीपुळयाला मुंबईहून तुकारामबोटीने गेलो. ही माझी पहिली समुद्रसफर होती. मला तरी ती बरीच मनोवेधक वाटली. श्रीगणपतीस अक्षत देऊन आलो. समुद्रस्नान केले. तीन दिवस तेथे राहून समुद्राच्या भरती आहोटी पहात शाहळयाचे खोबरे, साखरपाणी यांची चव घेत दिवस मजेत काढले.

एवढे होईतो जानेवारी महिना आला. लग्नाच्या अगोदर नागरिकांनी श्रीमंतांना केळवणे सुरू केली. पहिले केळवण आमचे. नंतर इतरांचे अशा क्रमाने सकाळी संध्याकाळी पेशवाई थाटात केळवणाचा थाट होत असे. श्रीमंतांच्या बरोबर आम्ही त्रिवर्ग इतर सरदार व अधिकारी वर्ग असतच. माझे लग्न नुकतेच झाल्यामुळे माझी विचारपूस अधिक केली जाई.

माझे पतींना शिकारीचा नाद होता. त्यांनी जिवंत चित्तेही पकडले होते. घोड्यावर बसण्यात त्यांच्या इतके कुशल कोणीच नव्हते. त्यांनी बरेच पोलो कपस् मिळविले आहेत. काही वर्षे ते एका नाटक कंपनीचे मॅनेजर म्हणून काम करत होते. नंतर महायुद्धाची आग पेटली. व नाटके बंद करून ते श्रीमंतांबरोबर महा-युद्धावर गेले. फ्रान्स मेसापोटेमिया येथे त्यांनी उत्तम कामगिरी करून दाखविली त्याबद्दल त्यांना केसर इ हिंद मेडल व सोर्ड ऑफ ऑनर(तरवार)मिळालीआहे. इतर कांही महत्त्वाची संस्थानची कामे केल्यामुळे श्रीमंतानी त्यांना पाटीलकी व २५० एकर जमीन दिली होती. त्याचप्रमाणे मानकरी म्हणून एकशेपंचवीस रुपये नेमणूक केली होती आणि ही नेमणूक पुढे तीन पिढ्या चालवावी असा करार होता. त्याच प्रमाणे बंगल्याकरता जागा वगैरे देऊन त्यांच्या नोकरीचे चीज त्यांनी केले होते. अशा ऐश्वर्यात मी होते. मला अस्मान ठेंगणे झाले. मी म्हणजे मोठी दैववान म्हणून स्वत:जवळच शेखी मिरवत होते. पण दैव घटना वेगळी होती. त्याला माझे सुख पहावत नव्हते.

श्रीमंतांची लग्नाची घाई जोरात चालली आहे. वरातीकरता चांदीची अंबारी तयार झाली. हत्तीवर अंबारी कशी काय दिसते ते पाहणे करता श्रीमंतांनी हत्तीला आणण्यास सांगितले. हत्ती मस्तीत होता. आणि आणि काय झाले 'श्रीमंतांना हत्तीने भिंतीला रेटले.' संपले. जिकडे तिकडे हाहाकार उडाला. तारा केल्या. डॉक्टर आले, ज्योतिषी आले, सर्व आले. श्रीमंतांना दिवाणखान्यात घातले होते. ते शुद्धीवर आले होते. सर्वजण ते पाहून रडत होते. भयाने सर्वच विव्हल झाले होते. प्राण कासावीस होत आहेत आणि श्रीमंत मानकरी म्हणून हाक मारत आहेत. मानकरी शोक सागरात बुडाले, कायमचे बुडाले. त्यांनी त्यांना जवळ बोलावले. आतमहत्या करणार नाही म्हणून वचन घेतले. मी तुमच्यापुरते सर्व दिले आहे, कोणाची नौकरी करू नका व माझ्या मुलीला सांभाळा हे सांगून तसे करणे करता त्यांचेकडून वचन घेतले. राणीसाहेब, राजकुमार व मानकरी यांना एकदिलाने वागण्यास सांगून श्रीमंत आम्हा सर्वांना सोडून निघून गेले.त्यांच्या बरोबर आम्हीही राजधानी सोडून बाहेर पडलो. नंतर संस्थानच्या अधिकारी वर्गांनी आमची सर्व इस्टेट ताब्यात घेतली. नेमणूक बंद केली. का तर श्रीमंत मानकऱ्यांचे ऐकत होते.

आम्ही तेथून तिघेजण निघालो. आम्हांला स्वत:ची मोटर मिळाली नाही. भाड्याची मोटर करून गाव सोडले. मला चारुदत्ताची व मुद्राराक्षसमधील राक्षसाची आठवण झाली. दैवावर हवाला टाकून आम्ही येथे आलो. बाहेर पडण्याची लाज वाटू लागली. पण मनातील पुढील शिक्षणाची इच्छा कमी झाली नव्हती म्हणून कर्वे यांनी चालविलेल्या महिला विद्यालयात जाणेस मी सुरुवात केली. ही माझी पहिल्या वर्षाची त्रोटक कहाणी !

८

## सौ. सु. डोंगरे

संध्याकाळची वेळ होती. दिनमणी रजनीचा निरोप घेत होता व रजनी त्याला हळूच हसून लाजत लाजत लाजत परवानगी देत होती. दिनमणीने दिलेल्या निरोपाची चिन्हे चोहोकडे दिसू लागली. इतके दिवस मनात घोळत असलेले विचार सैरावैरा धावण्यास सुरुवात झाली. पंजाब-मेलला मागे टाकणारे ते मन बार्शी-लाईटला जुमानते होय. आई-बाबा, दादा-ताई ह्यांना निरोप दिला. ' सर्वांशी चांगले वाग ' हे आईचे शब्द हृदयात धरून गाडीत बसले. आई-बाबांच्या विरहाच्या दुःखाबरोबर नव्या जगात निघालेले मन नवीन सहप्रवाशाचाच विचार करण्यात गुंग होऊ लागले.

दोन व्यक्तींचे नवे नाते—त्या आनुषंगाने येणारी अनेक नाती शिरावर घेऊन ही स्वारी —मनोरथाच्या पायघडचावरून —कल्पनासाम्राज्यात स्वैर धावत चालली होती. पण जसजशी वऱ्हाड प्रांतातून गाडी धावू लागली. तसतशी छाती धडधडू लागली ! नव्या—सासरच्या घरात प्रथम प्रवेश होणार होता. नांदी चालू झाली होती. पण सूत्रधार—जीवनाचा सूत्रधार लांब होता. . . . .तेथे गेल्यावर कसं होईल ? मधुकर स्टेशनवर येईल का ? आपण कसे बोलायचे ? कशी थट्टा करायची ? कसे रागवायचे, कसे रुसायचे ? दीर-नणंदा कशा असतील ? सासूबाई-मामंजी काय विचारतील ? आपण कसे बोलायचे. . .अशा तऱ्हेच्या विचारांनी डोक्यात थैमान करून सोडले. तोच कारकुनाने सांगितले, " बाईसाहेब, उतरायचे बरे का आता. " गाडी खाड् खाड् खाड् करीत थांबली. . .जितक्या वेगाने गाडीची खाड् खाड् थांबली. तितक्या वेगाने छातीत धाड् धाड् सुरू झाले.

गाडीतून उतरते तो बरीच मुले-दीर-नणंदा-भाचे आणावयास आलेली दिसली. माझी नजर भिरभिर माझे माणूस शोधू लागली. ' चढा ना वहिनी मोटारीत ' या दीराच्या म्हणण्याने सावध झाले ! कसे विचारायचे, कोणाला विचारायचे ! मला काहीच कळत नव्हते. मुले गंमती सांगत होती. मी ऐकत होते—पण माझे मन—तोच माझी नणंद म्हणते कशी, " एक माणूस आले नाही म्हणून एक माणसाचा चेहरा पडला ! " मला वाटले विचारावे त्यांना,—"घरी तरी आले आहेत का नागपूरहून ? " या स्थितीत मोटार घरासमोर केव्हा आली कळलेही नाही. घरी आले तो मोलकरणीने तुकडा ओवाळून टाकला. सहज वर पाहिले तर गच्चीवर स्वारी खुषीत होती.माझ्याकडे पाहून हसले—नजरानजर झाली ! लाजेने किती चूर झाले मी. पुन्हा डोळे वर करून बघितले नाही तर बोलते कुठली ! घरात गेल्यावर तर कोडकौतुकाच्या समुद्रात पडल्यासारखे झाले. कौतुकाच्या लाटांवर लाटा ! गुदमरत होते मी. पण माझा जीवन-सोबती-दूर किनाऱ्यावर. कधी एकदा

रात्र होते असे झाले. जिन्यात अंधारात उभे राहून हळूच सांगितले मला. "पश्चिमेकडच्या खोलीत आपली अंथरुणे आहेत." व सटकले. जेवणे झाली. लहान मुले "वहिनी तू आमच्याजवळ नीज, वहिनी तू आमच्याजवळ नीज" करीत होती. माझा जीव आपला थोडा थोडा.

जेवणे आटोपली. बालचमू झोपली. नोकर येऊन सांगून गेला 'बिछाना वर घातला म्हणून.' हळूच वर गेले. दिवा लावून स्वारी वाचत होती. वाचत होती का वाचावयाचे सोंग करत होती माहीत नाही पण डोळयांपुढे पुस्तक होते खरे. मी गेल्याबरोबर दिवा घालविला. इतकी घाबरले होते मी. पण स्वप्न सत्यसृष्टीत उतरत होते. जीवाभावाचे—जीव देणारे—आयुष्यभर हातात हात घालून सोबत करणारे भेटले होते. स्त्रीच्या जीवनातील क्रांतीचा दिवस ! आपली रक्ताची माणसे सोडून—या परक्या माणसास आपले समजून आपले सर्वस्व अर्पण करावयाचे, धन्य आहे आमची संस्कृती.

दिवसा एकमेकांकडे पाहण्याची चोरी तर बोलतो कुठले ! कुठे तरी न्हाणीघरात, जिन्याच्या पायऱ्यावर चोरून बोलण्याकरिता थांबावे तोच वन्सबाईंचे फिदफिदणं कानावर यावयाचे—हे थांब थांब म्हणतात तो मी पार दूर ! कधी त्यांनी दिराच्या हाती चिठ्ठया द्यायच्या. त्याकरिता त्यांना लांचही भरपूर द्यायला लागायची...नाहीतर मग खोडया...घडयाळाचा गजर...असा लावून ठेवायचा रात्री आमच्या खोलीत की बंदच होऊ नये...खिडक्या लावता येऊ नयेत. म्हणून त्यात बारीक दगड घालायचे ! व मी लावायला लागले की सगळयांनी एकदम हसायचे. त्या वेळी आमच्या घरात १५।२० मुले-दीर-होते शिकायला व मी पहिलीच सासुरवाशीण ! सगळयांना गंमत वाटायची. पहिल्याच वर्षी—मंगळागौरी—सासर—माहेर...आजोळ,— सासर...चालायची गडबड ! दिवाळीत दिवाळसणाची गडबड—आईकडे...त्यात हवे नको व्हायला लागायचे... मग तर विचारायलाच नको. त्यांना वाटायचं—'मी त्यांच्याबरोबर सिनेमाला जावे. रोज फिरायला जावे.' पण मांजराच्या गळयात घंटा बांधायची कुणी ? पण एक दिवस का कोणास ठाऊक सासूबाईच त्यांना म्हणाल्या, "अरे, तिला घेऊन जरा फिरायला वगैरे जात जा ना." मग काय पडत्या फळाची आज्ञा. पण आमचे फिरायला जाणे तुम्हांला माहीत नाही.समोर मोठी माणसे बसलेली असायची. त्यांच्या समोर बरोबर निघता यायचे नाही. मग...'तू या फाटकाने जा मी त्या फाटकाने येतो.' असे रोज चालायचे. एकदा काय झाले, नेहमीप्रमाणे दोघे दोन्ही फाटकांनी निघालो. त्यांना कोणीतरी भेटले. राहिले बोलत. मी चालू लागले! मला अगदी राग आला होता. मी अर्धा रस्ता गेले तरी हे भेटलेच नाहीत. मी जोरजोरात चालत होते. तोच आमच्या गावचे एक प्रतिष्ठित वृद्ध वकील मला भेटले. ते विनोदी होते. माझ्या चेहऱ्यावरील आठया पाहून ते म्हणतात कसे, "अहो,

तुमची आज चुकामूक झालेली दिसते! तुम्ही पुलावर बसा मी पाठवून देतो त्यांना." मला असा राग आला. पण ते खूपच वयस्कर व प्रेमळ होते. मी नुसते हसले व निघाले. असे होते आमचे ४० वर्षापूर्वीचे जीवन ! घरात काय– सगळ्या गावाच्या सुनबाई होतो आम्ही. एक तर आम्ही या नव्या घरात आलो तेव्हां पंधरा वर्षांच्याच होतो. आधी आम्हांला समजायचे नाही–घरातील सजावट-बिजावट-व त्यातून आम्ही केले तर चालायचेही नाही ! कोठली सजावट अन् कोठला मधुचंद्र ! उलट पुष्कळ वेळा पाहुण्यांच्या गडबडीत ' मधु तिथे अन् चंद्र इथे ' अशीच म्हणायची पाळी यायची.

एव्हढे खरे की पहिले वर्ष–धावपळीत कोडकौतुकात व सुंदर स्वप्ने रेखाटण्यात निघून जाते. त्यांच्या मनात त्या वेळी काय चालले होते माहीत नाही पण माझ्या मनात–कीर्ती, प्रीती, ध्येय, त्याग, सेवा या सर्वांची स्वप्ने मी पाहिली ! सत्यसृष्टीत उतरताच ' सत्य ' कळले त्यातील !

▭

## ६

## श्रीमती सुशीला पुरोहित

▭

शुभमंगलऽ साऽऽ व धाऽ नऽऽ मंगलाष्टकाच्या घोषात, मंत्राक्षतांच्या वर्षावात अंतरपाट बाजूला झाला. काहीशा संभ्रमावस्थेतच मी सुधाकरांच्या गळचात माळ घातली. प्रत्येक मुलीच्या आयष्यात येणारी ही एक ठराविक घटना आहे. मग माझ्या आयुष्यातच त्याचं एवढं काय महत्त्व आहे ?

म्हटले तर आहे म्हटले तर नाही. प्रत्येक मुलीच्या मनात आपल्या पतीविषयी ज्या प्रणयरम्य कल्पना असतात तशाच त्या माझ्याही मनात होत्याच.

आपल्या परिस्थितीप्रमाणे माणूस कल्पना–साम्राज्यात रमत असतो आणि तरीही त्या कल्पना प्रत्यक्षात काडीच्याही उतरत नाहीत असाही अनुभव माणसाला येत असतोच.

कथा-कादंबऱ्या वाचून केलेल्या प्रणयी जीवनाची कल्पना प्रत्यक्ष व्यवहारात कुचकामाची असते असेच माझ्या अनुभवाला आले.

आमच्या वडिलांनी माझ्यासाठी पुष्कळ स्थळं पाहिली. पण माझं शिक्षण कमी अन् पैसा नाही, यामुळे वडील जेरीस आले होते. त्यात हे आताचे स्थळ सर्व बाजूंनी उत्तम. माझे पती हे एका कारखानदाराचे एकुलते एक पुत्र. मुलगी पाहून पसंत करून ठरवलेले हे लग्न मुलाच्याच गावी झाले. सर्व खर्च त्यांनीच

केला. आतापर्यंतचा सारा थाटमाट पाहून कुणीही हेवा करावा असे स्थळ. माझ्या वडिलांनी त्यांच्या कुवतीप्रमाणे मुलाची चौकशी केली. मुलगा अव्यंग, सुदृढ, देखणा. फक्त शिक्षणात डोकं नाही. माझंही शिक्षण सात यत्ता जेततेम. तेव्हा अधिक पाहण्याचा, तपासाचा खटाटोप न करता वडिलांनी होकार दिला अन् लग्न झाले.

लग्न झाले. हे दोनच शब्द पण मुलीच्या आयुष्यात एकदम स्थित्यंतर करणारे.

आहेर स्वीकारण्यासाठी आम्ही दोघं सजवलेल्या कोचावर बसलो. उंची वस्त्राभरणांनी नटलेली आपली मुलगी बघून वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्र आले. आमची मंडळी मोजकीच असल्यामुळे बाकी सर्व मंडळी वराकडीलच. माझी ओळख कोणाशीच नसल्याने मी स्वस्थ पहात होते.

प्रत्येक बाई येई. गोट, तोडयाच्या दिमाखात आमच्यासमोर येई, अन् यांच्याकडे पाहून म्हणे 'अण्णा बायको मोठी छान आहे हं.' त्या प्रत्येक वेळी यांचं हसणं मला चमत्कारिक, विकृत असं वाटे. नंतर कारखान्याची मंडळी येऊ लागली.

मामंजी स्वतः येऊन मला म्हणाले म्हणून मला हे समजले. प्रत्येकजण येई, काही बाही बोले. ते बोलणे एखाद्या लहान मुलाशी बोलावे तसे असे.

एका वात्रट माणसाने त्यांचे उष्टं आइस्क्रीम मला द्यावयास त्यांना सांगितले, तेव्हा तर कहरच झाला.

हे चक्क म्हणाले, " माझ्यातलं नाही हं द्यायचं; मी नाही देणार ! आमचे लग्न आणि आम्ही नाही आइस्क्रीम खायचे ! "

हे शब्द मी ऐकले अन् मी घाबरले. प्राणान्त ओढवल्यासारखे वाटले. डोळ्यांपुढे अंधारी आली.

सासूबाई लगबगीने तेथे आल्या आणि म्हणाल्या, 'काय ग, तुझा चेहरा असा का दिसतो ? काही होते आहे का ? कोणी काही दिलेले खाल्ले गेले तर नाही ना ? '

मी काही बोलले नाही. पण रडं मात्र भयंकर येऊ लागले. ते पाहून मग सासूबाईंनी तेथेच एक खुर्ची मागवून घेतली व त्याही तेथेच बसल्या. नंतर काही विशेष न घडता वरातीपर्यंतचा प्रोग्रॅम पार पडल्यानंतर सर्व स्थिरस्थावर झाल्यावर सासूबाई मला घेऊन माडीवर त्यांच्या स्वतःच्या खोलीत आल्या. मामंजी आधीच तेथे बसले होते. तेथे येताच मी त्यांना नमस्कार करण्याकरता वाकू लागले. तोच त्यांनी माझे दोन्ही हात धरले अन् मला कोचावर बसवून म्हणाले, 'बसा, बसा. दमल्या असाल.'

नंतर जरा खाकरून सासूबाईंना ते म्हणाले, 'तुम्ही पण बसा त्यांच्याजवळच.' मग एक सुस्कारा सोडून ते म्हणाले,

'सूनबाई तुमचं लग्न झालं, तुम्ही या घरी आलात. नव्हे मीच तुम्हांला आणले, पण सूनबाई म्हणून नव्हे बरे, माझी मुलगी म्हणून. आता मी काय सांगतो ते शांतपणे ऐका.

यापुढे आम्ही दोघे तुझे आई आणि बाप.

तुझी सर्व जबाबदारी आमच्यावर आहे. कारण तुझे ज्याच्याशी लग्न झाले आहे तो आमचा मुलगा वेडा आहे.'

प्रथमपासूनच माझे हृदय कसल्यातरी अनामिक भीतीने धडधडत होते. मामंजीचे हे शब्द कानावर पडताच त्या माझ्या हृदयाचे शतशः तुकडे तुकडे झाले. मला एकदम रडे येऊ लागले.

मामंजी खोलीत येरझारा घालीत होते. त्यांच्या हृदयातली तळमळ मला आता समजते, पण तेव्हा ते एक हृदयशून्य राक्षस असावेत असे मला वाटले.

सासूबाई माझ्याजवळ आल्या आणि त्यानी स्नेहभराने मला एकदम पोटाशी ओढून घेतले. पण त्यामुळे माझे दुःख एकदम दाही दिशानी उचंबळून आल्यासारखे मला हुंदके येऊ लागले.

सासूबाई मला 'उगाग ! उगा, रडू नको' असेच काही उद्‌गार काढीत स्वतःचेही डोळे पुशीत होत्या.

शेवटी मामंजी म्हणाले, 'तुम्हीं जरा शांत रहा. तिला जरा रडून मन हलके करू दे नंतर सर्व काही चांगले होईल.

माझी परीक्षा चुकली नाही, माझी खात्री आहे ही मुलगी माझ्या मुलाचा संसार उत्तम करील.'

दुःखाने आलेल्या ग्लानीतून मी एकदम जागी झाले आणि म्हटले,

'माझा सर्वस्वी नाश करून वर माझ्याकडून आणखी अपेक्षा करण्याचा तुम्हाला काय अधिकार ? माझ्या वडिलांच्या गरिबीचा असा फायदा घेतलात. दुष्ट. . . '

मला पुढे बोलवेना, मी संतापाने थरथर कापत होते. सासूबाई मला शांत करण्याचा प्रयत्न करीत होत्या.

कोणीच काही बोलत नव्हते. ताण असह्य होत होता. मी कपाळावर हात मारून घेतला आणि म्हटलं, 'संपली सारी स्वप्नं. माझ्या सर्वस्वाला चूड लागली.'

असहायतेने मी डोळे मिटून घेतले आणि कोचावर मान टाकली. खुर्ची सरकवल्याचा आवाज झाला. मामंजी माझ्याजवळ आले अन् माझ्या डोक्यावरून हात फिरवू लागले.

त्या वात्सल्यपूर्ण स्पर्शानं माझं मन किंचित शांत होऊ लागलं. मामंजी बोलू लागले; त्यांच्या बोलण्यात कारुण्य होतं, सहानुभूती होती, असहायता होती आणि निश्चयही होता.

ते म्हणाले, ' बाळ, तू माझं बोलणं पुरतं ऐकून घे आणि मग माझ्यावर रागाव. मी तरी या परमेश्वराच्या हातातील एक बाहुलेच आहे. सर्वसाधारण मनुष्याप्रमाणेच मलाही सुख-दु:खं सोसावीच लागत आहेत. तसं पाहिलं तर या गावाचा मी एकपरी राजाच आहे. माझी लाखा दीड लाखाची इस्टेट स्वकष्टार्जित आहे. कित्येक श्रीमंतांच्या मुली माझ्या या वेडया मुलाला सांगून येत होत्या. पण त्या नाकारून मी तुझी निवड केली. माझा मुलगा जन्मापासून वेडा नाही, तो एवढया अवाढव्य इस्टेटीचा एकमेव वारस आहे हे सहन न होऊन कुणा दुष्टाने त्याच्या डोक्यावर फटका मारून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला तेव्हा माझा मुलगा इंग्रजी सातवीत होता. त्या फटक्याने त्याला जी दीर्घ बेशुद्धी आली, त्यातून तो शुद्धीवर आला तो हा असा ! लहान बालकाप्रमाणे त्याची बुद्धी झाली. तो आम्हा आई-बापांनाही विसरला. त्यातून तो पूर्वस्थितीवर यावा म्हणून मी पाण्यासारखा पैसा खर्च केला पण व्यर्थ ! आम्ही आमच्या हुशार, गुणी मुलाला कायमचे मुकलो ! त्याच्या मेंदूला जडलेली विकृती असाध्य आहे असाच शेवटी निष्कर्ष निघाला.

' या धक्क्यातून सावरायला मला फार वेळ लागला. डॉक्टरांच्या सल्ल्याने आम्ही त्याचे लग्न करण्याचा निर्णय घेतला. '

मामंजी थोडे थांबले, नंतर थोडे पाणी पिऊन ते पुढे म्हणाले, ' आमची उमेद खचण्यापूर्वी अण्णाच्या मुलाचे संगोपन करून वंशाचा दिवा तेवत ठेवण्याचे कार्य आम्हांस हाती घ्यायला हवे होते.

गावी मी माझ्या हितचिंतकांकडून, मित्रांकडून तुझ्यासारख्या मुलीचा शोध घेत होतो, प्रत्यक्ष पाहात होतो. अन् मगच तुझी निवड केली आहे. '

मामंजींनी भराभरा येरझारा घातल्या.

' तुझं आयुष्य फुकट घालवण्याचा माझा हेतू नाही. माझ्या पदरात नातू पडला म्हणजे तुझ्या शिक्षणाला सुरुवात होईल. तुझी व्यवस्था हॉस्टेलमध्ये केली जाईल. तुझं शिक्षण पूर्ण झालं आणि आता जोडलेला नवा नात्याचा संबंध तुला पसंत नसेल तर वकिलांच्या सल्ल्याने तुझे पुन्हा कन्यादान मी स्वत: करीन. '

मामंजी पुन्हा स्वस्थ उभे राहिले. मग एकदम माझ्याजवळ येऊन म्हणाले, ' मग माझ्या मुली तू आम्हा तिघांना आपल्या पदरात घेशील ना ? '

लग्न होऊन पुरते सहा तासही उलटले नाहीत तो कसला विचार करण्याची माझ्यावर पाळी आली होती हो !

इतक्यात दरवाजा वाजला म्हणून मामंजींनी पुढे होऊन दार उघडले.

माझे पतिदेव आले होते, त्यांच्या हाताला धरून मामंजी त्यांना आत घेऊन आले. आत येताच ते म्हणाले,

' बाबा, माझ्या बायकोला तुम्ही मारलंत ?'

‘ नाही रे बाबा, मारीन कसा ? ’ मामंजी म्हणाले !

‘ मग ती रडते का ?’

‘ काय सांगू बाबा ती का रडते ते, आम्हा सगळ्यांनाच तू रडवीत आहेस ’ मामंजींनी त्यांचा हात माझ्या हाती दिला अन ते मला म्हणाले,

‘ मुली, तुझं याच्याशी लग्न झाले. यात चूक माझी असेल, तुझ्या पित्याची असेल, पण माझ्या या अश्राप वेडसर मुलाची तर नाहीना ? कृपा कर आणि याला आपला म्हण. ’

त्यांचे हे हृदयस्पर्शी बोलणे ऐकून माझे हृदय द्रवून गेले. मी त्यांना आश्वासन दिले. ‘ माझ्या जिवात जीव असेपर्यंत मी यांना अंतर देणार नाही. ’

ज्या वेळी मी असे आश्वासन दिले तेव्हा काही पूर्ण विचार करण्याच्या मन:स्थितीत मी नव्हते. केवळ ही जीव घेणारी मुलाखत संपू दे एकदा अशाच विचारानं मी तसे तेव्हा म्हणाले होते.

पण नंतर मात्र माझे मन शांत झाले.

नवे पर्व सुरू झाले.

माहेरच्या कपड्यालत्त्यांच्या, कामाधामाच्या, खाण्यापिण्याच्या वगैरे सर्व विवंचना बंद होऊन सुखसमृद्धीचे, हौसेमौजेचे नवे दालन मजपुढे जादूनगरीसारखे उभे राहिले.

नानापरीच्या नववधूंच्या सोहळ्यात मंगळागौर वगैरेत मी रमून गेले. एक विचार– फक्त ह्यांचा टाळून मी सुखात मन रमवण्याचा प्रयत्न करीत होते. थोड्याच दिवसांत यांच्या वेडाची साधारण कल्पना मला आली होती. काही वेळा ते सर्वांचे ऐकत तर काही वेळा कोणाचेही न ऐकता गोंधळ घालीत. मग मामंजी त्यांना कोंडून ठेवीत. अशावेळी त्यांना बाहेर काढणे धोक्याचे असे. जेव्हा ते ऐकण्याच्या मन:स्थितीत असत तेव्हा सांगितलेले कोणतेही काम करीत. कारखान्यात नोकरांवर लक्ष ठेवीत, पगाराच्या पुड्या वाटीत. केव्हा अगदी लहान मुलासारखे बोलत तर केव्हा शहाणपणाच्या गोष्टी सांगत.

आणि तो मला वाटत असलेला भीतिदायक पण स्त्रीच्या आयुष्यातील परमसुखाचा, भाग्याचा, पतीमीलनाचा दिवस उगवला !

सर्व धार्मिक विधी झाल्यावर सासूबाईंनी माझी ओटी भरली. अन् मला पोटाशी धरून सांगितले, ‘ घाबरू नको, त्याची प्रकृती उत्तम आहे. तुला उत्तम, सुलक्षणी, त्याच्यासारखा देखणा मुलगा होईल, असा माझा आशीर्वाद आहे. त्याच्यात कोणतीही शारीरिक विकृती नाही. मी येथेच आहे. घाबरू नको. माझी वंशवेल तुझ्या उदरी वाढो. जा ! ’ मी आत जाताच दरवाजा बंद झाला.

विचारांचा हलकल्लोळ माझ्या डोक्यात उसळला. काय हे माझे जिणे, एका वेड्याची मी पत्नी ! गेल्या जन्मी मी पातक तरी काय केलं होतं ! मी

तेथेच एका खुर्चीवर बसले, अन् देवाला, दैवाला, माझ्या पित्याला, मामंजींना लाख लाख दोष दिले. मला हुंदके येत होते पण मी तोंडात पदराचा बोळा कोंबून माझा आवाज बंद केला. मनात येणाऱ्या सगळ्या विचारांचा त्याग केला.अन् परमेश्वराला अनन्य भावाने शरण गेले!

डोळे मिटून हात जोडून मी अशा तऱ्हेने प्रार्थना करीत असताना माझे पती मजजवळ येऊन उभे राहिले. मला अत्यंत भीती वाटत होती पण सर्व भार देवावर टाकून मी चटकन् उठले आणि त्यांना म्हटले, 'चला आता रात्र झाली आपण झोपू या हं!' मी त्यांचा हात धरून त्या सुसज्ज पलंगाकडे घेऊन गेले. तेही लहान मुलाप्रमाणे मला बिलगून झोपी गेले.

हळूहळू ते माझ्या सांगण्याप्रमाणे वागू लागले व त्यांना कोंडून ठेवण्याचा प्रसंग येईनासा झाला. मी कुटुंबाशी एकरूप होऊ लागले. कुटुंबातील हेवेदावे माझ्या लक्षात येऊ लागले. माझ्या सासऱ्यांची इस्टेट मिळवण्यासाठीच्या त्यांच्या नातेवाईकांच्या कारवाया माझ्या लक्षात येऊ लागल्या. माझे सासऱ्यांशी वितुष्ट यावे, मी येथून निघून जावे, असे अनाहूत सल्ले मला मिळू लागले. माझी कीव करणारेही मला भेटू लागले. माझ्या सासऱ्यांच्या हे लक्षात येत नव्हते असे नाही. पण ते माझ्यावर संपूर्ण विश्वास टाकून स्वस्थपणे आपल्या कामात गर्क असत. इस्टेटीची संपूर्ण माहिती ते मला हळूहळू देत होते. माझे इंग्रजीचे शिक्षण सुरू झाले. त्यांच्या एकंदर वागण्यात अत्यंत मोकळेपणा असे. जणू मी त्यांचा मुलगा असून त्यांची सूनच फक्त वेडी होती.

दिवस झपाट्याने चालले. गावात माझ्याबद्दल चाललेल्या साशंक कुजबुजी बंद होऊन मला एक तऱ्हेचा असामान्य दर्जा प्राप्त झाला.

अन् तो भाग्याचा दिवस ज्याची आम्ही सर्व वाट पाहत होतो तो उगवला. मला दिवस गेल्याचे प्रथम सासूबाईंच्या लक्षात आले. त्यांनी एकदम माझा एक पापाच घेतला. मला फारच लाजल्यासारखे झाले. मामंजींचे डोळे भरून आले. त्यांनी माझा हात धरून मला देवघरात नेले व देवांना हळदकुंकू वाहून नमस्कार करावयास सांगितले.

आता काय सोहळ्यांना नुसता महापूर आला. या सर्वांत माझे पती अगदीच उपेक्षिले जात. त्यामुळे माझा जीव व्याकूळ होई. त्या बिचाऱ्यांना कसलीच जाणीव नव्हती.

फक्त ते मला कोठेही जाऊ देत नसत. त्यामुळे मला माहेरी जाता आले नाही. मी दिसले नाही तर ते घर डोक्यावर घेत. मलाही त्यांची फार माया लागली होती.

आणि मला मुलगा झाला—

आमच्या घरी उत्सवाला जसे उधाण आले. अक्षरशः आमचे मामंजी

गड्याच्या डोक्यावर पेढ्यांचा थाळा ठेवून मुठीने पेढे वाटीत होते.

बारशाच्या दिवशी सासूबाईंनी यांच्या मांडीवर मुलगा ठेवला अन् म्हटले, ' अण्णा हा तुझा मुलगा बरं का !'

झालं. त्यांना प्रेमाचं भरतं आलं ! त्यांनी तो कपड्यांत गुंडाळलेला लहानगा जीव उचलला आणि बाहेर धाव ठोकली. एकीकडे तोंडाने ' माझा मुलगा, माझा मुलगा ' चाललेच होते.

सर्वांची पाचावर धारण बसली. आता काय करावे काही सुचेना. त्यांना धाक दाखवण्यात काही अर्थ नव्हता. मग मीच धावत गेले आणि त्यांना हाका मारल्या. माझ्या हाका ऐकताच ते लगेच मागे आले अन् सर्वांचा जीव भांड्यात पडला.

पण ते मुलगा माझ्याजवळ द्यायला तयार होईनात !

मग मी विचारले, ' हा बाळ कोणाचा ?'

' वा माझा आहे !'

' मी कोणाची आहे ? '

' तू पण माझी आहेस !'

' मग तो तुमचा बाळ मला नाही का द्यायचा ? '

' तुला पायजे का मग घे तुला ' असे म्हणून बाळ एकदाचा माझ्या हातात दिला. मग मी म्हटले, ' हा बाळ आपला दोघांचा आहे. त्याचा तुम्ही फक्त पापा घ्यायचा. बाहेर न्यायचा नाही !.'

हे सर्व पटल्यासारखी त्यांनी मान हालवली. मग बारसे थाटामाटाने झाले हे काय सांगायला पाहिजे ?

— महाराष्ट्र टाइम्सच्या पहिल्या पारितोषिकाचा लेख

□

७

## सौ. संगीता पुराणिक

□

सुनीलचे लग्न झाले ! पाहुणेरावळे घरी परतले व घर अगदी मोकळंमोकळं झालं. मीलनोत्सुक असलेली सुचिता ध्येयपूर्तीसाठी किती आतुरतेने अवीकडे गेली. माझे मन भूतकाळात डोकावू लागले. माझे मन २३ वर्षापूर्वी घडलेल्या गोष्टीकडे वळले. हीच आतुरता माझ्यात त्या वेळी होती का ?

त्या वेळी नववधू म्हणून मी या घरात असाच प्रवेश केला होता. ' कुर्यात् सदा मंगलम्-शुभ मंगल सावधान 'चा गजर होत होता. एकमेकांच्या गळ्यात

हार घातले गेले. आणि दोन जीवांचे एक नवे नाते, नवे जग निर्माण झाले. आम्ही सर्वांच्या कौतुकानें न्हाऊन गेलो. यांच्या आनंदाला तर पारावार नव्हता. माझ्या भोवती सारखे रुंजी घालत होते. मला स्पर्श करण्याची एकही संधी दवडत नव्हते पण मी –

अगदी निर्जीव बाहुलीसारखी वागत होते. मला कशातच काही रस वाटत नव्हता. केवळ वडिलांच्या भीतीमुळे मी या लग्नाला तयार झाले होते. शरीराने मी यांची झाले होते. पण मनाने ? मनाने मी केव्हाच सतीशशी एकरूप झाले होते !

तसा सतीशचा आणि माझा सहवास अगदी थोडा. पण थोडयाच सहवासात आम्ही एकमेकांचे झालो होतो. चिरंतन एकमेकांचे होण्याच्या आणाभाका घेतल्या होत्या. ' मी लवकरच येतो ' असे सांगून कोठल्याशा कामासाठी सतीश दूर गेला खरा पण बरेच दिवस त्याचा काही पत्ताच लागेना. दिवस सरत होते. रात्री आठवणीने व काळजीने काळवंडून जात होत्या. माझा कोंडमारा होत होता. ढग जमले होते. आनंददायक पर्जन्यवृष्टी होण्याऐवजी काळ पुढे पुढे नेत होता व एक दिवस ते माझे आशांचे-स्वप्नांचे आकाश फाटले-अवीचे स्थळ वडिलांना कुणीतरी सुचवले. स्थळ फार छान होते. मी त्या वेळी तशी लहानच. वडिलांनी चौकशी करून मला दाखवावयास नेले. मी पसंत पडले. याद्या वगैरेपासून मुहूर्तापर्यंत सर्व काही पक्के झाले. शेवटी एका कातरवेळी मनाचा हिय्या करून सर्व काही वडिलांना सांगितले. वडिलांनी माझी निर्भर्त्सना केली. रूढीविरुद्ध जायला ते तयार नव्हते. संकेताविरुद्ध जायला ते तयार नव्हते. त्यांनी माझे लग्न ठरवले व ते झालेही !

मीलनाची ती पहिली रात्र - नववधू आपल्या जीवनसाथीकडे जाण्याच्या संधीची किती आतुरतेने वाट पहात असते. औत्सुक्य, भीती या भावनांनी मन काठोकाठ भरलेले असते. पण मी ? अगदी कोरी. त्या रात्रीची मी वाट पहात होते पण रात्र येण्यासाठी नव्हे, ते क्षण टळण्यासाठी–

रात्री सासूबाईंनी मला झोपायला जाण्याची सूचना केली. आज्ञाधारकाप्रमाणे मी खोलीत प्रवेश केला. त्या वेळी हे इतके स्वप्नरंजनाच्या धुंदीत होते की मी आल्याचे त्यांना भानही नव्हते. मी थंडपणे त्यांच्याजवळ जाऊन बसले. त्यांनी मला पाहिले मात्र. उत्कटतेनें त्यांनी मला जवळ घेतले. मी तितक्याच त्वेषाने त्यांच्यापासून दूर झाले. त्यांना काही समजेना. ते म्हणाले, " हे काय ? तुझ्या चेहऱ्यावर असा संताप का ? तू अशी रडतेस काय ? काय झाले ? कोणी काही बोलले का ? माझे काही चुकले का ?" पण मी मुखस्तंभासारखी बसून राहिले. ते हळुवारपणे मला समजून घेत होते व मी कठोरपणे त्यांना दूर लोटीत होते. शेवटी त्यांना मला सर्व सांगणे भाग पडले. त्यांना मी स्वच्छ सांगितले की, आपण

दैवगतीने एकत्र आलो असलो तरी मनाने व शरीराने तुमची कधीच होऊ शकणार नाही. केवळ जबरदस्तीनं तुमच्या गळयात मला बांधलंय. मी तुमच्याशी कधीच एकरूप होऊ शकणार नाही. यापेक्षा मला जास्त काही विचारण्याचा प्रयत्न करू नका. एवढे ऐकल्यावर ते माझ्यापासून दूर झाले व पहिल्याच रात्री आम्ही विभक्त झालो. दोन जीव एक होण्याआधीच दूर झाले.

अशा प्रकारे आम्ही अलग जीवन कंठीत होतो. घरात आम्हा उभयतांची चेष्टा करत, कौतुक करत परंतु मी अतिशय तुसडेपणाने वागे व बोले. माझ्या वागणुकीने मी माझ्याबद्दल घरात एक भीतीची भावना निर्माण केली. घरातील सर्वांमध्ये मी अंतर निर्माण केले. पण हे मात्र माझी न चुकता विचारपूस करत. काळजी घेत. काही उणे पडू देत नसत. प्रथम प्रथम सण आले व गेले. ज्या वेळी आनंद व उत्साह दुथडी वहायचा त्या वेळी मी माझ्या कृतीने सर्व भावभावनांचे डबके करून टाकले होते. मी कायमची माहेरी गेले असते पण वडिलांच्या करारी स्वभावाची मला पूर्ण कल्पना होती. त्यामुळे सासरी राहूनच दिवस काढणे मला भाग होते.

आणि एक दिवस माझ्या सासरी सतीशचे पत्र आले. माझे लग्न झाल्याबद्दल त्यात आनंद व्यक्त केला होता व भेटायला यायची इच्छा व्यक्त केली होती ! मला काहीच सुचेना-सतीशला खरेच काय वाटले असेल हेही समजेना. परंतु त्याची मला भेटायची इच्छा आहे व तो येणार आहे या कल्पनेनेच मी मोहरले. मी कसलाही विचार न करता त्यास उत्तर लिहिले. ' तू ये–मी वाट पहात आहे. तू नेशील तिथे-तू रहाशील तिथे '–मी अगदी खुशीत होते-माझा सतीश–येणार माझ्याशी बोलणार. माझ्याशी हसणार या कल्पनेत मी दंग होते. अन् एक दिवस तो आला ! मला काय करू अन् काय नको असं झालं. तो आल्यावर मी यांच्याशी एक शब्दही बोलले नाही. सतीशने स्वत:च यांची ओळख करून घेतली. त्यांच्या गप्पा अगदी रंगात आल्या. माझ्या हाताने सतीशला मनोसोक्त वाढण्याचे मनात ठरवून मी स्वयंपाकघरात गेले. पण बाहेर येऊन पाहते तो ते दोघे फिरायला बाहेर पडले होते. दोन तासांनी ते दोघे परत आले.

माझी कल्पना तो आता दोन दिवस राहील. पण जेवण वगैरे झाल्यावर तो लगेच जाणार म्हणाला. मी त्याला त्याच्याबरोबर येणार असे बजावले पण दोन दिवसांत परत येतो असे सांगून तो निघून गेला. तो दोन दिवसांनी परत आल्यावर त्याला अजिबात जाऊ द्यायचे नाही किंवा आपण तरी त्याच्याबरोबर जायचे या आशेवर मी होते. पण......

दोनच दिवसात त्याचे पत्र आले. मोठ्या अधीरतेने मी पत्र फोडले. माझी भिरभिरती नजर पत्रावर स्थिरावली. पत्रात त्याने लिहिले होते, ' मला माफ कर, तू माझेवर नि:स्वार्थी, निस्सीम प्रेम केलेस पण मी ते स्वीकारू शकत नाही.

आपण दूर झाल्यावर मध्यंतरीच्या काळात तुझ्याप्रमाणेच मीही विवाह केला. मलाही तसे करणे भाग पडले. माझी बायको शंभरात एक आहे. तू पाहिलीस तर तिचा मत्सरच करशील. माझ्यावर अतिशय निष्ठेने प्रेम करते-मी तिला आपल्या पूर्वीच्या संबंधाबद्दल सांगूनही ती माझ्यावर अतिशय प्रेम करते. अशा निष्ठावंत, सुंदर व सुस्वभावी पत्नीशी अप्रमाणिक होणे मला स्वप्नातही शक्य होणार नाही. पूर्वी आपण परिस्थितीनुरूप वागलो पण ईश्वराचे मनात तसे नव्हते. प्राप्त परिस्थितीत आपण त्या सर्व गोष्टी विसरल्याच पाहिजेत. दोन संसार उधळण्यात काय अर्थ आहे ? शिवाय तुला अविनाशसारखा पती लाभला. कुणीही हेवा करावा असाच तुझा पती आहे. परवा तुझ्याकडे आलो होतो. तेव्हा आम्ही फिरायला बाहेर पडलो. तो किती आनंदाने व उत्कटतेने तुझी स्तुती करत होता. तुझ्यावरील त्याचा विश्वास व प्रेम पाहून मला खूप आनंद झाला. मला तुझ्यात जे जे चांगले दिसले ते ते त्याने बरोब्बर टिपले आहे. तेव्हा त्याच्याशी तू निष्ठापूर्वक वाग. व त्याचा संसार सुखी कर यातच आपणा सर्वांचे हित आहे.'

पुढचा मजकूर मला वाचवेना. मला दुःख होत होते ते प्रेमभंगाचे नव्हे. अविनाशबरोबर क्रूरपणे वागल्याचे. लग्न झाल्यापासून जेव्हा पहावे तेव्हा ते माझ्याशी अतिशय प्रेमाने वागले पण मी ? मी त्यांना किती त्रास दिला. किती दुःख दिले. माझा भावनावेग अनावर झाला. व त्यांची मी वाट पहात राहिले. त्या रात्री ते खूप उशीरा घरी आले. मी अजून जागी असल्याचे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. त्यांच्यासाठी मी जेवायची थांबले आहे हे सांगितल्यावर तर त्यांच्या आश्चर्याला पारावारच राहिला नाही. ते कोट काढताना मी तो काढायला हात घातला तेव्हा मात्र ते दूर झाले. मी थोडीशी दचकलेच. पण धीराने पुढे जाउन त्यांना बिलगलेच म्हणाना ! गंगा-यमुनांनी काम साधलं. लग्नानंतर अकरा महिन्यांनी आमची पहिली रात्र साजरी झाली.

आता माझ्या लग्नाला पंचवीस वर्षे झाली आहेत. लग्नाच्या दुसऱ्या वर्षी सुनीलचा जन्म झाला. त्यानंतर आजपर्यंत मी निष्ठेने सुखी संसार उभा केला. इतकी वर्षे नववधूच्या उत्कटतेने त्यांच्याशी एकरूप झाले. हसू नका पण सुनील जेवढ्या उत्कटतेने आता सुचेताची वाट पहात आहे त्याच उत्कटतेने ते माझी व मी त्यांची वाट पहात आहोत. रात्रीचे अकरा वाजले आहेत.

— महाराष्ट्र टाइम्सच्या दुसऱ्या पारितोषिकाचा लेख

□

## ८

## सौ. सरस्वतीबाई जोशी

"बाबी, तुला नवरा कसा हवा ?"
"पुष्कळ, टोपली भर दागिने घालील असा हवा"
"मिळेल हो ! ! भाग्यवान आहे पोरगी ! !"
प्रत्येक आईला असंच वाटत असावं की आपली मुलगी फार भाग्यवान आहे.

□ खरी लग्नाची वेळ आली त्या वेळी मात्र घरातील सर्व परिस्थिती बदलत होती, आईला काळजी पडली होती पोरगी चोळी लुगड्याला कशी लागते.

या काळजीत एक वर्ष गेलं. आणि चौदावं वर्ष लागताच आईने मोठ्या भावाला सांगितलं, "अरे ! तू मुंबईस आहेस तर एखादं स्थळ बघ, पोरगी चोळी लुगड्याला लागली म्हणजे सुटले मी." तसं मला अन्न-वस्त्र कमी होतं असं मुळीच नाही. पण, जिकडचे तिकडे माणूस असलं म्हणजे बरं, भावाच्यावर जबाबदारी नको, ही आईची इच्छा.

झालं, दिवाळी झाल्यावर मी मुंबईस आले, आणि दोन महिन्यात माझं लग्न ठरलं.

हल्ली एकसारखा सतावणारा प्रश्न की, "तुमच्या अपेक्षा काय आहेत ?" हा शब्द आमच्या लहानपणी मुळीच नव्हता. एक दोन गोष्टी पाहिल्या जायच्या. त्यात पहिली गोष्ट, मुलीचे आई वडील कसे आहेत; व दुसरी गोष्ट, मुलगी निरोगी आणि चुणचुणीत असली की झालं. त्यांत गोरी व दिसायला बरी अशी असेल तर आणखी काय अपेक्षा असणार ?

मुलीकडून पहाणं म्हणजे मुलगा प्रथम वर, व कायम नोकरी, मग आणखी काय शोधणार. झालं, लग्न ठरलं व झालं सुद्धा. मी त्यांना प्रथम पाहिलं, ते माळ घातली तेव्हा. वाटलं ठीक आहे.

लग्न झाल्यामुळे मोठा आनंद, उल्हास, असं काही वाटलं नाही, त्याबरोबर नाराजी, किंवा दुःख असं पण काही वाटलं नाही. मुंबईत लग्न झालं. तेव्हा विशेष जागा घेऊन लग्न करीत नसत. आमचं लग्न चाळीत झालं, अगदी साध्या पद्धतीनं पुष्कळ सोडाच, पण अगदी दोनच दागिने ते पण जुन्या पद्धतीचे. लुगडी, चोळ्या पण तशाच जुन्या पद्धतीच्या. तरीही मी काही बोलले नाही.

पंधरा वीस दिवस इकडेच गेले. विशेष अशी काही ओळख झाली नाही. नंतर आम्ही आमच्या गावी गेलो. गावाबद्दल काही चौकशी केली नव्हती व काही माहिती पण नव्हती. परंतु नशिबाने, मोठं घर, घरावाटोळी सुपीक बाग, मागेपुढे पाण्याने भरलेल्या विहिरी. घरी कशाचीही अपेक्षा न करणाऱ्या सासूबाई, वन्सं, भाऊजी पण घरी होती. आमची ओळख झाली. घर मोठं असल्यामुळे मधूनमधून गप्पा पण होत असत. लहान भाऊजी, वन्सं त्यांना मी आवडले.

सासूबाईंनी काहीच मत दिलं नाही. पण विरोध अगर राग नव्हता, त्या अर्थी त्यांना आवडले असावे. पण घर साधं, माणसं पण साधी, थोडसं खेडेगाव त्यामुळे शहरची हुशारी नाही.

गावात नवी सून म्हणून पुष्कळ ठिकाणी बोलावणे असे. तेच जुन्या काळचे दागिने घालून मी जायची. गावातही सर्वांना आवडले होते मी.

एक महिन्याने त्यांची रजा संपली, ते मुंबईस गेले व मी, माहेरी आईकडे गेले. आईने मला पाहिली, आणि एकदम म्हणाली, काग तू अशी काय दिसतेस, असं म्हणून ती गप्पच झाली. मी पूर्वीच्यासारखीच वागत होते, काम करीत होते. पण आईच्या डोळ्यांना मी बरी दिसत नव्हते......

४–८ दिवसांत माझ्या बरोबरीच्या मैत्रिणी आल्या. त्यांची पण लग्नं झाली होती आणि त्यांना उत्तम स्थळे मिळाली असा गवगवा होता. माझी एक मैत्रीण तेथील मामलेदाराची मुलगी होती. तिला खऱ्या अर्थाने टोपलीभर दागिने मिळाले होते. तिचे कपडे पण उंची उंची होते. ती काही माझ्यापेक्षा जास्त शिकली नव्हती पण तिला एका दमात ए. बी. सी. डी. म्हणता येत असे. दुसरी मैत्रीण वयाने दोन वर्ष व यत्तेने एक वर्ष अशी पुढे होती. तिला ' ग्रॅज्यूएट ' नवरा मिळाला होता. तिला दोनच दागिने पण ते हल्लीच्या पद्धतीचे होते. तिसरी आमच्या शेजारची मुलगी वयाने माझ्या येवढीच, तिला पुष्कळ दागिने, पुष्कळ लुगडी, मांडलेला संसार, व त्याशिवाय एक मुलगा असं स्थळ मिळालं होतं. तिच्या त्या दागिने-कपड्यांचा तिच्या आईला फार अभिमान वाटे. हे सर्व पाहिलं, आणि माझं मन अगदी खचून गेलं. त्या मैत्रिणींच्या बरोबरीने माझं मन सारखं तुलना करू लागे. माझंच असं का ? माझ्यात काय कमी आहे ? परत परत मनात येत होते, माझ्यात काय कमी आहे ? मला असं का ? साहित्यिक भाषेत बोलायचं, तर असं म्हणावसं वाटतं, की माझं मन आक्रंदू लागलं, माझं असं का ? हे मी मुद्दाम करीत नव्हते; कृती तर काहीच करीत नव्हते. कोणाजवळ नाराजीने बोलले पण नव्हते. 'लाजरीचं झाड जसं हात लावला म्हणजे पानं मिटतं, ते झाड काही ठरवून थोडंच करीत असतं ? तसंच माझं होत असे. मी मुद्दाम काहीच करीत नव्हते, मनानेच बंड पुकारलं होतं. आधीच मी कधी प्रफुल्लित झाले नव्हतेच त्यात ही भर पडली, आणि माझ्या शरीरावर त्याचा परिणाम होऊ लागला.

आईचं माझ्याकडे बरोबर लक्ष होतं,आई थोडी काळजीतच होती. मी चांगली व्हावी, म्हणून तिने मला तूप-साखरेतून औषध सुरू केले. असेच दिवस जात होते. अचानक मला यांचं पाकिट-पत्र आलं. आईला जरा बरं वाटलं, पाठविलेस का ग उत्तर, लौकर पाठव, असं सारखं सांगत राही. खरं म्हणजे तेव्हा अशी पत्रं पाठविण्याची पद्धत नव्हती. आमच्या वहिनीला कधीच पत्र आलं नव्हतं. मुलीचं म्हणून असेल, पण आईला बरं वाटलं येवढं खरं !

दोन महिन्यांनी मी सासरी गेले, आणि १५ दिवसांनी मला परत आणली. आईला वाटे, आपल्या डोळ्यांपुढे असावी मुलगी. दिवाळीला हे रजा घेऊन आले. व मला त्यांनी बोलावून घेतली. मला काही होत नव्हतं. फक्त मी सुकून गेले होते. पण ह्यांच्या ते लक्षातच आलं नाही.

आता आमची चांगली ओळख झाली होती. हे मला सांगत होते, " आता चार महिन्यांनी आपण बिऱ्हाड करायचं, आपण थोडंथोडं सामान घेऊ. तुला काय पाहिजे ?" मी थोडी बावरले. " इतक्यात बिऱ्हाड करणार, अय्या ! मला तर अजून काहीच करिता येत नाही. इतक्यात नको बाई बिऱ्हाड, मी स्वयंपाक शिकेन, मग चालेल. "

" छे ग ! तू करशील तसं मला चालेल. हळूहळू येईल. खोली घेतल्यावर तुला काय घेऊ पहिल्याने ? मी पण खुलले. मागचे ते सर्व विचार, मनाचं ते आक्रंदन सर्व थांबलं. मी म्हटलं, " खरंच घेणार ! मग मला पांढरं पातळ घ्याल ?" हे म्हणाले " हो ! हात्तिच्या. "

चार महिन्यांनी मी मुंबईस आले, थोडे दिवस आम्ही वन्संकडे राहिलो. एक दिवस हे बाजारात गेले आणि खोली घेऊन आले. तेव्हां खोली घेणं हे भाजी घेण्याइतकं सोपं होतं.

आमचं बिऱ्हाड झालं, त्याच दिवशी आम्ही दोघं जाऊन मला पांढरं पातळ आणलं, आमचे सर्व दिवस मजेत गेले. आता आमची नोकरी संपली. आमचं बिऱ्हाड आम्ही सून-मुलाच्या ताब्यात देऊन आमच्या गावी राहात आहो.

लहानपणी, डोळ्यांना दिसणारं सुख हेच खरं सुख असं का वाटतं, हे अजूनही मला समजत नाही.

▭

## ९ अनामिका

▭

ता. २९–५–१९४३, वैशाख वद्य एकादशी, स्वप्नातही सांगेन. अगदी तोंडपाठ आहे. आयुष्यातील महत्त्वाचा दिवस, पण त्या वेळी कुठे कळत होते एवढे ? अवघं चौदा वर्षांचे वय व ह्यांचे अठरा. मॅट्रिकचे पेपर नुकतेच लिहून आलेले. मला दाखवावयास आणली काय, आणि आठ दिवसात लग्न होते काय, सारेच काही चमत्कारिक ! नोकरी कुठे ? काय ? पगार किती ? काही ठाऊक नाही. व्ह. फा. झालेली मुंबईची मी सासऱ्यांना पसंत पडले. त्यांनी होकार दिला. पत्रिका पाहिली.

जमली. लगेच ठरले, ‘ २०० रु. आणि मुलगी. ’ मी आणि माझे मावसे लग्न करूनच मुंबईला परत आलो ! लग्न कसले ते ? ना पत्रिका ना बँड. ना वरात ना पाहुण्यांची धावपळ, गडबड, जेवणावळ. अवघी मोजून दहा माणसे लग्नाला ! गोरज मुहूर्त धरला गेला व रात्री बारा वाजेपर्यंत सर्व सोहळा पार पडला. हल्लीच्या मुलींचे बाहुला-बाहुलीचे लग्नतरी यापेक्षा थाटात होते. असो.

वयाच्या सातव्या वर्षीच माझे वडील वारले ! आम्ही चौघी बहिणी व दोन भाऊ लहान; म्हणजे एक दोन वर्षांचा व दुसरा फक्त चार महिन्यांचा. सासर-माहेर दोन्ही ठिकाणी गरिबी. आईचे वय तर २८ वर्षांचे ( हल्लीच्या घोड नवरीचे ). प्रसंग बाका, पोळपाट लाटणं घेतलं आईने व बाकीच्यांना लहानाचे मोठं केले. त्यामुळे मला मावशीकडे ठेवण्यात आले. तिची पहिली सवत मेलेली. दोन मुली होत्या सावत्र तिला. त्याही तिच्या बरोबरीच्या होत्या. त्यांचा त्रास तिला व्हावयाचा आणि त्याचा राग माझ्यावर निघायचा ! पाठीचं धिरडं निघायचं ! रोज शिळं पाकं खायला मिळायचं. रात्रंदिवस काबाड-कष्ट करावे लागायचे. रोज गणपतीला-देवळात जाऊन-सांगायचं बाबा, माझं लवकर लग्न होऊ दे. मला चांगला ( मनाने ) मोठा नवरा मिळू दे. सासू, सासरे, भलेमोठे घर, मिळू दे. म्हणजे माझा त्रास चुकेल व मी माझ्या आईचे व भावंडांचे पालन-पोषण करीन. त्याप्रमाणे गणपतीने माझे पाऊण मनोरथ पूर्ण केले. मोठं घर दिले, मोठया मनाचा नवरा दिला; पण सासूबाई अं हं—नाहीत ! त्यांनाच आई आठवत नव्हती ! तीन दीर ( त्यांत एक वेडसर ). सासरा व एक नणंद (माझ्या आधीच एक वर्ष तिचं लग्न झालेलं) माझ्याहून एक वर्षाने लहान होती ती. वडील दीर-जाऊ ( सावत्र ) नागपूरहून फक्त लग्न लावायला आले होते. त्यामुळे सर्वभार ( चौघा-पाच जणांचा ) माझ्यावरच पडला ! भांबावून गेले ! सर्वच पुरुषांचे राज्य व मी त्यात एकटी एक स्त्री. बावरले ! घाबरले ! सासरा म्हणजे एक नमुनेदार माणूस. चांगले वे. शा. संपन्न. वकिलीची परीक्षा दिलेली. पोस्टल पेन्शनर. त्या वेळी त्यांचे वय ६० वर्षांचे असेल. पण वॉर-टाईम असल्यामुळे देवळालीला मिलिटरीमध्ये चांगली १५० रु. पगारावर नोकरी करीत होते व तिथेच दोघा चिरंजीवांनाही पण लावून घेतले होते. २३ मे ला ह्यांना लागली नोकरी व २९ मे ला आमचे लग्न झाले. पगार रुपये ६०. रोज १८ मैल बसने जायचे-यायचे. धकाधकीचे दिवस ! त्याच सुमाराला रेशन बसले. पण त्याचे खापर माझ्या कपाळी आले ! ‘ तुझा पायगुण पहा कसा ? ’ त्या वेळी मला काही समजायचे नाही की, माझ्या लग्नामुळे सर्व देशात रेशन कसे काय बसले ! जाऊ द्या. इतकी का मी टाकाऊ, वाईट आहे ? खचित नाही. आज ना उद्या चांगले दिवस येतील व सर्व ठीकठाक होईल. देवाधर्मावर माझी फार श्रद्धा होती. आमच्या इथे नदीकाठावर देवीचे मंदिर आहे. त्या वेळी तिथे फार शांतता

असे. हल्ली नाही. तिच्याजवळ जाऊन मनातील सुखदुःख सांगून आले की, हलकेसे वाटू लागे. लग्न झाल्याबरोबर मावसे पण पेन्शन घेऊन, नासिकला रहावयास आले. त्यामुळे माहेर म्हणजे काय, याचा कधीच अनुभव आला नाही ! नाही म्हणायला जुन्या चालीप्रमाणे ज्येष्ठात वडील दिराचे तोंड पहायचं नाही म्हणून मावशीकडेच ठेवण्यात आलं मला. मी म्हटलं, " बरं झालं. ते जुनं घर, गाय-म्हैस, त्यांचा शेणगोठा, अंधारं घर ( जुनाट आणि भयाण ! ) व सासऱ्यांचा विचित्र स्वभाव आणि शिवीगाळ एक महिनातरी सहन करावयास नको ! " पण मायेच्या बाबतीत ' सासरी शिवरात्र व माहेरी एकादशी ' अशीच माझी परिस्थिती झाली ! तथापि मावशीकडला त्रास पत्करला. ' भीक नको पण कुत्रा आवर ' तशातली गत! मी मुंबईच्या वातावरणातली. आपले नासिकला कसे काय होणार ? ह्या भीतीने त्रासून गेले. मी दाद तरी कोणाजवळ मागणार ? ' आई जेऊ घालीना व बाप भीक मागू देईना. ' अशी तऱ्हा ! गणपतीकडे ( देवळांत हं ) जाण्याचाही आता धीर होईना. माझी शरीरयष्टी पडली नाजूक, तर ह्यांची प्रकृती याच्या उलट चांगली दणधाकट, व्यायामपटु. यामुळे मनातून चांगलीच घाबरून गेले होते मी त्या वेळी. कसा काय आषाढ महिना संपला, ते कळलेही नाही. मंगळागौरी-साठी मला नासिकला बोलावण्यात आले. धडधडत्या अंतःकरणाने मी माझ्या हक्काच्या घरी आले. पण मला आनंद तर झाला नाहीच; उलट एक तऱ्हेची भीती कायमची माझ्या मनात घर करून राहिली ! सासऱ्यांची माझ्याकडे बघण्याची दृष्टी काही वेगळीच होती ! वागण्याची तऱ्हा काही वेगळीच होती !

माझे पतिराज सासऱ्यांच्या अर्ध्या वचनांत राहणारे.' ऊठ की ऊठ ' आणि ' बस की बस '. इतके आज्ञाधारक की, त्यांच्यापुढे ह्यांचे काहीच चालत नसे. धाकटे दीर तर वडिलांच्या वाऱ्यालाही उभे रहात नसत. व त्यांची एकही आज्ञा पाळीत नसत. थोरले दीर मुळात वेडेच ! तेव्हा आगीतून फुपाट्यात आल्यासारखेच वाटले मला या वेळी! जाऊ द्या झालं. नशीब माझं म्हणून कपाळाला हात लावला; पण हिंमत सोडली नाही. परमेश्वरी प्रार्थना सुरू केली. तोच आता माझा पाठीराखा. मावशींनी बजावले, " हेच तुझे घर. तिथेच तुला राहिले पाहिजे व तिथूनच मरून बाहेर निघाले पाहिजे. " मनाशी खूणगाठ बांधली, भले मरण आले तरी शीलभ्रष्ट व्हावयाचे नाही ! हो. तर काय सांगत होते मी ? मंगळागौरीसाठी बोलावली मला. मुली किती होत्या? तर ' दोन '. कोण कोण म्हणाल ? तर मी आणि माझी नणंद. पूजा सांगणारे भटजी कोण ? तर माझे सासरेच. वायफळ खर्च नको ना? मोठ्या जाऊबाई काही आल्याच नव्हत्या. बोलून चालून सावत्र. त्यांची हौसमौज सासऱ्यांनी चांगली पुरविली होती म्हणे. मुंबईला मी चाळीत लोकांच्या चांगल्या मंगळागौरी, सणवार पाहिले होते. आपल्या नशीबी ते सुख नाही, म्हणून गप्प

बसले. पण लहानपणी उराशी बाळगलेल्या स्वप्नांचा चक्काचूर झाला. हे वडिलाविषयी एक शब्दही ऐकून घ्यायला तयार नसत. कसाबसा श्रावणमास व अर्धा भाद्रपद संपवून हाड ( कृष्ण ) पक्षात नवऱ्याचे तोंड पहावयाचे नाही म्हणून मला परत मावशीकडे पाठविले व मी आनंदाने मुंबईला गेले. चाळीतील शेजाऱ्यांनी सासराबद्दल नाही नाही ते विचारले पण मला कुठे तोंड होते खरी परिस्थिती सांगायला ! मी आपली काही तरी उत्तरे देत असे ! भाद्रपद आश्विन संपता, दिवाळीला सूनबाई घरी असावी म्हणून मला सासऱ्यांनी बोलावून घेतली, व रडत रडत मला मावशांनी नासिकला आणून पोहोचती केली. मी मनातून फार नाराज होते. पण करणार काय ? तरणोपाय नव्हता. 'बेवारशी गाय कसायाच्या हाती सापडावी ' तशी माझी तऱ्हा झाली होती. पतिराजांशी काही बोलण्याची सोयच नव्हती. आणि त्यांना ऑफिसच्या कामामुळे सवडही नसावयाची. कंटाळून गेले. भलतेसलते ( म्हणजे जीव देण्याचेही ) विचार मनात थैमान घालू लागले ! कोणाशी बोलता न येणारा हा छळ सुरू केला सासऱ्यांनी. नाना युक्त्या-प्रयुक्त्या करून, जाळचात पकडण्यासाठी शिकस्त करू लागले ते. आणि मी. मीपण स्वत:चे शील रक्षणासाठी वाटेल ते साहस करू लागले. तत्क्षणी परमेश्वर सत्याचा वाली असतो ह्याची साक्ष मला पटू लागली व माझ्या अंगात बारा हत्तींचं बळ संचारू लागे. आणि मी त्यांच्या तावडीतून सहीसलामत बाहेर पडे. त्यांचा पराभव होताच, माझ्या नावाची टिमकी सुरू करावी. ह्यांच्या मनात नाही नाही ते भरवावे. बाबारे तुझी बायको चांगल्या चालीची नाही. ही काही तुझा संसार नीट करणार नाही. मी फसलो, तू असा हा भोळा सांब इत्यादी इत्यादी. आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम होई. आणि मग ते माझ्याकडे बिलकुल पहायलाही तयार नसत. आता फक्त स्वयंपाकघर आणि मधलं घर. ओटीवर यावयाचे नाही, पर पुरुषाशी बोलावयाचे नाही असा नवीन सासुरवास सुरू झाला ! देवीला जाणंही बंद केलं त्यांनी. मारझोड, उपासमार, कोंडून ठेवणे, सर्व आयुधे वापरून झाली. आता मी अगदी कंटाळून गेले. चौदा-पंधरा वर्षांच्या बाल वयांत केवढा आघात होत होता माझ्या मनावर ह्याची कोणाला कल्पना येणार नाही.

मावशीला पत्र पाठवून बोलावून घ्या म्हणून विनवणी केली. आग्रह धरला. म्हणून त्यांनी संक्रांतीसाठी म्हणून मला नेली ती होळीसाठीच परत पाठवली. शेळीमेंढी जशी रडत रडत कत्तलखान्याकडे जाते तद्वतच मी नासिकला आणली गेले.रडत रडतच कशीतरी ( बोंबा मारीत, म्हणू नये म्हणतात, मग काय म्हणायचे याला ? तुम्हीच सांगा. ) निघून गेले. पहिली रंगपंचमी, कुणीतरी म्हणाले, लपून बस, व संध्याकाळी नवरा आला की, उडव त्याच्या अंगावर रंग. भुरळले मी चेष्टा करायला. लग्नातला सिल्कचा पांढरा कोट ( कोट घालण्याची पद्धत होती त्या वेळी, मॅनीलाचा जन्म नव्हता झाला तेव्हा. ). भरली पिचकारी व

संधी साधून टपून बसले आणि उडवलान काय पाठीवर घट्ट लाल शाईचा रंग ! पण त्याचा परिणाम काय झाला ? रात्री चाबकाचे फटकारे खावे लागले ! अजूनही भोळ्या सांबाची ती करणी विसरू शकत नाही. आनंदाची दसरा-दिवाळी माझ्यासाठी नव्हतीच कधी. वर्ष संपले. चैत्र आला. पाडव्याचा सण पण तोही आला तसाच गेला.त्या दिवशी मुद्दामच गावाला जाणं झालं. आणि मी चैत्र-गौरीला शरण गेले आणि म्हटले ' बाई आता तूच माझं रक्षण कर, तूच माझी आई हो आणि मला पदरात घे '. मला उत्सवाची लहानपणापासून फार हौस. गौरीची चांगली आरास केली. तिला सजवली. फुलवली. आणि त्याच उत्साहाच्या भरात साजरा केला लग्नाचा पहिला वाढदिवस, वैशाख वद्य एकादशी २९ मे १९४४. असे गेले माझे लग्नानंतरचे पहिले वर्ष. संसाराच्या उंबरठ्यावरचे उमेदीचे पहिले पाऊल. भावी आयुष्याच्या दुःखांतिकेची पहिली निशाणी. संकटरूपी फोफावणाऱ्या वृक्षाची पहिली मुळी, व आजपर्यंतच्या २४ वर्षांच्या जीवनरूपी नाटकाची पहिली नांदी ! ना प्रेम. ना माया. ना कुणाची सहानुभूती. ना कुणी दाखवलेली माणुसकी. उपहास, कष्ट, दुःख आणि त्याग या सोपानाची पहिली पायरी ! कसचा मधुचंद्र, त्याचा अर्थ तरी काय ? आणि कसले सणवार आणि मंगळागौरी ?

आपले शीर्षक वाचले आणि एकदम हायसे वाटले. स्फूर्ती झाली. ' पाठवावयाचा लेख,काय होईल ते होवो.' आता मन अगदी हलकं फुलकं झालं आहे.दुःखही कोणाजवळ मोकळं करावंसं वाटतंच की,(असे म्हणतात की, आपली मांडी आपणच उघडी करू नये म्हणून ) पण ' अती झालं आणि हसू आलं !' अन्यायाला न्याय मिळालाच पाहिजे, व सत्याला वाचा फोडलीच पाहिजे, असे तुम्हांलाही नाही वाटत का ?

□

## १०

## सौ. सुशिला पुरंदरे

□

काळासारखा खरा सोबती कोणी नाही. आणि स्मरणशक्तीसारखा नोकर नाही. जेव्हा मनात आणावे तेव्हा सेवेला हजर.

आणि आज असेच झाले. समोरच्या लिंबाच्या झाडावर एक चिमणा आणि चिमणी यांचा सारखा चिवचिवाट चालला होता. मोठ्या जिद्दीने अंगणातून गवत, कापसाचे धागे गोळा करून त्यांचे घरटे बांधणे चालले होते. व्हरांड्यातून मी सारे पहात होते. जोराचा वारा आला आणि इतिहासाची पाने उलटी उलगडली गेली. आणि स्मरणशक्ती धावून आली.

पंचवीस वर्षाचा काळ आठवला. याच जिद्दीने आम्ही संसाराचा मांड मांडला. आमचा विवाह चार सामान्य जोडप्यांप्रमाणे झाला. त्यात वडीलधाऱ्यांनाही उत्साह नव्हता. माहेरी चले जावच्या चळवळीमुळे दोघे भाऊ तुरुंगात गेलेले. कर्ती मुले अशी अडकल्यामुळे वडिलांचा धीर खचला होता. आर्थिक दृष्टचाही ओढच होती. मग अशा वेळी माझ्या लग्नाची खटपट चालू होती. भावांना चार वर्षांची शिक्षा झाली होती. ते येईपर्यंत वडील थांबायला तयार नव्हते. सासरी यांची आई सतत आजारी.घराला घरपणा यावा म्हणून हे बळेच लग्नाला तयार झाले. खूप शिकावे ही सुप्त इच्छा त्यांनी दाबून टाकली होती.

मी नोकरीच्या गावी आले. मला गाव खूप आवडले. बंदिस्त समुद्र मी मुंबईला पहिला होता. परंतु नारळी पोफळीची वने, टुमदार झोपडी,सारखी घरे आणि धरणीमातेच्या अंगावर मुक्त मनाने बागडणारे तिचे ते लाडके अपत्य पाहून मला खूपच आनंद झाला. पण माझे मन एका चमत्कारिक द्वंद्वात सापडले होते. शाळा नी स्वयंपाकघर हे अंतर मी तोडले होते. आजूबाजूच्या सांसारिक बायकांत माझे मन रमत नव्हते. शिक्षणाने वयाने आम्ही दोघेही प्रौढ होतो.मऊपणा दोघातही नव्हता. काही खटके उडाले की मला वाटे हा मार्ग तर चुकला नाही. आपण उगीचच चार सामान्य मुलींप्रमाणे लग्न केले. मला शिक्षण घ्यावे असे वाटे, काही तरी भरीव करावे असे वाटे. या उलट घरात सर्वांना व माझ्या यजमानांना मी उत्तम गृहिणी म्हणून घर संभाळावे असे वाटे. म्हणून आमची नेहमी शाब्दिक चकमक चाले. यांनी म्हणावे तू उगीच धडपड करू नकोस. माझ्या बायकोपासून काही फारशा अपेक्षा नाहीत. दोन वेळेला जेवायला व्यवस्थित घाल म्हणजे झालं. यांनी माझी किंमत इतकी कमी लेखावी याचा मला राग येई. मी मंगळागौरी-सारख्या समारंभाला जायचे टाळी. कारण परिस्थिती होती.

आम्ही दोघं त्या काळात त्या गावाच्या मानाने शिकलेलो असलो तरी नव्या नवरीच्या अंगावर फुटका मणीसुद्धा नाही, याचे नाही म्हटले तरी माझ्या मनाला लागे. मी कुठले आमंत्रण घेतले नाही तेव्हा यांनी खूप खोदून खोदून विचारले. मी त्याना खरे कारण सांगितले. माझ्याही वागण्याला काही कारणे आहेत हे यांना प्रथम पटले. ते खूप गंभीर झाले. किती तरी वेळ समुद्रावर बसलो होतो. भरतीच्या लाटा पायाला बिलगल्या व आम्ही भानावर आलो. आमची सुखदु:खे परस्परांच्यात गुंतलेली आहेत ते त्या दिवशी आम्हांला जाणवले. मी मध्यंतरी माहेरी गेले. विरहाने प्रेम वाढते असे म्हणतात. पण अडचणीने माणसाची किंमत कळते येव्हढे मला कळले. हे मला घ्यायला मुंबईला आले होते. कुणाला काही न कळवता सासरी व माहेरी थापाथापी करून मुंबईला चार दिवस खूप मजेत घालविले. लग्न झालेल्या मैत्रिणींचे अनुभव ऐकून मीही थोडी समंजस झाले होते. स्वत:विषयीच्या अवास्तव कल्पनाही

कमी झाल्या होत्या. आम्ही मुंबईला जे चार दिवस घालविले त्यामुळे मनाने आम्ही खूपच जवळ आलो. घरी आल्यावर माझ्यातला बदल सर्वांच्याच लक्षात आला व घरातल्या लोकांनाही माझ्याविषयी आपलेपणा वाटू लागला.

लग्नाला चारपाच महिने झाले होते. इतर गृहिणींच्या व माझ्या समस्याही एक झाल्यामुळे मी त्यांच्यात मिसळू लागले होते. तरी घरातल्या माणसांच्या विषयी मला आपलेपणा वाटत नव्हता. याच सुमाराला आमच्या घरमालकांच्या मुलाचे लग्न झाले. वहिनी बी. ए. फर्स्ट क्लास होत्या. वयानेही त्या माझ्यापेक्षा मोठ्या होत्या. माझ्या पहिल्या वर्षाच्या जीवनात त्यांनी बराच आनंद निर्माण केला. सासऱ्यांना आवडते म्हणून त्या नऊवारी नेसत. गडी आला नाही तर शेणाच्या पाट्या टाकीत. खराट्याने गोठा साफ करीत. संध्याकाळी फिरायला जायला मोकळीक हवी म्हणून सकाळीच स्वयंपाक करीत. आमची ओळख झाली. खूप मोकळेपणाने गप्पा झाल्या. त्यांच्यापासून मी बोध घेतला. संसारात दोघांनीही प्राप्त परिस्थितीशी एकरूप झाले पाहिजे.प्रौढ विवाहाने मने जुळायला वेळ लागतो. पण समजूत ही स्त्रीची सखी आहे. माहेरच्या माणसांनी देशासाठी त्याग केला. निदान कुटुंबासाठी कामाची लाज सोडली पाहिजे. हेच घर आता आपले आहे.

माझे नवे स्वरूप पाहून हे अगदी खूष झाले. उरला सुरला ताण नाहीसा झाला. आमच्या संसाराचे गीत मुक्त छंदात सुरू झाले. मग एकदिवस पार्सल आले माझ्या नावावर. पुढल्या परीक्षेची पुस्तकं होती. त्यात यांनीही त्यांच्या व्यवसायातल्या परीक्षा द्यायला सुरुवात केली. एक नवी जिद्द, नवे बळ आमच्यात आले. मला आता आपल्याला इतरांसारखे दागदागिने नाहीत याचे वैषम्य वाटेनासे झाले. उलट ही चार सामान्य माणसे आहेत. आमचे उभयतांचे प्रेम, त्याग जगावेगळा आहे असा मला कैफ चढला.

मी दिवाळीला माहेरी गेले. यांना रजा मिळाली नाही. पण चार दिवसात हे हजर. सगळ्यांनी घर डोक्यावर घेतले. चेष्टा करून भंडावून सोडले. भाऊतर म्हणाला ताई तू तिथे असेपर्यंत साहेब रजा देत नव्हता आणि इकडे आल्याबरोबर रजा दिली बघ ! किती सुज्ञ आहे बिचारा. मी मनात सुखावले.

संक्रांतीपर्यंत हलव्याच्या दाण्याप्रमाणे आमच्या मनाची स्थिती झाली. खटके उडत, मतभेद होत, तीव्रही होत. पण परस्परांची समजुत घालून ते ढगाळलेल्या आकाशाचे स्वच्छ निळ्या आकाशासारखे होई. उलट गोड गोड खाल्ल्यानंतर मधून चटणीच्या चवीप्रमाणे प्रेमाची चव वाढवी. मग परस्परांची जास्तच जपवणूक होई. आमचा हा खेळ पाहून सासूबाई गालातल्या गालात हसत.

मी घरात रुळलेली पाहून सासूबाईंनी आम्हांला मोकळीक मिळावी म्हणून परगावी पळ काढला. आम्ही सगळी आता जिव्हाळ्याने जवळ आलो होतो. सासूबाई गावाला गेल्या. मला रडायलाच यायला लागले. त्या म्हणत, 'अग तुम्ही

दोघंच परस्परांना आहात. तू घरात मोठी, तुलाच सर्व जबाबदारी घ्यावी लागणार आहे. तुला सवय हवीच. तुझ्या परीक्षेच्या वेळेपर्यंत मी येतेच.'

मी, वन्सं,भावोजी स्वयंपाक घरात नवीन नवीन प्रयोग करीत असू.कधीकधी हे चेष्टेने म्हणत "मला अगदी देशभक्त असल्यासारखे वाटते कारण तुझ्या पुण्याच्या येरवडा जेलसारख्या भाकरी करतेस तू !".

लग्नाचा वाढदिवस आला. सासूबाई परत आल्या. मला चहा करताना एकदम घेरी आली. चहाचे आधण पायावर सांडले. सासूबाईंना वाटले यांच्या घाई करण्याच्या संवयीनेच अनर्थ झाला. डॉक्टर आले नी त्यांनी खरे कारण सांगितले. सासूबाईंना आनंद झाला. नवीन दुव्याने आम्ही आता दोन राहिलोच नव्हतो. आमची ध्येये-आशा आकांक्षा एकरूप झाल्या होत्या. या एकतेच्या भावनेनेच आम्ही लग्नाचा वाढदिवस साजरा केला.

□

## ११

## सौ. इंदिरा

□

सहा वर्षांची परकरी पोर होते मी त्या वेळी. दिसायला पिवळीरंज केतकीसारखी, नाजुक अवयव, लालचुटुक गाल नि ओठ, कुरळे केस आणि कोकणस्थांना वरदान दिलेले घारे डोळे. त्यामुळेच अप्पा जेव्हा कोकणातून मला अमरावतीस घेऊन सहस्रबुद्धचांच्या वाडचात आले तेव्हा वाडचाच्या मालकीणबाई सौ. रमाबाईंनी अक्षरशः मीठ मोहऱ्या ओवाळून टाकल्या माझ्यावरून. त्या वयात देखील अप्पांच्या बरोबरीन मी वाडचातल्या विहिरीवर एकेक लोटी पाणी वर घेऊन यायला जायची, चहाच्या कपबश्या धुवायची, स्वयंपाक घरातील केर काढायची, भांडी लावायची, पोळचांना तूप लावायची. . माझा उत्साह पाहून वाडचातील बायका माझं खूप कौतुक करायच्या. कधी कधी अप्पा मला खांद्यावर उचलून घेऊन माझ्या गालाचा पापा घेऊन म्हणायचे, "सावित्री तू जर आज लेकीला असं काम करताना पाहिलं असतंस तर तुला आकाश ठेंगणं झालं असतं" मग गदगदून ढसढसा रडायचे ते.

आईला लागोपाठ चार मुलगे झाले. तिला मुलीची फार हौस. पांचव्या खेपेस तिच्या आशा फलद्रूप झाल्या आणि माझा जन्म झाला. पण दाईनं मला स्वच्छ करून आईच्या कुशीत घातलं मात्र तोच वात्सल्याने माझ्याकडे टक लावीत माझ्या पाठीवरून तिनं एकदाच हात फिरवला आणि तिचे डोळे स्थिरावले ते कायमचे. त्यामुळेच अप्पांनी आई आणि बाप अशी दुहेरी माया दिली मला.

अप्पांनी माझं नाव अमरावतीच्या प्राथमिक मराठी शाळेत दाखल केले. माझा गळा गोड होता म्हणून अप्पांनी मला नवव्या वर्षी मनोहर मास्तरांच्या गायन शाळेत घातले. रमाबाईंना मी फार आवडत असे. त्यांना मूलबाळ काही नव्हते. माझा अड्डा त्यांच्याकडेच असायचा. अप्पा ऑफिसातून येईपर्यंत. आईविना पोर म्हणून रमाबाई खूप काळजी घ्यायच्या माझी. नात्यानं नाही पण मायेने त्यांनी आईची पाखर घातली माझ्यावर त्या वेळी. आईच्या दुरावण्याने आणि रमाबाईंच्या सहवासाने मी वयापेक्षा अधिक समजुतदार होऊ लागले.

वयाच्या पायऱ्या चढता चढता माझ्या यशाची कमान देखील उंचावू लागली. स्नेहसम्मेलने, जलसे, नाटके, क्रीडामहोत्सव या साऱ्या बाबींत अप्पांच्या उत्तेजनामुळे आणि रमाबाईंच्या सहकार्याने सारे अमरावती शहर मला ओळखू लागले. मॅट्रिकच्या वर्गात होते मी त्या वेळी. यौवनातल्या पदार्पणामुळे शाळा-कॉलेजातील विद्यार्थी व इतर तरुण आमच्या वाड्यावरून घिरट्या घालू लागले. मला येताना पाहून माझ्या हायस्कूलच्या जाण्यायेण्याच्या मार्गावर रस्त्यावरील ‘चकोर’ घुटमळू लागले. अप्पांना आता माझ्याकडे पाहून आई डोळ्यांसमोर दिसे आणि कधीकधी त्यांच्या हसऱ्या गालांवर अश्रुबिंदू ठिबकत. आमच्या घरातील बिलोरी काचेत मी दिवसातून अनेक वेळा डोकावू लागले आणि प्रा. ना. सी. फडक्यांच्या कादंबऱ्या माझ्या अभ्यासाच्या पुस्तकांच्या रॅकमध्ये अप्पांना दिसू लागल्या. रमाबाई तर आता मला तिळभर विसंबत नसत. बाजारातून संध्याकाळी घरी येताना भिकू माळ्याच्या दुकानातून फुलाची वेणी त्या हमखास विकत आणायच्या माझ्यासाठी.

एके दिवशी रमाबाईंचे यजमान, काका म्हणत असे मी त्यांना, माझे समक्षच अप्पांना म्हणाले, “अप्पा इंदूसाठी एक छान स्थळ आले आहे. मुलगा इंजिनियर आहे.” हे शब्द ऐकून माझ्या सर्वांगातून वीज चमकली, हृदय धडधडू लागले आणि लज्जेने ओशाळून मी नकळत माझा पदर सावरला.माझे कान अप्पांच्या होकारासाठी आसुसले होते. तोच अप्पा म्हणाले, “काकासाहेब ! अहो एवढ्यातच काय घाई आहे ? नुकतेच कुठे सतरावे वर्ष लागले आहे पोरीला ! इंदिरेला ग्रॅज्युएट करणार आहे मी काका. नंतर पाहू लग्नाचे ! ” काकांच्या चेहऱ्याबरोबर माझा चेहराही खर्रकन उतरला.

काकांच्या प्रश्नाने आणि अप्पांच्या सडेतोड उत्तराने त्या रात्री झोप लागली नाही मला. माझ्या सुखी संसाराची अनेक स्वप्ने रंगविली मी त्या रात्री. काका सहस्रबुद्ध्यांच्या बोलण्याने माझ्या हृदयात यौवनाने आपले निशाण खोल रुतून ठेवले.

त्या दिवसापासून माझे मन कशातच रमेना.मला एकान्त प्रिय वाटू लागला. डोळ्यांच्या वाती करून, स्वत: एखाद्या तपस्व्याप्रमाणे संयमी राहून मला

लहानाची मोठी करणाऱ्या माझ्या अप्पांचा मी नकळत तिरस्कार करू लागले. आपणच काका सहस्रबुद्धयांना सांगावे असे अनेक वेळा मनात येऊनही मला काकांशी बोलण्याचा धीर होईना. म्हणून रमाकाकूंना दुपारी गाठून मिळमिळीत शब्दात व घुटमळत अप्पांची आगळीक मी त्यांचेपाशी केली. तेव्हा त्या म्हणाल्या, " अग त्यांना काय कळतं. तू प्रथम मॅट्रिक हो. चांगली शीक म्हणजे इंजिनियरच काय, असे चार दोन इंजिनियर हाताशी बाळगणारा एखादा कंपनीचा मॅनेजर तुझ्या रूपाला भाळून मागणी घालेल तुला. " रमाकाकूंच्या बोलण्याने मी पक्की खट्टू झाले. निराशेने माझे तोंड काळवंडून गेले.

अशाच परिस्थितीत दोन महिने लोटले तोच रमाबाईंचा एकुलता एक धाकटा भाऊ, मधू, सालाबादप्रमाणे एक महिन्याची सुटी घेऊन बहिणीकडे आला. आतापर्यंत मधु अनेक वेळा येऊनही रमाबाईनी मला मधूपासून दूर ठेवले होते. परंतु का कोण जाणे या खेपेस बाकी रमाबाईनी माझेसमोर मधूची खूप स्तुती करण्यास सुरुवात केली होती. म्हणूनच नागपूरच्या सिनेमा टॉकीजमध्ये तो आता मॅनेजर झाल्याची व त्याला दरमहा रु. ४००।– पगार मिळत असल्याची सनसनाटी बातमी त्यांनी पहिल्याच दिवशी रसभरीत वर्णन करून मला सांगितली व मी काही बोलले नसताही त्यांनी मधूला माझे नाव सांगून प्रमोशनचे पेढे आणावयास सांगितले. मधूही कर्णाचा आव आणून अप्पा,काका,रमाकाकू,मी व तो अशा पाच माणसांसाठी १ शेर पेढे घेऊन आला.या खेपेस तो मोठा ऐटीत,छानछोकी पोशाखात राहात असे. सेन्ट काय, परीटदार इस्त्रीचे कडक कपडे काय ? त्याच्या गोऱ्या पण हडकुळ्या देहयष्टीला व लांब छडीसारख्या मानेला न शोभणारा गळ्यात लटकवलेला टाय काय ? सारेच काही और होते या खेपेस.

अप्पा ऑफिसात आठ वाजेपासून गेल्यानंतर रमाकाकू माझी शाळेची वेळ होईपर्यंत सारख्या आपल्या घरी मला बोलावू लागल्या. मी नको म्हणत असताना देखील माझे सकाळचे जेवण त्या आपल्या घरीच मधूबरोबर घडवू लागल्या. संध्याकाळी अप्पांच्या जेवणासाठी मला फक्त भातच टाकायला लावून पोळ्या, आमटी, भाजी त्या स्वत: करून मला अनेक वेळा संध्याकाळीही मधूबरोबर वाढू लागल्या. कधीही पत्ते न खेळणाऱ्या रमाकाकू रोज रात्रौ बळजबरीने मला आग्रह करून, अप्पांच्या रोषाला न जुमानता व काकांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून ' पाच, तीन, दोन 'चे डावात रममाण होऊ लागल्या. मी डाव हरून माझी पाने मधूने ओढायची वेळ येई तेव्हा तो ती न ओढताच मला सूट देऊ लागला व या त्याच्या कर्णासारख्या दातृत्वाचे रमाकाकू रसभरीत वर्णन करू लागल्या. मधू माझ्याशी वागताना आता पूर्ण मोकळा झाला होता.

एके दिवशी रमाकाकूंनी मला दुपारच्या सुट्टीतच घरी येण्यास सांगितले. त्या म्हणाल्या, " आज तू, मी व मधू मिळून सिनेमाला जाऊ. " माझ्या संगीत,

नाटच, नृत्यकलेच्या आवडीमुळे मला सिनेमा पहाण्याचेही जबरदस्त वेड होते. अप्पाही मला माझ्या कलासक्त प्रेमामुळे दुखवीत नसत. मी ताबडतोब रुकार दिला. आम्ही तिघेही तीनचे शोला गेलो. अप्पांना व काकांना न कळविता. मधूने बाल्कनीची तीन तिकिटे अगोदरच रिझर्व करून ठेवली होती. थिएटरमध्ये शिरताच रमाकाकूंनी अशी काही शिताफी केली की प्रथम त्या, मग मी व नंतर मधू अशीच सीट समोर आलो व मी सीट बदलण्याचा सल्ला दिला असताना देखील त्यांनी मला बोलू दिले नाही. लगेच दोन दिवसांनी पुन्हा सिनेमाचा बेत रचण्यात आला आणि या खेपेस आयत्या वेळी सिनेमातून डोके दुखू लागल्याचे सांगून त्या पिक्चर सुरू होताच घरी निघून गेल्या. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. इंटरव्हलचे दोनच मिनिटे अगोदर मधूने माझ्या अंगाभोवती नागमोडी वळविलेला त्याचा उष्ण हात झटकन काढून घेतला. काजू, चीप्स् व कोल्ड्रिंकचा समाचार घेतल्यावर इंटरव्हलनंतरचा चित्रपट पहाण्यापेक्षा मधूच्या बाहुपाशात मी स्वर्गीय सुखाच्या आनंदात संचार करीत होते. त्या दिवशी पिक्चर लवकर सुटल्याचा प्रत्यय आयुष्यात प्रथमच मला आला. आमच्या भावी आयुष्याची नांदी आज सुरू झाली होती.मी मधूच्या पूर्ण आहारी गेले होते.

त्यानंतरचे माझे वागणे, बोलणे, अबोल राहाणे, अप्पा घरी आल्यानंतरही रमाकाकूकडे येर झारा घालणे अप्पांच्या लक्षात आले होते. त्यांनी गदगदून रडून मला सांगितले, " पोरी हे सारे काही बरे नाही बरे ! अग, सिनेमात रात्री बेरात्री काम करणारी ही माणसे चांगली नसतात. अग रमाकाकूंचा भाऊ झाला म्हणून काय झाले. आपला तोल वेळीच सावर. अग, केवढ्या मोठ्या आशा उराशी बाळगून मी जगतो आहे !" अप्पांच्या बोलण्यावर मी काहीच उत्तर दिले नाही. अप्पांनी माझ्या भावना माझ्या मते दुखावल्या होत्या. पण तशाही परिस्थितीत अप्पांचे मला खूप वाईट वाटले. . . पण मधूचा मोहही मला आवरता आला नाही. थोड्याच दिवसानंतर आपल्या इच्छेच्याविरुद्ध रमाकाकूंच्या रदबदलीमुळे अप्पांनी मधूशी थाटामाटाने माझे लग्न लावून दिले.

पूर्वीची ही पार्श्वभूमि कळल्याशिवाय माझ्या वैवाहिक जीवनाची वाचकांना कल्पना येण्यासारखी नसल्याकारणाने पूर्व परिस्थितीचा पाल्हाळ लावण्याचा प्रमाद पत्करूनही माझ्या " संसार" नाटकाचा प्रथम अंकाचा पडदा मी वर ओढते. परंतु हा पडदा वर जाण्यापूर्वी वाचक प्रेक्षकांना घंटीचा शुभनाद चाखावयास मिळायचा नाही की बिसमिल्लाखानच्या सनई वादनाचे सुस्वर ऐकू यावयाचे नाहीत.वाचकप्रेक्षकांना पडदा वर गेल्यावर जर काही ऐकू यावयाचे असेल तर ते व्हायोलीनचे आर्त कर्कश स्वर.

अमरावतीहून निरोप देताना अप्पांचा धीर साफ सुटला होता. सारी रात्र त्यांनी रडून काढली आणि निरोप देण्यासाठी अप्पांसकट सर्व मंडळी जेव्हा रिक्षा-

पाशी आली तेव्हा पानशेतच्या धरणाचा एकाएकी बांध फुटून त्याचं पाणी जसे वेगाने पुण्यनगरीतील सारी जमीन ओली करीत गेले तसेच भावनातिरेकाने फुटून त्यांनी जोराचा हुंदका दिला आणि माझे डोके आपल्या छातीशी धरून आसवांनी त्यांनी मला न्हाऊन काढले. आई-वडिलांना सोडताना साऱ्याच मुलींना खूप वाईट वाटते पण माझे दुःख त्यापेक्षा अनिवार होते. माझ्या सासरी जाण्यात अप्पा उघडे पडणार होते वार्धक्याची सोबत घेऊन आणि मला मात्र नव्या नवलाईच्या नव्या गोड गोड माणसाचा आजीव साथ मिळणार होता. अप्पांनी त्यांचे सर्वस्व लुटवले, हरवले होते तर मी सौभाग्यवती होऊन सर्वस्व मिळवले, कमावले होते. अप्पांचे नाव माझ्या नावापुढून मी पुसून टाकले होते आणि त्या जागी मधूचे नाव मी कोरले होते.

मधुकरला आई, वडील व भाऊ नसल्यामुळे नागपूरच्या महालात आमचा 'राजा-राणी 'चाच संसार सुरू व्हायचा होता. बडनेरा स्टेशनवर आम्ही गाडी बदलून नागपूर एक्सप्रेसमध्ये बसलो. माझे हृदय नागपूरच्या भोसल्यांच्या महालात प्रशस्त जागेचा विचार करण्यात, तेथे गेल्यावर माझ्या हौसेप्रमाणे घर सजविण्याचे आणि रोज निरनिराळे चविष्ट पदार्थ मधूला खायला घालून 'फुलपाखरांचा' सुखी संसार करण्याचे सुखस्वप्न पहाण्यात दंग झाले होते. तोच नागपूर स्टेशनात आमची गाडी धडकली. सामान हमालाकडे देऊन आम्ही जोडीने एकमेकाला खेटीत, रेटीत स्टेशनाचे बाहेर पडलो. माझ्या हातातील हिरवा चुडा, गळयात चमचमणारे मंगळसूत्र आणि अंगावरील भारी कपडे पहाणारांना आमच्या नुकत्याच झालेल्या विवाहाची साक्ष देत होते. मधूने रिक्षा केली आणि त्यास महालाकडे जाण्यास सांगितले.

का कोण जाणे पण रिक्षात बसल्यापासून मधू विचारमग्न झाल्यासारखा मला दिसला. रिक्षातून जाताना तो माझ्याशी एकही शब्द बोलला नाही. सहाजिकच होते ते. कारण संसाराचा बोज पडला होता ना त्याच्या शिरावर. मधूने गजभियेच्या चाळीकडे रिक्षा वळवावयास सांगितला. महालाऐवजी गजभियेची चाळ हे शब्द मला विचित्रच वाटले. एका चंद्रमौळी गलिच्छ चाळीकडे रिक्षाने तोंड फिरवून ती उभी राहिली. मधूने बारा आण्याची नाणी रिक्षेवाल्याच्या हातात टाकली. हातात सामान घेऊन मी व मधू चालू लागलो. मी उत्सुकतेने मधूला विचारले, "का कुणा मित्राकडे का आजचा दिवस आपण राहाणार आहोत." मधूने काहीच उत्तर दिले नाही. तोपर्यंत त्या ओंगळ चाळीच्या जिन्याच्या मोडक्या पायऱ्या ओलांडीत आम्ही एका कुलुप लावलेल्या अंधाऱ्या खोलीपाशी आलो. मधूने खिशातून चावी काढली आणि कुलुप उघडले. . .माझे हातपाय थरथरू लागले. . .सर्वांगाला दरदरून घाम सुटला. मधूने दरवाजा उघडला. . .माझ्या डोळयांपुढे अंधार आला. मधू आत शिरला. . .मी खोलीत शिरता शिरता

माझ्या पायाखालच्या भूमीचा खंदक झाला. . .मी भेदरून चौफेर नजर टाकली तेव्हा दाराआड ठेवलेली लक्ष्मी-केरसुणी ताई, एक फाटकी सतरंजी व त्यावर एक तेलकट उशी. गृहलक्ष्मी, मी आणि मधू शिवाय आमची सोबत करण्यास भिंतीवरील जळमटं आणि ढोपरभर साचलेला केर तेवढा होता. मला घेरी आल्यासारखे झाले. माझ्या शरिरातील सारे बळ एकत्र करून कापऱ्या रडक्या स्वरात मी म्हटले . . .म्. . .म्. . .ध्. . .धू. . .म्. . .म. . .हा. . . ल. तोपर्यंत मधू माझ्या नजरेआड झाला होता. माझ्या संसार नाटकातील 'ताजमहाला'च्या अक्षरशः ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या होत्या. ऊर फुटेपर्यंत मी अप्पांची मूर्ती डोळ्यासमोर आणून ओक्साबोक्शी रडू लागले. रमाबाईने मातृत्वाच्या पोकळ पांघरुणाखाली पुरते गाडून टाकले होते मला. माझ्या उध्वस्त जीवनाचे भयाण, भेसूर चित्र या बेगडी 'महाला'च्या रूपाने मला वेडावित होते. मी पुरती बरबाद झाले होते. इतक्यात मधूने खाणावळीतून आणलेला डबा माझी वाट पहात होता.

पुन्हा संध्याकाळी माझ्या भावी जीवनाच्या लक्तरांची अधिक कल्पना आली मला. मोठ्या अभिमानाने, मी नको म्हणत असताना जबरदस्तीने मधूने मला त्याच्या थिएटरमध्ये पिक्चरला नेले. त्याला आपला विक्रम थिएटरच्या मालकांना दाखवावयाचा होता. त्याने माझी ओळख मालकाशी करून दिली. त्याने दात विचकून काणा डोळा करीत मधूला विचारले, "अरे बहिणीकडे जातो म्हणून सुट्टी घेऊन गेलास अन् लेका लग्न करून चांगली फक्कड छेलछबिली घेऊन आलास कीरे. पण महिना चाळीस रुपये पगारात भागेल काय रे तुझे आणि तिचे नाकापेक्षा हा मोती तर जडच दिसतोय. नीट संभाळ बेटचा. . .नाहीतर" हीः हीः हीः करीत आशाळभूतपणे त्याने माझ्या सर्वांगाला नजरेने टिपून काढले. माझ्या अंगाची कशी लाही लाही झाली होती. मधूने मॅनेजर जवळ पास मागितला. एका चिठोऱ्यावर लिहिता लिहिता आठवल्यासारखे करून मॅनेजर पुन्हा बोलला, "हे बघ मधू तुझी रजा संपायला फक्त दोनच दिवस बाकी आहेत आणि तुझा साथीदार डोअरकीपर गफार गेले दोन दिवस कामावर येत नाही. डोअरवर माणसे कमी आहेत तेव्हा उद्यापासून तू डयूटीवर ये असे म्हणून त्याने लिहिलेले ते चिटोरे माझ्या हाताला चांगलेच जाणवेल अशा बेताने जोराने दाबले. माझी तळपायाची आग मस्तकाला गेली. मला असे वाटले की पायातली चप्पल काढावी आणि मधू व मॅनेजर सकट दोघांच्याही श्रीमुखात खडाखड मारून अमरावतीला अप्पांकडे तत्क्षणी चालते व्हावे. पण अप्पांचे निरोप देतावेळचे शब्द मला आठवले, "पोरी कुळाचे नाव काढ. . .नीट संसार कर. कोंडयाचा मांडा करून आणि माझी मान सदैव ताठ राहील असेच चारित्र्य ठेव तुझे." माझा राग मी आवरला आणि इच्छा नसताही व मधूचा तिरस्कार वाटत असताही फार्स नको म्हणून मी निमूट मधूबरोबर बाल्कनीत जाऊन बसले. पिक्चर सुरू होताच निर्लज्यपणे मधूने माझ्या

मानेभोवती सरकवलेला हात दूर ढकलून दिला. अक्षरश: डोळयांच्या गंगा यमुना करून डोळे बंद करून मी सिनेमा पाहिला त्यादिवशी. पिक्चर सुटल्यावर घरी येताना मधू खाणावळीकडे वळला. मी मला जेवावयाचे नाही असे सांगितल्याबरोबर तोही न जेवताच घराकडे वळला.

जीवनातला सारा उत्साह मावळून गेला होता माझा. अमरावतीला शाळा, सम्मेलने, जलसे, नाटके इत्यादीत गाजलेली मी मुलगी पूर्ण नीरस बनले होते. माझी सारी हौस मौज नष्ट झाली होती. [illegible] बाबूराव माझ्या वडिलांना आग्रह [illegible] वडिलांच्या मनात लग्न जरा [illegible] धरून लौकर लग्न उरकून टाकू या. [illegible] करायचे होते. पण ह्यांच्या हट्टापुढे त्यांचे काही चालले नाही. ह्यांनी जाहीरच केले की कसलीही थाटामाटाची तयारी व आमंत्रणे नकोत. तुमची नातेवाईक मंडळी व आमची पाचदहा नातेवाईक मंडळी बस्स् ! मेजवान्या घालाल तर मी मंडपातून पळून जाईन अशी धमकीपण त्यांनी माझ्या वडिलांना ( व मला हळूच पत्र लिहून ) घातली होती !

हे सर्व त्यांनी स्वत: अंमलात आणले होते त्यामुळे आम्हांला बोलायची सोय नव्हती. आपल्या बहुतेक मित्रांना त्यांनी कळविले होते की येत्या पाच जूनला माझे लग्न होणार आहे. पण तुम्ही कोणी यायची तसदी कृपा करून घेऊ नये ! गांधीवादी माणसाला, महायुद्धानंतरच्या काळाला व त्याहूनही आमचे जे स्वातंत्र्याच्या शत्रूसंगे युद्ध चालले होते त्या काळालाच फक्त हा स्पष्टवक्तेपणा शोभून दिसला असे नव्हे आजही ह्या साधेपणाची राष्ट्राला फारफार गरज आहे. आपल्या मित्रांना आपले लग्न झाले हे कळले म्हणजे झाले, आपापली कामे सोडून यायलाच कशाला पाहिजे, असे या राष्ट्रभक्तांचे विचार ! अशा माणसाची अर्धांगी बनून, त्यांच्या प्रत्येक आचारविचारांशी एकरूप होऊन, स्वत:ला विसरून त्यांना सतत साथ देणं हे सतीचं वाण आहे.

पण आपल्या प्रभावामुळे व त्याहूनही प्रेमामुळे बाबूरावांनी लग्न झाल्या दिवसापासून माझ्यासारख्या एका बडया सरकारी अधिकाऱ्याच्या बंगल्यात रहाणाऱ्या, व जॉर्जेटच्या साडया नेसून मोटारीतून फिरणाऱ्या लिलूचे रूपांतर एकदम एका देशभक्ताची खादीच्या जाडयाभरडया साडया नेसणारी, अगदी साधेपणाने झोपडीतसुद्धा कष्ट सोसून रहायला तयार असणारी, पतीच्या कार्यात सतत आनंदाने साथ देणारी गृहिणी यात सहजतया केले.

पहिल्या वर्षाच्या आठवणी या बऱ्याचशा गोड, मधुर व सुखदायक असणारच ! पण हे सतीचे वाण घेतलेल्या जोडप्याला स्थैर्य व आनंद सतत मिळतोच असे नाही.

लग्नानंतर प्रथम आम्ही गेलो आमच्या मधुचंद्रासाठी ह्यांच्या मूळगावी बैलहोंगलला ह्यांच्या अलिशान बंगल्यात. ह्यांचे सर्वात वडील भाऊ व वहिनी

हिरव्यागार आम्रपल्लवांनी सजविलेला मंडप,
अक्षता म्हणून तांदळाची नासाडी होऊ नये
[illegible]

[illegible] प्रयोगांची वेड हे त्या वेळी डोक्यात घेत ! अशा आपल्या भावाला सांभाळणारी मुलगी मिळाली म्हणून त्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला व आपली लाडकी मुलगी दुसऱ्याच्या स्वाधीन करताना पिता जे उद्‌गार काढील तेच त्यांनी हा आपला भाऊ माझ्या स्वाधीन करताना काढले. " हा आमचा मुलगा हा असा आहे, आता तू त्याची जोडीदारीण झाली आहेस तर आता यापुढे तू त्याला नीट संभाळ !" हे त्यांचे उद्‌गार मी अजून मनात ठेवले आहेत.

सासरच्या सर्व मंडळींनी दीर, जावा, नणंदा, पुतणे-पुतण्या सर्वांनीच मला चटकन् आपलेसे केले ! सासरच्या मंडळीशी मुद्दाम जमवून घ्यावे लागते याची जाणीव होण्याआधीच मी त्यांच्यात मिळून-मिसळून गेलेदेखील. माझ्या कानाच्या अधूपणामुळे मला थोडी धास्ती होती. पण कुणीही याची जाणीव दिली नाही. एवढ्या प्रगत विचारांची मंडळी क्वचितच मिळतात.

पण हे सर्व आपलं स्वतःच मूळ मुद्दल अस्सल असलं तरच मिळतं बरं का ! त्या गावी आम्ही आमचे पहिले वहिले दिवस अतिशय आनंदात घालविले. आताही तिथं गेलं की त्या रम्य दिवसांची आठवण होते. आम्ही दोघं खरेखुरे याच ठिकाणी एकरूप झालो म्हणून ते ठिकाण मला फार प्रिय आहे.

काही दिवसांनंतर आम्ही वर्ध्याला जाण्यासाठी मुंबईला जाऊन तेथेही काही दिवस जिवाची मुंबई करून घेतली. मुंबईतले ह्यांचे सर्वात आवडते ठिकाण म्हणजे " रॉयल एशियाटिक लायब्ररी ". प्रत्येक खेपेला ह्या लायब्ररीतील ती भली मोठी जाडी पुस्तकं बॅग भरून घ्यायची व मागच्या खेपेची परत द्यायची असा ह्यांचा रिवाज आहे. कारण हे तेथले कायम सदस्य ! त्यांची ती वाचनाची आवड बघून मी थक्क झाले. गाडीत,मोटारीत, प्लॅटफॉर्मवर, वेटिंगरूममध्ये कोठेही एक मिनिट ते वाचनावाचून फुकट घालवीत नसत ! प्रथम मी हळूच त्यांचे एखादे पुस्तक घेऊन त्यांची पृष्ठसंख्या, लेखक, देश, वगैरे बघून ठेवून देत असे. इतक्या बारीक इंग्रजी टाइपातील, आठशे नऊशे पानांची, इंग्रज, अमेरिकन्, रशियन लेखकांची पुस्तकं वाचायची म्हणजे मला सक्तमजुरी वाटे ! आता आमच्या लग्नाला एकवीस वर्षं झाली तरी त्यांची भटकण्याची व वाचनाची ही आवड कायम आहे ! व रॉयल एशियाटिकची पुस्तकं रोज आमच्या घरी येतंच आहेत.

पू. काकासाहेबांनी आपल्याच हिंदी प्रचारसभेच्या इमारतीमध्ये आम्हांला

ते येवढ्यासाठी होय, लबाड आहेस. आम्हांला पत्ता लागू दिला नाहीस वगैरे, वगैरे.

सुरवातच झाली मुळी मुहूर्त ठरवण्याच्या मुद्द्यापासून ! ते १९४६ साल होते. नुकतीच सर्व मंडळी जेलमधून बाहेर पडली होती. व बाबूरावांच्याप्रमाणेच इतरही अनेकजण दुसऱ्या अर्थाने " चतुर्भुज " होण्याच्या तयारीला लागले होते. जूनमध्ये बाबूरावांना परत वर्धा-सेवाग्रामकडे जायचे होते. त्यामुळे मे महिन्यात बाबूराव माझ्या वडिलांना आग्रह करू लागले की एकदोन आठवड्यांत मुहूर्त धरून लौकर लग्न उरकून टाकू या. वडिलांच्या मनात लग्न जरा सावकाशीने व थाटात करावयाचे होते. पण ह्यांच्या हट्टापुढे त्यांचे काही चालले नाही. ह्यांनी जाहीरच केले की कसलीही थाटामाटाची तयारी व आमंत्रणे नकोत. तुमची नातेवाईक मंडळी व आमची पाचदहा नातेवाईक मंडळी बस्स् ! मेजवान्या घालाल तर मी मंडपातून पळून जाईन अशी धमकीपण त्यांनी माझ्या वडिलांना ( व मला हळूच पत्र लिहून ) घातली होती !

हे सर्व त्यांनी स्वत: अंमलात आणले होते त्यामुळे आम्हांला बोलायची सोय नव्हती. आपल्या बहुतेक मित्रांना त्यांनी कळविले होते की येत्या पाच जूनला माझे लग्न होणार आहे. पण तुम्ही कोणी यायची तसदी कृपा करून घेऊ नये ! गांधीवादी माणसाला, महायुद्धानंतरच्या काळाला व त्याहूनही आमचे जे स्वातंत्र्याच्या शत्रूसंगे युद्ध चालले होते त्या काळालाच फक्त हा स्पष्टवक्तेपणा शोभून दिसला असे नव्हे आजही ह्या साधेपणाची राष्ट्राला फारफार गरज आहे. आपल्या मित्रांना आपले लग्न झाले हे कळले म्हणजे झाले, आपापली कामे सोडून यायलाच कशाला पाहिजे, असे या राष्ट्रभक्तांचे विचार ! अशा माणसाची अर्धांगी बनून, त्यांच्या प्रत्येक आचारविचारांशी एकरूप होऊन, स्वत:ला विसरून त्यांना सतत साथ देणं हे सतीचं वाण आहे.

पण आपल्या प्रभावामुळे व त्याहूनही प्रेमामुळे बाबूरावांनी लग्न झाल्या दिवसापासून माझ्यासारख्या एका बड्या सरकारी अधिकाऱ्याच्या बंगल्यात रहाणाऱ्या, व जॉर्जेटच्या साड्या नेसून मोटारीतून फिरणाऱ्या लिलूचे रूपांतर एकदम एका देशभक्ताची खादीच्या जाड्याभरड्या साड्या नेसणारी, अगदी साधेपणाने झोपडीतसुद्धा कष्ट सोसून रहायला तयार असणारी, पतीच्या कार्यात सतत आनंदाने साथ देणारी गृहिणी यात सहजतया केले.

पहिल्या वर्षाच्या आठवणी या बऱ्याचशा गोड, मधुर व सुखदायक असणारच ! पण हे सतीचे वाण घेतलेल्या जोडप्याला स्थैर्य व आनंद सतत मिळतोच असे नाही.

लग्नानंतर प्रथम आम्ही गेलो आमच्या मधुचंद्रासाठी ह्यांच्या मूळगावी बैलहोंगलला ह्यांच्या अलिशान बंगल्यात. ह्यांचे सर्वात वडील भाऊ व वहिनी

तेथे होत्या. आईवडिलांच्या पश्चात ह्याच दोघांनी ह्यांना मुलाप्रमाणे वाढविले, खूप शिकावे म्हणून आटापिटा केला, पण त्यांना न जुमानता हे चळवळीत गेले तरी ह्यांच्याबद्दलचा त्या दोघांचा वात्सल्यभाव कायम होता. ह्यांचा स्वभाव लहानपणापासून तसा हूड व धाडसीच. भटकण्याची हौस फार. चळवळीने ह्या स्वभावाला प्रोत्साहन व चालनाच मिळालेली. त्यातून गांधीतत्त्वज्ञानातली नाना तऱ्हेच्या प्रयोगांची वेडं हे त्या वेळी डोक्यात घेत ! अशा आपल्या भावाला सांभाळणारी मुलगी मिळाली म्हणून त्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला व आपली लाडकी मुलगी दुसऱ्याच्या स्वाधीन करताना पिता जे उद्गार काढील तेच त्यांनी हा आपला भाऊ माझ्या स्वाधीन करताना काढले. " हा आमचा मुलगा हा असा आहे, आता तू त्याची जोडीदारीण झाली आहेस तर आता यापुढे तू त्याला नीट संभाळ !" हे त्यांचे उद्गार मी अजून मनात ठेवले आहेत.

सासरच्या सर्व मंडळींनी दीर, जावा, नणंदा, पुतणे-पुतण्या सर्वांनीच मला चटकन् आपलेसे केले ! सासरच्या मंडळीशी मुद्दाम जमवून घ्यावे लागते याची जाणीव होण्याआधीच मी त्यांच्यात मिळून-मिसळून गेलेदेखील. माझ्या कानाच्या अधूपणामुळे मला थोडी धास्ती होती. पण कुणीही याची जाणीव दिली नाही. एवढ्या प्रगत विचारांची मंडळी क्वचितच मिळतात.

पण हे सर्व आपलं स्वतःच मूळ मुद्दल अस्सल असलं तरच मिळतं बरं का ! त्या गावी आम्ही आमचे पहिले वहिले दिवस अतिशय आनंदात घालविले. आताही तिथं गेलं की त्या रम्य दिवसांची आठवण होते. आम्ही दोघं खरेखुरे याच ठिकाणी एकरूप झालो म्हणून ते ठिकाण मला फार प्रिय आहे.

काही दिवसांनंतर आम्ही वर्ध्याला जाण्यासाठी मुंबईला जाऊन तेथेही काही दिवस जिवाची मुंबई करून घेतली. मुंबईतले ह्यांचे सर्वात आवडते ठिकाण म्हणजे " रॉयल एशियाटिक लायब्ररी ". प्रत्येक खेपेला ह्या लायब्ररीतील ती भली मोठी जाडी पुस्तकं बॅग भरून घ्यायची व मागच्या खेपेची परत द्यायची असा ह्यांचा रिवाज आहे. कारण हे तेथले कायम सदस्य ! त्यांची ती वाचनाची आवड बघून मी थक्क झाले. गाडीत,मोटारीत, प्लॅटफॉर्मवर, वेटिंगरूममध्ये कोठेही एक मिनिट ते वाचनावाचून फुकट घालवीत नसत ! प्रथम मी हळूच त्यांचे एखादे पुस्तक घेऊन त्यांची पृष्ठसंख्या, लेखक, देश, वगैरे बघून ठेवून देत असे. इतक्या बारीक इंग्रजी टाइपातील, आठशे नऊशे पानांची, इंग्रज, अमेरिकन्, रशियन लेखकांची पुस्तकं वाचायची म्हणजे मला सक्तमजुरी वाटे ! आता आमच्या लग्नाला एकवीस वर्षं झाली तरी त्यांची भटकण्याची व वाचनाची ही आवड कायम आहे ! व रॉयल एशियाटिकची पुस्तकं रोज आमच्या घरी येतंच आहेत.

पू. काकासाहेबांनी आपल्याच हिंदी प्रचारसभेच्या इमारतीमध्ये आम्हांला

संसार थाटायला सुंदर खोल्या दिल्या होत्या. तेथेच आम्ही आमचा नवा चिमुकला संसार थाटला !

वर्ध्याला जाताच ह्यांनी जर प्रथम कोणती गोष्ट केली असेल तर ती ही की मला हे लगेच बापूजींच्या पाया पडायला सेवाग्रामला घेऊन गेले ! अनेक वर्ष ज्यांच्याविषयी अद्वितीय गोष्टी ऐकून मनात पूजा केली त्या जगद्वंद्य महात्म्याच्या पायावर नववधू म्हणून डोके टेकताना माझं सांसारिकच नव्हे तर सारं जीवन कृतार्थ झाल्याचा आनंद मी त्या क्षणी उपभोगला ! हा माझ्या जीवनातला सर्वश्रेष्ठ आनंद !

पण या बापूजींच्या शिष्याचे एक एक व्रत अंगिकारताना अनेक वेळा बराच ताण पडे ! वर्धा सेवाग्रामकडे जाताना लग्नाच्या वेळी घेतलेले सर्व सुवर्णालंकार त्यांनी काढून ठेवायला लावले. हे तर मला समजावू लागले, येथल्या विवाहित बायका बघ कस्तुरबांच्याप्रमाणे गळचात व हातातसुद्धा काही घालत नाहीत. पण त्यांचा हा उपदेश मी चालू दिला नाही. मंगळसूत्र व बांगडचा मला हव्यातच हा माझा हट्ट एवढचाबाबतीत मी कायम ठेवला.

त्या वेळी माझे केस विपुल. मी सरळ मोठमोठे कंगवे " मेड इन् ब्रिटन् " वगैरे घेत असे. एकदा मी नव्या आणलेल्या कंगव्यावर ' ब्रिटन् 'चा छाप बघून ह्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. व आत्ता तो कंगवा बदलून आण म्हणून हट्ट धरला. मला त्यात अपमान वाटत होता पण मिळतं जुळतं व नमतं घ्यायच्या माझ्या स्वभावानं धुसपुसत परत जाऊन " मेड इन् इंडिया " कंगवा आणला. तेव्हा ह्यांचा राग शांत झाला.

माझ्यासारख्या नाजुक मुलीला अशा प्रखर ध्येयवादित्वाशी मिळतं-जुळतं घेताना पुष्कळ शारीरिक व मानसिक कष्ट पडत असत. तरी ज्या पुष्पवृष्टीने आम्ही एकत्र आलो त्या फुलांइतकीच आम्ही आमची अंतःकरणे एकमेकांच्या बाबतीत मृदू ठेवलेली आहेत. त्यामुळेच हे कितीही संतापले तरी पाच मिनिटात ते मृदूनि कुसुमादपि होणार व पश्चात्तापाने पहिल्यापेक्षा जास्त प्रेमवर्षाव आपल्यावर करणार हे माहीत असल्यामुळे पुढेपुढे हा संतापही मला हवाहवासा वाट लागला !

आश्रमीय जीवनात शारीरिक कष्टही खूप करावे लागतात. हे शारीरिक कष्ट, ह्या नव्या जीवनाचा मानसिक ताण व वर्धानागपूरकडची नवखी हवा ह्यामुळे मला बराच अशक्तपणा आला. ह्यांना मीरत कॉंग्रेसकरता व पुढे पंजाबच्या दौऱ्यावर जायचे होते. माझ्या अशक्त झालेल्या प्रकृतीला ही दगदग सोसणार नाही म्हणून त्यांनी मला माहेरी बेळगावी पाठवून दिले व स्वतः एकटेच मीरतला गेले. त्या काही महिन्यातच मनाने आम्ही इतकी एकरूप झालो होतो की हा विरह मला असह्य वाटू लागला ! त्यात मीरतला दंगा झाला व कॉंग्रेस अधिवेशनाच्या

मंडपाला व प्रदर्शनाला आग लागल्याच्या बातम्या आल्या ! आधीच अशक्त झालेल्या माझ्या मनाने ह्या बातम्या ऐकून व हे पुढे तसेच पंजाबमध्ये गेले हे समजून जो धसका घेतला व बिछाना धरला तो कित्येक दिवस. माझ्या आजाराने ह्यांना पंजाबमधून बेळगावी परत खेचून आणले. माझ्या वडिलांच्या अहोरात्र जागरूकतेमुळे व बाबूरावांनी सर्व कामे बाजूला सोडून समर्थपणे केलेल्या शुश्रुषेमुळे मी बरी झाले.

याच सुमाराला स्वराज्य मिळाले १५ ऑगस्ट १९४७ ! त्यानंतर खादी, ग्रामोद्योग, नीरा, ताडगूळ वगैरे सर्व विभाग दिल्लीला गेले व आम्हीही, दिल्लीला गेलो तरी ह्यांनी आपली ध्येयनिष्ठा सोडली नाही. नीरा ताडगूळ उपसल्लागाराच्या १२०० रु. पगारापैकी हे फक्त ३०० रु. घेत ! दिल्लीला असतानाच स्वराज्यानंतरचे पहिले भव्य काँग्रेस अधिवेशन जयपूरला भरले तेथे आम्ही गेलो पण गांधीजींची उणीव त्या अधिवेशनात सर्वांना भासली. त्या दुःखाच्या छायेतच ते अधिवेशन पार पडले.

दिल्लीतर्फे नीरा ताडगुळाचे प्रयोग करायला बेळगावजवळील लोंढ्याच्या घनदाट जंगलात आम्ही काही दिवस राहिलो होतो. हे जंगल म्हणजे काय आहे ते स्वतः पाहिल्याशिवाय कुणालाही कळणार नाही. प्रचंड वृक्षांचे कित्येक मैलपर्यंत घनदाट जंगल, वाटसुद्धा मिळत नाही ! मध्यभागी एका झोपडीत काढलेले ते दिवस आठवले की अंगावर काटा येतो ! हे समोर असले की त्या जंगलाचे भान मला जरासुद्धा नसे ! पण जरा का नीरेची झाडे वगैरे तपासण्यासाठी बाहेर गेले व यायला उशीर झाला तर अक्षरशः जीव मुठीत धरून मी बसे ! व यायला फारच वेळ लागला तर हे येताच माझ्या डोळ्यांतल्या गंगायमुना बघून " भित्री " म्हणून मला जवळ घेताच मघापासूनची सर्व भीती कुठे पळून जाई कोण जाणे ! हे जणू माझी शंकराने पार्वतीची घेतली तशी सत्त्वपरीक्षा घेत असत. व मी त्या कसोटीला उतरले की ह्यांचा आनंद गगनात मावेनासा होई. सासरी-माहेरी आरामात रहायची व्यवस्था असताना त्या तसल्या जंगलात ह्यांच्याबरोबर रहायला मी खुषीने तयार असे हे पाहून माझ्याबद्दलचा ह्यांचा विश्वास अधिकच दृढ होई.

त्या जंगलातून हे मला घेऊन बाहेर पडले व दिल्लीला आले खरे पण त्या जंगलातला भयंकर मलेरिया स्वतःसाठी घेऊन. त्या मलेरियाच्या तापाने पुढे दोन वर्षे त्यांना सताविले.

याच दरम्यान आणखी एक मजेदार सफर आम्ही केली. ती म्हणजे दक्षिणेकडची. उत्तरेच्या बाजूला ह्यांच्याबरोबर मी खूपच फिरून आले होते वर्षभरात. त्यामुळे दक्षिणेकडचे नाविन्य काही वेगळेच वाटले. उडपी, मंगलोर, बंगलोर, मद्रास कडची वर्णनं, तिथले आदरातिथ्यशील लोक, तिथले गरमागरम इडली-डोसे, प्रथम आमचा साधा वेष बघून उपेक्षा करणारे व मग दिल्लीहून आलो हे कळताच

उभे राहून सलाम ठोकणारे अधिकारी, ह्या सर्वांचे वर्णन करीत बसले तर स्वतंत्र लेख होईल. तेथली प्रचंड शिल्पकामे, देवालये, बाहूबलीची उंच मूर्ती, सर्व सर्व पाहिले, अनुभविले. अगोदरच एकरूप झालेली आमची मने ह्या प्रवासाने आणखीनच जवळ आली.

ह्या पहिल्या वर्षात आमच्यात विरोध उत्पन्न होत नसे असे नाही. खरं म्हणजे त्यांची प्रकृती कणखर व स्वभाव जरा तापट व कठोरच. बरोबर उलट मी प्रकृतीने नाजुक व स्वभावाने भित्री ! पण हा विरोधच आम्हांला एकमेकाला पूरक व प्रेरक ठरला. माझ्यामुळे त्यांच्या स्वभावात बरीच मृदुता आली तर मला अशी कणखर बनवण्याला त्यांनी खूप कष्ट घेतले. मात्र आम्हा दोघांत एक विलक्षण साम्य आहे ते म्हणजे कितीही खटके उडाले तरी काही क्षणातच स्वतःची चूक व एकमेकांचे स्वभाव लक्षात घेऊन आम्ही सर्व काही विसरून हसू लागतो. फारवेळ आम्ही आमची मने एकमेकांविषयी रूसव्याफुगव्यात ठेवूच शकत नाही. माझा नाजूकपणा घालवायला त्यांना जसे कष्ट घ्यावे लागले तसेच त्यांना प्रेमळ संसारी पती व पिता बनवण्याला मलाही कित्येक वर्षे तपश्चर्या करावी लागली !

दक्षिणेच्या प्रवासातून परतल्यानंतर आम्ही परत दिल्लीला येऊन राहिलो. याच सुमाराला आमची पहिली मुलगी लता हिचा जन्म झाला.

आमच्या संसाराच्या पहिल्यावहिल्या मृदूकठोर अनुभवांना, आठवणींना आलेलं हे पहिलं पुष्प !–

आज एकवीस वर्षानंतर ! आमच्या दोन मुली कॉलेजात आहेत. धाकटा मुलगा मॅट्रिकला आहे. मुलांच्यासाठी ह्यांनी आपल्या सर्व व्रतांना मुरड घातली आहे व मुलांच्या स्वतंत्र वृत्तींना प्रेमाने प्रोत्साहन देत आहेत. हे सर्व बघून आमच्या पहिल्या वर्षातले हेच का ते बाबूराव म्हणून ह्यांच्याकडे टक लावून पहात मी हसत आहे “ हसतेस काय अशी ” म्हणून ह्यांनी विचारताच मी समाधानाने म्हणत आहे, “कृतार्थ झाले अवघे जीवन.”

□

## १३

## सौ. राधाबाई पै

▭

लग्नानंतरचे पहिले वर्ष अनेक मधु-स्मृतींनी भरलेले असते. जरी त्याला कडवटपणाची झालर असली तरी काळाच्या ओघात माणूस ते विसरू शकतो. पण कधी? जर त्या स्मृतीत थोडा तरी मधुसंचय असेल तरच. ह्या बाबतीतला प्रत्येकीचा अनुभव जवळ-जवळ सारखा असतो. वडीलमंडळीचे कोडकौतुक, प्रणयाची उधळण, सणवार, मातृत्वाची चाहूल व दोन्हीकडून होणारे कौतुक. जर आंतरजातीय किंवा प्रेम-विवाह असला तर मात्र ह्यातले काही अंशी सुख त्यांना लाभत नाही. पण त्यात देखील नवीन संसाराची नवलाई असतेच. पण सजातीय विवाह असून सुद्धा अनेक अडचणींमुळे विवाहानंतरच्या पहिल्या वर्षात जे सुख असते ते न मिळणाऱ्या देखील काही मुली असतात. त्यापैकी मी एक.

मी जन्माला यायच्या अगोदर एक महिना माझ्या वडिलांनी या जगाचा निरोप घेतला. अतिशय कष्टाने, परिस्थितीशी झगडत माझ्या आईने मला फायनलपर्यंत शिकविले. नंतर मला शिकविण्याचा तिला धीर झाला नाही. माझं देखणं रूप व उफाड्याची शरीरयष्टी यामुळे तिने माझ्या लग्नाची खटपट चालू केली. पैशाअभावी त्यात तिला यश मिळाले नाही. माझ्या वयाच्या एकोणीसाव्या वर्षी तिला देवी आल्या व त्यातच तिचा अंत झाला. माझ्या एकुलत्या एक मामांनी मला त्यांच्या घरी नेले.

मामांच्या घरी मी म्हणजे दुष्काळात तेरावा महिना. त्यांना तीन मुली होत्या. मुलगा नव्हता. नोकरी बेताची. शिवाय मामी म्हणजे अगदी तोफखाना. माझी अर्थातच तिला अडचण होऊ लागली. मामा माझ्या लग्नाची खटपट करू लागले.

एक दिवस मामांचे एक मित्र आले. त्यांना माझ्याबद्दल माहिती होती. तेव्हा त्यांनी त्यांच्या ओळखीच्या एका चांगल्या मुलाचे स्थळ सांगितले. मुलाला तीनशे रुपये पगार होता. पण त्याची आई अर्धांगवायूने आजारी असल्याने प्रेमळ व समंजस मुलगी त्याला हवी होती.

मामीचा ह्या स्थळाला होकार होता. मामांना हे स्थळ पसंत होते. शिवाय हुंडा नसल्याने हे लग्न मोडण्याची भीती नव्हती. मला 'पाहण्याचा' कार्यक्रम मामाच्या मित्राकडे झाला. मुलाच्या घरात आईखेरीज कोणीच नसल्याने त्याला तावडतोब परत जायचे होते. म्हणून दुसऱ्याच दिवशी आमचे नोंदणी पद्धतीने लग्न झाले. मी लगेच तिसऱ्या दिवशी सासरी रवाना झाले.

सासरी जाताना व माहेर सोडताना अगदी तीव्रतेने माझ्या आईची आठवण

झाली. मामी म्हणजे साक्षात् पत्थर होत्या. काही समजुतीच्या गोष्टी सांगणे तर राहोच पण उलट, ‘ आता तुमच्या कौशल्याचे दिवे तिकडे पाजळा ’ असे सांगून तिने मला निरोप दिला. मलाही तिच्याबद्दल विशेष माया नव्हती. पण शेजारच्या स्त्रियांनी जेव्हा अश्रूभरल्या नजरेने निरोप दिला तेव्हा मात्र माझं मन भरून आलं. पण क्षणभरच ! कारण मला पूर्णपणे माहीत होते की ही किंचित् वियोगाची जाणीव. नंतर प्रत्येकजण आपल्या संसारात मग्न. आई असती तर तिला पदोपदी पोटच्या गोळचाची आठवण झाली असती.

संध्याकाळी चारच्या सुमारास सासरी पोहोचले. गोरी-पान तरतरीत नाकाची, साठी उलटलेली, शरीराने सुदृढ परंतु रोगाने विकलांग झालेली ती माऊली भरल्या डोळचांची निरांजने आमच्यावरून ओवाळू लागली. स्मितमुखाने तिने आमचे स्वागत केले. मी त्यांना नमस्कार केला. त्यांनी प्रेमाने माझ्या पाठी-वरून हात फिरवला आणि मला जवळ घेतली. त्यांच्या हाताचा तो प्रेमळ स्पर्श आणि त्यांच्या डोळचांतून वाहाणारे ते आनंदाश्रू आजही माझ्या मन:पटलावर ताजे आहेत.

लवकरच घराचा ताबा मी घेतला. माझी कामातील तत्परता आणि हसतमुख चेहरा त्या माय-लेकरांना लाख मोलाचे समाधान देई. आणि त्यांचे ते समाधान पाहून मी मनातून तृप्त होई.

सासूबाईंना चालवत नसे. सर्व प्रार्तविधी घरातच होत. प्रथम ती घाण स्वच्छ करताना मला किळस येई. पण माझे मन सांगे, “ तुझा नवरा बघ ! पुरुष असून-सुद्धा ही कामे न कुरकुरता, न त्रासता करतो. मग तू स्त्री असून असे का ?” त्याचा सुद्धा मला सराव झाला. सासूबाई आजारी असल्याने आम्हांला कुठेच फिरायला जायला मिळत नसे. दोनच खोल्या. बाहेरच्या खोलीत पंखा होता. सासूबाई तिथे झोपत. आम्ही आतल्या खोलीत झोपत असू. मला कामाचा विलक्षण ताण पडतो हे त्यांच्या लक्षात येई. त्या बोलूनही दाखवीत. पण मदत करू शकत नाही, म्हणून दु:खी होत. तशात त्यांना हृदयविकार जडला होता. पण लहान-सहान बाबतीतसुद्धा मुलाचे व सुनेचे मन कधीच त्यांनी मोडले नाही. उलट माझे तोंडभरून कौतुक करीत. आयुष्यात तू खूप सुखी होशील असा आशीर्वाद देत.

लग्नानंतर मामाकडचे साधे कार्डसुद्धा आले नाही. आणि जरी त्यांचे आमंत्रण आले असते तरी मी जाऊ शकले नसते. म्हणून पत्र न आल्याची जाणीव कधीच झाली नाही. दिवसभर काम करून रात्री थकवा येई. पण ‘ ह्यां ’च्या प्रेमळ शब्दांत आणि दृढ मिठीत मी सर्व विसरून दुसरे दिवशी ताजीतवानी होई. तो ज्येष्ठ महिना होता. धो धो बरसणाऱ्या पावसाचा. होता होता वटपौर्णिमा आली. वडाची फांदी घरातच आणली व पूजा केली. ह्या दिवशी वडावर जाऊ शकले नाही. पण तेव्हां श्रावण आला तेव्हा मात्र मी मनातच नाराज झाले. कारण

माहेरी कोणी नेणार नाही व सासरी मंगळागौरीची मजा लुटता येणार नाही. पहिल्या मंगळवारी मी घरातच मंगळागौर पुजली आणि प्रार्थना केली, ' हे देवी ! जन्मोजन्मी ह्याच पती मला लाभू दे. त्याला तू दीर्घायुष्य दे आणि ह्या माऊलीला निरोगी जीवन देऊन या जन्मी तिची अपुरी आकांक्षा पुढच्या जन्मी तरी पुरी कर. " पूजा झाल्यावर मी सासूबाईंना नमस्कार केला. माझी खिन्नता त्यांच्या लक्षात आली असावी. कारण सबंध दिवसभर त्या अस्वस्थ दिसत होत्या. त्यांची अस्वस्थता पाहून मला वाईट वाटले. त्या वेळी मला आईची आठवण झाली. ती म्हणायची एकाने जर आपल्या सुखाचा त्याग करून दोन जीव आनंदात राहिले तर त्या घरात लक्ष्मी पाणी भरते. मी मनात निर्धार केला की यापुढे कसलेच दुःख मानायचे नाही. पतीचे आपल्यावरील प्रेम आणि सासूबाईंचे समाधान हेच माझे सुख.

आणि याच महिन्यात आम्ही पंखा-टेबल फॅन घेतला. त्याचे असे झाले. लग्न झाल्यानंतर काही दिवस सासूबाई बाहेरच्या खोलीत झोपल्या. नंतर त्या स्वयंपाक-खोलीत झोपू लागल्या. तिथे पंखा नव्हता. पुष्कळ उकाडा व्हायचा. आम्ही त्यांना परोपरीने समजाविले. पण त्यांनी ऐकले नाही व आम्ही बाहेरच्या खोलीत झोपू लागलो. त्यांचे म्हणणे एकच, ' माझ्यामुळे तुम्हांला हिंडण्या-फिरण्याचे सुख मिळत नाही. म्हणून तुम्हांला रात्रीतरी एकमेकांचा मोकळा सहवास मिळावा !' ह्यावर काही इलाज नव्हता. पण त्यांना नेहमी पंख्याखाली झोपायची सवय असल्याने आतल्या खोलीत झोप येईना. अशात हा श्रावण आला. तेव्हा मंगळागौर वगैरे घरी साजरी करता येत नाही म्हणून मला हवी ती वस्तू घेण्यास ह्यांनी १०० रु. दिले. माझ्याकडे मी थोडेथोडे साठविलेले ६० रुपये होते. ते १६० रु. ' ह्यां 'च्याकडे दिले व मी टेबल फॅन आणण्यास सांगितला. ज्या स्त्रीमुळे मला हे सौभाग्य लाभले तिच्याकरिता काहीतरी त्या वेळी केल्याचा एक अनमोल आनंद मला लाभला.

आमच्या लग्नाला नऊ महिने झाले होते. आणखी सात महिन्यांनी मी आई बनणार होते. सासूबाईंना हे माहीत नव्हते. कारण हे म्हणत की हे गोड गुपीत त्यांनीच आपल्या आईला सांगावे. ह्यावरून त्या दिवशी रात्री मी जरा अबोलच होते. ' हे ' आईला विचारू लागले, " आई ! तुझी सून गप्प का ग ?"

" अरे, ती थकली असेल !"

" अग ! आताच जर ती एवढी थकली तर पुढे कसे होणार ?"

" का रे ?"

" अग आणखी सात महिन्यांनी तू आजी होणार, आजी !" क्षणात त्या वातावरणात आनंद भरला. सासूबाई अत्यानंदाने धडपडत उठून बसल्या. . . .आणि त्यांना हृदयविकाराचा झटका आला. क्षणापूर्वी आनंदाने भरलेल्या त्या घरात दुःखाची छाया पसरली.

त्यानंतर त्या फक्त तीनच महिने जगल्या. आमच्या लग्नाचा त्या दिवशी वर्षदिन होता. त्यांच्या सांगण्यावरून मी मंगळसूत्राच्या वाटचा परतून घातल्या. आणि त्यांना नमस्कार केला. त्या दिवशी लग्नानंतर प्रथमच आम्ही दोघे बाहेर पडलो. आणि देवळात जाऊन देवाच्या पाया पडून आलो.

आणि नंतर तीनच दिवसांनी अचानक हृदयक्रिया बंद पडून त्यांचे देहावसान झाले.

हे माझे लग्नानंतरचे पहिले वर्ष ! त्यानंतर पहिली मुलगी झाली. तिच्या पाठीवर वर्षातच अनिल-सुनील ह्या तिच्या जुळचा भावांनी जन्म घेतला.

आज माझी मोठी मुलगी सोळा वर्षांची आहे. हे मुलगे पंधरा वर्षांचे आहेत. अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज असा फ्लॅट आहे. दारात गाडी आहे. सर्व सुख आहे. पण उणीव भासते ती एकच. ती म्हणजे ह्या सर्व सुखाचे कौतुक करणाऱ्या सासूबाईंची. मुलीचे सुख पाहून सर्व कष्ट विसरणाऱ्या मातेची.

आता कधी कधी आम्ही सर्व मैत्रिणी मंगळागौरीनिमित्त एकत्र जमतो. गप्पांच्या ओघात लग्नानंतरच्या पहिल्या गोड आठवणी चघळविल्या जातात. मी मात्र त्या गप्पात भाग घेत नाही. मी माझ्या मनाला विचारते, 'तू यातले काय मिळविलेस?' माझे मन उत्तरते, "ह्या क्षणिक सौख्याचा लाभ जरी तुला मिळाला नाही तरी एका अपंग जीवाची सेवा करून तू फार मोठे मानसिक सौख्य मिळवलेस. तूच खरी भाग्यवती ! तूच खरी भाग्यवती !"

□

## १४

## सौ. शकुंतला पळणीटकर

□

लग्नानंतरचे पहिले वर्ष ! त्याच्या स्मृती शब्दांकित कशा करू. २० वर्षांपासून मुग्ध असलेले स्मृतिशिंपले उमलून दाखविले त्यात मौक्तिके नसली तर ! मोती नव्हे रेती सलेल तुला, कुणाला रडू येईल. कीव येईल तर ! शिंपल्यातील कटु बीज उघड केले म्हणून कोणी चिडेल. काय करू, कसं सांगू ! आज माझ्या भावनांच्या आविष्काराला संधी देऊ? गुपिताला वाचा फोडू? व्यथा कथारूप करूच. पहा.... जुना कालग्रंथ उघडला... कसर नाही, कीड नाही अगदी टवटवीत ताजा. हे पहा १९४६ सालचे वैशाखाचे पहिले पान. मुखपृष्ठ ! माझ्या वडिलांनी किती सुशोभित केलेले ते पान. त्या दिवशी मी इंदोर नगरीतून सातपुडचाच्या कुशीत विसावलेल्या त्या गावात गेले. क्षिप्रेतील कमळ चंद्रभागेत आणून सोडले

तो दिवस. त्या गावात शिरण्यापूर्वी अमरावती नगरी लागली. " याच नगरीतून भगवान कृष्णाने रुक्मिणी हरण केले ना ? " मी नवोढा पण हळूच प्रश्न केला माझ्या उजव्या बाजूच्या कानात. पण त्या चेहऱ्यावर भानच नव्हते. मी चमकले. बोलले शब्द पुसले जाणार नव्हते. माझ्या वन्सं माझी चेष्टा करीत होत्या. सासूबाई प्रेमाने पहात होत्या. आमची मोटर मोठ्या वाड्याशी थांबली. मंजुळ वाद्यांचा गजर झाला. नववधूवरून पंचारती ओवाळली. अलंकाराने सजलेली मी त्यांच्या-मागोमाग जाऊ लागले. केशराचा सडा घातला होता. हळदकुंकवाची स्वस्तिके, लक्ष्मीची पावले काढली होती. लक्ष्मीपूजन झाले. मामंजींनी माझे पाय धुतले. सासूबाईंनी पुसले. भरलेल्या घरात लक्ष्मी आली. मेजवान्या झाल्या. देणग्या आल्या. रोज मला सासूबाईंची माया व मामंजींचे कौतुक मिळत होते. दोन नणंदा पहिल्या व एकुलत्या एक भावजयीला कुठे ठेवू व कुठे नाही असे करीत होत्या. दिवसांना पंख फुटले. दोन्ही नणंदा घरोघरी गेल्या. मामी, मामी करणारी भाचरे गेली. पाहुणे मंडळी तोंडभर स्तुती करून गेली. माझ्या माहेरचे पत्र आले. माझे वडील शेवटची कन्या देऊन मुक्त झाले होते. त्यांनी ऐपत नसताना खूप खर्च केला. लग्न गाजले. मला माणसे फार छान मिळाली आहेत असे अंतरीचे बोल मी त्यांना कळविले. लक्ष्मी, सौजन्य व विनय असा कांचनमणिसंयोग झालेल्या घरात मी पडले होते. माझे यजमान सुविद्य, पदवीधर, देखणे, लक्ष्मीपुत्र व सरकारी अधिकारी, माझ्या सुखाला मोजमाप नव्हते.

वटपौर्णिमेची पूजा थाटात झाली. वाजंत्री वाजली. वडावर सर्व बायकांनी माझ्या दागिन्यांपेक्षा माझे सुरूप न्याहाळले. वाखाणणी केली. मी संध्याकाळी घरी सावित्रीगीत म्हटले. सर्वांनी कौतुक केले. आमच्या घरचे वातावरण त्या काळीही पुढारलेले होते. ह्यांच्या आजी' म्हणाल्या 'सर्वांनी कौतुक केले पोरीचे. पण वसंता तू काही एक शब्द तरी बोलशील. म्हातारीच्या कानाला किती गोड वाटेल.' इतक्यात मामंजी म्हणाले, 'नातू किती प्रिय आहे पहा. आई तूच हिला रागवत होतीस ना सर्वांसमोर बोलते म्हणून.' एक माणूस सोडून सर्व मनमोकळी हसली.

पुढे शयनगृह सजले. मोगऱ्यांच्या माळा लागल्या. गंध दरवळला. मधुर फळे आली. मी पाण्याचा तांब्या घेऊन माडीवर गेले. रेडिओवर गाणे लागले होते. बहरास, आली प्रितीची पहिलीच रात. मी लाजत प्रवेश केला. स्वारी कोचावर बसली होती. मी बाजूच्या खुर्चीवर बसले. माझे मन मोहरले होते. त्यांनी हळूच उठून दार लावले. त्या कोंदण्यात माझा आनंद कोंदला होता. रेडिओ बंद झाला. बराच वेळ गंभीर शांतता पसरली. इतक्यात बाहेर पर्जन्य धारा पडू लागल्या. मला वाटले आता मजवर प्रेमाचा वर्षाव होणार. घड्याळात टोले पडत होते. न राहवून मी मध्यरात्री विचारलं – 'माझ्याशी बोलायचं नाही का ?' उत्तर नाही.

'राग आलाय माझा....' पुन्हा शांतता. माझं अरण्य रुदन सुरू झालं. शेवटी थकून गेले. पुष्पशेज सुकत होती. मला डुलक्या येऊ लागल्या. पहिलेच शब्द ते बोलले. झोपायला अंथरूण तयार आहे. मी आनंदले. तरी स्वरात ओलावा नव्हता. 'झोपू या बिछान्यावर ?' 'हूं.' नुसता हुंकार मिळाला. अंबाडचावरील मोगरीची वेणी टेबलावर टाकून मी त्या शृंगारलेल्या शय्येवर बसले. आता ते हळूच येतील आपल्या-जवळ. आशांकुर फुटत होते. त्यांनी दिवा विझवला. माझ्या आशेची कोजळलेली ज्योत तेवू लागली. ते पलंगाजवळ आले. मी त्यांना आळवून विचारलं, 'माझं काही चुकलं का ?' 'मुळीच नाही. माझंच चुकलं' असे म्हणून व एक उशी घेऊन ते खाली सतरंजीवर झोपले. पहाटे पहाटे मी पण एका कोपऱ्यात अंग टाकले होते.

दुसऱ्या दिवशी माझे डोके दुखत होते. अंग ठणकत होते. विचारांचे काहूर माजले होते. जेवताना सुग्रास घोटाळत होते. सासूबाई म्हणाल्या, 'का ग बरं नाही का तुला ? एक घास सुद्धा खात नाहीस ती !' मी मान खाली घालून बसले होते. आमच्या घरची तरुण स्वयंपाकीण म्हणाली, 'आता काय जेवणार. रात्री पोट भरलंय वहिनींचं !' व मिस्किलपणे हसली. सासूबाईंचा चेहरा मंदस्मिताने उजळला. कारण स्वयंपाकिणीचा विनोद खेळकर होता. पण माझे पोट शंकेने, भयाने भरले होते. आमच्या खोलीत सुंदर पलंग व बिछाने घातले. जनदृष्टीने आम्ही एकरूप परंतु वास्तवात अगदी खूप दूर होतो.....एका रात्री मी सासूबाईंना म्हटले की, 'मी खालीच झोपू का ?' त्या हसत उद्‌गारल्या... 'वेडीच दिसतेस. तो मुंबईला गेला की खाली आहेच.' दिवस जात होते. रात्री वटवाघुळाच्या पंखाने उडत होत्या. ते मुंबईला गेले. शिष्टाचार म्हणून माझ्याकडे वळून 'येतो' म्हणाले. सासूबाई म्हणाल्या, 'घराची खटपट कर. पैशांची काही फिकीर नाही. तिला पत्र पाठवत जा. मधून येत जा.' वडिलांनी अशाच आशयाचे बोलणे केले व प्रेमळ वृद्ध आजीने शिकवण दिली.

आषाढ संपला. श्रावण गंध उधळीत आला. पहिली मंगळागौर सासरी झाली खूप थाटात. वन्सं आल्या होत्या. मी रात्रभर जागले. मनमुराद खेळले. तोच विरंगुळा वाटला मला. इंटर सायन्स झालेली मुलगी. पण किती साधी असं वाटलं सर्वांना. दुसऱ्या मंगळवारी हे आलेले होते मुंबईहून. ती मंगळागौर गावात एका ठिकाणी जागवली. इतर नवविवाहित मुली रात्री जागत नाही म्हणून लाजत गेल्या. मी तेथेच राहिले. कारण घरी जाऊन तरी काय—दुःसह अबोला, कटु नाटक, मनाचा कोंडमारा, शंकांचे जाळे, हेच वाढलेले होते माझ्यापुढे. तिसऱ्या मंगळवारी मी इंदोरला गेले. माहेरी दिवाळीपर्यंत राहिले. मुका मार कसा सांगणार ? जीवनाला झालेलं उलटं गळू कसं दाखविणार ? ना बरोबरीची बहीण ना भाऊ ! मैत्रिणी चेष्टा करीत त्यांच्या शब्दांवर भूक भागवीत होते. दिवाळसणापूर्वी ह्यांच्या आई त्यांना जबरदस्तीने एक दोन दिवसाकरिता घेऊन

आल्या. दिवाळीचे कोरडे सोहाळे झाले. जावयांचे वागणे पाहून आई-वडिलांचे डोळे पाणवले. मी वाळवंटात राहून जलक्रीडेचा अभिनय करीतच होते. माझे सर्व पत्ते छानच होते. पण हुकुमाचे पानच नव्हते. तसाच डाव खेळत होते मी. सासर माहेर खेपा चालू होत्या. मी मूक-नायिका झाले होते. मार्गशीर्ष, पौष गेला. संक्रात सण आला. माझ्या अंगावर काटा येऊ लागला. माघ, फाल्गुन हळूच सरकले. चैत्र संपून वैशाख आला. मनात वैशाख वणवा पेटला व त्याच्या ज्वाला आईला कळू लागल्या. तिने माझ्या पोटात शिरून खरं खरं शोधलं. वर्षसणाला माझ्या मामंजींना इंदोरला बोलावलं. सत्य घटना त्यांच्यापुढे ठेवल्या. नववर वधूला टाळतो. स्पर्शसुद्धा नाही. याची चिकित्सा झाली व कायदेशीर इलाज हाच मार्ग वडिलांनी निवडला.माझे वडील गदगदून म्हणाले: 'तरुण मुलाचा अविचार झाला, तुमचे प्रयोग झाले; पण माझ्या मुलीच्या जीवनाचा खेळखंडोबा झाला.' मामंजी घळघळ अश्रू गाळीत म्हणाले, 'किती सोशिक मुलगी.' त्यांनीच माझ्याकडून मेडिकल कॉलेजचा फॉर्म भरवून घेतला. पैसे भरले. मी शरीरविज्ञान शिकणार होते. आरोग्य चिकित्सेत प्रवीण होणार होते. पण त्या एका शरीराचा, ज्यांची मी अर्धांगी होते त्याचा पत्ता माझ्या मनाला लागणार नव्हता. वर्षसण कटुतेनं पार पडला. जनदृष्टीने माझं उपभोगाचं सुखाचं पण वास्तवात माझं सोसण्याचं वर्ष संपलं. पाहिलास माझा अर्धोन्मीलित शिंपला ! म्हणून मी कचरत होते उघडायला. न त्यात मोती न रेती. तडफडणारा किडा आहे नुसता. पाहिलास !

दा. क्र. १६५८२

□

## १५

## सौ. सुमति देवस्थळे

□

आमच्या लग्नाच्या पहिल्या वर्षासंबंधी लिहायचे म्हणजे २० वर्षांपूर्वीच्या स्मृती चाळविल्या पाहिजेत. त्या वर्षाचे एकाच शब्दात वर्णन करायचे तर "आव्हान" हा शब्द योजला पाहिजे. लग्नाच्या पहिल्या वर्षाने मला खूप अवघड आव्हाने दिली. ती स्वीकारण्यास मला फार लहान वयात तयार व्हावे लागले. लग्नाचे वेळी मी १८ वर्षांची होते. इंटरपर्यंत शिक्षण झालेले होते. गोविंदाग्रज, बोरकर यांच्या काव्याची भुरळ मनावर होती. परंतु वास्तव किती परखड असते हे लग्नानंतर लवकरच समजून आले. काव्य, स्वप्ने—सर्वांची धुंदी उतरली. उरला तो फक्त रोकडा व्यवहार, कष्ट आणि गद्यप्राय जीवन. त्या सर्वांना सोबत होती ही एकच गोष्ट अडचणींवर फुंकर घालीत असे.

लग्नानंतर महिनाभराने माझे सासरे गेले. ही गोष्ट व्हायला नको होती, पण घडली. माझे सासरे अतिशय वृद्ध, थकलेले होते. इतके, की प्रवासाचा त्रास होईल म्हणून लग्नाला येण्यासही ते तयार नव्हते. आग्रहाने त्यांना आणले. तरीसुद्धा लग्नानंतर केवळ महिन्याभरानेच त्यांचे देहावसान व्हावे ह्याचे मला फार वाईट वाटे. त्यांच्या मृत्यूचा माझ्या लग्नाशी संबंध जोडला जाईल अशा धास्तीने मी बेचैन होई. घरात तसे कोणीही बोलले नाही. परंतु सासूबाईंच्या मनात आल्याशिवाय राहील का ? ह्या विचारांनी माझा अक्षरशः छळ मांडला होता.

पाण्याच्या पहिल्या घोटातच ठसका बसावा अशी माझी आयुष्याची पायवाट होती. घरातील कुटुंबप्रमुख गेल्याने सर्वत्र औदासीन्य पसरले होते. मंगळागौर, दिवाळसण, सासरमाहेरच्या फेऱ्या ह्या सुंदर सोहळ्यांवर सावट आले होते. खऱ्या अर्थाने आनंद कशातच उरला नव्हता. हे स्वतः नोकरीच्या निमित्ताने मुंबईस होते. जागेची अडचण तीव्र होती. म्हणून मला सासरी, माहेरी एकट्याने रहावे लागे. मुंबईस जागा मिळविण्यासाठी खूप खटपट चालली होती. अखेरीस रु. ५०० पागडी व रु. ३० भाडे असे ठरवून जागा घेतली.

हक्काची जागा घेतल्याचे पत्र आल्यावर मला कोण आनंद झाला ! मात्र जागा पाहून तितकीच निराशा झाली. जागा म्हणजे फक्त एक लहानशी खोली— आत नळ नसलेली, गळणारी, सर्व अर्थाने दिव्य ! माहेरी माझी अभ्यासाची जेवढी खोली होती, तेवढ्या जागेत आंघोळीसकट सर्व संसार करायचा म्हणजे परीक्षाच होती. बाहेरून पाणी भरून आणायचा संकोच वाटत असे. पण करणार काय ?

लवकरच मुंबईच्या महाग रहाणीचा ताण जाणवू लागला. घरात दरमहा फक्त रु. ११० येत असत. त्यातून रु. ३० घरभाडे दिल्यावर उरलेल्या ८० रुपयांत उभयतांचे केवळ जेवणखाण उरकत असे. नव्या संसारासाठी खरेदी, नवे कपडे, नाटक-सिनेमा, आवडीची पुस्तके घेणे ह्यासाठी काहीही पैसे नसत. ह्या गोष्टी केवळ स्वप्नवत भासत असत. अत्यंत निकडीच्या गरजाही भागविता येत नसत. मला पक्के आठवते की थंडीच्या दिवसात पांघरण्यासाठी आम्ही एक ब्लँकेट घेतले. पण त्यामुळे आलेली तूट भरून काढताना असे नाकीनऊ आले की रेशनमधील गहू घेणे ही चैन ठरावी ! रात्रीच्या वेळी आम्ही मक्याची भाकरी खाऊन रहात असू. अशा आर्थिक ओढाताणीत कोणाही नातेवाइकाजवळ किंवा खुद्द आईवडिलांजवळसुद्धा कसलीही मदत मागितली नाही, कोणाचे मिंधेपण स्वीकारले नाही. आज जे जवळ आहे ते संपूर्णतया स्वकष्टार्जित आहे याचा सार्थ अभिमान वाटतो.

कोणाचेही उपकार न घेता आपल्या पायावर उभे रहाण्याचा मी निर्णय

घेतला होता खरा. पण प्रश्न असा होता की १८–१९ वर्षांच्या, अर्धवट शिक्षण झालेल्या मुलीला नोकरी देणार कोण ? खूप ठिकाणी अर्ज टाकले. कोठूनही उत्तर आले नाही. पोस्टेजचा खर्च सोसेनासा झाला. अखेर एका शाळेत नोकरी मिळाली. पगार होता फक्त रु. ७५. प्रथम पगार घेताना जो विलक्षण आनंद झाला त्याची सर आजच्या मोठ्या पगाराला कधीही येणार नाही !

शाळेत जरी नोकरी मिळाली होती तरी ती तात्पुरत्या स्वरूपाची होती. कारण शिक्षकी पेशाला जरूर असलेले प्रशिक्षण व पदवी ह्या दोघांचा मजजवळ अभाव होता. त्यामुळे नोकरीवरून आपणास केव्हाही दूर सारले जाईल ही धास्ती वाटत असे. मग काय करणार ? प्रशिक्षण व पदवी ह्या दोन्ही गोष्टी साध्य करून घ्यायच्या असे ठरविले. सकाळच्या कॉलेजात नाव दाखल केले. पैशाचा प्रश्न तीव्र होता खरा. परंतु तुटपुंजा का होईना, पण मी पगार मिळवीत होते व ती मिळकत चालू रहाण्यासाठी पदवी घेणे क्रमप्राप्त होते.

त्या वेळचे दिवस आठवले म्हणजे एवढा ताण आपण कसा सहन केला तेच समजत नाही. परिस्थितीचे आव्हान स्वीकारून मी पदवी मिळविण्याची जिद्द धरली. पहाटे उठून पोळीभाजी करून ठेवायची. ७–१० च्या गाडीने कॉलेजला जायचे. ११।। ला परत आल्यावर जेवून शाळेत जायचे. ६ ला परत आल्यावर संध्याकाळसाठी स्वयंपाक करायचा. रात्री ९ च्या सुमारास अभ्यास करायला बसायचे. अभ्यास प्रथमपासूनच सुरू ठेवला होता. कारण स्कॉलरशिप मिळून फीचे पैसे वाचले तर संसाराची मांडामांड करायला मदत झाली असती. स्कॉलरशिप मिळविली, नव्हे टिकविली !

लग्नानंतरचे पहिले वर्ष हे असे गेले. त्या पहिल्या वर्षाने माझ्या सर्व सुप्त शक्तींना आवाहन केले. कित्येकदा असे वाटते की झाले ते बऱ्यासाठीच झाले. कठीण परिस्थितीने मला माझ्या कष्टाळूपणाची ओळख करून दिली. जगात पुष्कळशा गोष्टी कष्टसाध्य आहेत हे उमजले. धडपड केली तर यश मिळू शकते असा अनुभव आला. एकदा आमच्या घरी प्रा. न. र. फाटक आले होते. त्यांच्याकडून स्वाक्षरी व संदेश घेतला. ‘ पराधीनं वृथा जन्मं ’ हा त्यांनी दिलेला संदेश अद्याप डोक्यात आहे. पराधीनत्व आर्थिक क्षेत्राप्रमाणे वैचारिक क्षेत्रातही पत्करले नाही. लग्नाच्या पहिल्या वर्षात लोक काव्य जगत असतात. माझ्या लेखी मात्र

“ आमुचा पेला दुःखाचा, डोळे मिटुनी प्यायाचा
पिता बुडाशी गाळ दिसे, अनुभव हे त्या नाव असे. ”

एवढेच होते. तरीही तो अनुभव घेण्या जोगा वाटत होता. कारण तापदायक अनुभव घेणारी मी एकटी नव्हते. जीवनाचा सहचर त्यात भागीदार होता. त्यांना माझ्या धडपडीबद्दल पूर्ण सहानुभूती होती. “ नवरेपणा ” त्यांनी गाजवला नाही. मला

स्कॉलरशिप मिळाली तेव्हा माझ्यापेक्षा त्यांनाच जास्त आनंद वाटला, अभिमान वाटला. असे दुर्मीळ आनंदाचे क्षण त्या वर्षात डोकावत असत, आणि त्यामुळे अडचणीची आव्हाने स्वीकारण्यास मनोबल लाभत असे. आपणही काही करू शकतो असा आत्मविश्वास निर्माण करणारे ते पहिले वर्ष माझ्या दृष्टीने चिरस्मरणीय आहे.

□

## १६

## सौ. विजया शहाणे

□

उंबरठ्यावरून माप लोटून मी गृहप्रवेश केला त्याला झाली आज वीस वर्षे ! आठवणी विसरण्याइतका काळ लोटला. स्मृतींचा सुगंधही आता विरळ होत आला. संसार-वेलीवरील पहिल्या कन्येची कर्दळ या श्रावण मासात सतेजतेने उमलत आली आहे. त्या केळी-कर्दळीकडे पहात कधीकधी कल्पनेच्या पाकळ्या पसवतात, आणि गृहप्रवेश करून एका अननुभूत आनंदाने, अनामिक उत्सुकतेने आणि आगळ्या उत्साहाने पल्लवित झालेल्या भाव-कुसुमांचा सुगंध मनाच्या गाभाऱ्यात दरवळतो; आणि अंत:करणात तरल संवेदनेचे गुलाबपाणी शिंपडून जातो.

माझे लग्न झाले तेव्हा वयाच्या अठराव्या वर्षांचा उंबरठा नुकताच ओलांडला होता मी. शालेय शिक्षणाच्या फाटकातून बाहेर पडत होते मी. थोडी फार स्वप्नाळू, कल्पनेच्यां वाळूवरून हळूवार पाऊल टाकणारी. अशा चित्तवृत्तीतच विवाहाचे सूत्र-कंकण माझ्या हाती बांधले गेले. एका अधिर, लाजऱ्या आणि हर्षित भाव-भावनांनी माझ्या अंत:करणात एकच गर्दी करून सोडली. शरद् ऋतूत सोनेरी किरणात हिरव्यागार लुसलुशीत गवताच्या कुरणात गाईच्या पाडसाला प्रथमच मोकळे सोडल्यावर त्याची जी अवस्था होते, तोच आनंद मी अनुभवीत होते. प्रपंचाची सुरुवात अशा कोवळ्या अनुभवाने झाली.

आमच्या सह-जीवनाची वाटचाल सुरू झाली, तेव्हा नव्हती शहाणपणाची शिदोरी, नव्हता परिपक्व विचारांचा आधार, अगर अर्थाची व अनुभवाची समृद्धी. लहानपणी बाहुलाबाहुलीचे लग्न लावण्यात कोण आनंद ! त्या लग्नात बाहुला-बाहुलींना कुठला आनंद ? सगळा आनंद असायचा आमचाच. आमचेही लग्न होते असेच बाहुलाबाहुलीसारखेच ! आम्ही दोघेही होतो दुय्यम, तिय्यम. वडील मंडळीच्या विचाराने ( ! ) आमच्या जीवनशृंखला जोडल्या गेल्या. देण्याघेण्याचे व्यवहार झाले. राग, रुसवे झाले, लग्नातील सर्व विधी साकल्याने उरकले गेले; घास देऊन

झाले; मग अधिऱ्या मनाने, ‘इकडचे नाव’ अनेक वेळा घेण्याचा ‘प्रसंग’ पार पाडला गेला आणि वरातीचे ‘घोडे’ आमच्या चाळीतून सासरच्या चाळीसमोर येऊन थांबले. न अडता, बिनचूक, शहाणपणाने, सोशिकतेने !

त्यानंतर लग्नाचे पहिले नव्या नवलाचे वर्ष कसे गेले ते कळलेच नाही. प्रपंचसौख्याची सारी इमारत उभी असते या प्रथमवर्षीय प्रेमाच्या प्रभावी पराक्रमावर ! प्रपंच म्हणजे ही दो-खंबी इमारत. मात्र हे दोन खांब किती खंबीर आहेत, याची कसोटी ठरते अगदी याच पहिल्या वर्षात. नव्या नवतीचा नवोन्मेष आकारास येत असतो; सुरवंटाचे फुलपाखरू तयार होत असते; आणि नव्या जीवनाचा परिमल व परिचय प्रगत होत असतो. अशाच वेळी हा आधार किती कमजोर अगर प्रखर असतो याचीही साक्ष पटत असते.

माझ्या सासरचेच चित्र थोडे तपशीलवार रेखाटते. चाळीवजा जागेत अडीच खोल्या. सासूसासरे कर्तृत्वशील, कर्तबगार; वानप्रस्थाचा विचारही मनात नसणारे. एक नणंद, वय वर्षे सोळा, यत्ता दहावी, शालेय अभ्यासापेक्षा शालेतर विषयात समरस होणारी. एक मोठी नणंद, संसारपाश नसणारी, पण सर्वज्ञात समजणारी. सुदैवाने इकडची स्वारी एकमेव कुलदीपक, दुर्दैवाने मातृ-पितृ प्रेमाची पाखर नसलेली. वडिलार्जित कर्जाचा वारसा अविरत चालत असलेला, आणि थोडचाफार अंध अविचाराचाही—त्यामुळे काही दिवसांनी उघडचा डोळचांनी, कानांनी व सावध मेंदूने ही वास्तवता जाणिवपूर्वक आकलन झाल्यावर माझ्यावरील जबाबदारीची गंभीरता अधिकच वाढली.

अगोदरच लग्नाप्रीत्यर्थ यांना काढावे लागलेले कर्ज, ते फेडण्यासाठी सकाळपासून रात्रीपर्यंत करावी लागणारी वणवण, आणि त्यातही पुढील महा-विद्यालयीन शिक्षण चालू ठेवण्याची धडपड, यामुळे प्रपंचातील मनमोकळचा आनंदाचे फूल आमच्या प्रपंचवेलीवर उमललेच नाही. पण सातत्याने जबाबदारी-च्या जाणीवेची आच असल्याने त्याची खंत मी मनाला वाटू दिली नाही. लग्न झाल्यावर ‘मधुचंद्रा’ची रम्यता आम्हांला सुतरां चाखायला मिळाली नाही.

श्रावणमासातील ‘चार’ मंगळवार मोठ्या रसिकतेने व भावगर्भ वृत्तीने मी जागवले व गाजवलेही. चातुर्मास्य, नवरात्र, दसरा, दिवाळी, संक्रान्त, पाडवा इ. सण यथाक्रम साधेपणानेच पार पडले. कोणत्याही परिस्थितीत उगाच कुढेपणा ठेवायचा नाही; पराभूतवृत्ती पत्करायची नाही व शरणागती स्वीकारायची नाही, अशा जिद्दीने मी वावरत होते. उगाच वितंडवाद करायचे नाहीत व गैरसमजाला वाव ठेवू द्यायचा नाही, अशी माझी वागणी व विचारसरणी होती. प्रथम खूप मनस्ताप मला सहन करावा लागला. काही झाले तरी एका घरंदाज कुलवान खानदानशील घराण्यातील संस्कारसमवायी मी मुलगी. ‘शुश्रूषस्व गुरून् कुरु प्रियसखीवृत्तिः प्रपंचे जने’ इत्यादि कण्व मुनींचा आदेश, उपदेश अभ्यासिला

नसला, तरी सुजन सभ्य घराण्याची रीतभात सतत नजरेखाली घालीत जाणारी कुलकन्यका मी होते. त्यामुळे पहिल्याच वर्षात मतभेदांची तणे, व वादावादीची कुरणे नाहीशी करण्यात माझी उमेद मला घालवावी लागली.

खूप मनस्ताप या पायी मला भोगावा लागला. मनाच्या आनंदी वृत्तीलाही ग्रहणे लागण्याचे प्रसंग उभे रहात. सर्वांना एकत्र व समाधानाने राखण्यात व कटु-भावनांपासून रोखण्यात, कमीपणा स्वीकारणे, पड खाणे, सर्वांची मने राजी राखणे, चित्तवृत्ती प्रसन्न ठेवून त्यांच्या ध्येयमार्गावरून त्यांचे चित्त न ढळेल असे वागण्यात माझे खूप हाल झाले. पहाटे उठावे लागे. घरची कामे वेळात उरकावी लागत. सासूबाईंना जेवणात मदत करावी लागे. सायंकाळी ऑफिसातून आलेल्या स्वारीची प्रसन्नमुद्रा पाहिली की, माझे सारे शीण नष्ट व्हायचे. कोणत्याही परिस्थितीत दुःखीकष्टी रहायचे नाही, हा माझा मनोनिग्रह मला फार उपकारक ठरला.

जेवढे सद्भावपूर्वक करता येईल तेवढे करण्यात मी कसूर केली नाही. सासरची मंडळी परकी अशी मी कधी मानलीच नाहीत. सासूसासरे आईवडिलां-प्रमाणेच मी मानत गेले, नणंदा बहिणींप्रमाणे, त्यामुळे मला कोणतीही गोष्ट कठीण गेली नाही. माझ्या सर्व संबंधितांकडून धन्यतेचे, गौरवाचे, वाखाणणीचे शब्द मी आज ऐकते. आदर, सन्मान व कर्तृत्व आज थोडे फार लाभले आहे, आणि घराण्यात मानमरातब, आब राखून आहे याचे सर्व श्रेय प्रपंचातील पहिल्या वर्षात जाणीवपूर्वक, कष्टपूर्वक व संयमपूर्वक दाखविलेल्या माझ्या सोशिक वृत्तीस व समंजसपणासच आहे, अशी माझी श्रद्धा आहे.

“ Teach a boy and you will teach an individual; but teach a girl and you will teach the whole race.” हे स्वामी विवेकानंदाचे शब्द मला पटतात. मनूनेही स्त्रीची ही द्विविध भूमिका स्मृतीत स्पष्ट केलीच आहे. मात्र या स्त्रीच्या भूमिकेची कसोटीही विवाहानंतरच्या पहिल्या वर्षातच होत असते.

□

## १७

## सौ. शांता मंगेश

□

“ . . . माझी खोली येणाऱ्या-जाणाऱ्या थोड-थोडक्या का मुलींनी पाहिली असेल ! पण तिचे आजचे स्वरूप पालटविण्यास कोणालाही बुद्धी झाली नाही. अन् ही निकोप, सुंदर मुलगी कुठची कुणास ठाऊक ! त्या खोलीला भुलते काय, आणि माझ्याशी लग्न करून एकरूप होऊन संसाररूपी रथ हाकारते काय, सगळेच विचित्र ” असा गोड भाव ह्यांच्या तोंडून ऐकला की मन बहरते, फुलते व आजही वीस वर्षांनी पुलकित बनते.

माझी ह्यांची दृष्टादृष्ट झाली त्या वेळेस ह्याच मुलाशी आपले लग्न व्हावे असे मनाला वाटू लागले. माझे असे जवळचे नातेवाईक कोणीच नव्हते. एक दूरचे काका होते त्यांना नेहमी वाटे ही मुलगी आपल्या नात्यात पडावी. त्यांनी असे बरेच वेळा मला बोलून दाखवले. पण मला कोणी लग्नाबद्दल विचारले, की मला फार आश्चर्य वाटे. कारण माझे असे मत झाले होते की, ज्या मुलीला आई-वडील नसतात त्या मुलीचे लग्न कसे होणार. कारण लग्नासाठी भरपूर हुंडा द्यावा लागतो. कोडकौतुक करणारे आईवडील असावे लागतात पण माझ्याकडे तसे काहीच नव्हते. माझ्या दोन धाकटचा बहिणींची जबाबदारी माझ्यावरच होती. त्या काही काळ एकटचा राहिल्यामुळे दुसऱ्याशी कसे मिळवून घ्यावे हे माहीत नव्हते. थोडीशी शेती व घर असून त्याची वहिवाट मामाच पहात असे. मामावर लहान वयात जबाबदारी पडल्यामुळे माझे सर्व शिक्षण बोर्डिंगमध्ये झालेले. मॅट्रिक झाले व माझ्या बहिणींना मी बोर्डिंगमध्ये ठेवले. ह्या मामाच्या सान्निध्यात मुली हट्टी व उनाड बनलेल्या. बोर्डिंगमधून त्यांच्याबद्दल नेहमीच तक्रारी येत. अशी २–३ वर्षे निघून गेल्यावर मधली बहीण मॅट्रिक झाली. ती थोडी समजूतदार झाल्यामुळे आम्ही दोघी ' समाजशिक्षण ' करू लागलो. पण त्या वेळीच गांधीहत्या झाल्यामुळे मुलींच्या शीलाच्या विटंबना ऐकू येऊ लागल्या. माझ्या शिक्षणात खंड पडल्यामुळे माझे लग्न करण्याची भुणभुण ह्या काकांनी सुरू केली.

मग नाइलाजाने मी काकांना रुकार दिला. पण नवऱ्याला आईवडील, बहीणभाऊ असे कुटुंब असावे व त्यांनी एकमेकांवर प्रेम करणारे असावे, अशी अट घातली. त्यांच्या माहितीतला हा मुलगा तसाच होता. तेव्हा झटपट हे लग्न ठरून आठव्या दिवशी मी सौभाग्यवती झाले.

लग्न झाल्यावर, एकच खोली व त्या खोलीत जुन्या वळणाचे आई-वडील, बहीणभाऊ. एकमेकांशी बोलावयास मोकळेपणा नाही हे पाहून मात्र मन उदास झाले. कारण कोणी कोणाशी कामाव्यतिरिक्त बोलत नसत. सासरे देवाची पूजा व देवाचे नामस्मरण ह्यातच दिवसभर दंग असत. मी दिवसभर उभी राहून, सासूबाईंच्या कामात मदत करून वेळ घालवीत असे. ह्यांना आकडीचा त्रास असल्यामुळे हे सकाळी ९ वाजेपर्यंत झोपत. झोपून उठले की तोंड धुऊन जेवत व ऑफिसमध्ये जात, व संध्याकाळी ६–७ वाजता घरी येत.

ह्यांची लग्नाच्या आधीच सुट्टी संपल्यामुळे बाहेर गावी जाणे शक्यच नव्हते. त्यामुळे एकांतवास कधी मिळतच नसे. लग्नानंतर ह्यांच्या प्रकृति अस्वास्थ्यामुळे ह्यांची भीती वाटत असे. ह्यांची प्रकृती बरी नसते अशी कुणकुण लग्नाआधी लागली होती. पण त्यांना मी भुललेच म्हणाना ! व लग्न करून बसले. जेव्हा ह्यांना आकडी येत असे तेव्हा वाटे हे ' परमेश्वरा सत्यवानाचे प्राण परत मिळवून सावित्रीने आपले पातिव्रत्य टिकवले तसे वरदान तू मला दे. ' कारण माझे माहेरचे

प्रेमाचे कोणीच नाही. त्यात भर म्हणून की काय ? आजूबाजूचे सांगत की, ह्यांचा प्रेमभंग झाला असल्यामुळे ह्यांची प्रकृती बिघडली आहे.

काही का असेना पण लग्नाच्या आधी स्वच्छंदाने मी बागडत होते. माझ्यावर कोणाचे बंधन नव्हते. पण दैवाने माझे सत्त्व हरण करावयाचे ठरवले की काय असे वाटू लागले. मी ह्यांना चुकविण्याचा प्रयत्न करू लागले. ह्यांना वाटे ही आपल्यापासून दूरदूर का रहाते. ही सुदृढ व सुंदर दिसते पण हे लग्न फसवून झाले की काय? एकदा सोक्षमोक्ष तर करू या. रात्री कधी बोलण्याचा ह्यांनी प्रयत्न केला की, मी सांगत असे सासूसासरे इथे असताना तुम्ही माझ्याशी बोलू नका. पूर्वीपासून आमच्या माहेरचे वळण जुन्या पद्धतीचे, परंतु माझ्या सासऱ्यांनी हे ऐकले असावे कारण थोड्याच दिवसात त्यांनी कोकणात जाण्याचा बेत केला.

ते गावाला गेल्यावर मात्र आम्ही ऐकमेकांशी मोकळेपणाने बोलू लागलो. तरीपण मी त्यांच्या प्रेमप्रकरणाबद्दल एकही शब्द बोलत नसे. हळूहळू मी ह्यांना आपलेसे केले पण मन मात्र चलबिचल होतच असे. एक दिवस हेच म्हणाले माझी प्रकृती बरी नसते हे तुला कोणी सांगितले नव्हते का ? तू माझ्याशी लग्न करावयास कशी तयार झालीस. पण मी उडवाउडवी करून वेळ मारून नेत असे. कारण सर्व जन्म ह्यांच्याच सान्निध्यात काढावयाचा असल्यामुळे ह्यांना दुःख व्हावे असे काहीही झाले तर आपले सर्व आयुष्य कसे जाणार ?

पण ह्यांचे गुपित ह्यांनीच उघड केले, आपल्या बालपणापासून आपल्याला कसकसे अनुभव येत गेले, आपली प्रकृती बिघडण्यास काय कारण झाले वगैरे सर्व हकीकत काहीही आडपडदा न ठेवता ह्यांनी सांगितली. आपल्यावर एक मुलगी एकतर्फी प्रेम कशी करत होती, व दुसऱ्या मुलाशी लग्न केल्यावर परत ती आपल्याबरोबर रहाण्यास यावयास कशी विनवणी करत होती हे सविस्तर सांगितले. व एका लग्न झालेल्या मुलीबद्दल विचार करणे किती अयोग्य हे सांगितल्यावर, मात्र माझ्या मनातील ह्यांच्याबद्दलचा जो दुरावा होता तो नाहीसा झाला. घरचे वळण जुन्या पद्धतीचे असल्यामुळे डॉक्टरपेक्षा देवावरच भार ठेवण्याची प्रवृत्ती अधिक असे. मी ह्यांचे मन हळुहळू वळवले व डॉक्टरचे औषध सुरू केले. डॉक्टर मला ओळखत असल्यामुळे त्यांना माझी दया येत असे. ते म्हणाले, 'पोरी घाबरू नको. तुझ्या नवऱ्याला काहीही झालेले नाही. मी देत असलेले औषध बारा वर्षे घ्यावे लागेल. मग बघ तुझ्या पतीची प्रकृती कशी चांगली होते.' आणि खरोखरच त्यांचे आरोग्य चांगले झाले. जुन्या वळणाच्या इतर सासरच्या मंडळीना मात्र हे अजूनही पटत नाही. त्यामुळे मन कधी कधी उदास होते. पण आम्ही दोघेही एकरूप झालो हे मात्र खरे.

▭

कुणाचे कुणावाचुनी अडे ।
सारखा काळ चालला पुढे ।।

१८

**सौ. कमल नेवसे**

बघता बघता लग्नाला अठरा वर्षे झाली. परंतु लग्नानंतरच्या पहिल्या वर्षातील गोड व कटु आठवणी अजूनही मनात वादळ निर्माण करतात.

१९४९ च्या एप्रिलमध्ये माझे लग्न ठरले. साखरपुडा झाला. तो दिवस अजूनही आठवतो. तेरावे वर्ष संपून चौदाव्या वर्षात मी पदार्पण केले होते. सासरची माणसे खूपच जुन्या वळणाची. अर्थात् साखरपुड्याची साडी नऊवारी आणली. मी सहा वारी साडी का आणली नाही म्हणून खूप हट्ट धरला व रडू लागले. परंतु वडीलधाऱ्या मंडळीपुढे माझे काय चालणार. मुकाट्याने आलेल्या प्रसंगाला तोंड द्यावे लागले. ती नेसल्यावर साडी नऊवारी असल्यामुळे आवरेना. माझी कोण तारांबळ झाली. ही हुकूमशाही पहिली माझ्यावर झाली. अगोदरच माझ्या डोक्यात अनेक विचारांचे वादळ निर्माण झाले होते.आणि त्यात ही सक्ती माझ्यावर लादली गेली. असे वाटले आपण घेतलेला हा आयुष्यातला महत्त्वाचा निर्णय बरोबर आहे का ? कारण इकडे माहेरी मी खूप लाडात वाढलेली श्रीमंत आईवडिलांची लाडकी लेक होते. त्यामुळे कामाची तर मला अजिबात सवय नव्हती. आणि सासरचे लोक तर अशा जुन्या वळणाचे. शिवाय कुटुंब पण एकत्र व बरेच मोठे, कसे होईल आपले या विचारातच डोळे पाणावले होते. पण आईच्या प्रेमळ शब्दाने व ताईच्या आधाराने मनातील विचार क्षणभर का होईना झटकून टाकले. पण तेवढ्यापुरतेच ! भावी जीवनातील अनेक बऱ्या वाईट विचारांचे वादळ मनात चालूच होते. अशा या विचारांच्या स्वप्नसृष्टीत लग्नाचा दिवस कसा उगवला हे देखील कळले नाही.

सासरची व माहेरची पण खूपच श्रीमंत पार्टी असल्यामुळे लग्न खूपच थाटामाटात झाले.

अठरावर्षापूर्वी एका मंगलप्रसंगी २४ मे १९४९ ला माझ्या इच्छित पतिदेवाबरोबरच मी सप्तपदी चालले आणि हक्काच्या घरात प्रवेश केला तोही अगदी थाटामाटात. घरात जाऊन देवाला व वडीलधाऱ्या मंडळींना नमस्कार करायचे पण भान न राहून मी घाबरून एका कोपऱ्यात रडतच उभी राहिले. न घाबरण्यासारखी धैर्यवान व्हायची शिकवण लुळी पडली आणि क्षणभर का होईना तिथून पळून जावेसे वाटले. पण आता मी प्रेमळ अशा एका व्यक्तीची पत्नी होते. या घरातील मंडळींची सून, वहिनी, मामी, काकी– बापरे ? केवढ्या नात्याची गुंतावळ. ही सारी नाती ठोकरण्याचा मला मुळीच अधिकार नव्हता.

परंतु आई, वडील, बहीण, भाऊ यांच्या प्रेमळ आठवणीने आणि पतिदेवांचा सहवास या बळावर मी डोळ्यांतील अश्रू पुसून हसत सर्वांकडे बघितले. माझे हसणे आणि रुसणे माझ्या वर्तनावरच अवलंबून आहे. आणि ते दूर करणेही माझ्यावरच अवलंबून आहे याची मनाशी पक्की खूणगाठ बांधून मी संसाराच्या नवीन जबाबदारीचे स्वागत केले. माझ्या घरातील दिसेल ते काम मोठ्या आवडीने व हौसेने करू लागले.

लग्नाचा सत्यनारायण होता. मी जेवायला वाढत होते. नात्यातील व इतरही पाहुणे मंडळी खूप होती. त्यामुळे मी जरा घाबरतच वाढत होते. तेवढ्यात माझ्या हातून कोशिंबीरीचे पातेले सांडले. मी खूप घाबरले. नवीन घर, नवीन माणसे त्यामुळे माझी मन:स्थिती कशी झाली असेल, विचार न करणेच बरे. भीतीचे काजवेच डोळ्यांपुढे उभे राहिले. आणि गंगा-यमुना डोळ्यांत उभ्या राहिल्या. पण इतक्यात सासूबाईंचा प्रेमळ हात पाठीवरून फिरला. त्या म्हणाल्या, 'मुद्दाम का सांडलेस. चुकून माणसाच्या हातून अशा चुका होतात. ऊठ, वाढ सर्वांना.' हे ऐकून माझ्या मोठ्या जाऊबाई चेष्टेने कशा म्हणतात, 'आमच्या हातून झाले असते तर सासूबाई किती रागावल्या असत्या. पण ही लहान धाकटी सून ना ?' आमच्या घरी सर्व काम, धुणं आणि भांडी सोडून घरीच असे.

लग्नाचा सत्यनारायण पार पडला. आणि आम्ही हनीमूनकरता दुसऱ्याच दिवशी महाबळेश्वरला जायचे ठरवले. पाहुणे मंडळी असल्यामुळे सत्यनारायणाची पूजा लग्न झाल्यावर दोन दिवसातच उरकून घेतली. महाबळेश्वरला जायचे ठरवले खरे पण या गोष्टीला मामंजींचे आणि सासूबाईंचे जुने मत पंधरा दिवस झाल्याशिवाय बाहेर गावी जायचे नाही असे निक्षून सांगितले. यांना तर खूप घाई झालेली. कारण अशा गोष्टी आयुष्यात एकदाच येतात. शेवटी मामंजींची कशीतरी (अर्थात खोटी) समजूत घालून अगदी भगीरथ प्रयत्न करून (चक्क मामंजींना बनवलं बरे का ?) कशीतरी परवानगी काढली. आणि लग्न झाल्यावर पाचव्या दिवशी हनीमूनकरता आम्ही महाबळेश्वरला आलो. फक्त आठच दिवस महाबळेश्वरला होतो. पण ते आठ दिवस अगदी आठ क्षणांसारखे भरकन् निघून गेले.

आणि शेवटी अशा या धुंद, आनंदी व काहीशा बेहोश मन:स्थितीतच आम्ही आमच्या गावी परत आलो. पण आल्यावर घरातील वातावरण अगदी तंग झालेले. जाऊबाई नाक मुरडून माझ्याकडे पाहू लागल्या. सासूबाईंचे घालून पाडून बोलणे चालूच होते, त्यामुळे महाबळेश्वरचे आनंदी दिवस व गोड सुखस्वप्न विसरून गेले. अशाच वातावरणात चार दिवस निघून गेले.आणि एक दिवस माझे चुलते व भावंडे मला न्यावयास मोटार घेऊन आले. भावंडांना ताईचे घर पहाण्याची हौस असतेच. माझी निघण्याची सर्व तयारी झाली. परंतु यांनी – पतिदेवाने लगेच सांगितले, 'दोन दिवसांत तुम्ही स्वत: आणून घालवा.' यावर माझे काका (चुलते) म्हणाले,

'अहो आठ दिवसांनी घालवू. अजून ती नवी नवरीच आहे.' पण यांचा स्वभाव थोडा कडक होता. कारण माझ्याशिवाय त्यांना करमत नसायचे.

माझ्या काकांना म्हणतात कसे, 'येवढी लाडकी पुतणी होती, तर मग लग्न कशाला केले ?' पण मुलीकरता सर्व मान अपमान सहन करावाच लागतो. कारण तिला त्या घरी आयुष्य काढायचे असते ! पण माझ्या मनाला किती यातना झाल्या असतील. शब्द सुद्धा हत्यारच आहे. त्याचा सुद्धा योग्यच उपयोग करावा. अंतरंगाचे फोटो फक्त हृदयाच्या काचेवरच घेता येतात, त्याची दुसऱ्याला काय कल्पना.

तशी बाकी सर्व गोष्टीत मी अतिशय खूप सुखी होते. पण आमच्या घरात बायकाबायकांत हेवा करण्याची मनोवृत्ती फार होती. माहेरी तर अशा गोष्टी काहीच माहीत नव्हत्या. त्यामुळे अनेक लहानमोठ्या संकटांना तोंड द्यावे लागले. पण म्हणतात ना सुखदु:खाच्या पायऱ्या चढल्याशिवाय यशाचे मंदिर गाठता येत नाही. घरी मुबलक शेती असल्यामुळे नोकरी करण्याचा प्रश्नच येत नाही. शिवाय मंगळागौरीसारखे – पण आमच्यात मंगळागौरच नसते– नवीन सण व सर्व व्रतवैकल्ये माझे बहुतेक पहिले वर्षी सासरीच पार पडले. फक्त पहिली नागपंचमी माहेरी झाली.

लिहायला बसले अन् इतक्या मधुर आठवणी मनात गर्दी करू लागल्या. लग्नानंतर लवकरच मला दिवस गेले. लग्नाच्या पहिल्या वाढदिवशी मी बाळंतीणच होते. सातव्या महिन्यात मी बाळंतपणाकरिता माहेरी गेले. पण माहेरी जाऊन आठदिवस होतात कुठे तर हे दत्त म्हणून दारात उभे. काही काही विचार न करता मला सासरी घेऊन आले ! आणि परत दोन महिन्यांनी माहेरी गेले. आणि लगेच आठ दिवसात बाळंतीण झाले.

आणि काय आश्चर्य ! पंधरा दिवस सुद्धा झाले नाहीत तोच न्यावयास सासूबाई आल्या. मी खूप रडू लागले. पण सासरची माणसे कोणाचेच ऐकेनात. शेवटी माहेराहून मी एक मोलकरीण घेऊनच सासरी आले. पण माझ्या आई-वडिलांची मन:स्थिती कशी झाली असेल ही एक लग्न झालेल्या भगिनींनाच कल्पना येईल. अशा एक ना दोन कटू व गोड आठवणी मनात विचारांचं वादळ निर्माण करतात. पण मी कुठल्याच गोष्टीबद्दल कधी खंत ना खेद बाळगला नाही. आज माझ्या प्रीतीची सुंदरशी वेल चार गोजिरवाण्या मुलांनी बहरली आहे. पैकी एका मुलीचे लग्न झाले आहे. व बाकीची शिकतात.

बाकी सर्व गोष्टीत मी अगदी सुखात आहे. पण याचं श्रेय माझ्या पतिराजाला आहे.

कारण माझ्यासारख्या स्वप्नाळू मुलीला व्यवहारदक्ष पतीने व्यवहाराची ओळख जर हलकेच अन् हळुवारपणे करून दिली नसती तर व्यवहाराच्या कठोर

चटक्यांनी माझे जीवनपुष्प किती पटकन् कोमेजून गेले असते. असे माझे लग्नाचे पहिले वर्ष चांगल्या व वाईट अनुभवाने पटकन् निवून गेले.

व पुढील वर्षें सुखात गेली व सध्या जात आहेत.

□

## १९

## सौ. शीला

□

आकाश ढगांनी कुंद झालंय. हे ऑफिसच्या कुठल्याशा पार्टीला गेले आहेत. मुले शेजाऱ्यांबरोबर सिनेमाला गेली आहेत. मी एकटीच घरात– बसवत नाही म्हणून मी गॅलरीत येऊन उभी आहे. कुठेतरी दूरवर दृष्टी लावून पहात आहे. अस्वस्थ होत आहे. . .कुणाची तरी वाट पाह्यल्यासारखी – पण छे ! आज मी कुणाचीही वाट पहात नाही. आज मी माझ्यातच गुरफटले आहे. भविष्याचा विचार करीत आहे. भूतकाळात केलेल्या वेडेपणाबद्दल स्वतःलाच दूषणे देत आहे. . .

सोळा वर्षे होऊन गेली आमच्या लग्नाला. बेताची परिस्थिती असून देखील रूपाच्या जोरावर उत्तम स्थळ मिळाले होते मला. आणि अजूनही तसे पाहिले तर दृष्ट लागावी असा माझा संसार आहे. लाडक्या मुलीचे वैभव पाहून आईबाबांचे डोळे निवलेत. सासूबाई–मामंजी अधूनमधून येऊन राहतात आणि तृप्त मनाने परततात. हे कर्तृत्ववान् आहेत. मुले वडिलांसारखी बुद्धिमान आहेत. यांचे आणि मुलांचे हवेनको सांभाळण्यात आणि आल्यागेल्याचे स्वागत करण्यात माझा दिवस संपत आहे. पण हे करण्यात पूर्वी जी धन्यता मला वाटत असे ती मात्र आता वाटेनाशी झाली आहे. क्वचित मी एकटीच असले तर माझे स्वतःचे मीपण मी हरवून बसल्याची जाणीव मला बेचैन करते. . .

मला आठवतंय, श्रावणाचे दिवस होते. लग्नाच्या वेळच्या जेवणाची व समारंभाची आठवण अजून ताजीच होती. पण मी होते एकुलती एक सून. आणि सासूबाई हौशी होत्या. परंतु एकदा मंगळागौरीच्या निमित्ताने पाहुणे आले. जेवणावळी झाल्या. पूजा करताना आरती, करताना फोटो काढण्याचा कार्यक्रमही झाला. शालू – दागिन्यांनी सजलेल्या माझ्याकडे सर्वांच्या कौतुकाच्या, क्वचित असूयेच्या नजरा वळत होत्या आणि मी मनोमन सुखावत होते. मी सगळे मनापासून करून घेतले म्हणून सासूबाई खूष झाल्या आणि दिवाळी-संक्रांतीचे बेत रचू लागल्या.

वर्षाऋतूने घातलेल्या हिरव्या मखमली पायघड्यांवरून हसत हसत दिवाळी

आली. माझे माहेर गावातच होते. त्यामुळे दिवाळसणासाठी माहेरी रहायला जाण्याचा प्रश्न नव्हता. आणि तशातच लग्नात निवांतपणे रहायला झाले नाही म्हणून सासूबाईंनी दोन्ही वन्संनाच दिवाळीला घरी बोलावले होते. मुलाबाळांनी घर भरले. वर्षा, मेघा, नीतिन् वगैरे छोटयांच्या ' मामी ', ' मामी ' अशा लाडिक हाकांना ओ देता देता माझी पुरेवाट झाली. बोबडे बोलणाऱ्या लहानग्या मिलिंदला ' मामी माझी छान ग, गोरी गोरी पान ग ' असे गाणे साभिनय म्हणायला कोणी शिकविले होते कोण जाणे ! दिवसातून एकदातरी त्याच्या या गाण्याचा कार्यक्रम व्हायचा, आणि मग सर्वजण त्याचे आणि त्याच्या मामीचेही कौतुक करीत हसायचे.

. . .दिवाळी मजेत गेली. अंगावर थंडीचे काटे फुलवीत संक्रान्त सामोरी आली. भावी मातृत्वाची चाहूल लागल्यामुळे मी रोमांचित झाले होते. आनंद-लेल्या सासूबाई दुप्पट उत्साहाने संक्रान्तीच्या सणाची तयारी करू लागल्या. प्रत्येक सणाला सोन्यामोत्याच्या दुकानात जाऊन नवीन अलंकार खरीदणाऱ्या सासूबाई आता हलव्याच्या दागिन्यांच्या शोधात होत्या.

सासूबाईंच्याजवळ मी सावलीसारखी वावरत होते. त्यांच्या इच्छेप्रमाणे वागत होते. वारंवार माहेरपणाला येणाऱ्या वन्संची मर्जी राखीत होते. भाचरांचे कौतुक करीत होते. त्यामुळे सासूबाई खूष होत्या. इतकी शिकलेली व रूपवान पत्नी मिळाली म्हणून हे स्वत:ला नशीबवान समजत होते. सुंदर सुंदर साड्या नेसून यांच्याबरोबर फिरायला जावे. लहर लागेल तेव्हा नाटकाला, सिनेमाला जावे. जीवन म्हणजे जसे काही रंगीबेरंगी आणि मोहक छटा असलेले सुंदर आकाश होते. आणि या आकाशात स्वैर भराऱ्या मारणारी आम्ही हंस व हंसी होतो. जीवनात जणू कायम एक वसंतऋतूच फुलणार होता वर्षाऋतूची छाया त्यावर कधीतरी पडणार आहे आणि शिशिरही एकदा त्या जीवनात प्रवेश करणार आहे याची जाणीवच नव्हती. उन्हाळयातच पावसाळयाची बेगमी करणाऱ्या मुंग्यांप्रमाणे, विवाहानंतरच्या पहिल्या वर्षातच, जीवनातल्या या वसंतऋतूतच, पुढील काळाची बेगमी केली पाहिजे हे तेव्हा उमगलेच नाही.

लग्नानंतर वर्षानेच आमची मुंबईला बदली झाली. सासूबाईंचा आधार सोडून मला स्वत:चा संसार उभारावा लागला. आता त्यालाही कितीतरी वर्षे लोटली. लग्नानंतरच्या पहिल्या वर्षी माझ्या अवतीभवती घोटाळणारे हे आता ऑफिसच्या कामात बुडाले आहेत. मुलांना आता पंख फुटले आहेत. अजून त्यांची झेप घरालगतच आहे. पण उद्या ती दूर, कदाचित सातासमुद्राच्या पलीकडेही जाईल––आणि मग मुलांच्या पत्राची वाट पाहणे हा एकच उद्योग बनेल माझा. कारण वयाची चाळिशी उलटलेली मी दुसरे काय करू शकणार ? . . .हा भविष्यकाळच मला आताशा भेडसावीत आहे. स्वत:चे ' मी 'पण गमावून बसण्याइतके समर्पण करायची मला खरंच जरूर होती का ? असा प्रश्न मनाला सतावतो.

लग्नानंतरच्या पहिल्या वर्षात वारा प्यालेल्या अवखळ वासराप्रमाणे केलेल्या वर्तनाची लाज वाटू लागते. खरंच जीवनाच्या उत्तरार्धात येणारे हे वैफल्य टाळण्याकरिता विवाहोत्तर जीवनातील पहिले पाऊल मी अधिक विचारपूर्वक टाकायला हवे होते.

□

## २०
## सौ. सुधा मिराशी

□

३ जून १९४८ ! हा मंगल दिन मी जन्मात विसरणार नाही. तारुण्यातील अल्लडपणा झुगारून गृहिणीपदाच्या भारदस्त प्रांगणात मी ह्याच दिवशी पाऊल टाकले ! होय ! ह्या 'शुभ मंगल सावधान' च्या गजराने मला कर्तव्यासाठी सावध केले ! अंतरपाट दूर होताच मी गृहिणीपदाबरोबरच ३ मुलांची 'माता' बनले होते ! माहेरची ही 'सिंधू' सागराप्रमाणे विशाल अंतःकरणाची होऊन सासरच्या 'सुधा' नावाचे सार्थक करणारी व्हावी अशीच माझ्या माता-पित्यांची, काका-काकींची मनीषा होती. मला ती पूर्ण करायची होती ! आता दीन अशा तीन अपत्यांची मला 'आई' व्हावयाचे होते. गौरीहराजवळ तशी मी मनोमन आणभाक दिली होती. कालची ही कुमारिका आज गृहिणी, माता म्हणून वावरायला कर्तव्याचा पदर बांधून सरसावली होती. अर्थात ही जबाबदारी मी आपणहून पत्करली होती. माझ्यावर कुणाची सक्ती झालेली नव्हती ! नक्षत्रासारखा सुंदर पती मला मिळाला होता पण गुणपरिचयाच्या अभावी आम्ही एकमेकांच्या लेखी अजून परकीच होतो. माझ्या मातेच्या भूमिकेत त्यांच्याकडून योग्य ते सहकार्य मिळाल्यास ही भूमिका मी यशस्वी करीन असा आत्मविश्वास मला होता. पण लग्नाला इतकी पाहुणे मंडळी व बाबालोक जमले होते की माझी 'पाडसे' कोणती तेच मला कळेना ! शिवाय माझ्यासारख्या सामान्य रूपाच्या मुलीला असा मदनासारखा पती मिळाल्यामुळे मी अत्यंत खुशीत होते खरी पण 'हे' लग्नाला कोणत्या मनःस्थितीत उभे राहिले असतील त्याचा विचारही माझ्या मनाला शिवला नव्हता ! त्यामुळे 'ही मंडळी फार नीरस' अशीच माझी भावना झाली.

'लाजाहोम' चालू होता. त्यांच्या प्रथम स्पर्शाने माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले होते. कोणत्या तरी धुंद भावनेच्या आहारी मी गेले होते. इतक्यात माझ्या कानी पुढील शब्द पडले, "अहो, मुलगी अगदीच साधारणच आहे. नाही ? शिवाय शहरातली ! नौकरी करणारी अन् बी. ए. कशी खेड्यात रहाणार अन् कशी मुलांना वाढविणार ! दादाच्या डोक्यावर बसली नाही म्हणजे मिळवलं ! "

लाजाहोमाच्या धुरामुळे जेव्हढा त्रास झाला नाही तेव्हढी अश्रूंची धार ह्या शब्दांनी सुरू झाली. आता खरी जीवनाला सुरुवात ! मी व माझे शिक्षण ह्यांचा उदोउदो होण्याऐवजी त्याचा उद्धार होणार हे मी जाणिले आणि मनाशी काही आडाखे बांधले ! लग्नगर्दीतून जरा वेळ मिळताच मी ‘ माझी मुले ’ हुडकून काढली अन् त्यांना जवळ घेतले. त्यांचे प्रेम मला जिंकायचे असेल तर मी ‘ खरी आई ’ होणे हाच एक मार्ग होता. मुले पण छान होती. सशाच्या पिलाप्रमाणे प्रथमतः बुजणारी ती पाखरे लौकरच मला चिकटली. मला मुले फार आवडतात. अजून सुद्धा ! ‘ आखरी खत ’ मधील त्या गोड बंटीला उचलून त्याचे अनेक पापे घेण्याचा मोह मला अनिवार झाला होता. सिनेमा आहे हे सत्य असताना देखील ! त्यामुळे ही जबाबदारी तितकी कठीण नव्हती. मुख्य म्हणजे ‘ सावत्र ’ ही भयंकर चीज मला माझ्या वागणुकीने घालवायची होती.

नवी नवलाई संपली ! जीवनाची चाकोरी सुरू झाली. इचलकरंजी त्या मानाने--म्हणजे पुण्याच्या--खेडेच. माणसे व घर अगदी साधे. सायकलीवरून बसून कॉलेजला व ऑफिसला जायचे, एकुलती एक म्हणून अगदी लाडात जीवन गेलेले, काही चिंता नाही, काही काळजी नाही. सुविद्य काका व काकी प्रो. श्री. ल. आजरेकर ह्यांच्या सतत सान्निध्याने गायन, वादन ह्यांचा छंद लागलेला अशी मी इथे विहिरीचे पाणी ओढण्यात, अन् १५–२० जणांच्या एकत्र कुटुंबात रांधा, वाढा, उष्टी काढा मध्ये रमण्याचा प्रयत्न करू लागले. प्रथम मन रमेना ! त्यातून सासरच्या लोकांची टोचून बोलणी ! एवढे कॉलेजात शिक्षण घेणारे माझे दीर पण तेसुद्धा मला विहिरीचे पाणी ओढता येत नाही म्हणून टिंगल करीत. पण मी विहीरच मुळी जन्मात प्रथम पहात होते तिथे पाणी काढायला कसे येणार हा विचारसुद्धा मनाला शिवला नाही कुणाच्या ! त्यातून हा संसार माझाच नव्हता. एक माता, एक स्त्री आपली छाया ह्या ना त्या रूपाने इथे ठेवून गेली होती. प्रथमतः हे मनाला डाचे ! सले ! पण माझ्या मनाची मीच समजूत घालून माझे मन तयार केले ! ह्यांच्याशी मुद्दाम त्यांच्या प्रथम पत्नीविषयी बोलत राहून त्यांचे गुण, सवयी समजावून घेतल्या व ह्यांच्या मनावरचे ओझे हलके करण्याचा प्रयत्न केला. मुलांना प्रेमाने वागवीन हा दिलासा देण्याचे कारण आता उरले नव्हते. मुले आता माझ्यात पूर्ण रमली होती. ते तर प्रात्यक्षिकच होते. तरीसुद्धा घरातील कोणी ना कोणी ह्यांचे मन माझ्याबद्दल कलुषित करी. अन् मग मात्र ह्यांचे निष्प्रेम वर्तन पाहून मला ब्रह्मांड आठवे. त्यातून ह्यांचा जन्मच मुळी खालच्या लोकात वावरण्यात गेलेला. अपशब्दांना सुमार नव्हता. शेवटी कधी रागावून, कधी न जेवून तरी कधी गोडीत ह्यांना सांगून ६ महिन्यांच्या आत ती संवय सोडविली. मनात मी म्हटले ‘ तुम्हाला देवाने रूपाची दैवी देणगी दिली आहे ना तर मला मनाचे सौंदर्य दिले आहे. त्याने मी तुम्हांला जिंकेनच जिंकेन. ’ परमेश्वराचे आशीर्वाद पाठीशी

घेऊनच मी सुरुवात केली. आमचा धाकटा मुलगा त्या वेळी रिकेटी होता. त्याच्या-साठी औषधपाणी, अंगारेधुपारेसुद्धा वडील माणसांच्या मतासाठी मी तत्परतेने केले. वर्षाच्या आत मुलगा बाळसे धरू लागला व माझ्याबद्दल किंचित आस्था घरातील मंडळींना वाटू लागली. दुसरा मुलगा ४ वर्षांचा व मुलगी ८ वर्षांची होती. इतक्यात आमची परिस्थिती बिकट झाली. नाइलाजाने ह्यांनी परवानगी दिली व मी येथील गोविंदराव हायस्कूलमध्ये नौकरी धरली. माझी नणंद त्या वेळी मॅट्रिकला होती. एकुलती एक व चौघा भावांची अत्यंत लाडकी ! त्यामुळे हट्टी ! पण तिच्या फीसाठी मी शिकवण्या धरल्या, दीराच्या कॉलेजफीसाठी सोन्याच्या पाटल्या विकायला दिल्या आणि पुष्कळच परिस्थिती पालटली. ज्या माझ्या उच्च शिक्षणाचा उद्धार व्हावयाचा तिथे कौतुक होऊ लागले. धाकटा मुलगा माझ्या आईने तिच्या घरी नेल्यामुळे माझे कलावंत मन हालचाल करायला जरा मोकळे झाले. शाळेच्या मंडळीच्या प्रोत्साहनाने मी नाटके वगैरे बसविण्याच्या उद्योगाला लागले. त्याची पण आमच्या घरी टर उडविली गेली. पण यश पाहूनच टीका थांबली !

माझ्या मामेसासूबाईंचा माझ्यावर फार राग ! आणि मला सख्ख्या सासूबाई नसल्यामुळे ह्यांचेच आमचे घरी वर्चस्व, पण त्यांना सुद्धा मी जिंकून घेतले. अर्थात् एका वर्षात नव्हे ! त्याला बराच काळ लागला ! पण सुरुवातीचे त्यांचे मन बदलले खरे ! त्या आता नाहीत पण त्यांची 'सूनबाळ' ही हाक अजून ऐकू येऊन गहीवरून येते.

मंगळागौर, दिवाळसण सगळे सण आईने केले. इकडे झाले. पण मंगळा-गौरीच्या आदल्या दिवशी माझा पुतण्या माडीवरून पडला. त्याला बरेच लागले. त्यामुळे मन नाराजच होते. दिवाळसणाला कामामुळे प्रत्यक्ष दिवाळीला हे आले नाहीत व पाडव्याला ओवाळणी घातली नाही म्हणून केव्हढी रुसले मी ! मला वाटले आता अगदी 'नच सुंदरी करु कोपा' सारखा प्रवेश रंगणार ! पण कुठले काय अन् कुठले काय ? माझा रुसवा मलाच काढावा लागला. झाले !

एका वर्षाचा काल असा आंदोलनीय अवस्थेत गेला. लग्नानंतरचा ना बेहोषपणा ना धुंदपणा ! सगळे व्यवहारी ! रुक्ष ! फक्त माझे धाकटे दीर व त्यांची पत्नी ह्यांचे मला साहाय्य होते. वेळ निघून गेली पण व्रण राहिले.

आता वीस वर्षात काळ पालटला आहे. आम्ही फार सुस्थितीत आहोत. दारी मोटार आहे. अंगावर झुळझुळीत वस्त्रे आहेत, दागिने आहेत. मातृत्वाचे देणे देवाने मला दिले नाही पण ही तीन मुले माझी मातृत्वाची तृष्णा भागवून राहिली आहेत. ह्यांचे संपूर्ण परिवर्तन झाले आहे. वृद्धत्वाच्या वाटेकडे आम्ही एकमेकांना साथ देत चाललो आहोत. ह्यांच्या कर्तृत्वाचा डोलारा दोन्ही मुले संभाळत आहेत. रंगाच्या मोठ्या कारखान्यात आमची गणना होत असते. सुना,

जावई, लेक, नात ह्यांच्या वास्तव्याने आमची वास्तू चैतन्याचे माहेरघर बनली आहे. माझे सामाजिक कार्य, संगीत आराधना चालूच आहे. अन् अशा वेळी मानससरोवरात एक वलय उठले ते महाराष्ट्र टाईम्सच्या महिला विभागासाठी ठेवलेल्या लेखन विषयाने ! मनात विचाराचे तरंग उठतात, मन अंतर्मुख होऊन २० वर्षापूर्वीचा काळ आठवतो अन् साकार होतात चार वेडेवाकडे शब्द ! मनाला पुनःप्रत्यय देणारे ! जिवाच्या मैत्रिणीजवळ हितगुज करावे तसे !

▭

## २१

## सौ. प्रभा जोग

▭

हिरवं पातळ, हिरवा चुडा, कोरे करकरीत पिवळे जर्द दागिने ल्यायलं की एक आगळाच मूड अंगभर पसरतो. मी कोणाची तरी नी कोणी एक सर्वस्वी माझे आहेत असंच तो पोशाख सुचवीत असतो. मी सुद्धा ह्याच वेषात होते. आणि सर्व जग जसं काही फक्त माझ्याचकडं टवकारून पाहत आहे, असं आपलं मला वाटत होतं. मी कशीही होते तरी बरी दिसत होते.

मी आज सिनेमाला जाणार होते. परस्पर नोकरीवरून थिएटरवरच येईन असं सांगितलं होतं. त्यांना सुटी असल्यानं ते आधीच येऊन माझी वाट बघत असणारच ही खात्री. थिएटरच्या जवळ येताच मी लाजून पावले टाकू लागले. पण जवळ जाताच बघितले. हे आले नव्हते. आले असतील. मीच पाहिलं नसेल नीट असं वाटलं. आणखी पुढे गेले. थिएटरच्या जवळजवळ दारातच. पण हे नव्हतेच. मलाच त्यांची वाट पहावी लागली. हे आले वेळेवर धावत धावत माझ्याकडे. क्षणभर नजर टाकून किंचितही कौतुकाची–आपुलकीची भावना त्यात नव्हती, ते म्हणाले, " चला, उशीर झाला, कमलची ( नणंद ) पत्रिका एका मुलाला द्यायला गेलो होतो. "

अजूनही माझ्यासाठी – केवळ माझ्यासाठीच त्यांनी धावत यावं यासाठी मी वाट बघत आहे.

सर्व सासरची माणसं मिळाली. खूप आनंद झाला. आपण सर्वांशी मिळवून घेऊ, सर्वांच्या आवडत्या होऊ असे माझ्या वेडया मनाचे आडाखे. वहिनी-वहिनी म्हणून सर्वांनी फेर धरावा ही खुळी इच्छा मनात धरून माप उलथलं, पण–?

" अहो, वेणी घेऊ या का ? " एक दिवस संध्याकाळी घरी येताना मी ह्यांना म्हटलं.

'घे की' मी नवी, ह्यांची लाडकी बायको हे नाही म्हणणार नाहीत असं वाटलंच. ह्यांनी वेणीवाल्याला सांगितले, "दे रे तीन वेण्या, दोन बांधून दे हां"

"तीन ?"

"हं, तुलाच वेणी घेतली तर घरात राग होईल."

मी खट्टू झाले. वेणीचा आनंद लोपला. ५.६त माझ्यासाठी ते काहीही करू शकत नव्हते. ते माझे नव्हते, सर्वांचे होते.

लग्नानंतर काही कारणांनी आम्ही पुण्याला जायला निघालो. जायच्या दिवशी दीर कार्बनपेपर घेऊन कसल्याशा कॉपीज् काढत होता. माझी आपली ह्यांच्याबरोबर जायचं म्हणून खुशीत तयारी चालली होती. सहज आत डोकावले. सासूबाई म्हणत होत्या, "दिली आहे स्थळांची यादी, त्या सर्व ठिकाणी जाऊन ये. नाहीतर उपयोग काय सुटीचा ?" सुटी मजेसाठी, माझी, त्यांची जास्त ओळख व्हावी म्हणून होती की–?

पुण्याला जाऊन पोहोचताच यांनी मला एका नातेवाइकाकडे ठेवले नी पत्रिकांचा जुडगा घेऊन 'स्थळं' शोधायला बाहेर पडले. ह्यांचं स्वतःच 'स्थळ' मात्र घरीच पदर सावरून बसलं होतं.

पहाटे साडेपाचचा गजर झाला. पण ह्यांच्या मिठीतून बाहेर पडवेना. पण स्वयंपाकघरातील ती शय्या उचलायलाच हवी लौकर. खांद्यावर गादी टाकून हे बाहेर येऊन भावांच्यात नी मी नणंदांच्यात झोपले. एकवार माझ्याकडे वधितलं हेच नशीब.

लग्नानंतरचं पहिलं वर्ष, किती आनंदाचं, किती अनिबंध उत्साहाचं. माझ्या अपेक्षा फार नव्हत्या. चार बहिणीभावंडं नी असलेल्या यांची सर्व तऱ्हेची जबाबदारी असलेल्या पतीकडून मुळातच मी जास्त काय मिळवणार होते ? माझ्या अपेक्षा पैशांनी पुऱ्या करायच्या नव्हत्या. नुसतं मला बायको म्हणून किंचित जास्त महत्त्व असावं ही माफक इच्छा, पण मी नवीन आलेली. माझ्या काय आवडी आहेत, मी कुठल्या घरातून आलेली आहे, मी किती शिकलेली आहे, माझ्या पैशाचा ह्या संसाराकरताही उपयोग आहे हेही कोणी लक्षात घेतले नाही, मला मुळी कोणी मोजलंच नाही.

ह्यांना म्हटलं तर हे म्हणायचे, "आता होतील ह्यांची लग्नं, मग तुझ्या मनाप्रमाणे."

पण ज्या गोष्टी जेव्हा हव्यात, त्या तेव्हाच झाल्या पाहिजेत हे खरं. अजूनही मी अतृप्तच आहे. ह्या गोष्टी चार माणसांना सांभाळूनही करता आल्या असत्या. मन कुठेतरी कायमचं दुखावतं. अखेर मन मारावं लागलं मला. त्यांची पत्नी म्हणून सर्वांची झाले. भोग सुटून सक्तीचा त्याग सुरू झाला. अकाली प्रौढत्व धरावे

लागले. पत्नीच्या नात्यापेक्षा वहिनीचं-सुनेचं नातं जपू लागले. नी 'सुखाचा संसार' सुरू झाला.

मधुचंद्राच्या त्या काळात दोन डोळे शेजारी, भेट नाही जन्माची अशी स्थिती झाली. ह्यांना स्वतःच्या पत्नीचा चेहरा बघायला वेळ नव्हता.लग्नाच्या बहिणीचे फोटो खिशात ठेवून चिंता होती.

अखेर शरणागती पत्करून सहकार दिला मी. कारण ते नी त्यांचे आप्त बदलणं शक्य नव्हतं.

हा हा म्हणता तारुण्य सरत आलं नी आज वाचलं 'लग्नानंतरचं पहिलं वर्ष.' पुन्हा ती जखम ताजी झाली. नुकतीच मुलांना घेऊन महाबळेश्वरला गेले होते. नवीन जोडपी एकसारखी नटून-थटून, एकमेकांना बिलगून बाहेर पडताना दिसत होती. फार बरं वाटलं पाहून. डोळ्यातल्या धूसर पडद्यासमोर मी चित्र उभं केलं, "मी नी हे अशाच तारुण्यावस्थेत आहोत, नुकतंच आपलं लग्न झालं आहे, अशीच नवी साडी नेसून असाच हिरवा चुडा घालून- हे मला विळखा घालून झाडीतून जाताना रस्ता सरत नाही. नी मिठी सोडवत नाही."

मुलानं जागं केलं, "आई-चल की बाँबे पॉइंटवर ?"

मी म्हटलं, "नको रे, पाय दुखतात माझे. तुम्हीच जा पपांबरोबर"

हे म्हणाले, "काय नाचत होतीस लग्नापासून महाबळेश्वर, महाबळेश्वर म्हणून, नी आता नुसती थंड, गप्प."

खरंच ! जेव्हा गरम होते तेव्हा कुबट स्वयंपाकघर मिळालं नी थंड झाले तेव्हा मला महाबळेश्वर !

▭

## २२

## सौ. इंदू भोरसकर

▭

लग्न लागण्याच्या कितीतरी दिवस अगोदर आमचे लग्न ठरले होते. परंतु तेव्हां 'हे' सिंगापूरला. दीड वर्षांनी सुटी मिळाली, आणि मग मात्र, चतुर्मास संपण्याची वाट न बघता ऐन दिवाळीतला मुहूर्त धुंडावा लागला. तारीख सुद्धा १३ ! कुणीतरी नको म्हणत होतं ! परंतु सुटीकडे बघता एक एक दिवस महत्त्वाचा होता.

लग्न लागलं, त्या दिवशी आमच्याकडच्या जेवणाचा बेत जरा मोठा होता. इंदुरातील फार प्रसिद्ध आचारी स्वयंपाकाला होते. कुणाच्या तरी डोक्यात कल्पना आली की, जेवणाच्या अगोदर अल्प प्रमाणात शांकरी घालून केलेल्या थंडाई

प्राशनाचा कार्यक्रम करावा. म्हणजे आचाऱ्यांच्या कलेचा मनसोक्त समाचार घेता येईल !

इंदूरकडे अशा प्रसंगी भांग घातलेली थंडाई पिण्यात विशेष वावगे समजत नसत. मी मात्र कधीच भांगेला स्पर्श करीत नसे. परंतु त्या दिवशी मैत्रिणींच्या घोळक्यात मी बसलेली असताना कुणीतरी माझ्या हातात थंडाईने म्हणून भरलेला पेला दिला आणि त्यात नक्की थोडीशी भांग असावी. कारण थोडयाच वेळात माझ्यावर तिचा परिणाम व्हावयास लागला !

जेवणाची वेळ कधी होते असं मला झालं ! ' घास घालणं, पंक्तीत वाढणं ' वगैरे गोष्टी ' ह्यांना ' आवडत नसल्यामुळे त्या कार्यक्रमांना सुटी मिळाली व माझी संभाव्य फजिती टळली. परंतु सासूबाईंच्या पानात जेवण्याचा आग्रह त्यांनी केला. चांदीची ताटं, रांगोळ्या, उदबत्त्या, समई असा सगळा थाट झाला. बायका केव्हा पानावर बसतात असं मला झालं. आमच्या पानाभोवती बऱ्याचशा मैत्रिणी, वहिनी, वगैरे जमून, मी सासूबाईंच्या पानात कशी विनयाने जेवते हे बघत होत्या. थोडा वेळ लाजून, हळूहळू घास घेतल्यासारखं दाखवलं. परंतु नंतर माझ्यातल्या भांगेने संपूर्ण ताटाचा कबजा घेतला. " इतकी खादाड सून, घरात कशी निभेल ?" असं नक्की त्यांच्या मनात आलं असेल.

दिवसभर मी त्याच नशेत होते. संध्याकाळी वरात घरी गेल्यावर. कुणीतरी रात्रीच्या सिनेमाचा बेत केला. म्हणजे शान्त झोप पण नाही. थिएटर पावेतो मी कशी गेले, कोणचा सिनेमा पाहिला, घरी कशी आले ? ते माझं मला माहीत. पण शेवटपावेतो, मला भांग चढली होती हे कुणाला कळू दिलं नाही.

लग्नानंतर १०–१२ दिवसांनी आम्ही, पुण्याला ' ह्यांच्या ' दत्ता नावाच्या मित्राकडे गेलो. बऱ्याच ठिकाणी हिंडून इंदूरला परत आलो. आणि ह्यांची सुट्टी संपत आली. हे सिंगापूरला जावयास निघाले. मी त्यांच्या बरोबर जाणार नव्हते. कारण तिकडे आम्हांला घरच मिळालं नव्हतं.

दोन महिन्यांनी ह्यांना घर मिळाल्याचं कळलं. आणि माझ्या प्रवासाची तयारी सुरू झाली. कलकत्त्यापावेतो माझे भावोजी मला पोहोचविण्यास येणार होते. त्या दिवशी संध्याकाळची गाडी होती. पेटया भरल्या, फराळाचा डबा तयार झाला. मी सुद्धा तयार झाले. भाऊ तांगा आणावयास गेला येवढयात भाऊजी हातात तार घेऊन आले. ' येणे स्थगित करा ' येवढाच मजकूर असलेली तार वाचून काहीच उलगडा होईना. घरात एकच गडबड ! कुणी मला चिडवू लागले. कुणी धीर देऊ लागले. मी मात्र तोंडावरच हसू सोडायचं नाही असं ठरवून वागत होते. दोन दिवसांनी ह्यांचं पत्र आल्यावर मला समजलं की कंपनीकडून माझ्या विमान भाडयाची मंजुरी यावयास वेळ लागणार होता. मी माझ्या आईला सर्व समजून सांगितलं. परंतु तिला फार काळजी वाटत होती. तिला शेजारणी, नातेवाईक

काही काही येऊन सांगत. सगळ्यांच्या बोलण्यातला सूर एकच. " सांभाळा हो. इतक्या लांब गेलेत, एकदा बायकोला नेली म्हणजे झालं. नाहीतर आजकालची पोरं ! तिकडे काय चांगल्या चांगल्या बायका असतात !" हे असं काही ऐकलं, की आई मनातून घाबरायची ! त्या १५–२० दिवसांत तिने इंदुरातल्या सगळ्या देवदेवतांना किती नवस केले असतील तीच जाणे ? शेवटी एकदाच्या त्या देवता आईच्या नवसाला पावल्या आणि माझं विमानभाडं मंजूर झालं.

रात्री १२ वाजता विमान सुटणार होतं. आम्ही ११ वाजता विमानतळावर गेलो. माझ्याजवळ सामान बरेच होते. कपड्यांपेक्षा मसाला, लोणची, पापड, शिकेकाई वगैरे. वजन करताच बरचसं सामान काढून टाकावं लागलं. एक एक वस्तू काढताना वाईट वाटत होतं. शेवटी शिकेकाईचा डबा राहिला. तेवढा मात्र मी न्यावयाचा ठरवला. कारण महाराष्ट्रीयन स्त्री आणि शिकेकाईचं नहाणं हा संबंध अतूट आहे. शेवटी दोन चादरी,. टॉवेल्स, हातावर काढून तो डबा मी ठेवला. विमानात फक्त तीन प्रवासी ! १२ तास मी कुणाशीही न बोलता पुढच्या संसाराच्या रम्य कल्पना करत बसले.

सिंगापूरच्या विमानतळावर ह्यांना बघून खूप बरं वाटलं ! परंतु कस्टमचा फार त्रास झाला. सगळ्या वस्तू त्यांनी पास केल्या. परंतु ' शिककाई ' ही वस्तु त्या चिनी, मलायी व ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या मेंदूत शिरेना ! हिंदु स्त्री प्रवासी. म्हणजे गांजा व अफू हे संबंध त्यांच्या डोक्यात पक्के बसलेले.

मी माझ्याकडून खूप समजाविण्याचा प्रयत्न केला. तिने केस कसे धुतात ते पण सांगितले. पण पटेना ! त्यांनी विचारलं, " ह्यांत काय काय वस्तू असतात ? " आता काय सांगणार ! लिंबाची साल, गवला, काचरी, आंवळकाठी, शिकेकाई ह्यांची इंग्लिश भाषांतरं केली, एका मोठ्या विमानतळावर तिथल्या कस्टम अधिकाऱ्यांशी चर्चेला घेण्यासारखी ही नावे आहेत का ! शेवटपर्यंत त्यांना वाटत होते ह्यांत कुठेतरी अफू व गांजा असला पाहिजे ! शेवटी मात्र मी जरा चिडले. " खाऊन बघा, नशा आला तर मला कोर्टात न्या. उलट्या झाल्या तर तुम्ही दवाखान्यात जा " असं काहीसं उद्धटासारखं बोलल्यावर सुटका झाली !

घरी आले ! घर कसलं. एक मोठी खोली अन् एक बाथरूम. तिचंच आम्ही स्वयंपाकघर केलं. परंतु माझं असं ते पहिलंवहिलं घर होतं ! परदेशात असल्यामुळे सणवार काहीच जमत नसत. परंतु हरतालिकेचा उपास मी बऱ्याच वर्षांपासून करत असल्यामुळे तो करावयाचे मी ठरविले. परंतु उपासाला सुद्धा एक वेगळं वातावरण लागतं. पूजा नाही. आजुबाजूला आपल्या स्त्रिया नाहीत, सगळ्या चायनीज् आणि पंजाबी ! एकेकीच्या घरातून असे छान छान वास येत होते. चुपचाप बसून दिवस घालविला. रात्री जागण्याचा प्रश्नच नव्हता ! पहाटे झोप उघडली, आणि कधी झाली नाही इतक्या तीव्रतेने आईची

आठवण झाली. कारण दर हरतालिकेला ती, सकाळी सुंठ साखर तुपात कालवून ठेवायची, आणि आंघोळ उरकताच गरमगरम पिठलं भात ! आणि त्या दिवशी माझ्याच्याने तर उठवून चहा करवत नव्हता.

हळूहळू दिवस जात होते. एकमेकांच्या स्वभावाचे धागे एकरूप घेत होते. मला हिंदी सिनेमा आवडे, ' हे ' इंग्रजी सिनेमाशिवाय काही बघत नसत. २–३ गाजलेले इंग्रजी सिनेमे ह्यांच्याबरोबर पाहिले तरी दिलीपकुमारचा ' आन ' सिनेमा पाहिल्यावर ह्यांना भीतभीत विचारलं अन् ' हे ' पटकन् कबूल झाले. ' ह्यांच्या 'कडून ब्रिजचे धडे घेता घेता कधी कधी हे माझ्याबरोबर बिजिक खेळू लागले.. एकमेकांना संभाळताना दुसऱ्याची आवड आपोआप सांभाळली जाते.

अशातच एक दिवस, हिंदुस्थानातून, कंपनीचे एक पाहुणे येणार असल्याचं पत्र आलं ! ते संपूर्ण शाकाहारी होते. म्हणून कंपनीकडून त्यांना आमच्याकडे जेवायला बोलवावयाचे ठरले. सकाळपासून मी पायाला चाक लावून काम करीत होते. भाजी आणवली. घर झाडून पुसून स्वच्छ केलं. मोठा बेत केला. २–३ वाजेपर्यंत कितीतरी करून झाले, आणि तेवढ्यात ' ह्यांचा ' शिपाई एक तार घेऊन आला. ' पाहुणे येतात ' येवढा मजकूर मी घाईघाईत वाचला व कामाला लागले. संध्याकाळपावेतो मनासारखं सगळं झालं, छानशी साडी नेसले, चेहऱ्यावर अजिबात थकले नाही असे भाव आणले. एकही नोकर न ठेवता घरात दोन नोकर सतत कामाला असतात, असा चेहरा ठेवण्याची मला सवय झाली होती ! हे घरी आले. ते एकटेच ! मी म्हटलं, " पाहुणे कुठे आहेत ?" तेव्हा हे म्हणाले, " म्हणजे तुला त्यांनी तार नाही का पाठविली. " मी आत जाऊन तार नीट वाचली. पाहुणे दुसऱ्या दिवशी येणार असल्याची ती तार होती. म्हणजे ! हाय रे देवा ! उद्या पुन्हा असाच दिवस घालवायचा ! आणि केलेल्या अन्नाचं आज काय करू ! तिथले भिकारी सुद्धा, मी केलेलं वांग्याचं भरीत, भेंड्याची भाजी, आमटी न खाणारे ! परंतु काय करणार ? तितक्याच उत्साहाने दुसरे दिवशी परत तोच मेनू !

अशात आमच्या लग्नाचा वाढदिवस जवळ आला. २–४ दिवसांपूर्वीच दत्तांनी हिंदुस्थानातून वाळवलेली मेथी धाडली होती. मेथीची भाजी म्हणजे हुकमी एक्का. माझी पाकशास्त्रांत फार फार हळूहळू प्रगती झाली ! कधी भेंडीच्या भाजीला तार सुटे. कधी वरणाची फोडणी कच्ची राही. अशा वेळी वाळली मेथी म्हणजे माझी " सखी शेजारीण " तेव्हा मी ह्यांना म्हटलं, " उद्या आपला लग्नाचा वाढदिवस आहे. तुम्ही सुटी घ्या. मी छान मेथीची भाजी करीन, आपण सिनेमाला जाऊ आणि एकदा फोटो पण काढवू या. "

सगळा बेत करून आम्ही झोपलो. सकाळी उठले तर मला कससंच वाटू लागलं. आजपर्यंत वाटलं नाही इतकं निराळं वाटू लागलं. उठवेना ! आणि कार्यक्रम

तर केव्हाच ठरवून ठेवला ! कशीतरी उठले, स्वयंपाक घरात आले आणि मला समजलं माझ्या अनिरुद्धाची चाहुलच ती !

□

## २३ कृष्णाम्मा □

'आता तरी वर बघ ना राणी' म्हणतच सतीशनी माझी मान वर केली. त्याचे ते प्रेमभाव पाहून माझी मान आणखीनच खाली गेली.

"गालावरचे गुलाब मुळी पाहूच देत नाही. बुवा तुम्ही" हसत हसत ते म्हणत होते न् माझी कानशिलं आणखीच गरम होत होती लज्जेने.

खोलीत मंद निळसर दिवा लागला होता. भिंतीचा हिरवा रंग शांतपणा वाढविण्यास मदत करीत होता. वातावरणात दिवाळीच्या थोडचाशा थंडीचा गुलाबीपणा भरून राह्यला होता आणि आमची लग्नानंतर सहा महिन्यांनी पहिली रात्र साजरी होत होती.

विवाहाचं पहिलं वर्ष म्हटलं की १५ वर्षापूर्वीचा तो प्रसंग एखाद्या चित्रपटातील प्रसंगाप्रमाणे माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो. किती पण मी भ्याले होते त्या वेळी. मन नाना शंकाकुशंकांनी भरले होते. "पुढे काय ?" म्हणून मन उत्सुकही होते तशीच मी बावरलेही होते.

खरं म्हणाल तर या वेळी मी अगदीच काही लहान नव्हते. नववधू जे चंदनी दार उघडण्यासाठी फार उत्सुक असतात, ते दार लौकर न उघडेल, जेवढं लांबेल तेवढं बरं असंच मला वाटत होतं. हज्जारदां मनात येई – सतीशना फसवायचं नाही मला. पण ते माझं म्हणणं नीट ऐकून घेतील का ? अशा बाबतीत पुरुष किती विचारी, संयमी राहू शकत असेल ? त्यांनी सर्व ऐकल्यावर ते आपल्यावर किती रागावतील ? आपण नकोशा तर नाही ना होणार त्यांना ? एक ना दोन– मन चिंती ते वैरी न चिंती.

सहा महिन्यांपूर्वी रीतीप्रमाणे बाबांनी माझा विवाह सतीशचं स्थळ बघून थाटाने पार पाडला. सतीश एकुलते एक पुत्र, डॉक्टर होऊन कमिशन घेतलेले, देखणे असे होते. खरोखर अशा स्थळी मला काय उणं होतं ? दोन्ही पक्षांनी लग्नाचा अगदी थाट उडवून दिला. हौसेनं, मौजेनं, रागरुसवे न होता समारंभ यथासांग पार पडला होता. पण या नाटकातील नायिका मी, ती मात्र उदासच होती. चार दिवस पाहुण्यारावण्यांनी घर कसं गजबजून गेलं होतं. पण या गजबजलेल्या घरात

माझं मन रमत नव्हतं. एखाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणे मी वागत होते. कारण—

कारण माझ्या सर्व स्मृती या वेळी माझ्यापुढे उभ्या होत्या. सतीशच्याऐवजी मला श्रीधरजवळ उभे असल्याचा भास होत होता. आणि मग मध्येच भानावर येऊन मी भटजी सांगतील ते सर्व विधी पार पाडीत होते. मन आक्रंदतच होतं. आज खरं म्हणजे ही जागा सतीशची नाही. श्रीधरची आहे. त्याचं काय झालं की,—

आमच्याच कॉलेजमधून इंटर सायन्सपर्यंत शिकून श्रीधर इंजिनिअरिंगकडे गेला. त्या हुषार विद्यार्थ्याला मी तशी विसरूनच गेले होते. पण कशी कोण जाणे आमची पुन्हा भेट झाली. आमची दोन्ही कुटुंबेही तशी परिचितच होती. मी आणि श्रीधर – आमचा परिचय वाढू लागला. दोन महिने आम्ही हिंडलो, फिरलो, गप्पा मारल्या. आमचं प्रेम जमलं. लग्नाच्या आणाभाकाही झाल्या. आमच्या विवाहाला वडीलधाऱ्यांचा विरोध होणार नव्हता. विवाहाची गोड स्वप्ने आम्ही रंगवीत होतो. पुढच्या संसाराची चित्रं रेखाटत होतो. श्रीधरची कंपनी दोन वर्षासाठी त्याला परदेशी पाठवीत होती. तो परत आला की आम्ही विवाहबद्ध होणार होतो. सर्व जण मोठ्या खुषीत येऊन पुढचे बेत आखीत होतो. पण त्याचवेळी चालू असलेल्या नियतीच्या योजना आम्हाला कशा कळणार ? श्रीधरला घेऊन त्याची बोट परदेशी निघाली. लौकर परत येण्याबद्दल पुन्हापुन्हा त्याला बजावून जड पावलांनी आम्ही आमच्या घरी परतलो. आणि – आणि दहाव्याच दिवशी त्या अशुभ घटनेची दुष्ट वार्ता सांगणारी तार आमच्या हातात पडली. समुद्राची शोभा डेकवर उभे राहून पाहताना डेकच्या कठड्यावर रेललेल्या श्रीधरचा तोल गेला व तो पाण्यात पडला ते कुणालाच उमगलं नव्हतं. आणि जेव्हा उमगलं तेव्हा फार उशीर झाला होता. सर्व संपलं होतं. तारेतील मजकूर मी वाचला पण मला त्याचा अर्थच कळेना. माझा मेंदू बधीर होऊन गेला. आकाश कोसळलं, वेड लागायची पाळी आली. असं वाटे हे दुःख मला सहन होणार नाही. ते कधीच संपणार नाही. आपलंच आयुष्य त्यापेक्षा संपवलं तर ? तो परतण्याची आशाही वेडं मन करीत राही. सहा महिने तर मी खरोखरच एखाद्या वेड्यासारखी झाले होते. कोणाच्या सांत्वनाचा काही उपयोग नव्हता. मनाला एवढंच समाधान होतं की, आमच्या प्रीतीशी आम्ही प्रामाणिक राहिलो होतो. काळासारखं दुसरं औषध नाही म्हणतात. हळूहळू मी हेही दुःख पचवलं. आणि बाबांनी आणलेल्या दुसऱ्या स्थळाकडे पाहू लागले. बाबांसाठी मी आता सारं करणार होते. अशाच खटपटीत सतीश व मी विवाहबद्ध झालो.

लग्नसोहळा संपला. पाहुण्यांनी भरलेलं घर हळूहळू रिकामं झालं. आम्ही मोजकीच माणसं राहिलो. सासूबाईंनी एक शुभ दिवस पाहिला. इकडे माझ्या

मात्र हृदयात जोराची धडधड सुरू झाली. सतीशना आपण सर्व सांगितलं पाहिजे. त्यांना फसवून नाही चालणार. मलाही ते पुढे जाचक होईल. पण प्रथम भेटीतच कसं सांगणार सर्व. मनाचा निर्णय होत नव्हता. अस्वस्थता वाढतच होती. सासूबाई, मामंजी खुषीत होते पण—पण सतीशना दुपारीच त्यांच्या कामावरून अचानक तार आली. त्यात तावडतोब कामावर हजर होण्याचा हुकूम होता. सतीशनीही मनाशी काही बेत योजले असतील पण कर्तव्य चुकवून चालणार होतं थोडंच ? प्रथम भेटीच्या आधीच आमच्या ताटातुटी झाल्या. मी मात्र मनाशी नि:श्वास टाकला. आजचं मरण पुढे ढकललं. सतीश संध्याकाळीच निघून गेले.

वसंत आला आणि गेला. मोगरा फुलला आणि कुणी वेणीत माळण्याआधीच सुकला. श्रावणधारा बरसू लागल्या.थाटाच्या मंगळागौरी झाल्या.पण मी धास्तावलेली उदासच होते. माझं मन रमत नाही, मी मनमोकळी दिसत नाही अशी सासूबाईंना शंका आली. प्रथम भेटीचा वियोगच ह्याला कारण अशा कल्पनेने त्या मला अधिकच जपू लागल्या. सुनेला कुठे ठेवू अन् कुठे नको असं मामंजींना झालं. अर्थात् मीही ह्या संसारात समरस होण्याचा प्रयत्न करीत होते. सासूबाईंचं सुनेशिवाय हरकामी अडू लागले. मामंजींच्या कौतुकाला तर सीमाच नव्हती. " तिला आवडतात ना मग रोज सोनाचाफ्याची पुडी निराळी टाकीत जा रे " म्हणून माळचाला ऑर्डर झाली. " तिला आवडतं तर दोनचार दिवसांनी तरी गोड करीत जा घरात " म्हणून सासूबाईंनाही बजावून झालं. छोटया वन्संचं तर वहिनीशिवाय पाऊलही अडू लागलं. सतीशची नियमित पत्रं येतच होती.

हे सर्व जरी खरं असलं, ह्या माणसांना मी ळळा लावण्याचा जरी प्रयत्न करीत असले तरी सतीशना जिंकू शकेन की नाही, ह्या शंकेने मन व्याकुळ होत होतं आणि परीक्षेची वाट एखाद्या विद्यार्थ्याने पहावी तशी मी दिवाळीची वाट पाहू लागले.

इतके दिवसांनी सतीश येणार म्हणून मी दिवाळीला माहेरी जाणारच नव्हते. " वहिनी, वहिनी बघ तुझा सतीशदादा आला " धावत येऊन छोटया वन्संनी बातमी दिली. माझे सतीश – कोण जाणे ते माझे होतील की नाही. माझा ज्यात अपराध नाही अशासाठी मला शिक्षा तर नाही ना ते करणार ? एका गालावर आसू अन् दुसऱ्यावर हसू घेऊनच मी त्यांचं स्वागत केलं.

दिवाळीला चार दिवस अवकाश होता त्यामुळे घरात सुरू झालेली गडबड सतीशच्या येण्याने अधिकच वाढली. " ह्या आनंदात मिठाचा खडा तर नाही ना पडणार ? " मला सारखी भीती वाटत होती. आणि एक दिवस–दिवस कसला रात्र उगवलीच. मी ज्याला भीत होते तीच ती रात्र.

धास्तावलेल्या मनानेच मी खोलीत प्रवेश केला. भरीला भर नववधूचा संकोचही त्यात होता. पत्रातून तशी आमची जानपछान झाली असली तरी आजच

खरी आमची पहिली ओळख होणार होती. ह्या पहिल्या मुलाखतीत काय घडेल त्यावर माझं पुढचं भवितव्य ठरायचं होतं. पण म्हणून त्या भीतीपोटी मला सतीशना अंधारात ठेवायचं नव्हतं.

सतीशनी मला हळूच जवळ घेतली. मीही त्यांच्यापासून दूर व्हायचा प्रयत्न केला नाही. पण हळूहळू शांतपणे सर्व हकीकत त्यांना सांगितली. “ सतीश हे सर्व ऐकल्यावर माझा राग तर नाही ना आला तुम्हाला ? मी नकोशी तर नाही ना वाटत ? मी शरीराने तर पूर्ण शुद्धच आहे; पण म्हणाल का मला आपली ?” उत्तर काय येतं म्हणून मी शंकित झाले होते.

“ वेडी कुठली ” म्हणत त्यांनी मला अधिकच जवळ ओढली. “ तुला काय वाटलं हे सर्व मला नवीन आहे ?” लग्नाआधीच मला हे सर्व माहीत होतं. ते समजलं तरीही तू माझी आहेस. जे घडलं त्यात तुझा गुन्हा काय होता? सर्व काही आता विसरून जायचे हा. आणि हास बरं राणी एकदा. तुझी पत्रं त्रोटक आणि अलिप्त का असत, मी समजत होतो आणि तुला विश्वास यावा म्हणून लांबलचक पत्र पाठवीत होतो. तू आपण होऊन सर्व मला सांगितलंस, माझ्याशी प्रतारणा केली नाहीस म्हणून आणखीनच मला आवडू लागली आहेस. ” हे त्यांचे बोलणे ऐकून मला काय झाले असेल. सर्व माहिती असूनही माझ्याशी तितक्याच प्रेमळपणे सतीश वागत होते. मला आपली म्हणत होते. केवढा हा त्यांच्या मनाचा मोठेपणा. त्यांच्या निरागस प्रेमळ भावाने ते मला आधीच आवडले होते आता तर फारच.

येईल येईल म्हणून एखाद्या संकटाची भीती मनात धरावी आणि ते मुळी येऊच नये म्हणजे जसा आनंद होईल तसंच माझं झालं.

सतीशच्या ह्या मुक्कामात निरनिराळ्या विषयावर आम्ही खूप गप्पा मारल्या. नव्या संसाराच्या नव्या योजना आखल्या. थोडेच दिवसात नव्या बिऱ्हाडातही रहावयास गेलो. वर्षाचे पुढचे दिवस कसे गेले ते समजलेच नाही. वर्षसणही आला.

प्रीतीचा सुगंध मादक आहेच. त्याचा रंगही विलोभनीय आहे. सहवासाने आमची प्रीती दृढ झाली. त्याला अवीटच गोडी आली. आमची प्रीती अन् आसक्ती दिवसेंदिवस वाढतच गेली.

ह्या प्रथम वर्षाच्या आठवणींनी अजूनही आम्ही रोमांचित होतो. त्या आठवणी पुन्हा पुन्हा आठवताना कित्येक रात्री आम्ही जागून काढल्या आहेत. ह्या आठवणींचे मधुबिंदू नव्या वर्षासाठी आम्हाला संजीवन देतात.

▭

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना

२४

## सौ. जयश्री खुलगे

लग्न झालं नि लागलीच दुसरे दिवशी आम्ही मुंबईच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात केली. माथेरान, महाबळेश्वरला जाण्यासाठी नव्हे, तर शाळेत नोकरीवर हजर राहण्यासाठी! कारण अक्षरशः फक्त दोनच दिवसांची रजा मिळाली होती ना मला. नवीनच शाळेत लागल्यामुळे नि नुकतीच शाळा सुरू झाल्यामुळे. शाळेत अगदी जावेसे वाटत नव्हते मला त्या दिवशी. पण......मोहावर विजय मिळवायला मी....अगदी पहिल्यापासूनच शिकले.

आणि नंतरचे दिवस कसे गेले सांगू? 'तू तिकडे अन् मी इकडे' अशी स्थिती होती, आमची जागेच्या अभावी. तब्बल चार महिन्यांच्या प्रदीर्घ (!) कालावधीनंतर आम्हाला मिळाली छोटीशी टुमदार जागा-मुंबईच्या एका प्रशांत उपनगरात–स्टेशनपासून दूर–निवान्तात! नि संसार सुरू झाला.

साताशिवाय न हालणारी मी. पण सकाळी साडेपाचला भय्याच्या 'बाई, दूध' या ललकारीबरोबर मधुर साखर झोपेला बाजूस सारून जागं व्हावं लागे मला. नि मग जरा वेळाने लागलीच सुरुवात स्वयंपाकाला. स्वयंपाकाची घाई! जेवायला बसायची घाई! ह्यांची ऑफिसची तर माझी शाळेची घाई! हे सारं होता होता जीव दमून जाई. त्रेधातिरपीट होई. त्यातच पाहुण्यांची करावी लागे सरबराई. आणि मग अगदीच नाकी नऊ येई. नवीन बिऱ्हाड, नवी जागा पाहण्यासाठी येणाऱ्यांचे सस्मित वदनाने सुस्वागत. भाज रवा की कर शिरा. हो, प्रथमच येणाऱ्यांचे तोंड नको का करायला गोड! 'छान आहे हो जागा.', 'आता जरा स्टेशनापासून लांब आहे खरी.', 'अजून सामान फारसं दिसत नाही?', 'कशाला हवी नोकरी नि बिकरी'——असे अनेक उद्‌गार निघत. काही रुचत, काही पटत, काही वाऱ्यावर उडत तर काही वर्मी लागत.

बाकी दोन्ही खटली सांभाळणं म्हणजे सुरुवातीला तरी निदान अक्षरशः 'तारेवरची कसरतच' होती. कधी सवय नव्हती मुंबईच्या धावपळीच्या जीवनाची. नव्हती गाड्या गाठण्याची. नव्हती नोकरीची नि नव्हती स्वयंपाकाची.

हा हा म्हणता दिवाळी येऊन ठेपली. लग्नानंतरची पहिली दिवाळी! आगळी, वेगळी नि निराळी! पेपर्स तपासून हातावेगळे करून सुरुवात केली. दिवाळीचे खमंग खुसखुशीत पदार्थ करायला...आई, वहिनींच्या मदतीने. नव्या घरातली नवी दिवाळी. त्यातून यायचे होते सासरचे लोक. 'आपल्या हातून सर्व नीट होईल ना? कुणाचा रोष तर होणार नाही ना?' असे विचार मनात डोकावत होतेच. फटाके वाजत होते, फुलबाज्या उडत होत्या, चंद्रज्योती पाजळत

होत्या नि या गडबडीत पार पडला पाडव्याचा दिवस माहेरी. दिवाळी संपली. मामंजी, वन्सं, दीर परतले. नि खरं सांगू का एखादी मोठी परीक्षा आपण पार पाडल्यानंतर मनावरचं दडपण कसं दूर होतं ना तशीच स्थिती झाली माझी.

दोनच दिवसानंतर मामंजींचं पत्र आलं —सुनेचं कौतुक करणारं—तिच्या वागण्याचं, स्वभावाचं, व्यवस्थितपणाचं. केवढा आनंद झाला मला ते पत्र पाहून ! जे पाहिजे होतं ते मिळालं. ज्यांनी वधूपरीक्षेच्यावेळी ' गव्हल्याची खीर कशी करतात ? पानात कोणत्या बाजूला कोणते पदार्थ वाढायचे ? शकुंतलेला सासरी जाताना कण्वमुनींनी कोणता उपदेश केला ?' वगैरे प्रश्नांच्या भडिमाराने मला रडकुंडीला आणलं होतं, नि ज्यांच्याबद्दल मला भीती वाटत होती त्या आमच्या मामंजींकडून असे प्रशंसेचे उद्गार बाहेर पडलेले पाहून मला का बरं आनंद होणार नाही ?

आणि त्यानंतरचं हे दुसरं पत्रं ...अवघ्या चारच ओळींचं....त्यांच्या मुलाला लिहिलेलं. 'तू आजपर्यंत कर्तव्य म्हणून कुटुंबाला केलेल्या मदतीबद्दल धन्यवाद. यापुढे मदतीची जरुरी व अपेक्षा नाही........' वगैरे वगैरे. धक्काच बसला मला हे पत्र पाहून. असं काय झालं ? काही उमगेना, समजेना. मनाच्या छटा पालटल्या. ते अस्वस्थ झालं, बेचैन झालं. आणि मग पुढे, असं समजलं की आम्ही त्या सर्वांचं परतीचं रेल्वेभाडं दिलं नव्हतं... आमच्याजवळ पैसे असूनही ...दोघे मिळवत असूनही — हा ( गैर ! )समज. बाकी कुठून असणार जास्त पैसा आमच्याजवळ. नुकतंच महिन्यापूर्वी बिऱ्हाड झालेलं. डिपॉझिटची रक्कम भरलेली. अटकळ नसल्यामुळे बरीचशी केलेली सामानाची खरेदी. महिनारंभी आलेली दिवाळी दिवाळं वाजवणारी नि हा आता ओढवलेला राग नि रोष !

संसाराच्या सुरुवातीलाच वादळ सुरू झालं गैरसमजुतीचं.

मे महिना उगवला. आतुरतेने ज्याची मार्गप्रतीक्षा करीत होते तो मे महिना आला. केवढं धकधकीत वर्ष गेलं होतं. ना विसावा. ना विश्रांती. जणू चाकंच लावली होती जीवनाला. वेगाने जात होते ते पुढे पुढे. वाटत होतं. जावं कुठेतरी दूर दूर रम्य स्थानी..पण छे...ते तरी कुठे जमलं ?

जून उजाडला. बी. टी. ला दाखल होऊन गतिमान जीवनाची गती जास्तच वाढवली मी. उगवत्या उषेबरोबर २२ जून उगवला. लग्नाचा पहिला वाढदिवस. साजरा झाला फक्त पत्ररूपाने... कारण हे होते टूरवर...संपलं वर्ष. पहिलं वर्ष. धावपळीचं.

पण काय गम्मत होती या धावपळीतही. केवढा उत्साह, उमेद, उल्हास ! एकमेकांचं साहचर्य नि साथ ! तडजोड नि समरसता !

चवदा वर्षांच्या काळानंतर लग्नानंतरच्या या पहिल्या वर्षाकडे नजर

टाकताच किती तरी गोष्टी दृष्टीत भरतात. काही सांगण्यासारख्या उघड करून नि काही लपविण्यासारख्या मनात....अगदी खोल....अगदी खोल.

आज ' लागो न दृष्ट माझी, माझ्याच वैभवाला. ' अशी मी सुखात आहे. दोन चिमणी पाखरं माझ्या पंखाखाली विसावली आहेत. ' आकाशात तारा, अंगठीत हिरा नि हाच दागिना खरा ' असं म्हणावं असेच आमचे ' हे ' आहेत नी मुख्य म्हणजे माझे सासरे माझ्यावर निहायत खुष आहेत....हरवले ते गवसले आहे.

□

## २५

## सौ. प्रभा फडके

□

२६ डिसेंबर १९५५ ची संध्याकाळ महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या हॉलमध्ये जेमतेम पंचवीस तीस मंडळीच्या उपस्थितीत माझा विवाह साजरा झाला. विवाहप्रसंगी एकही नवी साडी मी घेतलेली नव्हती. सामान्यत: दिसणारे विवाहसमारंभाचे जे दृश्य असते त्याहून हे दृश्य अत्यंत वेगळे होते. विवाहप्रसंगी साक्ष देणारे श्री. गं. बा. सरदार, माझ्या वडिलांचे स्नेही श्री. बेल्हेकर व श्री. शकुंतला परांजपे ही माणसे माझ्या परिचयातील होती. रजिस्ट्रारने सांगितलेली शपथ घेऊन मी विवाहबद्ध झाले. अर्ध्या तासाचा तो समारंभ आटोपून आम्ही घरी जाऊन शिकरण-पोळीचे जेवण केले व शुक्रवार पेठेतील काळ्या हौदाजवळील एका वाड्यात जिन्याखालची एक खोली भाड्याने घेतली होती तेथेच ती रात्र घालवून आमच्या वैवाहिक जीवनाला सुरुवात केली.

माझ्या विवाहास माझे आईवडील, बहीणभाऊ वगैरे कोणीच हजर नव्हते. कारण त्यांचा माझ्या ह्या विवाहास सक्त विरोध होता. लहानपणापासून ज्यांनी मला अत्यंत लाडाने व प्रेमाने वागविले त्यांनीच माझ्याकडे पाठ फिरविल्यामुळे आयुष्यात अनेक चटके बसले आणि अर्थातच विवाहानंतर होणारे कोडकौतुक तर दूरच राहो पण एक मोठीच जबाबदारी माझ्या शिरावर पडली.

मी ज्यांच्याशी विवाह केला त्यांची प्रथम पत्नी अत्यंत सुंदर होती व ती स्वत: डॉक्टर होती. शिवाय त्यांना एक मुलगा होता. आणि तोही आठदहा वर्षांचा होता. अर्थातच मी त्या मुलाची आई झाल्याकारणाने इतर मुलींच्यासारखे अवखळ वागणे शक्यच नव्हते. उलट मला नव्यानेच विवाह झाला असला तरीही खूप प्रौढपणाने व संयमाने वागावे लागे. पण माझ्या या मुलाला मी माझ्या विवाहापूर्वीपासूनच ओळखत होते व त्याच्यावर माझे आत्यंतिक

प्रेम होते, म्हणून मला त्याचे सारे करण्यात खूप आनंद आणि समाधान वाटे. खरं म्हणजे या घरात पाऊल टाकल्यापासून तो मुलगा आपला नाही असे मला कधीच वाटले नाही. आणि त्यालाही माझ्याबद्दल कधी मत्सर वाटलेला दिसला नाही. आज केवळ माझ्या वयाच्या स्त्रीला एवढा मोठा मुलगा असणे शक्य नाही एवढ्यावरूनच कुणाला शंका येईल बाकी आमचे नाते खऱ्या माता-पुत्रांचेच आहे. परंतु मुलगा लहान होता तेव्हा बऱ्याचशा सवयी त्याला लावण्याचा माझा प्रयत्न चालू असे. शेजारी पाजारी ' ही बाई असं वागवते ', ' फार बोलते ' वगैरे टीकेची झोड उठवत. आणि ते सारे धैर्याने सहन करावे लागे. मी मात्र कुणी मला वाईट म्हणेल याचा विचार न करता माझ्या शक्यतेनुसार त्याला चांगल्या सवयी लावल्या आणि चांगला अभ्यास करवून घेतला. शिवाय माझा मुलगा व माझे पती यांनी माझ्यावर कधीच गैरविश्वास दाखविला नाही. आणि माझ्या मुलानं उत्तरोत्तर उत्तम असे यश मिळवून मला भरपूर समाधान मिळवून दिले. आणि त्यामुळेच आईवडिलांनी माझ्याकडे पाठ फिरविल्यामुळे होणाऱ्या मनाच्या यातना मी सहन करू शकले.

विवाहानंतर विशेषतः ज्यांनी माझ्याप्रमाणेच विधुराशी विवाह केला असेल त्यांना हा अनुभव असेलच की अशा स्त्रियांची नेहमी प्रथम पत्नीशी तुलना करून हिच्यापेक्षा ती अधिक किती चांगली होती याचे गुणवर्णन मुद्दाम ऐकवण्यात किंवा टीका करण्यात इतर स्त्रियांना फार आनंद होतो. आम्ही राहात असू त्या वाड्यातील सुखवस्तू स्त्रिया दुपारी कामधाम आटोपल्यावर गप्पा मारीत बसत आणि हटकून चर्चा करीत. त्यात माझे पती डॉ.... यांची प्रथम पत्नी सुंदर व शिवाय डॉक्टर होती. मी एक ग्रॅज्युएट व कुरूप नसले तरी सुंदरही नाही असे चार-चौघीसारखे माझे रूप. तेव्हा माझ्याबद्दल जी काही चर्चा चाले ती विचारूच नका. परंतु माझे वडील अत्यंत बुद्धिमान होते. व अगदी लहानपणापासून त्यांच्या तोंडून मी जे काही ऐकत असे त्यामुळे कोणी कितीही टीका केली, तरी आपल्याला योग्य वाटेल ते मनाशी निश्चित ठरवून त्याप्रमाणे खंबीरपणाने पावले टाकण्याची त्यांनी मला लावलेली सवय अत्यंत उपयुक्त ठरली. गेल्या बारा वर्षात माझ्याकडे बघण्याचा इतर स्त्रियांचा दृष्टिकोण मी बदलून टाकला.

माझ्या वडिलांचे स्वतःचे घर असल्याने माझ्यासाठी स्वतंत्र खोली असे व घरात भांडीकुंडी भरपूर असत. माझ्या स्वतःच्या घरात मात्र तीनच खोल्या. त्यात सारी माणसे. घरात हे आहे ते नाही आणि आणायचे असल्यास आपणच आपल्या खर्चाचे बजेट बसवून आणावयाचे याची सवय करणे फार अवघड गेले. आणि आपण आई-वडिलांना दुखविले असे मनात येऊन मला फार वाईट वाटे. माझ्या विवाहासंबंधी घरात चालू झालेली खडाजंगी आठवे आणि मला रडू येई. मग मी तासन तास रडत बसे. नवीन विवाह झालेल्या मुली व त्यांचे

होणारे कोडकौतुक पाहून आपले मात्र कौतुक करणारे कोणीही नाही असे वाटून विषाद वाटे. या प्रसंगाने मनावर झालेला आघात आपल्याला सहन करता येईल की नाही असे सारखे मनात येई आणि काळजी वाटे. पण माझ्या ह्या मन:स्थितीची जाणीव माझा मुलगा व माझे पती यांनी ठेवून मला अत्यंत प्रेमाने वागवून माझ्या मनावरील दडपण दूर केले.

अशा तऱ्हेने मनाला होणाऱ्या यातना, इतरांची टीका, वयाच्या मानाने पडलेली मोठी जबाबदारी, आईवडील, बहीणभाऊ यांची ताटातूट यामुळे आलेली खिन्नता, तर दुसरीकडे पतीचे अलोट प्रेम आणि मुलाची अपार माया अशा ऊनसावलीत माझ्या लग्नानंतरचे पहिले वर्ष सरले. कालांतराने तो मागचा ताण नाहीसा होऊन माझ्या संसारात मी रमून गेले.

□

## २६

## सौ. निर्मला जोशी

□

आमचं लग्नच मुळी मुलुखावेगळ्या पद्धतीनं ठरलं. आजच्या जमान्यात पत्रमैत्री हा शब्द बराच लोकप्रिय आहे; पण १२ वर्षांपूर्वी हा शब्द फारसा रूढ नव्हता. पण त्या वेळी आमचं लग्न केवळ पत्रव्यवहारानं ठरलं. हे वाचताना तुम्हाला अगदी गुदगुदल्या झाल्या असतील नाही ? तुम्हाला वाटलं असेल, ही कोण आधुनिक शकुंतला पत्राने विवाह जमवणारी ? पण असलं काही नाही हं ! पत्रव्यवहार कुणामध्ये ठाऊक आहे ? माझा मोठा भाऊ व आमचे हे ! मुलगीसुद्धा लग्नाअगोदर कुणी पाहिली नाही. मुलीची पसंतीसुद्धा फोटोवरूनच झाली. मग इतर देण्याघेण्याची बोलणी तर दूरच.

माझ्यासारख्या कोकिळेला ( फक्त रंगानेच हं ! ) ज्यांनी केवळ फोटोवरून पसंत केलं त्या माणसाच्या मनाच्या मोठेपणाची मला तेव्हाच कल्पना आली. पण त्याबरोबरच एक अनामिक हुरहूर वाटत होती; कारण फोटोवरून जे काल्पनिक चित्र त्यांनी तयार केलं असेल त्याला प्रत्यक्ष मुलगी पाहिल्यावर धक्का तर नाही बसणार ?

पण ही भीतीही अगदी व्यर्थ ठरली आणि सासरच्या माणसांनी माझं फारच कौतुक केलं. त्या कौतुकातलं एक खरं कारण तुम्हाला म्हणून सांगते हं ! माझे केस फारच लांब आहेत म्हणजे जवळजवळ पावणेसहा फूट लांब आहेत. तर असं मुलखावेगळं एक आश्चर्य आपल्या पायांनी चालत आपल्या घरी आलेलं

पाहून कुणाला आनंद होणार नाही ? आणि सीता, द्रौपदी यांच्यासारख्या पतिव्रतांचे केस अगदी पायांपर्यंत असल्याचे पौराणिक दाखले ! मग माझ्या सासूबाईंना सतीच आपल्या घरी आल्यासारखं वाटलं यात काय नवल ?

अशा नवलाईत पहिले काही दिवस केव्हाच गेले. दि. ९ जूनला माझ्या बी. ए. च्या परीक्षेचा निकाल लागला व बी. ए. ही नवीन उपाधी लागली. विद्येतील पदवी व संसारातील पदवी जवळजवळ एकदमच मिळाली. गृहिणी झाले पण सुगृहणी होण्याची नवी जबाबदारी येऊन पडली व त्या कसोटीला मी उतरते की नाही याबद्दलची भीती वाटू लागली. व जणु काही अशी कसोटी घेण्यासाठीच दैवाने काही प्रसंग निर्माण केले.

लग्नानंतर पाहुणेमंडळी अजून परतलेली नव्हती. एके दिवशी अचानक ह्यांचा व माझ्या भाऊजींचा काही क्षुल्लक कारणावरून वाद झाला व एकदम रागाच्या भरात ह्यांनी ' मी वेगळं बिऱ्हाड करीन ' असं सांगून टाकलं. झालं ! आमच्या सासूबाईंच्या व वन्संच्या डोळ्यांतून गंगायमुना वाहू लागल्या. आता यांची समजूत कशी घालायची हा माझ्यापुढे प्रश्न पडला. तशात मी नवीनच घरात आलेली. त्यामुळे त्यांना साहजिक असं वाटणार की वेगळं होण्याची माझी इच्छा आहे. एक क्षणभर माझ्या मनात संभ्रम निर्माण झाला. पण माझी खात्री होती की, ह्यांनी जरी ते वाक्य उच्चारलं तरी ते रागाच्या भरात होतं. मनापासूनचं नव्हतं. आणि समजा त्यांना राग आला तर तो दूर करणं आपल्याच हातात नाही का ? म्हणून चटकन् सासूबाईंच्या समोर शपथ घेतली की निदान माझ्या धाकट्या वन्संचं लग्न होईपर्यंत तरी आम्ही वेगळे होणार नाही. एवढं आश्वासन दिल्यावर काय पाहिजे ? एका क्षणात अश्रूंची फुलं झाली. माझ्या सासूबाईंना माझ्याबद्दल पूर्ण विश्वास वाटू लागला. व तो अजूनही तसाच आहे. आता तर प्रत्येक बारीक-सारीक गोष्टीतही माझ्या विचाराशिवाय त्यांचं पान हलत नाही.

आणखी एक प्रसंग असाच डोळ्यांसमोर उभा राहतो. माझं लग्न झालं त्या वेळी माझ्या धाकट्या वन्सं कॉलेजला जाणाऱ्या होत्या. माझी जाऊ माझ्याच बरोबर घरात आली. भाऊजींनी तिला S. T. C. ला घातलं. साहजिकच माझ्या सासूबाईंना वाटलं की मोठ्या सुनेला पण शिकवावं. म्हणून त्या मला सारख्या बी. टी. ला किंवा एम्. ए. ला बसण्याचा आग्रह करू लागल्या. खरं सांगायचं तर मलाही शिक्षणाचा फारसा उत्साह नव्हता म्हणून मी आपली त्यांना नकार देत होते. पण त्यांचा सारखा आग्रह सुरूच. मी त्यांचं ऐकत नाही म्हणून त्या माझ्यावर खूप रागावल्या व शेवटी, ' सुनेला मी शिकवलं यामध्ये जे समाधान मला मिळणार आहे ते सुद्धा तू मिळू देणार नाहीस का ? ' असा प्रश्न त्यांनी विचारल्यावर मला फार वाईट वाटलं. पण शक्य तितकं मन शांत ठेवून मी उत्तर दिलं, " आपलं आता वय झालंय. आता सुनेच्या हातचे चार घास खायचं

आपलं वय आहे. अशावेळी जर आम्ही आपल्या सगळ्या लेकीसुना शिक्षणासाठी बाहेर राहू लागलो तर आपण तरी विश्रांती केव्हा घ्यायची ?" माझे हे उद्गार ऐकल्याबरोबर त्यांच्या डोळ्यांतून अश्रू आले व त्या एवढंच उद्गारल्या, " पोरी एवढी माया करायला कुठे शिकलीस ग ?"

बस्स ! नवीन मुलीने पहिल्या वर्षात जे मिळवायला हवं ते मिळालंय आपल्याला, याची या उद्गारांनी खात्री पटली. आज बारा वर्षे झाली. हेच प्रेमानं ओथंबलेलं वाक्य हरघडी ऐकायला मिळतंय. आता माझ्या सासूबाई म्हणजे अगदी पिकलं पान झालंय पण त्यांचं हे वाक्य म्हणजे त्यांची सततची स्मृती आहे.

□

## २७
## सौ. शकुंतला साठे
□

महात्मा गांधी म्हणत असत, ' भारत आपली जन्मभूमी आहे. तरी आपण त्याच्यासाठी प्राण दिले पाहिजेत. ' शेवटी त्यांनी भारतासाठी प्राणसुद्धा खर्ची टाकला. इतके प्रेम त्यांचे भारतावर होते. तसेच प्रेम माझ्या नवऱ्यावर माझे आहे. मी एक चांगल्या घराण्यातील मुलगी आहे. मी शाळेला असताना म्हणजे ४ थी मध्ये माझे प्रेम त्यांच्यावर बसले की, शेवटी मी त्यांच्याशीच लग्न केले. तो मुलगा कमी जातीतला आहे म्हणून आमच्या घरी सारखी भांडणे होत. पण मी तिकडे लक्ष दिले देखील नाही. कारण गांधींनी काढलेले चार शब्द म्हणजे, " जातीयता नष्ट करा. " तसेच मी केले. पण दुर्दैवाने ते भांडण सुरू झाले की आधी तुला जिवंत ठेवणार नाही अशी भीती ते माझ्या पतीस देऊ लागले. या भीतीने ते एक वर्षानंतर सैनिकात भरती झाले. त्यानंतर ४ महिन्याने त्यांचे पत्र मला आले. ते पत्र वाचून मला धक्का बसला व मी आजारी पडले. आजारी पडले म्हणून मी पुष्कळ पत्रे त्यांना पाठविली की तुम्ही परत या. पण ते कसे घडणार, ते कसे होणार, एकदा जाळ्यात मासा सापडलेला तो सुटणार आहे थोडाच. पण मला विश्वास होता की ते काही काळानंतर घरी परत येणार. व तसे झालेहि. २॥ वर्षानंतर ते घरी आले. ते आल्यावर मी अशी मिठी त्यांना मारली की गांधींनी स्वातंत्र्य मिळविल्यावर आपल्या तीन रंगी झेंड्यास मारली तशी. पण त्या झेंड्याचे सुख गांधींना फार थोडे मिळाले. म्हणजे की अगदी भुंग्यास फुलांचे सुख लाभते तितकेच. कारण महात्मा गांधींचे सुख ब्राह्मणांना बघवले नाही.

आपणाला पुढे ताप होईल म्हणून त्यांनी खून करविला. पण गांधीजींने कोणत्याच धर्माला ताप दिला नसता. आणि खरोखरच त्यांनी काढलेले चार शब्द की, जातीयता नष्ट करा. हे चार शब्द माझ्या आनंदास मी वापरले सुद्धा. मीच नाहीतर माझ्या सहा मैत्रिणींनी देखील तसे केले. तेव्हा वापरले आहेत. लग्नेसुद्धा पर पुरुषांशी केली आहेत म्हणजे कमी जातीतील मुलांनशी.

माझ्या नवऱ्याचे पत्र:–,

प्रिय शकुंतला पत्नी हीस,

माझा आशीर्वाद.

पत्रास कारण की, मी आता अगदी सरहद्दीवर आहे, काही काळजी करू नये. मी ५ तास 'चिन्यांशी' लढत असताना मला एक गोळीसुद्धा लागली आहे. ती अगदी पायाला घासून गेली आहे. ती जखम आता बरीदेखील झाली आहे. काळजी नसावी. मी ६ महिन्यांनंतर घरी परत २ महिने येईन. कारण मला रजा मिळणार आहे. तुझा-पती.

हे पत्र वाचून मला धक्का बसला. इतका की माझे कपाळावरील कुंकू गेले असे मी समजत पण होते. त्यापासून मी कुंकू अगदी पुसट लावू लागले. व सारखी काळजी करू लागले. शेवटी मी २० ते २५ दिवस आजारी पडले.

मला कोणी औषधपाणीदेखील करीत नाही. पण माझा धाकटा भाऊ शाळेत आहे त्याने माझे औषधपाणी केले. कारण आज त्यांना शाळेत गांधीजींची गोष्ट गुरुजींनी समजावून सांगितली होती. या गोष्टीमुळे मला फार फायदा झाला तो या रूपाने. शाळेतून जो माझा भाऊ आला तो थेट माझ्याकडे आला. व मला म्हणाला कीं, "ताई तुला मी आज गुरुजींनी सांगितलेली गोष्ट सांगणार आहे. ती गोष्ट म्हणजे गांधी व त्यांनी केलेली कामं."

"बरं सांग तर."

"गांधींनी जातीयता नष्ट केली. अनेक थोर कामे केली. स्वातंत्र्य मिळविले. आपणाला सगळे समान वागा, कोणाला नावे ठेवू नका तो मराठा, तो ब्राह्मण, तो महार तो मांग असे म्हणू नका. तसे आपण वागू लागल्यावर (वांचून) आपला भारत कधीच पुढे जाणार नाही. आपण सगळे एकाच देवाचे आहोत म्हणून आपण सगळे एक होऊन आपले राज्य एकजुटीने राखले पाहिजे."

"तू म्हणतोस ते अगदी खरे आहे. पण तसे करतो कोण. आपल्याच घरची गोष्ट लक्षात घे की, मी एका कमी जातीतील मुलाशी लग्न लावले आहे म्हणून मला कोणी औषधपाणीसुद्धा करीत नाहीत."

"ताई तुला मी डॉक्टरांकडे घेऊन जातो. कोण अडवितो बघतो. दादा, आई-वडील कोणीही अडवू देत मला. मी त्यांना गप्प बसवितो. तू यात काय वाईट केले आहेस. जगालासुद्धा धडा घालून दिलास. मी तुला जरूर उपाय करून तुला

जगवेण मरू देणार नाही." असे माझा भाऊ मला म्हणाला. याप्रमाणे मला त्याने औषधपाणी बघितले व बरे केले.

नंतर २ वर्षांनी माझे पती आनंदराव परत आले. त्यांना पाहून मी त्यांना अशी मिठी मारली की, एकादे माकड जसे आपल्या आईला मिठी मारते तसे. अगदी २ महिने केव्हा निघून गेले याचा पत्ता देखील लागला नाही.

नंतर ते जाण्यास निघाले, तेव्हा मी त्यांना कडकडून मिठी मारली की, ती मिठी मला सोडवेना. ५ ते ७ मिनिटे मी तशीच त्यांना धरून रडू लागले. व लगेच त्यांनी मला दूर केले व म्हणाले, " मला चांगला निरोप दे. " असे मला म्हटले. लगेच मी म्हणाले की, ' जसे तुमच्यावर मी प्रेम करते तसेच तुम्ही आपल्या भारतावर करा. भारतासाठी प्राण पणाला लावूनच लढा. त्याच्यासाठी आपला जीव सुद्धा द्या. पण आपल्या भारतात चिन्यांना एक पाऊलसुद्धा टाकून देवू नका. तरच आपला भारत सुखी होईल. नाहीतर भारत सुखी कधीच होणार नाही. " यापुढे मी म्हणाले, " जाताना संभाळून जावा. मला पत्र पाठवा. खुशाली कळवा. व निदान गांधीजींच्या १/१०० अंश तरी आपले नाव निघेल असे काही-तरी आपल्या देशासाठी करा. " असे सांगून मी त्यांना जाण्यास परवानगी दिली. ते गेले ते थेट सरहद्दीवर गेले. या गोष्टीला आज १२ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यात त्यांनी पुष्कळ पराक्रम केले. पण चिन्यांशी झुंजत असताना त्यांचा एक पाय निघाला आहे तरी त्यांनी त्यांना (चिन्यांना) तोंड दिले होते. शेवटी त्यांना १२ वर्षांनंतर मोठी सभा घेऊन त्यांच्याबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यानी पुष्कळ माहिती सांगितली. ती ऐकून सभेतील सैनिक एकदम म्हणाले, " आम्हीसुद्धा यांच्यासारखेच पराक्रम करून भारतात कुणाला येऊ देणार नाही. " असे ते मोठ्याने सांगू लागले. हे ऐकून आनंदराव इतका आनंद झाला की त्या आनंदाला पारावारच उरला नाही. त्यानंतर सगळ्यांनी महात्मा गांधीजींचा जयजयकार केला व ' वंदेमातरम् ' हे राष्ट्रगीत गाऊन सभा संपविली. दुसऱ्या दिवशी ते येण्यास निघाले व घरी सुखरूप आले. तेव्हापासूनच आमच्या लग्नाचे पहिले वर्ष चालू झाले आहे.

आता आम्हाला तीन मुले झाली आहेत. आम्ही आनंदात संसार सागरात पोहोत आहोत. तसेच तुम्ही सुद्धा करा. भारताच्या भूमीसाठी व गांधींच्या नावासाठी.

मी एक अगदी थोडी शाळा शिकलेली मुलगी आहे. तरी माझ्या काही चुका व खेडवळ शब्द असतील ते शब्द खोडून सुधारक पद्धतीने शब्द घाला.

— या लेखाचे शुद्धलेखन शक्यतो आहे तसेच ठेवले आहे.

□

## २८

## सौ. शोभा बीडकर

"बारा वर्ष वनवास अन् एक वर्ष अज्ञातवास स्वीकारावा लागेल " ही ऐतिहासिक घटना माझ्या आयुष्यात थोडयाशा फेरफाराने व उलटया क्रमाने सार्थ ठरली असे म्हटल्यास वावगे होणार नाही. "एक वर्ष अज्ञात वास व बारा वर्ष सहवास " हे माझ्या आयुष्यातील घटनेचे सार आहे. कोडयात कशाला बोलू ? जीवनातील त्या घटनाच पहा ना !

माझ्या लग्नासाठी सारी मंडळी औरंगाबादेहून हैद्राबादीं दोन दिवस आधीच पोहोचली. लग्नाचा दिवस उजाडला. मंगलाष्टके म्हटली गेली, सावधान झाले आणि एकमेकांच्या गळयात माळा घालण्यात आल्यावर आम्हाला एका सुशोभित सोफासेटवर नेऊन बसविण्यात आले. अभिनंदनाचा वर्षाव करण्यासाठी यांचा मित्रपरिवार महापुराचा लोंढा यावा इतक्या वेगाने धावून आला. त्यांची ती प्रचंड संख्या पाहून यांच्या " पाप्युलॅरिटीची " कल्पना आली.

" लकी आहेस यार तू ", " पारख चांगली आहे हं ! ", " चांगली बायको पटकावलीस बेटचा ", " आमच्या वहिनीची निवड उत्तम आहे, आम्हांला आवडली. " अशा अर्थाचे विनोदी, गुदगुदल्या करणारे शब्द मित्रमंडळीच्या हास्याच्या फव्वाऱ्यात ऐकण्यात कोण आनंद होत होता. आणि यातच सर्वांचा डोळा चुकवून कुणालाही ऐकू जाणार नाही अशा शब्दात हे मला म्हणाले होते, " माझ्या राणीला आज दृष्ट तर लागणार नाही ना ! " हे त्यांचे प्रेमळ शब्द ऐकून मन आनंदाने भरून आले. हे जीवनभर असेच प्रेमात मला डुंबत ठेवणार याची आशा नव्हे खात्री वाटली; पण विधिघटना काही निराळी होती. हा आनंद, हे सुख, क्षणभंगुर होते की काय असा विचार मीलनाच्या अगदी पहिल्याच दिवशी मनाला चाटून गेला. आयुष्याच्या एका नव्या जीवनात प्रवेश करण्याचा तो दिवस. दिवसभर पूजा-आन्हिकाच्या श्रमाने व होमकुंडाचा धूर घेऊन डोळे लाल झाले होते. पाणावले होते व रात्री बारा वाजून गेले तरी यांचा येण्याचा पत्ता नसल्याने आधीच पाणावलेले डोळे भरून येऊन गंगौघ सुरू झाला. हे रात्रौ बाराच्या पुढे केव्हा तरी आले. का तर एका नाटकाची रंगीत तालीम होती. आणि हे त्या नाटकाचं दिग्दर्शन करीत होते. अशा प्रकारे पहिल्याच रात्री नाटकाच्या रंगीत तालमीनं माझ्या आयुष्याचा बेरंग करण्याचा कटु प्रसंग आणला. यांची 'पॉप्युलॅरिटी ' भलती. एका नावाजलेल्या संस्थेचे पदाधिकारी. ऑफिसमध्ये मानाची जागा. त्यामुळे आज काय या नाटकाचं दिग्दर्शन, उद्या अमक्या नाटकात प्रमुख भूमिका, परवा रेडिओवरील श्रुतिकेची प्रॅक्टिस, तर कित्येकदा सभा-संमेलन कार्यक्रम. एकूण या यांच्या विविध कलानैपुण्यामुळे यांचे घरी येणे रात्रौ बारा एकच्या

पुढेच. त्यामुळे दिवसभर काम करून दमल्यासारखं व्हायचं मला व यांच्या प्रेमळ सहवासाची फार ओढ लागायची पण यांच्या लौकर न येण्याने वाट पाहून पाहून मला केव्हा झोप लागायची ते कळतही नसे. त्यातून एकत्र कुटुंब असल्याने घरात सासूबाई, जावा, दीर, नणंदा यांचा गराडा. त्यामुळे दिवसा काही बोलणे तर दूरच राहो पण रात्रीही दोन गोष्टी करण्याची शक्यता कमी. त्यामुळे मनाची सारखी कुचंबणा सुरू झाली.

निरनिराळ्या घटना, निरनिराळे प्रसंग या कुचंबणेत भर घालीत. सायंकाळच्या साडेचार पाचच्या सुमारास दारात उभं राहणंही माझ्या जीवावर येऊ लागलं. आजूबाजूच्या, शेजारच्या, समोरच्या घरात शेजारणी-पाजारणी आपापल्या पतिराजांची आतुरतेने वाट पहात उभ्या असायच्या आणि पाच दहा मिनिटांच्या फरकाने साऱ्यांचे मिस्टर घरी यायचे आणि मला मग पाच मिनिटेच काय पण रात्री बारापर्यंत वाट पाहूनही निराशच रहावे लागत होते. अशीच एके दिवशी हिरमुसली होऊन घरात परतले होते मी. घरात कशातच लक्ष लागेना. म्हणून साऱ्यांचा डोळा चुकवून हळूच गच्चीवर गेले. माझ्या मनाला टोचण्या देण्यासच की काय आकाशात पक्ष्यांचा थवाच्या थवा किलबिल करीत आपापल्या घरट्याकडे जात होता. काही जोडीजोडीने जात होते, ते पाहून मनात विचार आले, की पक्षीदेखील तिन्ही सांजेला आपापल्या घरट्याकडे जातात आणि आमच्या ' यांना ' घराकडची काही ओढच नाही. मग जोडीने फिरायला जाणे तर दूरच राहिले. माझं उद्विग्न मन तिथंही रमेना म्हणून खाली आले. पुन्हा आशाळभूतपणे दारात गेले. दारापुढून गाई-म्हशी आपापल्या गोठ्याकडे परतत होत्या. पण आमचे ' हे ' ऑफिसमधून घरी येण्याऐवजी परस्पर कलेच्या सेवेसाठी मजपासून दूर दूर गेले होते.

आठ दहा महिने असेच निघून गेले आणि मला दिवस गेल्याने मधूनमधुन सासूबाईंच्या प्रेमळपणामुळे निरनिराळे कार्यक्रम होऊ लागले. डोहाळेजेवणं सुरू झाली, पण या आनंदाच्या प्रसंगीही यांची मात्र पूर्वीसारखीच गैरहजेरी. आनंदाच्या सुखसागरात विहार करण्यासाठी नाव होती, पण नावाडीच नव्हता. त्यामुळे खरा आनंद असा मी जीवनातील पहिल्या वर्षात घेऊच शकले नाही.

यांना, त्रासून पुष्कळदा म्हणायची मी की सोन्यासारखी बायको सोडवते कशी तुम्हाला, तर म्हणायचे, " कोणतं सुख नाही माझ्या राणीला. घरदार आहे, पैसा आहे, खायला प्यायला भरपूर अन् मनासारखं आहे, विचारपूस करायला आई आहे, भाऊ आहेत, बहिणी आहेत, काय कमी आहे माझ्या लाडकीला." आता कसं सांगावं यांना की, " साऱ्यापेक्षा मला आवश्यकता आहे फक्त तुमची, तुमच्या सहवासाची. " पण प्रत्यक्ष बोलू शकले नाही कधी मी. त्यामुळे त्यांनाही कधी माझ्या मनाची–भावनांची कल्पनाच आली नाही.

माझ्या पोटी येणाऱ्या बाळाचीच पुण्याई की काय नकळे पण त्याच्या आगमनाच्या आरंभीच माझ्या सुदैवाने खुषखबर ऐकायला मिळाली, की, यांची 'ट्रान्सफर' हैद्राबादेहून उस्मानाबादी झाली. हैद्राबादच्या राजधानीतून आम्ही आता एका मागासलेल्या व रुक्ष गावाला जाणार होतो पण तेच रुक्ष मागासलेले गाव माझ्या जीवनात नव पल्लवी निर्माण करील याची खात्री वाटत होती मला. कारण तिथे यांचा सदैव सहवास मला लाभणार याची शाश्वती होती. म्हणून मी खूप आनंदले होते. पण 'हे' मात्र अत्यंत दुःखी होते. यांना 'ट्रान्सफर' ची बातमी ऐकल्यापासूनच वाईट वाटत होते. एकदोनदा तर 'हे' अक्षरशः ओक्साबोक्शी रडलेसुद्धा. कारण ते त्यांच्या कलेला व मायेच्या माणसांना सोडून दूर जाणार होते.

माझ्या आयुष्याला खरी कलाटणी मिळाली ती या 'ट्रान्सफर' पासून. लग्न झाल्यानंतर खऱ्या अर्थाने राजा-राणीच्या संसाराला सुरुवात झाली ती या घटनेमुळे आणि ज्याला सर्वोच्च सुख म्हणतात ते सारं सारं मी अनुभवलं व गेली बारा वर्षे अनुभवीत आहे. ते माझ्या पहिल्या बाळाच्या आगमनापासून आणि म्हणूनच म्हटलं की, लग्नाचे नंतरचे पहिले वर्ष हे असे खडतर, व अज्ञातवासाचे गेल्यानंतरच सहवासाचा आनंद मला मिळाला. अर्थात त्यामुळेच दुःखानंतरच्या सुखाचा खरा आनंद आज मी उपभोगीत आहे.

□

## २९
## 'सौ. सुशील'

□

आता माझ्या लग्नाला एक तप पुरं होऊन गेलं. मागं वळून पाहिलं- लग्नानंतरचे ते दिवस आठवले की नकळत मन भूतकाळात झेपावून त्या कटू-गोड आठवणी चघळताचघळता सद्यःस्थितीचे विस्मरण होते आणि मन तिथेच रेंगाळते.

माझे लग्न अगदी खानदानी रीतिरिवाजानुसार झाले; मी ह्यांना पाहिलं ते विवाहवेदीवरच. लग्न ठरवताना मुख्य पाहिलं गेलं टिपण ( कुंडली ), खानदान आणि आर्थिक संपन्नता; पण हे पाहताना वातावरणाचा विसर पडला किंवा मुद्दामच दुर्लक्ष केलं गेलं. माझ्या माहेरी अतिशय मोकळे खुले वातावरण ! आम्ही मूळ राजस्थानी असूनदेखील महाराष्ट्रात दहा बारा पिढ्या गेल्यामुळे आम्ही अगदी महाराष्ट्रीयनच बनलो. माहेरच्या घरी पर्दापद्धत अजिबात नव्हतीच, पण प्रत्येकाला व्यक्तिस्वातंत्र्य होतं. माझ्या भावजया माझ्या वडिलांशी किंवा

थोरल्या दिराशी मर्यादा केवळ मोठ्या माणसांची ठेवतो इतकी ठेवून अगदी अगदी मोकळेपणी वागत. वाचनाविषयी, शिक्षणाविषयी इथे आत्मीयता असायची, ज्ञानाविषयी जिज्ञासा असायची. ह्याच्या नेमकं उलट माझ्या सासरी होते. व्यापार, पिढीजात सावकारी होती. प्रत्येक जण आपले आखीव ! रूढीपरंपरांगत चालत आलेल्या वर्तुळाला ओलांडण्याच्या भानगडीत सहसा कुणी पडायचे नाही. सासुरवाशिणीचे वाचन नजरेआडच व्हायचं. त्यात पुन्हा लेहंगा आणि ओढणी ! माहेरची भाषा शुद्ध मराठी तर इथे राजस्थानी ! भाषा, वेष, माणसं सारीच भिन्न. सासर माहेरात अंतरदेखील ३–३।। शे मैलांचं !

त्यामुळे सासरी आल्यावर ह्या भिन्न वातावरणात समरस होताना मला अति कष्टप्रद गेले. त्यात भरीत भर हे अगदी अबोल स्वभावाचे तर मी बोलकी !

भाषा लवकरच मी आतमसात केली. तो वेष अंगीकारताना जड जरी वाटले तरी 'फॅन्सीड्रेस नाही का आपण करीत' अशा मनाच्या समजुतीने त्यात रुळण्याचा प्रयत्न करीत होते. पण खरी अडचण होती ती घुंगटाची ! ओढणी तशी पातळच वायलची किंवा मलमलीची असे पण तरीदेखील तिचा घुंगट अगदी हनुवटीपर्यंत घेतला की माझे डोळे उघडे असून देखील अंधारल्यासारखे व्हायचे. त्या ओढणीतून बघण्याची सवय होईतो जवळ जवळ सात आठ महिने तरी मला फार त्रास झाला. मी अडखळायची, कशाला तरी ठोकर लागायची, सांडलवंड व्हायची आणि मग मला बोलणी खावी लागायची. त्यात मी सावळी. वास्तविक सासरच्या प्रमुख पुरुषांनीच पाहून मला पसंत केलेली ! पण घरातल्या वडीलधाऱ्या स्त्रियांनी मात्र लग्नानंतर तीव्र असंतोष व्यक्त केला. मी शहरातील त्यामुळे बोलताना "ही बघा शहरची लहर, आम्ही काय खेड्यातले वेडे" म्हणून उपहास केला जायचा. मी अगदी रडकुंडीला यायची. समाधानाची जागा म्हणजे "मी ह्यांना विचारायची खरच का हो मी काळी म्हणून तुम्हालाही पसंत नाही." तेव्हा ह्यांचं आपलं ठराविक उत्तर असायचं, "तू काही फार काळी नाहीस अन् रंगाला काय गुण असले म्हणजे पुरे !" पण हे फक्त माझ्यापुरतं. ह्यांच्या तोंडावर जरी कुणी माझी निंदा केली तरी हे अवाक्षर बाहेर काढायचे नाहीत. त्यामुळे माझी फार कुचंबणा होई. वास्तविक मी शक्यतो समंजसपणे त्या वातावरणाशी समरस होण्याचा प्रयत्न करी पण सारे माझ्याकडे अविश्वासू नजरेने पहात. कुणाचे मार्गदर्शन नाही की सहानुभूतीही नाही. माहेरी पत्र लिहायचं ते अतिशय आनंदात असल्याचं. काय करावे ते कळत नसे मग माझ्या रडण्याला असा पूर येई की विचारू नका. बरं प्रत्येक वेळी घरात साऱ्यांच्या देखत डोळ्यातून पाणी काढणंही अशक्य; मग आमची प्रिय जागा असायची बाथरूम !

माहेरचे पत्रं आले की अगदी भान न रहाण्याइतका आनंद व्हायचा. आणि सासुरवाशिणीच्या भूमिकेचे क्षणभर विस्मरण होऊन काही क्षण पोरकटासारखे

वागले जायचे. मग पुन्हा बोलणी पुन्हा आसू ! तसं पाहिलं तर माझे वय अवघे साडे सोळा सतराचे आणि ह्यांचेही साडे एकोणीस वीसचे. परिपक्वता दोघांच्याही विचाराची नाही. माझी रात्र रात्र रडण्यात जात असे. आणि हे "जाऊ दे," "लक्ष देऊ नये" वगैरे पलिकडे जाऊ शकत नसत. त्या वेळी सासर म्हणजे भयंकर तुरुंग अशी कल्पना झालेली असायची.

भाऊ मला माहेरी न्यायला आला की मी त्याला निघण्याची घाई करायची. माझी सासरची मंडळी त्याला दोनतीन दिवस रहाण्याचा आग्रह करीत. त्याला मान देऊन रहाण्याचा होकार द्यावा लागे अन् मी अगदी तळमळत असे. एकदा रेल्वेत बसलो ( भाऊ नि मी ) आणि सासरची हद्द संपली की मी सुटकेचा दीर्घ श्वास सोडीत असे. बरं ह्याचं कारण माहेरी सांगायचंही नाही कारण खानदानी शिकवणूक ! आनंदाचे नाटक हे करायलाच पाहिजे. त्यामुळे माहेरी नानातऱ्हेचे लाड होऊन देखील आम्ही आपल्या कुढतच राह्यचो. कुणाला ही अतिशयोक्ती वाटेल. पण खरीखुरी परिस्थिती हीच होती. पुन्हा हे न्यायला आले की यांच्या भेटीचा आनंद टिकायचा थोडा वेळच; कारण माहेराहून निघताना मायेच्या माणसांचा विरह आसवात व्हायचा. चारदोन स्टेशने गेली की थोडं मन हलकं होतं न होतं तोच जसं जसं सासर जवळ यायचे तसतशी पुन्हा दारुण अवस्था व्हायची. एकएक प्रसंग आठवायचे आणि गाडीतच रडू यायला लागायचं. गाडीतील प्रवासी कुतूहलाने बघायला लागायचे आणि हे चिडायचे. हेही दुष्ट वाटायला लागायचे. 'आपल्याला साऱ्यातून तोडून कैदेत घालणारा प्राणी' अशी भावना ह्यांच्याबद्दलही निर्माण व्हायची. सारे परके परके भासायचे. मराठी बोलणारे कुणी भेटले की, विलक्षण आत्मीयता वाटायची. हे सारं असंच चाललं मला एक मूल होईतो ! मग हळूहळू तिथल्या लोकांनाही माया वाटू लागली. आपल्या वंशाची माता म्हणून असेल किंवा माझ्या सरळ वागण्यानेही ! कशी का असेना. पण आवाजात थोडी मृदुतेची झाक येऊ लागली. मलाही माझ्या पहिल्या वहिल्या मायेच्या तंतूत ही लोकं गुंतल्यामुळे बरे वाटू लागले. परकेपणा कमी होऊ लागला. हळूहळू परिस्थिती पालटत गेली. सारं घरच मला आपलं वाटू लागले. घरातल्या व्यक्तीं-बद्दल स्नेह निर्माण झाला. आणि आज मी साऱ्यांच्या विश्वासाचे स्थान बनले. माझ्यासारखी कुणी सासूरवाशीण दिसली—चुकणारी, बावरणारी, आणि तिची-तिच्याबद्दल कुणी चर्चा करू लागले की, मी झटकन् तिची बाजू घेते. मला तिची विलक्षण कणव येते. तिच्यात दिसते मला सुरुवातीची मी. आज ते दिवस आठवताना वेदनाही होतात अन् सुखही मिळतं. का ? कुणास ठाऊक ! !

▭

## ३०
## सौ. मीनाक्षी सरदेसाई

रंगीबेरंगी फुलांचा नाजुक अंतरपाट दूर झाला; शुभमंगलचा गजर, गंधाक्षतांचा वर्षाव, सनईचे सूर आणि त्याच क्षणी अंतरपाटाआडून दिसणाऱ्या त्या पावलांवर लागलेली दोन नेत्रकमलांची समाधी उतरली. दवबिंदूंनी भिजलेल्या लाजाळूच्या पानांसारखी काळचा-भोर पापण्यांची नाजुक उघडझाप झाली. काहीशी आर्जवी, उत्सुक, भित्री अशी नजर समोरच्या स्निग्ध, तेजस्वी, पाणीदार डोळ्यांना भिडली. आणि जिवणीच्या कोपऱ्यातून ओघळणारे रेशिमवाणे स्मित पाहून झर्‌कन् खाली वळली. तो सोहळा, परक्या वधूवरांची ती लग्नघटिका...

पण भावभावनांच्या कल्लोळांनी भरलेले ते दृश्य माझ्या मनात स्थिर झाले ! मन १० वर्षांमागे रेंगाळले ! त्या चित्रातील लाजरी वधू होते मी; आणि माझ्या गळ्यात माळ घालणारे बळकट बाहू होते माझ्या पतींचे ! !

उंबरठ्यावरचे माप उधळून मी त्या पाहुण्या-रावळ्यांनी भरलेल्या गडगंज वाड्यात शिरले ती किती घाबरत ! भव्य अंगण, लांबरुंद सोपे, मोठी दालने, धान्यांनी भरलेली कोठी, गडी माणसांसहित पंचवीस माणसांनी भरलेला तो वाडा माझ्यासारख्या शहरी मुलीला अपरिचितच ! पण तरीही माझा, हवाहवासा वाटणारा ! अभिमानाने मान उंचवावी असा ! वाड्यात वावरणारी माणसेही तशीच ! वेगवेगळ्या पुष्पगंधांनी न्हाऊन निघावे तशी त्या सर्वांच्या कौतुकमिश्रित प्रेमाने मी त्या घरची झाले ! सरितेच्या प्रवाहात मिसळून एकरूप होणाऱ्या निर्झरासारखी !

लग्न होऊन महिना उलटला तरी पाहुणे होतेच ! त्या गोंधळात आम्हांला एकान्त कुठला ! नव्या नवरीला पाहायला येणाऱ्या बाया, खटचाळ पुतण्या, पुतणे, आणि मिस्किल जावा, दीर आमच्या गप्पांच्या रंगाचा बेरंग करायचे ! तेवढ्या छोट्या गाठीभेटीतून, आणि संभाषणातून मी निष्कर्ष एकच काढला की स्वारीचा स्वभाव म्हणजे श्रावणातल्या ऊनपावसाचा – हसण्या-रुसण्याचा लपंडाव–प्रेमळ, अवखळ, हट्टी, रागीट !

असा ओसंडला होता माझ्या सुखाचा पेला ! हे सारं असंच कायम राहिल का ? पाल चुकचुकावी तसा हा अशुभ विचार–मी अंगावर येणाऱ्या झुरळासारखा झटकून टाकी !

पण. . . . . झुरळासारखी संकटं येतात का झटकायला ! छे ! छे ! ! ती तर निश्चल पर्वतासारखे राहून फुलांसारखी झेलायची असतात !

गणेश चतुर्थीचा तो दिवस ! मी पूजेची तयारी करीत होते ! मामंजी आंघोळ

करून भटजींची वाट पहात देवापाशीच बसले होते. घरात मोदकांच्या पुरणाचा वास दरवळत होता,—'आऽ ऽ' असा मामंजींचा आवाज ऐकून मी वर पाहिले, ते पाटावरच आडवे झाले होते. मी चरकले ! जवळ जाऊन पहाते तो— हात पाय ताठ, मान एक बाजूला पडलेली ! मी रडवेली होऊन, सासूबाईंना हाक मारली— आणि काय सांगू पुढे ! सारं संपलं होतं. कुटुंबावर छत्र धरलेला तो वृक्ष उन्मळून पडला होता. सारा वाडा शोकसागरात बुडाला ! आणि माझ्या सुखाच्या पेल्यातील सुखही थेंबाथेंबाने आटू लागले. . . . . .

मी वाईट पायगुणाची—पांढऱ्या पायाची ठरले होते ! माझं सासर कर्मठ विचारांचं ! घरातील प्रत्येक व्यक्ती मामंजींच्या जुन्या आचारविचारांचं बाळकडू प्यालेली ! . . . . . . त्यातून सर्वांनाच अत्यंत प्रिय अशा व्यक्तीचे निधन. . . .पर्वताएवढ्या दु:खाची ती गोष्ट. खरं तर माझा त्यात काय दोष होता ! केवळ एक योगायोग. पण असा विवेक तिथे कोणालाच सुचणे शक्य नव्हते !—

सासूबाईंच्या समाचाराला येणाऱ्या बायका, मामंजींना देव मानणारे शेतातले वाटेकरी, घरातील सारी माणसं—साऱ्यांच्या विचित्र नजरांना तोंड देताना मी अपराध्यासारखी ओशाळे ! तसे उघड शब्द माझ्या कानावर येत नसत. पण त्या मुकेपणातच सारे भाव भरलेले ! साऱ्यांच्या नजरांतल्या कौतुकाच्या फुलांचे झालेले ते अंगार फुलासारखे हसत झेलले असते मी माझ्या पतीच्या गोड शब्दांनी ! पण. . . ते तर मला टाळायलाच बघत ! वडिलांच्या विरहाच्या गाढ दु:खापुढे त्यांना कुणाचीच पर्वा नव्हती. . . उलट जुन्या संस्कारांचा पगडा बसलेले त्यांचे भावनाशील मन. त्यांनी मलाच वाईट पायगुणाची ठरविल्यास काय नवल ! तो ताण सहन होत नव्हता......आईच्या कुशीत शिरून सारे दु:ख हलके करावे असे वाटे ! पण माहेरी जायचे कसे ! सर्वांना टाकून ?

आणि एक दिवस माझे आईवडील आले. सर्वांचे सांत्वन केल्यावर. . .ह्यांना भीतभीतच त्यांनी विचारले, "लीलाला नेऊ का ?" "न्या" हे कोरडेपणाने उत्तरले ! "जाऊ दे ब्याद ! तिच्या जाण्यायेण्याचे मला काय सुखदु:ख !" हाच भावार्थ होता त्या 'न्या'त ! सर्वांना त्या स्थितीत टाकून जाणे बरोबर नव्हते. पण मीही फार मोठी नव्हते. ते असह्य ओझे सहन करण्याची माझ्या मानेची कुवत नव्हती. शेवटी मी आईबरोबर गेले. ....

पण माझे दु:ख, माझी वेदना कुठे सोडत होती मला ! सावलीसारखा माझा पाठलाग करीत होती ती ! दिवस मुंगीच्या पावलांनी सरत होते; सासरची माणसंच काय प्रत्यक्ष 'हे'सुद्धा माझी दखल घेत नव्हते.

दिवाळी चार दिवसांवर आली होती. माझ्या मैत्रिणी आपापल्या पतिराजांना घेऊन माहेरी दिवाळसणाला आल्या होत्या. त्यांच्या तोंडून त्यांच्या सासरचं आणि

' ह्यां 'चं कौतूक ऐकून वाटायचं, मलाही देवाने असंच पंच पक्वान्नांचं ताट दिलं होतं ! पण माझ्या कर्माने ते लाथाडलं !—माझ्या पतीची माझ्यावर कायमची अप्रीती राहिली तर मी काय करू ? बाहेर दीपमाळा लागलेल्या पण माझ्या मनात शंकाकुशंकांचा अंधार ! ! ईश्वराला शरण जाण्याशिवाय मार्ग नव्हता. सर्वांची आवडती होता यावे म्हणून शिवामूठ वाहिली होतीच, पतीच्या प्रीतीसाठी आणि आयुष्यासाठी मंगळागौर पूजली होती. . .आता फळाची प्रतीक्षा करायची होती ! ती किती दिवस करायचीय कोण जाणे ! पण मला फार थांबावे लागले नाही. देवाने माझा धावा ऐकला. दोन महिन्यांनीच ह्यांचे पत्र आले, त्यात होते,' तू कधी येणार ?' त्या तीन शब्दात काय नव्हते ? मी त्या पत्राची खरेच पारायणे केली!

आता सारे छान चालले आहे ! सारे वैभव पायाशी आहे. साऱ्यांना मी हवीहवीशी वाटतेय ! पण मामंजींची पोकळी आणि पहिल्या वर्षातल्या जखमेचा तो वण भरून येत नाही. वैवाहिक जीवनाची सकाळ संपली आहे. मागे वळून पहाताना चालून आलेल्या वाटेतले बारीकसारीक खाचखळगे नाही दिसत, पण सुरुवातीचाच तो खड्डा मात्र स्पष्ट दिसतो ! जिथे ठेचाळून मी रक्तबंबाळ झाले होते, पण माझ्या मदतीला कोणी आले नव्हते. साऱ्या जखमा माझ्या मीच बांधल्या ! असे माझे लग्नानंतरचे पहिले वर्ष ! तेवढ्याच दृष्टीने अविस्मरणीय !

□

## ३१

## उर्मिला

□

शुभ मंगल सावधान ! शब्द उच्चारले जातात आणि दोन भिन्न जीव एका पवित्र, अतूट बंधनात बांधले जातात. कायमचे ! कितीतरी आशाआकांक्षा हृदयात बाळगून नववधू नवजीवनात प्रवेश करते. मीही ह्याला अपवाद नव्हते. वरातीच्या वेळी माझ्या वृद्ध पित्याने वात्सल्याने माझ्या पाठीवरून हात फिरवून मला सांगितलं होतं – " तुला शालू घातला नाही, दागिनेही एकदोनच घातले म्हणून तुझी निराशा झाली असेल; पण त्याचा परिणाम तुझ्या वागण्यावर होऊ देऊ नकोस. तुझे संस्कार चांगले आहेत. तेच दागिने आहेत तुझे ! सगळ्यांशी मिळून मिसळून वाग. लहानपणीच तुझी आई गेली म्हणून भरलं घर तुला पाहून दिलं आहे. सासूकडून तुला आईची माया लाभो ! " ते सांगत होते. आणि माझ्या डोळ्यांपुढून झरझर सरकत होता शाकुंतलातील तो चौथा अंक, ते वृद्ध, प्रेमळ कण्व व त्यांचा तो चार श्लोकांतला बहुमोल उपदेश !

भारावलेल्या मन:स्थितीतच मी गृहप्रवेश केला. दोन दिवसांनीच एक प्रसंग घडला. मी व माझे पती त्यांच्याच एका नातेवाइकाकडे गेलो होतो. यायला उशीर लागला आम्हांला. घरी आलो मात्र आणि मामंजींनी त्यांना खोलीत घेऊन दार लावले आणि वाटेल तसे संतापाने ते त्यांना बोलले ! का तर म्हणे जेवायला सर्वांना उशीर झाला म्हणून ! ह्या पूर्वीच माझ्या सावळेपणाचाही उपहास झाला होता; कारण आमच्या घरी केवळ गोरेपणा एवढीच सौंदर्याची कसोटी मानली जाते. पण ते सर्व मी गिळलं होतं. परंतु " त्यांचा " हा अपमान मला असह्य झाला.

बदलीची नोकरी, त्यामुळे बदलीच्या गावी बिऱ्हाड थाटणं भाग होतं. एकत्र कुटुंबाची मला हौस पण नाइलाज होता. माझी कल्पना होती की कधीही न पाहिलेल्या गावी मी जाणार व लग्न नुकतंच झालेलं तेव्हा सासूबाई बरोबर येतील काही दिवस. परंतु प्रत्यक्षात घडलं ते उलटच ! कुणीही आलं नाही एवढंच नव्हे तर भांडीकुंडी, अंथरूणपांघरूण, इतर संसाराला लागणाऱ्या वस्तूही आहेत की नाही याची चौकशीही झाली नाही. माझ्या वहिनीने काही पदार्थ, काही वस्तू दिल्या होत्या पण इकडून काहीच देणार नाहीत हे तिला तरी काय माहीत ? एकच समाधान होतं की इतर माणसं कशी का असेनात पण ह्यांच्या मनात मात्र माझ्याबद्दल प्रीती होती, स्नेह होता. एकीकडून दु:सह अशी उपेक्षा तर दुसरीकडून प्रेम असा ऊनसावलीचा खेळ माझ्या संसारात सतत चालू होता.

काल कुणासाठी थांबला आहे ? थोडयाच अवधीत मी माझ्या घरात अगदी रमून गेले. स्वत:च्या कष्टांवर व हिंमतीवर त्या घरातील प्रत्येक वस्तू मी उभी केली होती आणि म्हणूनच आनंदाबरोबर अभिमानाची, गौरवाची भावनाही माझ्या मनात होती.

हसत खेळत श्रावण आला. पहिली मंगळागौर माहेरी झाली. ह्याच वेळी एका नवीन जीवाची चाहूलही आमच्या संसारात ऐकू येऊ लागली होती. माझ्या वडिलांना खूप आनंद झाला. कौतुकाच्या वर्षावात मी न्हाऊन निघाले. " जरा जपूनच खेळ ग " अशा सूचना वडील देत होते आणि मधूनच " तुझी आई आज असती तर ! " असे उद्‌गार पाणावलेल्या डोळ्यांनी काढत होते आणि ते दृश्य मी डोळे भरून पहात होते कारण त्यांच्या सफल दांपत्यजीवनाचं प्रतिबिंब त्यात स्पष्ट उमटलं होतं.

सासरी खूप थाटात माझी मंगळागौर झाली. सासूबाईंनी अगदी खेळापासून सर्वात भाग घेतला. किती बरं वाटलं मला ! मी मागील सर्व विसरून खूप खेळले हसले. अशा हौसेमौजेत काल सरला व प्रसन्न मनाने मी माझ्या घरी परतले.

परंतु निर्भेळ सुख माझ्या नशिबातच नव्हते. प्रथम अपत्याच्या आगमनाचे वेळी पतीलाही खूप आनंद होतो, अशी माझी कल्पना होती. पण 'ह्यांनी' मात्र तोंड वाकडं केलं कारण एवढ्या लवकर त्यांना मूल नको होतं. कदाचित त्यांचे विचार

बरोबर असतील पण होणारं होऊन गेल्यावर ते व्यक्त न करणेच चांगले नाही का? पण तेवढा संयम त्यांना राहिला नाही. अर्थात् पुढे त्यांनी माझे सर्व डोहाळे पुरविले पण पहिल्या प्रहाराची जखम कधीच भरून निघाली नाही. माझ्यातल्या पत्नीने त्यांना क्षमा केली पण माझ्यातल्या मातेने मात्र त्यांना कधीच क्षमा केली नाही.

डोहाळचांचा मला खूपच त्रास झाला. त्यांतच माझ्या बिऱ्हाडी पाणी खालून वर भरावं लागे. गडीमाणूस न मिळाल्यामुळे आम्हीच भरत असू. एकदा दुपारी पाणी भरताना मी पडले. त्रास झाला नाही. पण मी खूप घाबरले होते. त्याच वेळी माझे वडीलही बरेच आजारी होते. "खर्च सर्व मी देईन पण बाळंतपण तुम्ही कराल का?" असं वडिलांनी विचारलं कारण घरात फक्त वहिनी व तीही माझ्याच वयाची व तिच्याही पदरात एक लहान मूल! पण 'पहिलं बाळंतपण माहेरीच करायचं असतं!' असा जबाब आला. मी त्या लोकांचं काय केलं होतं कोण जाणे पण लग्नानंतर ३–४ वर्षांत माझ्याकडे कुणी आलंही नाही. माया, प्रेम ह्या गोष्टी सोडल्या तरी कर्तव्य म्हणून काही आहेच ना! ह्या उलट वडिलांचे विचार किती सोज्ज्वल होते. माझ्याकडे पाहिले की त्यांचे पितृहृदय करुणेने, वात्सल्याने क्वचित् क्रोधाने थरकापून उठे. पण दुसऱ्याच क्षणी त्यांच्यातील तत्त्वज्ञ जागा होई. आणि ते म्हणत– "तू तुझे कर्तव्य विसरू नकोस. तू वाईट वागू नकोस. कुणाजवळ नाही तरी परमेश्वराच्या दरबारी तुझं कौतुक होईल. बेटा! माणसाने देऊन काही पुरत नाही गे! मागावं ते त्याच्याजवळच आणि आभाळ फाडूनही द्यावंही त्यानेच!"

लग्नाला वर्ष व्हायच्या आतच साडेसात पौंडांच्या काळचाभोर डोळ्यांच्या व दाट जावळाच्या सुनंदेचा जन्म झाला. त्यांना खूपच आवडली ती! वडिलांनी आजारी असूनही थाटात बारसं केलं. मुलगीच का? ही सासरची प्रतिक्रिया! सासरची सर्व माणसं पदवीविभूषित, पण सुशिक्षणाने येणारे ते संस्कार, ते विशाल हृदय कुठे होते? पण त्या वेळी मातृत्वाच्या असीम आनंदात क्षुद्र कुरकुरीकडे लक्ष द्यायला मला वेळच नव्हता.

आज त्या सर्व प्रसंगांना ९–१० वर्षं लोटली आहेत. आज मी सुखात आहे. माझ्या पित्याला मात्र मृत्यूने दूरदूर नेलं आहे. काळामुळे पूर्वीच्या प्रसंगातील कटुतेची धार बोथट झाली आहे पण एक खरं. परक्या घरातून आलेल्या मुलीला माया लावावी लागते. मीही एक सामान्य स्त्री होते. माझ्याही काही साध्यासुध्या अपेक्षा होत्या. पण त्यांना धक्केच मिळत गेले. आज मी एवढंच म्हणेन की, जे दुःख व अपमान मी सहन केला तो कुणालाही सहन करावा लागू नये. कारण पुढे कितीही सुख मिळालं तरी मुळातच खुडलेली कळी पूर्ण विकसित होत नाही. संसारातील सुखं सामान्य व नाशिवंत आहेत हे खरं असलं तरी माणसाचं व्यक्तिमत्त्व

संपन्न व्हायला ती नितान्त आवश्यक आहेत. आणि प्रत्येक व्यक्ती ही सामान्यतः सामान्यच असते.

□

३२

## सौ. मीरा दिनकर

□

एक जुनी आठवण. दहा बारा वर्षांची. मनात जशीच्या तशी घर बांधून आहे. तिला मी कधी जतन केली नाही. पण सावलीसारखी नेहमी मला चिटकून असते. लग्नानंतरचे पहिले वर्ष एका वेगळ्याच परिस्थितीत गेले. ते मोकळ्या मनाने सांगणे सुद्धा थोडे संकुचित वाटते. काही जण म्हणतील 'ही बाई काय सांगते तरी काय ?' खरं मला जो अनुभव आला त्यात कुठं स्त्री व्यथा लपली असेल तर ? इतरांना ती बोधप्रद होईल. काही त्यातून शिकता येईल. समाज एकमेकांच्या अनुभवातून सूज्ञ होत असतो. केवळ आपणच अनुभव घेऊन सुधारायचे म्हटले तर सबंध आयुष्य पुरणार नाही. आणि काळाच्या मानाने आपले आयुष्य झाडावरून गळणाऱ्या पानाइतके अल्प.

नेहमीप्रमाणे मी शाळेतून आले. घरी चार पाच परकी माणसे बसलेली. मी आत आल्यावर आई म्हणाली, " मीरा, चार पाच कप चहा करून बाहेर दे. " नेहमीच्या कामातला एक भाग. निःसंकोचपणे चहा बाहेर दिला. सगळ्यांनी माझ्याकडे टका टका पाहिले. मला त्यांचे पहाणे विचित्र वाटले. यापूर्वी आमचे घरी माणसे येत होती. त्यांनी असे कधी पाहिले नाही. थोड्या वेळाने माझी बहीण मला म्हणाली, ' अग ताई तुला हे पाहुणे बघायला आलेत. ' अंगावर पाल पडावी तशी मी दचकले. सोळा वर्षांचे माझे वय. हायस्कुलात शिकणारी विद्यार्थिनी. अभ्यास नि खेळ. खेळात कधी पुण्या-मुंबईला मिळविलेले प्रावीण्य. तर कधी म्हैसूरला. एका फुलपरीसारखे जीवन. कशाकशाची काळजी नाही.

मी पसंत पडले. इतक्यात लग्न नको म्हणून मी सांगितले. पण माझे ऐकतो कोण. रडून रडून डोळे मात्र सुजले. ज्यांना मी स्वप्नातही कधी पाहिले नव्हते, विचारात कधी घेतले नव्हते त्यांच्या बरोबर लग्नाच्या होमवेदीवर सात पावले टाकली. धर्मसंस्काराप्रमाणे आजन्म बांधून घेतले. निरोप देताना सगळ्या मैत्रिणी भोवती जमल्या. मी सामना जिंकून आल्यावर जमाव्यात अशा. सगळ्यांची अंतःकरणे दाटली होती. डोळे डबडबले होते. स्टेशनवर गार्डचा हिरवा बावटा खाली पडला होता अन् माझ्या मैत्रिणींचे हाताचे बावटे वर फडफडत होते.

गाडी अदृश्य होईतो मी पहात होते. सगळ्यांनी एका अपरिचित व्यक्तीच्या पाठीशी बांधून माझी रवानगी केली. विकलेल्या जनावरासारखी. स्त्रियात आणि जनावरात काय फरक ! या विचारानं मन अस्वस्थ झाले. पण या विचाराचा उपयोग काय ? जे टाळता येत नाही त्याचा स्वीकार करणं भाग होतं. शेवटचं रेल्वे स्टेशन संपलं. एका मोटारीत बसलो. दीड तास मोटारीचा रस्ता संपला. पुन्हा तासभर बैलगाडीचा सुरू झाला. अंग आदळत आपटत संध्याकाळी खेड्यात पोचलो. हेच म्हणे माझ्या सासरचे गाव. घरे पडलेली. रस्ते नसलेलं वेडं,वाकडं गाव बघून माझ्या काळजात चर्र झालं. घरात गेलो. लहान घर. त्यात खंडीभर माणसं. आधीच बसा उठायची अडचण त्यात माझी भर. शहरच्या मोकळ्या वातावरणात वाढलेलं शरीर अवघडून गेलं. सांगणार तरी कुणाला. पतीचा नवा सहवास. त्यात नववधूने पुरुषाशी बोलायचे नाही हा घरचा रिवाज. सकाळी सहज अंगणात आले. लगेच लहान नणंद म्हणाली, " वैनी या घरच्या बायकांनी उंबऱ्याच्या बाहेर पडायचे नाही. " मी आत झाले. दिवसा झोपायचे नाही. बसून तर दिवस मावळायचा नाही. अधूनमधून परस्त्रिया यायच्या. मला न्याहाळून बघायच्या. माझा अद्ययावत पोशाख, बोलण्यातले शुद्ध उच्चार. त्यांच्या पेक्षा मी अलग. मध्ये कसली तरी भित. अल्पावधीत मला कळून आले बाह्य जगाशी आपला संबंध तुटलेला आहे. या घरात मी बंदिस्त आहे. हे घर एवढेच माझे विश्व. असेल ते रांधून घालणे माझे कर्म. फावल्या वेळात जिथे पत्र लिहायला चोरी तिथे वाचायला कुठले. घरची स्त्री कोणी साक्षर नाही. शिकलेली स्त्री म्हणजे बिघडलेली, हा लोकापवाद. घटकाभर पुरुषांशी बोलत बसावे म्हटले तर ते शक्य नव्हते. बायका नाके डोळे मोडतात. सासुरवाशी मुलींनी नवऱ्याशी बोलायचे नाही. करणी धरणी केल्याशिवाय नवरा म्हणायचा नाही. मी थोडी उघडउघड बोलू लागले. साऱ्या घराने आकांत केला. एकीने तर सांगितले "असले आम्हाला परवडायचे नाही. स्त्रीने आपल्या पायरीने राहिले पाहिजे. शहरातले खेड्यात नाही चालायचे. आम्हाला पाच पाच पोरे झाली खरं, अजून नवऱ्याचे तोंड बघितले पण नाही. " पुढे हे खरे असल्याचे मला आढळून आले. खेड्यात स्त्री-पुरुषांचा एकत्र असा बिछाना सहसा असत नाही. एक तर घरे दाटकी व एकत्र कुटुंबपद्धतीमुळे घरात माणसे फार. तेव्हा महिन्यातून एखादे दिवशी नवऱ्याने अंधाराचा आधार घेऊन कामापुरते श्वास रोखून चुपचाप यायचे, नि जायचे. काही बोलावे तर माणसे जागी होतील ही धास्ती.

महिन्यानंतर माझा भाऊ बोलवायला आला. त्याला पाण्याचा तांब्यादेखील मला देता आला नाही. घरी आलेल्या पाहुण्याची उसाभर पुरुषांनी करायची असते. त्या वेळी मला लावून दिलं नाही. पुढे महिन्याभराने लावून दिले. आणि महिना होतो न होतो तो परत बोलावणे आले. माझ्या ढासळलेल्या शरीरावरून आईने

ओळखले होते. पण सगळे ठीक असल्याचे मी तिला सांगितले होते. माझ्या मैत्रिणी मला शाळेचा सामन्यांचा अहवाल सांगत होत्या. माझी उणीव त्यांना जाणवत होती. पण जे एकदा हरवले त्याचा हव्यास धरण्यात काय फायदा.

दिवस हळू हळू जात होते. सकाळी लवकर उठायचे. कुठेतरी आडोशाला शौचविधी उरकायचा. अन् घरकामाला लागायचे. स्वतःच्या अंगची स्वच्छता ही गौण बाब. घरकाम आटपून झोपायला अकरा सहज होत. पतीला फक्त नजरेने बघायचे. झोपताना स्त्रियांनी आत झोपायचे अन् पुरुषांनी बाहेर. रात्री केव्हातरी पतीची भेट. तेवढ्याच त्याच्या स्पर्शाने साऱ्या अंगभर जाईजुई फुलत. परंतु लगेच त्या खाली गळून पडत. पुन्हा रात्रभर मला झोप यायची नाही. कुठंतरी दूरवर भुंकणाऱ्या कुत्र्यांचे आवाज ऐकू येत. मन अधिक विषण्णतेने भरून येई. अशा अवस्थेत एक दिवस मला कळून आले आपल्याला दिवस गेलेत. मी अधिक अस्वस्थ झाले. बायका मला नाके मोडू लागल्या. त्यांच्या मते मी स्वैराचारी. नवऱ्याला भुरळ पाडली. अशाच विमनस्क अवस्थेत लग्नानंतरचे माझे पहिले वर्ष संपून गेले. मी आई बनले. अनेक ग्रामीण स्त्रियांसारखी दुःखाची सवय झाली. ते पचनी पाडले. आता दुःखाच्या वेदनाही मनाला बोचत नाहीत इतके ते बोथट झाले. धार नसलेल्या विळीगत.

□

## ३३

## सौ. प्रभा बैकर

□

आमचे लग्न म्हणजे काही प्रेमविवाह झाला नव्हता. चारचौघांप्रमाणे मुलगी 'दाखवण्याचा', 'पसंत' करण्याचा वगैरे प्रोग्रॅम झाले. आणि एक दिवस आमच्या लग्नाचा बार उडाला. लग्नातले ते विधी, हाताला हात लावणे, सात पावले बरोबरीने चालणे वगैरे सारेच मला विचित्र वाटत होते. त्या वेळी मला नुकतेच १८ वे संपून १९ वे लागले होते. 'सोळावं वरिस धोक्याचं, ग सोळावं वरिस धोक्याचं' च्या टप्प्यात नुकताच कुठे प्रवेश झाला होता. निद्रादेवीच्या राज्यात चंदेरी नि अति मोहक स्वप्नं रंगवायला सुरुवात झाली होती. तोच स्वप्नातला 'राजकुमार' अचानक पृथ्वीवर उपस्थित झाला, आणि आमचे लग्न झाले. त्यामुळे लग्न म्हणजे काय ? ते कशाकरिता करतात ? करावेच लागते का ? जन्मभर आईबाबांकडे राहिलं तर काय बिघडतं ? वगैरे प्रश्नांची उत्तरे 'अलिबाबा चाळीसचोर'च्या गुहेत असणाऱ्या संपत्तिराशीप्रमाणे मला अज्ञात होती. लग्न म्हणजे फक्त नवेनवे कपडे, दागिने घालून

नवऱ्याबरोबर मिरवायचे एवढाच अर्थ मला माहीत होता. आता माझ्या अज्ञानाचे मला हसूच येते. मी सासरी आल्यानंतरची गोष्ट बर का. मला पोहोचवायला आलेली आई परत जाताना सासूबाईंना विचारीत होती, "परवा पाठवाल ना परत ? मी प्रकाशला पाठवीन घ्यायला." सासूबाईंनी काही उत्तर देण्याच्या आतच रावसाहेब ( म्हणजे आमचे हे ) उद्गारले, "छे छे, मी महिनाभर रजा काढली आहे, रजा संपली की, मी गावाला जाईन अन् मगच तिलाही पाठवून देईन." हे ऐकताच माझ्या डोळ्यातून ज्या गंगायमुना सुरू झाल्या त्या काही केल्या थांबेनात. एखाद्या लहानशा छोकरीची समजूत घालताना, "रडू नको हं बाळ, इतक्यात नाही तुला सासरी पाठवणार बरं" असे म्हणतो ना त्या प्रसंगातले गांभीर्य माझ्या चांगलेच लक्षात आले. कुणाशीच फारशी ओळख नसल्यामुळे मी न बोलता जे दिसेल ते काम, "काय आळशी मुलगी आहे ? साधं काम पडलेले देखील दिसत नाही" असा शिक्कामोर्तब होऊ नये म्हणून, थकलेली असताना देखील करत राही. त्यामुळे 'सूनबाई अगदी चलाख अन् कामसू आहे हं ! ' असा सासूबाईंनी निर्वाळा दिला. सर्व पाहुणे मंडळी पण खुष होती. छोटे छोटे दीर व नणंदांनी तर जणू काही बॉडीगार्डची भूमिका स्वखुषीने पत्करली होती.

फिरायला जायचे नव्या वहिनीबरोबर, निजायचे तर वहिनीजवळ, जेवायचे वहिनीबरोबरच. साऱ्या गोष्टी वहिनीच्याच बरोबर झाल्या पाहिजेत असे हट्ट होऊ लागले आणि मीही ते हट्ट पुरवायला तत्पर असल्यामुळे बाबा लोकांनी, "वहिनीशी गट्टी आता, तुला दोन थापा, तुला दोन थापा तिला साखरेचा पापा" या गाण्याप्रमाणे वागून दादासाहेबांना अंगठा दाखवण्याचे काम छान बजावले.

बिचारे हे ! महिन्यातली पहिली आठ दिवसांची रजा तर लग्नाआधीच संपली होती. आता उरलेली पण या पाहुणेमंडळींमुळे संपेल की काय या भीतीने निराश दिसायला लागले. ड्यूटीवर हजर होण्यापूर्वी एकदा तरी 'चान्स' मिळेल की नाही या शंकेने हैराण झाले. त्यातच मी हक्काची रजा घेतल्यामुळे ऋतुशांती ४ दिवस पुढे ढकलली गेली. मग मात्र एकेका पाहुण्याने आपापले चंबुगबाळे आवरते घेतले. हा प्रसंग केव्हा ना केव्हा तरी येणारच हे माझ्या हितचिंतक मैत्रिणींनी आधीच सांगून ठेवल्यामुळे मी मनातून खूऽऽप धास्तावले होते. मला वाटायचं, आता हा 'दादटल्या' माहेरी न्यायला म्हणून का येत नाही ? कुणास ठाऊक ? असाच आहे मेला छळवादी ! त्या दिवशी त्याला शिव्यांची लाखोली वाहिली.

पण म्हणून अविरत फिरणारे सृष्टीचे चक्र थोडेच थांबणार होते ? हळहळू जगाच्या रंगभूमीवरून विंगमध्ये प्रवेश करायला सूर्यकिरणांनी सुरुवात केली. अन् साऱ्या सृष्टीवर संध्याराणीचा अंमल सुरू झाला. त्या रात्री. . .त्या रात्री मी माझी उरलेच नाही. सगळीकडे सोनेरी प्रकाश असणाऱ्या मदनाच्या राज्यात माझा प्रवेश झाला. लग्नानंतरच्या पहिल्या काही रात्री माझ्या मनावर जणू

कोरल्या गेल्या आहेत. अगदी अप्सरांच्या रेखीव आकृत्यांसारख्या ! चांदण्याचे पैंजण वाजवीत आमच्या रंगमहालात आलेल्या त्या रात्रींनी अनेक अगणित मधुघट भरून आणले. त्या रात्री म्हणजे सुंदर सरोवरे होती. प्रणयक्रीडांच्या विविधरंगी कमळांनी फुललेली—त्या स्वर्गसुखात मी अगदी डुंबून गेले होते. प्रेमळ मामंजी, हौशी सासूबाई, लबाड पण हुषार दीर, अन् थट्टेखोर नणंदा यांच्याकडून होणाऱ्या प्रेमामृतात मी मनसोक्त न्हात होते. त्यातच सक्रांत, वटपौर्णिमा, आणि श्रावणातल्या मंगळागौरींनी कानात सांगितलेले गोडगुपित ऐकता ऐकता दिवाळीची चाहूल ऐकू आली. एका पाठोपाठ एक येणाऱ्या सणांमुळे सतत काही ना काही खरेदी होई. या सणाला साडी तर त्या सणाला मोत्याचे तोडे. एक माहेरून तर एक सासरहून. यामुळे मी स्वप्नात तर नाही ना अशी वेडी शंका मनात तरळून जाई. परमेश्वरा, या माझ्या सुखी संसाराला कुणाची दृष्ट लागू देऊ नको. 'जीवनात ही घडी अशीच राहू दे' हे भावगीत मनात आळवत, भविष्यकाळातली गोड स्वप्ने पहात पहात मी निद्राधीन होई. आणि अशा मऊ मखमलीच्या पायघड्यांवरून चालता चालता ६ महिने कापराच्या वडीप्रमाणे कुठे उडून गेले त्याचा पत्ताच लागला नाही. एक दिवस सकाळी मी उठले ती घेरी येत येतच. कशीबशी झोकांड्या खात मोरीशी गेले तोच भडाभड वांत्या झाल्या. नंतर माझी शुद्धच हरपली. मी शुद्धीवर आले ते "हार्दिक अभिनंदन हं मिस्टर जोशी" या फॅमिली डॉक्टरांच्या वाक्यामृताचे पान करीतच. मला दिवस गेले होते. सासूबाईंचा हर्ष तर गगनात मावेना. हरतऱ्हेचे पदार्थ करून मला खाऊ घालण्याचा त्यांनी सपाटा लावला. आणि ह्यांना तर मला कुठे ठेवू नि कुठे नको असे झाले होते. सर्वांनी मला फुलासारखी जपली. आणि अखेर. . .अखेर १५ ऑगस्टला विलासरावांनी अवतार घेतला. तेव्हापासून मला अशक्तपणाचे वाणच मिळाले जणू.

पहिले वहिले कौतुक करायला तत्पर असणाऱ्या सासूबाई आता थकल्या आहेत. मामंजींना चालतांना काठीचा आधार घ्यावा लागतो. दृष्टी पण अधू झाली आहे. धाकट्या दीराचे विश्वच वेगळे आहे. नणंदा आपापली संसारबाग फुलवण्यात रमल्या आहेत. आणि या महागाईच्या दिवसात हातातोंडाची गाठ घालताना आम्ही जिकिरीस आलो आहोत. 'दोघांनीच' फिरायला जाणे अन् सिनेमा या गोष्टी तर आम्ही विसरलोच आहोत. 'तुझी प्रत्येक इच्छा मी फुलासारखी झेलीन व पूर्ण करीन,' असे प्रतिपादणारे हे कानीकपाळी ओरडून सुद्धा ऐकलं न ऐकल्यासारखंच करतात. आणि उठल्यासुटल्या, बायकांना मुळी डोकंच नसत, बायका मूर्ख असतात, बायका नवऱ्याला अगदी बैल समजतात, दिवसभर नोकरी करावी, दमन भागून घरी यावं, चहा पिऊन जरा वेळ होत नाही तो लगेच कारट्याला पुढं करतात, असली निरर्थक लेक्चर्स देत असतात. वास्तविक दिवसभर घरात राहून मुलांना, अन् त्यांचं खेळणं, रडणं, 'शी' आवरता आवरता कामाचा रामरगाडा

ओढणाऱ्या मला, कंटाळा आलेला असतो. पण त्याची त्यांना जाणीवच नसते. निदान असली तरी दाखवण्याची तयारी नसते. त्यामुळे हे चित्र अन ते चित्र, जमीन–अस्मानाचा फरक जाणवतो. तसा ह्यांनासुद्धा मधून मधून उत्साहाचा 'अटॅक' येतो. अगदीच नाही असं नाही. पण...पहिल्या वर्षासारिखा नाही. आमची अगदी कडाक्याची भांडणे वगैरे होत असतील असा तुमचा गैरसमज झाला असेल, पण तसे नव्हे बर का ! आम्ही दोघंही जण आपापल्या परीने एकमेकांना खूष ठेवण्याचा प्रयत्न करतो. आमच्या संसारवेलीवर उमललेल्या विलास अन् विनया या दोन फुलांच्या गुजगोष्टी ऐकता ऐकता आमचा काल चांगला व्यतीत होतो. पण हे सारं असलं तरी काही वेळा जीवन अळणी वाटतं. पहिल वर्ष ते पहिलंच वर्ष. रेडिओवर सुधीर फडके, 'तोच चंद्रमा नभात' गायला लागले की आम्ही दोघं एकमेकांना हरवून बसतो.

नजरेत नजर पकडून हे विचारतात "किती वास्तवता आहे या गाण्यात ?" नजरेतच माझे उत्तर मिळते. अन् मी पुन्हा उत्साहाचा वसा मिळवण्यासाठी बेडरूममधल्या छपरी पलंगाकडे नजर वळवते. त्या जोडीच्या उशा, त्यावरची नाजुक डिझाईन्स, अन् चोचीत चोच घालून बसलेले चिमणा-चिमणी, आम्हाला लग्नानंतरच्या १ ल्या वर्षात नेऊन सोडतात. अन् आम्ही दोघे––पुन्हा पुन्हा त्या स्मृतींचे कॅडबॅरीज चॉकलेट चघळत चघळत, गोड धुंदीत वावरत निद्रादेवीच्या राज्यात प्रवेश करतो.

□

३४

## सौ. सुमित्रा कुलकर्णी

□

बेगमपेठेच्या 'जहागिरदार्स कॉलेज'च्या आवारात संध्याकाळी एका प्रशस्त बंगल्यापुढं आमची टॅक्सी उभी राहिली. दोन ट्रंका आणि दोन वळकट्या, या ऐश्वर्यानिशी आम्ही 'गृहप्रवेश' केला. 'उंबरठ्यावरचं माप'च काय पण महाराष्ट्राचाच 'उंबरठा' ओलांडून आम्हा दोघांना दूर एका अनोळखी गावात यावं लागलं. पुणं सोडून हैद्राबादला आम्ही आलो होतो. पण त्या प्रशस्त बंगल्यात येताच आम्हांला आमचं विश्व गवसलं होतं. सारा शीण पार निघून गेला होता !

रात्र उलटली आणि दिवसा-उजेडी मला माझा संसार अगदी केविलवाणा दिसू लागला. एका कोपऱ्यात सारे सामान दीनवाणे पडले होते; पण त्याकडे पाहून 'हे' मला 'गृहलक्ष्मी' 'गृहलक्ष्मी' म्हणून मुद्दाम डिवचत होते. मोठ्या कष्टानं

आमच्या लग्नाला ‘ ह्यांच्या ’ घरच्या मंडळींनी संमती दिली होती; आणि ह्याच आनंदात ते चूर होते. पण मला मात्र माझा रिकामा बंगला हिणवीत आहे असं वाटे. आजूबाजूला सर्व ख्रिश्चन आणि मुसलमान कुटुंबंच होती, सारे अ-मराठी भाषिक. त्यामुळं आल्यागेल्याचा राबता, आणि फाजील चौकश्यांचा उपद्रव आम्हाला होत नसे. आमच्या घरचे आम्ही ‘ राजे ’ होतो. पण आमच्या ओसाड राज्यातील दौलत म्हणजे स्टोव्ह, आणि एक दोन खिरीची पातेली याखेरीज काही नव्हतं ! धान्य आणून ठेवायचं कशात ? स्वयंपाक करायचा कसा ? एक ना दोन, साऱ्याच विवंचना माझ्यापुढं दत्त म्हणून उभ्या होत्या ! ही स्वारी मात्र शांत होती ! कॉलेजचा गडी चहाचा ट्रे घेऊन जेव्हा आला, तेव्हा त्यांच्या शांतीचं रहस्य उलगडलं. दुपारचं जेवणही कॉलेजच्या ‘ मेस ’ मधून आलं ! आणि आमचं पहिलं ‘ सहभोजन ’ झालं. मुसलमानी ‘ पुलाव ’ आणि ‘ रोटी ’ खाताना मला ‘ लक्ष्मीबाई टिळकां ’ची आठवण झाली ! पहिला दिवस निभावला. पण पुढं काय ? संसार उभा करायला जवळ पैसा नव्हता ! एक दोन महिने आमचा संसार वाण्याच्या कागदी पुड्यात तसाच बांधलेला होता !

घर मोकळं होतं, पण आमची मनं आनंदानं भरली होती; डोक्यात अनेक कल्पनांची गर्दी उठे. आम्ही बाग करायचं ठरविलं. त्यांनी हाती कुदळ घेतली. मी फावडे घेतले. माझा ‘ श्रमलक्ष्मी ’चा अवतार त्यांना फार आवडला. बागेचं प्लॅनिंग केलं, आणि कॉलेजमधून वेगवेगळ्या फुलझाडांची कलमं आणली; भाजी-पाल्याचे बी आणलं. वृक्षारोपण तर झालं; स्वहस्ते ! निसर्गही आमच्यात सामील झाला. आषाढमेघ बरसू लागले. दिवसामासानं बाग वाढू लागली, फुलू लागली. सगळ्या वातावरणात फुलांचा संमिश्र सुवास दरवळून गेला. त्या फुलांकडं पाहताना साऱ्या विश्वाचं सुख ह्या आपल्या घरकुलात साठवलं आहे, असं मला वाटे.

आणि श्रावण आला. श्रावण म्हणजे आम्हा नवोढांचा सौभाग्य मास ! माझ्या मनात हर्ष दाटून आला. थाटानं मंगळागौर करावी असं मला वाटलं. पण मंगळागौरीला मुली नाहीत, गावात कुणी ओळखीचं नाही. ना सासरची मंडळी, ना माहेरची ! माझं मन फार खट्टू झालं, त्यांना हे फार फार जाणवलं, पण ते दिसू नये म्हणून हसत हसत ते म्हणाले, ‘ अग, घरातल्या चार भिंतीत कसली मंगळागौर पुजतेस ? निसर्गात चल, मंगळागौर म्हणजे साक्षात् निसर्ग देवता ! सोळा पत्री कशाला ? सोळा सहस्रदळे पाहा, आणि वाहा ना ! ” आणि खरोखरच त्यांनी मला तशा पावसात एका मंगळवारी ‘ टॅंकबंड ’ला नेले. तेथील तो तुडुंब भरलेला तलाव आणि बाजूची वनश्री पाहिली, निळ्या मंडपाखाली केवढ्या उत्साहानं हा समारंभ पार पडत होता ! मन तृप्त झालं.

पण घरी आल्यावर माझ्या बायकी मनात ती निर्गुण निराकार पूजा नीट

स्थिरावेना. मंगळागौरीचा घाट घातल्याशिवाय काही खरं वाटे ना. गावातील एका मैत्रिणीच्या घरची मंडळी आणि आम्ही मिळून समारंभ साजरा केला. माझ्या घरी, माझी मंगळागौर, माझ्या बागेतल्या फुलांनी जेव्हा ' झाकून ' गेली, तेव्हा कसं बरं वाटलं ! हेही खूष होते, कारण या पुरुषाला रात्री ' जागरणात ' मिसळणाची आम्ही संधी दिली. त्यांनीही नकला करून आणि उखाणे घेऊन सर्वांस खूप हसविले. अवतीभवती मराठी जाणकार नसल्याने भरपूर स्वातंत्र्य उपभोगले.

बेगमपेठ म्हणजे केवळ बडयांची वस्ती ! ' हे ' तेथील जहागिरदार्स कॉलेज-मध्ये मराठीचे लेक्चरर म्हणून लागलेले ! शेक्सपियरसुद्धा मराठीतून शिकवावा हे यांचं पुण्यातलं मत पुण्यातच राहिलं. उलट अ-मराठी भाषिक मुलांना इंग्रजीतून मराठी शिकविण्याचं त्यांच्या नशिबी आलं. आणि तेही ' ग-म-भ-न ! ' याचे दुःख त्यांना होई, पण ते लगेच म्हणत, " बस्स ! आता याहून कठोर शिक्षा होणे शक्य नाही. आता मी एकदम पुण्यात किंवा मुंबईत प्रोफेसरच होणार ! " ते त्यांचं ध्येय होतं.

आणि तेवढ्यात निसर्गाची एक नवी चाहूल मला लागली. अगदी चोरटी, अगदी नाजुक, हवीहवीशी ! त्यांना हे कळताच ते एकदम गंभीर झाले आणि म्हणाले, " या विजनातही या ' वसुंधरे ' ची मी नीट जपणूक करीन ! " आमच्याकडे माणूसबळ नव्हतं, की पैशाचंही बळ नव्हतं ! निम्मा पगार आम्हास पुण्यास सासूबाईकडे पाठवावा लागे. पहिले दोन महिने मला उलटयांचा अतिशय त्रास झाला. पोटात अन्नपाणी ठरेना ! याच गडबडीत दसरा आला. गेला. पहिला दिवाळसणही अंथरुणात लोळूनच काढावा लागला. मला फार फार वाईट वाटलं. पण पुढं मला थोडं बरं वाटताच मी उठले, रांगोळी काढली आणि यांना ओवाळलं. त्या वेळी अशा स्निग्धतेने त्यांनी माझ्याकडं पाहिलं की निरांजनातल्या ज्योतीच त्यांच्या नेत्रात जणू उतरल्या होत्या ! तीच माझी ओवाळणी ! सारं सारं काही !

आमचा संक्रातीचा सण तर अचानकपणे सुंदररीत्या पार पडला. माझ्या आईनं पोस्ट-पार्सलनं सगळा सण पाठवून दिला होता. त्या दिवशी हलव्याच्या दागिन्याशिवाय दुसरा विषय नव्हता. सारे दागिने त्यांनी केवळ माझ्यासाठी घालून घेतले. हार, अंगठी, घडयाळ सारं काही ! आणि 'गुच्छा 'चा तर पुन्हा पुन्हा खोटा खोटा वास घेत होते ! मीही सर्व दागिने घातले, आणि पुन्हा एकदा लग्नसोहळा अनुभविला. पाच घरी जाऊन वाणवसा करता आला नाही, याचं मात्र मला वाईट वाटायचं ते वाटलं !

संक्रात झाल्यावर आईकडे ' दीर्घ मुदती 'च्या रजेवर जाणं मला आवश्यकच होतं. आठ दिवसात मी ह्यांची सारी तयारी करून निघाले. पाय निघत नव्हते,

सर्व ठिकाणी जीव गुंतला होता. ह्या वास्तूचे आणि त्यात राहाणाऱ्या 'जीवाचे' दर्शन परत होईल की नाही, ही अनामिक भीती एकसारखी भेडसावीत होती. गाडी सुटली तरी माझे डोळे सारखे भरून येत होते. शेजारी एक वयस्कर बाई बसली होती; तिने विचारले, " क्या वह तुम्हारा बडा भाई है क्या ? उसको छोडकर ससुराल को जाती है क्या ?" मला हसू आलं, हसण्याचे कारण कळल्यावर तिलाही कौतुक वाटलं, तीही हसली. माहेरी आल्यावर डोहाळजेवणं झोडण्यात दोन महिने कधी संपले ते समजलेच नाही. ह्यांची काव्यमय पत्रं सतत येत असत, त्या पत्रासाठी तरी विरह आवश्यक आहे असं नेहमी वाटे. तिकडे ते अभ्यासाचा डोंगर हलवीत होते. आणि पत्रातून माझ्याशी हृदयसंवाद करीत होते. मीही इकडं एस्. एस्.सी. ची परीक्षा दिली होती.

दोन महिन्यांनी परीक्षेसाठी ते पुण्यास आले, तेव्हा माहेरी मी माझ्या बाळीला कुशीत घेऊन झोपले होते. माझ्याकडे पहात ते म्हणाले, " मातृत्व जितकं प्रौढ दिसतं, तितकंच ते सुंदरही दिसतं ! " पण क्षणातच त्यांच्यातला हा तत्त्ववेत्ता त्यांनी झटकला, आणि ' अमावास्येच्या कडेवर चंद्रकोर ' म्हणून माझी थट्टा करायला सुरुवात केली. मी हलकेच त्यांना म्हटलं, " ज्ञानेशा, तुमचे वामन मल्हार इथं उपयोगाचे नाहीत. ' पौर्णिमेच्या पोटी शशिबिंब ' असं काहीतरी म्हणा !" ते मनमोकळेपणानं हसले. आणि देवस्वरूप बाळीचा आशीर्वाद घेऊन परीक्षेस निघून गेले.

त्यांच्या परीक्षेनंतर मुलीचं बारसं केलं. त्या वेळी सारी माणसं आली होती; माझ्यावरचा राग टाकून देऊन सासूबाईही आल्या होत्या. मला अगदी धन्य धन्य झालं ! आम्हाला जे करता आलं नाही ते आमच्या ' शशिकलेनं, केलं होतं ! अबोलपणे, केवळ हसून !

बारा वर्षांपूर्वीची ही कहाणी, कशी काल घडल्यासारखी वाटते ! आज आता कशास काही उणं नाही. हे मुंबईच्या एका मोठ्या कॉलेजात नामांकित प्राध्यापक आहेत. राहाण्यास उत्तमपैकी ब्लॉक आहे. घर सुखासमाधानांनी भरलं आहे. दारी जाईचा मांडव आहे. सासर-माहेरची माणसं कौतुक करीत आहेत. मीही आज पदवीधर झाले आहे. माझी शशिकला कलेकलेने वाढत आहे. पण माझ्या मनातील बेगमपेठ आहे तशी ताजी आहे. मध्येच ती जागी होते. मला आपल्या बागेत, तेथील ' ॲव्हेन्यू 'मध्ये घेऊन जाते; आणि मंद चांदण्यात रात्री विहार करताना उमटलेली आमची ती पावलं दाखवून मंद स्मित करते !

▭

३५

## सौ. सुलभा कुलकर्णी

□

आम्ही आता खऱ्याखुऱ्या अर्थाने "तपस्वी" झालोय. नुकताच आमच्या लग्नाचा बारावा वाढदिवस ( "तप" झाले म्हणून ) आम्ही साजरा केला. . . . .कळत न कळत मन भूतकाळात गेले आणि "सुरुवाती "चे दिवस मनश्चक्षूपुढे उभे राहिले.

"आम्ही दोघे पाखराप्रमाणे स्वच्छंदानं गगनात स्वैर विहार करू किंवा एखाद्या वणव्यात सापडून खलास होऊ, पण आमच्या निर्णयात आता बदल होणार नाही." असं ह्यांनी, आमच्या लग्नाआधी, मामंजींना लिहिलेलं पत्र, आजही माझ्या संग्रही आहे. आज मामंजी स्वर्गस्थ आहेत आणि आमचे पायही "जमिनीवर" टेकलेत.... तरीही, त्या आठवणी मात्र, मनाला हलक्याफुलक्या पिसाप्रमाणे गगनात नेऊ शकतात, एवढे खरे !

प्रेमाचा मार्ग मुळातच काटेरी ! त्यात आमचा आंतरजातीय प्रेमविवाह ! ! ... दोन्ही कुटुंबातील मंडळींचाच नव्हे तर, दूरान्वयानेही ज्यांचा संबंध नाही अशांचाही आमच्या लग्नाला विरोध. . . त्यामुळे भवितव्याबद्दल फारसे सुखद चित्र रंगविण्याची वास्तविक सोय नव्हती.

आणि म्हणूनच, आपण आपल्या अवतीभवतीच्या "ह्या जगातून" कुठेतरी दूरदूर गेलो तर "आपले जीवन" जगायला आपण मोकळे होऊ या कल्पनेने आम्ही पुण्याहून महाराष्ट्रातल्या अगदी कोपऱ्यातल्या एका खेडेगावात जाऊन रहायचा निर्णय घेतला. ह्यांना तिथं एका हायस्कूलमध्ये नोकरी देण्याचं तिथल्या संचालकमंडळींनी अभिवचन दिल्यामुळं, लग्नाच्या दुसऱ्या दिवशी आम्ही "मधुचंद्रा "ला निघालो.

त्या खेडेगावात आमच्या अपेक्षेपेक्षाही जास्त कूट प्रश्न निर्माण झाले... आम्ही आमची जात केव्हांही आणि कुठेही लपवून ठेवायची नाहीं असं निर्धारानं ठरविलं होतं त्यामुळे होणारा सामाजिक उपद्रव आम्ही अर्थातच गृहीत धरला होता. तथापि रात्री न् रात्री जागून काढायला लावणारी संकटं एकापाठोपाठ कोसळतील याची कल्पना नव्हती.

अर्थात् वाइटातून, कधी कधी चांगलं कसं निघतं याचाही अनुभव माझ्यासारख्या "नवऱ्या मुलीला" यायला हवा, असं ईश्वराच्या मनात असणार !

त्या खेडेगावात जाऊन आम्हाला दोन महिने झाले होते. शाळेतल्या मुलांचं ह्यांनी एवढं प्रेम संपादन केलं होतं की त्या दोन महिन्यात मला भाजीसाठी कधी बाजारात जावं लागलं नाही किंवा भाजीसाठी कधी पैसाही खर्च करावा लागला नाही.....शाळेतून "हे" घरी आले की ह्यांच्या भोवती मुलांचा घोळका

असायचाच आणि " बाई "ना जगातल्या सगळ्या अप्राप्य वस्तू आणून देऊन त्यांना खूष करायला ही शाळकरी मुलं धडपडायची....मुलींनी तर मला वेणी देण्यासाठी आपापसात दिवस ठरवून घेतले होते. हे मला नंतर कळलं. पण इतकं सुख, गावातल्या आमच्या " हितचिंतकांना " पाहवणार नाही, हे आमच्या लक्षात आलं नाही.

अतिशय आग्रह झाल्यामुळं, अगदी अनिच्छेनं हे एका पुढाऱ्याकडे ( ! ) जेवायला गेले आणि घरी आल्यानंतर थोडयाच वेळात ह्यांच्या पोटात असं काही दुखायला लागलं की मला ब्रह्मांड आठवलं.

प्रथम सुरुवातीला पोट दुखण्यावर काहीतरी बाष्कळ विनोद करून ह्यांनी वेळ मारून न्यायचा, मला धीर द्यायचा प्रयत्न केला, पण मध्यरात्री ह्यांना स्वत:लाच सारं असह्य झालं आणि "माझे उरलेले जीवन ह्यांना दे" अशी मी प्रार्थना करू लागले.

त्या गावातील अनोळखी, अपरिचित अशा दोन्ही डॉक्टर्सनी ह्यांचा जीव वाचविण्यासाठी सतत दोन दिवस आणि दोन रात्री अविश्रांत केलेले प्रयत्न, शाळेतल्या झाडून एकूणएक मुलांनी " शाळेला सुट्टी देऊन " ग्रामदेवतेपुढे ह्यांच्यासाठी केलेली प्रार्थना, सामुदायिक माझी तार हाती पडताच, चारशे मैल अंतर तोडून अगदी एकटया आलेल्या व माझे कुंकू वाचविण्यासाठी धडपडलेल्या सासूबाई —ही सारी चित्रं डोळयांपुढून झरझर निघून जातात. . .त्यातला सुखद भाग मान्य करूनही " ते जीवन पुन्हा जगंशील का ?" असं कोणी विचारलं तर त्याचं उत्तर होकारार्थी देणं, मला निश्चितच कठीण जाईल.

वणव्यात होरपळून जाणाऱ्या, जळून खाक होणाऱ्या आम्हा दोन पाखरांना, माझ्या सासूसासऱ्यांनी नुस्तं वाचविलंच नाही, तर आपल्या पंखाखाली घेतलं. बहीणभावंडांनी गजबजलेल्या घरात आईवडिलांच्या उबदार पंखाखाली " हे " पुन्हा " माणसात " यायला लागले होते.....माझी जात विसरून मी " गृहलक्ष्मी " आहे, अशा भावनेनेच सासुसासरे माझ्याशी वागत होते. त्यांच्या औदार्यात मी न्हाऊन निघाले होते; थोडीफार सुखावत होते, तोच–

तोच पुन्हा एकदा आकाश कोसळलं !————नागपंचमी असल्यामुळं ह्यांच्या ऑफिसला सुटी होती. डॉक्टरांना भेटून माझ्या डिलिव्हरीची अपेक्षित तारीख समजावून घेतली आणि " नाव नोंदवून " आम्ही दोघे घरी निघालो... माझ्या सासऱ्यांची विनोदबुद्धी प्रखर असल्यामुळे, घरी जाताच आपल्याला काय काय ऐकायला मिळेल, ह्याविषयीच आमची चर्चा चालली होती..." बापसे बेटा सवाई " ह्या न्यायानं " ह्यां "च्या विनोदालाही उधाण आलेलं होतं. आम्ही फाटका-पर्यंत हसत खिदळत आलो. आणि व्हरांडयांतील समोरची खुर्ची रिकामी दिसताच आम्ही दोघेही नकळत गंभीर झालो....घरात पाऊल टाकलं. . .सगळा शुकशुकाट ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

आम्ही डॉक्टरांकडून निघालो असू, त्याच वेळी माझ्या सासऱ्यांना हॉस्पिटलमध्ये नेण्यात आलं असावं ! आम्ही घरी पोहोचलो असणार त्याच वेळी ते त्यांच्या " आवडत्या घरी "– स्वर्गात पोहोचलेले असणार !

घरी गेल्यावर सासऱ्यांचे विनोद ऐकायला मिळायच्या ऐवजी, ईश्वराच्या निष्ठुर विनोदाचा इरसाल नमुना मात्र पहायला मिळाला.

आणि हे सगळं, लग्नाचा पहिला वाढदिवस पंधरा दिवसांवर आला असताना ! पोटात बाळ असताना !

मामंजींच्या निधनानंतर चारच दिवसांनी मी " पांढऱ्या पायाची " असल्याचा निर्वाळा, आमच्या एका दूरदूरच्या नणंदेनं देताच, माझ्या सासूबाई स्वतःचं दुःख विसरून तिच्यावर विजेसारख्या कडाडल्या.." माझ्या सुनेच्या पोटात बाळ असताना, अभद्र बोलणाऱ्यांनी ह्या घराची पायरी न चढलेली बरी. " असं बोलणाऱ्या सासूबाई, हे लिहीत असताना माझ्यासमोर बसल्या आहेत...त्या वेळी माझा पहिलाच झालेला मुलगा संजू, त्यांना स्वतःच्या पुस्तकातील गोष्ट वाचून दाखवतोय....

कधीही भरून न येतील अशा जखमा, आज ' व्रण 'सुद्धा दिसू नयेत अशा रीतीनं भरल्या आहेत...बऱ्याच जणांचे आपुलकीचे शब्द, बऱ्याच जणांनी योग्य वेळी दाखविलेली माणुसकी, ह्यामुळे तर आम्ही " तपस्वी " ठरलो !

□

## ३६

## सौ. विजया शिरसाळकर

□

लग्नाचा मांडव आता काहीसा शांत वाटत होता. निवांत कोपऱ्यात पुरोहित नवविवाहितांच्या करवी विवाहोत्तर विधी करवून घेत होते. विवाह समारंभाला जायला मला फार आवडते. कारण एके काळी आपण स्वतः अनुभविलेले सर्व सोपस्कार पुन्हा नजरेखालून गेल्यामुळे, नववधूवरांच्या निमित्ताने त्या गोड गतस्मृतींना पुन्हा एकदा उजाळा मिळतो.

हं, आता म्हणा, धर्मे च, अर्थे च, कामे च—पुरोहितांच्या ह्या आदेशाने मला अलगद एक तपापूर्वीच्या त्या प्रसंगापर्यंत नेऊन सोडले. होमाला प्रदक्षिणा चालल्या असताना माझे अंतःचक्षू गत आठवणींभोवती चकरा मारीत होते. वधूच्या जागी मी स्वतःच बसल्याचा भास झाला. होय, अगदी अस्सेच, धर्मे च अर्थे च—पुरोहित ह्यांच्याकडून शपथपूर्वक वदवून घेत होते. मी अपेक्षेने " ह्यांच्या "कडे

हेतूपूर्ण कटाक्ष टाकला पण छे ! ह्यांचे माझ्याकडे लक्षच कुठे होते. हात गुरुजींच्या आज्ञेनुसार अवदाने टाकत होते तरी लक्ष मात्र मित्रांनी केलेल्या विनोदाला प्रत्युत्तर देण्यात होते. माझे मन जरा खटकले.

'जोडा अगदी छान शोभतोय नाही ' कुणीसे कानाशी लागून बोलत होते, मीही असेच कुण्या पोक्त स्त्रीचे उद्‍गार यापूर्वी ऐकल्याचे आठवते ते प्रथम माझ्या घराच्या उंबरठ्याचे माप पायाने लवंडताना ! सामान्यांच्या ठिकाणी सुद्धा लक्ष्मी नारायणाचा आभास उत्पन्न करण्याचे सामर्थ्य विवाहाच्या मंगल संस्कारात असावे. तसेच कधी न पाहिलेल्या माणसाच्या ठिकाणी आपलेपणा निर्माण होण्याचे सामर्थ्य अक्षतांमध्ये असावे.

नवी माणसं, नवा गाव, तोही माहेरापासून खूप लांब. ह्या लोकांची माहिती, स्वभाव, आवडी या सर्व गोष्टी अजमाव्या लागतात. लग्नापूर्वी प्रत्येक सौभाग्य-कांक्षिणीने आपले घर, संसार याबद्दल आपल्या कल्पनेप्रमाणे एक रम्य चित्र चितारलेले असते. मीही त्याला अपवाद नव्हतेच. त्यातून माझे लग्नही माझी पसंती वरपक्षाने केल्यावर एक वर्षाने झाले. लग्न का लांबणीवर टाकले जात आहे त्याचा वरपक्षाने कधीच खुलासा केला नाही. ते एक वर्ष मी कल्पनेच्या भराऱ्या मारून पुरे केले. या नव्या घरी सासू-सासरे असे मोठे कुणीही नाही. मुलगा व त्याच्या तीन बहिणी. माझ्या लग्नापर्यंत दोन बहिणींची लग्ने होऊन त्याही निघून गेलेल्या. अर्थातच आई-बापाविना पोरक्या झालेल्या अल्लड मुलाची जबाबदारी आहे, हे लग्नापूर्वीच घरच्यांच्या बोलण्यातून समजले.

आम्ही घरी आलो. पाहुणे तसे कुणी नव्हतेच. चार दिवस राहून दोघी बहिणी घरी गेल्या. अरे बापरे, आता माझी जबाबदारी सुरू होणार ! ते घर, घर तरी कसले, पूर्वी म्हणे त्या जागेचा गोठ्यासारखा उपयोग करावयाचे. ना धड जमीन, ना काही सोय, वरती पत्र्याचे छप्पर ! ते घर पाहून माझ्या रम्य घराच्या कल्पनेचा पार चुराडा झाला. अखेर कल्पकता व वास्तवता ह्यांचा मेळ बसू शकत नाही तर ! मन कमालीचे खट्टू झाले. अशा घरात ' मधुचंद्र ' तो कसला ? ह्या घरात सामानाची जुळवाजुळव कशी करायची. केवळ स्वतःची जागा म्हणून इथे राहावयाचे येवढेच. ' त्यापेक्षा दोन खोल्यांची आटोपशीर जागा भाड्याने घ्यावी. ' मी ह्यांना म्हणाले.

प्रत्येकाचे स्वभावगुण ओळखणे हे लग्नानंतरचे पहिले अवघड काम आहे. माझ्या घरात माणसे इन मिन तीन. एखाद्या माणसाबद्दल काही ग्रह एकदा झाला की तो कायमचाच होऊन जातो. म्हणून मी माझ्याकडून फार फार जपत होते.

लहानपणापासून वडीलमाणसांच्या सहवासाचा अभाव, जबाबदारी तर जन्मापासून होतीच. त्यामुळेच की काय पण ह्यांचा स्वभाव काही वेगळाच घडलाय. आमच्या संसाराच्या पहिल्या दिवसापासून तो आजपर्यंत, मी एक घेण्यासारखा

गुण ह्यांचा पहात आहे, अन् तो म्हणजे संपूर्ण बेफिकिरी. तुम्ही मला वेड्यात काढाल ! पण मला मनापासून वाटते, ह्यांच्याजवळ असलेल्या ह्या 'सद्गुणाच्या' एकशतांश बेफिकिरी मजजवळ असती तरी मला प्रत्येक गोष्टीचा एवढा त्रास होणार नाही. जेवढ्या काळज्या जास्त तेवढे हे जास्त निष्काळजी राहातात. आपल्याला होणारे दुःख वा त्रास ह्याची शब्दानेही वाच्यता कुणाजवळ करावयाची नाही. स्वभाव समुद्रासारखा शांत, अविचल.

हळूहळू मी ह्यांच्या वागणुकीचा अभ्यास करू लागले. मला अशा वातावरणाची सवय नव्हती. घरात लहान नणंदेच्या छंदाने वागावे लागे. त्यांच्या बालबुद्धीप्रमाणे त्यांचे खेळ असत. त्यात त्यांच्या मनाप्रमाणे सर्व झाले पाहिजे. सर्वांनी तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेली ही मुलगी केव्हा काय हट्ट धरील ते सांगवत नसे.

कधी सागरगोटे तर कधी पत्ते, कधी गाण्याच्या भेंड्या लावत तर कधी कधी गोष्टी सांगून त्यांना झोपवावे लागे. ह्यांचा घरी बऱ्याच रात्रीपर्यंत पत्ता नसे. 'ऑफिसमध्ये ओव्हर टाईम करतो' असे सांगायचे. मला वाटे, येवढा खटाटोप कशासाठी. मिळते आहे त्यातच भागवावे. बरे, पैशाच्या व्यवहारासंबंधी काही कळू द्यायचे नाही. आमच्या दोघांमध्ये वयाचे अंतर बरेच होते. म्हणून की काय, कोणत्याही गोष्टीत 'तुला काय कळतंय' असं चटकन् बोलून मोकळे व्हायचे. हे कसल्यातरी काळजीत होते, इतके मात्र नक्की हेरलं होतं. मात्र मजजवळ बोलतील तर शपथ.

मला फार वाईट वाटायचे. अखेर दिवसभर, रात्रभर काम करण्याचा परिणाम ह्यांच्यावर व्हायचा तोच झाला. हे चांगलेच आजारी पडले. पण मी त्यांच्याकडे गेले की म्हणायचे, 'तू जा, मी माझा पडून राहातो.' कोणीही मायेने विचारपूस करणारे आतापर्यंत नव्हतेच. म्हणूनच मी त्यांचे काही केले की त्यांना अवघडल्यासारखे व्हायचे. मला राग यायचा. आतापर्यंत कुणी नव्हते, पण आता तर मी आहेना ? मग मला विश्वासात घेऊन ह्यांनी आपले दुःख का सांगू नये ? मी ह्यांची कोणीच नव्हे का ?

जवळ जवळ एक महिन्याने ह्यांचा ताप उतरला. तो महिना मी कसा काढला ह्याचे मला आजही नवल वाटते. आता ह्यांना उतार पडला होता. ह्यांच्या काळजीचे कारण शोधून काढलेच पाहिजे अशा निर्धाराने मी खोलीत गेले. पण हे काही बोलतील तर शपथ. अखेर माझी सहनशक्ती संपली. मनात आजपर्यंत साठविलेले मी भराभर बोलून टाकले. अहो, तुम्हांला येवढं मला तुमच्या संसारात सहभागी होऊ द्यायचं नव्हतं तर लग्न तरी कशाला केलंत ? मलाही काही भावना आहेत. अखेर लग्न ही एक शोकांतिका आहे ह्याची जाणीव अंशतः जरी मला पूर्वी झाली असती तर जीव दिला असता पण तुमच्याशी. . . . .

पुढे माझ्याच्याने बोलवेना. मी अनिर्बंध अश्रूंना वाट मोकळी करून दिली. खरं म्हणजे आपण ह्यांना विनाकारण निष्ठुरतेने बोललो ह्या भावनेनेच मला रडू येत होते. अखेर बिंग बाहेर पडले. माझ्या लग्नाआधी आठ दिवस ह्यांच्या बहिणीचे लग्न ह्यांनी केले. त्याचे कर्ज ह्यांना कसेही करून एक वर्षाच्या आत फेडावयाचे होते. आता मला ह्यांच्या सर्व वागण्याचा खुलासा झाला. भाड्याचे घर न घेता जुन्या जागेत राहिले, रात्ररात्र काम करणे; पैसे पै-पैने राखणे. मला ह्यांच्याबद्दल एकदम मोठेपणा वाटायला लागला. मनाशी एक निश्चय करून मी उठले.

दिवाळसणाला ४ दिवस माहेरपणाला जाऊन आलोत. पण मला लवकर घरी येण्याची ओढ लागून राहिली. ह्यांच्या नकळत मी एके ठिकाणी नोकरी धरली. पण सत्य किती दिवस लपणार. ह्यांना माझे नोकरी करणे मुळीच पसंत नव्हते. मला तरी कुठे आवडत होते ? पण कर्जमुक्त होईपर्यंत नोकरी करणे, सर्व हौसमौज यांना मुरड घालणे; शक्य तेवढे काटकसरीने राहणे हे नियम मी कटाक्षाने पाळले. आता ह्यांनी मन उघडे केल्यामुळे ही दगदग मी आनंदाने सोसत होते. कर्जमुक्त होताच आपण होऊन नोकरी सोडण्याचे मी कबूल केले होते. माहेरी मात्र कोणत्या गोष्टी मी माहीत होऊ दिल्या नाहीत.

आज आमच्या लग्नाचा पहिला वाढदिवस होता. मुद्दाम ह्यांच्या बहिणींना माहेरपणाला बोलावले होते. सुखदु:खाच्या पाठशिवणीचा खेळ खेळत असता वर्ष कसे भुर्रकन् निघून गेले ते कळलेसुद्धा नाही. सर्वांच्या भेटीगाठीमुळे वातावरण आनंदाने भरून गेले होते.

‘ आज काय तुला सुट्टी-बिट्टी आहे वाटतं ?’ ह्यांनी मला विचारले. ‘ होय , यापुढे रोजच सुट्टी घ्यायचं ठरविलं आहे मी. ’ एक बंद पाकीट ह्यांच्या पुढे धरीत मी उत्तरले. ‘ हे काय ?’ ह्यांचा प्रश्न. ‘ अहो आज लग्नाचा पहिला वाढदिवस आहे ना ? का तेही विसरलात नेहमीप्रमाणेच ? मला काही भेट द्यावी हे तर नक्कीच विसरला असाल नाही ?’ तेही नेहमीप्रमाणे मंद हसले. हसत हसत एक बंद लिफाफा त्यांनीही मला दिला.

माझ्या पाकिटात माझा राजीनामा मंजूर झाल्याचा पुरावा होता. दुसऱ्या पाकिटात मात्र काय असेल अशा उत्सुकतेने मी घाईघाईने पाकीट फोडले. कर्जमुक्त झाल्याची पावती त्यात होती ! माझे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. वाढदिवसाची भेट मला लाखमोलाची होती.

आजही एखाद्या त्रयस्थासारखे त्या पहिल्या वर्षाचे सिंहावलोकन केले म्हणजे सर्व प्रसंग जसेच्या तसे डोळ्यांपुढे उभे राहतात.

□

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## ३७
## आबिगाएल एरन्

विषय मोठा छान निवडला आहे– लग्नाच्या कल्पनेनेच मुळी स्त्री हुरळून जाते. विवाह झाल्यावर पुरुषाच्या जीवनात काही विशेषसा बदल घडून येत नाही. परंतु स्त्रीचे मात्र सारे जीवन घुसळून निघते. तिच्या जीवनात केवढं तरी मोठं स्थित्यंतर घडतं. ज्या मायेच्या सावलीत ती वाढलेली असते, तिचं कोवळं जीवन-पुष्प विकसित झालेलं असतं, ती सावली तिला सोडावी लागते. विवाह झाल्यानंतर तिला सगळं नवीनच असतं. नवं घर, नवीन माणसं यांच्या सहवासात तिला आपल्या जीवनाचा मागोवा घ्यावयाचा असतो. माहेरच्या माणसांप्रमाणेच ही माणसं आपल्याला प्रेमाने वागवतीलका या भावनेनं व नवीन आयुष्य आपल्याला भोगायला मिळणार आहे, आपल्या जीवन-वेलीला वृक्षाचा आधार गवसलेला आहे व त्याच्या आधाराने आपले अर्धोन्मीलित जीवनपुष्प एखाद्या टपोऱ्या गुलाबाच्या फुलाप्रमाणे उमलणार या आनंद-भय-मिश्रित भावनेनं ती आपल्या जीवनाकडे व जगाकडे पहात असते. नवी नवी स्वप्नं रंगवीत असते. आपल्या भावी जीवनाचं ती एक मनोरम, सुंदर चित्र रेखाटते. मधुचंद्राच्या सुखद कल्पनेत ती रंगून जाते. परंतु सर्व स्त्रियांची ही स्वप्नं खरी होतात का ? नाही. काहींची स्वप्नं भंग पावतात. त्यांची शकलं होतात ! विवाह होऊन गृहप्रवेश करताना काहीजणी खोली सोडून ब्लॉकमध्ये जातात, काही स्वतःच्या बंगल्यात प्रवेश करतात, तर काहींना झोपडीत आपलं बिऱ्हाड थाटावं लागतं ! जगात प्रत्येकजण सुदैवी असतोच असं नाही.

प्रेमविवाहाबद्दल अनेकांच्या अनेक कल्पना आहेत. माझाही प्रेमविवाह झाला. दिनांक ८ जानेवारी १९५६ रोजी माझे लग्न झाले. परंतु ही लग्नगाठ सुटणार असं भविष्य ज्यांनी वर्तविले होते त्यांना आज ११ वर्षांनंतर ती अधिकच पक्की बसलेली दिसत आहे ! आमच्या लग्नाला खूपच विरोध झाला. आतून व बाहेरूनही. माझ्या निवडीबद्दल अनेकांनी आपली नापसंती अनेक मार्गांनी व्यक्त केली. गरीब पती निवडला म्हणून मला अनेकांनी दोष दिला. तर माझ्या पतीविषयी अनेक कंडया प्रसृत केल्या गेल्या. हाती करवंटी घेण्यास मी तयार आहे का म्हणून मला प्रश्न विचारला गेला. मी निवडलेल्या वरापाशी पैशाचा झगमगाट नाही, सोन्याची चमक नाही म्हणून माझ्या विवाहाचे परिवर्तन मी एक तर विधवा होण्यात वा घटस्फोट घेण्यात होईल, असे अशुभ भविष्य वर्तविले होते. पण खंबीर-पणे उचलेले पाऊल हे नेहमी पुढेच पडत असते. एकदाचा आमच्या लग्नाचा बार उडाला अन् मी माझ्या हक्काच्या घरी प्रवेश केला.

माझी काही स्वप्नं होती. आपल्या घरी सुंदर सुंदर वस्तू असाव्यात, सुकामेवा,

बिस्किटे, मिठाई आदींच्या बरण्या एका हारीने असाव्यात अशी माझी आकांक्षा होती. समाजात आपल्याला प्रतिष्ठा लाभावी अशीही महत्त्वाकांक्षा होती. परंतु ही मनोराज्ये केवळ दिवास्वप्ने आहेत या जाणिवेनेच मी नूतन गृहप्रवेश केला. लग्नानंतरचे पहिले वर्ष कसे निघून जाते हे काहींना कळतही नाही. मधुचंद्रासाठी एखाद्या नयनरम्य स्थळी जाणं, पहिली मंगळागौर , नानाप्रकारची जेवणं, आप्तांनी दिलेली आमंत्रणं, पहिला दिवाळसण, सासरच्या तसेच माहेरच्या माणसांनी उठल्यासुटल्या केलेले कौतुक यांनी हे वर्ष भरून गेलेले असते. दिवस वाऱ्याप्रमाणे उडून जातात. सगळी मजाच मजा असते. परंतु माझ्या वाट्याला यापैकी काहीही आले नाही. इन मिन चार माणसांचा संसार ! धाकट्या दिराचे लग्नं हे अगोदरच करून दिले होते. नि सासूबाईंचा स्वभाव अत्यंत गरीब व भोळा. त्यांच्याकडून माझे जे काही कौतुक होईल तेवढेच. कारण लौकिक अर्थाने ज्या काही गोष्टी सन्मान प्राप्त करण्यास जवळ हव्या असतात त्या आम्हापाशी नव्हत्या. परंतु इकडचा स्वभाव मला ठाऊक होता. सूडबुद्धी मनात बाळगायची नाही, द्वेष ठेवायचा नाही अन् आपलं कर्तव्य चोखपणे व प्रामाणिकपणे करीत राहायचं. मग कोणी निंदो अथवा वंदो ! आयुष्यात माणसाला काही तत्त्वं असायला हवीत व त्या तत्त्वांशी आपण कुठल्याही परिस्थितीत प्रामाणिक रहायला पाहिजे ही यांची निष्ठा. परंतु जगात बुद्धिमत्तेची नी प्रामाणिकपणाची कदरच केली जाऊ नये अशी जगाची विषम रचना आहे. त्यामुळे जेथे चणे आहेत तेथे दात नाहीत व जेथे दात आहेत तेथे चणे नाहीत ! काही माणसे ही मुळातच दुर्दैवी असतात. त्यांची सर्व मेहनत ही वायाच जायची असते. त्यांच्या जीवनात स्थैर्य हे नसतंच मुळी ! त्यांच्या अंगी असलेल्या गुणांची पारख जगाला शेवटपर्यंत होतच नाही. हा एक स्वतंत्र विषयच आहे. परंतु प्रसंगोपात हे सगळं सांगावंच लागतं. कारण लग्नानंतर स्त्री ही पतीच्या जीवनाशीच एकरूप होते. नव्हे, तिनं तसं व्हायला पाहिजे. सामान्य माणसांच्या आयुष्यात काही विशेषशा घडामोडी होत नाहीत. त्यांची जीवनचित्रं इतिहासात रेखाटली जात नाहीत. त्यांची कुणाला स्मृतीही रहात नाही. परंतु त्यांच्याही जीवनात त्यांना रोज लढाई द्यावी लागते. संग्राम खेळावा लागतो. कधीकधी जीवन जगविण्यासाठी जीवनाशीच दोन हात करावे लागतात. नी अशी लढाई देण्यातच माझे लग्नानंतरचे पहिले वर्ष गेले. हे आजारी पडले, यांची नोकरी खाजगी असल्याने सुटली. बेकारीचे संकट कोसळले व चांगली पक्की जागा सोडून झोपडीतच मला आपला चिमुकला संसार थाटावा लागला. परंतु सुख म्हणजे तरी काय ? समाधान हेच सुख. मन समाधानी असले तर दुःखाचे घणाघातही माणूस लीलया झेलतो. प्रेम हे सच्चे असेल तर कुठल्याही परिस्थितीत माणूस माणसाला सोडीत नाही, माणुसकीला मुकत नाही. व हेच ज्यांना माझ्या पतीची नोकरी जाण्याने आपली भाकिते खरी ठरणार असे वाटत होते त्यांना आम्ही

सिद्ध करून दिले की, प्रीती ही चंद्रमौळी झोपडीत सुद्धा राजमहालाप्रमाणेच सुखासमाधानात नांदू शकते. यांना दुसरी नोकरी मिळाली. व आज आम्ही झोपडी सोडून पुन्हा खोलीत रहायला आलो आहो. आम्हास चार गोजिरवाणी मुले आहेत. जगाच्या दृष्टीने नसला तरी आमच्या दृष्टीने आमचा संसार सुखाचा आहे. स्मृती या गोड असतात तद्वत त्या कटूही असतात. जीवन हेच मुळी संमिश्र गोष्टींनी भरलेले असते. खूपसा रस्ता चालून गेल्यानंतर आपण केवढे अंतर चालून आलो हे मागे वळून पहाण्यात जसा सर्व श्रमांचा परिहार होतो, अथवा डोंगरमाथा चढून गेल्यानंतर वरून खाली दृष्टी टकाल्यास केवढे कांटेकुटे तुडवीत आपण वर आलो हे पाहून आपण आपल्या वेदना विसरतो, तशीच मजा जीवनाकडेही मागे वळून पहाण्यात आहे. अन् म्हणूनच सुरुवातीस मी हा विषय छान आहे असे म्हटले.

▭

## ३८

## सौ. उमा पानसे

▭

शंकराची उमा बनून मी माझ्या नव्या घरात प्रवेश केला. लक्ष्मीपूजनाच्या वेळी तांदुळाच्या राशीत नाव लिहायची वेळ आली. काय 'नाव ठेवायचं' प्रश्न पडला ह्यांच्यापुढे. एवढ्यात सासूबाई कुठूनशा आल्या व म्हणाल्या, 'उमा ठेव हिच नाव. शंकर उमेचा जोडा छान शोभेल' ह्यांनी जुनं नाव आवडेल की नाही ह्या शंकेने माझ्याकडे पाहिलं. पण मला उमा नाव खूप आवडलं. माझ्या चेहऱ्यावरील पसंतीचे भाव बघून तांदुळाच्या राशीत उमा हे नाव कोरलं.

लग्न म्हटलं की, स्त्रीचा जणू पुनर्जन्मच. नाव, गाव, घर, वातावरण सगळंच बदलून जातं. जे घर, माणसं कधी पाहिलीही नाहीत त्या ठिकाणी आपल्या जन्मदात्या आईवडिलांना सोडून यायचं व त्या घराला, माणसांना आपलं म्हणायचं. माझ्या माहेरी सासरच्या मानाने पुष्कळच मोकळं वातावरण होतं. माझ्या मामंजींचा स्वभाव बराच कडक होता. ते बाहेरून घरी आले की सगळीकडे अगदी Pin drop silence व्हायचा. लढाईच्या दिवसात सायरन वाजला की जशी माणसं जिथल्या तिथं दबून बसतात तसं. मला आधी आधी इतकं जड गेलं वावरताना की वाटे आपण टाकतो हे पाऊल तरी बरोबर आहे किंवा नाही. मोठ्यांदा बोलायचं नाही, हसायचं नाही. अगदी सगळीकडे 'गुपचूप'.

लग्नाच्या आधी आई नेहमी म्हणायची, 'अग मुलीच्या जातीला स्वयंपाक न

आला तर सासरी जड जाईल बरं.' पण आम्ही त्या वेळी परीक्षा, अभ्यास, कॉलेज-जीवनात मग्न. पण सासरी आल्यावर साधे पदार्थ करताना अशी फट्फजिती व्हायची की आईचे न ऐकल्याबद्दल पश्चात्ताप होऊन डोळ्यातून जलधारा सुरू होत. स्वयंपाकघर लहानच होतं त्यामुळे समोर जेवायला बसलेली माणसं बघून माझी पुरतीच घाबरगुंडी उडे. साधी परातीत थापलेली भाकरी हातावर धड येण्यासाठी कुरकुरे. कशीबशी हातावर आली तर तव्यापर्यंत जायची मारामार. जेवढ्या चुका होऊ नये म्हणन मी काळजी घेई तेवढ्या पदोपदी चुका होत. मग सगळ्यांची उणीदुणी बोलणी, टोमणे, सोसावे लागत. सासूबाई पुष्कळदा माझी कडक शब्दात कानउघाडणी करीत. तरी सगळा स्वयंपाक उत्तम तऱ्हेने करायला त्यांनीच शिकवला. वस्तू लगेच जिथल्या तिथ ठेवायच्या, पसारा न करता व्यवस्थित काम करण्याचे वळण त्यांच्यामुळे लागले. त्यामुळे आता कितीही पाहुणे एकदम आले तरी न गडबडता व्यवस्थित, सगळे पदार्थ चांगले करून वाढू शकते ह्याचं श्रेय सासूबाईंनाच देते मी.

घरात मामंजी, सासूबाई, मोठे दीर, जाऊबाई, आम्ही दोघं, धाकटे दोन दीर व नणंद एवढी माणसं होतो. त्या मानाने घर लहानच पडे. घरचं वळण पण जुनं. त्यामुळे आम्हा दोघांना एकाद्या वाक्याच्या पलीकडे बोलता यायचे नाही दिवसा. त्यामुळे लग्नातील नवेपणा, आतुरता किती दिवस तरी कायम होती. मला आपलं वाटतं लग्न झाल्यावर दोघचे दोघच राहिली की, लग्नातील नावीन्य लवकर नाहीसं होतं. चार माणसात राहून चोरून बघण्यात, चोरून बोलण्यात, आतुरतेने पतीची वाट बघण्यात वेगळाच आनंद असतो. शिवाय मोठ्या माणसाकडून संसार करण्याचे धडे पण मिळतात. नाहीतर एकदम संसार अंगावर पडला की फार जड जातं.

ह्यांनी लग्नानंतरच्या पहिल्या रात्री विचारलं की, 'तुला माहेरी मोठ्या घरात राहायची संवय असल्यामुळे येथे चुकल्या चुकल्या सारखं वाटत असेल.' मी गप्प बसले. पण माझ्या चेहऱ्यावरचे भाव त्यांना सांगत होते की, 'तुमच्यासह लहान घरातच काय पण अरण्यातसुद्धा राहण्याची तयारी आहे.'

आणि लग्नानंतर २–३ महिन्यात खरोखरच अरण्यात राहण्याचीच वेळ आली. हे इंजिनियर असल्यामुळे ह्यांची बदली 'Project' वर झाली. तेथे घर मिळून सगळी व्यवस्था होईपर्यंत मला नेणं शक्य नसल्यामुळे ते एकटेच जावयास निघाले. सकाळपासून फराळाचं करणं, बांधाबांध ह्या धावपळीत वेळ गेला. निघण्याची वेळ झाल्यावर त्यांनी त्यांच्या आईवडिलांना वगैरे नमस्कार केला व निरोप घेण्यासाठी माझ्याकडे पाहिले. त्याबरोबर मला एवढा मोठा हुंदका आला की मी ओंजळीत तोंड लपवून स्वयंपाकघराकडे पळाले. हे माझ्या मागोमाग स्वयंपाकघरात आले व माझे डोळे पुसून म्हणाले, 'वेडी कुठली. मी पंधरा वीस

दिवसात घर मिळालं की, घेऊन जाणार राणीसाहेबांना. रडायला काय झालं ? हस बघू. चारचार दिवसांनी मी पत्र लिहीनच.' पुढे पंधरावीस दिवसाचे चार महिन्यात रूपांतर झाले. ही गोष्ट वेगळी. एवढ्या सगळ्या माणसांच्या देखत रडू कोसळले या जाणिवेने लाजेने मला मेल्याहून मेल्यासारखं झालं. दुसरे दिवशी लवंगी मिरची नणंदबाईने टोमणा मारलाच की, " दादा गावाला गेला म्हणजे वहिनीला अरण्यात टाकून नाही गेला. "

तीन चार महिन्यानंतर ' Project site ' वरील गावापासूनच्या दूर अशा घरात मी यांच्यासह रहायला गेले. आजूबाजूला दुकाने, घरं फारशी नव्हती. आठवड्याला एकदा सगळं सामान शेजारच्या गावातून आम्ही सरकारी जीप-मधून आणत असू. बोलायला महाराष्ट्रीयन शेजार नाही. सिनेमा, पुस्तके, करमणूक, काही नव्हती. हे येईपर्यंतचा वेळ क्वचित कंटाळवाणा वाटे. नाही असं नाही. ह्यांची वाट बघण्यात बराचसा वेळ जायचा. पण ते आल्यावरचा वेळ तरी पंख लाऊनच जायचा. किती भुर्रकन् जायचा. स्वार्थत्याग करायचा म्हणून हेतूपूर्वक नव्हे पण आयुष्यात पतीसाठी स्त्री किती तरी गोष्टींचा त्याग करते. त्या त्यागाची तिला स्वतःला देखील जाण नसते.

असे दोन महिने किती आनंदात गेले. एके दिवशी हे कामावरून आले तो ताप घेऊनच. चेहरा, कानाची पाळी, लाल लाल झालेली. कपडेही न काढता ते कॉटवर झोपले. कपाळावर हात ठेवला. चटकाच बसला माझ्या हाताला. थर्मामीटर लावून बघते तो चार डिग्रीच्यावर ताप. ते डोळे मिटून ग्लानीत पडले होते. मी शिपायाला बोलावून शेजारच्या गावी जाऊन सासूबाईंना तार करण्यास सांगितलें. व येताना डॉक्टरांना पण बोलावून घेऊन येण्यास सांगितले. मला काही सुचेना. मी यांच्या उशाशी बसून कोलनवॉटरच्या पट्ट्या कपाळावर ठेवीत होते. जीवनातील उत्साह, हातापायातील शक्ती कुणी काढून घेतल्यासारखं झालं होतं. सात-आठ तासानंतर डॉक्टर आले. त्यांनी तपासून औषध दिलं. व ' अजून १–२ दिवस ताप कशाचा आहे ते नक्की सांगता येणार नाही. कदाचित् टॉइफाईड असेल. पण घाबरण्याचे कारण नाही. ' असा धीर देऊन डॉक्टर निघून गेले. हे ऐकल्यावर माझी काय स्थिती झाली हे कसं सांगू ? आदल्या दिवसापासून घोटभर पाणीसुद्धा घातलं नव्हतं मी तोंडात.

दुसऱ्या दिवशी ती माय माऊली धावत आली. सासूबाईंना बघताच मी त्यांच्या गळ्यात पडले व खूप रडले. त्यांनी मला आईच्या मायेने गळ्याशी धरले. त्यांना बघून खूप धीर आला मला. सासूबाईंनी ह्यांच्या अंगाला हात लावून बघितला. पाच साडेपाच डिग्रीच्यावर ताप होता. त्या खोलीबाहेर आल्या व म्हणाल्या, ' अग संसार म्हटला की बरे, वाईट प्रसंग यायचेच. संसारात नेहमीच सुख असतं का ? त्या जगन्माता अंबाभवानीचे पाय धर. तिच्यावर सगळा भार

घाल. ती सगळं ठीक करेल. असा धीर सोडायचा नाही. माझा त्या आईवर विश्वास आहे.' त्या अंबाबाईच्या फोटोपुढे गेल्या. मनोभावाने डोळे मिटून हात जोडून उभ्या राहिल्या. देवीला हळदकुंकू वाहिलं. व आपल्या हाताने मला पण ठसठशीत कुंकू लावलं. मीही उठले. त्या जगन्मातेपुढे शांतमनाने पाच मिनिटे बसले. कुठून कोण जाणे मला मनोधैर्य प्राप्त झाले. मोठ्या धैर्याने ह्यांची शुश्रूषा केली. पंधरा-वीस दिवसात त्यांना थोडासा आराम वाटू लागला.

आजपर्यंतच्या, लग्न झाल्यानंतरच्या काळात, दहा, अकरा वर्षात किती तरी मानसिक क्लेशाचे प्रसंग आले. मुले खूप आजारी पडली. पण त्या त्या वेळी मला जे मानसिक धैर्य लाभलं ते या सासूबाईंच्या उपदेशाच्या ठेव्यातून. कधीही न संपणारा अमोल ठेवा.

खरंच पहिल्याला काही आगळंच स्थान आहे जीवनात. पहिलं प्रेम, पहिलं मूल, पहिली रात्र, तसंच लग्नानंतरचं पहिलं वर्ष हे सुद्धा अनेक कडू, गोड, प्रसंगांचं मिश्रण ज्याची चव जिभेवर आयुष्यभर रेंगाळते.

आज मी माझ्या सासरच्या माणसांशी एकरूप झाले आहे. वरून टणक पण आतून मायेचा ओलावा असलेली, नारळासारखी दर्शनी कठीण भासणारी माणसं आहेत माझी. त्यांच्या वात्सल्याचा कितीदा तरी प्रत्यय आला मला पुढे. लग्नानंतर पहिल्या वर्षी नवीन सुनेला टोमणे मारणे, नेमके दोषावर बोट ठेवणे, तिच्या माहेरचं उणं काढणे, वगैरे गोष्टी चालायच्याच. पण मी त्याबद्दल कधी मनातला राग व्यक्तही केला नाही. किंवा कोणाला उलटही बोलले नाही. पुढे सहवासाने आमच्या प्रेमाचे बंध निर्माण झाले. मी माहेरी जाऊन सासरची कड घेऊन तावतावाने भांडते व आज मला कोणी बोललं की सासूबाई माझी कड घेतात.

असं आहे पहिलं वर्ष वैशिष्ट्यपूर्ण. माहेरचं जीवन व सासरचं जीवन यातील संधिकाल. या संधिकालातच विजांचा व मेघांचा गडगडाट, सोसाट्याचा वारा सुटला व संधिकाल अभ्राच्छादित झाला तर संपूर्ण दिवसावर त्याची काळी छाया झाकळेल. म्हणून संपूर्ण वैवाहिक आयुष्यावर उषेची गुलाबी छटा, स्वच्छ प्रकाश पडावा वाटत असेल तर या संधिकालात संयमाने वागायला हवे. नाही का ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
दि: ..........
नों दि: ..........

३९

**सौ. कांचन**

मी ग्रॅज्युएट झाले अन् माझं लग्न माझ्या वडिलांनी ' ह्यांच्या 'शी ठरवलं. हे त्या वेळेस कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणून लागले होते. मुलगा हुशार, घराणं चांगलं, स्वभाव चांगला वगैरे वगैरे बघून माझ्या वडिलांनी हे स्थळ ठरवलं. लग्नसमारंभ थाटात झाला. मी नववधू म्हणून सासरी आले. इथपर्यंत सगळं चार-चौघींसारखं झालं.

मी आर्टस्‌ची विद्यार्थीण–त्यातून कथाकादंबऱ्या खूप वाचलेल्या–त्यामुळे थोडी काल्पनिक भावविश्वात रमणारी. अर्थात्‌च पहिल्या भेटीची काही मनोहर स्वप्नचित्रं घेऊनच मी ह्यांच्या खोलीत प्रवेश केला. हे काहीतरी वाचत बसले होते. आपण इतके दिवस वाचलेलं कथाकादंबऱ्यातलं जीवन आता आपल्याला प्रत्यक्ष अनुभवायला मिळणार म्हणून मी आनंदले, शहारले, लाजलेदेखील. . .पण ह्यांनी माझ्याकडे बघितलंही नाही. न बघताच त्यांनी मला बसायला सांगितलं. मला जरा चमत्कारिक वाटलं. पण म्हटलं कदाचित् विद्यार्थ्यांमुळे त्यांना अशी सवय झाली असेल.

मी अवघडून बसले. छाती धडधडत होती. कसलीतरी भिती वाटत होती.

थोडया वेळाने ह्यांनी डोकं पुस्तकातून वर काढलं अन् विचारलं, " हं, काय M. A. करणार की नाही ? " अन् एखादे कडक मास्तर विद्यार्थ्याकडे पहातात तसं, त्यांनी माझ्याकडे बघितलं.

काल्पनिक स्वर्गातून मी धाड्दिशी खाली कोसळले. तेही शिक्षणाच्या रुक्ष खडकावर. क्षणभर मला काय उत्तर द्यावं हेच समजेना. इतका रूक्ष प्रश्न ? अन् पहिल्या भेटीत ? पुढे केव्हाही त्यांना हा प्रश्न विचारता आला नसता का ? माझी M. A. होण्याची इच्छा नव्हती म्हणूनच तर मी लग्नाला तयार झाले ना ! छान संसार करावा, स्वतःचं घर सजवावं, अन् त्यात बुडून जावं असं मला वाटायचं म्हणूनच मी लग्न केलं.

एखाद्या सुंदर बागेत प्रवेश करावा अन् सुरवातीलाच काटयाकुटयाची अन् निवडुंगाची झाडं लागावी असं माझं झालं. माझा नंतर मूडच गेला.

ह्यांचा स्वभाव अबोल, काहीसा गद्य, अरसिक, पण भोळाभाबडा अन् सरळ आहे हे कळायला मला वेळ लागला नाही. माझ्यापेक्षाही त्यांचं गणितावर जास्त प्रेम. गणित सोडवत बसले की तासन्‌तास त्यात रमून जायचे. दिवेलागण व्हायची. मी कपडे करून बाहेर जाण्यासाठी तयार होऊन बसलेली असायची. पण त्यांचं माझ्याकडे लक्षही नसायचं. ते जवळ असूनही मी विरहिणी होते. प्रिय

माणूस जवळ असूनही मी प्रेमाला वंचित झाले होते. त्यांच्या हातात हात गुंफायचे सोडून रागाने हात चोळण्याशिवाय काही करू शकत नव्हते.

बसून बसून कंटाळा यायचा. ह्यांचा रागही जायचा. असला कसला अरसिक नवरा आपल्याला भेटलाय असं मी मनात म्हणायचीदेखील.

माझ्या मनाची ही स्थिती ह्यांच्या लक्षात येण्याऐवजी सासूबाईंच्या लक्षात यायची अन् मग त्याच म्हणायच्या, "अरे, माधव, जा आता तिला फिरायला घेऊन. पुरे झाला अभ्यास." मग पुढे स्वारी उठायची जागेवरून.

बर. आता फिरायला गेल्यावर तरी काही चांगलं बोलतील ? छे. ते आपल्याच नादात असायचे. त्यांच्या डोक्यात प्रेमाऐवजी प्रमेयंच घाळायची. अशी मनातून चिडायची मी.

पण नवीन लग्न झालेलं. नवीन ओळख झालेली. त्यामुळे एकदम रागावताही यायचं नाही. मग मी मुद्दाम काहीतरी विषय काढून बोलायची. अपेक्षा ही की त्यांनीही काही तरी बोलावं, सांगावं. पण ते काही बोलायचे नाहीत. जवळ एवढी चालतीबोलती बायको असताना, तिच्याशी न बोलणारा, तिच्याकडे न बघणारा हा कार्तिकस्वामीचा तर अवतार नसेल अशी मला शंका यायची !

त्यामुळेच लग्नाच्या पहिल्या वर्षात ते बाहेरून फुलांची वेणी आणणं–एखादी आवडती वस्तू आणणं, तासन्तास गुलुगुलु गोष्टी करीत बसणं, एकमेकांच्या चेष्टा करणं वगैरे गोड गोड––काही माझ्या वाट्याला आलंच नाही. बाहेर मैत्रिणी खूप चिडवायच्या. त्यात मला आनंद वाटायचा; पण क्षणभरच. कारण लगेच ह्यांची आठवण व्हायची अन् वाटायचं, छे :! इतकं काव्यमय जीवन कुठे आहे आपल्या नशिबात ? पण मी आपली गप्प बसायची. मूठ झाकलेलीच बरी.

नंतर मात्र मी ह्यांना ह्याबद्दल कित्यकवेळा म्हटलं. कधी प्रेमाने, कधी चिडून, कधी रागावून–पण त्यांचं आपलं एकच उत्तर, " मी आयुष्यात एकही कादंबरी वाचली नाही की, मित्रांशी उगीच गप्पागोष्टी केल्या नाहीत. अभ्यासात हुषार म्हणून मला बाबांनी पहिल्यापासून गणिताचं वेड लावून दिलं. मलाही त्यात आनंद वाटू लागला. ह्या विद्येत मी मठ्ठ आहे कबूल. रोमान्स-बिमान्स मला काही येत नाही हेही कबूल. तू शिकव त्याप्रमाणे मी वागतो. "

झालं ? आता का ह्यांना प्रेम कसं करावं ह्याचे धडे देऊ ? का लहान मुलाला रोज शिकवतात तसं शिकवू ? कमाल आहे की नाही ?

पण करता काय ? त्याही गोष्टीला मी तयार झाले. त्यांच्या त्या अभ्यास अन् पुस्तकाच्या अवजड चौकटीतून त्यांना बाहेर खेचून काढायचं असा मी निश्चय केला. तुमचा कदाचित् विश्वासही बसणार नाही, पण खरं सांगते त्या दिवसापासून मी खरोखरच ह्यांना काही गोष्टी शिकवायला सुरुवात केली. फडक्यांच्या चारपाच कादंबऱ्या ( Romantic ) आणि इतरही पुस्तकं, मासिकं

त्यांच्याकडून वाचून घेतली. सुंदरसुंदर कविता वाचून दाखवू लागले. दर आठवड्याला त्यांना घेऊन सिनेमाला जाऊ लागले. बागेत, मैत्रिणींकडे वगैरे जास्तीत जास्त त्यांना हिंडवू लागले.

मग कुठे त्यांच्या मनाला प्रणयाचे कोवळे पंख फुटू लागले. गणितापेक्षाही अजून निराळं सुंदर विश्व आहे ह्याची त्यांना हळूहळू जाणीव होऊ लागली. बोलून चालून ते स्कॉलरच. जातीचे हुषार. त्यामुळे सगळं चट्दिशी शिकले.

पण ह्यात माझं वर्ष गेलं ना ! नव्या नवलाईचं वर्ष ! —पण गेलं तर गेलं. कारण त्याची भरपाई ह्यांनी पुढे भरून काढली. पुढे चार वर्षांनी आम्ही काश्मीरला गेलो ( दोन वर्षाच्या मुलाला घरी ठेवून ) अन् हनीमून साजरा केला.

नंतर मात्र आमचे दिवस मजेत जायला लागले. संसारातली गोडी काय असते ते त्यांना अनुभवाने कळायला लागलं. आम्ही Picture ला, बाजारात, फिरायला जाऊ लागलो. आमचं मित्रमंडळ वाढवले.—अन् नंतर सगळं सुरळीत सुरू झालं. सध्या तर आम्ही आनंदात आहोत. तीन मुलं, स्वत:ची बंगली, सगळचा सुखसोयी—कशाला कमी नाही.

पण अशी कधीतरी पहिल्या वर्षाची आठवण झाली, किंवा कुणी करून दिली की वाटतं, की खरचं ह्यांच्यासारखे तरुण असतील का ? असले तर त्यांना सांगावंसं वाटतं की, “ बाबांनो, फक्त पुस्तकातले किडे बनू नका. तुम्हाला सुखाने संसार करायचा ना ? मग बायकोशी कसं वागायचं हेही लग्नाचे अगोदर शिका ’ म्हणजे माझ्यासारखी तुमच्या बायकोची सुरुवातीला कुचंबणा होणार नाही. ”

▭

## ४०

## सुशीला

▭

‘ कुर्यात् सदा मंगलम् ’ शुभमंगल सावधान-चा गजर होतो. एकमेकांच्या गळचात हार घालण्यासाठी उभे आहेत. आणि दोन व्यक्तींचे एक नवीन नाते — नवे जग अवतार घेते. दोन व्यक्तिमत्त्वाचे हे मीलन कधी सहजतया घडते. परंतु माझे नशीब असे की जेव्हा मधला अंतरपाट सरकविण्यात आला. तेव्हा पहाते तो माझ्यासमोर चाळिशी उलटलेला मनुष्य हातात फुलांची माळ घेऊन उभा असलेला दिसला. तेव्हा मला खूप राग आला. मनातल्या मनात खूप शिव्या दिल्या. मेल्यानं आम्हाला फसविले. आम्ही मुलगा पाहण्याची इच्छा दर्शविली तेव्हा त्यांचा पुतण्या दाखविण्यात

आला. हुंडा घेत नव्हते. म्हणून माझ्या वडिलांनी मागेपुढे विचार न करता लग्न करण्याचे ठरविले. परंतु शेवटी असे पाहिल्यावर एकदम असा विचार मनात आला की रामदासाप्रमाणे आताच्या आता इथून पळ काढावा. परंतु पळाले असते तर किती ? व कुठे ? लगेच लोकांनी मला मांडवाच्या आतच पकडले असते. लग्न नाकारले असते. पण मुलीच्या जातीची नामोशी जगभर होते. शिवाय दारावरून वरात परत गेल्यामुळे आईवडिलांचीही नामोशी होईल ती वेगळीच ! म्हणून काही न बोलता अगदी गुपचुप स्तंभाप्रमाणे उभी होते. हृदयाचे तर आतून आरपार विभाग झाले होते. मारुतीप्रमाणे शक्ती असती तर तेव्हाच हृदय फाडून दाखविता आले असते. अशी खळबळ माझ्या एकटीच्याच मनात उडाली होती काय ? नाही. आईवडिलांनाही वाईट वाटत होतं. पण ते दर्शवीत नव्हते. त्यांचीही एक प्रकारची फसवणूकच झाली होती. पण करणार काय बिचारे ! सगळ्यांची दातखिळी बसली. कोणालाही काही बोलता येईना ! त्यांनी स्वत:ला व आपल्या दैवाला दोष देऊन मनाचे समाधान केले. आपणच आपणहून आपल्या पायावर दगड टाकून घेतला आहे. रडत रडत त्यांनी कशी बशी तयारी करून आम्हाला निरोप दिला. माझ्याबरोबर पाठराखीण म्हणून माझी ७–८ वर्षांची लहान बहीण बरोबर होती. आम्ही खंडवा ते इंदौर गाडीनेच आलो. सकाळी ११ वाजता जे गाडीत बसलो ते संध्याकाळी ५ वाजता पोहोचलो. तोपर्यंत मी सारखी रडतच होते. मला समजूत घालणारे कोणीही नव्हते. घरी पोहोचल्यावर लग्नघर आहे असेही वाटले नाही. समोरच चार म्हाताऱ्या गोळा होऊन गाणी म्हणत होत्या. आहे तरी कोण ह्यांचं घरी. म्हाताऱ्याचं दरवर्षी लग्न. मला तर इथं आल्यावर जास्तच रडू येऊ लागले. असा हा एक प्रकारचा माझ्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंग घडला. तो मी कधीही विसरू शकणार नाही.

संसारात पाऊल पडले तर कसे तरी रडत रडत किंवा आनंदानं आयुष्य कंठावे लागते. परंतु माझ्या आईवडिलांनी मला शिक्षण भरपूर दिले होते. म्हणून पुढच्या आयुष्याची मला काळजी नव्हती. कारण मी माझ्या पायावर उभी होते. कुठेही दोन पैशाची नोकरी करीन व पोट भरीन. म्हाताऱ्या नवऱ्याशिवाय घरात दुसरे कोणीही नव्हते. व तोही नेहमीच आजारी असायचा. त्याने माझ्याशी अनेकदा बोलण्याचा प्रयत्न केला. इतके दिवस घरात राहूनही मी कधीही एक वाचासुद्धा चढविली नाही. संसाराची चव घेतली नाही. संसारात पदार्पण करूनही त्याची गोडी न स्वीकारणं ही एक आश्चर्यकारकच घटना होय.

शेवटी एक दिवस असा आला की, म्हातारा मृत्यूशोकाने खूप ओरडत होता. खूप वेदना होत होत्या. असह्य पाप उसळत होते. अशा वेळी मी त्याच्या तोंडात तुळशीपत्र व गंगेचं पवित्र पाणी घातले. तो लगेच एका क्षणात जीव निघून गेला. शेवटचे कर्मकांड करण्यात आले. म्हाताऱ्याची गडगंज संपत्ती होती. पण

त्याला वारसदार कोणी नव्हते. दत्तकही घेतले नव्हते. शेवटी त्या संपत्तीचा अधिकार फक्त मलाच होता.

माझ्यावरच अशी परिस्थिती आली त्याचे मुख्य कारण म्हणजे माझे वडील गरीब पद्धतीचे होते. पाच मुली होत्या. पाच पाच हजार हुंडा एकेका मुलीला कुठून देणार. जन्मभर क्लार्कची नोकरी केली. तर पैसा कुठून गोळा झाला असता. व हे लोक हुंडा घेत नव्हते. म्हणून माझ्या वडिलांनी विचार केला की, एक काम होतं तर होऊ द्या. पण त्याचं फळ मला आजही आयुष्यभर भोगावं लागतं आहे. परंतु मी काही त्याच्या नावाने आयुष्यभर वैधव्यात किंवा कुणाच्या चाकरीत काढले नाही. मी पण जनतेसमोर कुमारिका म्हणून आजही नाव प्रदर्शित करते. हळूहळू आज हेडमिस्ट्रेसच्या पदावर कार्य करीत आहे. त्या गडगंज सासरच्या संपत्तीचा लवलेशही उपयोग करून घेतला नाही. ती सर्व संपत्ती मी माझ्या हाताने गोरगरिबांना वाटून टाकली. स्टेशनजवळ एक भव्य धर्मशाळा बांधून दिली. व बाकी थोडे आणखी उरले होते ते अनाथ आश्रमात देऊन टाकले. व माहेरी आले.

अशा प्रकारे थोडं आयुष्य गेलं ते तर दुःखातच गेले व पुढचे देव जाणे काय होईल ते ?

▭

## ४१

## एक भगिनी

▭

लग्नानंतरचे पहिले वर्ष ! विचार करता करता मन गत जीवनाकडे गेलं. सात वर्षांच्या अत्यल्प काळातून—त्या झिरझिरीत पडद्यातून पाहू लागले. अन् त्याच क्षणी कुणा एका कवीची एक सुंदर कविता मला आठवली...........

ह्या माझ्या पंखांनी —उडण्याचे वेड दिले
पण माझ्या हातांनी—घरटें हे निर्मियले।

पूर्ण कविता आठवत नाही. संग्रही ठेवली होती. ती कधीच जळून खाक झाली आहे. पण हा दोष माझा नाही. हा लग्न म्हणजे तड-जोड ह्या शब्दांचा-अन् अनुकरणाचा आहे. लग्न म्हणजे दोन जीवांचे मीलन. सत्यं-शिवं-सुंदरम्चा अत्युत्तम आविष्कार. आकाशधरतीचे मीलन. पुष्पाला सुवास मिळणं हे सगळं, अगदी सगळं खरं आहे. पण काव्याच्या जगात. व्यावहारिक जगात ते कितपत खरं आहे ? माझ्या मतानं तर हे काही खरं नव्हे असं वाटतं. ह्या पहिल्या वर्षाची आठवण झाली की, लग्न ही केवळ तड-जोड आहे. संसाराचा रथ एका चाकानं चालत नाही म्हणून दुसऱ्या चाकाचा दिलेला केवळ टेकू आहे हा असं वाटतं. असं नसतं तर ह्या ओळी मला का आठवत्या ! त्यानंतर

आकाशाकडून धरतीकडे, धरतीकडून आकाशाकडे ह्या वेडया जीवानं भ्रमण का आरंभिलं असतं. . . ? पण तो स्त्री-जीवनाला मिळालेला शाप आहे. स्वप्नांचं दिव्य भांडार मिळालेल्या सुंदर डोळयांना मिळालेला शाप आहे हा. पंख दिलेल्या मनावर, ईश्वरानं, हे जीवन लादून केलेला फार मोठा अन्याय आहे हा !

शुभमंगल झाले ! टाळयांच्या कडकडाटात हास्यकल्लोळात, चेष्टामस्करीत भांबावून ह्या नव्या जीवनात काहीसं बावरूनच पदार्पण केलं. भावी जीवनाविषयी, सफलतेविषयी साशंकता, संपलेलं पर्व यशस्वी की सुरू होणारं यशस्वी होणार ह्या विचारानं हैराण झाले होते. मोठ्या हौसेनं सासूबाईंनी देवीला जोडयानं ओटी भरायला पाठविलं होतं. ओटी भरणं झालं. जोडयाचा नमस्कार देवीला पावता झाला. नंतर त्याच देवीसमोर राजश्रींनी नव-जीवनाची दीक्षा दिली. तिच्या साक्षीनं आजपासून जुनं सगळं संपलं. नवीन सुरू झालं. आता आपली आवड एक, निवड एक, छंदही एक, अन् जीवनसुद्धा —— दोन प्रवाह एकत्र मिळाल्यावर वेगळपणा तो काय ?– नाही ना उरणार ?

पण त्यात त्यागाची भूमिका आलीच तर आपल्याकडे येणार हे न कळण्याइतकी का मी वेडी होते ? पृथ्वीला कक्षेचे बंधन निर्माण झाले होते. तिच्याकरिता एक सूर्य होता. आणि तिनं केवळ त्याच्या भोवती भोवतीच फिरायला हवे हेही कळले होते. गृहिणी–तिची कर्तव्ये–चूल अन् मूल–हेच तिचे कार्यक्षेत्र–तिला दुसरा नाद–छंद–आवड असू नये, तिनं लिहू नये, काही करू नये, असे असल्यास तिचे संसाराकडे दुर्लक्ष होते हे स्वारीचे प्रामाणिक मत होते. अन् ते माझ्यापुढे सुस्पष्ट करण्यात आले होते. देवा रे ! केवढे भयानक हे अंतर——दोन आवडीनिवडीतील अन् हे दोघे जीवनाचा प्रवास करायला निघाले होते. बरोबर कधीही एकमेकांपासून दूर न होण्याच्या गोड वचनात बांधले गेले होते. माझ्या मनानं एकच आकान्त केला——

चिर तरुणारे–चिर रुचिरा रे
तुज सन्निधनी वास बरा रे !
तुझ्या नि माझ्या मध्ये केवढी
परंतु आहे खोल दरी रे. . . !!!

पण नाही ! ही दरी मिटवायलाच हवी. निराशेच्या एका ठोकरीने ह्या दरीत फेकल्यासारखे झाले. परंतु कपाळावर आठया पसरणार नाहीत याची कोशीस करीत, आवंढा गिळीत सारे काही चूप चाप बघत राहिले. त्या प्रिय हातांनी पेटीचा तळ धुंडाळला होता. त्यात लपलेले कागद——जीवाभावाने जतन करून ठेवलेली दौलत——माझा खजिना——जळून खाक झाला——एका क्षणात कित्येक सुंदर-मधुर-करुण क्षणांची रम्य अनुभूती राख झाली होती. त्या बरोबरच राखेला मिळालेली एक अनुभूती माझ्या ओठावर येऊन गेली——

" आणि कळले तेव्हाच
जीवनाला अर्थ आला
जळणारा जीव माझा
राख होऊन हासला
राख होउन हासला ! "

हाच, हाच तो क्षण ! ह्या अनुभूतीचा ! छे–माझ्या अनुभूतीशी मला प्रामाणिक पण राहायलाच हवे–अन् मी हसत हसत सांगितले. यापुढे असे कुठे काहीच नाही दिसायचे तुम्हाला. ते तर माझ खूळ होते––रिकामपणाचे चाळे होते. त्याला काही काही सुद्धा अर्थ नव्हता.

अर्थ होता फक्त संसाराला–रांधा–वाढा–उष्टी–काढा ह्या जीवनाला–संसाराच्या काव्याला बहर आला होता. एक हसरे फूल घरात खेळू लागले. अन् यांनी समाधानाचा श्वास सोडला असावा, मी ते खूळ पूर्णपण विसरले म्हणून ! पण खरंच का ते खूळ होते. वेड होते ! थोडचा दिवसात विसरता येण्यासारखे ! तो स्वभाव कधी बदलतो का ? इतरांनी हेवा करण्यासारखे भाग्य असताना कधी कधी अचानक विनाकारण होणारी कूरबूर कुणाला कळेल का ? कारण लग्न ही केवळ तडजोड आहे तड–जोड ! ह्या अन् असल्याच विचारांनी मन कसे विव्हल होऊन गेले आहे. बाण– वर्मी बाण लागलेल्या पांखरासारखे ! पण मला माहीत आहे ही विव्हलता फार कमी काळ टिकेल. पुनः एकदा जुने संस्कार–सहवासातून निर्माण झालेली प्रीती ह्या सर्व विचारांवर मात करील. अप्रिय करणारे हात देखील प्रिय होतील. फक्त त्यांच्यात मनाची तगमग शांत करण्याची शक्ती असणार नाही. पण मला वाटते ह्या जीवनाची इतिकर्तव्यता हीच असावी. सार्थक हेच असावे. पण कधी कधी ह्या पहिल्या वर्षाची आठवण झाली की काय होते ? सारे जग अंधाराच्या साम्राज्यात चिडीचूप–गुद्‌लगुप्प करून झोपले असले की मन ताब्यातून उडून भूतकाळात जाते. दिवसा व्यवहारात गुंतलेले मन ते पहारे नष्ट झाल्यामुळे मुक्त झाले असते ना ? हृदयात उचंबळलेला सागर डोळ्या-वाटे पाझरू लागतो. अन् मग आठवणींना खारट चव येऊ लागते. ती चव मनाची तगमग शांत करण्याचा प्रयत्न करते. पण छे ! ते एक शल्य आहे की जे हृदयात जपूनच हा जन्म काढायला हवा. ते शल्य काढण्याचा प्रयत्न केला तर मात्र जीवच राहणार नाही. कारण ते शल्य देखील आता प्रिय झालंय–अनेक सुंदर कल्पना इकडे तिकडे इतस्ततः विखुरल्या. चकाकणारा पारा जमिनीवर सांडावा अन् गोळा करता येऊ नये–तसली अगतिकता येते. ह्या पहिल्या वर्षाच्या आठवणीने–त्यानंतर जीवनाकडे बघण्याची बदललेली दृष्टी –गालिबच्या शब्दात––

" दुनियामे हूं–दुनिया का तलफगार नही हूं
बाजार से गुजरा हूं मगर खरीददार नही हूं "

अन् सरते शेवटी भूतकाळात भटकून आलेले मन– गपचीप जाग्यावर येते त्याला येणेच भाग आहे. कारण लग्न ही केवळ तडजोड आहे. दोन दिवसांचा खेळ नाही. मनाला हे सारे विसरायला हवे. ते विसरले की नाही हा प्रश्न गौण आहे. पंख फुटलेले पाखरू त्याचे निळ्या जगात विहरण्याचे रम्य स्वप्न-अन् अवेळी कातरले गेलेले पंख–पिंजरा–. त्या नंतर उडण्याची तगमग निर्माण होऊ नये ह्याकरिता तो पक्षीच स्वतःचे स्वतःच पंख कातरू लागतो. कारण त्याला चार दिवालींच्या आत सारे विश्व साकारायचे असते. पहिल्या वर्षानं हेच शिकविले. . .पण तडा जोडता जोडता अनेकदा त्या विषण्ण मनातून स्वर झंकृत होतात. . .

"कह्दो इन हसरतों से
कहीं और जा बसें
इतनी जगह कहाँ है
दिले–दाग़दार में"

□

## ४१

## सौ. गीता जी. पवार

संसार सागरात प्रथम नौकानयन करणाऱ्या नवदांपत्यांच्या जीवनचरित्राचा कटु अनुभव असल्यामुळे 'लग्न' हा शब्द ऐकला की, माझ्या अंगावर काटेच उभे राहायचे. त्यातल्या-त्यात 'माझं लग्न' हे शब्द तर "जीवघेणा करार" वाटले. पण––एक दिवस म्हणजे १६ मे १९६१ हा माझ्याच इच्छेप्रमाणे उगवला. त्याचे असे झाले– म्हणजे "लग्नानंतरचे पहिले वर्ष" यापूर्वी 'लग्नाअगोदर एक वर्ष' हा विषय हाताळल्याशिवाय माझ्या लग्नानंतरच्या पहिल्या वर्षाला किंमत येणार नाही असं मला वाटत असल्यामुळे लग्नाअगोदरची पार्श्वभूमि थोड्या शब्दात येथे दिल्यास विषयांतर होईल असं मला वाटत नाही.

'हे' आणि मी एकाच खेड्यात जन्माला आलो. अर्थात आमची ओळख बालपणापासूनच. पण यांचं ४ थी इयत्तेनंतरचे शिक्षण शहरात झाल्यामुळे स्वारी आमच्या गावाला सुट्टी व्यतिरिक्त येत नसे. तेव्हा आम्ही एका गावचे असूनही तोंडओळखीशिवाय आमचा परिचय नव्हता. यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर यांना वर्धा जिल्ह्यात नोकरी लागली व एक दिवस स्वारी भपकेबाज पोशाखात आमच्या गावाला आली. तेव्हा मी ८ इयत्ता चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. त्याबरोबरच नव जवानीला सुरुवात झाल्याचे सर्टिफिकेट सुद्धा निसर्गाने माझ्या हातात न कळत दिले.

एक दिवस सकाळी १० वाजता मी नदीवर धुणे धुवायला गेले असता स्वारी न कळत माझ्यासमोर 'दत्त' म्हणून उभी होती. 'हिंदु संस्कृति' आणि ती देखील ग्रामीण संस्कारांनी युक्त असल्यामुळे माझ्या मनात तरुण पुरुषाबद्दल मुळीच आदर नव्हता. आणि 'हे' ओळखीचे असूनही हा परकेपणा का निर्माण व्हावा हे मला देखील कळत नव्हते. प्रेमळ नजरेने ( अर्थात ती नजर मला विषारी वाटली ) 'त्यांनी' माझी विचारपूस केली. पण त्यामागचा हेतू मला वेगळाच वाटल्यामुळे त्यांच्याबद्दल माझ्या मनात आदर व प्रेम निर्माण होण्याऐवजी तिटकाराच अधिक उत्पन्न झाला. पण 'त्यांनी' मात्र न बोलताच नजर बाणांनी माझा पाठलाग चालू ठेवला. तेव्हा असल्या माणसाबद्दल अधिक तिटकारा करण्यापलीकडे मी काही करू शकले नाही. पुन्हा एकदा असेच 'हे' सुट्टीवर घरी आले असता त्यांनी मला माझ्या घरी एकटीलाच एकांतात गाठले. आणि सरळ प्रश्न केला—"गीता. . . " मला वाटलं काही काम असेल मी—'उं. . .'

'हे'—"मला काही बोलायचे आहे."

मी—"बोला"

'हे'—"मी तुझ्यावर खूप खूप प्रेम करतो." हे ऐकून मी गप्पच बसले. माझ्या मौनाचा 'त्यांनी' भलताच अर्थ करून सरळ माझा हात हातात घेतला. हातात घेतलेल्या हाताचे 'हे' सरळ चुंबन घेणार–तोच माझ्यांतील स्त्रीत्व जागृत झाले. व मी अशी काही 'त्यांच्या' थोबाडात दुसऱ्या हाताने लगावून दिली की, 'हे' जर त्या वेळी आरशासमोर गेले असतील आणि त्यांच्या लाल झालेल्या गालाकडे पाहिले असेल तर स्त्रीच्या लवचिक हातात किती कणखरपणा भरलेला असतो याचा अनुभव त्यांना खचित झाला असेल.

त्यानंतर पुन्हा स्वारी १५ ऑगस्टला घरी आली. आमच्या खेड्यात 'हे'च सुशिक्षित असल्यामुळे आमच्या गुरुजनांनी यांच्याच भाषणाचा कार्यक्रम १५ आगस्ट या स्वातंत्र्य दिनावर ठेवला. चिल्लर वक्ते बोलून झाल्यावर स्वारीने बोलायला सुरुवात केली. स्वातंत्र्यावर चार शब्द सांगितल्यावर स्वारी जाहीर सभेतून सांगू लागले—"या स्वातंत्र्य काळात कोणाला आपल्या संपत्तीची घमेंड असेल, कोणाला आपल्या शेतीवाडीची घमेंड असेल, कोणाला आपल्या सौंदर्याची, सुंदरतेची घमेंड असेल तद्वतच मलाही घमेंड आहे—माझ्या प्रेमाची, माझ्या सुंदर मनाची. म्हणून तुम्हीही एकमेकावर प्रेम करून आपले मन सुंदर बनवा." अर्थात हे वक्तृत्वाचं नाटक केवळ मी प्रेक्षक म्हणूनच यांनी रचले हे चटकन लक्षात यावयाला मला उशीर लागला नाही. नंतर 'हे' आपल्या नोकरीवर गेले. आमच्या उभयतांच्या वडिलांनी काही तरी खलबत करून आमचे 'कुर्यात् सदा मंगलम्' करावयाचे ठरविले. हे जेव्हा मला कळले त्यावेळी तर माझ्या काळजात धस्सच झाले. मला वाटले हे जरी जुळले तरी स्वारी गतघटनेमुळें लग्नाला तयार

नसणार. कारण लग्नाच्या दोन दिवस अगोदर स्वारी गावाला आली आणि ते जेव्हा मला कळलं त्या वेळी तर मी अवसान गलित झालेली होते. कारण माझी व्यथा हिंदु संस्कृतीला धरून असल्यामुळे मला कोणाला बोलूनही दाखविता येत नव्हती. शेवटी १६ मे १९६१ चा दिवस उजाडला आणि 'यांच्या' निराश चेहऱ्यावर कसलेही प्रसन्नतेचे चिन्ह न दिसल्यामुळे आम्ही उभयतांनी निराश अंतःकरणानेच 'सावधान' च्या गजरात एकएमेकांच्या गळ्यात हार घातले. तेव्हा संसारी जीवनात माझी नक्कीच हार आहे हे 'सावधान' शब्द कानी पडताच मला वाटले.

**लग्नानंतरची पहिली रात्र**

खोली सजवण्यात आली. माझी ओटी भरली. ४–५ मैत्रिणींनी मला त्यांच्या खोलीत ढकलले. मी लाजत मुरडत आत गेले. तेव्हा रात्री ९।। वाजले असावेत. एकच पलंग होता. मी सभोवार दृष्टी फेकली. पण स्वारी आढळली नाही. बाहेर गेले असतील. म्हणून मी तीन तास पलंगाच्या पायाशी वाट पहात बसले. गतस्मृतीने मन अगदीच कालवा कालव करू लागले. स्वारी माझ्यावर चांगलीच भडकेल या भीतीने 'मन चिंती ते वैरी न चिती' प्रमाणे माझी स्थिती झाली. रात्रीचे १२।। वाजले होते. मी बसून कंटाळले. पलंगावरची उशी घेतली व खालीच पहुडले. स्वारी १ वाजता आत आली. मी उगीच डोळे मिटले. आणि स्वारी काय करते याचा मी डोळे मिटून कानोसा घेत होते. स्वारी मला न उठविता सरळ पलंगावर आडवी झाली. अर्ध्या तासानंतर त्यांनी अंगावर पांघरूण घेतल्याचा मला भास झाला. मी डोळे उघडून पाहू लागले. स्वारी कसल्याही पद्धतीची हालचाल करीत नाही हे पाहून डोळे उघडे ठेवून मी पण झोपी गेले. सकाळी मी ५ वाजता उठले. त्यांच्या अंगावरचे पांघरूण नीट करून मी खोलीबाहेर पडले. सकाळी ७ वाजले तरी स्वारी उठली नाही. 'हे' माझ्या सारखेच ४ वाजेपर्यंत तरी झोपले नसावेत असा सरळ अर्थ मी केला. सासूबाईंनी मला ह्यांना उठवायला सांगितले. पण मी माझ्या धाकट्या दिरावर ही कामगिरी सोपविली. स्वारी उठून सरळ न्हाणीत ( खेड्यातील स्नानगृह) गेली. आंघोळीला पाणी घातले नव्हते. तेव्हा माझ्या ऐवजी माझ्या नणंदेवरच स्वारीनं रात्रीचा वचपा काढला. मी मुकाट्याने पाणी घेऊन गेले. त्यांनी तिरस्कारयुक्त नजरेने माझ्यावर दृष्टिकटाक्ष टाकला. मी गुपचूप निघून आले. आंघोळ, न्याहारी झाल्यावर यांनी आमच्या सासूबाईला सांगितले की, मी शेजारच्या खेड्यावर जाऊन येतो. माझ्या मनात मात्र विचारांचे थैमान चालू होते. अर्थात् त्यांनी मुद्दामच खेड्याला जाण्याचा बेत रचला हे माझ्या लक्षात चटकन् आले. यांना खेड्यावरून परत यावयाला दोन दिवस लागले. लग्नाच्या चवथ्या दिवशी 'हे' रात्री ८ वाजताच खोलीत जाऊन झोपले. ( कसले झोपले म्हणता ! )थोड्या वेळाने मी पण पाण्याचा गडवा घेऊन आत गेले. स्वारी

बोललीच नाही. बोलायला विषय हवा होता म्हणून मी म्हटले– झोप येत नसेल तर काही वाचायला आणून देऊ का ? हे आपले गप्पच. मी बाहेर आले व ज्ञानेश्वरीचा ग्रंथ घेऊन आले. ग्रंथ स्टूलावर ठेवताच ‘ हे ’ ओरडले–‘हा ग्रंथ कशाला ?’ निदान रागवायला तरी सुरुवात केली म्हणून मला हायसे वाटले. मी ग्रंथ घेऊन बाहेर आले. पुन्हा खोलीत गेल्यावर थोडा वेळ उभी राहिले. नंतर मी माझ्या पहिल्या दिवशीच्या जागेवर जाऊन बसले. अर्धा तास वातावरण अगदी शांत होते. नंतर स्वारी हळूच म्हणाली–“ गीता ”

मी उठून उभी राहिले– “ काय ? ”

“ तू माझ्यावर लग्नाआधी प्रेम करीत होतीस काय ? ” खरं काय ते त्यांना सांगावं म्हणून मी म्हटले–“ नाही ” ‘ हे ’ उठून बसले व पुन्हा मला विचारले, “ लग्नानंतर– ” माझ्या डोळ्यात निसर्गतःच आसवं आली मी म्हटले–“ हो. पतिपत्नीचं नातं प्रेमाचा डोंगर निर्माण करण्यासाठीच जोडले जाते ना ?” ह्यांनी मला खसकन् जवळ ओढलं. आणि पहिल्या रात्री विरोधासाठी पक्कं केलेलं माझं मन कधीच धैर्यगलित झालं. आणि. . . . .

यांची सुट्टी संपली. मला सोबत घेऊन जाण्याबद्दलची कल्पना यांनी यांच्या आईवडिलांना दिली. माझे सासूसासरे माझ्या बालपणापासूनच परिचयाचे असल्यामुळे ते मला स्वतःच्या मुलीसारखेच समजत. लग्न झाल्याबरोबर मला सोबत घेऊन जायची कल्पना यांच्या आईवडिलांना पसंत पडली नाही. यांनी रजा वाढविली, ती कायमचीच.

दिवसांमागून दिवस जात होते. आमचे संसारी जीवन लतांनी फुलून, बहरून जात होते. गुलाबी व पोपटी रंगाच्या साड्या यांची आवड असल्यामुळे कधी कधी माझी इच्छा नसतानाही केवळ यांची आवड म्हणून ह्या साड्या नेसाव्या लागतात, इतकंच माझ्या मनात खटकतं.

घरात भरपूर होते. पण नोकरी नसल्यामुळे पैशांचा अभाव जाणवू लागला. चार महिने असेच लोटले. आणि यांनी नोकरीसाठी मुंबईला धाव घेतली ते आमच्या दोघात तिसरं येणार हे यांना कळल्यावरच. नंतर यांना ‘ कलर कार्टन्स लि. ’ मध्ये बऱ्यापैकी नोकरी मिळाली. यांनी मला लगेच बोलावून घेतले. जिल्हाबंदी नसल्यामुळे जवळपास ६ महिने आम्हाला आमच्या खेड्यावरूनच रॅशन आणावे लागले. त्यामुळे आमचे दिवस बऱ्यापैकी जाऊ लागले. पण मुंबईच्या एका मुलीनं यांच्यासोबत प्रेमाचं नाटक करायला सुरुवात केली. पण हे नाटक लवकरच यांच्या लक्षात आले. आणि ‘ हे ’ सावध झाले. पण त्या मुलीला स्वारीच्या हृदयात स्वारीने एवढं स्थान दिलं की, तिला विसरण्यासाठी स्वारीनं सरळ हातभट्टीची झोकायला सुरुवात केली. यांचं माझ्यावर खूपच प्रेम असल्यामुळे त्यांच्या मार्गात आडवं यायची माझी इच्छा झाली नाही. लग्नानंतर बरोबर एक वर्षानी यांच्या कानी जेव्हा

टॅऽऽहाँऽ  टॅऽऽऽ हाँ आवाज पडला, तेव्हा यांचं मन एकदम बदललं. व त्यांनी लगेच दारू सोडली. कारण चि. दिनेश जन्माला आला होता. आज तो शाळेत जातो. पण १५ ऑगस्टचे यांचे 'ते' भाषण मी कशी विसरू शकेन ?

▭

## ४३
## सौ. जयश्री दोंड

▭

माझे लग्न झाले. मी पहिल्यांदा मुंबईस आले. माझे पती मुंबईस होते. मुंबईस आल्यावर मला सर्व नवीन दिसू लागले. घरातील काम कसे करावे, कसे नाही, हे मला कळत नसे. माझे लग्न होऊन सहा महिने झाले. जाऊ-बाईने घरामधे कामाची वाटणी घातली व भांडणास सुरुवात केली. माझे पती त्या वेळेस कॉलेजमध्ये जात होते. त्यांना नोकरी नव्हती. दिराने विचार केला आम्ही कसे रहावे, संसार करावा ? ते लगेच वेगळे झाले. मग काय करावे ? माझे पती म्हणाले, मी कॉलेज सोडून देतो. सासूबाईंने सांगितले, कॉलेज सोडू नकोस, मी भाजी विकून पोट भरीन ! असा सासूबाईंनी आधार दिला. मग सासूबाई भाजी विकू लागल्या. मीही त्यांना मदत केली. पतीची फी भरण्यासाठी सासूबाईंनी घरातील भांडी विकली, माझे दागिने मोडले व फी भरली. माझे व पतीचे नातेवाईक आम्हाला मदत करू लागले. मी माझ्या नातेवाइकांकडे जाऊन रहात असे. ते मला कपडे घेत व काही पैशांची मदत करीत. कोणी कशाची कोणी कशाची मदत करीत असे. नंतर माझ्या पतीने पैशाच्या अडचणीमुळे कॉलेज सोडले. त्यांच्या मित्रांनी त्यांना खूप मदत केली. पैशाची व पुस्तकांची मदत केली. तीन वर्षं आम्ही अशीच अडचणीत घालविली. नंतर माझे पती नोकरीस राहिले. नंतर आम्ही लोकांचे थोडे कर्ज दिले. आता मुले झाल्यावर आणखी अडचण भासू लागली. महागाई असल्या कारणाने संसार करणे कठीण आहे. माझ्या पतींना पगार कमी असल्याने परवडत नाही. मुलांची खाण्यापिण्याची अडचण होते. असे आम्ही पहिले वर्ष घालविले. माझ्या पतीच्या नातेवाइकाने मला अगदी प्रेमळपणाने वागविले. बरे, जास्त लिहीत नाही.

▭

४४
मीना

एका मंगलदिनी, फार वर्षापूर्वी, ह्यांना पटले की, 'गृहं तु गृहिणीहीनं कान्तारादतिरिच्यते' व चतुर्भुज होण्याचा कार्यक्रम होऊन, मी आपल्या घरी समारंभाने येते. गृहिणी, आरोग्यसचिव, सखी, प्रियशिष्या इत्यादी सोनेरी पदव्या आयत्याच बहाल होतात. पण ही सगळी खाती यशस्वी रीतीने चालवायला देवीप्रमाणे अष्टभुजा बनले पाहिजे असे मनाला पटवीत, माहेराकडे वळून पहात, मी घरी रमू लागले. माझे नाव पूर्वीचेच ठेवण्यात आले. तरीपण सूनबाई, वहिनी, काकू, तर कधी मामी तर कधी नुसतेच 'हॅलो' ( अग 'ए'चे ह्यांचे स्पेशल रूपांतर ) अशी विविध संबोधने हसवू लागली. प्रसन्न, लाघवी, अगत्यशील सासूबाईंची 'अंडरस्टडी' झाले तर खूपच कौतुकमिश्रित लाड होतील, असे मी ठरवले. उद्योगी गृहिणीला, मितभाषणी नी, कुलकामिनी असा आशीर्वाद, द्यावा, की इष्टमुखा इष्टभुजा म्हणावे, असे विचार सुरू झाले. लग्नानंतरच्या पहिल्या वर्षी मेतकूट जमवायचे कसे हे कुशल कारागिरच जाणे.

सकाळीच कोंबड्याच्या आरवण्याने मी जागी झाले. लहानपणी दिवस कसे संथ, स्थिर, क्षणोक्षणी रम्य व लांबलचक असत. तसेच आता थोडेसे वाटू लागले. आईच्या वात्सल्यधारांनी धन्य झालेली मी, इथे सर्वांच्या कौतुकाने रमू लागले. जेवताना सासूबाईंच्या शेजारी बसून खूप आग्रहाने जेवू लागले (जावई-बापूंच्या गोष्टींची आठवण येई–लोणचे आवडते म्हटले की, आणखी चार बरण्या जास्त घालू, फुलांची तर काय रासच माझ्यापुढे पडे) नातलग, पाहुणे ह्यांच्याबरोबर चार दिवस मजेत गेले. वडील वन्संचं आजारीपण तेवढे मनाला क्लेशदायक होई. पण त्यांचे घर शेजारीच, यामुळे थोडावेळ त्यांचे पथ्यपाणी, व मनोरंजन करण्यात मी घालवी. 'मना चंदनाचे परि त्वा झिजावे, परी अंतरी सज्जना नीववावे.' असे त्यांनी जीवनक्रमण केले. आता स्मृतिचित्रे लिहावी तेवढी थोडीच.

नातलग, इष्टमित्र, शेजारी ह्यांची नवी ओळख व थोडा उद्योग ह्यात बराच वेळ करमणुकीत जाई. आदर्श गृहिणी होण्याचे कसब, हुशार, केळीसारखी नम्र, सुदृढ, सुस्वभावी, व्यवस्थित व स्वच्छ, उद्योगी, तिळगूळ घेतल्यासारखी गोडगोड बोलणारी, असे होण्यात आहे हे लवकरच समजू लागले.

थोडीशी मोठी जागा शोधण्यात थोडा वेळ गेला. अर्ज केले. ( तेव्हा करता येत असत ) त्यात सगळ्यात स्वागतपर उत्तर आले ते माहीम विभागातून. सस्यशामल व पंख्याप्रमाणे झुलणारे माड असलेल्या परिसरात एक सुंदर, हवेशीर,

आधुनिक पद्धतीची, बेताच्या भाड्याची जागा पसंत केली. ( हीच पुढे अध्यापन मंदिर– ह्यांचे क्षेत्र माटुंग्याला आल्यानंतर व येताजाता 'द्राविडी प्राणायाम' करावा लागल्यामुळे कंटाळवाणी भासली. पण जुन्या जागेत कुठे चालला हो ?, मिळणारा Guard of Honour थोडे दिवस तरी चुकवावा असे वाटू लागले )

घर लावले, माहीमचा भूगोल तोंडपाठ झाला. फूटपाथवरचा प्रत्येक दगड, हरएक दुकान, पुष्कळसे चेहरे ओळखीचे वाटू लागले. दाणेवाला, भाजीवाला, केशकर्तनालयातील नट-नटींचे फोटो ओळखता येऊ लागले. थोडावेळ 'ऑनररी' काम करू लागले. उषास्वप्न साकारले.

गुलाबाला काटा हा असणारच. आर्थिक अडचणी हळूहळू भासू लागल्या. कुठल्याही आघाडीवर कपात एकदम नापसंत ! तोच 'पाळण्याची दोरी' हलवायची सुवर्णसंधी लवकरच येणारसे वाटू लागले. हळूहळू आमचा आनंद साकारू लागला. व 'युवराज 'साहेबांचे आगमन दिवाळीच्या शुभदिनी सुप्रभाती झाले. लग्नाच्या पहिल्या वाढदिवशी, हा अमोल ठेवा, सर्वस्वी जतन करून यशवंत व्हायला आम्हास लाभला. ह्या उल्हासमय घटनेत 'छोटी दुनिया' बरोबर छोटेसे होऊन स्वर्गसुख अनुभवण्यात, अंगाई गीते शिकण्यात, व 'नर्सरी ओव्या' म्हणण्यात एक वर्ष कधी संपले व पुढली सर्कस कधी सुरू झाली, हे लक्षातच आले नाही.

▭

## ४५

## सौ. शालन दिघे

▭

गरिबीच्या चरकात पिळून निघाल्यामुळे बोहल्यावर चढवून लग्न लावणे माझ्या आईवडिलांना शक्य झाले नाही. तेव्हा मी सुद्धा माझ्या मनोराज्यांचा चुराडा करून सव्वीस एप्रिल एकोणीसशे त्रेसष्ट रोजी नोंदणी पद्धतीने विवाह करून पद्माकरांचे पत्नीपद स्वीकारले. बोहले नाही, वाजंत्री नाही, पवित्र सप्तपदी नाही म्हणून दुःखाने त्या वेळी माझे डोळे पाणावले. अंतःकरणाचे तुकडे तुकडे झाले. पण हे सारे फक्त त्या दिवसापुरतेच. माझ्या ह्या कृत्याने समाधान पावून पतिराजांनी आपल्या प्रेमरसभरित शब्दांचे सिंचन करून त्यांच्या झालेल्या ह्या लाडक्या राणीचे दुःख हवेत उधळून टाकले.

लग्नासाठी त्यांनी कोणतीही अट घातलेली नव्हती. पूर्वापार चालून आलेल्या रूढीनुसार व घरातील मोठ्या माणसांचा केवळ मान राखण्याचा उद्देशाने त्यांनी मी अति विवंचनेने जमा केलेल्या दोनशे रुपयांचा पोशाखासाठी स्वीकार केला.

त्या वेळी ते धन उचलताना त्यांच्या हृदयाची विलक्षण कालवाकालव झाली हे मला त्यांच्या स्वभावानुसार कळले. अशा अनेक बारीकसारीक गोष्टी डोळ्यांनी पाहिल्या व माझ्याबद्दल त्यांना अधिक आपुलकी वाटू लागली.

लग्नानंतर नवीन जागेत नवीन संसार थाटला गेला. जीवनाला एक वेगळेच वळण लागले. लग्नानंतर चारच दिवसांनी आलेला पगार माझ्या—गृहस्वामिनीच्या स्वाधीन झाला. काय काय खरेदी करायचे, ते कसेकसे लावायचे ह्याचा विचार दिवसभर मी करीत असे. सायंकाळची चाहूल लागताच एखादा रुचकर नवीन पदार्थ तयार करण्यात बराच वेळ जाई. ते सर्व आटोपून बाहेर जाण्याच्या तयारीला लागताच खिडकीतून गोड शीळ कानावर पडे. लगबगीने दार उघडून हास्यवदनाने पतिराजांचे स्वागत करीत असतानाच, क्षणापूर्वी माझ्या हातून उघडला गेलेला दरवाजा त्यांच्या हातून हळूच बंद केला जाई. माझ्या मोहक वाटणाऱ्या केशरचनेवर त्यांच्या हातून, देवीला घातल्या जाणाऱ्या हाराप्रमाणे मोगरीची तर कधी सायलीची नाजूक वेणी अगर गजरा माझ्या केसात माळला जाई. त्या क्षणी त्यांचा दिवसभराचा सारा शीण निघून त्या जागी खेळकर वृत्तीला स्थान मिळे. तर दिवसभर संध्याकाळच्या सातची वाट बघणाऱ्या माझ्या भांबावलेल्या मनाची ह्या सुखद प्रेमाचा स्वीकार करता करता त्रेधातिरपीट उडे. अशात घड्याळाचा काटा कधी जास्त पुढे सरकलेला दिसला तर बाहेर जाण्याचा बेत रद्द करावा लागे. तर कधी कधी मनासारखी खरेदी करून आनंदाने भारावलेल्या मनःस्थितीत दोघेही आपल्या घरकुलात शिरत असू. संसारातील नित्योपयोगी वस्तूंची खरेदी करताना दोन महिने कुठे निघून गेले कळलेच नाही.

बघता बघता धरतीमातेची हिरवीगार शाल पांघरली गेली. आमच्यात आता अधिक जवळीक निर्माण झाली. एकमेकांची सुखदुःखे मनमोकळेपणाने आम्ही परस्परांना सांगू लागलो. आयुष्याच्या कादंबरीतील खरीखुरी उत्तरं हृदय उघडं केल्याशिवाय देता येत नाहीत हे अनुभवानेच पटले. आणि हृदय हृदयापाशी उघडं झालं. आईवडिलांकडे अनेक गोष्टीसाठी मारल्या गेलेल्या माझ्या दुःखित मनाला आता प्रेमाचे, मायेचे भरपूर खत मिळू लागले. मी समजूतदारपणाने माझ्या हौशी, माझे हट्ट कशा तऱ्हेने दाबून ठेवले होते व त्यामुळे माझ्या मनाचा झालेला कोंडमारा पाहून पद्माकरांचे मन भरून आले. काही दुःखित आठवणींनी पाणावलेले माझे डोळे कोरडे करून त्यांनी मला मनमोकळेपणाने वागण्याचा सल्ला दिला.

रस्त्यावरून चालणाऱ्या एका ऐटबाज मुलीची ढाका साडी पाहून आम्हा मैत्रिणींचे एकदा असेच बोलणे झाले. तेव्हा त्या साडीचा हट्ट आपल्यासारख्या गरिबीने गांजलेल्या मुलींनी तरी आपल्या होणाऱ्या पतिराजांकडे करावा असा सल्ला मी तिला दिला. लग्नानंतर येणाऱ्या पहिल्याच गणपती-सणानिमित्त आम्ही

दोघांनी जाऊन डाका साडी खरेदी केली. किती अभिमान वाटला मला म्हणून सांगू ?

दिवस मजेत जात होते. जुन्या आठवणी हवेत विरल्या. पर्जन्यधारांच्या वर्षावाने सुकलेल्या वृक्षाला पालवी फुटू लागली. ते मोहरू लागले. परंतु नुसता मोहोरच हं ! आम्हाला त्याला एवढ्यात फळ लागू द्यायचे नव्हते.

लग्नानंतर पुरेपूर एक वर्ष आम्हाला मोकळे हवे होते. आधुनिक पद्धतीचे फर्निचर घेऊन छोटेसे घरकुल अशा रीतीने सजवायचे होते की ज्या चार भिंतींच्या आत पवित्र स्थान आहे, जेथे असत्याला वाव नाही, जेथे मायेचा पुरेसा ओलावा आहे. आणि हे सर्व साध्य होण्यासाठी कुटुंब नियोजन साधन पद्धतीचा अवलंब करावा लागला. आमच्या निश्चयाला योग्य साथ मिळाल्यामुळे आम्ही कुटुंब-नियोजन केंद्राचे अत्यंत आभारी आहोत.

पुढे दिवाळी आली. रजेच्या अभावी माझ्या माहेरी आम्हा दोघांना जाणे शक्य नव्हते. दिवाळीसारख्या मोठ्या सणाचे स्वागत मी एकटीनेच करायचे मला पटेना. मला फुलासमान झेलणाऱ्या, माझ्या भावनांची कदर करणाऱ्या, माझ्यासाठी पाणावलेल्या त्या नेत्रांना एकटे सोडून जाण्यासाठी माझा पाय उचलेना. मी काहीशा गंभीर निश्चयाने आईला परत पाठविले. फक्त पाडव्याच्या दिवशी दोघे जोडयाने येण्याचे तिला आश्वासन दिले.

त्यांना टाकून घरातून मी कुठे जाऊ नये ही त्यांची नम्र पण केविलवाणी विनंती असते. मी सुद्धा माझ्या घरकुलात पूर्णत: रमले आहे. आता माझ्या लग्नाला चार वर्षे पूर्ण झाली आहेत. परंतु जसजशी अधिक वर्षे होत आहेत तसतशी मायेची पाखर अधिक घट्ट होत आहे. परकेपणा पूर्णपणे नाहीसा होऊन एक मताने, एक विचाराने आम्ही उभयता संसाराची यापुढील गोड स्वप्ने रंगवीत आहोत. लग्नाला एक वर्ष पुरे झाले. व आमच्या निश्चयाचे उद्यापन करण्यासाठी जणू परमेश्वर कृपेने आम्हाला नवीन येणाऱ्या बाळाची चाहूल लागली. आनंदाने माझे जीवन फुलून गेले. लाड व कौतुकाला आता अंत नव्हता. आनंदाच्या, उत्साहाच्या सुगंधी वासाने घर अधिकच आकर्षक वाटू लागले. आधुनिक पद्धतीचा संसार थाटला गेला. आज तीन माणसांचे आमचे कुटुंब ह्या वाढत्या महागाईला न भिता आनंदाने, सुखाने, समाधानाने नांदत आहे.

मी कोणत्याही शुभप्रसंगी चार मैत्रिणींमध्ये आनंदाने, अभिमानाने उखाणा घेते—

कवीच्या काव्यरचनेत असावे सुरेल यमक
पद्माकरांची साथ हेच सुखी संसाराचे गमक.

## ४६

## सौ. निर्मला गरतोळा

आता ४ वर्षे झाली आमच्या लग्नाला. ते लग्नाचे पहिले पहिले दिवस आठवले की, मन आश्चर्याने थक्क होते.

लग्नानंतर पाच सहा दिवसांनीच माझ्या हातून घडलेली ही चूक आहे. ती मी विसरू शकत नाही व माई ( म्हणजे माझ्या सासूबाई ) पण जरा कडक स्वभावाच्या असल्यामुळे त्याही न विसरता आजही मला बोलतात. ती चूक म्हणजे आमच्यामध्ये लग्नाच्या वेळेस वराकडील लोक नवऱ्या मुलीला एक आंगठी घालतात. त्या आंगठीला पतानाम म्हणतात. ती आंगठी मुलीच्या हातात असली तर, वराला चांगले असे सनजले जाते. ती आंगठी माझ्या हातात होती. परंतु सकाळी अचानक बोटाकडे लक्ष गेले व त्यावर नजर जाताच, माझे हातपायच गळून गेले. व मी अगदी घाबरून गेले. कारण माझ्या बोटात आंगठी नव्हती. माझ्या हातून ती केव्हा व कुठे पडली , ते समजलेच नाही. थोड्याच वेळात घरात सर्वांना समजले. सर्वांनी घरात शोधाशोध केली. पण माझ्या दुर्दैवाने ती मिळालीच नाही. माझ्या माईंना तर, भयंकर राग आला व त्या मला खूप बोलू लागल्या. त्यांचे बोलणेही रास्तच होते म्हणा, पण त्याला मी तरी काय करणार ? माझे सासरे जरा शांत स्वभावाचे असल्यामुळे मला काही म्हणाले नाही. उलट माझी बाजू घेऊन माईंना म्हणाले: तिला बोलून आता काय होणार ? तिने मुद्दाम घालविली का ? आपल्या हातून काही गेले तर, आपण काय केले असते.

चार वर्षे ह्या गोष्टीला झाली, पण आजही माई कशावरून तरी आठवण झाली की, बोलल्याशिवाय रहात नाही.

दुसरे म्हणजे, वसंत व मधुकर हे दोन ह्यांचे मित्र आहेत. ह्या दोघांचीही लग्ने आमच्या लग्नाच्या वेळेस चार आठ दिवसांच्या अंतराने झाली व वर्षाच्या आत त्या दोघाच्या सौ. गरोदर राहिल्या. नंतर प्रसूत होऊन त्यांना मुलेही झाली. ह्याबद्दल माईना, फार वाईट वाटायचे. कारण माझ्या कमनशिबाने मला काही झाले नव्हते. पुढे, पुढे तर, त्यांच्या मनात माझ्याबद्दल राग फार वाढू लागला. हिच्यामध्ये काही शारीरिक दोष तर नाही ना ? मला मूल होईल की, नाही ह्याबद्दल त्यांचे मन साशंक झाले. तसे पाहिले तर, घरात सर्वांना ह्याबद्दल वाईट वाटत होते व दुःखही वाटत होते. परंतु माईच्या दुःखाचे रूपांतर रागात आणि तिरस्कारात झाले. दिवसेदिवस माझ्याविषयी त्यांच्या मनातील अढी वाढतच गेली. आमच्या घरी खास आमच्यापैकी कोणी ( स्त्रिया ) आल्या की, माई त्यांना सांगत वसंतचे व मधुकराचे लग्न माझ्या मुलाच्या लग्नाच्या वेळेस झाले. ते दोघे एका मुलाचे वडीलसुद्धा झाले. त्यांच्या घरात पाळणासुद्धा हालू

लागला. पण माझ्या घरात काही नाही. माझ्या मुलाचा मुलगा मी बघते की नाही असे म्हणून रडू लागत. हे सर्व पाहून मला खूप वाईट वाटे. मी एकांतामध्ये जाऊन माझ्या अश्रूंना वाट मोकळी करून द्यायची. माझ्या माईंचे दुःख मी जाणत होते. कोणत्याही स्त्रीला आपल्याला नातू व्हावेत, त्यांना आपण खेळवावे वगैरे इच्छा असतात. ह्याबद्दल त्यांना दुःख वाटणे साहजिकच आहे. पण त्यात माझा काय दोष होता. मी त्याला काय करू शकणार होते. माझे नवस वगैरे सर्व चालू होते. पण देवाला माझी दयाच येत नव्हती. माझ्या दुर्दैवाने हे सर्व ऐकणे मला भाग होते.

माझ्या लग्नाला दोन वर्षे झाली, दुर्दैवाने माझी पाठ सोडली व मला दिवस राहिले. घरातील सर्व वातावरण बदलून गेले. माई माझ्याशी प्रेमाने राहू लागल्या. रागाची जागा प्रेमाने घेतली व मला मुलगा झाला. आता तो ९ महिन्यांचा आहे. माईंचा स्वभाव आता फार बदलला आहे. माझ्या नणंदबाई आपल्या आईना (माईना) कधीमधी म्हणतात: फार रडत होतीस ना नातवासाठी, आता घे. हे ऐकून माई हसतात. ते पाहून त्या रडताना मला जेवढे पूर्वी दुःख वाटायचे तेवढाच आता आनंद होतो व माझा जितेंद्र होण्यापूर्वीच्या दिवसांची म्हणजेच लग्नाच्या पहिल्या वर्षाची आठवण होते. व माझ्या अंतरंगात अनेक विचारांचे तरंग उठतात.

▭

## ४७
## सौ. 'समता'

▭

ध्यानी मनी नसतानाच माझे लग्न ठरले. ते मला पहायला आमच्या घरी आले होते. त्यांना पाहता क्षणी माझी नजर जमिनीकडे वळली. एकदाच पाहिले पण डोळयात त्यांची मूर्ती सामावून ठेवली. पहिल्याच भेटीत त्यांची माझ्यावर चांगली छाप पडली. मला हवा होता त्यापेक्षा काकणभर जास्तच असा तरुण, मला पती म्हणून मिळाला. नोकरी बऱ्यापैकी, शिवाय मुंबईसारख्या ठिकाणी स्वतःचे रहाते घर. सासरेही चांगल्या हुद्द्यावर असल्याने घरात भांडीकुंडी दागदागिना यांची रेलचेल. नाही म्हणायला एकच उणीव होती ती म्हणजे ह्यांना आई व वडील दोन्हीही नव्हते. त्यामुळे घरची सर्व जबाबदारी माझ्यावरच पडणार होती. "नसेना का कोणी, उलट त्यामुळे तुझ्या कर्तबगारीला वावच मिळेल" आई म्हणाली. 'तुझ्या अंगच्या गुणाचे चीज होईल' वडील म्हणाले.

अखेर मुहूर्त ठरला. लग्नाचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला तसतशी मनातून सुखद भीती वाटू लागली. मला माझा संसार सुखी व यशस्वी करावयाचा होता.

लग्न थाटात पार पडले. वकील, इंजिनियर्स, व्यापारी वर्ग व निरनिराळ्या कलाक्षेत्रात नाणावलेल्या व्यक्ती आल्या होत्या. त्यामुळे ह्यांचे मित्र बरेच आहेत हे मी जाणले. प्रत्येकाशी ओळख करून देताना ते सकौतुक माझ्याकडे पहात. त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावी वाटले मला. नोकरीपेक्षा निरनिराळे व्यवहार ह्यांनी हाताळले होते. त्यामुळे इतर तरुणांच्या मानाने ते मला जरासे वेगळेच हुशार असे वाटू लागले.

लग्नानंतर कुठे गावाला आम्ही गेलो नाही. चांगले महालासारखे घरदार सोडून हॉटेलमध्ये राहणे मला रुचेना. त्यांनीही माझ्या म्हणण्याला मान दिला व आम्ही घरीच मधुचंद्र साजरा केला. " आली हासत पहिली रात, उजळत प्राणांची फुलवात " ही ओळ अगदी सार्थ आहे, असे मला त्या रात्री वाटले.

लग्नानंतर काही दिवस मोठ्या मजेत गेले. ही सुखनावीन्याची पहिली लाट ओसरली आणि दैनंदिन व्यवहार जीवनात आम्ही पाऊल टाकले. मुळात असलेल्या काटचांची जाणीव होऊ लागली. घरात कोणी मोठे नाही ह्या सबबीवर मोठ्या नणंदांनी मंगळागौरीचा बेत रहित केला. माझे मन जरासे खट्टू झाले. माहेरी मात्र आईनं दणक्यात मंगळागौर केली. सासरी मंगळागौर झाली नाही याचे दुःख माहेरी मंगळागौरीच्या निमित्ताने जायला मिळाले ह्या आनंदापुढे विसरून गेले.

दिवाळीनंतर हिवाळचात दोनतीन ठिकाणी ट्रिपला गेलो होतो. त्यांनी मला नाटकाची आवड आहे हे लक्षात घेऊन नाटचोत्सवाची तिकिटेही काढली होती. त्याच वेळेस मी महिलामंडळाच्या नाटकात काम केले व उत्कृष्ट भूमिका केल्याबद्दल बक्षीस मिळवले. त्यांनी माझे फारच कौतुक केले. मलाही वाटले माझ्या ह्या महत्त्वाकांक्षेला येथे वाव मिळेल. माझ्या बोलक्या स्वभावामुळे व अंगच्या चातुर्याने मी महिलामंडळात लवकरच पुढे आले व जरा वरची जागा मिळाली. " काय अध्यक्षीणबाई " असे मला हे थट्टेत हाकसुद्धा मारायचे. पण त्यामुळे माझ्या महत्त्वाकांक्षा दुणावल्या. तशी पावले टाकली, त्यामुळे घरात दुर्लक्ष होऊ लागले. घरातला व्याप मला नकोसा होऊ लागला. नाही म्हटले तरी, घरात दोन नणंदा, दीर व मोठं कोणी नाही त्यामुळे आला गेला, पाहुणा ह्यांचे मलाच करावे लागे. जीव अगदी मेटाकुटीला आला. नंतर कालचक्रही फिरले. माझ्यामुळे ह्यांचे व दिरांचे मतभेद होऊ लागले. त्यातच दिवाळीच्या मानपानावरून नणंदा मला घालून पाडून बोलू लागल्या. क्षुल्लक कारणावरून आमची भांडणं होऊ लागली. घर आहे तेथे भांडचाला भांडे लागायचेच

हे खरे आहे; परंतु मला वाटे ह्या सर्वांच्या खस्ता खायच्या मग ह्यांनी तरी जरा आपलं चुकलं-माकलं तर पोटात नको का घालायला !

नणंदा नेहमी आळीपाळीने आजारी असायच्या. मोठ्या दिरांचे उपास तापास शिवाय देवादिकाचं करायचं. तरी मी हसतमुखानं साऱ्यांचं करायची. मग ह्यांनीच एवढा मोठेपणा का गाजवावा आपल्यावर ! चूक कोण बरोबर कोण याचाच आम्ही शब्दच्छल केला. मीही जरा स्वाभिमानी असल्यामुळे माहेरच्या माणसांना बोललेले मला खपले नाही व भांडणं विकोपाला गेली. त्यामुळे लग्न झालेल्या नणंदांचे व माझे जाणे येणे संपले. संबंध तुटले. परंतु संबंध तुटल्यामुळे झालेली हानी फार जबरदस्त व कधीही न भरून निघणारी आहे हे मला नंतर कळले. पण त्या वेळी संबंध पुन्हा जोडण्यासारखे राहिलेले नव्हते. काचेच्या भांड्याला एकदा तडा गेला, की गेला. तद्वत झाले. त्यातच मी मंडळाला देणगी देऊ शकले नाही त्यामुळे महिलामंडळाने माझ्याकडे पाठ फिरविली व माझा अहंकार दुखावला गेला ह्यांना म्हटलं, " तुमची घरदारं नुसती दिसायलाच वाटतं ! साधी शंभर रुपयांची देणगी देऊ शकत नाही तुम्ही ! नुसता बडा घर नी पोकळ वासा असेच दिसतेय. " असे ह्यांचे व माझेही खटके उडू लागले. ह्याला कारण माझी होत असलेली कुचंबणा हेच होय. मी त्यांना नाही नाही ते बोलू लागले. मला स्वत:बद्दल अतिशय विश्वास होता. त्यामुळे मी ह्यांनासुद्धा अगदीच सामान्य लेखू लागले. " हे बघ तुला ह्या घरातल्या माणसांचं होत नसलं तर टाकू हे घर विकून " असे हे म्हणाले. मात्र मला फार वाईट वाटले. घर विकण्याची व विभक्त रहाण्याची भाषा घरात होऊ लागली, की माझा जीव वरखाली होई. सासऱ्यांनी येवढं मिळवलं ते घालवण्यासाठीच का ? असा विचार मनात येई. मला ह्यांचा संताप आला. घृणा वाटू लागली. त्यांचा खेळकर स्वभाव मला विक्षिप्त व तऱ्हेवाईक वाटू लागला. " आपल्या पायावर आपण उभं राहू " हे म्हणाले. " नाही ! ! नाही ! ! " काही झालं तरी हे घर विकू देणार नाही मी तुम्हाला. मी खडसावून सांगितले. घरात रोजच्या काही कटकटी. त्यातच भाडेकरूंच्या कटकटी. त्यातच ऑफीसमध्येही ह्यांचे व वरिष्ठ साहेबांचे बिनसलेले, त्यामुळे घरातले वातावरण तंग राहू लागले. हौस नाही मौज नाही, हिंडणे-फिरणे काही नाही. रोज तेच ते जीवन जगण्याचा मला कंटाळा आला. " जीवन रूपी प्याल्यांत सुखदु:खाचे पेय, जयवंतरावांना सुखी करणे हेच माझे ध्येय " हा उखाणा मी लग्न झाल्यावर हौसेने घेत होते पण प्रत्यक्षात ही सुखदु:खे म्हणजे किती भयंकर आहेत ह्याची जाणीव मला होऊ लागली. आधीच दुष्काळ आणि त्यात तेरावा महिना तसेच झाले. माझ्यात काही स्थित्यंतरे होत आहेत असे मला आढळून आले. नव्या पाहुण्याची चाहूल लागली. मला मात्र ब्रह्मांड आठवले. इतके दिवस सासू-सासरे नाहीत हेच बरे आहे असे मला वाटे. पण आता त्यांच्या देवपणाची घरात असलेली उणीव मला जाणवली. माहेरच्या माणसांची

माया असतेच पण त्याला मर्यादा असतात. परंतु सासरच्या माणसांचे तसे नसते. सासूबाईंची मायेची पखरण काही वेगळीच असते ! "आधी जपते दुधाला म्हणजे सुनेला मग जपते सायींला म्हणजे नातवाला" असे म्हटलेलेच आहे. पहिले बाळंतपण म्हणून सोबतीने ह्यांनी मला माहेरी पाठविले बरोबर एक पत्र खास वडिलांच्यासाठी ह्यांनी दिले होते. मला अगदीच अगतिक वाटले. माहेरी जाण्याची भीती वाटली. घरातल्या मंडळींचा निरोप घेताना डोळे भरून आले. मन चिंती ते वैरी न चिंती. आपण कायमचेच माहेरी तर जात नाही ना असे वाटू लागले.

मी ते पत्र माहेरी दिले. काय होते त्यात ! गप्प गप्प राहिले. पत्राविषयी मी काहीच विचारले नाही. आईकडूनच कळले. "स्वभावाने अगदी हळवे आहेत हो जयवंतराव ! त्यांना तुझी फार काळजी वाटते. पैशांची कितीही अडचण वाटली तरी मला कळवा मी लगेच व्यवस्था करीन असे लिहिले आहे त्यांनी. स्पेशल रूम घ्या. स्पेशल नर्स ठेवा. मुलाला रात्री व दिवसा सांभाळायला दायी ठेवा. पैशासाठी मागेपुढे पाहू नका असे सांगितलेले आहे. जणू काही आम्हाला आमच्या लेकीची काही काळजीच वाटत नाही." आई थट्टेने म्हणाली. महिलामंडळाच्या देणगीसाठी शंभर रुपये दिले नाहीत म्हणून मी रागावले होते तो राग आता कुठल्या कुठे पळाला व त्याची जागा अनुरागाने घेतली.

विश्वासला घेऊन मी घरी आले तो ह्यांनी जातीने सर्व व्यवस्था केलेली. घरात आज २५ वर्षांनी पाळणा हालत होता. नवा पाळणा, खेळणी, गाद्या, गरम रग, बाळाला आंघोळ घालायला बाई सर्व अगदी जय्यत तयार. सासूबाईंची उणीव भासू नये म्हणून त्यांचा सारा खटाटोप चालला होता.

काळाच्या गतीबरोबर पूर्वीच्या सर्व अडचणी दूर झाल्या. घराच्या बाबतीत कोर्टातले फेरनिवाडे आमच्या बाजूने झाले. सर्व लवकरच सावरले गेले. आर्थिक मिळकत वाढली. म्हणूनच की काय महिलामंडळाच्या प्रियंवदाबाई पुन्हा मला भेटायला आल्या होत्या. मी त्यांना म्हटलं, "छे आता नाही मंडळात यायला मला जमणार." त्यात नाराजी नव्हती तर घराविषयी बाळाविषयी वाटणारा स्वाभिमान होता.

सर्वसामान्य मध्यमवर्गातल्या मुलींचं लग्नाचं पहिलं वर्ष असंच जातं. सुख-दुःखाच्या हिंदोळ्यावर झुलत असतं. मीसुद्धा कधी रुसवे फुगवे, क्वचित् भांडण, अबोला आणि नंतर गट्टी ह्या सर्वांचा अनुभव घेतला व त्यातच मजा व न्यारीच गंमत आहे असे मला वाटते.

४८

**‘ शीला ’**

▭

बंडयाला आमच्या कित्येकवेळा कसे वागावे हे कळतच नाही. अति बडबडया व अति हूड मुलगा आहे. आईला कधी कामात सुचू देणार नाही. तर कधी मला निवांत बसू देणार नाही. नित्याप्रमाणे आजही त्याच्या तोंडाची बडबड चालू होती. पण आजची त्याच्या तोंडाची बडबड जरा वेगळीच वाटली. ताई, तुझं लग्न ठरलंय म्हणे. तू आता दुसऱ्याची होणार अशी काहीशी त्याची बरीच बडबड चालू असताच, त्याने मला एक शब्दही बोलू न देता ओढतच खाली नेले. मला पहाताच सर्वांनी माझेकडे कौतुकाचा दृष्टिक्षेप टाकला. वडील म्हणाले, “ पोरीने नशीब काढलं. ” तर आई म्हणाली, “ आहेच तशी माझी पोर. ” यामध्ये काय समजायचे ते समजून मी वर आले व खोलीचे दार लावून घेतले. अन् आरशासमोर मी उभी राहिले. माझ्याच प्रतिबिंबाला पाहून मी लाजले. “ हं ! एवढं काही फुशारून जाऊ नका म्हटलं शिलूताई ! इतरांचीही लग्नं होतात. ” असंच काहीतरी मी आरशासमोर उभी राहून पुटपुटत होते. चटकन् भानावर येत माझी मीच किती लाजले म्हणून सांगू. त्या रात्री मी आमच्या गच्चीवरच्या शीतल चंद्रप्रकाशात पहुडले असताना मनात कितीतरी आनंदाच्या, उत्साहाच्या व आशेच्या लाटा उसळत होत्या. मधुनच वाऱ्याच्या मंद लहरींबरोबर माझ्या भावी स्वप्नाच्या मंदिरातील घंटा मधुर किण-किण करत होत्या. किती प्रशांत, किती समाधानकारक स्वप्ने होती ती —! माझ्या आयुष्यात येणाऱ्या पतिदेवाला वहाण्यासाठी माझ्या सर्वस्वाची कोमल फुले किती आतुर झाली होती. नव्याने आयुष्यात येऊन, आयुष्यातील नियतीच्या चक्राबरोबर आनंदानं आणि धिमेपणाने मला हाताला धरून घेऊन जाणारी व्यक्ती—छे व्यक्ती नव्हे माझं माणूस—नव्हे माझेच प्रतिबिंब. मीच मला स्पष्ट दिसू लागले. त्यांचं सुख, त्यांची सेवा याखेरीज माझं दुसरं जीवन मला नव्हतंच. प्रेमाचा वर्षाव करून त्यात आपण आपल्याला विसरायचं मी ठरवलं. चन्द्राच्या प्रकाशात माझ्या मनोरथांना तेज चढत होते. चंद्राला साक्ष ठेवून माझ्या जीवन साथीदाराच्या पुढं नंदादीपाप्रमाणे मी संथपणे तेवत रहाण्याचा निर्धार केला. मला इतर जग आता माहीत नव्हतं. आमच्या जगात मी माझं छोटसं घरकुल कसं असावं, याचा विचार केला. निरनिराळया रंगीबेरंगी विविध फुलांनी नटलेली बाग, टुमदार घर, मोजक्याच पण आकर्षक पद्धतीनं मांडलेले फर्निचर, आधुनिक स्वयंपाकघर, एक ना दोन. चंद्र माझ्याकडे बघून हसत नव्हता आणि म्हणूनच मी मनोरथ करत असताना , मला लाज वाटत नव्हती. पण बाई ! हे सगळं त्यांना विचारून. त्यांच्या इच्छेनुसार करायचं. ऑफिसातून हे घरी यायच्या अगोदर त्यांना चहा, खायला

करून दारातच त्यांचं गोड स्वागत करायचं. पण संबंध दिवस त्यांच्याशिवाय घरात मी रहाणार कशी? या विचाराने उगाचच माझे डोळे पाणावले. आणि सुखात सुद्धा माणसाला आनंदाश्रूंचं भरतं येतं ना! तसंच माझं झालं. भविष्यकाळातील माझ्या पहिल्या रात्रीची वाट बघत, माझ्या प्रियकराच्या आगमनाची प्रतीक्षा करत, देवाचे स्मरण करत मी स्वप्नांच्या दुनियेत झोपी गेले.

अखेर तो गोड लग्नाचा दिवस उजाडला. सगळीकडे धांदल चालली होती. वाजंत्री वाजत होती. तर कोण-कोणाला हुकूम सोडीत होते. माझे मात्र कशाकडेच लक्ष नव्हते. बावरलेल्या मनाने इकडे तिकडे पहात असताच, माझ्या मन:चक्षूसमोरील आंतर पाट दूर झाला. एकमेकांनी एकमेकांना हार-तुरे देऊन, आपण एक झालो आहोत अशी इष्टमित्रांसमवेत, देवाब्राह्मणादेखत साक्ष पटवून दिली. बँडच्या निनादातच.

त्याच रात्री नवीन आयुष्यातील पहिली पायरी चढून मी वन्संच्या सूचनेवरून माडीवर, ह्यांच्या खोलीत प्रवेश केला. खोलीचे निरीक्षण करत, ह्यांची मी उत्सुकतेने प्रतीक्षा करत होते. मनामधे हजारवेळा लाजले आणि घाबरूनही गेले. पण लाज, भीती, उत्सुकता, मिनिटामिनिटाला वाढू लागली. जसजसे घड्याळाचे ठोके पडत तसतसे ह्यांच्या भेटीकरिता मन अधिकाधिक धाव घेऊ लागले. क्षणाक्षणाला माझी नजर दाराकडे उत्सुकतेने धाव घेई. पण शेवटी घड्याळामध्ये एकचा टोला पडला. केवढी दचकले मी! पण पदरी निराशाच पडली. तिकडून अजूनही येणं झालं नव्हतं. सर्व जग झोपी गेलेलं होतं. शांतता मोठी भीषण वाटू लागली. कुठंतरी दूर कुत्रं भुंकत होतं पण त्याचे भुंकणेही कानाला मोठं विचित्र वाटू लागले. शेवटी माझ्या रचलेला मनोरथांचा डोलारा पडतो की काय असा भास होऊ लागला. शेवटी पहिली रात्र अश्रूंनी भरून निघाली. पहिल्या रात्रीच्या गर्भात उद्याच्या सोनेरी दिवसाची मी वाट पहात असताच दुसरे दिवशी ह्यांना आपण, रात्री का बरं उशीर केलात, हे विचारण्याचे धाडस करणार, तोच ह्यांचे कर्ण-कर्कश स्वर माझे कानावर पडले. मी काय सांगतो ते नीट ऐका. तुमचं माझं लग्नं हे केवळ मोठ्या माणसांच्या समाधानाकरिता झाले आहे. तेव्हा मी कसाही वागेन, त्यावर तुम्ही प्रश्नोत्तरे विचारू नये. तुम्हाला कपडा-लत्ता, खाणेपिणे, यात कुठे कमी पडणार नाही. हे ऐकताच माझे पाय थरथर कापू लागले. आपलं मन कुठं आहे–आपण कुठं आहोत–कुठंतरी खोल-खोल दरीत आपण डुबतो की, काय असा मनाचा कोंडमारा होत होता. एखादी बांधलेली इमारत अचानकपणे ढासळावी. तद्वतच माझ्या मनोरथांची व्यथा झाली. सर्व जीवन शून्य, निरर्थक वाटू लागले. तरीही नित्याच्या कार्यक्रमात कधी खंड पडू दिला नाही. रोज नित्याप्रमाणे मुकाट्याने कामाची गती चालू केली. हे करत असताना माझे डोके ताळ्यावर नसे. कामातही चुका अनेक होऊ लागल्या. काचेच्या वस्तू वरचेवर फुटू लागल्या. गांगरलेल्या स्थितीतच मनाचा विचार दुसऱ्या फेराने

सुरू झाला. ह्यांच्या रूपाला शोभेल अशी मी मदनाची पुतळी नव्हते खरं ! पण ह्यांच्या विचाराला तरी माझ्या विचाराची जोड मिळाली असती. पण तिकडून कधी बोलणेच नसे. कर्तव्याची साक्ष ठेवून मी ह्यांच्या सेवेत कधी कमतरता पडू न देण्याची जास्त खबरदारी घेतली. ह्यांचं काम करण्यातसुद्धा सुख मानू पहात होते. पण जसजशी मी ह्यांची सेवा अधिक करू लागले. तसतसे हे अधिकच रागवत चालले. ह्यांच्या या अशा वागण्यानं मला ह्यांच्या स्वभावाचा उलगडाच होईना. दैव मोठे विचित्र आहे.

आज मंगळागौरीचा दिवस. पण माझे त्याकडे मनापासून लक्षच लागेना. मैत्रिणींचे मोठे आग्रहाचे निमंत्रण होते. त्यामुळे तिच्याकडेच मी पूजेकरिता गेले होते. सर्व सुवासिनी एखाद्या गुलाबाच्या टवटवीत फुलाप्रमाणे प्रसन्नता घेऊन, पूजेची उत्सुकता वाढवीत होत्या. माझं उदास मन या सर्वांच्याकडे पहात असतानाच. सर्व निरर्थक आहे. कशात अर्थ नाही. प्रेमा-माया-इच्छा हे सर्व झूट आहे. जगात देवाचे अस्तित्वच नाही. अशा विचाराने डोळ्यात तरंगलेले अश्रू दडवता येईनात. माझी ती जिवलग मैत्रीण होती. त्यामुळे तिच्यापाशी मनसोक्त अश्रूंना वाट करून दिली. मंगळागौरीला शेवटी अश्रूंच्या फुलांनीच पुजले. माझ्या मैत्रिणीने मला खूप समजावले. स्त्रीजातीला या संसारामध्ये अनेक प्रकारचे चटके बसत असतात. म्हणन स्त्रीने त्यामध्यें होरपळून न जाता, त्यातून तरून वर आले पाहिजे. " शीला ! तू तुझा निश्चय ढळू देऊ नकोस. त्यांच्या सेवेत कमतरता करू नकोस. जितकी सहनशीलतेची मर्यादा ओलांडशील तितकेच पुढे तुला खात्रीनं सुख मिळेल. "

तिच्या उपदेशाचा डोस औषधाच्या कडू डोसासारखा वाटला खरं ! पण तोच सदैव आचरणात आणण्याचा प्रयत्न सुरू केला. ह्यांच्या पायाच्या चरणी माझ्या जीवनाच्या फुलाचे निर्माल्य झाले तरी चालेल. पण ह्यांच्या कामात कुठंच न्यूनता पडू न देण्याची खबरदारी घेतली. इतकं मन मारून, मी माझ्या शरीराचीही कधी परवा केली नाही. पण एक दिवस तर ह्यांनी माझ्या हृदयावर भयंकर प्रहार केला. आपल्या मैत्रिणीला घेऊन त्यांनी घरात प्रवेश केला. ते पहाताच माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. माझी तळपायाची आग मस्तकाला पोहोचली. पण सगळ्याच भावना काही शब्दाने व्यक्त होत नाहीत ! माझे दुखावलेले मन मला दाबूनच ठेवावे लागले. मैत्रिणीच्या उपदेशाचे आचरण सोडले नाही. जगाच्या रहाटीप्रमाणे आपले जीवन नाही. काही तरी आयुष्यात रोज नवीन घडते आहे. व अशा प्रकारच्या आयुष्याच्या दिव्यातून पार पडणे. मला मोठं कठीण जात होतं. अखेर मन घट्ट करून द्वेष-मत्सर व मत्सराने तापलेल्या शरीरातील रक्तवाहिन्या हे सर्व मैत्रिणीच्या उपदेशाच्या डोसाची आठवण होताच बाहेर दिसू न देता प्रफुल्लित चेहऱ्याने मी तिचे स्वागत केले. भूमिका मोठी अवघड होती. पण कसबाने त्यातून तरून निघाले. ती आल्यावर मी हसतमुखाने तिचे स्वागत करी. पण ज्या ज्या वेळी मी तिचे स्वागत

करी त्या-त्या वेळी हे माझ्याकडे आश्चर्याने बघत. अशाच एका संध्याकाळी ह्यांची तब्येत किरकोळच बरी नव्हती. म्हणून ते आपल्या खोलीत कॉटवर जाऊन पडले होते. माझे मन त्यांच्याकडे जाऊन केव्हाच पोहोचले. बोलणं तर कधीच नसे. पण तरीही भीतभीत माझ्या मायेची गुंफण नको तिथं जाऊ पहात होती. अखेर हळूच मी खोलीमध्ये प्रवेश केलाच. बहुधा ह्यांना झोप लागली होती. खिडकीतून वाऱ्याची मंद झुळूक येई. त्याचा त्रास होऊ नये म्हणून मी हलक्या हाताने ह्यांच्या अंगावरून मायेचा हात फिरवून रग पांघरला. पहाता-पहाता माझ्या डोळ्यात अश्रू तरंगले व त्यातील एक अश्रूबिंदू नकळतच ह्यांच्या गालावर टिपकला. आणि तेवढ्यानेच स्वारी जागी झाली. कसली घाबरले बाई मी ! बावरलेल्या स्थितीतच मी खोलीतून तोंड फिरवून निघणार तेवढ्यात ह्यांनी माझा हात धरून मला खाली बसवले. ते क्षणभर माझ्याकडे नुसते पहातच राहिले. त्यांचे ओठ नुसतेच हलत होते. शब्द मात्र बाहेर पडत नव्हते. शेवटी स्वतःला सावरून ते म्हणाले, " किती मोठं मन आहे तुझं ! का प्रेम केलंस माझ्यावर एवढं. " एवढं बोलून ते खिडकीजवळ गेले आणि परत मागे वळून म्हणाले– ' सगळ्यांच्या जीवनात सुख असतंच असं नाही, माझंही असंच झालं. आज माझं मन तुझ्यासारख्या निष्पाप कलिकेला पाहून आपली व्यथा सांगायला तयार झालंय. माझं एका मुलीवर प्रेम होतं पण निर्दय परमेश्वराने तिला माझ्यापासून हिरावून घेतलं. आणि मी आजन्म अविवाहित राहण्याचा निश्चय केला. पण वडीलमंडळीच्या हट्टापुढे माझा निश्चय ढळला. आणि मी तुझ्याशी विवाहबद्ध झालो. आजवर तुझ्याशी मी फटकून वागलो. पण यापुढं आता मला जगायचंय ते " तुझ्यासारख्या नंदादीपाच्या प्रकाशात न्हाऊन जाऊन " ! असं म्हणत, त्यांनी मला जवळ ओढली----अगदी बाहुपाशात........! !

परमेश्वराचे खरेखुरे स्वरूप या आनंदात आहे. हे आज मी जाणू शकते. लग्न संस्काराची कोवळी उन्हं मला प्रथम उपभोगण्यास मिळाली नाहीत. कारण माझी मंगल प्रभातच माध्यान्हातील तप्त किरणांनी सुरू झाली. आता मात्र आयुष्याच्या अंतापर्यंत लग्न संस्काराची कोवळी उन्हं उपभोगण्याचा आनंद मिळणार आहे. परंतु आमच्या पहिल्या वर्षाची कथा ही अशी आहे.

खरोखरच अभंग विश्वासाने, हातात हात घालून संसारातील सुखदुःख-वैफल्याची वाटचाल करायची, त्यागात सुख मानायचे, यातच वैवाहिक जीवनाची सार्थकता असते. आणि हा साक्षात्कार एका वर्षाच्या तपश्चर्येनंतर का होईना घडून आला. यातच मी माझ्या जीवनाचे साफल्य झाले असे समजते. खरोखर ! किती सुखात आहोत सध्या आम्ही. परमेश्वराचे दर्शन प्रेमरूपाने घेताना मनात आनंद लहरी उसळल्याशिवाय रहात नाहीत. आणि मग म्हणावं वाटतं–

" Love thy name is God. "

□

## ४९

## सौ. ‘सया’

माझा परिचय— माझं पूर्ण नाव सौ. सयाबाई ज. काशिनाथ तेलगोटे. पण ते मला नेह्मी ‘सरिता’ म्हणतात. मी परिस्थितीनुसार फक्त पाचवा वर्ग पास झाले. आईतर लहानपणीच देवाला लाडकी झाली. बाबा तर पुढे चालून आईच्या भेटीला गेले. घरात त्यांच्या मागे मी व माझा भाऊ. आम्ही किती लहान लहान होतो! किती मुशीबत सहन केली! पण देवाने आम्हाला तारले. अशा परिस्थितीत दिवस निघून गेले. आम्ही जवान झालो. माझा भाऊ कसून मेहनत करू लागला. आणि आता त्याने पानपट्टी दुकान लावून तो आनंदात आहे. ज्या वेळी आमचेवर परिस्थिती वाईट होती त्या वेळी आम्हाला कोणीही सहारा दिला नाही. कोणीही प्रेमाने वागविले नाही.

मला पुष्कळ मागण्या आल्या होत्या पण ते एक तर मी रंगाने काळी, दुसरी परिस्थितीची पाळी आणि त्यात मी पिडलेली एक दुर्भागी! जो यायचा तो काळा रंग पाहून व परिस्थिती पाहून नकार द्यायचा. हे पाहून भाऊ नाराज व्हायचा आणि मी पण मनात दुःखी व्हायची. तरी पण देवावर विश्वास ठेवून जीवन जगायची.

आणि खरोखरच एक दिवस माझ्या भाग्याचा निघाला ( उजाडला ) व हे माझे महाशय आले, व काही आपल्या धर्माप्रमाणे गोष्टी झाल्या. पण माझे मामाजी यांनी सुरुवातीला मला नकार दिला. पण यांनी आपल्या वडिलांची मर्जी न संभाळता माझ्या भावाला लग्नाची संमती दर्शविली. त्यांची संमती पाहून मला इतका हर्ष झाला की, माझ्या डोळयांतून आनंदाश्रू वाहू लागले. हे पाहून भाऊलादेखील गहिंवरून आले व तो म्हणाला, “ ताई, काय झालं ग तुला रडायला ? ” “ काही नाही रे दादा ! ” मी म्हणाले. लग्नाची तारीख, मुहूर्त घडून आले आणि आमचे लग्न एका शुभ मुहूर्तावर पार पडले. त्या गडबडीत मला लग्नाची नक्की तारीख माहीत राहिली नाही.

लग्न ठरले त्या दिवसापासू न मी मनात एवढे ठरविले होते की, मला कुणीच सहारा दिला नाही ना, मी त्यांना इतका जीव लावीन की, मी त्यांच्यासाठी वेडी होऊन जाईन. कारण त्यांनी मला–एका अनाथाला– सहारा दिला, मला आपल्या जन्माचे साथी करून घेतले. मी त्यांच्यावर इतकं प्रेम करीन की, बस! — आणि त्याचबरोबर त्यांच्या घरातील मंडळींवर–माझ्या सासूबाईंवर–माझ्या सासऱ्यावर खूप ( पुष्कळ ) विश्वास निर्माण करील. ते पण मला आठवण करतील की, “मी उगाचच सूनबाईला नकार दिला होता.”–त्याचप्रमाणे माझे इतर नातेवाईक, दीर, वहिन्या, भाचे, वगैरेवर खूप प्रेम करील व आपले आयुष्य खर्ची घालील !

आणि लग्नाचे दिवस उजाडले ! मंडपात लग्न पार पडले. दिवस-रात्री भराभर चालले. तिसरी रात आमच्या खोलीत सजावट विचारू नका. ते पाहून माझे मन खूप आनंदले. इतक्यात. . . . .दारावर. . .ठक. . .ठक. . .ठक. .. आवाज आला. मी डोक्यावरील पदर सावरून उभी राहिले. ते पाहून ते जरा स्तिमित झाले व पुढे पुढे येऊ लागले. ते पाहून माझे मन थरथरा कापू लागले. मला हादरे बसू लागले.

त्यांनीच मला विचारले, " तुझे नाव काय आहे ? " मी त्यांना घाबऱ्या आवाजात सांगितले, " सया ! " ते म्हणाले, " अरे वा, खूप सुंदर नाव आहे तुझं ! " असे म्हणून ते उठले व माझ्या शेजारी येऊन उभे राहिले. हे पाहून मी घाबरून जरा दूर झाले. त्यांनी हळूच मला विचारले, " तुला कोणता फोटो आवडला यापैकी ? " त्यावर मला काहीच सुचेना. नंतर त्यांनी पुन्हा विचारले, " तुला सिनेमा पाहणं आवडते का ? " त्यावर मी त्यांच्या तोंडाकडे पाहून स्मित केले. ते पाहून पुन्हा ते माझ्याकडे सरकले व म्हणाले, " तर मग उद्या जाऊ आपण ." त्यावर त्यांनी मला त्यांच्या दवाखान्यातील पुष्कळ गोष्टी सांगितल्या आणि जवळ जवळ म्हणजे ती रात्र जागरणातच गेली. पहाट झाली. त्यांनी मला सांगितले की, सायंकाळी मी कपडे घालीन तर समजायचं की, 'जावं लागतंय.' नंतर सकाळी स्नान आटपून, नाश्ता वगैरे करून ते आपल्या कामावर जावयास निघाले. जाताना मला डोळा लावून इशारा केला आणि निघून गेले. मला तर हा दिवस केव्हा निघून जातो आणि केव्हा ते घरी येतात व केव्हा चार वाजतात असे झाले. अशाच विचारानं दिवस निघून गेला आणि खरोखरीच चार वाजले ! मग मात्र माझा जीव घाबरला जरा. ते स्नानसंध्या आटपून कपडे बदलू लागलेले पाहून मला जरा थरकाप आला. हे पाहून सासूबाई म्हणाल्या, " सयू, तू कपडे बदल पाहू ?" आणि आम्ही कपडे बदलून निघालो तर माझ्याच मनात आले की, लोक म्हणतील, पाहा ना –! पण छे:–!

प्रथम महाशय मला घेऊन आझाद-पार्कवर गेले. तेथे मला त्यांनी खूप माहिती सांगितली. नंतर तेथून त्यांनी मला सायकलच्या डबलसीटवरून नेहरूपार्कवर नेले. तेव्हा मला कसेसे वाटले. मी त्या ठिकाणी त्यांना म्हटले, " हे काय, आपण सिनेमा पाहणार ना ?" इकडेतिकडे फिरून ते म्हणाले, " आता तर कोठे पाच वाजले. अजून एक तास बाकी आहे. " त्यांनी मला विचारले, " तुला यापैकी काय आवडते ?" त्यांना मी सांगितले, " जी तुमची आवड तीच माझी आवड !" त्यावर ते म्हणाले, " बरे तर ! " असे म्हणून त्यांनी मला एक आंगठी दिली व म्हणाले, " जर आपण एकमेकांपासून दुरावलो, तर हीच एक आठवण !" हे ऐकून मला खूप दु:ख झाले. मी म्हणाले, " काय म्हणता तुम्ही ! मी तुमच्यापासून जाऊ तरी कुठे ? " " बरं तर, चल, ! " ते म्हणाले, आणि येऊन सिनेमाची तिकिटं

काढली. त्या वेळेला पाहिला आम्ही ' जंगली '—सिनेमात काय विचारता. . . .हं! नंतर सिनेमा पाहून आम्ही घरी येऊन जेवण वगैरे घेऊन झोपायच्या खोलीत गेलो आणि ती रात्री ' जंगली ' सिनेमाच्या धुंदीत चालली असता आमच्या महाशयांनी आपला स्वार्थ साधला ! तेव्हा किती गोड रात्रीची राणी आपली कळी उमलवीत होती आणि त्यात आम्ही मस्त, मग्न होतो. . . ..नको ! ते मला रागावतील.

एक वेळ त्यांनी मला आमच्या कापशी तलावावर नेले आणि मला पुष्कळ माहिती सांगितली. अशाच वेळी आम्ही थकूनभागून आंब्याच्या झाडाखाली बसलो. नाना प्रकारच्या गप्पागोष्टी चालू आणि फराळावर ताव मारणं चालू. फराळ आटोपल्यावर हळूच आम्ही थंडगार सावलीत लोळू लागलो आणि एक-मेकांच्या प्रश्नोत्तरानं एकमेकांचे मन जोडू लागलो. त्यांनी हळूच म्हटले, " सरिता, एक-दोन वर्ष मोठी आनंदात व मजेत जातील, पण नंतर. . .." मी म्हणाले, " नंतर काय ?" " अग, लहान लहान मुन्ने येतील, आपणा दोघांना खेळवतील आणि मग हे खेळणं बागडणं सर्व लयास जाईल नाही ? " छे हो, अशा काय गोष्टी ? "

—आणि आम्ही थोडा वेळ एकमेकांच्या बाहुपाशात सामील झालो. इतके आनंदात बुडून गेलो ते विचारू नका. काय सांगू, विचारू नका. अशाच एका वेळी त्यांच्या बहिणींचा आट पडला. मी त्यांना सांगितले, " किती दिवस ठेवणार त्यांना ! " त्यांनी मला उत्तर दिले, " मी काय करू ?" आणि खरोखर ते तरी काय करणार ? मीच तिला म्हटले, " सुनंदा, सासरी जाऊन पतीची, सासूसासऱ्यांची मनोभावाने सेवा करावी !" हे तिने त्यांना सांगितले आणि त्यांना मला ६ महिन्यांच्या आत १ धम्मक लाडू व चापटपोळीचा प्रसाद दिला. ते खाऊन पोट तर भरलेच. उलट पाणी न पिता पोटातील पाणी डोळ्यावाटे पडले. ते पाहून त्यांना फार वाईट वाटले. त्यांना पश्चात्ताप झाला आणि रात्री मला हळूच म्हणाले, " सरिता, ए सरिता, का माझा राग आला ? का मला क्षमा नाही करणार तू ? हे घे, मी माझे हात जाळून टाकतो !"—असे म्हणून ते दिवालगीटी पकडणार, एवढ्यात मी गेले व त्यांना मिठी मारली आणि तेव्हा खरोखरच आमच्या घरातील दिवालगीटी पार विझून गेली होती. काय काय सांगू ? किती किती सांगू, तेच कळत नाही, आणि अशा गोष्टी सांगणे मला फार तर आवडत नाही. तर-बरे भय्या—

आपली,

सया

□

८०

**सौ. ' शुभा '**

माझं लग्न जमलं. . .अगदी अनपेक्षितपणे! घरात माझ्या लग्नाचं सूतोवाचही नव्हतं आणि अचानक एका नवरदेवाने माझ्या मावसभावातर्फे मला लग्नाचं विचारलं. . . मी माझ्या मावशीला. .नव्हे जिवश्चकंठश्च मैत्रिणीला सांगितलं. .तो स्वतःच विचारतोय न मग मोठ्या माणसांच्या तर्फेच होऊ दे न " मावशी बरं म्हणाली ! तिने लगेच घरात सांगितलं. . .नवरा मुलगा सर्वच दृष्टीने चांगला होता. . .शिक्षण, पैसा आणि रूप ! हुंड्यामुळं अडेल कदाचित् असं वाटलं होतं, पण माझ्या सासऱ्यांनी विशेष काहीच न मागता माझे लग्न जमले . .!

लग्न जमले आणि थोड्याच दिवसांनी केवळ दोन दिवसांच्या आजाराने माझे बाबा गेले . .एक प्रिय व्यक्ती जवळ यायला थोडेच दिवस राहिले होते तर एक प्रिय व्यक्ती फार दूर गेली होती. .! बाबा गेल्यावर वाटत होतं सध्या लग्नच करू नये. नोकरी करावी आणि भावंडांचं शिक्षण पुरं करावं. पण माझं कोण ऐकणार होतं ? " शुभमंगल सावधान " च्या गजरात मी नव्या आयुष्यात पदार्पण केलं ! पतीच्या सुखात सुख आणि दुःखात दुःख मानायचं ठरवून बाबांचे दुःख दडवून लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी आम्ही माथेरानला गेलो. हनिमूनच्या त्या सातआठ दिवसात ह्यांनी अनेक हौशी आवडी पुरवल्या ! आम्ही परत घरी आलो. .माझे सासरचे दिवस फार चांगले जात होते. .सारेजण माझ्यावर प्रेमाचा वर्षाव करत होते. . . " सासरच्या घरी आले माहेर. . माहेर ! माय काय सासू झाली. . " हाच अनुभव मला येत होता. अगदी ५–६ दिवसात मी सर्वांच्यात रमून गेले. .सर्वांच्यावर मी मनापासून प्रेम करू लागले. माझे धाकटे शरद भावोजी इंटरच्या परीक्षेत नापास झाले होते आणि तेव्हापासून जेवणखाण, चांगले कपडे घालणं, दाढी करणं सारं वर्ज्य केलं होतं. . स्वतःच्याच तंद्रीत बसायचे. मी एक दिवस त्यांना म्हटलं, ' भावोजी दाढीचं सामान ठेवलंय, दाढी करा, मी आंघोळीचं पाणी काढते. " माझ्या शब्दात काय किमया होती कोण जाणे. . . ते माझं सारं काही ऐकू लागले त्यामुळे तर मी सर्वांच्याच कौतुकाचा विषय होऊन बसले. " शरदला दोन दिवसात ताळ्यावर आणलं हो ! " असं ते म्हणू लागले. ह्यांच्या रजेचे दिवस पटकन् संपले आणि आमचा जबलपूरला जाण्याचा दिवस उजाडला ! स्टेशनवर पोहोचवायाला सारेजण आले होते. . गाडीची बेल झाली. माझ्या वन्सं जवळ आल्या आणि म्हणाल्या, " श्रीला एकटं इंदूरला पाठवू नकोस हं ! " मी चकित झाले ! ' का ! ' असं म्हटलं पण गाडी आली. . . तो का हा सतावणारा प्रश्न आणि नव्या संसाराची स्वप्नं, रंगवत असताना आमच्या घरात कधी आलो

ते कळलंच नाही ! आमचे घर छान होते. मी घरात गेले, हातपाय धुतले आणि 'बॅगेच्या किल्ल्या द्या ' म्हणून ह्यांना हाका मारू लागले. ह्यांनी ओच दिली नाही. म्हटलं स्वारी मुद्दामच करते आहे, म्हणून ह्यांच्या खोलीत गेले. तर हे खिडकीतून समोरच्या मुलीला खुणा करण्यात गुंगलेले ! मी तशीच मागे गेले. पण मनाला आवर घालून वेडे विचार झटकून टाकले ! त्यानंतर हा प्रकार मी वरचेवर पाहिला, समोरच्या त्या तरुण मुलीला काय म्हणावं कळेना, एक दिवस सगळ्या खिडक्यांना पडदे लावून टाकले, पण पडदे लावून काय फायदा होणार होता ! एक दिवस सरळ समोर गेले आणि म्हटलं, " हे पुरुष आहेत तुमच्या मुलीला ताब्यात ठेवा ! "

माझा नवा संसार सजवण्यात मी गुंगून गेले. एक दिवस सारा पसारा काढताना पत्रांचा गठ्ठा मिळाला. मी सारी पत्रं भराभर वाचून काढली. मी काय वाचत होते ! त्यातला एक हीशब्द सांगण्यासारखा नाही. हिंदू स्त्रीने वाचू नये आणि उच्चारही करू नये. अनेक मुलींची ती पत्रं होती. ह्यांनी फसवलेल्या अनेक प्रेयसींची पत्रं ! आणि अगदी आमच्या लग्नापर्यंतच्या दिवसांची पत्रं होती ती ! काहीच त्रास न पडता माझे लग्न जमले होते आणि ते सुद्धा एका सधन सुस्वरूपरुबाब; दार तरुणाशी. सुखाच्या झोपाळ्यावर बसून मी उंच उंच झोके घेत होते पण माझ्या नशिबी भलतेच वाढून ठेवले होते. उंच गेलेला माझा झोपाळा एकदम खाली आला होता, मी धाडकन् खाली पडले होते. संसाराच्या रम्य स्वप्नांचा बंगला कोलमडून पडणार असं वाटलं. पण मी धीर धरला, ह्यांच्याशी अधिक गोडीने वागूलागले! फिरायला गेल्यावर भेटेल त्याला " नसती धोंड गळयात बांधून घेतली " हे ह्यांचं वाक्य चेष्टेचं नव्हतं, खरं होतं, ह्याचं प्रत्यंतर मला आलं ! टूरच्या निमित्ताने हे दिवसचे दिवस घरी येत नसत इंदूरला तर वारंवार जात. मी येते म्हणून हट्ट केला तर वाटेल तसं बोलत आणि नंतर मारूही लागले.

वटसावित्रीची पूजा आली, मी मनोभावे पूजा केली आणि. जन्मोजन्मी हाच पती लाभू दे हे तोंडात आलेले शब्द मनात गिळून टाकले. ह्यांना मी नको असताना परत परत ह्यांना दुःखात टाकायला सांगण्याचा काय अधिकार होता मला !

श्रावण आला, मंगळागौरीकरिता मी माहेरी आले, श्रावण म्हणजे नव्या वधूकरिता धावपळीचा, आनंदाचा ! मी वरवर हसत होते, पण मन मात्र आषाढातल्या काळ्या ढगांनी व्यापलं होतं ! सासरी आल्याआल्याच सासूबाईंनी विचारलं " ठीक चाललंयना सगळं ! " मी आनंदाने म्हटलं " हो " ! ह्यांनी समाधानाचा एक निःश्वास टाकला. मी सारं उमगले. वाटलं सांगावं सगळं ! पण म्हटलं जाऊ देत ! सुधारतील हे ! तशा त्या कडक स्वभावाच्या !

नव्या वधूंचे नवे अनुभव ऐकत होते कुठे पैशांची ओढाताण, कुठे घरात मतभेद, कुठे गोड गोड हितगुज ! माझ्या सासूनं खूप छळ केला असता तरी चाललं असतं, पैसे कमी असते तरी भागवलं असतं पण माझ्या ह्या दुःखाचं स्वरूप. . .ह्या

कळा ! ‘ कळा ज्या लागल्या जीवा. कुणाला काय सांगावे’ ? माहेरीही मी सुखाचा बुरखा पांघरून वावरले आणि नव्या आशा मानात बाळगून परत ह्यांच्याकडे गेले !

माझ्या १ महिन्याच्या विरहानं ह्यांच्यातील व्यसनं वाढली होती, रोजरोज हिच्याकडे जातो, तिच्याकडे जातो असं हे सांगत होते ! लग्न जमल्यावर हे प्रथमच घरी आले होते. महाराष्ट्रात कमी राहिल्याने ह्यांना मराठी येत नसे व हे हिंदीतच बोलत, आणि दिसायलाही हे महाराष्ट्रीयन वाटत नसत, माझे बाबा गंमतीनं म्हणाले होते ‘ हा आपला जातवाला आहे ना ? नाहीतर निघायचा काझी !’ चेष्टेने काढलेले त्यांचे उद्‌गार किती खरे ठरले होते !

आईने बोलावूनही गणपतीला मी माहेरी गेले नाही, दिवाळसणाला आम्ही दोघंही मुंबईला आलो. मला खूपशा साड्या घेऊन प्रेमाचं प्रदर्शन हे करत होते. आणि त्यांच्या नाटकात मीही सामील झाले होते ! ( घेतलेल्या साड्या नंतर कुठे कुठे जात हे मीच एक जाणे हे वेगळंच ) वाटत होतं ह्यांना सांगावं मला इतर काही नको, फक्त तुम्ही, तुमचं हृदय हवं आहे.

लग्न करून स्वातंत्र्य गेलं असं हे वारंवार म्हणत, वाटेल तसं बेतालपणे वागूनही ह्यांचं स्वातंत्र्य कुठे कमी झालं होतं कोण जाणे ! ह्यांनीच मला मागणी घातली होती, आईवडिलांच्या पसंतीने आणि बळजबरीने थोडेच लग्न झाले होते ? मग हे असे का ? माझ्यात काय कमी होते ! मी सुंदर होते. हुशार होते. पण फुलपाखराला काय ? सुंदर फुल थोडंच हवे ? एकाच फुलातला मध शोषून थोडेच समाधान होणार ! हे अगदी एखाद्या सुंदर फुलपांखराप्रमाणेच होते !

संक्रांतीला मी माहेरी आले, येताना ह्यांना आलेली सर्व पत्रे बरोबर आणली होती. तोंडाने कुणाला काही सांगायचा धीरच नव्हता, पत्रांचा गठ्ठा नीट बांधून मी आईकडे दिला, वाटलं ही वाचील कदाचित् ! पण पतिदुःखाच्यात चूर झालेल्या ह्या माऊलीला ह्या गठ्ठ्यांत काही वावगं असेल ह्याची शंकाही आली नाही. मी परत ह्यांच्याकडे आले. कशावरून तरी रागावणं, भांडणं करणं आणि मग मला मारणं हा ह्यांचा नित्यक्रम होऊन बसला होता. मला मारल्यावर हे निघून जायचे. थोड्यावेळाने शेजारच्या वहिनी येत. पण काहीच झालं नाही अशा अविर्भावात मी वागत असे. इतर विषयांवर गप्पा मारत बसे. एक दिवस त्या माझ्या खूप मागे लागल्या. म्हणाल्या, काय झालं सांग ! तुला असं वाटतं आम्हाला काही माहित नाही, पण वाईट वाटतं कीं ह्याने ह्याच्या लग्नाची कुणकुणही आम्हाला लागून दिली नाही. न पेक्षा हे लग्न आम्ही होऊन दिले नसते. त्याचे सगळे थेर आम्हाला माहीत आहेत, वाईट वाटून घेऊ नकोस, पण हा काझीच्या वरचढ आहे. ह्यातून तू सुटका कर, माहेरी जा, घटस्फोट घे, आम्ही तुला मदत करू !” पण मी कशी माहेरी जाणार होते! बाबा असते तर गेले असते. आई तशी माहेरी गेलेली आधीच. सर्वजण बाबांच्या दुःखात त्यात माझे दुःख कुठे सांगू ? एकदा

मी माझ्या मावशीला सांगण्याच्या बेतात आले, आणि एवढ्यात कोणीसं आलं, मग मात्र मला काही सांगण्याचा धीर झाला नाही.

मोत्यांचा सर सुटावा आणि एक एक मोती भराभर गळून पडावा न तसं झालंय माझं. अनेक आठवणींचे मोती भराभर गळून पडतायत. एकदा मुंबईला गेले होते. दादरच्या शिवाजीपार्कहून हिंदूकॉलनीत चालले होते. हिंदूकॉलनीत घरी आल्यावर लक्षात आलं गळ्यात मंगळसूत्र नाही. मोठा अपशकून वाटला मला. मी हमसाहमशी रडू लागले. तशीच उठले, म्हटलं. बघू या मिळतो का ? वेळ संध्याकाळची होती. ५।। वाजले होते रस्ते शाळकरी मुलांनी, ऑफिसमधल्या माणसांनी भरून गेले होते. मी आल्या पावलीच रस्ता शोधत निघाले. प्लाझा सिनेमा आला. सिनेमा थिएटरपाशी लोकांची ही गर्दी होती. आणि फूटपाथखाली मला माझं मंगळसूत्र दिसलं. मी पटकन् उचललं. त्या वेळचा माझा आनंद शब्दापलीकडचा होता. 'मंगळसूत्राच्या रूपाने मला माझ्या पतीचं मनही जिंकता येईल.' ह्या कल्पनेने मी आनंदून गेले. परत जबलपूरला न जाता इथेच रहावं, नोकरी करावी हा माझा विचार कुठच्या कुठे पळाला !

मी जबलपूरला गेले. पण येरे माझ्या मागल्या. लग्न करून पस्तावलो, वगैरे भाषा क्षणोक्षणी येऊ ऐकू लागली. मार खाण्याची तर सवयच झाली, अखेर ठरवलं नणंदेला कळवायचं. माहेरी कळवून हे कोणाचं ऐकणार ! सर्व परिस्थिती मी नणंदेला व सासू-सासऱ्यांना लिहून कळविली. व कसंही करून याच म्हणून लिहिलं ! ते तिघंही आले. " मला वाटलं दिराला ताळ्यावर आणलास ह्यालाही आणलं असशील. मी सुटकेचा निःश्वास टाकला होता " सासूबाई आल्या आल्याच म्हणाल्या. म्हणजे एकंदरीत ह्यांना लेकाचे उद्योग माहीत होते तर ! मग का ह्यांनी आधी सांगितले नाही ? का माझी आहुती दिली ! भावोजींना वठणीवर आणलं म्हणून सर्वांनाच फार आनंद झाला होता, माझं कौतुक वाटलं होतं त्याचं कारण आता मला कळलं होतं ! ती लोकं २०–२२ दिवस होती, त्यातले १३–१४ दिवस हे टूरवरच होते ४–५ दिवसात बरं वागले पण एवढ्याने काय सुधारणा होणार ! दुःखात असूनही मी माझा संसार फार छान ठेवला होता, माझी कलाकुसर, पाककौशल्य साऱ्यावर सासरची माणसं खूष होती. पण त्यात मला काय आनंद होणार ? ते लोक इथली परिस्थिती माझ्या माहेरी कळवतील असं वाटलं होतं. पण त्यांनी काहीच सांगितले नसावं. न पेक्षा मला एखादं तरी पत्र आलं असतं ! आपणच सांगावं का ? पण छे. हे कसेही असले तरी माझे ह्यांच्यावर फार फार प्रेम होतं. त्यांच्याबद्दल काही सांगणं आणि माझ्या प्रेमामुळे माहेरच्या माणसांनी त्यांना बोलणं ही कल्पनाच सहन होत नव्हती ! ह्यांना नुसतं रागावून काय उपयोग होता ? त्यांच्याशी गोडीगोडीने वागूनच, प्रेमाचा वर्षाव करूनच मला ह्यांना–ह्यांच्या दगडरूपी मालान

पाझर फोडायचा होता. आणि म्हणूनच त्यांच्या बारीक सारीक आवडीनिवडींकडे मी लक्ष देत होते, हे कुठे जातात म्हणून चौकशीही करत नव्हते. गोड गोड बोलून ह्यांना मी माझं करणार होते. अगदी पहिल्या दिवसापासूनचा माझा हा निश्चय होता. घरात एक चिमणासा जीव येईल आणि घराचं नंदनवन होईल, माझ्या पतिराजांना घरची ओढ लागेल ह्या एकाच आशेने माझं मन मी आवरत होते !

उन्हाळ्यात लग्न होऊन माझ्या आयुष्यात रखरखीत वाळवंटच निर्माण झाले. ह्यांच्या अनेक भानगडी आषाढात माहिती झाल्या आणिमाझे मन आषाढातील काळाकुट्ट ढगाप्रमाणेच दुःखाने भरून गेले होते. पण धीर धरून वागायचे ठरवले होते ना ? श्रावणातील क्षणात ऊन क्षणात पाऊस माझ्याही मनात पडला होता, हळूहळू ह्यांचा छळ एवढा वाढला होता की आश्विन, कार्तिकमध्ये लोकांना थंडीमुळे शहारे येतात तर ह्यांच्या वागणुकीमुळे माझ्या अंगभर शहारे येत होते. वर्ष हे असंच गेलं. लग्नाचा वाढदिवस आला. म्हटलं थाटात करू आणि नवीन आयुष्याला सुरुवात करू पण उठल्याबरोबरच हे म्हणाले ' माझ्या तुरुंगवासाला वर्ष झालं..! खरंच होतं पण ह्यांच्या की माझ्या ?

— या बाई आता हयात नाहीत.

□

## ५१
## सौ. विमल
□

यौवनाची पहिली ऊर्मी जितकी उत्साही तितकीच आंधळी असते. व्यवहारातील काटेकुटे तिला दिसत नाहीत. स्वप्नातील सुगंध मात्र सतत तिच्याभोवती दरवळत असतो. अशा या स्वप्न सुगंधाच्या धुंदीतच मी यौवनात पदार्पण केले. नुकतेच १५ वे वर्ष संपत होते. अन् ज्याला स्त्रिया देव मानतात आणि आपले सर्वस्व अर्पण करतात अशा पतिदेवाची मी पत्नी झाले.

' कुर्यात सदा मंगलम् । शुभ लग्न सावधान । ' चा गजर, सनईचे सूर, जमलेल्या लोकांचा गोंगाट, मित्रमैत्रिणींची गोड चेष्टा, नावांची देवाणघेवाण, या सर्व गोड गोंधळाने माझ्या धुंदीला कैफ चढला होता आणि भावी संसाराची मनोहर सुखस्वप्ने रेखाटीतच मी उंबरठ्यावरील माप ओलांडले.

पहिल्यांदा सासरी येताना आईवडिलांच्या, बहिणभावंडाच्या, वहिनींच्या, मैत्रिणींच्या व इतर जमलेल्या मंडळींच्या डोळ्यातील अश्रू पाहून माझ्याही डोळ्यातील पाणी खळत नव्हते. इतके दिवस मी ज्यांच्या कुशीत राहिले, ज्यांच्या

परिवारात खेळले–बागडले, ज्या परिसरात वाढले, ज्यांच्या समवेत शिक्षण घेतले, ज्या वास्तूत सुखदु:खाचे अनुभव घेतले, त्या सर्वांपासून मी दूर जात होते. माझ्या स्वत:च्या हक्काच्या घरी जात होते. मी हक्काच्या घरी जाणार म्हणून सर्वांना झालेला आनंद व आपल्यापासून दूर जाणार म्हणून होणारे दु:ख असे संमिश्र वातावरण निर्माण झाले होते. मी सर्वांना नमस्कार केला. त्यांचा निरोप घेतला. पण पाय मात्र निघत नव्हते. पान्हावलेल्या गाईपासून तिच्या वासराला ज्या-प्रमाणे बळजबरीने दूर करतात त्याचप्रमाणे मामंजींच्या हाकेसरशी मी बाहेर ओढली गेले.

मी सासरी आले तेव्हा एका वेगळ्याच जीवनात पदार्पण केल्याचा प्रत्यय येऊ लागला. आता आपण कन्याच नव्हे तर पत्नीपदाचाही स्वीकार केला आहे याचा अभिमान व जबाबदारी वाटू लागली. तसेच आपल्याला आता सासरच्या माणसांशी समरस व्हायचे आहे, त्यांच्या बाबतीतील कर्तव्ये यशस्वीरीतीने पार पाडायची आहेत, ही जबाबदारी, ही कर्तव्ये पार पाडीत असतानाच ' ह्यांचा ' एखादा मिस्किल कटाक्ष धुंद करील, मधूनच ओझरता स्पर्श अंग मोहरून टाकील असे अनेक विचारतरंग मनात एकच गर्दी करीत होते. मन आनंदाने हलकेफुलके होऊन हवेवर तरंगत होते. आनंद आणि भीती यांची संमिश्र झाक चेहऱ्यावर उमटली होती, आणि अशा स्थितीतच मी गृहप्रवेश केला.

सुंदर, सुस्वरूप नवरा, गडगंज संपत्ती, चार मजली इमारत, पुण्यासारखे शहर आणि प्रेमळ, सोज्वळ माणसे पाहून वडिलांनाही अपार आनंद झाला. आईविना पोरकी असलेली मी गोरी-गोमटी, लक्ष्मीसारखी दिसणारी. सासू आई-सारखीच वाटली त्या वेळी मला ! पण ह्या जमदग्नीचा अवतार धारण करणाऱ्या महाजगदंबेने दुसरेच दिवशी आपले स्वरूप प्रकट केले. का तर लग्नातील देणे कमी पडले म्हणून ! वास्तविक दोन्ही पार्टर्या समान असल्यामुळे कशातच कमतरता नव्हती. पण क्षुल्लक गोष्टींवरून वादविवाद निर्माण झाला. माझे हृदय धडधडू लागले. परंतु झाली असेल माणसामाणसात काही तक्रार ! आपल्याला काय करायचे लक्ष घालून ! म्हणून मी दुर्लक्ष केले. परंतु अशा क्षुल्लक गोष्टींवरून रोजच उणेदुणे बोलणे सुरू झाले. तरीपण अशा गोष्टींच्याकडे कानाडोळा करून मी पतिदेवाची प्रेमभरी नजर वेड्यासारखी धुंडाळीत असे. परंतु एकदाही पतिदेवाचा प्रेमकटाक्ष माझ्या नजरेत भरला नाही. मी वर तर ते खाली ! मी आत तर ते बाहेर ! मग बोलणे तर दूरच राहो ! आपण होऊन बोलण्याचा प्रयत्न केला तर ' अगोदर तुझ्या बापाला सांग–देणे पुरे करायला मग माझ्याशी बोल ' हे ऐकून घ्यावे लागे. त्यांची ती बोलण्याची, वागण्याची तऱ्हा पाहून माझ्या दिलाचे हजार तुकडे झाले. तरी पण ' धीर धरी रे, धीरा पोटी असती मोठी फळे गोमटी ।' या तत्त्वाने अत्यंत सहनशीलतेने वागण्याचा प्रयत्न सुरू केला.

पण——पण रोजच नवीन घटना घडू लागल्या. हजारो मैलावर असलेल्या असंख्य ताऱ्यांचा शोध लावता येतो पण मानवी मनाचा वेध घेता येत नाही. त्याप्रमाणे आमच्या पतिदेवांना प्रथमपासूनच फिट्स येत होत्या. परंतु आईवडिलांच्या ओंजळीने मोजून पाणी पिणारा हा तरुण आपल्याशी काहीशा विचित्र पद्धतीने वागेल असे मला स्वप्नात सुद्धा वाटले नव्हते. आपले बिंग बाहेर पडेल म्हणून कधी घराच्या बाहेरही पडला नाही बिचारा ! त्यामुळे जगातील व्यवहाराशी यत्किंचितही संबंध कधी बिचाऱ्याच्या जीवनात आला नाही. सतत आईवडिलांच्या आणि बहिणभावंडाच्या कडक पहाऱ्यात असणारा हा कैदी कधीही बायकोशी प्रेमभराने बोलू शकला नाही. मंदिरातील देव दगडाचाच असतो, मूर्ती अगदी साधीच असते, परंतु मंदिर मात्र किती सुंदर सुशोभित केलेले असते ? त्याचप्रमाणे माझ्या संसारमंदिरातील देव मात्र निव्वळ दगड होता. परंतु मंदिर मात्र श्रीमंती डौलाने झळकत होते.

आमची पहिली रात्र. . . .? स्वरूप मात्र अगदी कथा–कादंबऱ्यातून वाचतो तस्सेच–पिक्चरमधून पहातो तस्सेच ! फक्त बाह्यस्वरूपच हं ! पण अंत:रंग.. ? तें फक्त मी एकटीच जाणू शकले.

लग्नाचा सोळावा झाला. सोहळा संपला. बरीचशी पाहुणे मंडळी अजून जायची होती. आणि अशाच एके दिवशी ‘ ह्यांना ’ फिटस् येऊन हे निपचीत पडले. झाले. आईने आपले खरे स्वरूप प्रकट केले. सर्वांसमक्ष माझ्या अंगावर धाऊन आली. अन् मला म्हणाली, ‘ ह्याच चांडाळणीचा पायगुण भोवला. माझ्या पोराला. माझ्या पोराच्या नखातहि रोग नव्हता !’

कधीही न पाहिलेलं दृश्य, अन् वातावरण पाहून मी बावरून गेले. माझ्या निष्पाप मनाला ह्याचा काहीच उलगडा होईना ! काय करावे काहीच सुचेना ! लहान लहान दीर, नणंदा, माझ्याकडे एक अपराधीण म्हणून पाहू लागली. पाहुणे मंडळींना हा अपशकूनच वाटला. सर्वांच्या नजरा माझ्यावर रोखल्या गेल्या आणि श्रीमंती घरातील हे वातावरण पाहून क्षणार्धात माझ्या संसाराच्या सारी पटा-वरील आशा-आकांक्षेच्या सोंगट्या उधळल्या गेल्या. त्यांचा चुरडा झाला. माहेरी लाडात वाढलेली मी. मला कसे वागू ? काय करू ? असे होऊन गेले. कारण माझ्या माहेरी अगदी खेळीमेळीचे अन् मन मोकळे वातावरण आहे. त्याच्या अगदी विरुद्ध सासरी ! त्यामुळे दिवसेंदिवस माझ्या मनाचा कोंडमारा होऊ लागला.

पहिल्यांदा माहेरी नेण्यासाठी भाऊ आला तर त्यालाही उणेदुणे बोलून परत पाठविले. माहेरच्या लहानपणीच्या आठवणी किती नाजूक अन् मोहक असतात. जणू मोरपिसेच ! परंतु त्या आठवून रमण्यापलीकडे मला काहीच करता आले नाही. रडण्याचीही चोरी ! जरा रडलेले दिसले की, लागलीच सासूने आपल्या लाडक्या मुलाला सांगावे अन् मुलानेही पडत्या फळाची आज्ञा घेऊन जे हाती

सापडेल ते घेऊन माझ्या अंगावर धावून यावे. म्हणजे आईचे समाधान होई. अन् आईचे समाधान म्हणजेच मुलाचे समाधान ! मामंजी तर काय बायकोच्या ताटाखालचे मांजरच बिचारे ! छोटे दीर, नणंदा तर काय कुंभाराची मडकीच जणू ! जसा आकार द्यावा तशीच वळणारी ! बिचारे निष्पाप जीव !

नवी नवरी म्हणून मी घरात आले. त्यातून घरातील रोज नित्य नवे घडणारे प्रकार पाहून बावरेल्या हरिणीसारखी गत झाली माझी ! नकळत नको त्या चुका होऊ लागल्या माझ्या हातून ! प्रत्येक मनुष्यप्राणी चुकीला पात्र असतो. परंतु घरातील माणसांच्या स्वभावाची, रीतीपद्धतींची पूर्ण माहिती होण्यापूर्वीच माझ्यावर एकेक आघात होऊ लागले आणि अजाणतेपणी माझ्याकडून जास्तच चुका होऊ लागल्या, त्याचे प्रायश्चित्त मला रोज मिळू लागले.

नवविवाहितांच्या गमती-जमती, हसणे–खिदळणे दूरच ! मग मधुचंद्र कोठला ? हळूहळू घरातील मोलकरीण व गडीमाणसे कमी होऊ लागली अन् त्यांच्या ठिकाणी हक्काची, बिनपगारी मोलकरीण वावरू लागली.

नवीन नवीन ह्या सर्व गोष्टी वडिलांच्या कानावर जाऊ लागल्या. परंतु आपली लाडात वाढलेली मुलगी, अजून अल्लड आहे ! तिचीच काही चूक असेल म्हणून वडील दुर्लक्ष करीत. त्यासाठी खरेदीला जरी आले तरी चौकशी करून परस्परच निघून जात. आमच्या घरी तर येणेच सोडून दिले त्यांनी ! कारण त्यांचे तत्त्वच असे होते की, मुलगी एकदा उजवून घराबाहेर गेली की, ती पतिगृही नांदो अगर यमदरबारी दाखल होवो ! त्यामुळे सासूबाईंना तर जास्तच जोर चढे ! माहेरी पाठवायचे ते पण चारच दिवस अन् तुम्हीच या अन् तुम्हीच परत आणून घाला. नाहीतर नेऊ नका.

पहिली मंगळागौर अत्यंत थाटात साजरी केली ! परंतु सर्व सोहळा वेगडी होता. अत्यंत मनोभावे अश्रूंची फूले वाहून मी गौरीची पूजा केली. परंतु तिच्या पाषाण हृदयाला थोडासुद्धा पाझर फुटला नाही. उलट रात्री जागरणाच्या वेळी चारचौघीजणी जमल्या, बरे वाटले मनाला, म्हणून हसले, खिदळले ! गप्पागोष्टी, चेष्टामस्करी, गाण्याच्या भेंड्या, उखाणे वगैरेच्या गोंधळात मजेत गेली रात्र; पण सकाळी सर्व निचरले.

सणवार, तिथमिथ काही असो पतिराज मनाला वाटेल तेव्हाच जेवणार अगर एकेक दिवस जेवणारही नाहीत. ( कारण फिटस्‌मुळे त्यांच्या डोक्यावर थोडा परिणामही झाला होता. ) मग मी पण जेवायचे नाही असा सासूबाईंचा कायदा ! पण हे महाशय शब्दानेही कधी चौकशी करणार नाहीत. जणू त्यांचा माझा काहीच संबंध नाही.

पहिली दिवाळी माहेरीच असते. लेक जावई जोडीने जाऊन साजरी करायची असते. पण आम्ही......? भाऊ न्यायला आला तर आमची ‘ लक्ष्मी आमच्या

घरातच पाहजे लक्ष्मीपूजनाला ! शिवाय मुलाला कुठे जायची सवयच नाही ' म्हणून त्याला लाखोली वाहून परत पाठविले.

असे कितीतरी लहान मोठे अनुभव मला पहिल्या वर्षातच अनुभवयाला मिळाले. परंतु ह्या सर्व प्रसंगांना मी अत्यंत धीराने, कुणालाही दुरुत्तरे न करता तोंड दिले. उलट जास्तीत जास्त वेळ घरकामात घालवू लागले. स्वयंपाक करतानाही रोज आदलून बदलून पदार्थ करू लागले. प्रत्येकाच्या म्हणण्याप्रमाणे प्रत्येकाचे ताल सांभाळून हळूहळू मी एकेकांची मने जिंकली. छोटचा नणंदेला फ्रॉकवर भरून दे तर दिराला शाळेला पिशवी करून दे. मधल्या दिराला स्वेटर विणून दे तर सासूसासऱ्यांच्या पूजेची व्यवस्थित तयारी कर. तिरस्कार केला तरी पाय चेपण्यापर्यंत आपण होऊनच सर्व करू लागले. त्यामुळे हळूहळू का होईना अंधारातही ओझरती प्रकाश किरणे पसरू लागली. सर्वांकडून नकळत सहानुभूतीची वागणूक मिळू लागली.

इतके दिवस जरी मी दुःखाच्या दरीत गटांगळचा खात असले तरी उशीरा का होईना सुखाच्या हिरवळीवर लोळण्याचा सुवर्णकाळ येण्याचे भविष्य दिसू लागले, आणि मलाही कळून चुकले की दुष्टपणाचा बदला दुष्टपणाने घेऊन काहीच फायदा नाही तर दुष्टपणाला सद्वर्तनानेच उत्तर देणे श्रेयस्कर ठरेल.

▭

५२

सौ. इंदू

▭

सुखी संसाराच्या बुरख्याआड लपवलेली सत्य आणि कठोर कहाणी आहे ही. माझे लग्न झाले ते म्हणजे लव्हमॅरेज्. इतर चारचौघी गृहिणींप्रमाणे मीही काही स्वप्ने रंगवली होती. प्रथमतःच नवऱ्याचे माझ्यावर खूपच प्रेम होते व सासरी आल्यानंतर सर्वांना खूपच आनंद झाला. त्यातून लहानमुलांना तर फारच. माझ्या नवऱ्याला कोठे ठेवू कोठे नको असे झाले होते. हे सर्व पाहून मला असे वाटे की माझ्यासारखे भाग्य कोणाचेच नाही. शेजारीपाजरी मला पहावयास येत व त्यांना नमस्कार करताकरता कंबर मोडून जात असे. पण त्याचे मला भान नसे. मी वेगळचाच धुंदीत असे. आपण हवेत तरंगत आहोत की जमिनीवर आहोत याचे भानच रहात नव्हते. एकादे वेळेस डोके दुखु लागले तर चेहरा नाराज झाला तर लगेच स्वारी विचारणार आज काय होतंय राणी सरकार. कोणाची आठवण तर झाली नाही ना ? " नाही डोके दुखते. " मग लगेच स्वारी म्हणणार डॉक्टरांना बोलावू का की औषध आणू. तेव्हा असा काही चेहरा करतील की माझे काही न दुखता याच स्वारीला काही तरी

वेदना होत आहे, असा चेहरा करतील. एखाद्या दिवशी फाटलेली साडी शिवीत बसलेली पाहिली म्हणजे दुसऱ्या दिवशी लगेच दोन साड्या. पुढे आणून ठेवते स्वारी. म्हणते की इथून पुढे साडी शिवूच नकोस ? की माझ्या पानामध्ये भात कमी दिसला की स्वारी लगेच म्हणणार तांदूळ एक मण की दोन मण ? हे सर्व अनुभव फक्त सहाच महिन्यात.

पुढे या परिस्थितीत थोडा फार फरक दिसून आला. सासूच्या मनामध्ये सासूपण निर्माण झाले. जावेचे हेवेदावे चालू झाले. एखाद्या, गोष्टीला काहीच अर्थ नसला तरी त्यातून माझ्या चुका दिसू लागल्या. नवऱ्याचेही प्रेम थोडे कमी होत चालले दिसून आले. घरच्या मंडळीच्या मनासारखे वागावे तर नवऱ्यास थोडे दूर सारावे लागते, नाहीतर नवऱ्याच्या मर्जीप्रमाणे वागावयाचे म्हणजे इतरांचे टोमणे खावे लागतात. अशा विचित्र परिस्थितीत मी वैतागून गेले. त्यातून त्यांचे घराणे जुन्या वळणाचे. जे काही करावयाचे ते सर्व चार भिंतीच्या आत. एखादे वेळीस देवाधर्माचा सिनेमा लागला तरच मला चार भिंतीच्या बाहेर पडावयास मिळते. तेही अशाप्रकारे की सासू पुढे दोघी जावा दोन्ही बाजूस व मागे आमची स्वारी व मधे मी. अशी माझी प्रेतयात्रेप्रमाणे सिनेमागृहात रवानगी होत असे. तरीही घरी आल्यानंतर स्वारी थोडी गरमच असणार. या सर्वांचा उद्देश असा की, आपल्या बायकोकडे कोणी पाहू नये. तो सिनेमा पाहाण्यात काय अर्थ आहे असे म्हणून तोही नाद मी सोडून दिला.

त्यांच्या मते स्त्री म्हणजे मन–भावना नसलेले एक यांत्रिक खेळणे आहे. आपणास हवे असेल तेव्हा आपल्या मर्जीप्रमाणे वागावे व नको असेल तेव्हा बटन बंद केलेल्या रेडिओप्रमाणे गप्प बसावे. अशा प्रकारचा अनुभव पुढील सहा महिन्यात आला. मी जर या गोष्टीबद्दल थोडी तक्रार केली की, तुम्ही किती वचने दिली ? माझ्याशी किती प्रेमाने वागत होतात आणि आता असे का ? याला एकच उत्तर मिळे. मनुष्य आपले काम होईपर्यंत वाटेल त्या थापा देतो. प्रेम प्रेम म्हणजे किती दिवस ? चार दिवस. पट्टराणी पुन्हा काढते केर व भरते पाणी अशी बोलणी खावी लागतात. याच वेळी मला नाजूक सुखाची जाणीव होऊ लागते. त्यामुळे इतर गोष्टींकडे थोडे दुर्लक्षच होते. या परिस्थितीची घरी सर्वांना माहिती असते. व त्यांना आनंद होतो. पण त्यांना फक्त मूल हवे असते ते निरोगी व सुदृढ व्हावे याकरिता माझ्या आहाराकडे लक्ष देणार नाहीत की मला विश्रांतीची आवश्यकता आहे हेही पाहणार नाहीत. म्हणतात ना उगवलेला दिवस केव्हातरी मावळणार त्याप्रमाणे जीवनातील एक वर्ष संपत आले.

आता मला मात्र वेगळाच अनुभव येऊ लागला. ह्या घरी मी म्हणजे एक हक्काची मोलकरीण म्हणून वागवली जाते. माझ्या नवऱ्याची अनेक प्रेम प्रकरणे ऐकावयास मिळतात. या गोष्टीचा घरीही थोडा परिणाम होतो. उदाहरणार्थ.

कारण नसता घरी भांडणे, उशीरा घरी येणे माझ्याबद्दल तर मी घरी आहे की नाही याची सुद्धा चौकशी होत नाही. पुरुषांच्या जवळ पैसा आला म्हणजे प्रेमाला काही तोटा नाही. अशा गोष्टीला मात्र पूर्वी मागे असलेल्या व हल्ली कॉंग्रेसच्या राज्यात पुढे आलेल्या धर्मातील स्त्रियाच आम्हा हिंदू स्त्रियांचे संसार उध्वस्त करून सुख हिरावून घेतात, त्या मग कुरूप असोत की दोन पोरांच्या आया असो. त्या यांना अप्सरेप्रमाणे वाटतात. प्रेमाची व पैशाची खैरात होते. खर्च वाढू लागतो व सर्वांचा रोष बायकोमुलांवर. या गोष्टीचा परिणाम माझ्या प्रकृतीवर होत होता. चारचार दिवस उपवास केले असते तरी त्याची पर्वा नसे. तरीही मला त्यांच्या जेवणा खाण्याची व कपडचालत्यांची व्यवस्था करावी लागते. आम्हा हिंदू स्त्रियांचा धर्म- म्हणजे पती हाच परमेश्वर मानून त्याच्या सेवेत खंत पडू न देता आहे त्या स्थितित हसत मुखाने दिवस कंठीत होते. कारण आता माझा बाळ वर्षा १।। वर्षाचा झालेला असतो आणि पतीच्या प्रेमाला अंतरलेली स्त्री त्या लहान मुलाच्या अनेक गोड लीला पाहून डोळचामध्ये अश्रू आलेले असता पहिल्या सहा महिन्याचा चित्रपट डोळचापुढे सरकत असतो व त्या सुखापेक्षा हे सुख फार वेगळे आहे असे वाटून पहिले सुखदु:ख विसरून मी माझ्या मुलाचे अनेक पापे घेत होते. त्या आनंदात चालू परिस्थिती विसरण्याचा प्रयत्न करते कारण तिच्या सर्व आशा आकांक्षा त्या मुलाठिकाणी गुरफटलेल्या असतात आणि मी आदर्श माता बनण्याचे स्वप्न रंगवीत होते. कारण माझ्या मुलाला आदर्श पुरुष बनवावयाचे होते.

तरी माझ्या आयुष्यात अनुभव म्हणजे लव मॅरेज हे काही दिवसांनी लव खलास होऊन मॅरेज तेवढेच शिल्लक राहते अशा प्रकारे लग्नानंतरचे एक वर्ष व नंतरचा आलेला अनुभव मी वरती नमूद केलेला आहे.

□

## ५३

## सौ. सुरेखा शहा

□

बी. ए. झाल्याबरोबर माझे लग्न उरकायचे असे घरात सर्वजण बोलत असत. आणि गप्प बसून मीही माझी मूक संमती देत असे. एवढेच काय कुठलीही कथा कादंबरी वाचताना नायकाच्या जागी माझे होतील ते पती व नायिका मीच अशी चित्रे कितीतरी वेळ मी बघत राही. रिझल्ट लागला, चांगली पास झाले. ऑनर्स घेऊन. आणि लगेच लग्नही ठरले. वरून दाखविले नाहीतरी मनातून मी आनंदले आणि ते आनंद आभिमान वाटावा असेच होते. फर्ग्यूसन कॉलेजमधून एम्. ए. फर्स्ट क्लास झाले व तिथेच

लेक्चरर म्हणून लागले. व कुठलीतरी एल्. आय्. सी. ची परिक्षाही दिली होती. चांगल्या घरातले होते. उंचेपुरे, खोल पण बुद्धीचे तेज असलेले डोळे, दाट केस, रंग सावळा ( सावळा वर बरा गौर वधूला ) अजून काय हवे होते. लग्न महिन्याने होणारहोते. घरात लाड होत होते. मैत्रिणी चिडवत थट्टा करीत होत्या. मीही मीलनाच्या रात्री रंगवीत होते. 'ययाती' मधले ययाती व देवयानीच्या मीलना-पूर्वीचे वर्णन वाचून तर वाटे खरंच का 'मीलन म्हणजे आकाश व पृथ्वीचे मीलन ?' पती पत्नीच्या मीलनाला केवढे भव्य, उदात्त रूप दिलेले !

लग्नाची कितीही हौस असली तरी आईवडील भावंडे यांचा निरोप घेताना अश्रू खळाळले. किंचित मन वावरले. कोण जाणे कसे असतील सासरचे लोक ? कसा असेल ह्यांचा स्वभाव ? क्षणभर असे विचार मनात तरळून जात पण त्यांचा उष्ण ओला हात हातात आला की सारे विचार दूर पळत.

सासरी आले. सारे लोक सुशिक्षित, सुस्वभावी आणि सरळ. मी येऊन ८ दिवस झाले आणि त्यांना एल्. आय. सी. मध्ये Administrative officer म्हणून कॉल आला सर्वांना माझ्या पायगुणाचे कौतुक वाटले. धाकटी नणंद तर माझ्याकडूनच वेणी घालून घेई माझ्याशी दिवसभर गप्पा मारीत बसे. काम मात्र बरेच करावे लागे. एकत्र व मोठे कुटुंब त्यामुळे लोकांची ये जा ही बरीच असे त्यामुळे अगदी शिणल्या सारखे वाटे. पण रात्रीच्या धुंद विचारात मी सारे सोशीत असे आणि खरच त्यांचे उत्कट स्पर्श माझ्या सर्वांगावर नक्षी कोरू लागले की मी देहभान विसरून जाई. आणि आधिक कष्ट करायची तयारी होई.

आठ दिवसांनी ते पुण्याला गेले. रजा संपली होती. मी पुढे महिन्यांनी जाणार होते. कारण मग नव्या नौकरीवर हजर झाल्यावर त्यांना L. I. C. क्वार्टर्स मिळणार होते. आणि मग आवश्यक वस्तू घेतल्यावर मी जाणार होते.

काम बरेच करावे लागले तरी कौतुकही बरेच होते. आल्यागेल्यापुढे सासूबाई माझे वर्णन करीत. कामसू, शांत, समंजस असे माझे वर्णन होई ते ऐकन मीही पुलकित होत असे. गेल्यावर त्यांचे एक पत्र आले. बस्स पुढे त्यांनी मौनव्रत स्विकारले असावे. दिवस कामात कसातरी जाई पण रात्र वैरीण होई. रंगलेल्या रात्रींची उजळणी करण्यात व येणारे धुंद क्षण चितारण्यात कशीतरी रात्र संपे. मध्येच पापण्यावर एखादे स्वप्न फुले. आणि नीज चाळवे.

१–१॥ महिन्यानी पुण्याला आले. ब्लॉक मोठा, हवेशीर, होता. आम्हा राजा राणीचे केवढे सुख होते या विचारात मन बागड् लागले आनंदाने. पण त्या घराची दुर्दशा बघताच ते ताळ्यावर आले एकीकडे रद्दी, एकीकडे पुस्तके, हँगरला वेडेवाकडे अडकविलेले कपडे. चहाच्या कपबश्या आस्ताव्यस्त पडलेल्या. पदर खोचून कामालाच लागले. आठवेल तशी सामानाची यादी करून दिली. ते येईपर्यंत घर स्वच्छ आवरले. ही स्वारी ११॥ ला घरी आली

२ मित्र बरोबर घेऊन आणि यादीतील एकही वस्तू न आणता. तिथून ४ माणसांचा स्वयंपाक केला. भांडी कमी पडली. आल्या दिवशीच काम एवढे सगळे आणि मित्रांमुळे एकांतही मिळाला नाही त्यामुळे मी चिडले. पण नव्या घरातील पहिला दिवस होता म्हणुन स्वतःला आवरले. पण हळू हळू लक्षात येऊ लागले की ते विसरभोळे आहेत. कुणालाही केव्हाही आणतात व घरात सुद्धा म्हणावे तितके ते लक्ष देत नाहीत. मग मात्र राग येऊ लागला. वाचायला बसले की तासन् तास. लिहायला बसले की तासन् तास. मला वाटे माझ्याकडे त्यांचे दुर्लक्ष होतंय आणि माझा अहंकार दुखावला जाई. वाटे संपले ते उत्कट प्रीतीचे, आतुरतेचे मोरपंखी क्षण, नव्याचे नऊ दिवस. आणि उगीचच मनात काहीतरी सलत राही. कधीकधी ते मला फिरायला नेत. अंगाला अंग घासत जाणारी, मधूनच हातात हात घेणारी, कानात कुजबज बोलणारी जोडपी पाहिली की वाटे यांनी सुद्धा सर्वांसमोर आपल्याशी असे वागावे. पहाटे एकमेकानी बिलगून पर्वती चढावी, चंदेरी रात्रीत न्हाऊन निघावे घरात काय कुणीही एकमेकांवर प्रेम करते पण . . .

त्यांचे सर्व वेगळंच होतं. माझ्यावर प्रेम करीत नव्हते असेही नाही ते जेव्हा खुषीत असत तेव्हा, त्यांच्या गणितांतून शुद्धीवर आलेले असत तेव्हा, उत्कट प्रीतीचा असा वर्षाव करीत की पावसाळ्यातील धरणीप्रमाणे मी तृप्त होऊन जाई. त्यांतच तृप्तीचा हुंकार शरिरावर घुम लागला तशी मग तर त्यांनी खूपच आपल्याकडे लक्ष द्यावे असे वाटू लागले. भावी बाळाची चित्रे मिळून रंगवावीत असे वाटे. मी काहीतरी सांगायला जाई तर त्यांचे लक्षच नसे. गणिताचे एक पुस्तक त्यांनी लिहायला घेतले तेव्हापासून तर त्यांचं लक्षच उडाले संसारातून. तसे मला स्वातंत्र्य होते. पगार सगळा माझ्याजवळ असे. क्लब, सिनेमा, महिलामंडळे कुठेही जायाला परवानगी पण मला वाटे त्यांनी माझ्याकडेच सर्व लक्ष द्यावे. मी उगीचच दुःखी झाले, कारण नसताना. ज्या दिवशी त्यांचे पुस्तक पूर्ण झाले त्यादिवशी मला एकदम मीठीत घेऊन ते म्हणाले “ तुला खूप त्रास झाला ना ? पण मला माझे सगळे लक्ष माझ्या पुस्तकावर केंद्रीत करायचे होते त्यामुळे मी मुद्धामच तुझ्याकडे दुर्लक्ष केले. ’ तेव्हाचा त्यांचा आवेग बघून मी लाजले. मला वाटले त्यांचे क्षेत्र विशाल आहे. केवळ पत्नी व घर इतकेच त्यांचे क्षेत्र नाही. खरच ते आकाश आहेत व आपण पृथ्वी.

□

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
[illegible]

## ५४

सौ. सुनीता पेठकर

□ कुर्यात सदा मंगलम् ... भटजींच्या तोंडून निघत असलेली ती मंगलाष्टकं माझ्या हृदयात आनंदाचे जलसिंचन करून मनोबागेतल्या टपोऱ्या कळ्यांना फुलारीत होती. माझं मीलनोत्सुक मन ऐका विलक्षण ओढीने, एका आगळ्या आनंदाने, एका अनामिक हुरहुरीने कधी हर्षित होई, तर कधी बावरून जाई. दुसऱ्याच क्षणी यांच्या नजरेत नजर मिसळली की माझ्या डोळ्यात हर्ष व गालावर लज्जा लपविण्याचा प्रयत्न करूनही वर उसळून येई. भटजींनी शेवटचं मंगलाष्टक म्हटलं आणि सनईच्या मंजुळ स्वरलहरीत, भरजरी शालू व मोत्याच्या मुंडावळ्या सावरीत, हिरव्या चुड्याच्या सुशोभित हातांनी, लज्जेने नतमस्तक झालेली मी फुलांचा भरघोस हार—नव्हे माझ्या जीवनाचा सारा भारच यांच्या गळ्यात घातला, व त्यांच्या नजरेतून ओसंडणाऱ्या आश्वासनांचा व प्रीतिपुष्पाचा हार माझ्या गळ्यात पडला, व माझ्या बावरलेल्या जीवास शाश्वती मिळाली. आणि निर्धास्तपणे सप्तपदी बरोबर वैवाहिक जीवनांच्या वाटेवर मी पहिलं पाऊल हळुवारपणे टाकलं.

साऱ्यांना हवी हवीशी वाटणारी, नणंदांची आवडती वहिनी, माझ्या पुतण्यांची आवडती काकू, भाच्यांची आवडती मामी व आवडती सूनबाई बनून मी सासरी आले. साऱ्यांच्या कौतुकात पहिले पाच दिवस कसे भुरकन् गेले. त्या अवधीत परस्परांना चोरून पाहण्यात भावी संसारांची स्वप्ने रंगविण्यातच वेळ गेला. यांचा चुकून ( ? ) होणारा स्पर्श अंगावर शहारे आणी शरिरात वीज चमकून जाई आणि मन...पण फलशोभन विधी झाल्याशिवाय—. हं म्हणून स्वारीला चूप बसावे लागले होते. तरी स्वारी खुशीत होती. कारण चार पाच वर्षाची आम्हा दोघांची तपश्चर्या फळली होती. त्यामुळे मला मिळविल्याची तृप्ती 'त्या' सुखाहून काकणभर जास्तच होती.

यांची रजा लवकरच संपली व साऱ्यांच्या आग्रहास्तव मला सोडून यांना एकट्यांनाच गुजराथेस जावे लागले. तेव्हा हे उत्तर गुजराथमध्ये बनासकाठा जिल्ह्यात थरा येथे नोकरीनिमित्त ( पशुचिकित्सक ) होते. "एवढ्या लांब तिला आताच नको नेऊस" असं वडीलधाऱ्या मंडळींचे मत पडले. त्यामुळे थोड्याश्या घुश्श्यात व नाराजीतच हे गावी गेले. आणि हाय ! लग्नानंतर सहजीवनास प्रारंभ होतोय न होतोय तोच आमचा वियोग सुरू झाला.

एक दिवस अचानक यांचे पत्र आले "मी येणार आहे तू तयारीत रहा." विघ्नहर्त्याचे शतशः आभार मानले. माझी कोण तारांबळ उडाली म्हणून सांगू ? तशी मी थोडीबहुत तयारी करीतच होते. भांडी खरीदली होती. उशीचे अभ्रे

भरून ठेविले होते, पिशव्या, टेबल क्लॉथ वगैरे भरून शिवून ठेविले होते. यांनी स्वत: डिझाईन वगैरे काढून दिले होते कारण हे स्वत: कलावंत आहेत व ते सर्व डिझाईन भरून ठेवण्याबद्दल मला पूर्व सूचना मिळालीच होती. चटण्या, मेतकूट करून घेतले मी एकटीच जाणार होते यांच्याबरोबर. देश (प्रांत) नवा, रीतभात सारं वेगळं. नवा नवा संसार थाटायचा तेव्हा सारी तयारी असायला हवी ना !

अखेर तो दिवस उजाडला. मनोमन मी ज्यांचे चिंतन करीत होते. ज्यांच्या आगमनाची मी वाट पहात होते, ज्यांची प्रतीक्षा करून करून डोळे निस्तेज झाले होते, मन थकले होते, ती स्वारी अचानक पूर्व-सूचना पत्र वगैरे काही न पाठविता दत्त म्हणून हजर झाली. आणि ५।६ महिने भोगलेली विरह व्यथा कुठल्या कुठे पळाली. जादूची कांडी फिरविल्यागत, वियोगाच्या भाराखाली दडपलेलं माझं मन पिसासारखं हलकं हलकं होऊन हर्षाच्या कलमाने भावी संसाराची गोड गोड चित्रं रंगवू लागले. दिनकराच्या कोवळ्या किरणांनी जशी धरती फुलकित होते, तशीच माझी गात्रन् गात्रं यांच्या अ गमनानी पुलकित झाली. (त्यांचं नाव सुद्धा दिनकरच बर का ! ) हृदयात आनंद व डोळ्यात उत्साह व पावला पावलात उमंग आशा आणि समाधान !

माझ्या जीवनाच्या सहप्रवाशाबरोबर माझा पहिला सहप्रवास सुरू झाला. डब्यात आम्ही दोघच ! एक सद्‌गृहस्थ चढले होते, पण आम्हा दोघांना पाहून खाली उतरले (जणू त्यांना कळलंच होतं, की ५।६ महिन्यांच्या वियोगाने हे दोन जीव एकत्र आलेत, तेव्हा आपला मध्ये व्यत्यय नको. ) गाडीचा वेग वाढला. मनात न कळत ते भावगीत आठवलं. ‘ वळणावरुनी वळली गाडी आज सोडलं गाव, ’ काहीशी सुन्न व काहीशी पुलकित नजरेने मी यांच्याकडे पाहिले. हे सहजपणे थोडेसे जवळ सरकले व लज्जेने मी थोडीशी लांब सरकले, पण त्यापूर्वीच यांच्या ओठांनी माझे अश्रू टिपले व त्या उष्ण श्वासात मी माझे दु:ख पार विसरले. शुक्लपक्ष होता. आकाशात चंद्रतारकांचा लपंडाव चालला होता. मंद झुळूक, चंद्राचा शीतल प्रकाश व यांचा मादक सहवास, आतुर स्पर्श व नजरेतील अपार प्रेम, तो अवघ्या तीन तासांचा आमच्या जीवनप्रवासाचा पहिला टप्पा मी अद्याप विसरू शकत नाही.

मी सासरी आले. रजेच्या अभावी आम्हाला लवकरच निघावे लागणार होते. तिथे दोन दिवस राहून जे काही सामानसुमान हवं असेल ते घेऊन, प्रेमळ नणंदांचा, दीरांचा सासु-सासऱ्यांचा निरोप घेऊन आम्ही पुढच्या प्रवासास निघालो.

प्रवासातल्या अडीअडचणी सोसत जवळ जवळ दोन दिवसांनी आम्ही आमच्या गावी पोहोचलो. गाव कसलं एक मागासलेले पण सधन खेडं ते. बसमधून उतरल्यावर प्रथम आला तो यांचा दवाखाना. यांचं राज्य जिथे चाले तो राजवाडा ! नवीन इमारत. समोर बारमाशी फुलांचा छोटासा बाग ! बागेतल्या विहिरीतून शिपायाने ताजे पाणी काढून दिले. हातपाय धुऊन डबा काढला व आईच्या हातचे

लाडू व चिवडा काढला व तिथे साऱ्यांना वाढून खाऊन पोटभर गोड पाणी प्यायलो. तिथले दोन्ही तिन्ही पट्टेवाले कुतूहलाने व कौतुकमिश्रित आदराने माझ्याकडे पाहात होते. लग्नापूर्वी १ वर्षापासून हे तिथे होते; त्यामुळे सारे यांना चांगलेच ओळखीत होते. प्रत्येकजण माझ्याकडे कुतूहलाने पहात होता. साऱ्यांच्या नजरा चुकवीत आम्ही घरी आलो. घर म्हणजे एक मोठी खोलीच होती. खूप प्रशस्त व स्वच्छ होती. आणि यांनी खोली ( ज्या चार वस्तू होत्या तेवढयाच ) खूप कलात्मकतेने लाविली होती. माझे मन अभिमानाने भरून आले. मी माझ्या हक्काच्या घरी आले होते. घरची गृहस्वामिनी म्हणून आले होते. तेही एका कलाकाराची पत्नी म्हणून. ( आजही सारे 'घर पाहू कस लावलय ते' म्हणून पहायला येतात. व कौतुक करीतच राहतात. )

मला प्रथम, तो गाव, ती भाषा तो वेष सारं सारं कसं विचित्र वाटलं. दोन दिवस शेजारपाजारच्या बायका 'बेन'ला म्हणजे मला पहायला यायच्या व आपापसात म्हणायच्या, "सारी छे हो साहेबनी वहु!" मला त्यांची भाषा कळत नव्हती की त्यांना माझी. पण मूळ माझा स्वभाव बोलका असल्यामुळे मी हिंदीतच पण खाणाखुणा करून बोलायची. काही १५।१६ वर्षे वयाच्या मुलींना तर माझ्याबद्दल खूपच आकर्षण वाटायचं. मी भरलेले अभ्रे, पिशव्या, टेबलक्लॉथ पाहून कौतुक वाटायच. हळुहळु त्या शिकायला पण येऊ लागल्या. भाषेमुळे थोडीशी अडचण वाटायची. भाषा सोपी आहे पण ती खेडयातली होती. त्यात मला प्रथमच कानावर पडत होती. तिथं मराठी तर राहोच पण हिंदी बोलणारासुद्धा क्वचितच आढळे. आमच्या घरमालकिणीचा ६।७ वर्षाचा मुलगा 'बाबुडा' त्याची आणि माझी खूप गट्टी जमली व मी अल्पावधीतच भाषा अवगत केली. मैत्रिणीपण खूप जमल्या.

गाव नवा, माणसे नवी, भाषा नवी, तरी मला काही जड गेले नाही. कारण लोक अतिशय प्रेमळ होते. आमचे घरमालक गरीब पण प्रेमळ होते. घरमालकीण 'जीवीबेन' तीच माझं काम करी. प्रत्येक कामात मदत व्हायची. आजही तिची आठवण झाली की मन गहिवरून येतं. आम्ही तिकडे जाण्यापूर्वी तिनं घर स्वच्छ झाडून पुसून लिंपून ठेविले होते व भिंती पण रंगविल्या होत्या. निळसर छटा असलेला भिंतीचा रंग मला खूप आवडायचा. सुरुवातीस आमचं सामान बेताचे. सारंच आम्हाला नवं खरीदावं लागणार होतं. एक कॉट व त्यावरील मऊमऊ गादीवर स्वच्छ अभ्रे व त्यावर दोन उशा भरतकलेने सुशोभित अशा. एक छोटे टीपॉय व दोन मुंढा व त्यावरील दोन सुबक गोल उशा रंगीबेरंगी रेशमी फुलांनी नटलेल्या. समोरच्या निळयाशार भिंतीवर दत्तात्रयाची सुंदर हसऱ्या चेहऱ्याची मूर्ती. आजूबाजूला दोन सुरेखसे फोटो ते अशा कोंदणात होते की जे दर महा आम्ही आतील चित्रे बदलू शकू. कोपऱ्यातील फळीवर बसविलेले एक घडयाळ. व त्याखालील क्लॉकक्लॉथ ज्यावर छोटया रंगीत तीन चिमण्या पानाफुलांच्या डहाळीवर

विसावतात ( भरलेलेच बरका ). दत्तात्रयाच्या पायाशी शरण आलेली फुलदाणी. तीत डोकावणारी सदाफुली. इतर फुले क्वचितच आढळायची त्या रेताड प्रदेशात. ती फुलंही पुन्हा यांच्याच दवाखान्यातच यांनीच केलेल्या बागेतली बरे. कोण अभिमान एवढ्याशा गोष्टीचा सुद्धा ! घराच्या तीन मोठ्या खिडक्या व त्यांना लाविलेले सुंदर चिटाचे पडदे येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाचे लक्ष वेधून घ्यायचे. आम्ही त्या खोलीच्या मध्यावर पडदा लावून स्वयंपाकघर निराळे केले होते. दहाबारा पितळी डबे दिवसा सूर्य प्रकाशात व रात्री कंदीलाच्या पिवळ्या उजेडात चकचकायचे. खालच्या फळीवर मोजकीच पण स्वच्छ छोटी छोटी भांडी ओळीने लावून ठेवलेली असायची. यांनी खोक्याचे एक शेल्फ व कपाट घरीच करून दिले होते. कपाटसुद्धा छानसे केले होते. त्यात दुधातुपाची भांडी व इतर थोडे सामान रहायचे. शिवाय खालच्या फळीला हुक्स् लाविल्यामुळे कप अडकविण्याची सोय पण होती. एका कोनाड्याचा ताटाळ्यासारखा उपयोग केला होता. पण एका तिवईवर पाण्याचा टिप लखलखत असायचा. त्या कपाटावरील आमचा देव्हारा. देव नेहमी प्रसन्नतेने हसत रहायचे. खिडकीशी टांगलेली तुळशीची कुंडी मला नतमस्तक रहायला सांगायची. संध्याकाळी मी शुभंकरोती व इतर काही श्लोक म्हणत असायची आणि ते ऐकून शेजारचे क एवृद्ध गृहस्थ कौतुकाने माझ्याकडे पहायचे. माझे डोळे त्यांच्या डोळ्यातील कौतुक व समाधान पाहून हळूच मिटायचे व आशीर्वाद मागायचे. माझ्या मैत्रिणी मला सतत जाता येता हाका मारीत जात. त्यांच्या प्रेमळ हाकेला उत्तर देत देत मी गृहकृत्य करण्यात मग्न होऊन जायची.

आसपास सुद्धा खेडीच होती, त्यामुळे कुठे काही प्रेक्षणीय तर नव्हतेच. उलट आम्हीच तिथे प्रेक्षणीय ठरायचो. खेड्यातल्या अती मागासलेल्या बायकापोरी तर हातातले काम टाकून आम्हाला विशेषतः मला पहात रहायचे. पाणी भरता भरता डोक्यावरील घागरीसकट उभ्या राहून माझ्याकडे टक लावायच्या. डोक्यावरील ओझ्याचे भान विसरून. माझ्या जागी जर खरोखरच एखादी अधुनिक रुपगर्विता असती तर ते लोक नक्कीच वेडे झाले असते. तिथे साधीच पण स्वच्छ साडी व दोन शेपट्या सोडून बाहेर जायचेसुद्धा मला जीवावर येई सुरुवातीस. यांची जुनी म्हातारी घरमालकीण तर यांना म्हणायची 'तुझ्या बायकोला पण लाज ( घुंगट ) काढावी लागेल.' आमच्याकडे तशी प्रथा नसल्याचे यांनी तिला समजावून सांगितल्यावर आजीबाई थंडावल्या. हळूहळू मी तिथल्या वातावरणाशी समरस झाले. साऱ्या बायकांना व पोरींना माझ्याबद्दल आदर व कौतुक वाटायचे. मैत्रिणींची दिवसातून एकादी फेरी तरी असायची. त्यातल्या काही मुलींची लग्ने झाली होती तर काहींची ठरली होती. त्यांच्या नवऱ्यांची पत्रे आली की त्या माझ्याकडे वाचायला आणून द्यायच्या. मला खूप गम्मत वाटायची. मी वाचायला नकार दिला तरी त्या ऐकत नसत. वाचाच म्हणून द्यायच्या. कारण नंतर त्यांची माझ्याकडून

गोडमस्करी व कौतुक ऐकायला मिळे. मी त्यांना खरोखरच ‘ बेन ’ ( वहीण अथवा शिक्षिकापण ) बनले. मी म्हटले “ ए जरा माझ्याबरोबर बाजारात येतेस का ? ” तयारच व्हायच्या. कुठे मंदिरात निघाले तरी सोबतीला असायच्याच. माझ्याकडे येऊन भरतकाम शिकू लागल्या. हळूहळू ऐका शेपटीचे दोन शेपटयात रूपांतर होऊ लागले. मळकट कळकट कपडे स्वच्छ दिसू लागले त्यांचे. माझे पाहून थोडी बहूत सुधारणा झाली खरी.

आमच्या घरापासून थोडयाच अंतरावर श्री रामाचे मंदिर होते. तिथले लोक फारच भाविक. तिथे देवळात सतत कीर्तन भजन चालायचेच. माझ्या मैत्रिणी मला मंदिरात न्यायाच्याच. सुरुवातीस त्यांच्या आग्रहास्तव जायची. पुढे पुढे मला सुद्धा खूप गोडी वाटू लागली. मी खूप तन्मय होऊन जायची. एकदा मुलगी सासरी जाते त्या प्रसंगाचे बुवानी इतके छान वर्णन केले की माझे डोळे केव्हा पाणावले माझ्या सासरी येण्याचा प्रसंग आठवून, ते माझे मलाच कळले नाही. त्या भावडया व श्रद्धाळू लोकांच्या सहवासामुळे माझ्या मनात श्रद्धेचे जे बीज रोवले गेले आहे ते कायमच. ती अपार श्रद्धा आजही माझे मन अविचलीत ठेवू शकते. देव जे करतो ते सारे आपल्या भल्याकरिताच ! हे माझ्या जीवनातले वेदवाक्य तिथेच हृदयात कोरले गेले आहे.

तिथली थंडी मात्र खूप कडाक्याची. मी ऐन हिवाळयात तिकडे गेले होते. आमच्या बरोबर दुसरे-तिसरे कुणी नसल्यामुळे एकांत मिळविण्याकरिता मधु-चंद्रासाठी कुठे जावे लागलेच नाही. आमच्या घराच्या कौलाच्या फटीतून रोजच चंद्राचे गोड किरण आम्हाला हळुवारपणे गुदगुल्या करून उत्तेजित करून जात असत. तिथे मोर खूप असायचे. मोराचा फुललेला सुंदर पिसारा पाहून साऱ्यांना मोर आवडत असेल. मला मात्र वेगळयाच करणानी आवडायचे. तिथे मोर या घरावरून त्या घरावर उडया मारत असल्यामुळे कौले विस्कळीत व्हायची. व त्या फटीतून दिवसा सूर्यकिरण व रात्री चंद्रप्रकाश हळूच डोकावून आमच्या चिमुकल्या घरकुलाचं दर्शन घ्यायचे. रात्रीच्यावेळी आकाशाचा पै पैशाऐवढा भाग कधी एखाद दुसरी चांदणी दिसायची ते पाहून मला खूप गम्मत वाटायची. खिडकीतून चंद्रप्रकाशाचा छानसा दुधाळ रंगाचा पट्टा घरात यायचा. जणू आमच्या करिता चांदोबानी भेट म्हणून दुधेरी रंगाचा गालीचाच पाठवायचा. आणि तिथेच मऊ मऊ शय्येत ऐकमेकांच्या प्रेमळ सहवासात उत्कट स्पर्शात, मादक बेहोशीत व गाढ अलिंगनात रात्रीच्या रात्री रंगत होत्या व गुलाबी थंडीत पहाटेची पहाट उलटून जात असे.

दिवसामागून दिवस जात होते. सारेच कसे ठाकठिक चालले होते. शेजार-पाजार बायका म्हणायच्या, “ बेन तुझी तब्येत छान झाली आहे पहा आमच्या डॉ. साहेबांचे खाऊन. एकदा हळूच माझ्या शरीरात तापाने प्रवेश केला. अन्न

गोड लागेना. जास्त वेळ बसवतपण नव्हते. कसातरी स्वयंपाक करून पडून रहायची. पाच सहा दिवस झाले, तरी ताप कमी होईना त्यामुळे अखेर दवाखाना गाठावा लागला. डॉक्टरही खूप चांगले होते. त्यांनी सर्व चौकशी केली आपुलकीने व औषध चालू ठेविले. त्यावेळेस खूप त्रास झाला. आईची सारखी आठवण व्हायची. रडू कोसळायचे. तेव्हा घरमालकीण माझे सारे सारे नीट पहायची. व्हिजीट करिता यांना खेडोपाडी जावे लागे तेव्हा सोबतीला तीच असायची. ती जवळ असली की मोठी बहीणच आपल्या जवळ असल्याचा भास होई. थोडचा दिवसांनी तब्येत पूर्ववत्त झाली व पुन्हा दिवस मजेत जाऊ लागले.

एकदा आम्ही डीसा येथे पशुप्रदर्शन पहायला गेलो. पशुचिकित्सक म्हणून यांना आमंत्रण तर होतेच. व यांच्या मित्राच्या आग्रहास्तव यांनी मलाही बरोबर घेतले. प्रदर्शन वगैरे पाहून झाले, चार चौघांच्या ओळखी झाल्या. गावही सुधारलेला होता. सारा सुशिक्षित नोकरवर्ग भेटला. तिथे गेल्यावर माणसांत गेल्यासारखे वाटले. मित्रपत्नी पण स्वभावाने चांगली निघाली. दोन तीन दिवस खूप मजत गेले. त्यानंतर यांच्या दुसऱ्या एका मित्राकडे येण्याचे आमंत्रण मिळाले. त्यांनी अगदी गळच घातली. नाइलाजास्तव आम्ही त्यांच्या घरी गेलो. राहिलो. पण माझी तब्येत अचानक बिघडली. दीडदोन महिने लोटले होते मला. अर्थात त्याची विशेष जाणीव नव्हतीच. मला थोडा त्रास व्हायला लागला म्हणून त्यांच्या राहण्याच्या आग्रहाला न जुमानता लवकरच परतलो. उन्हातान्हातून पायाखाली तापलेल्या रेतीतून २।४ मैल चालून बस-स्टँड गाठावा लागला. कारण तिथे दुसरे कुठलेच वाहन मिळण्यासारखे नव्हते. पायी जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. अखेर एकदाचे घरी पोहोचलो. पुढे १२।१५ दिवस अतिशय त्रास होऊन संसारवेलीला फूल लागण्यापूर्वीच गळून गेले. ते सुद्धा मला किती उशीरा डॉ. नी सांगितल्यावर कळले. पुन्हा एकवार तब्येत खालावली. शरीराबरोबर मनही खचून गेले होते. आई-वडिलांची सतत आठवण व्हायची. सासर माहेरहून पत्रे आली की केव्हा एकदा साऱ्यांना भेटेन असे व्हायचे. माझी परिस्थिती पाहून माझी मलाच दया यायची. त्या प्रसंगात मात्र मला जीवीची फार फार मदत झाली. तिने खूप धैर्य दिले. यांनीही खूप जपले. यांच्या आधारावर मी मन आवरते घेतले. कारण मीच जर उदास झाले तर यांचे कोण पाहणार. स्त्रीचं जीवन तिच्या स्वार्थाकरिता नसते. तिच्या प्रियकरा करिता समर्पण केलेले असते. पतीचे सुख तेच सतीचे सुख. माझ्या उदासीनतेचा परिणाम यांच्यावर होऊ नये म्हणून मी माझे मन प्रफुल्लित ठेवण्याचा प्रयत्न करू लागले व थोडचाच दिवसात मला यश मिळू लागले. मनाबरोबर तब्येतही सुधारली व दुःख कसे गिळावे याचा धडा मिळाला. जीवनातील हलाहल पचविण्याची शक्ती देवाजवळ मागण्यास शिकले. आता तर सारे सहज पचविता येते.

कालौघ वहात होता. संसारात मन स्थिरावले. चांगला जम बसला. हळूहळू जबाबदारीची जाणीव होऊ लागली. उत्च्छृंखलतेतून गाढ शाश्वती निर्माण होऊं लागली. उथळ प्रीतीचे सखोल मायेत रूपांतर होऊ लागले. मीलनाच्या आवेगातून तृप्ती ओसंडू लागली. तृप्तीतून सुखाचा नि:श्वास सरू लागला. संसारगाडे संथपणे पण दृढतेने, अभिमानाने पण नम्रतेने चालू लागले. नव्याच्या नवलाईतून वास्तवता उगवू लागली. आम्ही दोघे एकमेकांचे चिरसोबती आहोत असे वाटू लागले व मी नव्या जोमाने, उत्साहाने व नेटाने संसाराची पाऊल वाट चालू लागले. आमचा संसार पाहणारेही समाधानाने मान डोलावू लागले होते. साऱ्यांचे चाहते बनलो होतो अल्पावधीत.

विवाहाला वर्ष होत आले आणि एकदा तिथून बदली झाल्याची ऑर्डर आली. मी साऱ्यांना सांगितले तरी कुणाला खरे वाटेना. जो तो आम्हाला म्हणू लागला, " साहेब आम्ही तुम्हाला जाऊ देणार नाही. आम्ही अर्ज करू की, आम्हाला हेच डॉक्टर हवेत म्हणून. " मैत्रिणी म्हणाल्या " बेन तुमची बदली रद्द होवो आम्ही जलारामच्या नावे दिवे पाजळू. " जीवीचा तो केविलवाणा चेहरा आठवला म्हणजे अजूनही वाटते पुन्हा एकदा त्या गावी बदली व्हावी. बाबूडाने तर अक्षरश: रडून गोंधळ घातला होता व त्याच्या म्हाताऱ्या आजीचे डोळे पाणावले होते. मुंबईपासून आम्ही अगदी जवळ सुरतेला जाणार होतो. तेव्हा आम्हाला बदली रद्द करून भागणार नव्हते. त्या प्रेमळ लोकांच्या सहवासाला मुकणार म्हणून वाईट वाटायचे. माझ्या संसाराची वाट जिथे सुरू झाली, माझे छोटे घरकुल जिथे वसले, माझी संसारस्वप्ने जिथे साकारली ते गाव सोडताना होणारे दु:ख अपार होते. गहिवरल्या अंत:करणांनी त्या साऱ्या गावाचा निरोप घेतला. बसस्टँडवर तर पोहोचवायला ही गर्दी. किती मानापानानी त्यांनी आम्हाला निरोप दिला. तो दिवस आजही जसाच्या तसा नजरेसमोर येतो.

ते नव्या नवलाईचे, बेहोशीचे वर्ष कालाच्या प्रवाहात वाहून गेले असले तरी, एकाकीपणात मनोमंथन चालू असता स्मृतिपुष्पं सुख दु:खाच्या काट्यासह वर येतात. व त्यांचा सुगंध तसेच काटेरी बोच दोन्ही सुखद वाटतात. मन कधी कधी आनंदाने हसते तर कधी गहिवरून येते. आणि या मिश्र-भावनांची एक आगळीच अनुभूती होते व संसाराच्या गाथेत नव्या रचनेची भर पडते.

▭

५५

## प्रा. सौ. शैला पांढरे

'शुभमंगल सावधान' भटजींचा आवाज एकदम थांबला 'वाजवा रे वाजवा' ते ओरडले आणि बॅन्डवर 'राजकुमार तेरे बिन रहा न जाय' या लोकप्रिय गाण्याची धून ऐकू आली. मी आपली खुळ्यासारखी स्तब्धच उभी होते. शेवटी 'अऽहो, हार घाला ना' या भटजींच्या वाक्यांनी मी शुद्धीवर आले, पटकन् हार घातला अन् मग मात्र लगीन घाईत सगळ्या आठवणी विसरून गेले.

इतरांचे लग्न अन् माझे लग्न यात फार मोठा फरक होता. मुलगी पहाणे, देण्याघेण्याच्या याद्या, मानपान, वरात या सर्व गोष्टींना आमच्या लग्नात फाटा देण्यात आला होता. एवढेच नव्हे तर भटजीसुद्धा यांचे एक मित्र होते. आम्हा दोघांच्या मित्रमैत्रिणींनीच या लग्नात पुढाकार घेतला होता. दोघांच्याही घरचे लोक उपस्थित होते खरे पण ते मांडवशोभेपुरतेच. कारण एक म्हणजे आमचा आंतरजातीय प्रेमविवाह होता व दुसरे म्हणजे माझ्याकरिता स्थळे पहाण्यास आई-वडील प्रारंभ करणार ही चाहूल लागल्याने 'आठ दिवसात माझ्याशी लग्न कर' असा हट्ट मी धरला होता व तो त्यांनी पुरवलाही होता. १५० रु. पगार व नोकरी मिळाल्याला महिनाच झाल्यामुळे लग्नखरेदी म्हणजे एक हिरवी साडी व मणि-मंगळसूत्र, एवढ्यापुरतीच मर्यादित होती. आमच्या हौशी मित्रमैत्रिणींनी कुठे काही कमी पडू दिले नाही. आईने आदल्या दिवशी शालू घेऊन दिला, दागिने घातले अन् होणार होणार, म्हणून गाजत असलेले आमचे लग्न थाटामाटात पार पडले. मी होते 'बडे बापकी लाडली बेटी' लहानपणापासून काश्मीर वा उटीला हनिमूनला जायचं ठरवलं होतं. पण प्रत्यक्षात पैशाच्या दृष्टीने नन्नाचा पाढा होता अन् नवीन नोकरी असल्याने नवऱ्या मुलाला फक्त एक दिवसाचीच रजा मिळाली होती. शुक्रवारी लग्न झालं अन् शनिवारी सकाळीच आमचे 'हे' लाडक्या बायकोला सोडून नोकरीवर चालते झाले. आणि मग हनिमूनची शेखमहंमदी स्वप्नं स्वप्नंच राहिली झालं.

महिनाभरातच आस्मादिकांना बी. ए. च्या परीक्षेला बसायचं होतं, त्यामुळे दोन दिवसांचा सासरचा पाहुणचार भोगून मी पुन्हा माहेरी येऊन दाखल झाले अन् अर्धे लक्ष अभ्यासाकडे व अर्धे लक्ष 'तिकडे' असा दिनक्रम सुरू झाला.

लग्न तर करून बसलो होतो, पण रहायला जागा कुठे होती ? हे रहात होते लॉजवर अन् मी माहेरी. खूप जागा शोधल्या पण पुण्यनगरीत पुण्यवंतांना लौकर जागा मिळणार ? मग झालंच. परीक्षा संपत आली अन् अजूनही जागा

मिळाली नाही. किती दिवस हे असे चालणार या विचाराने मी खिन्न होऊ लागले. तेवढ्यात प्रत्यक्ष परमेश्वरच–म्हणजे माझे पिताजी–साहाय्याला धावून आले. इंजिनिअरिंग कॉलेजात असताना माझ्या थोरल्या भावाने आमच्या घरासमोरच अभ्यासासाठी एक ड बलरूम घेतली होती. त्याचे शिक्षण संपले, तो मुंबईला नोकरी-साठी गेला, पण रूममात्र आमच्याच ताब्यात होती ती वडिलांनी आम्हाला दिली. जागा जुनाट, माडीवर, संडास बाथरूम खाली, गैरसोयी पुष्कळ होत्या. पण जागा तर होती ना ! शिवाय रस्ता ओलांडला की माहेर. परीक्षा संपली अन् दुसऱ्याच दिवशी आम्ही बिऱ्हाड केले. लग्नातील प्रेझेंटस् आणि आईने घेऊन दिलेली भांडीकुंडी यांच्या सहाय्याने आम्ही संसाररथ हाकायला सुरवात केली.

माझे आईवडील सुशिक्षित व समंजस आहेत. मला यापेक्षा अधिक चांगले स्थळ निश्चित मिळाले असते हे माहीत असूनही ते मुलीच्या इच्छेविरुद्ध गेले नाहीत. उलट लग्नानंतर त्यांनी खूप मदत केली. जागा दिली, भांडीकुंडी घेऊन दिली एवढेच नव्हे तर तू आणखी शीक. आम्ही शिक्षणाचा खर्च करू असेही आश्वासन दिले.

मी लग्नापूर्वी स्वयंपाकघरात कधीच पाऊल टाकले नव्हते. गाण्याच्या क्लासला जा, वक्तृत्व, नाटकात भाग घे, पी. टी. लीडर म्हणून काम कर, राहिलाच वेळ तर अभ्यासाचा तडाखा, एवढंच मी आजपर्यंत केलं होतं. माहेरी स्वयंपाकाला, धुण्याभांड्याला बाई होती. अगदी पाटावरून ताटावर करत असे. पण १५० रु. च्या बजेटात हे सारे निश्चितच जमण्यासारखे नव्हते. तेव्हा कंबर कसली अन् स्वयंपाक, धुणीभांडी सारे स्वतःच करू लागले. सवय नव्हती त्यामुळे खूप त्रास झाला. पण हे समंजस, माझी परिस्थिती त्यांना चांगली माहीत होती. प्रत्येक कामात ते मदत करू लागायचे अन् मग शेजारीपाजारी माझी चेष्टा करायचे. पाक-शास्त्राच्या पुस्तकांच्या आधारे केलेले सगळे प्रयोग हे हसतमुखाने खायचे अन् उत्तेजन द्यायचे. या मातीच्या गोळ्यातून एक मूर्ती त्यांनीच तयार केली.

वेगळे बिऱ्हाड असल्याने सासूसासऱ्यांचा जाच होण्याचा प्रश्नच नव्हता. दीरनणंदांची लग्ने आधीच झालेली होती. त्यामुळे विभक्त कुटुंबपद्धतीचे फायदे अन् तोटे दोन्ही अनुभवायला मिळाले. मंगळागौर, संक्रांत कोणतेच सण झाले नाहीत पण राजाराणीच्या संसारात ते लक्षातही आलं नाही. आईने दिवाळसण मात्र थाटात साजरा केला. यांना सूट, मला साडी. पाडव्याची ओवाळणीही घसघशीत वसूल केली.

आमचा दिवसभराचा कार्यक्रम अगदी बांधलेला होता. संध्याकाळी मात्र दोघे खूप भटकायचो, मनोराज्ये करायचो, भविष्यकाळातले बेत बोलायचो हवेत बंगले बांधायचो अन् रात्री पडल्यावर घाईघाईने खुराड्यात परतायचो. दिवस कसे जात होते समजत नव्हतं.

मधुचंद्राला जायला न मिळाल्यामुळे मी थोडी नाखूषच होते. त्यावर आम्ही एक मस्त तोडगा शोधून काढला. शिक्षकाच्या नोकरीकरिता रोज जाहिराती येत होत्या. अलिबाग जवळच्या एका खेड्यात आम्ही अर्ज टाकले, दोघांनाही मुलाखतीला बोलावणे आले व मुख्य म्हणजे येण्याजाण्याचा खर्च ती शाळा देणार होती. झाले, लगेच ह्यांनी २,३ दिवसांची रजा काढली व अलिबागला सागर-किनाऱ्यावरील एका लॉजमध्ये आम्ही येऊन दाखल झालो. नोकरीची मुलाखत दिली, निवडही झाली. पण ऑर्डर घ्यायलाच जायचे नाही हे मनात निश्चित ठरविले होते. कारण फक्त ग्रॅज्युएट होऊन आमचे समाधान होणार नव्हते, ध्येये वेगळी होती अन् अडचणींवर मात करून ध्येयपूर्ती करणार ही निश्चिती होती. तेव्हा मुलाखतीच्या नावावर अलिबागला जाऊन सागरात यथेच्छ डुंबलो, वाळूत लोळलो, नारळाच्या बनातून चांदण्यात हातातहात घालून खूप भटकलो, घसा बसेपर्यंत गीते गाईली आणि वाटेल त्या परिस्थितीत दोघांनी एम्. ए. व्हायचंच या निश्चयाचा पुनरुच्चार करून पुण्याला परतलो. दोघांनी पुणे विद्यापीठात एम्. ए. करिता नावे घातली. Periods सुरू झाले त्यांनी रात्रपाळी मागून घेतली. मी. एम्. ए. Join केलं होतं खरं पण इकडे सगळं कमी म्हणून मला दिवस गेले. घरात वडीलधारं माणूस कोणी नव्हतं. घरकाम, रोज गावातून पुणे युनव्हर्सिटीत जावं अन् सकाळी एक बी. ए. ची शिकवणी घेत होते ती घेणं—सगळं मला पहिलट-करणीला जड जाऊ लागलं. ' आता कसली तू एम्. ए. होतेस माँ हो झालं 'अशी चेष्टा भावंडं करू लागली. तेव्हा माझ्या ध्येयवादी मनाला ब्रह्मांड आठवलं. वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून आपण प्राध्यापक व्हायचं हे मी फार लहानपणी ठरवलं होतं. पण ध्येयपूर्तीचा मार्ग आता कठीण होता. दिवस गेले म्हणून आनंद मानावा की एम्. ए. सोडावे लागणार म्हणून दुःख करावे, मला समजेना. ज्यूनिअर एम्. ए. चे वर्ष होते, जिवाचा धडा केला व चांगले आठ महिने पुरे होईपर्यंत सगळं रेटलं, व्याख्यानांना हजर राहिले. कोणी कुचेष्टा करीत तर कोणी कौतुक. कॉलेजातून आल्यावर बसल्या बसल्या कुठे स्वेटर वीण, कुठं झबली शीव अशी बाळंतपणाची तयारीही केली. आईही नोकरी करणारी. पण २४ तास बाई ठेवून तिने बाळंतपण व्यवस्थित केलं. एम्. ए. च्या गडबडीत कसलं डोहाळजेवण अन् कसलं काय ? ह्यांनी मित्र—मैत्रिणींच्या साह्याने एक चांदण्यात डोहाळजेवण केलं अन् हौसेने स्टुडिओत नेऊन वाडी भरून फोटोही काढून घेतला. बाळंतविडे अन् आईकडून होणारं कोडकौतुक यात सव्वामहिना गेला अन् बाई ठेवून नोकरी करून मी पुन्हा तासांना जाऊ लागले. एम्. ए. पूर्ण केलं. दोघेही लेक्चरर झालो, मुलगी आज ४ वर्षांची आहे, आर्थिक स्थिती उत्तम आहे. लग्नानंतरचं पहिलं वर्ष असं अडचणींशी झगडण्यात, परिस्थितीवर मात करण्यात गेलं. पण दोघांनी एक-विचाराने धैर्याने परिस्थितीवर मात केली. ध्येयपूर्ती साधली. एकाच्या हातात

कुसळ टोचलं तर दुसऱ्याच्या डोळ्यात पाणी यावं असे ते दिवस आठवले की, वाटतं तेव्हांचा आनंद काही आगळाच होता. त्यावेळच्या अनुभवांची व आजच्या सुखाची तुलना करताच येत नाही.आंबा कितीही गोड असला तरी कैरीची आंबटगोड चव त्याला कशी येणार ? आणि मग आनंदात अन् सुखात असूनही म्हणावंस वाटतं. –तेहि नो दिवसाः गताः

▭

५६

## सौ. सिंधू

▭

बाहेर वरात वाजत आली होती, म्हणून मी सहज बाहेर आले व वरात पाहिल्यावर मला एकदम आमच्या वरातीची आठवण आली. माझे लग्न खेडेगावी झाले. परंतु चांगल्या रीतीने ते पार पडले. पण मला एका गोष्टीचे इतके वाईट वाटले की, मी इतकी रूपागुणाने चांगली असून मला आमच्या भाऊबंधांनी नावे ठेवली की मी काही चांगली नाही. सगळे आमच्या सासूसासऱ्यास म्हणाले की, " काय बाबा सून केलीस. मुलाला फार मोठी व काळी जाड. " परंतु आमच्या सासऱ्याने त्यांचा एकही शब्द ऐकून घेतला नाही. मला हे समजल्यावर इतके वाईट वाटले की, ' देवा मला तू का काळा रंग दिलास '. मी अशी रडत बसायची. हे एके दिवशी माझ्या सासूबाईस कळाले. तर त्या म्हणाल्या. " अग तू का रडते. तू काही–एक काळी नाहीस. कशाला उगीच मनाला लावून घेतेस." मला माझी सासू इतकी चांगली मिळाली की, मला माझ्या आईची आठवण सुद्धा आणू देत नाही. इतकी मला माया लावते. मला एक नणंद आहे. ती तर इतकी चांगली आहे की, मला तर वाटते माझी धाकटी बहीण आहे की काय ! ती सुद्धा माझ्यावर इतके प्रेम करते की फार, अगदी बहिणींच्यावर . ( मी ) जरा काय आणले की नुसते वहिनी, वहिनी, करायची. आम्ही बहिणीसारख्या वागायचो. त्यामुळे आमच्या सासूस फार आनंद होई. परंतु शेजारी-पाजारी फार कोकलायचे. त्यांच्या फार पोटात दुखायचे. ते आमच्या सासऱ्याला सांगायचे. परंतु आमचे सासरे म्हणायचे, " आपले तसेच दुसऱ्याचे लेकरू, असा भेदभाव करू नये. " मला खरंच, सासू-सासरे अगदी देवी-देवासारखे मिळाले.

माझ्या सासूनें तर माझ्यासाठी इतके काही सहन केले की तिचे तिलाच माहित. सहन करायचं कारण म्हणजे मला चुलीवरचा स्वयंपाक मुळी करताच येत नव्हता. बिचारीने सहा महिने स्वयंपाक करू दिला नाही. नंतर फार कुजबूज व्हायला

लागल्यावर मला त्यांनी शेजारी बसवून स्वयंपाक शिकविला. माझे व सासऱ्यांचे काही सहसा बोलणे होत नसे. कारण ते नौकरीकरिता पुण्यास होते. तरीपण कधी आले तर माझ्याशी फार प्रेमळपणाने वागत. ते ज्याला-त्याला सांगायचे की, " माझी सून ही सून नसून मुलगी आहे. हिला कोणी बोलाल तर याद राखा. " तेव्हा पासून मला घरात किंवा बाहेर कोणीच काही बोलत नाही. मी नाशिकची असल्यामुळे मला सगळी तिकडची भाषा यायच्या. मला ह्या इकडे जर काही सांगितले, तर ओळखता यायचंच नाही मुळी. एकदा काय गंमत झाली, मला माझ्या नणंदेने सांगितले की, ' वहिनी, मला जरा केरसुणी आणून दे " मी इतकी आश्चर्य करायला लागले की केरसुणी म्हणजे काय ? मी कितीवेळ विचारात पडले. नंतर परत सांगितल्यावर त्या म्हणाल्या, " अग केरसुणी म्हणजे आपलं घर झाडायला असलेली झाडणी. मग मी त्यांना सांगितले, " आम्ही याला ' शिराई ' म्हणतो. " तर त्या लागल्या हसायला.

असेच एकदा मला माझ्या सासूने सांगितले की, ' सिंधू, आज आपल्याला काराळचाची चटणी वाट. ' तरी मी अशीच बुचकळचात पडले. सगळे लोक ( म्हणजे घरातील ) उत्कंठेने माझ्याकडे बघायला लागले की 'पाहूया आता ही काय म्हणते तरी. ' त्या वेळेस मी विचारले, ' कारळे म्हणजे काय ?' मग सासूने मला ते कारळे दाखविले. तेव्हा मी सांगितले, " आम्हीं याला ' खुरसणी' म्हणतो.' तर लागलीच आमचे हे म्हणतात की, " तुझी नाशिकची भाषा आता सोडावी लागेल. इकडची भाषा शिकावी लागेल. ". " हिला आपली भाषा शिकव " असे आईला सांगितले. आषाढाच्या महिन्यात नवरा नवरी तोंड पहात नाहीत. त्यावेळेस मला माझ्या सासूने आमच्या चुलत नणंदेकडे ठेवले. ती इतकी खटचाळ होती की बापरे बाप ! ती माझा इतका रागराग करायची की, " तुला खायला कुठून आणू. उगीच तुझ्या सासूने इथे आणून ठेवले. तुला काय तुझे माहेर नव्हते का ?" मी तसेच सगळे काही सहन करायची. नंतर सहन न झाल्याने मी माझ्या सासूला पत्र पाठविले की असे नणंद करते. सासूला खरंच वाटेना. शेवटी सासू आल्यावरसुद्धा तिने छळ करायचा सोडला नाही. सगळ्यांची जेवणे झाल्यावर, मी माझ्या सासूला दाखविले की, पाहा. आता किती भाकरी ठेवली. माझ्या सासूने पाहिले तर अर्धीच भाकरी. लागलीच दुसऱ्या दिवशी आम्ही गाडी पकडली.

मला सगळे काहीं चांगलेच होते. परंतु मला माझे मूळ पती चांगले नव्हते. त्यांना फार वाईट नाद होता. त्यांना देवाच्या दयेने रूप इतके छान होते की बस्सं, परंतु दारूचे व्यसन होते व आणखी काही नाद होते. लग्न झाल्यावर दुसऱ्या दिवशी ते घरातून गेले. माझ्यासाठी माझी सासू बिचारी फार सहन करायची की, एवढी सोन्यासारखी आपली सून. पण आपला मुलगा पहा. त्या फार तळमळ

करायच्या. परंतु त्यांचा काही उपयोग होत नव्हता. मी आपली नशिबाला दोष द्यायची. तरी पण मी स्वस्त बसले नाही की आता आपला नवरा नाही घरी. आता काय करायचे. मी आपली सासूच्या सेवेत दिवस काढायचे. त्या आपल्या माझ्याकडे बघत व रडत बसत. लोकांचे लेकरू आपण आणले व आपले घराबाहेर गेले. परंतु मी यातील एकही शब्द माझ्या आईला कळविला नाही. मला माहेरचे सगळे लोक विचारायचे, " काय ग तुझा नवरा कसा आहे. " तर मी सांगायचे की, " खूप छान आहेत. मला खूप चांगले वागवितात. खूप लाड करतात. "

आमच्या घरी खूप इस्टेट होती. परंतु त्याचा काही उपयोग नव्हता. एकदा आमच्या सासूबाई झोपल्या होत्या. तेव्हा मी बसले होते खुर्चीवर. मी त्या वेळेस अगदी नवीन होते. तर आमचे हे दारात उभे राहिले. मी कशी त्यांना विचारते की, " कोण पाहिजे तुम्हाला. " हे बुचकाळ्यातच पडले की, आपली बायको आपल्याला ओळखत नाही. " मग त्यांनी पण गंमत केली की " मला तुमच्या सासू-बाईंना भेटायचे. मला वाटले असेल कोणी तरी म्हणून मी सांगितले, " त्या झोपल्या आहेत." तर ते म्हणाले की, " उठवा त्यांना. " मला इतका राग आला की, त्या बिचाऱ्या झोपल्या आणि हा कोण उपटसंभ्या आला आहे. मी रागातच सासूबाईंना उठविले व सांगितले की, तुमचेकडे कोण आले आहेत. त्या बाहेर आल्या. त्यांना वाटले की, दुसरेच असेल म्हणून परत मला विचारले की, ' कुठाय गं पाव्हणे. ' मी सांगितले, ' ते काय खुर्चीवर बसले, ' तेव्हा त्या लागल्या हसायला. मी कारण विचारले. त्यांनी सांगितले की, हा तर तुझा नवरा. " ' अरे बापरे ! आपण ह्यांना काहीच्या काही बोललो. देवा मला क्षमा कर. ' मी इतकी लाजेने चूर झाले. लागलीच स्टोव्ह पेटविला. त्यांना आंघोळीला पाणी, नाष्टा वगैरे दिला. कारण मला इतका आनंद झाला की, गगनात मावेना. मी ज्याला त्याला सांगत सुटले की, माझे पती किती दिवसांनी घरी आले. माझ्या सासूला पण इतका आनंद झाला की, बस्स. अजूनही मला हे चिडवितात की, स्वतःचा नवरा स्वतःला ओळखू येत नाही. माफ करा. मला जास्त काही लिहिता येत नाही. तरी चुकभूल असल्यास सुधारून घेणे. कळावे ही विनंती. . . . . .

□

## ५७
## सौ. मंगला आठवले

कुणीतरी ह्यांचे स्थळ सुचवले. काही आशा नव्हतीच त्यामुळे निर्विकार मनाने बघण्याचा कार्यक्रम पार पाडायला संमती दिली. दुसरेच दिवशी पसंती, बोलणी आणि मुहूर्त सुद्धा ठरला. पूर्वीच्या कहाण्यांमध्ये नाही का गरीब मुलीच्याकरिता देव ओसाड जागेवर सर्व सुखसोईनी समृद्ध आणि नोकरचाकरांनी भरलेला राजवाडा उभा करीत तसेच माझ्या बाबतीत झाले. मॅट्रिक झाल्यापासून लग्न होईपर्यंत दहा बारा वर्षे वडिलांचा संसार चालविण्यात कुठल्याही कष्टांकडे पाहिले नाही. सकाळपासून रात्रीपर्यंत शिकवण्या आणि शाळा ह्याशिवाय तिसरी गोष्ट माहीत नव्हती मला. त्यातल्या त्यात माझे भाग्य की त्याबद्दल घरात सर्वांना जाणीव होती. आई वडिलांना तर अपराध्यासारखेच वाटायचे. खालच्या दोन बहिणी मिळवायला लागल्यावर माझ्या लग्नाकरता खटपट चालू झाली होती. पण तेव्हा, कुठे वय आड यायला लागले, तर कोणी म्हणे आम्हाला नोकरी करणारी मुलगी नको. तिला स्वतंत्र वागायची चटक लागलेली असते. त्या मुलीच्या मनात काय आहे हे कुणी पहाते का ? गेल्या उन्हाळयाचा सीझन रिकामाच गेला म्हणून आईने निराशेने सुस्कारा टाकला आणि जणू काही देवाने आमची सत्त्वपरीक्षा पुरे असे ठरवले.

इतक्या वर्षांने लग्न झाले तरी पोरीने नशीब काढले असे जो तो म्हणायला लागला. कारण मला हे सर्वस्वी अनुरूप होते. शिक्षणाची बाजू थोडी कमी होती पण व्यवहाराच्या शाळेमधे ह्यांचे शिक्षण माझ्यापेक्षा किती तरी पटीने जास्त होते. आणि खरे सांगू सर्वांत काय माझ्या मनासारखे झाले ते. ह्यांच्यावर काहीही जबाबदारी नव्हती. दोनच बहिणी होत्या. त्यासुद्धा लग्न झालेल्या आणि ह्यांच्याकडून मोठ्या म्हणजे पर्यायाने मला कोणाचीही जबाबदारी उचलायची नव्हती. आजपर्यंत ते जू खांद्यावर वागवून वागवून माझी मान मोडायची वेळ आली होती. त्यामुळे लग्न होताना मला काय किंवा आमच्या घरातल्या लोकांना काय वियोगाचे दुःख होत होते त्यापेक्षा आनंदाचा भाग कितीतरी पटीने जास्त होता.

लग्न लागले. सौ. हे बिरुद माझ्या नावामागे लागले. ह्यांची नोकरी दुसऱ्या गावी होती तेव्हा आमचे (मी, हे व सासूबाई) असे तिघांचे बिऱ्हाड ह्यांच्या नोकरीच्या गावी हलवायला हवे हे आलेच. पण—पण मी तयार नव्हते. मी सांगत होते की शाळेचे वर्ष सुरू झाले आहे मी कायम असल्यामुळे मला एकदम नोकरी सोडता येत नाही म्हणून. कारण मला ह्यांना सांगायचे नव्हते. लग्न अचानक ठरल्यामुळे मला शाळेकडून कर्जावू पैसे घ्यावे लागले होते आणि त्याची मला

फेड करायची होती. ह्यांना खाणावळीचे जेवायचा कंटाळा आला होता म्हणून हे तयार नव्हते. ईश्वराने स्त्रियांना बहाल केलेल्या सर्व साधनांचा ह्यांच्यावर मारा करून माझ्या म्हणण्याला संमती मिळवली. मोठा किल्ला सर करण्यात यशस्वी झालेली मी सासूबाईंची छोटीशी गढी जिंकायला असमर्थ ठरले.

आमच्या गावीच मी आणि सासूबाई बिऱ्हाड करून रहायला लागलो. हे सुट्टीच्या दिवशी जाऊन येऊन असत.

लग्नानंतर पहिल्या महिन्याचा पगार झाला. ह्यांच्या जवळ पैसे देताना हप्त्याचे गेलेले पैसे सोडून पगार दिला. ह्यांनी कमी का विचारले आणि मला खोटे बोलावे लागले. मला वरखर्चाला हवेत असे सांगितले. पण तेव्हाच माझ्यासमोर प्रश्नचिन्ह उभे राहिले की, हे असे किती दिवस चालणार ?

माझे मंगळागौरीचे पहिले वर्ष. सासरी माझी मंगळागौर थाटात झाली. मला ह्यांनी हौसेने ६० रु. चे पातळ आणले. मला क्षणभर अभिमान वाटला ह्यांचा. नव्या पातळांचा आनंद कोणच्या स्त्रीला होणार नाही. पण लगेच माझ्या मनासमोर माझ्या बहिणी उभ्या राहिल्या. वाटले आजपर्यंत त्यांना टाकून मी कुठलीही चैन केली नाही. आणि आता त्यांच्यासमोर मी हे पातळ नेसून मिरवू कशी ! माझ्या अतापर्यंतच्या मनाच्या ओढाताणीची ती कुठे नांदी होती. आईला पण मंगळागौर करणे क्रमप्राप्त होते. कोंडयाचा मांडा करण्यात हुशार असलेल्या आईने तो प्रसंग साजरा केला. लग्नातले बरेचसे सामान तिने राखून ठेवले होते. पुढे दिवाळी आली. मागचीच पुनरावृत्ती पुन्हा झाली. ह्यांना आणि सासूबाईंना माहीत नव्हते की मी शाळेच्या जवळच बंगल्यातून रहाणाऱ्या लग्न झालेल्या बायकांच्या शिकवण्या करून कर्जाचा हप्ता आणि सण साजरे करण्याकरता लागणारे पैसे मिळवीत होते.

हे मला नेहमी चांगल्या चांगल्या साडया घ्यायचे पण मी मोकळेपणाने त्यातली एकसुद्धा बहिणींना नेसायला देऊ शकत नव्हते. कारण सासूबाईंच्या लगेच लक्षात आले असते. आणि मी त्यांच्या घरातले उचलून माहेरची भर करते ह्या संशयाचे बी पेरले जायचे. आमच्या घरात दोघांचे पगार येत होते. आणि इन मीन तीन माणसे. खरे म्हणजे तीन म्हणणे चुकीचे होते. कारण घरात चांगली वस्तू आणली की काही दिवसात त्याची रवानगी वन्संच्या घरी व्हायची. पण काय बोलू शकणार. पण मनाशी खूणगाठ बांधली की आता नाहीतरी पुढे ह्याबद्दल रणकंदन होणार.

संक्रातीचा सण आला. आईने आम्हाला दोघींना कापडे, छानशा तिळाच्या वडया आणि ह्यांना हलव्याची स्टेनलेसची वाटी दिली. झाले सासूबाईच्या रागाचा पारा चढला. त्यांनी म्हणे दोन्ही जावयांना चांदीच्या वाटया, मुलींना आणि त्यांच्या नणंदांना सुद्धा जरीचे खण दिले होते. मी त्यांची खूप समजूत घालायचा

प्रयत्न केला. तेव्हा महागाई येवढी नव्हती म्हणून. पण त्यांचे एकच म्हणणे, ' तू इतकी वर्षे नोकरी केलीस येवढे पैसे मिळविलेस मग तुझ्याकरता तुझ्या आईला येवढंसुद्धा करता येऊ नये ' मी त्यांना काय उत्तर देणार ! तोंड दाबून गप्प बसले. लगेच सुट्टीच्या दिवशी हे आले आणि सासूबाईंनी त्यांच्यासमोर त्या वस्तू जोरात ठेवून वाटेल तसे बोलायला सुरवात केली. मी चिमणीएवढे तोंड घेऊन कोपऱ्यात उभी होते. ह्यांनी एकदा माझ्याकडे पाहिले. माझे डोळे भरून आले होते. हे पुन्हा माझ्या माहेरचा उद्धार करतील ते ऐकून घ्यायला मनाची तयारी करीत होते. इतक्यात माझ्या कानावर अमृताचा वर्षाव करणारे शब्द ऐकू आले. "अग आई ! काय लहानशा गोष्टीत तू मन घालतेस. नसेल त्यांच्याजवळ चांदीची वाटी देण्याइतका पैसा. म्हणून तू त्यांना इतके हिणवणार. अग ही आता तुझी सून म्हणजे मुलीसारखीच नाही का ? तिच्या मनाचा विचार कर. ती प्रत्येक महिन्याला दोनशे रुपये मिळवते ना ! त्यात हव्या तेवढ्या वाट्या येतील. "

हे ऐकले आणि माझ्या मनावरचा सारा ताण गेला. माझ्या त्या वेळच्या नाजूक स्थितीत कितीही औषधे घेतली तरी त्याचा परिणाम होत नव्हता. पण त्या प्रसंगानंतर माझी प्रकृती हळूहळू सुधारायला लागली. माझ्या इच्छेप्रमाणे माझे पहिले बाळंतपण असून सुद्धा सासरीच झाले.मी घरामधे उबदार खोलीमधे त्याहूनही उबदार अशा खाटेवर बाळाला कुशीत घेऊन निवान्त पडले आहे. जगाच्या धावपळीकडे आपण आरामात पडून त्रयस्थपणे बघण्यात काय सुख आहे. हे आज मला अनुभवायला येत आहे. उभ्या माझ्या जगात फक्त मी आणि माझा बाळ असे दोघेच आहोत ह्यांना सुद्धा त्यांत स्थान नाही. ह्या गोष्टी सर्व गोष्टी स्वप्नात तर नाहीत ना असे सारखे मल वाटून मी पुन्हा बाळाला माझ्या जवळ ओढून बघते आहे.

माझ्या ह्या बाळाच्या पायगुणाने बाळाची आजी पण बाळाचे आणि बाळाच्या आईचे खूप कौतुक करते. आता ती शाळा, ती सकाळपासूनची घाई, त्या शिकवण्या सारे संपले आहे. आणि ह्यांनी नोकरीच्या गावी एक छोटेसे घर पाहून ठेवले आहे. आणि ते मला चोरून सजवण्यात हे दंग आहेत. मी पण माझ्या बाळाला घेऊन नव्या घरात जायला तिथे नंदनवन फुलवायला उत्सुक झाले आहे. पण हे काय बाळ उठला वाटते ! इतका वेळ मी माझ्या विचारातच गुरफटली होते. माझा ऊर तृप्तीने समाधानाने आणि वात्सल्याने भरून आला आहे आणि मी बाळाला हृदयाशी घट्ट धरले आहे.

□

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापित
नमूद.............................
...........................दि.

५८

## सौ. सुहास सावरकर

१४ मे ६३. मला माझी जन्मतारीख आठवत नाही. ह्यांना पण त्यांची आठवत नाही. पण आम्हा दोघांनाही ही तारीख जन्मभर विसरणे अशक्य आहे. अंतरपाट बाजूला सरला. कुणी आपल्याकडे बघत तर नाही हे बघायला गेले तर काय सर्वांच्याच नजरा आम्हा दोघांवर रोखलेल्या. धडधडत्या हृदयाने व थरथरत्या नजरेने मी ह्यांच्याकडे बघितले.. . .आणि काय सांगू ? माझ्या हृदयाची धडधड थांबली. त्या जाड भुवयांखाली भावपूर्ण डोळे मला धीर देत होते. ती दृष्टी जणू बोलत होती. " घाबरू नकोस. जन्मभराचा साथीदार आहे मी तुझा. " माझ्या मनात आले. रुक्मिणीला, द्रौपदीला, सीतेला, त्यांचे त्यांचे पती मिळाल्यावर इतकाच आनंद झाला असेल. जेवढा आज मला झालाय. माझं पतीस्वप्न ह्यांच्या रूपाने साकार झाले होते. परंतु आता स्वप्नात जगायचे नव्हते, वास्तवात यायचे होते. पण छे: बाई, ते पहिले वर्ष मला मधूर स्वप्नासारखंच वाटतं.

घरचा सत्यनारायण वगैरे धार्मिक विधी आटोपून आम्ही मुंबई गाठली. हो जून अखेर किंवा जुलैचाच महिना होता तो. मी मुंबई प्रथमच बघत होते. प्रथम दर्शनीच तिने मला अस्सल स्वरूप दाखवले. अव्याहत पाऊस पडत होता. भिजलेली मुंबई बघितली. तिची शान, तो झगमगाट, त्या चकाकत्या जाहीराती ती व्यवस्थित लावलेली दुकाने. त्या मोटारींच्या रांगा, त्या पाळणाऱ्या बसेस, मुंबईला पहिल्यांदा येणारा माणूस तरी मुंबईचे दर्शन घडताच हबकतोच. एवढं झगमगतं रूप बघितलेलं नसतं. माझीही अवस्था बावचळल्यासारखीच झाली. मग काय चिडवायला मोठाच विषय मिळाला. मुंबईच्या क्यू सिस्टीमचा मला मोठा राग. आपला नंबर येईपर्यंत स्वस्थपणे उभं रहायचे. पाय न् पाय दुखायचे. ही तपश्चर्या विश्वामित्राला सुद्धा साधायची नाही. एकदा माझा राग अनावर झाला. बस आल्याबरोबर मधेच घुसले. त्या वेळी इतका गलका गोंधळ उडाला–खालीपीली क्यू मोडती है । बहोत लीखीपढी तो दीखती है ( मुंबईचे अस्सल हिंदी )....मला वाटलं सीतामाईप्रमाणे पृथ्वी पोटात घेईल तर बरे. अर्थात् एवढीही हनुमान उडी मारून बसच्या गोटात जागा मिळाली नाही ती नाहीच. ह्यानंतर मी टॅक्सीशी दृढ मैत्री धरली. त्या दिवशी चिडवून मला रडायला लावले हे सांगणे न लगे. आमचे ' हे ' आहेत मेकॅनिकल इंजिनियर. एका फॅक्टरीत काम करतात. मी स्वत: मराठीत एम्. ए. सहाजिकच आमच्या आवडीनिवडीत आहे जमीन अस्मानचे अंतर. पहील्या वर्षी ह्या भिन्न आवडीनिवडीवरून फार वादंग माजायचे. शब्दाने भांडण वाढतं म्हणतात. त्यात पडल्या भिन्न आवडीनिवडी. दसरा जवळ येत होता. सुंदरशा साडीची वाट

बघता बघता दसरा येऊन ठेपलाच. आधल्या दिवशी आम्ही वेगवेगळे बाहेर पडलो होतो. घरी येताच पॅकिंग केलेले काहीतरी टेबलावर पडलेले. मी धावले तोच 'शू:' असे ऐकावे लागले. मीही माझे पॅकिंग दाखवले नाही. ह्यांना ओवाळले आणि हात पुढे केला. " अग मी काहीच आणले नाही. "

" मग काल काय आणलेत ? " मी खवळले.

छे : आजची आपल्याला आठवण नव्हती बुवा. माफ कर. मी ' प्लायर ' आणलाय माझ्यासाठी. पण काय ग तू काय आणलेस माझ्यासाठी ?

मी. . . .मी ते व्यक्ती आणि वल्ली पुस्तक आणलयं पू. लं. चे. दोघेही जळफळत होतो. गोडाधोडाचे जेवण सुचत नव्हते. शेवटी ह्यांनाच युक्ती सुचली. ए. असं करू या, मी आणलेला प्लायर तू मला भेट म्हणून दे. तू आणलेलं पुस्तक मी तुला प्रेझेंट करीन. कबूल ? चल आण पेन.

हे मेकॅनिकल इंजिनिअर असले तरी फार रसिक वृत्तीचे आणि नाविन्याची आवड असलेले आहेत. घरातलं सामान तर कित्ती वेळा जागा बदलतं. फुलदाणीत रोज वेगळी फुलं त्यांना हवी असतात. रोज एकच एक वेषभूषा, केशभूषा नको वाटते त्यांना. डिसेंबरच्या सुट्टचात महाबळेश्वरला गेलो होतो. बोटिंगसाठी सरोवरापाशी आलो तोच तऱ्हेतऱ्हेच्या पोशाखांतील मुलींचा ताफा हसतखिदळत आमच्यासमोरून गेला. ह्यांनी माझ्याकडे बघितले. एका वेणीतल्या व साडीतल्या माझ्याकडे बघून त्यांना खूप राग आला. घरी जाऊन वेगळी केश–वेषभूषा केली तेव्हा कुठे बाहेर पडण्यास राजी झाले.

खरं म्हणजे सामान्य माणसांच्या जीवनात संघर्ष येणार तरी कुठून ? एका सरळ ओढलेल्या रेषेत त्यांचे जीवन सुरू असतं. रम्याद्भुत् कादंबरी नाटकातल्या प्रमाणे अद्भुत् चमत्कारिक असं काहीच नसतं. हिंदी सिनेमातील हीरो-हीरॉईन-प्रमाणे ती बगीच्यात जाऊन गाणी म्हणत नाहीत किंवा हीरॉईनप्रमाणे तिच्यावर कुण्या दुसऱ्याचेच प्रेमही बसत नाही. तिला पळवलेही जात नाही. हीरोसारखी अचाट साहसी कृत्येही तो करीत नाही. वरवर बघणाऱ्यांना आमच्या जीवनात नाविन्य, आश्चर्याच्या धक्का देणाऱ्या साहसी गोष्टी, प्रेमप्रकरणातील लफडी, डोळे दिपविणारी श्रीमंती, आलीशान बंगले, ते फर्निचर, तो स्मार्ट नाटकी हीरो, अंगप्रत्यांगाचे दर्शन घडवणारी नायिका असं इथे काहीही आढळणार नाही. पण भगीनींनो, आपल्याही जीवनात नाटच आहे असं आपण ठामपणे म्हणू शकू.

एक मित्र आमचेकडे बऱ्याच दिवसांनी आला होता. सहपरीवार. फा रगोड व खेळणारी मुलं होती त्याची. बऱ्याच दिवसांनी आला मित्र. वाटलं जमेल आता गप्पांची फड ,पण छे : ह्यांनी सिगरेट शिलगावली व बसले मुलांकडे बघत, त्यांच्याशी खेळत. मला मेल्याहून मेल्यासारखे होत होतं. लज्जेने माझा जीव अर्धा झाला होता. पण ह्यांना कशाची जाणीव नव्हती. त्यातला एक म्हणाला, ' काका, तुमच्याकडे

नाही बाळ ?" हे भावडेपणाने पटकन् म्हणाले. "ए आपणही. . . " आणि मग हास्याच्या धबधब्याखाली मी गुदमरून गेले. हे नाटच नाही का ? लोकांना उत्तेजित करणारं भडक नाही. पण प्रत्येकाघरी अशा नाटचांनी प्रत्येकाची हृदयकमळं फुललेली आहेत.

मुंबई म्हटले कीं तिच्या दमट हवेबरोबर तिचे हटेल, आडमुठे पाव्हणे हे गृहीतच धरायचे. आमच्या पहिल्या वर्षातलं अर्ध वर्ष असंच एका जोडप्याने खाऊन टाकले . त्याला म्हणे जागा नव्हती मिळत. अखेर ह्यांनीच जोडे झिजवले आणि पाठवणी केली त्याची. आमची अर्धी मजा त्यांनी 'स्पॉईल' केली आणि अर्थात् आम्ही त्यांचीही. प्रा. वसंत कानेटकरांच्या लेखनशैलीने आणि मा. दत्ता-रामांच्या अभिनयाने सजलेल्या ' रायगडला जेव्हा जाग येते 'ची तिकिटं आम्ही पंधरा दिवसांपूर्वी काढून ठेवली होती. पंधरा दिवस मी रोज देवपूजा करीत होते. देवा कुठलाच पाहुणा आडवा येऊ देऊ नकोस. हे तर संभाजीच्या थाटात गर्जून सांगत होते. खामोष, आडवा आलास तर खंजीर खुपसेन पाठीत. जमलेल्या मैफली-सारखे आमचे योग त्यादिवशी जुळत आले होते. असं रात्री आठ वाजेपर्यंत तरी मला वाटत होतं. फक्त खटकण्यासारखी एकच गोष्ट झाली होती. ती म्हणजे ह्यांनी मोगऱ्याऐवजी त्यांच्या आवडीची निशीगंधाची वेणी आणली होती. टॅक्सीचे दार उघडणार तेवढचात मोठी बॅग असलेले एक गृहस्थ..... त्यांनी कागदावरचा पत्ता ह्यांना दाखवून ते कुठे रहातात असे ते विचारू लागले. हायरे दैवा, तो आमचाच पत्ता होता. ह्यांचा अवतार तेव्हा नाटकातल्या संभाजीपेक्षाही सरस दिसत होता. टॅक्सी थांबवल्याबद्दल मुकाटचाने अर्धे पैसे देऊन घरी आलो. आमच्या घराच्या रंगभूमीवर तिसऱ्या पात्राचा प्रवेश झाला होता. ह्यांना अर्थात् तो ' व्हीलन ' सारखा वाटत होता.

निदान पहिल्या वर्षी तरी वादाचा मोठ्ठा विषय म्हणजे आमचं घराणं तुमचं घराणं. एकदा बशीत रव्याचा लाडू दिला. त्रासिक मुद्रा करून हे म्हणाले, ' नुसता रव्याचा लाडू ? रवाबेसनचा मिश्र लाडू तुम्ही नाही करीत वाटतं ? काहीतरी लागतो हा. ' झालं मला पण ही टीका सहन नाही झाली. ' माझी आई रव्याचाच लाडू किती चांगला करते. ती किती सुग्रण आहे. ' आणि त्यांचं आपल्या आईबद्दल. आईवरून गाडी भावाबहिणीवर, वहिनींवर घसरली. मग तर गाडीने अजिबात रूळ सोडले. ' मी तुझ्यापेक्षा किती सुंदर, हुशार स्मार्ट आहे. फॅक्टरीतले सर्व लोक मला सिनेमातल्या ". . .' सारखा म्हणतात. ' माझेही सुरू झाले. घराण्यावरून भांडण झाले की आमचा अबोला आठ आठ दिवस संपत नसे. मला वाटे ते बोलतील आपणहून. त्यांना वाटायचं मी बोलावं. कित्येक वेळेला शेजारच्या शैलाताईंनी माझी समजूत घालावी. " घ्यावी आपण माघार. आपल्या माघारीनेच त्यांना आपल्या-बद्दल जास्त प्रेम वाटतं. पुरुषांची जात स्वतः शरण कधी नाही यायची. " माझंही

तरुण अहंकारी मन शरणागती पत्करायला तयार व्हायचं नाही. अखेर अबोला असह्य झाला की, माझ्यातील स्त्रीत्व एकवटून ह्यांच्याशी बोलायचे. आर्थिक व सर्व ताण आम्ही सोसले. पण अबोल्याचा हा मानसिक ताण आम्हाला कधीच सहन झाला नाही अजूनही. ‘ काय हो तुम्हाला बोलावसं नाही वाटलं माझ्याशी ? ’ हसत ते म्हणायचे, ‘ अग, तुझी शपथ खूप वाटलं बिलकूल करमत नव्हतं. गेल्या आठ दिवसात किती सिगारेटची राख झाली ह्याची कल्पना नाही तुला. म्हणून तर आठ दिवसांपूर्वी आलेली ‘ गूडन्यूज ’ तुला आज सांगतोय. त्यांनी तार हाती दिली मजकूर होता—“ जर्मनीतील उच्च शिक्षणासाठी तुमची निवड झालीयं. अभिनंदन. ” तार वाचल्यावर माझे डोळे पाण्याने थबथबले. ह्यांची माझ्यावर प्रेम करणारी मूर्ती क्षणकाल दिसेनाशी झाली. तेवढ्या वेळातच माझा जीव घाबरा झाला. मनात आलं आठ दिवसांच्या अबोल्यातच मला घर खायला उठले. वर्षभर ह्यांच्याशी बोलल्याविना कशी राहू ? आम्ही भांडलो, वाद घातला, अबोला धरला पण ह्या सर्व क्षणाच्या गोष्टी होत्या. जन्मभरासाठी एकच गोष्टी होती ती म्हणजे प्रेम, निष्ठा, एकमेकासाठी झिजणं. वर्षभराच्या सहवासाने आम्ही खूपच जवळ आलो होतो. माझ्या कितीतरी हौशी माझ्यासाठी, क्वचित् ह्यांच्या मनाविरुद्धही पुरवल्या होत्या. अनेक वेळेला खिशाला परवडत नसता. मला बरं नसताना कित्तीदा तरी हाच प्रेमळ हात पाठीवरून फिरला होता.

पहिले वर्ष हरणाच्या गतीनें निघून गेलं. विरहाच्या वर्षांनी खूपच लांबण घातले. बाकीची वर्षे आनंदात गेली. जातील. पण म्हणतात ना पहिल्यावहिल्याची गोडी काही न्यारीच असते.

□

५९

## सौ. वसुधा दिवेकर

□

आमचे लग्न लागले दादरला, परंतु सासूरवाडी बदलापूरला असल्यामुळे सुशोभित टॅक्सी नव्या घरी पोहचेतोवर रात्रीचा एकचा सुमार झाला. बिचकत बाचकत मी टॅक्सीतून उतरले. माझे हे नवे घर मी आधी पाहिले नव्हते पण त्याबद्दल ऐकले मात्र बरेच होते. ...‘ घर कसले, भला मोठ्ठा वाडा आहे. खूप जुना, पुराणा, माणसेपण पुराणमतवादी व संख्येने पुष्कळ ’. इत्यादि. आणि ते खरेही होते. उंबरठ्यावर ठेवलेले माप हलकेच पायाने उडवून मी आत शिरले. माझ्या भोवती बायकांचे व मुलीमुलांचे कडे पडले. कोऱ्या साड्या—कपड्यांचा वास फुला—अत्तरांच्या गंधात मिसळत होता.

उजळलेल्या दिव्यांनी घर लखलखत होते. मला त्याचे नीट निरीक्षण करायचे होते. पण उसंत म्हणून मिळत नव्हती. एकाच वेळी अनेकजण माझ्याशी बोलण्याचा, माझी थट्टा करण्याचा प्रयत्न करीत होती. एरवी मी तशी धीट पण त्यावेळी वर मान करायला मिळत नव्हती. घर व माणसे नीट पहायची होती, ते जमत नव्हते. एकच गडबड, एकच धावपळ. गलका व गलबला. उत्तर रात्र सुरू झाली होती पण तसे मुळी भासत नव्हते. ती रात्र तशीच गेली.

दुसऱ्या दिवशी लग्नानंतरचा सत्यनारायण झाला. नंतरचे दोनचार दिवस असेच गडबडीत गेले. पाहुण्यांची वर्दळ बरीच कमी झाली. मग एके संध्याकाळी मी व माधव नव्या बिऱ्हाडी जायला निघालो. आम्हा दोघांनाही मुंबईत नोकरी असल्यामुळे बदलापूरपासून रोज गाडीची धावपळ करणे अतिशय दगदगीचे होते व म्हणून माधवनी ठाणे येथे आधीच जागा घेऊन ठेवली होती. स्वतंत्र बिऱ्हाडाचा बेत घरी मात्र सांगितला नव्हता. हल्लीच्या काळात वेगळे होऊन स्वतंत्र बिऱ्हाड थाटणे ही फारच सामान्य गोष्ट होती. पण त्या मोठ्या घरात एवढ्याशा गोष्टीने मोठे वादळ उठले. बदलापूरचे घर जुने असले तरी प्रशस्त होते, घरात रेलचेल होती, हे सगळं खरं असलं तरी तेथून रोज मुंबईला जाणं व येणं महात्रासाचं होतं. ही दगदग टाळावी व त्याचबरोबर स्वतंत्रपणे रहायला मिळावे म्हणून माधवनी ठाण्याला बिऱ्हाड करण्याचे आधीच ठरवले होते. त्यांचा हा बेत सासरघरच्या मंडळींना माहीत नव्हता. घरात आलेली पहिली सून चार दिवसात नवऱ्याबरोबर बाहेर पडते. ही गोष्ट सर्वांना खटकली. सासऱ्यांचा आवाज तर इतका चढला की, क्षणभर मलाही वाटले की, आमच्या हातून मोठाच गुन्हा घडत आहे.

माधव मात्र शांत होते. मर्यादा न सोडता हलक्या स्वरात ते आपले म्हणणे पटवून देत होते. "आणखी निदान महिनाभर आम्ही येथे राहिलो असतो," माधव समजावत होते. "पण नवीन जागेत फक्त जागेखेरीज दुसरे फारसे काही नाही. अनेक वस्तू खरेदी करायच्या आहेत. घर लावायचे आहे. मांडायचे आहे. हे सर्व करायला दोन तीन आठवडे लागतील. त्यावेळेपर्यंत आमच्या रजा पण संपतील. म्हणून शक्यतोवर लवकर निघायला हवे. "

वाद वाढला नाही. ठाण्याचे स्वतंत्र बिऱ्हाड नव्याने मांडले. हे सर्व करताना मला खूप हौस वाटत होती. पण एकीकडे मनात खिन्नतेची व अपराधीपणाची भावना पण उफाळून वर येत होती. आल्या आल्याच सासरच्या माणसांचा खूप मोठा विरस झाला होता. वास्तविक नव्या बिऱ्हाडाची कल्पना मुळात माझी नव्हती. निर्धारपूर्वक ती कल्पना अंमलात आणली तीसुद्धा माधवनी. मी नुसती त्यांच्या बरोबर होते. तरीदेखील माझ्यामुळे नव्या नात्यातील माणसे दुखावली गेली. हे शल्य मला नंतर बरेच दिवस टोचत राहिले. दर शनिवार

रविवार आम्ही बदलापूरला मोठ्या घरी जात असू. सणासुदीच्या प्रत्येक प्रसंगी दोन दिवस आधी रजा घेऊन मी बदलापूरच्या मोठ्या घरी पदर बांधून कामास जुंपून घेत होते. घरी सोवळे फार कडक. मी ते बिनतक्रार पाळले. वडीलधारी मंडळी हळूहळू माझ्यावर प्रसन्न होऊ लागली. " ठाण्याच्या तुझ्या बिऱ्हाडी पाय ठेवणार नाही, " हा वडिलधाऱ्यांचा संकल्प मी गोड वागणूकीने मागे घ्यायला लावला. मी लावलेले ठाण्याचे बिऱ्हाड पाहून सर्वजण खुश झाले. आजूबाजूचे शेजारी पाजारी आम्हा दोघांबद्दल चांगले बोलताना पाहून सारी जणं आनंदून गेली. त्याच सुमारास माधव ' S. A. S. Accountant 'ची क्लिष्ट परीक्षा सन्मानाने पास झाले. त्यांना तात्काळ बढती मिळाली. ' सूनबाई फार चांगल्या पायगुणाची आहे ', असे मग सर्वजण म्हणू लागले.

आम्ही दोघेही नोकरी करीत असल्यामुळे दिवस कसा जायचा हे कळत नसे. तरीही स्वतंत्र बिऱ्हाडामुळे आम्हाला परस्परांचा सहवास भरपूर मिळायचा. शनिवार-रविवारचा बदलापूर येथील कार्यक्रम तर ट्रिपसारखा साजरा व्हायचा. लग्नाआधीच मी भरपूर प्रवास केला होता. माधव तर थेट काश्मीरपर्यंत जाऊन आले होते. लग्नानंतर आम्ही लगेच मधुचंद्राला गेलो नाही, म्हणून माधवचे मित्रमंडळ अधूनमधून थट्टा करायचे. दिवाळसणानंतर म्हणून मग आम्ही पुन्हा थोडी रजा काढून गोव्याला जाऊन आलो. परंतु अगदी मनातलं सांगायचं तर दूरच्या गावी भपकेबाज हॉटेलात एकत्र रहाण्यात आम्हाला काही खास वेगळा अनुभव आला नाही. ' निसर्गसुंदर ठिकाणी एकांतात अवर्णनीय सौख्यलाभ होतो ' वगैरे गोष्टी फक्त कादंबऱ्यात ठीक आहेत. प्रत्येक वेळी बारीक सारीक गोष्टीसाठी वेचावे लागणारे महागडे मूल्य व आजूबाजूची अपरिचित माणसे, त्यामुळे कधी एकदा ठाणे बदलापूर गाठते असं मला होऊन गेलं.

स्वतंत्र असावं परंतु आपल्याच माणसांच्या जवळपास असावं, असं आपलं मला वाटतं. गोव्याची ट्रिप तशी चांगली झाली पण भरमसाट खर्च झाला. माधव तर परत आल्यावर मित्रांना सांगत होते, " हनीमून कसला, मनीमून झाला ! "

ठाण्याचे स्वतंत्र बिऱ्हाड व बदलापूरचे मोठे घर यामुळे मला एकत्र व विभक्त कुटुंबपद्धती दोन्हीही अनुभवायला मिळाल्या. त्याचप्रमाणे ' मॉडर्न लिव्हिंग' व 'ऑरथॉडॉक्स कल्ट् ' दोघांचेही साक्षेपाने निरीक्षण करायला मिळाले. या दोन भिन्न प्रकारांची सांगड घालण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहिले. ठाण्याच्या बिऱ्हाडी मी आधुनिक गृहिणी होते तर बदलापूरच्या मोठ्या घरी नऊवारी साडी नेसून व नथ घालून मी सर्व धार्मिक गोष्टी मनःपूर्वक आचरीत होते. माधव नेहमी म्हणायचे, ' तू म्हणजे आपल्या दोन घरातील दुवा आहेस. ' या विधानात माझी स्तुती होती पण त्यात सत्यताही होती.

एक एक म्हणता वर्षभरातील सर्व मंगलसण थाटात साजरे झाले. चोर

पावलांनी वर्ष संपत आले. हळूहळू मला बदलापूरच्या मोठ्या घरी गेले की, वडील-धाऱ्यांच्या दृष्टीत वेगळीच अपेक्षा दृग्गोचर होऊ लागली. ' काय ते ' मला कळत होते. पण बोलणार काय व कसे ? काही वैयक्तिक तपशील सासूबाई प्रत्येक खेपेस कटाक्षाने विचारीत. तपशील त्यांच्या मनासारखा नसायचा. त्यांचा चेहरा उतरे. ' नातू केव्हा येणार, ' म्हणून त्या पुढे पुढे स्पष्टच विचारू लागल्या. एकदा तर माधवना त्यांनी चक्क विचारलं, " काय रे तू लूपवीप वापरतोस की काय ?"

त्यांच्या या प्रश्नावर आम्हा दोघांना हसू आवरेना. लूप हा वापरायचा नसतो, बसवून घ्यावयाचा असतो व त्याचा माधवशी यत्किंचित संबंध नाही, हे काही सासूबाईंना माहीत नव्हते. आम्ही हसलो खरे परंतु मी काहीशी खजिल झाले. टच्कन् कसली तरी कळ काळजात टोचली. दोघांचे तिघं व्हायला आम्हा दोघांची घाई नव्हती. तथापि तसे होण्यास आम्ही वर्षभरात कधीच प्रतिबंध केला नव्हता. सासूबाई कधीही भेटल्या तरी हाच विषय काढीत व मला आपले खिन्न होऊन तोंड लपवावेसे वाटे. हे टाळण्यासाठीच मी बदलापूरच्या भेटी हळूहळू लांबवू लागले. . . .

असे एक ना, अनेक कितीतरी प्रसंग. मला वाटते, लग्नानंतरच्या पहिल्या वर्षातील प्रत्येक बारीक सारीक तपशील कोणाही स्त्रीस अगदी अर्ध्या झोपेतून उठवून विचारला तरी सहज सांगता येईल. निदान मला तरी, विशेष करून; माझ्या बदलापूर येथील साप्ताहिक भेटीत वर्षाअखेरीस पडू लागलेला खंड या भेटी पुढे यथावकाश पुन्हा नियमित सुरू होणे, नव्हे, माझ्या व सासूबाईंच्या भेटीत लक्षात येण्याइतकी वाढ होणे !

□

## ६०
## सौ. भालेराव
□

माझा आणि वासूचा पूर्ण परिचयोत्तर विवाह झाला. रेडिओच्या कचेरीत तो एक विभागीय अधिकारी असल्याने जनसंपर्कासाठी हवी असणारी जिभेची गोडी आणि वागणुकीचे कौशल्य त्याच्या ठायी असल्याने माझ्यासारख्या गाण्यामधील कलावंताला त्याचं व्यक्तिमत्त्व विलोभनीय वाटलं. आणि कचेरीमधून झालेल्या परिचयाची प्रणयांतून परिणती झाली ती विवाहबद्धतेत ! !

वासूच्या बोलण्यावरून वागण्यावरून तो तसा बुद्धिवादी वाटे. जीवनाबद्दलच्या त्याच्या आशा आकांक्षा उंच होत्या. म्हणून लग्न करताना मी कल्पनाचे

भव्य मनोरे रचले. एक नवे विश्वच घडवायची जणू प्रतिज्ञा होती. ह्या विश्वात लग्नानंतर २।३ महिने जराही द्वैतभाव नव्हता ! तर दुःखाचे नावनिशाण कसले ! त्यात सगळीकडे सुबत्ता, मांगल्य, तुडुंब भरलेले होते असं प्रथम प्रथम मला वाटे.

पण थोड्याच काळात आकर्षणाचे तारुण्यातील मादकतेचे रंग आस्तेआस्ते उडू लागले आणि तू आणि मी मधली माणसे नागाच्या फणेप्रमाणे प्रश्नचिन्हासह डोके वर काढू लागली. मला नाटकात काम करायला नकार दिला. बॉबकट नावडता झाला. आणि शंभर वारावर असलेलं माहेर, तिथली माणसं मला भरवतात म्हणून, वर्ज्य झालं !! त्याच्याकडं तर ' कलावन्ताचा ' येणारा ओघ अव्याहतच होता. शांततेच्या वेळात एकमेकाबद्दलचे संशय डसू लागले. . .डिवचू लागले.

मी नोकरी करावी असं म्हणणारा वासू पहिल्या सहा महिन्यात ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हती ' असं म्हणू लागला. त्यात अनिच्छेपोटी मला दिवस राहिले. म्हणून डॉक्टर मैत्रीणीच्या सल्ल्यानं मी औषध घेतलं. केवळ या एकाच कारणावर वासूनं माझ्या आईवडिलांच्या ३ पिढ्यांचा उद्धार तर केलाच पण अहोरात्र घर डोक्यावर घेतलं. संशयाची राख डोक्यात घालून माझा पावलोपावली पाणउतारा होऊ लागला. माझ्या अस्मितेला क्षणोक्षणी तडा बसून एकमेकांना सतत छळण्यातच जणू आम्हाला समाधान वाटू लागलं ! दोघांचं जराही जमत नाही. पण त्या छळाची पाणउताऱ्याची इतकी बेमालूम चटक लागली की, आम्ही एकमेकांना दूर करण्यातही यशस्वी होऊ शकलो नाही.

दोन खोल्यांचा ठाण्याला घेतलेला मालकीचा ब्लॉक केवळ घर म्हणून राहिला. कारण तो सकाळी ७ ला जाई. आणि रात्री ९–१० ला परते तर मी त्याची वाट पाहून जेवण उरकून झोपेची आणि कधी लवकर आल्यानंतर त्याची आराधना करीत वेळ मारून नेत असे. (Killing my time and conscious) घर म्हटलं की घरात नियमितपणा, आपुलकी दोघातही हवी. सहजीवन हा माणसाच्या आयुष्यातला फार मोठा विसावा आहे. अन् माझ्यासम स्त्रीचा तर तो दिलासा होता. परंतु वासू बालपणापासून संघाचा प्रचारक आणि फिरत्या नोकरीमुळं भटक्यावृत्तीचाच राहिला. माझी त्याने सर्व बाजूने कुचंबणा आणि पर्यायानं प्रतारणा केली. त्यामुळं मधुचन्द्राच्या रात्रीचं वैफल्य पदरी आलं. हरतालिकेचा उपवास न करताच घडला. आणि मंगळागौरीच्या रात्री आपोआप जागल्या गेल्या.

संसाराच्या साफल्याच्या मार्गातील अडचणी दुस्तर होत्या आणि त्यावर मात करण्याची धडाडी माझ्यात राहिली नाही. माझा माहेरच्या लोकांच्या आपुलकीचा प्रतिसाद मिळूनही मी निराशाग्रस्त झाले. कारण मी सुविद्य, सुस्वरूप आणि सुसंस्कृत तरुणी होते. पुरुषीवृत्तीच्या ताठरपणापुढं क्षणोक्षणी वाकण्याची

प्रकृती माझ्या रक्तात नव्हती. अन् माझ्या आईनं तसं मला बाळकडूही पाजलं नव्हतं ! ! त्याला उपाय नव्हता ! !

बरोबर ११ महिने पूर्ण झाल्यावर वासूची सुदैवानं दिल्लीला बदली झाली. मी नोकरीचा राजीनामा द्यावा असं त्याला वाटत होतं परंतु आर्थिक स्थैर्य असतानाही माझ्या मनाला बसलेले धक्के इतके कठोर होते की मी म्हणूनच हसतरडत सहन केले. मी त्याला सोडून राहू शकले परंतु नोकरीशिवाय अशक्य आहे हे त्याला आता कळून चुकलं ! ! त्याचं दिल्लीचं जाणं ‘ गोड-दुःख ’ ठरलं ! !

आज तो परप्रांतीय मुलींच्या सहवासात सुखी आहे ! ! ही आमच्या विवाहाच्या पहिल्या वहिल्या वर्षाची कडवट कहाणी. . . . . . वाचून इतरांना तरी बोध होवो ! !

□

## ६१
## सौ. लता
□

दि. १३ मे १९६५ रोजी दुपारी १२॥ च्या सुमुहूर्तावर मी कु. लता वामन वैद्यची सौ. लता सुरेश सरपोतदार बनले. येथेच माझी कुमारी अवस्था संपुष्टात आली. मी एका नैतिक जबाबदारीला जखडले गेले. रात्री साधारणपणे १० वाजता सारी आवराआवर संपली. मी आमच्या खोलीत घुसले मात्र माझ्या भोवती मैत्रिणींचा घोळका दत्त म्हणून उभा राहिला.

“ लते नाव घे पाहू झक्कपैकी. ” त्या सर्वांनी हट्ट धरला. होना करता करता शेवटी त्यांचे म्हणणे मला पुरे करावे लागले.

“ एकमेकांच्या बाहूत आम्ही पडलो होतो बेहोष,
प्रत्यक्ष जीवनसाथी मात्र आहे दुसराच सुरेश. ”

आणि मी लागलीच मान खाली केली. माझी बहीण जवळ आली व खांद्यावर हात ठेवून म्हणाली “ लता, आता सर्व काही मागचे विसरून जा. आता तुला स्वतःचा सुरेश भेटला ना ? ”

मी—“ छेः नयन, मी विसरूच शकत नाही त्याला. तुला समजलं असेल कदाचित् स्त्री ज्याला एकदा आपल्या मनाचा नजराणा देते तो परत घेण्यासाठी नाही. ”

खरं पाहिलं असता पहिल्या रात्री जी अवर्णनीय गोडी चाखता येते ती फिरून कधीही उपभोगता येत नाही. मी आमच्या शृंगारलेल्या पलंगावर पडले होते. त्यांना पहाताच मी उठून बसले. त्यांनी माझा हात हातात घेतला व म्हणाले,

" झोप ग, दमली असशील ना तू आज ? फार त्रास झाला असेल तुला आज." मी मानेनेच नकार दिला.

ते म्हणाले " हे बघ आता न लाजता जवळ ये पाहू. हं अश्शी. " आणि माझे चुंबन घेणार. . . इतक्यात मी माझी मान फिरवली. ते हिरमुसले. व म्हणाले,

" काय ग ? अजून तो सुरेश आठवतोय् काय तुला ? " मला तर रडू कोसळले. मी झटकन त्यांचे पाय धरले व म्हटले,

" नाही, तुम्हीच माझे सर्वस्व आहात. तुम्ही स्वभावाने फार फार चांगले आहात. पण मला एका गोष्टीबद्दल खेद वाटतोय. मी तुम्हाला फसवले. मी उष्टावलेली आहे. "

त्यांनी मला जवळ घेतले व म्हटले, " छट् वेडी कुठली. हे बघ झालं गेलं गंगेला मिळाल. आपण एकमेकांना समजावून घेण्याचा प्रयत्न करू आणि गाडी रुळावर आणू. "

या त्यांच्या बोलण्याने मला फार आनंद झाला. यांचे औदार्य त्याच क्षणी दिसून आले. मन हलके झाल्या कारणाने मला त्यांच्या मिठीत कधी झोप लागली हे समजलेसुद्धा नाही. खरंच पहिल्याच दिवशी मी स्वतःला धन्य मानले.

दुसऱ्या दिवशी आम्ही ' मधुचंद्रा 'साठी बंगलोरला गेलो. प्रवासात फार मजा आली. पण . . . पण . . . माझे दुर्दैव त्याचक्षणी फिदीफिदी हसत होते म्हणूनच मला तो हसतमुखी सुरेश दिसला. होय. ज्या हॉटेलमध्ये आम्ही उतरलो होतो, तेथेच तो त्याच्या इतर मित्रांबरोबर बोलण्यात मग्न झाला होता. सुदैवाने ( त्याच्या हं. ) त्याने मला पाहिले नाही. पाच दिवस मी फक्त विचार करत होते सुरेशचा. ज्याला मी स्वतःचा मानला होता. आणि ज्याने अर्ध्या डावावरून तोंड काळे केले व मला दुसरा " पार्टनर " नाईलाजाने घ्यायला लावले त्याचा.

यांच्या मित्रांशी त्यांनी माझी ओळख करून दिली एक दिवस. सामोपचारिक संभाषणानंतर मी चहा करण्यासाठी आत स्वयंपाक खोलीत गेले. पण मित्रांबरोबर चाललेल्या गप्पा मला ऐकू येत होत्या.

" कमाल केलीस हं सुरेश ! ए वन बायको मिळवलीस हं. " त्यांच्या मित्राने त्यांचे कौतुक केले.

" अरे लाखात एक मुलगी अशी आढळते. तुझं ' लक् ' जोरावर होतं म्हणूनच तुला ही भेटली. " दुसऱ्याने पुष्टी दिली.

" तुमचे म्हणणे खरे आहे. पण दुसऱ्याचे सुख तेवढे दुसऱ्यांना दिसते. पण . . . पण दुःख ? फक्त स्वतःलाच . " हे म्हणाले .

त्यांचे एक मित्र एकदम गांगरले. काय बोलावे हेच त्यांना समजेना. पण एक मित्र म्हणाला,

" हे बघ आम्ही तुझे मित्र आहोत ना ? मग सांग पाहू तू कोणत्या संकटात

सापडला आहेस? आम्ही मदत करू तुला."

"तुम्हाला मी सारे सांगतो. आजपर्यंत मी कोणालाही याबद्दल सांगितले नव्हते." यांनी शेवटी प्रारंभ केलाच. "एवढी सुंदर, सुस्वभावी व सुलक्षणी पत्नी मला मिळाली आहे खरी. पण ते तिच्या मनाविरुद्ध."

"काय मनाविरुद्ध केलेस तू लग्न? का?"

"कारण तिचा प्रेमभंग झाला होता म्हणून."

"प्रेमभंग झाला ना? मग काय हरकत होती तिची लग्नाला?"

"पण ती त्याला विसरायलाच तयार होत नाही. सदान्कदा तोच सुरेश दिसतो तिला माझ्या जागी." थोडा वेळ शांततेत गेला. यांनी परत सुरुवात केली. "दुसऱ्या भेटींतच मला तिने त्याच्याबद्दल सर्व काही सांगितले. इतकेच नव्हे तर एक दिवस त्या 'हीरो' ची ओळख देखील करून दिली. अगदीच कोवळा होता लेकाचा. हिने आपल्या मावस बहिणीची त्याच्याशी ओळख करून दिली आणि ती दोघे एकमेकांच्या प्रेमात पडली."

याचवेळी मी चहा, शिरा, बिस्किटे, वगैरे घेऊन प्रवेश केला. हे मला म्हणाले "लता, आपल्या वाडीत या गणेशचतुर्थीला नाटक करावयाचे ठरविले आहे. तू करणार आहेस काय काम?"

मी– "कोणते नाटक निवडले आहे?"

"अपराध मीच केला."

नाव ऐकले मात्र...माझे डोके जड झाल्यासारखे वाटले. व तडकाफडकी "शक्य नाही" म्हणतच मी माझ्या खोलीत गेले आणि पोटभर रडले.

होय. याच नाटकामुळे माझी व सुरेशची ओळख झाली. त्यानंतर मैत्री... आणि मी नंतर त्याच्या प्रेमात पडले. त्याच्यावर खरखुरं प्रेम केले मी. पहिले वहिले प्रेम जे त्याने धिक्कारले. त्याचे म्हणणे होते "तरुण माणसांच्या क्षणिक भावनेला प्रेम म्हणत नाही." पण आमच्या नयनाला पाहून पाघळला बेटा. "लते ५ वाजले. चल तयार हो." या त्यांच्या वाक्याने मी भानावर आले.

माझे लग्न होऊन एक वर्ष व्हायला आले. तरीसुद्धा मी सुरेशला विसरू शकले नाही. पण एक दिवस मात्र तो प्रसंग घडून आला. आमच्या लग्नाच्या वाढदिवसाच्या दिवशी माझ्या बहिणीने एक तार ठोकली. "Many happy returns we are engaged S. & N." तार वाचून काय करावे हेच समजेनासे झाले.

संध्याकाळी आप्तेष्ट आणि मित्रमंडळी यांचे स्वागत करताना माझी धावपळ चालली होती. रात्री १०॥ ला सारा समारंभ संपला. झोपताना मला यांनी जवळ घेतले व विचारले "लता, अजुनसुद्धा त्या सुरेशची आठवण होते काय ग?"

" छे: त्याला विसरून की नाही, आज बरोबर १ वर्ष झाले. म्हणूनच ना आपण आजचा समारंभ केला ? " आणि मी झटकन् दिवा " ऑफ " केला.

□

६२

## सौ. मंजिरी मालंडकर

□

लाल पांढऱ्या गुलाबांनी सुशोभित केलेल्या पुष्पमाला घेऊन आम्ही दोघे सलज्ज उभे होतो. पुष्पमालेतल्या सुंदर, नाजुक पण टवटवीत फुलांकडे पाहून मी मनातच विचार करत होते, खरंच ! या पुष्पमालेच्या रुपाने मी माझे सर्वस्व मला अतिशय प्रिय असलेल्या व्यक्तीलाच बहाल करणार, केवढी मी भाग्यवती. माझी विचारमालिका भंगली ती रजिस्ट्रारच्या हसण्याने. ते म्हणत होते " चला आता हार घाला हं. " पहिल्यांदा मी आणि नंतर ते असा हार घालण्याचा कार्यक्रम झाला. फोटो टिपले गेले, आणि मग आमचा लग्नविधी ज्यांच्या साक्षीने पार पडला त्यांच्यासमवेत छोटीशीच पार्टी. या विवाहविधीत एक नाटयमय प्रवेश होता, तो म्हणजे वधूवरांनी इंग्रजीतून शपथ घ्यायचा. दोन भिन्न धर्म--प्रवाहात एकत्र आले आणि एकत्रच राहण्याची शपथ घेतली त्यांनी ! आमच्या धर्मातील विधींचा तर पत्ताच नव्हता, पण हिंदू धर्मात परिचित असणारे सनईचे मंजुळ सूर तेथे नव्हते, नव्हत्या मंगलाक्षता, नव्हते मंत्र की नव्हती जिवलग मैत्रिणींची गोड कुजबूज. पण त्याची खंत का वाटावी ? प्रीतीच्या जुळलेल्या तारांचे संगीत तर भान हरपवणारे होते. ब्राह्मणांच्या मंत्रापेक्षा विश्वासाचा मंत्रच अधिक जवळचा.

हेच संजीवन घेऊन मी सासरी पहिले पाऊल टाकले. एका हातात पाण्याचा तांब्या आणि मुठीत भाकर-तुकडा घेऊन लगबगीने येणाऱ्या सासूबाईंकडे पाहून मी भारावून गेले. आनंदाचा गोड काटा सर्वांगावर फुलला. थोरांच सौहार्द स्वागत आता कुठे मी अनुभवीत होते. मी आत गेले. प्रथम त्यांनी देवापुढे उभे राहून नमस्कार केला. मी त्यांचेच अनुकरण केले. निरांजन लावले, आणि देवाला साक्ष ठेवून त्यांनी कुंकुमतिलक लावून गळयात मंगळसूत्र बांधले. तो क्षण खरोखर शब्दांपलिकडचा आहे. उपमा अलंकाराच्या कोंदणात तो बसूच शकणार नाही. त्यावेळी मी पुलकीत झाले होते एवढेच मला आठवते. ते म्हणत होते, फासा बरोबर घट्ट कर हं. मी बाजूच्या आरशात पाहिलं, हळद न लागता नवतीचा सौभाग्यसाज मी ल्याले होते.

या नवलाईत दोन दिवस सरले आणि आमच्याकडे लगीनघाई उसळली.

चार दिवसातच बांगड्या तयार! हिरवा शालू, हिरवी चोळी आणि हिरवा चुडा अशी हिरवीराणी ह्यांच्या बाजूला पाटावर बसली. पाच सुवासिनींनी आरती केली. " तांदळाच्या ताम्हनात नाव लिही " सासुबाई ह्यांना म्हणत होत्या. दोन हसरे, चोरटे कटाक्ष भिडले आणि अक्षरे कोरली गेली " मंजिरी "

दिवस पाखरांचे पंख लावून उडत होते. उषा गुलाबी हसायच्या. रात्री यायच्या त्या रातराणीच्या सुगंधाने भिजलेल्या. निकट सहवासाने त्यांच्या व्यक्तित्वाचे नवनवीन पैलू माझ्या नजरेला येत होते, आणि माझी प्रीती अधिकाधिक गडद होत होती पाकळी पाकळीने उमलणाऱ्या गुलाबकळीसारखी. सर्वच नवविवाहितांचा हा काळ असाच धुंद असणार पण मला वाटतं प्रेमविवाहितांचा आनंद काही न्याराच. स्वर्गच हाताशी येतो. त्यात स्वैर विहरतांना कधी कधी पाय जमिनीला लागतात आणि ऐकू येतं, " स्वयंपाक जमत नाही अजून ! धांदलच फार " खरंच असतं ते ! मी तश्शी स्वयंपाकात ढ नव्हतेच कधी, पण आता पद्धतच बदलली होती. काही पाककृती तर मला अगदीच अनोख्या. मग कधी मधी कुळथाच्या पिठल्याऐवजी आमटीच तर कधी उडदाच्या डांगराबद्दल लाल डांगराची ( भोपळ्याची ) भाजीच आणि मिरचीच्या दाट आंबटगोड रायत्याऐवजी पातळ रस्सम अशी अदलाबदल व्हायचीच. पण हे सारं कधी हसू तर कधी आसूत विरून जायचे.

धर्मच भिन्न तेव्हा पूजाअर्चा माहितच नव्हती. शाळेतल्या हिंदू मुलींच्या तोंडून " हरितालिका " हा शब्द ऐकलेला होता, आता मी स्वतःच हरितालिका पूजणार होते. तेही नऊवारी नेसून. सासूबाई सांगत होत्या, बेल वहा. कुंकू वहा, फूल घाल आणि मी तसं करत होते. नमस्कार कर म्हणाल्या म्हणून मी हात जोडून नमस्कार केला, पण त्या लगेच म्हणाल्या, असा नाही हा बघ अस्सा नाक घासून करायचा. या नमस्काराविषयी आणखी एक गंमत आठवते. आम्ही सत्यनारायण केला होता. त्यावेळी भटजी सांगतील तसं करायचं असं सांगण्यात आलं. पण मंत्र म्हणता म्हणता त्याच तालावर भटजी काय हुकूम सोडीत ते मला कळतच नव्हतं. हे बाजूला होते म्हणून निभावलं. देवाला नमस्कार करताना त्यानी अगदी लोटांगण घालून साष्टांग नमस्कार केला. मी त्यांचीच री ओढली. अगदी सगळ्यांसमोर. घरात आल्यावर नणंद म्हणाली, अग बायकानी लोटांगण घालायच नसतं, वाकूनच नमस्कार करायचा. मी अश्शी लाजले, छे ! अजून खूप रुळायचंय येथे म्हणत म्हणत . . .

दिवाळी आली. सकाळी सुटणाऱ्या थंडवाऱ्याने वातावरण उल्हसित होत होतं. घराघरातून उत्साह ओसंडत होता. पण एरवी सबंध दिवस लवलवणारी मी मात्र जरा आळसावलेच होते. दुपारी झोप येऊ पहात होती. रंग सुद्धा जरा काळवंडला होता, वर्षेतल्या जलभरल्या काळ्या सावळ्या मेघासारखा. सासूबाईचा स्वभाव

जरा आडवळणाने बोलण्याचाच ! पण मी सर्व समजले. दिवाळीच्या अभिनंदनासाठी या चिमुकल्या राजाने आपल्या आगमनाची वर्दी दिली होती तर ! संध्याकाळी त्यांना सांगायला शब्द सुचत नव्हते, आणि हे गुपित पोटात दडविण्यासाठी जागाच नव्हती. कसेबसे अर्धस्फुट शब्द माझ्या कंठातून फुटले. एक खोडकर स्मित त्यांच्या ओठावर फुललेलं मी पाहिलं. नंतर मौनातूनच संवाद फुलत होते.

दिवाळीचा आनंद तर द्विगुणित झालाच होता पण आणखी काय भर म्हणूनच की काय, आम्हाला नवीन घरकुल मिळणार अशा आशयाचे पत्र गृहनिर्माण-मंडळाकडून आले. घरात मधूनमधून होणारी धूसफूस ह्यांच्या कानावर पडायची. सासू-सुनेचे खटके सर्वत्रच उडतात. खरं म्हणजे हा झगडा सासू-सुनेचा नसून नव्याजुन्याचा आहे आणि तो असाच अव्याहत चालूच रहाणार. संयमाचं रबर ताणलं जात आहे याची जाणीव होऊनच ह्यानी ठाम निर्धाराने स्वतंत्र जागेच्या शोधात पाऊल घातले. परमेश्वरकृपेने आम्हाला त्वरीत यश लाभले. दोन खोल्या आणि एक गॅलरी असा लहानसाच पण हवा प्रकाशाच्या दृष्टीने अत्युत्तम असा ब्लॉक पाहून मी खूष झाले. कल्पनेत सजवलेलं घरकुल आता साकार होणार होतं. प्रीतीचा नववसंत तेथे फुलणार होता. आणखी अवघा एकच महिना आणि आम्ही गृहशांती करून तेथे रहायला आलो देखील. मला सगळचात आवडली ती गॅलरी. तेथे सुंदरशी फुलबाग करा असा लकडा अगदी पहिल्या दिवशीच मी त्यांच्यामागे लावला. नवीन घरात नवीन फर्निचर, नवा रेडिओ, नवीन भांडी आणि आकर्षक सजावट होत होती. नवीन घरकुलाला शोभेसेच डोहाळे लागले होते मला. आणि सारे पुरवले जात होते. आमच्या बाजूलाच रहाणाऱ्या माझ्या मैत्रिणीचा सातव्या महिन्यात ओटी भरण्याचा सोहळा थाटाने पार पडला होता. मी नाराजीनेच म्हटलं होतं, माझे माहेरचे संबंधच नाहीत तेव्हा असले कोडकौतुक कुठलं व्हायला ? पण ते म्हणाले होते " अग आपली हौस आपणच करू या. " त्यांनी एक रेशमी साडी आणली होती. मी खुदकन् हसले होते. मला काहीसं आठवलं. मी त्यांना म्हटलं " अहो आमच्यात या महिन्यात नवीन साडी घालून दोघे जण समुद्रसफर करून येतात. " आणि त्याच संध्याकाळी आम्ही ठाण्याच्या तलावातून "जलवीर" होडीतून विहार केला.

स्वागताची सर्व तयारी जय्यत होती. आता लक्ष सारं नवागताकडे लागलं होतं. पती आणि चिमणा यापैकी कुणाला गौण स्थान द्यायचं या विचारात मी स्वतःलाच हरवून बसले होते. काळ जात होता. आम्ही आमच्या प्रीतीकरानी लावलेले रोप आता नवरस गंधाने बहरून आले होते. ज्या दिवसाची आम्हाला उत्कंठता लागली होती तो भाग्यदिन उगवला, आणि आमच्या प्रीतीचे अरुणपुष्प जन्माला आले. टॅहॅव. . .टॅहॅवऽऽ चिमण्यांनी साद घातली आणि इथेच आमच्या प्रथमवर्षाच्या सीमारेषेवर शिक्कामोर्तब केलं.

□

## ६३
## सौ. गया सूर्यवंशी

□

लग्नानंतरचे पहिले वर्ष म्हणजे आयुष्यातील स्वर्गसुखच. नववधूवरांची हृदये कशी गोड आडवळणे घेत जवळ येतात व मधुर मिलन होते. केवढा एकमेकांचा ओढा असतो? घरात बोलण्यासारखी वेळ नसली तर किती सूचक नयनसंकेत होतात व गाली गुलाब येऊन खळी पडते. पण ती सुद्धा लपविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला जातो.

आगत स्वागत, नटणं मुरडणं, मानपान, सारं काही मनाला गुदगुल्या पाडणारे घडते या आनंदी चांदण्यात.

पण, छे माझ्या लग्नानंतरच्या पहिल्या वर्षात सुखद असं काहीच घडलं नाही ताई. जे घडलं ते सारं याच्या विपरीतच.

मला मागणी घालावयाला आलेल्या पाहुण्यांना रवाना केल्यानंतर, 'बेटा तुझा संबंध जुळला, तुला पसंत केलं, पण माझी मुलगी शिकलेली नाही तरीसुद्धा तिला लिहिता वाचता मात्र येते असे मी खोटंच सांगितलं. कारण तुझ्या सुखासाठी.' असं माझ्या वडिलांनी मला व माझ्या आईला हळूच सांगितलं. वडिलांनी खोटं सांगून माझा संबंध पक्का केला हे ऐकताच माझा ऊर धडधडायला लागला. आणि १ वर्षभर तो तसाच धडधडत राहिला. गोरापान रंग, सतेज डोळे, चाणाक्ष व गंभीर वृत्ती आणि एम् ए. झालेल्या गोविंदरावाच्या गळयात मी थरथरल्या हृदयाने व कापऱ्या हातांनी माळ घातली. भरगच्च मंडपाने आमच्यावर अक्षता उधळल्या. आम्ही त्यांचे आशीर्वाद घेतले आणि मी त्यांचे बरोबर या घरात पिवळं पाऊल टाकलं. ते भितीयुक्त मनानेच.

चुरचूर बोलणारी नणंद, खोडकर व विनोदी दीर, घडयाळाचे गुलाम व असत्याची चिड असलेले मामंजी आणि सर्वांशी मिळून घेणारी सासूबाई व घरातील इतर आप्त मंडळी यांनी माझं स्वागत केलं; कौतुक केलं, स्तुती केली. स्तुती करण्यासारखीच मी गोरीगोमटी, आणि दिसायला सुंदर होते व अजूनही फुललेल्या वेलीप्रमाणे सुंदरच आहे. म्हणूनच मी पहिल्याच नजरेत सुख-संपन्न घराण्यातील गोविंदरावाच्या डोळयात भरले होते हे सांगावयास नकोच.

त्या सुखसोई असलेल्या घराच्या एकामागून एक खोल्या मी बघितल्या, स्वयंपाक घरातील भरगच्च स्टीलची भांडी, दिवाणखाण्यातील रेडिओ, भिंतीवरील मोठे घडयाळ, मोठमोठे आरसे, फोटो आणि फर्निचर, तसेच इतरही श्रीमंतीच्या लक्षणांनी व सुशिक्षित पद्धतींनी भरलेलं व सजलेलं घर पाहून मी आनंदित न होता, भांबावूनच गेले. कारण माझ्या माहेरची परिस्थिती गरीबीची असल्यामुळे ह्या सर्व गोष्टी मला कुतुहल निर्माण करणाऱ्या होत्या. या वातावरणाची माझ्यावर

छाप पडली व चिंता जडली. याला कारण माझ्यातील एक साक्षरतेची उणीव. आणि ही उणीव काही दिवस झाकून ठेवण्याची आई वडिलांनी टाकलेली ज़बाबदारी यामुळे माझे हृदय धडधडायला लागले होते व जे गवसले ते हरवते की काय ? अशी भीती सारखी वाटत होती.

अशा सुख दु:खाच्या कालवणामधेच माझा संसार सुरू झाला होता. माझ्यातील उणीव कोणाच्याही लक्षात येऊ नये अशा पद्धतीने मी घरात वागायला लागले होते. तरीदेखील माझ्या हातून कळत नकळत बारीक सारीक चुका होतच होत्या. पण मी नवीनच असल्यामुळे दुर्लक्ष केलं जात होतं. माझं वागणं चालणं बोलणं, जरा दणकटपणाचंच होतं. शिवाय मनात चिंता असल्यामुळे मी थोड्या प्रमाणात घाबरल्यासारखी व बावरल्यासारखी करीत होते.

अशा परिस्थितीत कसाबसा एक महिना निघून गेला. पण हृदयाची धडधड मात्र जराही कमी झाली नव्हती. नणंद आणि दीर यांनी माझ्याजवळ येण्याचा प्रयत्न केला. पण मी त्यांच्यापासून दूरच राहिले.

आता माझ्यावरील लाड कौतुकाचा वर्षाव अजिबात थांबला होता. माझं सौंदर्य सर्वांना परिचित झालं होतं. या घरात माझ्यातील उणीवेमुळे माझं सौंदर्य देखील मला नकोसं झालं होतं. कारण या सौंदर्यामुळेच मला हे सुख दु:ख मिळालं होतं.

घरातील मंडळीला माझ्या दु:खाची जाणीव नव्हती. देणं आणि दुखणं चव्हाटयावर मांडावं असं म्हणतात. पण माझं दु:ख कोणाला सांगू, कसं सांगू, काय सांगू आणि त्याचे परिणाम काय होतील या भितीमुळे कलीजा मुठीत दाबल्याच्या वेदना मी सहन करीत होते. वेळ काळ आला म्हणजे आपल्यातील उणीव सर्वांच्या नजरेत येईल. मग आपले कसे होईल, असे वाटत होते. ती वेळ आली. एका रात्री त्यांनी माझ्या हाती लिहिलेला कागद देऊन म्हटले, " वाच, मामाजींना हे लग्नानंतरचे पहिलेच पत्र मी पाठवीत आहे." झालं त्यांचे हे शब्द ऐकल्याबरोबरच माझ्या डोळ्यावर वीज कोसळली असं वाटलं. मी धाडकन् पलंगावर अंग टाकलं. व खूप हुंदके देत रडू लागले होते. तोंड घट्ट झाकून घेतले होते. त्यांनी हा प्रकार ओळखला. आणि माझ्या जवळ येऊन माझ्या पाठीवर हात ठेवला. व जरा गंभीर स्वरात विचारले, 'तुला वाचता येत नाही काय ?' त्यांच्या या प्रश्नाने पायात रुतलेल्या काटयावर बोट ठेवले असता जशी कळ लागते तसेच माझ्या मनाचे झाले. पण मी नुसती रडतच राहिले होते. अस्स आहे ते 'म्हणजे तुझ्या वडिलांनी माझी मुलगी शिकलेली नाही पण तिला लिहिता वाचता मात्र येते, असं खोटंच मला व माझ्या वडिलांना सांगितलं म्हणायचं !' असं म्हणून त्यांनी थोडसं आश्चर्ययुक्त हास्य करून त्यांच्या पलंगावर अंग टाकलं. त्यावेळी वाटलं होतं आता हे आपणाला अपशब्द बोलतील, त्रास देतील, कदाचित मारहाण करतील, पण

तसं काही घडलं नाही. फक्त मौन धारण केलं होतं त्यांनी. मी लगेच उठले आणि त्यांचे पाय धरले. त्यांनी मला जरा दूर लोटलं. आता आपलं काय होईल या भीतीने मी व्याकुळ झाले होते. पुन्हा मी त्यांचे पाय धरले व तुम्हीच मला शिकवाना, अशी विनंती केली. पण ते काही बोलले नाही. कशी गेली होती ती रात्र हे न सांगणेच बरे.

दुसरा दिवस उजाडला. तोही कालच्याचप्रमाणे. ते येथील हायस्कूलचे हेडमास्तर; शाळेवर ११ वाजता गेले म्हणजे सायंकाळी ६–७ ला परत यायचे. आज दुपारच्या वेळी सासूबाई म्हणाल्या, ' सूनबाई तुम्हाला वाचनाची आवड दिसत नाही. पण आज तुम्ही गजाननाची पोथी वाचा मी ऐकते. ' त्या वेळी मी मला वाचता येत नाही असं डोक्यावरील अवजड ओझे हळूच खाली ठेवल्यासारखे सांगितले. घरात सर्वांना ही बातमी कळली. कोणी संतापले, कोणी रागावले, अपमान वाटला म्हणून मला व माझ्या माहेरच्या लोकांना अपमानास्पद बोलले. मी सर्वांच्या डोळ्यात खुपायला लागले. चारचौघींबरोबर किंवा शेजारच्या पाजाऱ्यांच्या घरी जाण्याची तात्काळ बंदी माझ्यावर घातली. आणि एक घाव दोन तुकडे करण्याचा निर्णय माझ्यासमोर घेतला. तापलेल्या तेलाचे थेंब कानात टाकल्यासारखे वाटले मला.

जनतेच्या सांगण्यावरून रामानेसुद्धा सीतेचा त्याग केला होता, मग आई-वडिलांच्या सांगण्यावरून, या घरातून मला परत जावं लागणार की काय ? या कल्पनेने माझं हृदय होरपळून निघालं होतं.

रात्री मामंजी, सासूबाई व माझे धनी यांची सभा झाली होती. मला न वागविण्याच्या कटावर चर्चा चालू होती. माझ्या पतीला काय काय सांगितलं असेल ते देव जाणे. रामचंद्र प्रभू मिळावा म्हणून सीतेप्रमाणे माझी प्रार्थना इकडे चालूच होती.

थोड्या वेळाने मला तेथे बोलाविण्यात आले; आणि १ वर्षाच्या आत तू साक्षर झाली पाहिजे अन्यथा. . . .असा हुकूम माझ्या पतीतर्फे मला मिळाला. मी तो मान्य केला. सभा बरखास्त झाली. वातावरण, माझा भावी काळात सूड घेण्याच्या दृष्टीने शांत झाले. माझी भीती या वेळी गेली होती, हृदयाची धडधड पूर्णपणे थांबली होती. अशा परिस्थितीत २ रा महिना गेला.

आणि तिसऱ्या महिन्याच्या सुरवातीपासून तनमनधनाने म्हणतात तशी शिकायला सुरवात केली. पतीने शिकविलेले सर्व आकलन करू लागले. दिवसेदिवस माझा अभ्यास वाढला. अवघ्या चार महिन्यातच मी साक्षर झाल्याची व त्याच बरोबर माता होणार असल्याची लक्षणेही स्पष्टपणे दिसू लागली होती. म्हणूनच हिरवा चुडा व हिरवं पातळ नेसून एक वर्षाच्या आतच मी लिहावाचायला शिकले आणि अप्रत्यक्ष रीतीने शिकलेल्या व शिकविलेल्या मुलीला, ज्योतीला जन्म दिला.

व माझ्या दु:खाचा अंत झाला. ह्या माझ्या आठवणीतील कटुता आज जरी गेलेली असली तरी देखील त्या आठवणी काढल्या बरोबर मला अजून दरदरून घाम सुटतो. व जीव गुदमरल्यासारखा होतो. नको त्या आठवणी.

आज किती आनंदी आनंद कारण पती मिळाला गोविंद.

□

## ६४
## सौ. रजनी
□

मी वसई मधील एका खेडे गावात रहात आहे. माझे सासर-माहेर जवळच आहे. अर्थात सध्याच्या युगाप्रमाणे आमचा प्रेम– विवाह झाला आहे. माझे माहेरचे नाव रसिका होते. सासरचे नाव रजनी असे ठेवले आहे. आमच्या लग्नाला दोन्ही ठिकाणाहून विरोध होता. पण आम्ही कसोटी न सोडता आमचा प्रेमाचा सामना यशस्वी पार पाडला. असो. आता पुढील गंमत वाचा.

आमच्या लग्नाला १।।। वर्षे झाली. ता. १६ डिसेंबर १९६५ रोजी रजिस्टर पद्धतीप्रमाणे मुंबईला मराठी ग्रंथालयामध्ये 'दिवाकर' नावाच्या व्यक्तीबरोबर माझा विवाह झाला.

'कुर्यात सदा मंगलम् ।' शुभलग्न सावधान चा गजर होताच एकमेकांच्या गळयात हार घातले. चहापाणी आटपून दिवाकर-रजनीची जोडी संध्याकाळी घरी आली. सप्त-पद चालून रजनी दिवाकराच्या घराचा उंबरठा ओलांडते.

प्रथम दर्शनी मला खूप भीती वाटली होती. किती तरी चुकल्यासारखे झाले. पहिल्या थोडया दिवसात इतकी तारांबळ उडाली की, काही विचारता सोय नाही. आता त्यांची आठवण झाली की हसू येते.

कोणतेही काम करण्यास घेतले की हात थरथर कापत असे, आणि ते थरथरणे इतके विकोपाला जायचे की त्याचा परिणाम हातातील वस्तूवर होऊन ती वस्तू खालीच झेप घ्यायची. आणि नेहमीच काय हातात एकच वस्तू असते असे नाही. कधी ती फुटण्यासारखी असायची, कधी त्यातील पदार्थ सांडण्यासारखा असायचा. वस्तू फुटली अगर पदार्थ सांडला की, वस्तू फुटून फुकट गेल्याचे भय वाटत नसून सासूबाई ओरडतील ह्या भीतीने पाचावर धारण बसायची. पण तसे कधीच घडले नाही. मला जो सासूचा ठेवा मिळाला आहे तसा ह्या गावात कोणालाच मिळाला नाही. खरोखर मी त्याबाबतीत फारच भाग्यवान आहे. आणि त्यामुळे मी आजपर्यंत कधीच त्यांच्याकडून रागावून घेतले नाही. उलट त्याच म्हणायच्या,

'भांडं फुटलं तर फुटू दे. तू कशाला इतकी घाबरते. आपण दुसरं आणू. त्यात काय मोठे' असे मला आश्वासन मिळत असे. पण मी देखील ह्या आश्वासनाचा कधीच गैरफायदा घेतला नाही. पहिल्या थोडया दिवसांची गोष्ट सोडली तर मी त्यांच्या (घरच्या मंडळीत) मिसळल्यानंतर आपल्या हातून कोणतीही चूक घडणार नाही अशी वारंवार व पावलोपावली दक्षता घेत होते. आणि त्यामुळे माझ्याकडून तशी कधीच चूक झाली नाही. पण एखादी वस्तू फुटली आणि सासुबाई घरी नसल्या परंतु त्यावेळी आमचे मिस्टर जर जवळ असले तर मला जास्तच घाबरून सोडायचे. पहिल्या क्षणी ही चेष्टा खरीच वाटली पण सासुबाईच्या कानांवर गोष्ट जाऊन एकाही शब्दाने विचारणे झाले नाही. मग मीच ह्यांना चिडवायची 'कसा एका माणसाचा वडा झाला.' असे म्हटले की, लगेच नारदासारखी कळ लावायचे. सासुबाईना जाऊन सांगायचे की आई विचारना तिला. पण सासू नेहमी सुनेच्याच बाजूने बोलायची. त्या म्हणायच्या फुटली तर फुटू दे मी दुसरी त्याहीपेक्षा सुंदर आणीन, असे शब्द कानावर पडले की, एक माणूस घरातून पळ काढायचे. मग खोटं खोटं रागावायचे.

सासर- माहेर जवळ. तशात आमचा प्रेम-विवाह असल्यामुळे परकेपणाचा प्रश्न उरतच नव्हता. थोडयाच दिवसात साऱ्या गोष्टींचा परिचय झाला. आम्ही महिन्यातून एकदा सिनेमा बघत असू. मुंबईला चौपाटीवर एक दोनदा गेलो होतो. रोज जाणे शक्य नव्हते. कारण माझे पती दिवसा रोज मुंबईला एलिफस्टन मीलमध्ये सर्व्हिसला जात असतात. त्यासाठी त्यांना सकाळी ५ ची बस पकडावी लागते. माझी कोणतीही इच्छा पुरी करण्यास ते तयार असत; माझ्यासाठी ते नाना वस्तू आणत. नवीन कपडा आणत. पण माझा स्त्री-स्वभाव असल्यामुळे थोडा संशयी. त्यात दुसरे कारण म्हणजे माझे मिस्टर त्यांच्या पाचसहा मित्रांबरोबर पार्टीला जायचे. पार्टी म्हणजे साधी नाही. पार्टी रोजची असायची. मटण, ब्रेड, दारू, सिगारेट ह्या गोष्टी असायच्या. मला यांनी दारु पिणे व सिगरेट ओढणे बिलकूल आवडत नाही. त्याप्रमाणे मी लग्नाआधी त्याच्याकडून वचन घेतले होते. पण ते लग्न होईपर्यंतच पाळले गेले. (दारु पिणे माझ्या माहेरच्या लोकांना आवडत नाही म्हणून आमच्या लग्नाला विरोध होता.) लग्नानंतर पुन्हा तोच कार्यक्रम सुरू झाला. रात्री दोनदोन वाजेपर्यंत घरी येत नसत. (लग्ना आधी ठीक, पण लग्नानंतर असे कोणत्याही पुरुषाने करू नये.) त्यामुळे झोप मिळत नसे व सकाळी ५ ची बस पकडणार कशी ? ज्या दिवशी पार्टी झाली की, त्या आठवडाभर कामाला रजा; आणि पगार होई दिवसांवर. दिवसच भरले नाहीत तर मिलचा पगार येणार कुठून ? आणि दोन माणसे म्हाताऱ्या आईवडिलांच्या जीवावर पोषणे मला आवडत नसे. त्यामुळे आमचे भांडण व्हायचे. आठवडयातून एकदा रजा असायची त्या रजेत देखील पत्तेच पत्ते खेळत बसायचे. ह्यांना रजा असली तरी मला नव्हती.

माझे काम संपेपर्यंत २, २।। व्हायचे. त्यानंतर दोन तासाचा अवधी मिळायचा. पण त्या वेळातदेखील माझ्याशी पाच मिनिटे बोलायचे नाहीत. मला वाटायचे की निदान एक वर्षभर तरी ह्यांनी सारं काही सोडून ( अर्थात नोकरी नाही ) द्यायचे. फक्त मी आणि माझे पति घरातील काम आटोपल्यानंतर जो थोडा वेळ मिळतो त्या वेळात एकमेकांनी एमेकांच्या आवडीनिवडी समजावून घेऊन त्या जमवून घ्यायच्या. भावी सुखदु:खाच्या गप्पा गोष्टी करून थोडा वेळ मजेत घालवावा पण तो क्षण कधीच आला नाही. जेवले की, मित्रांबरोबर फिरण्यास जात ते रात्री ८।।–९ ला येत. रात्री जेवले की झोपले. सकाळी उठून कामाला जात. पुन्हा कामावरून आल्यावर तोच प्रकार. वारंवार असा प्रकार घडत गेला व सहा महिनेपर्यंत मी सारं सहन केलं. त्यानंतर माझ्यातील सहनशीलता नाहीशी होऊन आमचे वरचेवर भांडण म्हणजे बोलाचाल व्हायची. तसे अधूनमधून खटके उडतच राहिले. त्यांनी मजा करू नये असे नाही. आपल्या प्रकृतीला झेपेल, सर्व्हिसवर त्याचा वाईट परिणाम होता कामा नाही. घरात लहान लहान भावंडं आहेत त्यांच्या मनावर चांगला ठसा उमटला पाहिजे. ह्या सर्व दृष्टी-कोनातून विचार करून मजा करावी. ह्यावरून आमचे वारंवार भांडण होत असते.. माझे लिखाण मनमोकळेपणाचे आहे त्याबद्दल हसू नये.

बाकी घरातील एकंदरीत वातावरण हसूनखेळून होते आणि आहे. सर्वांना मी मानीत होते व मानत आहे. सर्वजण मलाही मानत आहेत.

सासूची मी पहिली सून असल्यामुळे माझे फारच लाड होतात. मला त्या लेकीसमान मानतात. कधीही मला वाईट शब्द बोलल्या नाहीत व मी त्यांना दुखवले नाही. प्रत्येक नवीन सणाच्या दिवशी आपली स्वत:ची ( सासू ) नऊवारी पातळे नेसावयास देत असते. नवीन सणाला नव्या नवरीने जी काही तयारी करायची असते ती सुद्धा मला आयती तयारी करून मिळत असे. त्यासाठी मला स्वत:ला काहीच कष्ट पडत नाही. ती सर्व तयारी सासुबाईच करत असत. मला त्याबद्दल काहीच बघावे लागत नाही. वटपौर्णिमेला वडाची पूजा करायला जाताना देखील सर्व तयारी आयती करून मिळते. मी फक्त मेक्-अप् करून ताट उचलून जायचे.

सासु-सासरेच नव्हे तर चुलत सासुसासरेदेखील फारच प्रेमाने वागतात. त्यांची मुलेदेखील प्रेमाने वागतात. मला त्या घरात सासर असे वाटत नाही. सासु-सासरे अगदी आई-वडिलांप्रमाणे वागतात. दीर-नन्सं भाऊबहिणीप्रमाणे वाटतात आणि वागतातदेखील. खरोखरीच मी किती भाग्यवान, माझ्यासारखी भाग्यवान मीच. फक्त वर वर्णन केलेले तेवढेच दु:ख. तसे ते इतर वेळी चांगले वागतात. बाकी कशातच उणे-दुणे नाही.

पहिल्या सुरवातीलाच असे वाटायचे की नको तो बायकांचा जन्म. किती

त्रासदायक असतो. प्रथमप्रथम सर्वंच बाबतीत लाज वाटायची. त्यात आणखी चेष्टेखोर चुलत सासु असल्या की मला मेल्याहून मेल्यासारखे होई. एक वर्षानंतर मात्र आज १० वर्षाइतकी जुनी आहे असे वाटू लागले आहे.

□

६५

## सौ. जस्मिना भट्ट

□

जगावेगळी हा कॉलेजमध्ये मिळालेला फिशपाँड आज १२ वर्ष सार्थ ठरत आहे. लग्नपण जगावेगळ्या तऱ्हेने झालं! "वधू परीक्षा"— पहायला येणाऱ्याच्या समोर उभे राहून घरच्यांच्या पैशाने (हुंड्याने) विकत घेतलेला नवरा मला नको होता! विवाहानंतरही "स्वातंत्र्य." स्वतःचं नावसुद्धा बदलता कामा नये अशा जगावेगळ्या कल्पना होत्या माझ्या. "कालोयम निरवधी विपुलाच पृथ्वी, अस्ती मे कोऽपि समानधर्मा" अशी माझी श्रद्धा होती.

१० जुलै ६६ ला माझ्या एका डॉ. मित्रानी मला विवाहाबद्दल विचारलं की, "माझ्या एका मित्राची तुझ्याशी लग्न करण्याची इच्छा आहे." माझ्या अटी मी सांगितल्या. त्या व्यक्तीला मी ओळखत होते. त्यामुळे "ओळख, परिचय" ह्या स्टेप्स वगळूनच आमची मैत्री जमली. १० ऑगस्टला साखरपुडा झाला. मी खादी वापरत असल्याने त्याने आणलेली पातळे मी घेतली नाहींत. आमच्या दोघात खूपच वैषम्य होतं. मी खादी वापरीत असे तर तो टेरी-कॉट, टेरीलीन. स्टॅजिस्टर हा त्याचा साथी होता तर 'झाडू' हा माझा. ३५ व्या वर्षीसुद्धा १५ वर्षाच्या मुलांचा पोरकटपणा त्याच्यात होता. तिसावं वर्ष लागलं नसलं तरी साठीच्या प्रौढपणाने मी वागे. जमणार कसं आमचं हे आमच्यासुद्धा सर्वांना कोडंच होतं!

पण अंतरंगात साम्य होतं नव्हे एकरूपता होती. हळवा, भावनाप्रधान, सरळ स्वभाव, काव्याची आवड. मी "चांदरात" हा माझा आवडता काव्यसंग्रह त्याला भेट दिला. त्याने "कलापी" मला दिला. हो विसरलेच. आमच्या दोघांच्या जातीच नव्हे तर भाषा पण भिन्न होत्या. मराठी-गुजराथी, काव्य समजायला भाषेचे अपुरे ज्ञान अंतराय ठरत नाही तसेच प्रेमातसुद्धा भाषा गौण ठरली. 'हिंदी' ही आमची प्रेमभाषा होती पण "शब्दावीणा कळलं शब्दाच्या पलीकडलं!" हे सर्व झाल्यावर आमच्या विवाहात एक फार मोठी कायदेशीर अडचण होती. तीन दिवसरात्र मी रडून काढल्या. काही सुचेना! शेवटी तडजोडीचा

मार्ग म्हणून कुराणावर हात ठेवून आम्ही जीवनभर सोबत रहाण्याची शपथ घेतली. जयश्री ऐवजी जस्मीना व्हावं लागलं मला ! ! प्रसूववेदनांप्रमाणे ह्या वेदना ! !

पुण्यात आम्ही पंडितराज जगन्नाथ हे नाटक पाहिलं आणि राजकोटमध्ये " कलापी " सिनेमा. माझी तत्त्वं जगाशी मेळ खात नाही, म्हणणाऱ्या ह्या कवीराजाने आपल्या दासीबरोबर लग्न केलं होतं ! आमच्या आवडी निवडी भिन्न होत्या. मला नऊवारी आवडे तर त्याला " फिट् स्लीव्हलेस पंजाबी. " एकदुसऱ्याला समजावून घेण्यात नव्याचे नऊ दिवस संपले. अबू व पावागड फिट्पँट घालून चढले. खूप भटकले. निसर्गाबरोबर महाराष्ट्र सौराष्ट्राची संस्कृतीची भिन्नता व एकरूपता हा सतत चिंतनाचा विषय होता. झांजमेरला कोकणचा सागर भेटला पण नारळीचा किनारा नव्हता. " लेकीची मी आहे आई " असं नजरेने सुचविणारी प्रेमळ सासूपण गुजराथी साडीचा आग्रह धरणारी. मी ब्राह्मण नाही म्हणून असणारा राग माझ्या स्वभावाच्या गोडपणाने संपला. फुलके मला आवडू लागले. इतकेच नव्हे तर खमण ढोकळा, डाळ ढोकळा, ढेबरा, नावे उच्चारणं जड पडणारे पदार्थ मी करायला शिकले. काही मराठी भाज्या व पक्वान्ने त्यांना पण आवडू लागली. जी गुजराथी ६ वर्षात मला शिकता आली नसती ती ६ महिन्यात बोलता वाचता येऊ लागली. पण माझ्या सुविद्य मैत्रिणी मात्र मला म्हणत," आमच्या समोर गुजराथी बोलू नकोस ! " मराठी न मिळाल्याने गुजराथी मासिकं, कथा, कादंबऱ्या वाचाव्या लागल्या. त्यात पुष्कळ चांगला आनंद अनुभवला. भाषा वेगळी असली तरी संस्कृतीचा साहित्याचा आत्मा एकच होता–" नामरुपम् विहाय " तसं नसून नामारुपासह मी एकरुप झाले–त्यांच्या थापाड्या बहीणीचा त्यांना कमालीचा अभिमान होता. तिच्याबद्दल उणा शब्द न बोलण्याचं पथ्य पाळावे लागे. धाकट्या नणंदेकडून तिच्या भावाला आवडणारा शृंगार मनाला मुरड घालून करून घ्यावा लागे. " मॅरेज अँड कोर्टशिप " ह्या मित्राने दिलेले पुस्तकाचं सहवाचन केलं, म्हणजे मी ऐकलं. इंग्लीशचा अभ्यास त्या निमित्ताने केला. मोटार ड्रायव्हिंग व पोहणे शिकण्याची फार दिवसाची हौस भागवून घेतली. गुजराथी भाषा गोड वाटली तरी सतत ऐकावी लागल्याने तिचा वीट आला. की, मराठी ऐकण्याची दुधाची तहान रेडिओवर पुणे-मुंबई स्टेशन ऐकून भागविली. " वादळथीवातोकरी उंच्चो गड गिरनार. " गिरनार हा सौराष्ट्राचा मानदंड आहे. लोकगीत व इतिहासाचे आधिष्टान. देवळानी व सुंदर वनराजींनी नटलेला पाहिला. मी नावानेच हाक मारी. गुजराथी सर्व नावांना ' लाल ' ही टोपी मला मुळीच आवडत नाही. केवळ नावं " सुमन, इंदू, शांती, कान्ती " बायकी वाटतात त्यामुळे नावाच्यापुढे " भाई " लावूनच मी हाक मारते हा सर्वांच्या चेष्टेचा विषय होता पण असे म्हणतात "स्त्री ही क्षणाची पत्नी असून अनंतकाळाची माता आहे." तसंच

मला वाटतं पती हा क्षणाचा पती असून अनंतकाळचा साथी आहे. असा मित्र मला लाभला, देवाचे किती उपकार मानावे !

आमचं वर्षाचं सहजीवन "बेबी प्रज्ञा" च्या रुपाने साकार झालं आहे. ती मूर्ती—साजिरी-गोजिरी मूर्ती विविध प्रसंगाची आठवण साकार करते ! अशी आहे ही साठा उत्तराची कहाणी ! !

▭

६६

## सौ. साधना शिंदे

▭

माणसाच्या आयुष्यात कर्तृत्वाचा काळ तो किती, आणि त्यांत धुमश्चक्रे किती. वरवर दिसणाऱ्या साध्याही गोष्टीत कितीतरी उलथापालथी दडलेल्या असतात. "प्रेम हा छंद आहे. लग्न व्यवहार आहे. छंद करताना माणूस बेहिशोबी असतो, तर व्यवहार करतांना जरा जपूनच पाऊल टाकतो." ह्यांचे हे शब्द. आम्ही दोन्ही केलं. दोन्ही करताना बेहिशोबीपणा केला.

मी नवीनच कामावर राहिले आणि त्याच ऑफिसातील एका तरुणाशी ओळख झाली. ३१ मे १९६५. तेव्हा कळलं की तो तरुण म्हणजे नवोदित कवि-लेखक श्री. दत्ता शिंदे होय. ओळख अधिक वाढली. बावीस डिसेंबर ६५ रोजी वैदिक पद्धतीने आम्ही विवाहबद्ध झालो. माझा आनंद द्विगुणित झाला. पंचवीस डिसेंबरला महाबळेश्वरच्या रम्य कुशीत ठाण मांडलं. ह्यांच्या संगतीत भटकताना, त्यांचे मधुर शब्द ऐकताना, मी भारावून जात होते. मला स्वर्ग ठेंगणा वाटू लागला. महाबळेश्वराहून आम्ही—नातूनगरला ह्यांच्या गावी गेलो. तिथं सगळेच अवाक् होऊन आमच्याकडे पहात होते. प्रेमळ सासू-सासऱ्यांनी पहिल्याचक्षणी मला आपली म्हटलं. ते पाहून तर मी बावरलेच. कारण खेड्यातील लोक शहरात जाऊन प्रीतिविवाह करून आलेल्या मुलीशी कसे वागतील हीच धास्ती होती. श्रीसत्यनारायणाच्या पूजेच्यावेळी तिथल्या बायकांनी मी नऊवारी नेसलंच पाहिजे असा आग्रह धरला. मला तर नेसता येईना. मग ह्यांच्या मोठ्या बहिणीने मला नेसवलं. गोड संवेदना मनाला चाटून गेल्या.

साऱ्यांच्या सदिच्छा घेऊन आम्ही मुंबईला परतलो. त्याचवेळी ह्यांचा "दत्तसाधना" नावाचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. दामोदर हॉलला ह्यांच्या "अपराध कुणाचा ?" नाटकाचा प्रयोग झाला. सगळीकडून कोडकौतुक होत होतं. आईवडिलही चांगला जावई मिळाला म्हणून खूष होते.

लालबागला ह्यांच्या मोठ्या भावाच्या खोलीवर आम्ही रहात होतो. खोली दहा गुणिले दहाची. ह्यांचं आणि ह्यांच्या भाऊचं कशावरूनतरी बिनसलं. भावाने व्यवस्था करावयास सांगितले. साडेचार वर्षांची ह्यांची कमाई साडेचारशे रुपये देऊन आमची बोळवण केली. जायचं कुठं ? रहायचं कुठं ? खिशात फक्त साडेचारशे रुपये. ना अंथरूण ना पांघरूण ना निवारा. आम्ही ह्यांच्या एका मित्राकडे फक्त झोपण्याची व्यवस्था केली. ह्यांनी मी काही दिवस आईकडे रहावं असं सुचविलं पण मी ते मानलं नाही. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला.

महिन्याभरातच ते साडेचारशे रुपये हॉटेलवाल्यांनी संपविले. सकाळच्या चहापासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत सारं काही हॉटेलात. मी आजारी पडले. खूपखूप आजारी. डॉक्टरांची बिले वाढली. ह्यांनी कॉलेज सोडलं. सतत तीन महिने मी घरी होते. वाढत चाललेल्या कर्जात आणखी भर टाकून आम्ही विक्रोळीला हाऊसिंग बोर्डाच्या खोलीत रहावयास गेलो. तिथं तर सगळेच दारूडे, गुंड, चाकू-सुऱ्यावाले. आमचं नव्हतं तिथं कोणी नात्याचं, ना गोत्याचं. खोलीमालक दरदिवशी दारुच्या नशेत यायचा. सोबत गुंड मित्र असायचे. तोडून टाकण्याची धमकी द्यायचा. जे काही सामान घेतलं होतं, ते हाऊसिंग बोर्डवाले घेऊन गेले. एकंदरीत आमची फसवणूक करण्यात आली. एक हजार रुपये मातीमोल झाले. कर्जापरी कर्ज झालं, खोलीपरी खोली सोडावी लागली.

माझी तब्बेत कधी बिघडेल त्याचा नेम राहिला नाही. मी कुठेही, कधीही, बोलता बोलता, चालता चालता चक्कर येऊन पडायची. अगदी बेशुद्ध. मी कामावर असून नसल्यातच जमा होते.

ह्यांच्या एका मित्राच्या ओळखीने, आधीच वाढलेल्या कर्जात अधिक भर टाकून आम्ही भयखळ्याला रेल्वेचाळीत पन्नास रुपये भाड्याने खोली ठरविली. दिवसेंदिवस माझा आजार वाढतच होता. डॉक्टरही म्हणाले कीं, तुम्ही कुठे बाहेर बघा. मनात पाल चुकचुकली. मन अस्वस्थ झाले. कुणाची दृष्ट लागली ? कुणी दुष्टपणा केला ? हे कामावरून यायचे. मी उदास दिसताच मला हसविण्याचा प्रयत्न करायचे. आतून मात्र आम्ही दोघेही खचलो होतो.

माझ्या दुबळ्या मनात चाललेल्या वादळाने एक दिवस मूर्त स्वरूप घेतलं.

संध्याकाळची वेळ. ह्यांचा एक मित्र घरी आला. बसला. गप्पा मारल्या. जेवला व घाईघाईने निघून गेला. तोच हे घरी आले. मी त्यांचा मित्र त्यांना भेटला का म्हणून विचारले. ते नाही म्हणाले. माझं अंग शहारलं. रात्र झाली. मी एकदम किंचाळले. समोर एक पिशाच्च दिसत होतं. तो गोकुळाष्टमीचा दिवस होता. मी गर्भगळीत होऊन ओक्साबोक्शी रडत ह्यांच्या कुशीत बिलगले. ते पिशाच्च मला सांगत होतं–मी कोण ? तुला काय वाटलं सत्यवान ? ( ह्यांचा मित्र ) मी तो नव्हेच. मीच त्याच्या रूपाने तुझ्या हातचं जेवलो. आता मी तुझ्या घरच्या

एक सुवासिनीला घेऊन जाणार आहे. बापरे म्हणजे हा यम ! माझ्या शरिराचा गोळा झाला. ह्यांना ह्यांतलं काहीच दिसत नव्हतं, की ऐकू येत नव्हतं. पण माझ्या "मी आता मरणार" टाहोने मात्र ते हादरले. ते पिशाच्च क्रूर हास्य करीत निघून गेलं.

दोनच दिवसात ह्यांची सख्खी बहीण के. ई. एम्. हॉपिस्टलमध्ये साध्या दोन दिवसांच्या तापाने मृत्यू पावली. माझ्या हृदयात धस्स झालं. म्हणजे तो खरोखरीच यम ! आता आटोपलाच कारभार. हे कामावर गेले की जीव मुठीत धरून मी राही. रात्रंदिवस हृदय धाडधाड करी. कोणत्याही क्षणी मी बेशुद्ध होऊन पडे. पण आमच्या जीवनात नुसते चमत्कारच होते. एके दिवशी ह्यांची कुलदेवता–महालक्ष्मीने दृष्टान्त दिला की एका महाराला सन्मानाने जेवण घाला. पाच कुमारिका पुजा. पूजा घाला व घरी माझी स्थापना करा. त्याप्रमाणे आम्ही केलं. दर मंगळवारी महालक्ष्मीच्या देवळात जायला सुरुवात केली.

देवीच्या कृपाप्रसादामुळे आमचं काहीच वाईट झालं नाही. पण अपार कष्ट, मानसिक वेदना, दैवी आणि पिशाच्चांशी सामना, हे सारं सारं करता करता "अरे संसार संसार– – –"करायची वेळ आली.

□

## ६७
## सौ. सुमन
□

स्त्री आणि पुरुष यांच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा क्षण म्हणजे लग्न. नवीन नाते प्रस्थापित करण्याचा हाच एक क्षण असतो. पुढील आयुष्यात काय होणार आहे याची गोड आणि कडू कल्पना देणारा हाच क्षण. माझ्याही जीवनात हा क्षण आता लवकरच येणार या कल्पनेने संपूर्ण शरीर पुलकित झाले. भावी आयुष्याची रूपरेखा मी निश्चित करू लागले. कल्पनेमध्ये मी रममाण होऊ लागले.

तसे पाहिले, तर इतक्या लवकर मी प्रापंचिक जबाबदारीत पडेन, असे मला कधीही वाटले नाही. नुकतीच शालान्त परीक्षा देऊन मी निकालाची वाट पहात होते.

तो दिवस, अजूनही आठवतो. आमच्या शेजारी एक नवीन बिऱ्हाड आले होते. नवखे असल्यामुळे आम्हीच त्यांचा पाहुणचार केला. परिचयानंतर कळले की, आमचे हे शेजारी येथे एकटेच रहाणार. असे पण ऐकण्यात आले होते की, स्वारी चांगल्या सरकारी हुद्द्यावर आहे.

प्रत्येक आई आपल्या मुलीचे कल्याण करण्यात, तिचे भावी आयुष्य सुखाचे

जावो, या एकाच विचारात असते. " मुलगा चांगला आहे, शिवाय सरकारी हुद्यावर ". " का ग, सुमन. तुला पसंत आहे का? "

मी क्षणभर लाजून आत गेले. आणि होकार समजूनच आईने पुढील पाऊल टाकले.

आपण कोणाची तरी सहधर्मचारिणी होणार, या एकाच कल्पनेने, माझे मन बहरलेले होते. आणि तो क्षण जवळ आला. १८ जून ! हो १८ जून, म्हणजे माझ्या जीवनाला नवीन कलाटणी देणारा क्षण. आणि मी नवीन घरात नवीन संबंध जोडला. अनेक शुभाशीर्वादांचा वर्षाव झाला, आणि मी सासरी गेले. आईने निश्वासाचा श्वास सोडला. माझ्या पतिराजांच्या मूळ गावाहून मी परत त्यांच्या नौकरीच्या गावी आले. सासर आणि माहेर एकाच गावी असल्यामुळे मला माहेरची विशेष उणीव भासली नाही.

अशीच एक दिवस मी, हो अजूनही तो दिवस आठवतो, त्यांची प्रतीक्षा करीत बसले होते. स्वारी रात्री जरा उशीरा आली. म्हटले आज चांगली खरडपट्टी घ्यायची. प्रवेश केल्यानंतर समजले की, स्वारीची तब्येत ठीक नाही. पाय अडखळत होते. काहीतरी बडबडत होते. आणि ! आणि थोडयाच वेळात समजले की स्वारी पिऊन आली आहे. माझी तळपायाची आग मस्तकाला गेली. मी जरा रागावले. आणि मग त्यांनी मला झोडपण्यास सुरुवात केली. मेहेंदीचा रंग संपूर्ण नाहीसा झाला नव्हता, तोच त्यात रक्ताची भर पडली. त्यांनी मला ओढीत माझ्या आईकडे नेले. आईने हे पाहताच, तिला काहीच सुचेना. " मला आताच रु. २०० पाहिजे. नाहीतर बघा. "

माझे ते केविलवाणे रडणे पाहून, कोणती आई सहन करील. तिने पटकन पैसे काढून दिले. आणि मग हे रोजचे दुखणे होऊन बसले. रोज त्यांनी पिऊन यायचे आणि मला मारायचे. माझ्या सर्व आशा–आकांक्षा धुळीस मिळाल्या. मनात मी कल्पनाही केली नाही की एक वरपांगी इतका सुंदर दिसणारा मुलगा राक्षस असू शकेल. माझ्या गोड जीवनाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या. आईने अंथरूण धरले आणि आपल्या जावयाला दिवाळसण देण्यापूर्वीच परलोकाची यात्रा आरंभली.

प्रत्येक नववधूच्या जीवनात मंगळागौर, दिवाळसण, संक्रांत ( पहिल्या वर्षाची ) महत्त्वाची असते. पण माझ्या जीवनात या कधीच आल्या नाहीत. आणि आता येणे शक्यच नाही. आज मी एका मुलाची आई आहे. आता फक्त या आशेवर जगते की एक दिवस तो मोठा होईल. . . . हो पण कुणी पाहिले ?

समाजामध्ये अशा समाजविघातक व्यक्ती असतात. दुसऱ्यांच्या जीवनाचे मातेरे करणारे. इतका सुद्धा विचार नसतो त्यांना की आपण एखाद्याच्या आयुष्यात काटे घातल्यामुळे तिचे काय होणार आहे ?

आज त्यांनी मला सोडून दिले आहे. मी स्वतःच्या पायावर उभी आहे. पण जीवनात राम वाटत नाही. त्यातच हे मातृपद. परमेश्वराने स्त्रीला हे मातृपद दिले नसते, तर आज मी हे लिहिले नसते.

लग्नापूर्वी, ‘ लग्न ’ शब्द उच्चरताच माझ्या शरीरावर काटा उभा राहायचा. पण आनंदाचा, उन्मादाचा व कर्तव्याचा. आता ‘ लग्न ’ शब्द उच्चारताच मी भीतीने कापू लागते. लग्नानंतरचे माझे पहिले वर्ष काटयांनी भरले गेले.खाच-खळग्यात मला ढकलण्यात आले. आणि आज मला जीवनाच्या निराशेच्या वाटेवर सोडून देण्यात आले आहे. परमेश्वरा ! निदान लग्नानंतर पहिले वर्ष सर्व मुलींचे सुखाचे जाऊ दे !

□

## ६८

## सौ. इं. द. ताम्हनकर

□

“ उषे, अग म्हणावे तरी काय तुला ? लग्न होऊन नवे बिऱ्हाड थाटल्याला अजून महिना होतोय न होतोय तोच तू निमित्ताचे नाटक करून माहेरी पळून आलीस ! म्हणे उबग आला ! शर्थ आहे तुझ्यापुढे. पोरी, अग, उभे आयुष्य अजून कंठायचे आहे नि इतक्यातच – – ?” “ नाहीतर ग काय आई ? चोवीस तास एकच ध्यास माणसाने धरला तर करावे तरी कसे ? रोज रोज ऑफीसला दांडी मारून बसतात. ऑफीसमध्ये मी सारखी समोर दिसते म्हणे नि काम सुचत नाही ह्यांना, की मारली बुट्टी. सारखा ससेमिरा यांचा पाठीशी लागलेला. खरेच वीट आला बघ आई, सतीशांच्या या गळेपडूपणाचा. चार सहा दिवसांनी माणूस लाडात आले तर वाटेल मजा. पण यांची मुळी दुसरी बातच नाही. अतीच आहेत सतीश अगदी. म्हणून शेवटी पाळीचे निमित्त बनवून साँगितले आणि आले सटकून . ” “ म्हणजे ! एवढे संस्कृत घेऊन एम. ए. झालीस ती फुकटच म्हणावयाची. मारे तेव्हा मला कालिदासाची आणि कोणाची तरी शृंगारवर्णने मुद्दाम वाचून दाखवायचीस. आता एवढा संस्कृतांतील वर्णने साकार करू पाहाणारा, अनिरुद्ध तुझ्या वाटणीला आला आहे तर तू ....” “ आई, बघ हं माझी थट्टा करशील तर ! ” “ उषे बायकांच्या जातील असे असहनशील असून चालत नाही. थोडा सोशिकपणा हवा धारण करायला तुला. नव्याच्या नवलाईचे हे उधाण आहे. अग, ओसरेल ते हळूहळू, निघते कोणी जास्त आधाशी. थोडे बाधले की येते ताळचावर. आता तुला थोडा जास्त आग्रह होतो आहे खरा पण उपास पडण्यापेक्षा एका परीने हे जास्ती बरे मी म्हणते.”

" अंय्या, मी समजले नाही आई, तुझे म्हणणे ? कुणाला उपास पडला होता की काय ?" " मुलगी असलीस माझी, तरी आता बरोबरीची झालीस. तुझ्या हितासाठी म्हणून आज मन मी थोडे मोकळे करून, तुला माझी एक अगदी खाजगी आठवण सांगते. हल्लींच्या मायलेकीत या विषयीपण हितगुज व्हायला हरकत नाही. तर-हं , मी तुला आमच्या वेळची थोडी हकीकत सांगते. लग्नाच्या चौथ्या दिवशी गर्भादान-विधी होता. आधीच्या तीन दिवसात या तुझ्या बाबांनी माझ्याशी नुसते बोलण्याचाही प्रयत्न केला नव्हता. आणि त्या दिवशी पहाटे उठून ताईंना म्हणजे तुझ्या आजीला हे म्हणाले, " आता मी शांताला घेऊन बाहेर फिरायला जाणार. आहे. " हे ऐकून माझ्याइतवयाच सासूबाईही थक्क झाल्या. त्यांनी मानेनेच मला ' जा ' म्हणून खुणावले. माझे पातळ बदलून होताच आम्ही बाहेर पडलो. रस्त्यात नि पुढे पी. वाय्. सी. च्या मोकळ्या मैदानात बसल्यावर या तुझ्या बाबांनी मला काय योजना ऐकविली असेल ? अग, खरे देखील वाटणार नाही कुणाला सांगितले तर. पण हे म्हणाले, " एक वर्ष आपण लग्न झालेच नाही असे राहावयाचे नि तेही एकत्र उठून बसून निजून. ताईला किंवा कोणाला शंका पण येता कामा नये. आसक्तीची सोय झाल्यावरही विरक्ती वठवता आली तर तो खरा पुरुषार्थ. आईवडिलांनी पसंत केलेल्या मुलींशी डोळे मिटून लग्न करण्याचा मी एक प्रयोग केलाच आहे. आता मला हा दुसरा प्रयोग करावयाचा आहे. मिळेल तुझे सहकार्य ? अर्थात् ही अजब मागणी धुडकावण्याचा तुला न्याय्य हक्क आहे. तुझा कोंडमारा होणार असेल तर माझा हा प्रयोग करण्याचा मला अधिकारच नाही. पण हा प्रयोग मला इतरत्र करता येण्याचीही शक्यता नाही. म्हणून सहकार्यासाठी तुझ्यापुढे मी हात धरला आहे. आज रात्री तुला अचानक बुचकाळ्यात पडायला न लागावे म्हणून मी आता हा फिरण्याचा घाट घातला. हं, तर-काय होतोय तुझा बेत ?" नव्या नवोढा पत्नीला तुझ्या बाबांची ही असली सलामी. पुरुष फार चंचल, उतावळे, नि हव्यासी असतात अशी माझी असलेली कल्पना पार धुळीला मिळाली त्याक्षणी. उलटसुलट काही म्हणायला माझी जीभच रेटेना. मी होकार देऊन मोकळी झाले आणि ह्यांनी चक्क माझ्या पाठीवर शाबासकी दिली. सर्वांगातून एक अननुभूत अशी लकेर लहरून गेली. नुकतेच दिसायला लागत होते. आता हे रंगात येऊन आपल्या आयुष्यातील हकीकती मला ऐकवू लागले. मी केवळ ऐकण्याचे काम करीत होते. शेवटी ' आता जाऊ या ना परत, ' असे म्हणण्याचा मी धीर केला तेव्हा हे भानावर आले, त्या रात्री बरं का उषे, तुझे बाबा लहान मुलासारखे माझ्या मांडीची उशी करून निवांतपणे झोपी गेले. सकाळी मुद्दाम नाटकीपणाने उठले नाहीत. आणि वर या नाटकाची सांगता म्हणून कामालाही त्यांनी तुझ्या भाषेतील दांडी मारली त्या दिवशी. खरे सांगू उषे ? माझापण त्या सकाळी त्या बोलण्यावर मुळीच विश्वास बसला नव्हता. पण त्यांनी आपले शब्द खरे करून

दाखविले. मग सहा महिन्यांनी झाली त्यांची बदली. आणि नव्या गावी आमचा राजाराणीचा स्वतंत्र संसार सुरू झाला. तरीही यांचा निर्धार डळमळला नाही. मी एकदा तर यांची परीक्षा घेण्याचाही मुद्दाम प्रयत्न केला. पण नाही. मला चुचकारून गोंजारून त्यांनी आपल्या मते मला शांत केली. केव्हा केव्हा ही मुलखावेगळी अजब तऱ्हा मला खरोखरही असह्य होई. पण ह्यांच्या वर्तनात कुठे बोट ठेवायलाही जागा नव्हती. मीही सारे अंगवळणी पाडून घेतले. शेवटी प्रतिज्ञेचे ते पर्व एकदाचे पार पडले आणि मग.. . . मग आम्ही प्रथम अंतर्बाह्य पतिपत्नी झालो. त्यावेळी त्यांनी पंधरवडाभर रजा घेतली आणि आम्ही अगदी इंग्रजी पद्धतीने मुंबई नि महाबळेश्वर येथे मधुचंद्र साजरा केला. वर्षभराची ती तपश्चर्या, नि त्या नंतरचे पंधरा दिवस मनसोक्त चाललेले त्या व्रताचे उद्यापन, यांच्या आठवणींनी अजूनही माझ्या सर्वांगावर सुखाचा काटा फुलतो. तुझे सतीश एका टोकाचे आहेत, तर बाबा पार दुसऱ्या टोकाचे. मी मनाला आवरले तसे तुही आपल्या मनाला थोडी कळ सोसायला सांग. अग, इंग्रजी पुस्तके वाचून या पुरुषांच्या डोक्यात खुळचा कल्पना ठाण मांडतात. 'प्रारंभीच आपण लेचेपेचे ढिले ठरू नका.' 'पत्नीवर पौरुषत्वाचा प्रभाव पाडा,' असा आचरट सल्ला देणारी ही बाष्कळ पुस्तके. जातात त्यांच्या आहारी ही मंडळी. तू बिथरून डोक्यात राख घालू नकोस. आली आहेस तर हे चार दिवस नाटक पुरे करण्यासाठी म्हणून रहा इथे; पण मग लगेच मुकाटयाने जा परत बिऱ्हाडी. अग आपणच कुठे सहलीची, भटकण्याची, नाहीतर नाटक-चित्रपटाला जाण्याची अशी टुमी काढाव्या. वेळ रिकामा पडूच देऊ नये. काय ?–

"बघ तुझ्यासाठी आज मला आमच्या प्रथम वर्षाचे केवळ आमच्यातले रहस्य उघड करून सांगावे लागले. बोलू नकोस हं कुणाजवळ, अगदी तुझ्या सतीशच्यापाशी सुद्धा." "म्हणजे पण बाबा अगदी पक्के आहेत नाही ?" "अग, हो ना. त्यांचा निश्चय म्हणजे अगदी वज्रलेप. हो, ए लाडकाबाई, तू जरी अगदी बाबांच्या गळयातली ताईत असलीस ना तरी तुला हे सारे प्रकरण ठाऊक झाले आहे, याची त्यांना कुणकुण सुद्धा वाटता कामा नये, तुझ्या बोलण्यात कधी. जेव्हा का ते बिथरतात ना तेव्हा त्यांचा राग शांत करताना मला कोण महाप्रयास पडतात. तुम्हा मुलांना आम्ही काहीच यातले समजू देत नाही म्हणून. मुलांच्या देखत आईला रागवू नये कधी वडिलांनी, हा नियम ते मोठ्या काटेकोरपणे पाळत आले आहेत. पहिल्या वर्षी त्यांच्या रागाची एक नुसती पद्धत मला काही माहीत नव्हती. तुझी आजी नको म्हणाली असताना मी एकदा गेले होते बाहेर आणि घरी आल्यावर तुझ्या बाबांना ही बातमी मिळाली. बस ! झाले ! ! तब्बल पंधरा दिवस झाले, त्यांचा अबोला संपेना. त्यापेक्षा खूप बोलून मला ते भरपूर रागावले असतेतरी इतके असह्य झाले नसते. पंधरवडा इतका जड गेला मला ! काय करावे हे ही

मला नवखेपणामुळे मुळीच समजेना. शेवटी एका रात्री हिय्या करून मी चूक कबूल केली व ह्यांची क्षमा मागितली.' आईचे कोणी न ऐकलेले मला खपणार नाही ' अशी समज देऊन त्यांनी अबोला सोडून दिला. इतकी पंचवीस वर्षे उलटली मध्ये, पण अजूनही त्या आठवणीने माझे मन बेचैन होते. सुरुवातीला एकमेकांच्या स्वभाव-खोडी समजेपर्यंत असे व्हायचेच. चला, पुरे हा विषय. अरू, चंदा, आता शाळा-कॉलेजातून परत यायची वेळ झाली. "

□

## ६९

## श्रीमती अंबूताई काळे

□

माझे गतवर्षी लग्न झाले. मला पण हायसे वाटले. कारण वडिलांची सांपत्तिक स्थिती बेताची त्यामुळे कित्येक ठिकाणी, हुंडा आड आला, त्यामुळे लग्न फिसकटायचे, त्यातून मला मंगळ. तेव्हा आईचे म्हणणे असे की, मंगळ असेल त्यालाच मुलगी द्यावी. पत्रिका पहावी; असे तिचे मत. पण, बाबा आधुनिक, त्यांचा भरवसा पत्रिकेवर नव्हता. आईला पत्रिकेचा ठोकताळा बरेच वेळा पटला होता. हे लग्न झाले. मलापण आईच्या ज्योतिषाचा विसर पडला. व मी माझ्या संसारात, पतीच्या सहवासात रंगून गेले.

आई चिंतातुर दिसावयाची, कारण ह्यांना मंगळ नव्हता. तेव्हा हे लग्न इष्ट नाही, तिला तिच्या ज्योतिषाने सांगितले होते. माझे मंगळामुळे, ह्यांना गंडातर आहे. त्यातून निभावले तर पुढे सर्व ठीक होईल. असे ज्योतिषाचे म्हणणे पडले होते.

लग्न झाल्यावर पहिले वर्ष किती आनंदाने जाते. माझे पण तसेच चालले होते. मला जगाचा विसर पडला होता. आम्ही एकमेकात रंगून गेलो होतो. सासरची सर्व माणसे चांगल्या स्वभावाची असल्यामुळे, व त्यातून हे, म्हणजे एकुलता एक मुलगा, रुबाबदार, मोठ्या हुद्द्यावर; स्वभाव मनमिळाऊ, म्हणजे काय, आईबापांचा जीव की प्राण. तेव्हा आमचे कोडकौतुक खूपच होत असे. आम्हाला लग्न झाल्यावर कुठे तरी हनीमूनला जावयाचे होते, पण ह्यांना लगेच रजा मिळेना. लग्नानंतर बरेच दिवसांनी रजा मिळाली. तोपर्यंत लग्नाला सहा महिने होत आले होते. नवीन युवराजांच्या आगमनाची चिन्हे दिसून लागली. घरात सर्वत्र आनंदी आनंद पसरला. सासूबाई हनीमूनला जाण्याची घाई करू लागल्या, लौकरच जा, नाही तर सूनबाईला पाठवता येणार नाही. तेव्हा ह्यांनी

बिनपगारी रजा घेतली व आम्ही हनीमूनला जावयाची प्रवासाची तयारी केली. काश्मीरला जावयाची तयारी करून, आम्ही प्रवासास, सगळयांचा प्रेमाचा निरोप घेऊन निघालो. पुष्कळ प्रेक्षणीय स्थळे पाहिली. व पाहात होतो, आठ दिवसांनी आमचा प्रवास संपून आम्ही परत घरी जाणार होतो, रेल्वेचा स्वतंत्र डबा केला होता, अर्थात डब्यात आम्ही दोघेच होतो, पौर्णिमा होती, रात्री पिठुर चांदणे पडले होते, दऱ्याखोऱ्यातून आगगाडी चालली होती. हे म्हणाले, "दाराशी ये, आपण चांदणे पाहू, वनश्री कशी बघ चांदण्याने नाहून निघाली." मी व हे खिडकीशी उभे राहिलो. हे म्हणाले, आपण दार उघडून पाहू. असे म्हणून हे दाराशी, दार उघडण्याकरिता जाऊ लागले, मला भीती वाटावयास लागली, चालत्या गाडीचे दार उघडू नका, असे मी म्हटले. ह्यांनी दार उघडले, व मला म्हणाले, अगदीच भित्री आहेस. आम्ही दोघे उघड्या दारातून चांदणे दरीत पडलेले पाहात होतो. इतक्यात गाडीला वळण आले, त्यामुळे धक्का बसला व ह्यांचा दाराचा हात सुटला. व हे बाहेर फेकले गेले. शालिनी, शालिनी, अशी ह्यांची हाक खोल खोल ऐकली. मी एकदम रेल्वेची साखळी ओढली, गाडी थांबली. गार्ड डब्याशी आला. त्याला मी सर्व सांगितले. त्याने माणसे अंवती भोवती पाठविली. पण ह्यांचा पत्ता लागला नाही. पत्ता लागला नाही हे ऐकताच, मी एकदम बेशुद्ध झाले. वरून बेशुद्ध असले तरी अंतर्यामी सावध होते. मला लग्नापासूनचा चित्रपट डोळयांसमोर दिसू लागला. आमची वरात आली, तांदूळाचे माप उंबऱ्यावरचे पायानी लवंडावयाचे, पण मला भीती वाटली कसे लवंडावे. आमच्या दोघांच्या पदराला गाठ मारलेली होती. ह्यांनी मला हळूच चिमटा घेतला व आटप, माप लवंडून टाक, असे म्हणाले. तसेच मंगळागौरीच्या पूजेच्या वेळेस, हे मला म्हणाले, देवीजवळ काय मागणार आहेस ? मी काहीच बोलले नाही. तेव्हा हे म्हणाले, आपल्याला युवराज पाहिजे. असे अनेक प्रसंग डोळयासमोर दिसू लागले. मी ज्या वेळेस शुद्धीवर आले, त्या वेळेस मी रेल्वेच्या दवाखान्यात होते. मला पत्ता विचारून त्यांनी माझे घरी तारा केल्या. घरची माणसे आली. हकीगत ऐकून घाबरून गेली, पोलीसात वर्दी दिली, जागजागी तारा केल्या, बक्षीसे लावली, सगळीकडे धावपळ सुरू झाली. आई तर सुन्नच झाली, तिला ज्योतिषाचे बोल आठवले, पण काय करणार ? शोधाशोध सुरूच होती, मलातर काहीच सुचेना, त्यांनी शेवटची मारलेली हाक 'शालिनी, शालिनी,' सारखी माझ्या कानात घुमत होती.

आता आम्ही परत आल्यावर आमचे घरात वर्षसणाची दणक्याची तयारी चालली होती, व त्याच वेळेस माझे मोठे डोहाळेजेवण करण्याचे सासू-सासऱ्यांनी ठरवले होते; पण, हे संकट-भीषण प्रसंग आमचेवर ओढवला.

आता हे जे दरीत कोसळले ते वेलींना गुंडाळत गुंडाळत तळाशी गेले, अर्थात हे बेशुद्ध होते, खाली दरीच्या तळाशी पाकिस्तानची छावणी पडली होती, त्यांनी

ह्यांना छावणीत नेऊन जखमा बांधल्या, व उपचार सुरू केले, काही दिवसांनी शुद्धीवर आले तेव्हा त्यांना सर्व आठवले, की आपण प्रवासात होतो, दार उघडून दोघे चांदणे पहात होतो, इतक्यात गाडीला धक्का बसला व माझा हात सुटला व मी बाहेर फेकलो गेलो. मी घाबरून शालिनी, शालिनी, अशी हाक मारली, पुढचे काही आठवेना. शुद्धीवर आल्यावर मला घर दिसू लागले. मी मेलो अशी सर्वांची समजूत झाली असेल. त्यांच्या दुःखाला पारावर नाही, हाय, माझी शालिनी कुठे असेल ? हायरे दैवा.'

हे शुद्धीवर आल्यावर पाकिस्तान्यांनी यांची चौकशी केली, हे हिंदू आहेत असे त्यांना कळले. तेव्हा ते म्हणू लागले की, तू मुसलमान हो, अथवा आम्हाला दहा हजार रुपये दे, म्हणजे आम्ही तुझी सुटका करू. अर्थात ह्यांचेजवळ दहा हजार रुपये कुठून असणार ? अंगावरच्या कपड्यानिशी खाली पडले, तेव्हा त्यांनी सुचवले कीं, तू मुसलमान होत नाहीस तर आम्ही आमचीच १० माणसे हिंदू वेषाने तुज बरोबर देतो, तू पत्राने तुझ्या घरी सुखरूप असल्याचे कळव अमुक ठिकाणी पैसे घेऊन या. पोलीसात कळवले तर तुला गोळी घालू असे ते म्हणाले. ह्यांनी त्यांच्या सर्व अटी मान्य केल्या, व पत्र घरी आले, ह्यांचे हातचे पत्र व हे जिवंत आहेत असे कळल्यामुळे, सर्वत्र आनंदी आनंद पसरला, व दहा हजार रुपये भरून हे घरी सुखरूप आले. ह्या सर्व घडामोडीने व धसक्याने मी पूर्ण दिवस भरण्याचे आधीच प्रसूत झाले व मुलगा झाला. बारसे व वर्षसण एकदमच करावयाचा असे ठरले, व धूमधडाक्यात बारसे व वर्षसण साजरा झाला.

□

७०

**सौ. लीला शहा**

□

नुकतंच सोळावं सतरावं लागलं अन् माझं लग्न झालं. अगदी अकल्पित. अनपेक्षित. मुळातच मी कमालीची स्वप्नाळु अन् त्यात वयाच्या मानाने समजही कमीच. घरात माझंच लग्न पहिलं वहिलं. त्यामुळे इतरांचे संसारही जवळून पाहिले नव्हते. आई–वडील अगदी जुन्या विचारांचे, त्यांना कधी जवळ बसलेलं पाहिलेलं नाही. तुळजापूरसारख्या लहान खेड्यात व पवित्र क्षेत्रात जन्म झालेला, त्यामुळे तिथलं सगळं वातावरण भक्तिमय, श्रद्धामय, त्यामुळे मनात पावित्र्याच्या काही चमत्कारिक कल्पना घर करून बसल्या होत्या. खांडेकरांच्या आदर्श प्रेमाने व ध्येयवादी नायकांनी भरलेल्या कादंबऱ्यांचा खोल ठसा मनावर उमटला होता. आणि या सर्व गोष्टींचा परिणाम

म्हणजे शरीरसुखाच्या पलीकडील असं काहीसं प्रेम करायला निघालेली मी स्वतःच्याच स्वप्नाळू दुनियेत रंगलेली असे. चुंबनाच्या पलीकडे गेलेला कादंबरीतला नायक मी बघितला नव्हता. आणि लग्न ठरल्यावर 'ब्रह्मचर्य हेच जीवन व वीर्यनाश म्हणजे मृत्यू' व 'मनोवांछित संतति' अशी दोनच पुस्तकं वाचली त्यामुळे माझ्या वागण्याचा त्यांना फार त्रास होऊ लागला. त्यांना वाटे हळूहळू मला त्यांची ओढ वाटेल. पण छे! मी सतत त्यांच्यापासून दूर राहत असे. पुष्कळदा ते दिवसभर उदास व गळाठल्यासारखे दिसत. अशा वेळी मला त्यांच्याविषयी कमालीचे प्रेम वाटे. मी त्यांच्या जवळ आऊन त्यांच्या डोक्यावर हळूवार हात फिरवू लागे. चटकन् ते मला जवळ घेत– आवेगाने उत्कटतेने. पण तितक्याच आवेगात मी दूर होऊन म्हणायची "हे काय तुम्हाला बरं नाही ना?" तेव्हा ते चटकन् माझा हात झिडकारून टाकीत. मग काय झालं ते मला समजेनासंच होई. लग्न नात्यातलंच असल्यामुळे सासरची सर्व माणसं समजुतदारपणे, प्रेमळपणे, माझ्या वयाचा विचार करून वागत. त्यांची मोठी बहीण अनुभवी व समजुतदार होती. तिनेही मला बराच उपदेश केला पण आमच्या मीलनानंतर वैफल्याची एक चमत्कारिक जाणीव मन पोखरीत राही. आणि त्यामुळे मी त्यांच्यापासून अधिकच दूर राही. हळूहळू ते माझ्या वागण्याला कंटाळले असावेत. मी माहेरी जाऊ का म्हणताच मला ते सोडून आले माहेरी. त्यांची उत्कट पत्रं येत त्यात ते मला समजावीत, 'दोन मन जुळण्याचं बौद्धिक एकात्मतेचे शरीरच माध्यम आहे' असं लिहीत पण मी त्यांना उलट लिहीत असे की "तुम्ही प्रेम कधीच करू शकणार नाही का? मी इतकी दूर असूनही तुमच्यावर अतोनात प्रेम करते. मग मने जुळली नाहीत असं का वाटतं तुम्हाला?"

माहेरी मी बरीच राहिले. पत्रं वाचण्यात व लिहिण्यात केवढी उत्कटता आहे, कधी न संपणारी ओढ आहे असं मला वाटे आणि तशात एखादी कविता सुचे. त्यावेळी उस्मानाबादच्या बालाघाट साप्ताहिकात माझी पहिली कविता छापून आली. कविता साधारणच आहे पण माझ्या वृत्तीची वाचकांना कल्पना यावी म्हणून इथे देत आहे त्यांतल्या काही ओळी—

'शाप जन्माला मृत्यूचा, दुःख शत्रूरे सुखाचा
मीलनाला वैफल्याचा शाप, न्याय या जगाचा
दूर निर्मू नवं जग, जेथ नाही दुःख दैन्य
प्रेम उदात्त अभंग, चिरकाल अन् मीलन.'

अशाच स्वप्नील दुनियेत डुंबत असताना त्यांचं पत्र आलं त्यांनी लिहिलं होतं, 'आपल्याला घर मिळालंय. तू लवकर ये. तुझ्या बौद्धिक प्रेमाच्या भोंगळ कल्पनांना मूठमाती देऊन ये. तरच आपला संसार सुखाचा होईल. ह्या वयात जर आपण रात्री रंगवल्या नाहीत तर काय म्हातारपणी एकत्र यायचं का? तू माझ्या मनासारखं वाग मी तुला फुलांत ठेवीन. कुठल्याहि दुःखाची झळ तुला लागू देणार नाही.'

वगैरे वगैरे बरंच न सांगण्यासारखं पण सारं शरीर झंकारित करणारं. पत्र वाचून कुठेतरी उसवलं कुठेतरी सांधलं गेलं. नव्या घराची स्वप्नं पुन्हा रंगू लागली. स्वप्नं, स्वप्नं अन् स्वप्नं, बस्स यापेक्षा मला काहीच येत नव्हतं. स्वयंपाक येत नव्हता. कामात लक्ष नसे. त्यांना हवं ते सुख देण्याचं शहाणपण नव्हतं तरीही ते माझ्यावर कातावले नाहीत. मी सर्वांचं मन राखायचं, त्यांच्या आवडी निवडी बघायच्या, त्यांना आपल्यात बांधून ठेवायचं ते सारं राहिलं बाजूला, उलट सासरची माणसंच माझ्या मनाला जपत. आणि कुमारच माझं मन जिंकायचा प्रयत्न करीत. आता मला वाटतं दुसरा एखादा नवरा असता तर तो किती संतापला असता, त्यानं 'वेगळा मार्ग' सुद्धा शोधला असता. तशी त्यांनी सुद्धा मला धमकी दिलीच होती (केवळ धमकी हं) पण माझ्या भावविश्वातून, स्वप्नाळू जगातून मला बाहेर काढायला त्यांना फार त्रास झाला. एखादी कळी हळूवारपणे पाकळी पाकळीने उलगडावी तसं ते माझ्याशी वागले.

नव्या घरी आले. जबाबदारी, काम, पाहुण्यांची ये जा यामुळे आपोआपच मी थोडीशी भानावर आले होते. त्यात शेजारपाजारची नवी, तरुण जोडपी क्षणाक्षणाला स्पर्शसुखाची संधी घेणारे प्रेमिक बघून हळूहळू मी व्यवहारी जगात आले. बेसूर झालेल्या जीवनाच्या तारा मस्त जुळू लागल्या आणि मग त्यातून स्वर उमटू लागले उत्कट प्रीतीने चींब भिजलेले, प्रणयरसान वातावरण भारून टाकणारे. आता मात्र वेळ अशी आलीय की २ दिवस जरी ते कुठे परगावी गेले की माझी संस्कृत कादंबऱ्यातील विरहिणीसारखी अवस्था होते.

▭

७१

**सौ. कांचन**

▭

पहाता पहाता समोर दिसणारा धुक्याचा धूसर, गूढरम्य आणि तरीही आकर्षक दिसणारा पडदा अदृश्य व्हावा ना त्याप्रमाणे लग्नानंतरचे पहिले वर्ष पहाता पहाता अदृश्य झाले! पाखराचे पर लावून उडून गेले. पण जाता जाता आपला जाईजुईच्या फुलांसारखा मंदमधुर सुगंध मागे ठेवून गेले. माझ्या मनाच्या मखमली कुपीत तो सुगंध मी जपून ठेवला आहे. पण... पण हा सुगंध मला दृश्यरूप करता येईल काय? विश्वातल्या साऱ्या सुंदरतम, मंगल गोष्टींचा गंध-रंग-रूप घेऊन साकार झालेले ते अद्भुत दिवस! त्यांना शब्दबद्ध करणे मला जमेल काय?

उंबरठ्यावरील भरले माप पायांनी उलथून मी घरात प्रवेश करताच

समोर दिसल्या त्या मेघाप्रमाणे सर्वांवर आपल्या निरपेक्ष प्रेमाची बरसात करणाऱ्या माझ्या सासूबाई ! मी वाकून त्यांना नमस्कार करताच, एकदम त्यांनी मला आपल्या हृदयाशी धरले आणि भरल्या आवाजात त्या म्हणाल्या, " सुखी हो पोरी! " त्याक्षणी मला वाटले —नव्हे जाणवले की माझी स्वर्गवासी आईच जणू त्यांच्या मुखाने मला आशीर्वाद देत आहे.

मधुचंद्रासाठी आम्ही माऊंटअबूला गेलो होतो. त्या आठ दिवसातील एकेका क्षणाची आठवण झाली तरी आनंदाने न्हाऊन निघते माझे मन ! अचानक आलेल्या श्रावणसरीमुळे भिजून चिंब व्हावे ना तसे ! त्या वेळी . . .त्या दिवसात एकच भावना ! समर्पणाची ! सर्वस्व समर्पणाची ! विजिगीषु वृत्ती मनात ठेवून दोन जीवांचे मीलन कधीच संभवत नाही. पण मी फार फार भाग्यवान ! खरेच सांगते की ह्यांच्या प्रेमाच्या अमृतवर्षावाने माझे मन, माझा आत्मा तृप्त झाला ! माझे अवघे अस्तित्व कृतार्थ झाले ! दोन शरीरे . . .एक मन ! असेच काहीतरी अद्भुत त्या काळात घडले असावे. एका अलौकिक, अनुपम आनंदाच्या साक्षात्काराने माझे मन मोहरले होते. अंग अंग पुलकित झाले होते. आणि आठवत होती कविवर्य तांब्यांची ती कविता—

" नववधू प्रिया मी बावरते, लाजते, पुढे सरते. "

मधुचंद्रानंतर आठ एक दिवस माहेरी राहून मी मग सासरी आले. आणि . . . आणि ज्या स्वप्निल विश्वात मी वावरत होते त्यातून एकदम जागी झाले. विवाह म्हणजे फक्त दोन जीवांचे मीलन नव्हे. विवाह म्हणजे समाजातील दोन भिन्न कुटुंबाना जोडणारा एक अदृश्य नाजूक रज्जू ! अती ताणला तर तुटणारा ! नाहीतर अनेक मने जोडणारा नाजूक तरीही चिवट असा धागा ! आमच्या विवाहाने दोन्ही कुटुंबात अकृत्रिम असा स्नेह मला निर्माण करायचा होता. आमच्या विवाहाच्या बाबतीत ती जबाबदारी आम्हा दोघांवर होती. कारण आमचा प्रेमविवाह होता आणि तो सुद्धा आंतरजातीय ! मी ब्राह्मण तर हे होते सी. के. पी. ! आमच्या लग्नाला प्रथम विरोध झाला होता. पण मग आमचा दोघांचा निर्धार पाहून दोन्ही घरच्या वडीलधाऱ्या मंडळींनी समजूतदारपणा दाखविला होता. आणि त्या सर्वांचा आशीर्वाद घेऊनच आम्ही विवाहबद्ध झालो होतो. दोन्ही घरातील रीतभात, खाणे-पिणे, आचार-विचार ह्यात चांगलीच तफावत होती. मला ह्या सर्व गोष्टींशी जुळवून घ्यायचे होते. तडजोड करायची होती आणि हळूहळू त्याघराशी एकरूप होऊन जायचे होते. ही तारेवरची कसरत करताना अनेकदा, तोल जाऊन मी पडेन असे वाटले. कित्येकदा पडलेही ! पण माझ्या पतीच्या आणि सासूबाईंच्या आधाराने पुन्हा पुन्हा उभी राहिले आणि अन्ती यशस्वी झाले. आता ह्या घराने, ह्या घरातील माणसांनी मला आपल्यात अशा रीतीने समावून घेतले आहे की मी जणू ह्या घराला कधी परकी नव्हतेच !

....

लग्नानंतर सहा-सात महिन्यांनी मी तापाने फणफणले असता माझ्या सासूबाईंनी माझ्यासाठी घेतलेले कष्ट आणि जागविलेल्या रात्री, मी कधीच विसरणार नाही. एक दिवस मला चारपर्यंत टेंपरेचर होते. तापाच्या ग्लानीतून जाग आली तेव्हा पहाते तो सासूबाई माझा घामाने थबथबलेला देह मऊसूत कपडा हाती घेऊन हळूवारपणे पुसत आहेत. रात्री बाराचा सुमार, सर्वत्र नीरव शांतता आणि समोर त्यांची ती थकलेली भागलेली कृश मूर्ती ! माझ्या डोळ्यात अश्रू उभे राहिले आणि ओठातून अस्फुट हाक बाहेर पडली 'आई ! ' त्या क्षणीच त्यांच्या माझ्यामधील परकेपणाचे बंध तटातट तुटले. अशा आपल्या नेहमीच्या निरपेक्ष सेवाव्रताने त्यांनी अबोलपणे जणू मला शिकविले "प्रेम लाभे प्रेमळाला–त्याग ही त्याची कसोटी."

सर्वात अवघड वाटले मांसाहाराची सवय करताना ! मेलेले झुरळ दिसले तरी अंगावर शहारा येईल अशी सोवळी वृत्ती माझी ! मच्छी, मटन, कोंबडी इत्यादी पदार्थ जेव्हा घरात केले जात तेव्हा मला इतकी शिसारी येई की चार चार दिवस जेवण जात नसे. कधी ते सारे असह्य होऊन मला रडू यायचे. आणि वाटायचे की त्या घरापासून दूर दूर पळून जावे. अशावेळी हे माझी समजूत घालायचे, म्हणायचे "सुमा, तुझ्यासाठी मी मांसाहारही सोडायला तयार आहे. पण त्यामुळे घरात इतर सर्वांची कुचंबणा नाही का होणार ? मीच खात नाही म्हटल्यावर घरात इतर कुणी स्पर्शसुद्धा करणार नाहीत. तुला आवडेल ते ? त्यांचा तो प्रश्न ऐकताच शरमून-वरमून मी म्हणत असे "चुकले माझे ! मी शिकेन हं खायला ! "

हळूहळू सवय होत मग दीड-दोन वर्षांनी मी मांसाहाराचे पदार्थ करायला आणि खायलाही शिकले, पण त्याआधी माझे होणारे हाल पाहून ह्यांनी अबोलपणे एक गोष्ट सुरू केली. जेव्हा शक्य तेव्हा, कुणाच्या लक्षात येणार नाही, कुणाला खटकणार नाही अशा रीतीने हे मांसाहार टाळत असत. आणि ज्यावेळी शक्यच होत नसे त्यादिवशी रात्री झोपताना दात खराब झाले आहेत ह्या सबबीवर टूथपेस्टने खसखसून दात घासत. केवळ माझ्यासाठी ! इश्श ! अजूनही ती आठवण झाली ना की माझ्या अंगावर गोड रोमांच उभे रहातात.

असे माझे पती ! त्यांच्या अथांग, असीम प्रेमाचा साक्षात्कार घडविणारे ते जादूभरले दिवस कसे नि कधी संपले तेच कळले नाही. पण त्या दिवसांची स्मृती होताच माझे मन त्यांच्या विषयीच्या प्रेमाने आणि कृतज्ञतेने भरून येते . . .आणि मी गुणगुणू लागते––

"तुझ्या उबदार संगतीत
जाईजुईची मृदु पखरण
बने पायतळीचा अंधार
कुसूम कोमल मखमल"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५५०६८ दि: [illegible]

समोर दिसल्या त्या मेघाप्रमाणे सर्वांवर आपल्या निरपेक्ष प्रेमाची बरसात कर- णाऱ्या माझ्या सासूबाई ! मी वाकून त्यांना नमस्कार करताच, एकदम त्यांनी मला आपल्या हृदयाशी धरले आणि भरल्या आवाजात त्या म्हणाल्या, " सुखी हो पोरी! " त्याक्षणी मला वाटले —नव्हे जाणवले की माझी स्वर्गवासी आईच जणू त्यांच्या मुखाने मला आशीर्वाद देत आहे.

मधुचंद्रासाठी आम्ही माऊंटअबूला गेलो होतो. त्या आठ दिवसातील एकेका क्षणाची आठवण झाली तरी आनंदाने न्हाऊन निघते माझे मन ! अचानक आलेल्या श्रावणसरीमुळे भिजून चिंब व्हावे ना तसे ! त्या वेळी. . .त्या दिवसात एकच भावना ! समर्पणाची ! सर्वस्व समर्पणाची ! विजिगीषु वृत्ती मनात ठेवून दोन जीवांचे मीलन कधीच संभवत नाही. पण मी फार फार भाग्यवान ! खरेच सांगते की ह्यांच्या प्रेमाच्या अमृतवर्षावाने माझे मन, माझा आत्मा तृप्त झाला ! माझे अवघे अस्तित्व कृतार्थ झाले ! दोन शरीरे. . .एक मन ! असेच काहीतरी अद्भुत त्या काळात घडले असावे. एका अलौकिक, अनुपम आनंदाच्या साक्षात्काराने माझे मन मोहरले होते. अंग अंग पुलकित झाले होते. आणि आठवत होती कविवर्य तांब्यांची ती कविता—

" नववधू प्रिया मी बावरते, लाजते, पुढे सरते. "

मधुचंद्रानंतर आठ एक दिवस माहेरी राहून मी मग सासरी आले. आणि . . . आणि ज्या स्वप्निल विश्वात मी वावरत होते त्यातून एकदम जागी झाले. विवाह म्हणजे फक्त दोन जीवांचे मीलन नव्हे. विवाह म्हणजे समाजातील दोन भिन्न कुटुंबाना जोडणारा एक अदृश्य नाजूक रज्जू ! अती ताणला तर तुटणारा ! नाहीतर अनेक मने जोडणारा नाजूक तरीही चिवट असा धागा ! आमच्या विवाहाने दोन्ही कुटुंबात अकृत्रिम असा स्नेह मला निर्माण करायचा होता. आमच्या विवाहाच्या बाबतीत ती जबाबदारी आम्हा दोघांवर होती. कारण आमचा प्रेमविवाह होता आणि तो सुद्धा आंतरजातीय ! मी ब्राह्मण तर हे होते सी. के. पी. ! आमच्या लग्नाला प्रथम विरोध झाला होता. पण मग आमचा दोघांचा निर्धार पाहून दोन्ही घरच्या वडीलधाऱ्या मंडळींनी समजूतदारपणा दाखविला होता. आणि त्या सर्वांचा आशीर्वाद घेऊनच आम्ही विवाहबद्ध झालो होतो. दोन्ही घरातील रीतभात, खाणे-पिणे, आचार-विचार ह्यात चांगलीच तफावत होती. मला ह्या सर्व गोष्टींशी जुळवून घ्यायचे होते. तडजोड करायची होती आणि हळूहळू त्याघराशी एकरूप होऊन जायचे होते. ही तारेवरची कसरत करताना अनेकदा, तोल जाऊन मी पडेन असे वाटले. कित्येकदा पडलेही ! पण माझ्या पतीच्या आणि सासूबाईंच्या आधाराने पुन्हा पुन्हा उभी राहिले आणि अन्ती यशस्वी झाले. आता ह्या घराने, ह्या घरातील माणसांनी मला आपल्यात अशा रीतीने समावून घेतले आहे की मी जणू ह्या घराला कधी परकी नव्हतेच !

....

लग्नानंतर सहा-सात महिन्यांनी मी तापाने फणफणले असता माझ्या सासूबाईंनी माझ्यासाठी घेतलेले कष्ट आणि जागविलेल्या रात्री, मी कधीच विसरणार नाही. एक दिवस मला चारपर्यंत टेंपरेचर होते. तापाच्या ग्लानीतून जाग आली तेव्हा पहाते तो सासूबाई माझा घामाने थबथबलेला देह मऊसूत कपडा हाती घेऊन हळूवारपणे पुसत आहेत. रात्री बाराचा सुमार, सर्वत्र नीरव शांतता आणि समोर त्यांची ती थकलेली भागलेली कृश मूर्ती ! माझ्या डोळ्यात अश्रू उभे राहिले आणि ओठातून अस्फुट हाक बाहेर पडली ‘ आई ! ’ त्या क्षणीच त्यांच्या माझ्यामधील परकेपणाचे बंध तटातट तुटले. अशा आपल्या नेहमीच्या निरपेक्ष सेवाव्रताने त्यांनी अबोलपणे जणू मला शिकविले “ प्रेम लाभे प्रेमळाला–त्याग ही त्याची कसोटी. ”

सर्वात अवघड वाटले मांसाहाराची सवय करताना ! मेलेले झुरळ दिसले तरी अंगावर शहारा येईल अशी सोवळी वृत्ती माझी ! मच्छी, मटन, कोंबडी इत्यादी पदार्थ जेव्हा घरात केले जात तेव्हा मला इतकी शिसारी येई की चार चार दिवस जेवण जात नसे. कधी ते सारे असह्य होऊन मला रडू यायचे. आणि वाटायचे की त्या घरापासून दूर दूर पळून जावे. अशावेळी हे माझी समजूत घालायचे, म्हणायचे “ सुमा, तुझ्यासाठी मी मांसाहारही सोडायला तयार आहे. पण त्यामुळे घरात इतर सर्वांची कुचंबणा नाही का होणार ? मीच खात नाही म्हटल्यावर घरात इतर कुणी स्पर्शसुद्धा करणार नाहीत. तुला आवडेल ते ? त्यांचा तो प्रश्न ऐकताच शरमून-वरमून मी म्हणत असे “ चुकले माझे ! मी शिकेन हं खायला ! ”

हळूहळू सवय होत मग दीड-दोन वर्षांनी मी मांसाहाराचे पदार्थ करायला आणि खायलाही शिकले, पण त्याआधी माझे होणारे हाल पाहून ह्यांनी अबोलपणे एक गोष्ट सुरू केली. जेव्हा शक्य तेव्हा, कुणाच्या लक्षात येणार नाही, कुणाला खटकणार नाही अशा रीतीने हे मांसाहार टाळत असत. आणि ज्यावेळी शक्यच होत नसे त्यादिवशी रात्री झोपताना दात खराब झाले आहेत ह्या सबबीवर टूथपेस्टने खसखसून दात घासत. केवळ माझ्यासाठी ! इश्श ! अजूनही ती आठवण झाली ना की माझ्या अंगावर गोड रोमांच उभे रहातात.

असे माझे पती ! त्यांच्या अथांग, असीम प्रेमाचा साक्षात्कार घडविणारे ते जादूभरले दिवस कसे नि कधी संपले तेच कळले नाही. पण त्या दिवसांची स्मृती होताच माझे मन त्यांच्या विषयीच्या प्रेमाने आणि कृतज्ञतेने भरून येते. . .आणि मी गुणगुणू लागते––

“ तुझ्या उबदार संगतीत
जाईजुईची मृदु पखरण
बने पायतळीचा अंधार
कुसूम कोमल मखमल ”

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलां
अनुक्रम......५०६८...... दि: ......

मनाच्या मखमली मंजुषेत भावना मावेनाशा झाल्या की त्या असाच शब्दांचा साज लेवून ओठावर नाचू लागतात. मग त्यातून निर्माण होते काव्य ! पण खरेच, लग्नानंतरचे पहिले वर्ष हेच मुळी मूर्तिमंत काव्य असते, नव्हे काय ?

□

## ७२

## सौ. मीना पाटकर

□

' लग्नानंतरचं पहिलं वर्ष ' खूप खूप मजा असते. ते लाजणं, मुरकणं, चोरटे दृष्टिक्षेप, नवीन संसार, नवीन माणसं, हनीमून, जगज्जेत्याप्रमाणे हातात हात घालून चालणं, परस्परांच्या भावना जपणं, नाटक, सिनेमा आणि वर्षअखेर बहुधा मूलही. लग्नाची ती पहिली रात्र, आयुष्यातल्या सगळ्या रात्री तीवरून ओवाळून टाकाव्यात. आयुष्यभर तीच चव आठवून आठवून सुखाने आयुष्य जगावं असं वर्ष . . .

हो . . .आणि मीपण आठवत असते ते वर्ष. खूप वेळा आठवते. आठवता आठवता मला नर्सिंगच्या ट्रेनिंगचा एक दिवस आठवतो आणि " मीना, लग्नानंतर तू लगेच विधवा होशील " हे बोल कानात घुमू लागतात. अंगावर काटा उभा राहतो आणि माझी तंद्री भंग पावते. मी आठवणीतून पूर्ण बाहेर येते. वाटतं, ' देवा, माझंच असं का झालं ? पण मन लगेच सांगतं, ' झालं हेच ठीक झालं. पुऱ्या आयुष्याला उपयोगी पडतील असेच अनुभव तू मिळविलेस. '

लग्नाअगोदर सहा महिने डिसेंटरी झाल्याचं निमित्त होऊन त्यांना ' अल्सरेटिव्ह कोलायटीस ' नावाचं दुखणं झालं आणि लग्नाच्या सातव्याच दिवशी आम्ही बॉम्बे हॉस्पिटलचा वार्ड गाठला, की ज्या दिवशी आमच्या घरी आम्हा दोघांचा एक गोड विधी व्हायचा होता. पण निराशा व्यक्त करायला अवधीच नव्हता. मन सारखं हुरहुरायचं. नर्सिंगच्या नोकरीमध्ये मी याहिपेक्षा खूप मोठी दुखणी बरी झालेली पाहिली होती. पण काहीतरी अशुभ वाटायचं. त्याच दिवशी नवीन गाठवलेल्या मंगळसूत्रातील मणीही ओघळून पडले. खूप वाईट वाटलं; पण मन कुणाकडे मोकळं करू ? काय म्हणत असतील मला सगळे ? त्यांना सतत ताप. रक्ताची धार धरल्यासारख्या " मोशन्स " सुरू झाल्या. स्पेशॅलिस्ट पाहून गेले. ट्रीटमेंट व्यवस्थित सुरू झाली. थोडा उतार वाटला पण तो क्षणिकच आणि आठच दिवसात सर्व पूर्ववत्. एका हाताला सतत ग्लुकोज, दुसऱ्या हातावर रक्त असं २४ तास सुरू. पुन्हा विश्रांती, पुन्हा सुरू. उपचारांचा उपयोग होईना. तब्येत दिवसेंदिवस खंगतच चालली. १३५ पौंड वजनाचा माणूस १०० पौंड झाला. हे

असं का आणि काय घडतंय्. माझ्याच नशिबात असं का ? मी केलेल्या हजारो लोकांच्या सेवेचे हेच फळ का ? हेच विचार राहून राहून मनात यायचे. भेटायला आलेल्या नातेवाइकांचे चेहेरेही पहाण्याची इच्छा होत नव्हती. डोकं बधिर होई. हातपाय गळल्यासारखे वाटत. ताकद नसलेला मनुष्य कसली गोड गुपितं करणार ? हात उचलण्याची ताकद नसलेला माणूस कसले चोरटे स्पर्श करणार ? पण मला सर्व त्यांच्या नजरेतून कळायचं " मीना, मी गेलो तर सुखाने रहा. दुसरं लग्न कर, मी मात्र तुला त्रास दिला, फार त्रास दिला. "

छे, छे, विचारच सहन होत नव्हते. पण मनाचा निश्चय करून या आपुलकीवर जोराने लाथ मारली. मन म्हणालं, " हा तुझा नवरा नाही, पेशन्ट आहे आणि ही सर्व त्याची नातेवाईक आहेत. हे हॉस्पिटल आहे. लाग कामाला. बजाव तुझी नर्सिंगची ड्यूटी. उशीर करू नकोस. " मला यावेळी शीवलीलेतला सीमन्तिनीचा अध्याय आठवला. मनात म्हणाले, " देवा, तुझं व्रत सौभाग्यवर्धक आहे. यश आलंच तर सोळा सोमवार करीन नाहीतर, आयुष्यात तुझं नावही घेणार नाही. " सोमवार करू लागले. एके दिवशी डॉक्टर म्हणाले, " ऑपरेशनशिवाय बरं होणं कठिण आहे. तोच उपाय आहे. " आम्ही होकार दिला. यापुढे काय होणार याचं चित्र डोळ्यांसमोर उभे राहिले.

बॉम्बे हॉस्पिटलमधील एका निष्णात डॉक्टरनी ही सर्व जबाबदारी घेऊन ' यांचे ' ऑपरेशन केले. २५ मिनिटांत ' इलिओस्टोमी ' नावाचं ऑपरेशन पार पाडले. ( तेही घाबरले होते हे त्यांनी मला मागाहून सांगितले ) त्या दिवशी ५०–६० माणसं हॉस्पिटलमध्ये जमली होती. बहुतेक सर्व रडतच होती. अश्रू फक्त माझ्याच डोळ्यात यायला तयार नव्हते. त्यामुळे निर्दय, उलटच्या काळजाची यासारख्या पदव्याही मी मिळविल्या. याहिपेक्षा बोलण्याचे खूप उच्चांक गाठले. " ही नर्सच आहे. हा गेला तर काय दुसरा मिळेल तिला. " कौतुकच केलं मी बोलण्याचं. तरी आमचं लव्ह मॅरेजही नव्हतं. आपापल्या बुद्धिनुसार सर्व बोलणं चाललं होतं. ऑपरेशननंतर त्यांना उचक्या सुरू झाल्या. त्या सतत सहा दिवस. वजन तर ६५ ते ७० पौंडांवर आलं. नाकासमोर हात धरल्यास व छातीवर हात ठेवल्यास सजीवतेचा प्रत्यय यायचा. डॉक्टर यायचे, चौकशी करायचे, निराश होऊन फिरायचे.

हॉस्पिटलमध्ये हनीमूनला ( ! ) येऊन आम्हाला तीन महिने लोटले होते. एव्हाना आम्ही तेथील कनिष्ठापासून वरिष्ठांपर्यंत सर्वांच्या चांगलेच परिचयाचे झालो होतो. मी खाली उतरून औषध आणायला चालले की, " सी दॅट न्यूली मॅरिड गर्ल ! ओ, सच ए, नाइस गर्ल अॅण्ड हाऊ शी इज सफरिंग ! " वगैरे शब्द माझ्या कानी पडायचे आणि मला माझ्यासारख्या वाईट पायगुणाच्या मुलीबद्दल ऐकू येणारी सहानुभूती संताप आणायची.

एकमेकांच्या उबेत रात्र रात्र विसावण्याच्या काळात मी रात्रभर त्यांचे रक्त व ग्लुकोज सुरू केलेले हात धरून बसायची. हातात नाडी घेऊन, त्यांचा बंद पडत जाण्याच्या मार्गावर असलेला देह सजीव आहे याची खात्री करून घ्यायची. छातीला कान लावून बसायची. रात्रीच्या वेळचा वार्डमधला मंद, निळा लाईट आणि खाटेवर पडलेली यांची भेसूर प्रेतवत् यष्टी. कदाचित् सिनेमात असे दृश्य दिसते तर मी खूप रडले असते. पण माझे डोळेच शुष्क झाले होते. कानात आवाज यायचा, "मीना, . . .तू विधवा होणार आणि लग्नानंतर लवकरच ! " त्याचाच प्रत्यय मला येत चालला होता. डॉक्टर, नातेवाईक मला झोपण्याबद्दल आग्रह करीत— निदान पडून राहाण्याबद्दल तरी. पण मी म्हणायची, " नाही, जे व्हायचं आहे ते डोळ्यांसमोर पाहीन. कसं, काय आणि का घडणार तेच पहायचंय् मला. " स्पेशॅलिस्ट तर सतत सांगत, " हिला घरी पाठवा, काही झालं तर शॉक असह्य होईल तिला. प्रायव्हेट नर्स ठेवा. " पण मी कशालाच नमले नाही. साडेपाच महि-न्यांच्या वास्तव्यात घरचं तोंडही पाहिलं नाही. मोठमोठे डॉक्टर—अगदी जवळच्या नात्यानं समजावीत, सहानुभूती दाखवीत आणि म्हणत, " बायको असावी तर अशी, आजकालच्या जमान्यात तर दुर्मिळच. कशी रात्रंदिवस नवऱ्यासाठी तळ-मळते आहे ! याचं श्रेय तिला मिळेलही तिच्या नशिबाने. "

आईवडील म्हातारे आणि मीच सर्वांत लहान हे ऐकून त्यांना दुःख नको म्हणून कुणाला एक अक्षरही कळवलं नाही आणि सगळ्यांना, कुणाला काहीही न कळवण्याबद्दल ताकीदही दिली होती. कसं आणि कुठून अंगात बळ संचारलं होतं याचं आता आश्चर्य वाटतं. तेव्हा माझं वय एकवीस वर्षांचं होतं. हॉस्पिटलच्या नर्सेसनाहि मी त्यांची सेवा करू देत नव्हते. सर्व मीच करायची. धड जेवण नाही, स्वच्छता नाही, झोप नाही यामुळे मीही दुसरा पेशन्टच बनत चालले होते. पण अंगात जिद्द होती आणि म्हणूनच मी यंत्रासारखी हातपाय हालवीत होते.

दुसरे ऑपरेशन करण्याचे ठरले पण हे सर्व प्रेताला सजवल्यासारखेच चालले होते. ऑपरेशनच्या दिवशी तर आमचे भाऊजी अक्षरशः सर्जनच्या पायावर डोकं ठेवून रडले. मृत्युंजयाचा जप किंवा आणखी काही असो महिन्यात त्यांच्या हाताची नाडी लागू लागली. जरा जरा सजीवपणा येत चालला आणि चमत्कार व्हावा तशी हळूहळू त्यांची हालचाल होऊ लागली. धरून बसू लागले. त्यांचा पाय जमिनीला लागला आणि माझं तर आनंदाने भान हरपायची वेळ आली. खूप सुधारणा झाली आणि साडेपाच महिन्यांच्या दीर्घ कालावधीनंतर आम्ही घरी निघालो. त्यांचा पुनर्जन्म झाला होता. त्यांच्या सर्वच गोष्टी मला करायला लागायच्या पण त्यात लाज, लज्जा नव्हती. अंग रोमांचित होण्यासारखेही काही नव्हतं. होता फक्त आत्मविश्वास आणि सुख. पण हे अपत्यसुखापेक्षाही खूप मोठं होतं. मी त्यांची आईच बनले होते आणि ते एक छोटं बाळ.

खूप अनुभव घेतले या एका वर्षात. माणुसकी कळून आली माणसाची. बरे, वाईट स्वभाव कळले. १० ते १५ हजार रुपयांचा चुराडा झाला. पण हसत पैसे काढून देणारे आणि त्यांचा योग्य उपयोग झाला. म्हणून ते पुन्हा न घेणारे सज्जन भेटले. वेळी अवेळी स्वतःचे पैसे व शक्ती खर्च करून धावपळ करणारे लोकही मिळाले. त्याचबरोबर सहानुभूतीच्या निमित्ताने पापी दृष्टीने माझ्याभोवती रुंजी घालणारे नराधम सुद्धा भेटले. कथा-कादंबऱ्यात आत्तापर्यंत वाचलेले दुष्ट खलनायकही भेटले. पण मनाचा यत्किंचितही तोल ढळू न देता मी सर्वांना पुरून उरले. ती एका जिद्दीच्या बळावर लग्नाच्या आदल्या दिवशी घेतलेल्या सुटीपासून तो सतत दहा महिने ते घरीच होते. पण घरातल्या माणसांनी कोणत्याच तऱ्हेने गैरसोय होऊ दिली नाही. क्वचित् बोलाचाली होई. पण सर्वजण मला समजून घेत. म्हणत, " त्रासामुळे चिडकी झाली आहे. वयही लहानच आहे. " लग्नानंतर सहा महिन्यांनी प्रथम सांगितलेला ( लग्नानंतरच्या सातव्या दिवशी होणारा ) विधी झाला. ज्या दिवशी ते प्रथम कामावर गेले, त्या दिवशी मी सुखाने निश्चिंत झोपले आणि जेवलेही. लगेच १६ सोमवार केले. कोणी म्हणत, " एवढ्या आजारानंतर यांना मुलं होणार नसतील म्हणून करत असेल." मी सांगायची, ' नाही, मुळीच नाही, फक्त त्यांच्यासाठी करते आहे. मला मुलांची अपेक्षाच नाही. ते चांगले असतील तर सर्वस्व मिळाल्याचा आनंद. "

असं गेलं आमचं पहिलं वर्ष. ना सण, ना गोड, नाही रुसवे-फुगवेही. त्याची कमतरता आम्ही आता भरून काढतो. आता आमच्या लग्नाला ३ वर्ष पुरी झाली आहेत. आमचे हे पुनर्जन्म झालेले पतिराज सिव्हिल इंजिनिअर आहेत. आम्ही खूप सुखात आहोत. आजारात ते म्हणायचे, " माझ्या छातीवर हात ठेवून बस. मला भीती वाटते. " मीही तसंच करायची. मला वाटतं त्यामुळे यमराज पुढे येण्यास धजला नाही, कारण मी पडले शिवभक्त ना !

आणि हो, एक गोष्ट सांगायचीच राहिली. लग्नाच्या पहिल्याच वर्षी मी एक मोठा निश्चय केला. की वटपौर्णिमा करायचीच नाही. आणि त्यानुसार मी वडाची पूजा व उपास दोन्ही करीत नाही कारण सावित्रीने नवऱ्याच्या बाबतीत माझ्यापेक्षा काय वेगळं केलं होतं ? या लिखाणामध्ये अतिशयोक्तीचा एकही शब्द नाही उलट काहीतरी कमीच असेल.

## ७३
## सौ. सुशीला फरांदे

‘ शुभलग्न सावधानतेचा ’ इशारा भटजींनी तारस्वरात दिला, बँडपथकाने रणशिंग फुंकले नि आम्ही वधूवर एकमेकांच्या गळचात पुष्पमाला घालून संसारयुद्धात फेकलो गेलो. विवाहसमयी वय माझे चौदा, म्हणजे लग्नाच्या वर्षाला दोन कमीच. माझे सौंदर्य ( इति पतिराज ) मला लग्नबंधनात पाडावयास कारणीभूत झाले.

लग्न म्हणजे मजाच मजा ! पंचपक्वान्नांवर ताव मारून, उंची वस्त्रालंकार परिधान करून उभयतांनी फिरायला जाणे, नाटक-सिनेमा पहाणे ’ ही सुपारी फुटल्यानंतरची माझी बालकल्पना. अशा पार्श्वभूमीवर मधुचंद्र कसा रंगला असेल आणि नववधूची कर्तव्ये मी कशी पार पाडली असतील त्याची वाचकांनी कल्पना करावी. सासर खेडेगावात, आतेसासू स्वभावाने कडक (पण तितक्याच प्रेमळ हे नंतर अनुभवाने पटले--हे मी त्यांच्या समाधानासाठी लिहितेय असा गैरसमज न व्हावा.) चुकीबद्दल क्षमा हा शब्द त्यांच्या कोषात नाही. चुकीचे प्रायश्चित म्हणजे जहरी वाग्बाण. माहेरी स्टोव्हवर स्वयंपाकाचा काही भाग करण्याचा अत्यल्प अनुभव. कालवणात मीठ घालायचे तर आईला दाखवून कणाकणाने कमी अगर जास्त करून. इथे तर चुलीशी युद्धप्रसंग ! जाळापेक्षा धूरच जास्त व्हायचा. अग्निदेवताच प्रसंन्न होईना तर स्वयंपाक प्रकरण दूरच. “ आधी हाताला चटके ” हे अनुभवले. पण पाठराखणीला आलेल्या आजीबाईंनी त्यात सांभाळून घेतले. मानपानाच्या पदसिद्ध पदाधिकाऱ्यांच्या पाया पडून आशीर्वाद घ्यावा लागतो हे वाक्य सांगून शिकवूनही हमखास विसर पडायचा. मग त्यांच्यादेखतच शब्दांच्या चाबकाचे फटकारे. आडाचे पाणी २०–२५ फूट हातावर ओढून भरावे लागते. खोली बघूनच चक्कर यायला लागली. धाकटचा वन्सनी ह्या अडचणीतूनही सुटका केली. नाहीतर पाणी ओढण्याच्या दिव्यातून सहीसलामत बाहेर पडणे कठीणच. असे अनेक दुर्धर प्रसंग ओढवले. जावे नववधूच्या वंशा तेव्हाच कळे. सोळावा पार पडला. धास्तावलेल्या मन:स्थितीत नवी नवरी माहेरी परतली. अन् तिचा जीव भांडचात पडला.

लग्नसोहळा ६४ च्या फेब्रुवारीमध्ये मोठ्या डामडौलाने साजरा झाला होता. एप्रिलच्या शेवटच्या आठवडचात वार्षिक परीक्षा होती, त्यानिमित्ताने तात्पुरते तरी नांदायला जाणे लांबणीवर पडले. आणखी हायसे वाटले.

अभ्यासाची गडबड सुरू झाली. पतिराज पुण्यातच नोकरीला होते. ते अधूनमधून सासूरवाडीत यायचे नि फिरायला जायचा आग्रह करायचे. हिरव्या चुडचा-शालूतील नववधूबरोबर रस्याने मिरवायची नाहीतरी नवऱ्यांना हौसच.

मला मात्र फिरण्यातील मजा चाखण्यापेक्षा अभ्यासाचीच गोडी वाटायची. खरं म्हटलं तर मी त्यावेळी नववधूपेक्षाही विद्यार्थीनीच अधिक होते. तरीही आई-वडिलांच्या दडपणामुळे मी त्यांच्याबरोबर फिरायला जायची–एखाद्या कैद्यासारखी. विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर एकाच शब्दात द्यायचे. त्यांच्या गप्पांना प्रतिसाद नाही. त्यांच्या मित्रपरिवाराशीही मोजकंच बोलणं. हॉटेलमध्ये गेलो तर तिकडून आग्रह होऊनही काही मागायचे नाही. सिनेमाला गेलो तर प्रेमाने चिकटून बसायच्या ऐवजी खुर्चीच्या दुसऱ्या टोकाला मी. नवदांपत्याच्या फोटो काढला तर बुजऱ्या हरिणी-सारखी माझी पोज. ( कथेला पारितोषिक मिळाल्यास व संपादकांनी मागणी केल्यास मी तोच फोटो प्रसिद्धीसाठी पाठवणार आहे. ) ज्या काळी शिक्षकांबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात भयग्रस्त आदर असे त्या काळी एखाद्या शिक्षकाबरोबर हिंडणाऱ्या विद्यार्थ्यासारखी मी त्यांच्याबरोबर हिंडे—मुक्या बाहुलीसारखी, लाजाळूच्या रोपट्यासारखी.

याचे पर्यवसान त्यांच्या नववधूच्या गृहीत कल्पनेला जबरदस्त तडाखा बसण्यात झाले. पुण्यातली ही मुलगी एवढी लाजरी, बुजरी नि अबोल कशी असा त्यांनी एकदा त्रासून माझ्या वडिलांना सवाल केला. सासऱ्यांनी पदोपदीने समजावणी करूनही जावईबापूंचे समाधान झाले नाही. कारण त्यांना कानात लाडे लाडे कुजबुजणारी, लचकणारी, मुरडणारी अशी फटाकडी वधू हवी होती. मलाही हे समजत होते पण कृतीत येत नव्हते. असतं एकेक आपलं लाजाळूचं रोपटं.

आईवडिलांनी नवऱ्यांशी त्याच्या मनासारखे कसे वागावे ह्याचे परोपरीने धडे दिले. पतिराजांनीही समजुतीचे धोरण स्वीकारले. मग आस्ते-आस्ते संकोची वृत्ती कमी होत गेली. वर्गामध्ये मैत्रिणी ‘ उखाणा ’ घेण्याचा आग्रह करीत. प्रश्नाचे उत्तर देण्यास विलंब लागला अगर थोडीशी चूकभूल झाली तर ‘ लक्ष लागले तिकडे’ अशा चिडवीत. काहीजणी तर वात्रटपणाचा कहर करीत. मी कशीबशी परीक्षा दिली व पासही झाले. परिक्षेच्या ऐन मोसमामध्ये लगीनबार उडवूनही मी यश मिळवल्याबद्दल सर्वांनी कौतुक केले. पेढे घेता-घेता ‘ पेढे कधी देणार ’ म्हणून पृच्छा. खटयाळ मैत्रिणींचा हशाच हशा.

एप्रिलमध्ये मायबाप सरकारने महागाईभत्त्यात ५ रुपयांची प्रचंड वाढ केली. त्याचे श्रेय मात्र अनायासेच गृहलक्ष्मीच्या पायगुणाच्या पदरात पडले.

शैक्षणिक परीक्षेत उत्तीर्ण झाले तरी संसाराभ्यासाला सुरवातही झाली नव्हती. पुण्यनगरीत खोली मिळणे म्हणजे भगीरथाला गंगाप्राप्तीची पूर्ती झाल्याचा आनंद. तरीही ती मिळाली. त्यांच्या एका मित्राची सुदैवाने बदली झाल्याने ( पुन्हा योगायोग, दुसरे काय ? ) बिनपागडीची नि म्हणूनच जास्त भाड्याची अन् कमी सोयींनी युक्त. माझ्यापेक्षाही दाजींनाच लाडक्या लेकीचा संसार सुरू करायची

घाई. त्याला पतिराजांचा हातभार. मेच्या पहिल्या आठवड्यात आम्ही नवीन खोलीत नव्या नवलाईच्या संसाराला शुभमुहूर्तावर प्रारंभ केला. आंदण आणि आहेर म्हणून मिळालेली भांडीकुंडी व चीजवस्तू हाच आमचा संसार. नाही म्हणायला पूर्वीची एक कॉट व पत्र्याची बादली अशी अपुरी संसारसामुग्री. त्यात 'प्रथमग्रासे मक्षिकापाता' प्रमाणे महागाईने कहर करायला सुरुवात केली. मध्यमवर्गीयांचे संसार महागाईच्या राक्षसाने अक्षरशः धुळीस मिळवले. आमच्या सुखी संसाराच्या सुरम्य कल्पनेला सुरुवातीलाच सुरुंग लागला. मासिक मोजक्या पगारात जीवनावश्यक वस्तू खरेदी करतानाच मारामार तर चैनीचे नाव कशाला? गरजेच्या अत्त्यावश्यक सामुग्रीच्या खरेदीचीही यादी करून काटछाट करावी लागे. चिमटा, उलातने, आणि चमचा हवा असेल तर फक्त उलातण्याचीच खरेदी.

जूनमध्ये रावसाहेब—माझे दीर आमच्याकडे महाविद्यालयीन शिक्षणासाठी आले. पुण्याची विद्येचे माहेर म्हणून ख्याती ना ! पण त्यांचे आगमन पथ्यावरच पडले. स्वयंपाक शिकवला त्यांनी मला. तेच माझे पाकशास्त्रातले खरे गुरू. शिवाय माझ्या प्रत्येक चुकीचे 'त्यांच्याकडे' वकिली करून समर्थन करीत. त्यामुळे माझा मानसिक डळमळीतपणा कमी झाला. मी जरा खंबीर पायावर उभी राहिले. आपल्याप्रमाणेच कित्येक मोठ्या महिलांनाही पाकशास्त्राचे ज्ञान नसल्याचे पाहून बरे वाटले. 'त्यांचा' स्वभाव भारी बोलका नि विनोदी (हीही स्तुति नव्हे ). मला बोलकी करण्याकरिता 'ते' चिडवीत. निदान रागाने का होईना मी बोलावे हा सद्हेतु. जुलैमध्ये धाकट्या नणंदेचे लग्न ठरले. कर्तेपणामुळे सगळाच भार 'त्यांच्यावर'. मी नि रावसाहेबांनीही तो बराचसा पेलण्याचा प्रयत्न केला. सहा महिन्यात दोन लग्नकार्ये म्हणजे चेष्टा नव्हे. त्यातून खेडेगावात लग्न म्हणजे भांडणतंटयाला निमंत्रणच. पण ईशकृपेने ( आमच्या श्रमालाही थोडेफार फळ) शुभकार्य यथासांग पार पडले. संधी मिळाली म्हणजे मनुष्य चमकतो. लग्नकार्यामुळे मीही थोडी चमकले नि नातेवाइकांमध्ये माझा भाव वधारला.

पुण्याला मी, ते नि रावसाहेब असे तीन संसारसदस्य. संसार कशाशी खातात ह्याचीही कुणाला गंधवार्ता नाही. सारा पोरकटांचा कारभार. त्यातून 'ते' नवमतवादाच्या नावाखाली ( पण वस्तुतः आर्थिक ओढाताणीमुळे ) काटकसर करणारे. त्यामुळे आषाढात तोंड न पहाणे, पंचमीची श्रावणपाटी, दिवाळसणाची साडी, संक्रांतीचे तिळगुळ वाण आदि पारंपरिक रूढी—ज्यामुळे नववधूला मिरवायला मिळते—पाळल्या गेल्या नाहीत. माहेरकडूनही आग्रह झाला नाही. माझी मात्र हौसमौज झाली नाही. पण मूग गिळून गप्प बसायचा माझा स्वभावधर्म. त्यामुळे तणातणी वाढायची नाही. बायका नवऱ्याशी एवढ्या तावातावाने कशा भांडतात याचे मला अजूनही आश्चर्य वाटते. अर्थातच् ती एक कला आहे. मी मात्र त्यात आजतागायत पारंगत होऊ शकले नाही.

एकदा मी शेजारंणीशी गप्पा मारत उभी होते. तेवढ्यात 'ते' बाहेरून आले. संभाषणातील वाक्य अर्धवट सोडून मी तशीच घरात पळाले. नंतर त्यांनी समजावून सांगितले की, बोलणे अर्धवट सोडून परतणे योग्य नव्हे. त्यामुळे नवऱ्याची निष्कारण बदनामी होते. कारण दुसऱ्या माणसांचा असा गैरसमज होतो की, नवरा बायकोला धड कुणाशी बोलू देत नाही, तर मग बिचारीचा किती छळ करीत असेल ? वास्तविक कसलेही दडपण वा बंधन नसताही मी उगीचच भयग्रस्त वातावरणात वावरत होते. तेव्हापासून मात्र इतकी निर्ढावले की, वाक्यच काय पण गप्पासुद्धा अर्धवट सोडून येत नसे. असाच दुसरा अविस्मरणीय अनुभव आहे. कसल्यातरी रागाने 'त्यां'नी एका रात्री जेवण करण्यास इन्कार केला. रावसाहेबांना भूक नसल्याचे सांगितले. त्यांनाही ते खरे वाटले. आम्ही दीर भावजयीने मात्र जेवणावर ताव मारला. माझ्यावर रागावल्याचे रावसाहेबांनासुद्धा समजायचे नाही हे एक त्यांचे रागवैशिष्टच. दुसऱ्या दिवशी शनिवारचा उपवास. आपल्याला जेवणाचा आग्रह नाही म्हणून 'त्यां'चा रागाचा पारा कायमच होता. त्यांनीही फराळाचे मागितले नाही नि मीही करायचे विसरले. ऑफिसला तसेच जाणे झाले. संपूर्ण दिवस उपवास घडला. अशी रागाची अद्दल घडल्यामुळे रागाच्या आवेशात अन्नसत्याग्रह करण्याचे खूळ 'त्यां'नी त्यापुढे सोडून दिले.

माहेर आणि तात्पुरते सासरही पुण्यातच. त्यामुळे माहेरकडची मंडळी वरचेवर येऊन भेटून जात. आईवडीलही मुलीच्या नवसंसारातील उणे-दुणे ४–८ दिवसांनी बघून जात. संसाराबद्दल व वागण्याबद्दल मोलाचा सल्ला देत. 'तिकडून' ही मला 'शहाणी' करण्याचे अविरत व्रत चालू होतेच. रावसाहेबांचाही आणखी दिलासामय मार्गदर्शनाचा हातभार होताच. 'प्रयत्ने वाळूचे' या न्यायाने मी 'सुधारत' चालले. संसाररस हृदयी तुडुंब भरला. वर्षाच्या शेवटी तर त्याचा इतका परिपोष झाला की, 'त्यां'ना फिरायला चलायचा मीच आग्रह करू लागले. माझ्या गप्पा थांबवण्यासाठी 'तोंड बंद' करावे लागे. नटणे-मुरडणे त्यांच्या खिशाला परवडेनासे झाले. आणि "साधीभोळी होतीस तशीच बरी होतीस" असे म्हणण्याचा 'त्यां'च्यावर प्रसंग ओढवला. ( नवऱ्याची बायकांबद्दल 'हिरॉईन'ची कल्पना खिशाला चाट बसताच लुप्त होते. ) मला गोंडस बाळ मांडीवर खेळावे अशी प्रबळ इच्छा झाली. पण पहिल्या वर्षी ती सफल झाली नाही.

असा आमचा संसाररथ अडखळत ठेंचाळत पण प्रगतिपथावर दुसऱ्या वर्षात मार्ग आक्रमू लागला.

आता आमच्या संसारात एक वर्षाचे कन्यारत्न लुटूलुटू दुडूदुडू खेळते आहे. संसार सुखाने चाललाय. पण विवाहाच्या पहिल्या वर्षातील एकेक माझा खुळेपणा आठवला की, मनाशी खुदकन् हसू फुटते. मग 'ते' विचारतात "का हसलीस ?"

आढेवेढे घेऊन स्पष्टीकरण केल्यावर हास्याचा धबधबा वहातो. त्यात आमची इवलीशी चिमुरडीही सामील होते. काही न कळताच !

□

## ७४

## सौ. मोना जयंत

□

लहानपणी मला बाहुलीशी खेळायला खूप आवडायचे. तिला सुंदर सुंदर कपड्यांनी ल्यायचे, रंगीबेरंगी मण्यांच्या माळांनी सजवायचे नि तिला बोहल्यावर चढवायचे ! हा खेळ मी चांगली दहा वर्षाची होईपर्यंत खेळत असे. माझे हे वेड पाहून आई म्हणायची 'आपण तुझे लग्न सोळाव्या वर्षीच करू या हं ! लालचुटुक मेंदीने हात रंगवू. हिरव्यागार बांगड्या भरू, घोड्यावरून वरात काढू. बँड लावू, सुंदर मंडप घालू, गरभा खेळायला मैत्रिणी बोलवू. चांगले आठ दिवस लग्नाचे सोहळे पार पाडायचे. 'आईचे हे कौतुकाचे बोल नेहमी मी ऐकत असे नि विसरूनही जाई. बघता बघता माझे शैशव संपून मी यौवनात प्रवेश केला. शिक्षण, नोकरी ह्या साऱ्या व्यापात मी बाहुलीचे लग्न विसरले. काळ दौडत होता. . .आणि. . .अगदी अनपेक्षित मी प्रेमविवाह केला नि सारे जीवनच जणू पालटून गेले. माहेरचा विरोध, नातेवाइकांची टीका, मैत्रिणींचा दिलासा, आकांक्षेचा चुराडा, हे सारे सहन करून मी अगदी साध्या पद्धतीने विवाह केला. . .थोडे दिवस मला खूप वाईट वाटले. . . मेंदीने रंगलेले हात, हिरवा चुडा, हळदीने माखलेली, शालू नेसलेली बाहुली मला सारखी दिसायची. . . आईचे बोल आठवायचे पण मी मनाला आवर घातला. . . सासरची मंडळी हौसमौज करतील पण छे नियतीला ते मान्य नव्हते. प्रेमविवाहाला सारे नाकेच मुरडीत होती पण मी संयम राखला. . . . मधुचंद्राचे गोड बेत मी रचले. दूरदूरच्या प्रवासाचे सुंदर इंद्रधनुष्य उभे केले. परंतु नणंदबाईचे लग्न ठरले. त्या लगीनघाईत आमचा मधुचंद्र मावळून गेला. . .निराशेच्या ढगाआड कल्पनेचा इंद्रधनुष्य अदृश्य झाला. पुढे लौकरच मंगळागौर आली. . .मैत्रिणींना बोलावून खूप खेळू या, जागू या म्हणून मी मनात मांडे खाऊ लागले. पण अपुऱ्या जागेमुळे तो बेतही कोसळून पडला. त्यामुळे मी खूप खूप उदास झाले. एकामागून एक सारे बेत फसले. त्यामुळे नववधू असूनही मी प्रौढ बाईसारखी पोक्त वाटू लागले. सुंदर सजविलेल्या निर्जीव बाहुलीसारखी झाले. मधुचंद्र फसला, सारे सग तसेच गेले. मी केलेला एकही बेत माझ्या अपेक्षेप्रमाणे सुखद गेला नाही. . . .वाटले. . . . माझ्या प्रेमाला नजर लागली. . .सर्वांचे शाप भोवताहेत. . . .मनी खूप निराश

झाले. नववधूचे जीवन फुलांनी पसरलेल्या गालिच्यासारखे असते पण माझ्या वाटेत फक्त काटेच होते. . . . त्यामुळे नववधूचा लाजरेबुजरेपणा गळून पडला. नव्यानवलाईची नाजूकता ओसरून गेली. मी बेरड झाले नि संसाराच्या व्यापात बुडून गेले. पुढे सहा महिन्यांनीच धुमकेतूप्रमाणे अचानक ह्यांची बदली उटीला झाली. उटीला जायला मिळणार ह्या कल्पनेने माझे मन मुळीच उचंबळून आले नाही. अपेक्षाभंगाने बेरड झालेला मनमयूर कल्पनेचा पिसारा फुलवायला तयारच नव्हता. निर्जीव यंत्राप्रमाणे सर्व तयारी करून आम्ही दोघेही प्रथम म्हैसूरला गेलो. म्हैसूरचे बादशाहीथाटाने नटलेले सौंदर्य पाहून माझ्या झडून गेलेल्या मनोवृक्षाला आशेची पालवी फुटली. वृंदावनबाग पाहून मी मोहरून गेले. तेथील सौंदर्य पाहून नववधुप्रमाणे बावरले. ह्यांनी विचारले कशी आहे बाग ? पण वर्णन करायला शब्दच नव्हते. पुढे दोन दिवसांनी आम्ही उटीला गेलो. उटीच्या गुलाबी थंडीत, अप्रतीम सौंदर्यसृष्टीने मी मोहित झाले. अंगावर गुलाबी रोमांच उभे राहिले. ह्यांनी विचारले कसे वाटते ? मी मूकभाषेनेच उत्तर दिले. डोळयांची भाषा डोळयांना समजली. मी लाजेने अर्धमेली झाले. अगदी नववधूसारखी !

एखादा मनुष्य खूप भुकेलेला असावा नि अचानक पक्वान्नाचे ताट समोर यावे तसे माझे झाले. लग्नानंतरचे आठ महिने मी किती यातना सहन केल्या होत्या. पण उटीला आल्यानंतर सुखही पचेना. किती हिंडलो, फिरलो, मजा केली. जीवनाचा पुरेपूर आस्वाद घेतला. उटीच्या सौंदर्याशी, जीवनाशी मी एकरूप झाले. इतकी की, माझे पहिले जीवन मी विसरून गेले. गुलाबाच्या पाकळ्या माझ्या पायाखाली पसरल्या होत्या. माझी संसारवेल फुलत होती. प्रेमाला बहर आला, प्रगतीचा घोडा दौडतच होता. माझ्या संसारवेलीला सुजूच्या रूपाने कळी उमलली. आणि माझे तुटलेले माहेर-सासर जवळ आले. सर्वांनी खूप कौतुक केले. माझी आई नातीचे कौतुक करण्यात दंग असते. मी पत्नी, माता, गृहिणी, नवीन संसार व्यापात दंग असते. सारे सुरळीत चालू आहे. सुजू खेळत आहे बाहुली बरोबर !

रंगीबेरंगी बाहुली पाहून मी म्हणते. सुजू मोठी होईल. आपण तिचे लग्न धुमधडाक्यात करू. मेंदीने हात रंगवू. हिरवाचुडा भरू, बँड, वरात सारे सारे सोहाळे नि हौसमौज करू. पण नको. माझ्या आईची इच्छा कुठे पूर्णत्वाला गेली ? मग माझी आशा कशावरून पूर्ण होईल ! सुजू लहान आहे, बाहुलीशी खेळते आहे तिला अशीच खेळू दे. पुढचे पुढे पाहू. अशा रीतीने माझा संसाररथ पुढे धावत आहे. धावत राहील. पण लग्नानंतरचे माझे पहिले वर्ष कसे सुखदु:ख मिश्रित गेले याची मला खंत वाटत नाही. पहिल्या कटू आठवणी मी कांद्याच्या भज्याप्रमाणे खमंग नि तिखट मानून चघळते, नंतरच्या गोड गुलाबी आठवणी मी श्रीखंडाप्रमाणे चाटत असते. दोन्ही गोष्टींचा आस्वाद एकाच वर्षी मला चाखायला मिळाला म्हणून मी आनंदच मानते. नुसते गोडच खाऊन त्याची गोडी कमी होणार. त्याला तोंडी

लावणे तिखट हवेच. तसेच संसारात नुसते गोड असून चालत नाही. दु:खाची, निराशेची, अपेक्षाभंगाची दु:खद फोडणी बसल्याशिवाय जीवनाचा खरा स्वाद मिळत नाही.

दा. क्र. १६५८२

७९

**सौ. विमल चिमोटे**

लग्न झाल्याबरोबर प्रसंग आठवतो मला ! आमचे लग्न अगदी गुपचुप लागले. सावधानाचे स्वर सावधानतेनेच म्हणावे लागले. संध्याकाळी फिरायला जाते म्हणून मी मैत्रिणीकडे गेले आणि मोदी लाइनवरील एका कार्यालयात ठरल्याप्रमाणे माझा प्रियकर आला. त्याने बऱ्यापैकी पोशाख केला होता. आम्ही दोघं वर गेलो. पंधरा मिनिटात सर्व तयारी झाली. शकुनाचे पाच जणच हजर होते. विधी मात्र सर्व झाला. ह्यांचे दोन मित्र मधून मधून चेष्टा करीत होते म्हणून भयानक शांतता दूर होऊन प्रसंगातील मांगल्याचे अस्तित्व कळून येत होते. होमहवन, सप्तपदी सर्व झाले, सप्त ऋषी दाखविण्याकरिता गुरुजी गॅलरीत चलण्याबद्दल आग्रह करू लागले. नवरदेवाचा श्यामवर्णी चेहरा फिका पडला होता. पण सर्व विधी साग्रसंगीत उरकले. न गर्दी, न वाजंत्री, लग्न लागले व आम्ही पूर्ण दक्षिणा गुरुजींच्या हातावर ठेवून कार्यालयातून निसटलो. मैत्रिणीकडे जाऊन मी एक सुंदर शालू परिधान केला आणि टॅक्सीतून आम्ही प्रथम माझ्या पूर्वाश्रमाकडे सुवार्ता सांगण्यास व आईवडील, आजोबा यांचे आशीर्वाद घेण्यास निघालो. आई देवाजवळ आत दिवा लावीत होती. म्हातारे आजोबा बाहेर बसले होते व वडील त्यांच्या दवाखान्यात जाण्याच्या घाईत होते. ते आम्हा दोघांना पाहून थबकले व छातीत कळ आल्याप्रमाणे अभिनय आपोआपच आला. आम्ही दोघांनी प्रथम आजोबांच्या पायांना वंदन केले. ते पुटपुटू लागले व डोळ्यांतून अश्रू गाळू लागले. आई विजेसारखी धावत आली व वडिलांनी आम्हाला पाहून रागवून बगिच्यातला एका बासडा हातात घेतला. नतमस्तक जावयाच्या पाठीवर आधी लाठी आणि मग शिव्यांची दाटी झाली. शेवटी 'तुम्ही इतका शहाणपणा केला. पोट्टे ! आपल्या घराला काळिमा फासला. असं कसं प्रेम ? आता उद्या जळगावच्या पाहुण्यांना काय सांगू. मनाने विवाह— पोरी काय केलंस. 'राजहंसा दवडोनी दिवाभीत पाळिले' एवढा इंग्लंडरिटर्न जावई सोडून हे पात्र आलं गळयात.' माझा प्रियकर वडिलांना समजावण्याचा प्रयत्न करत होता. पण माझे वडील त्याच्या अंगावर धावले. शेवटी आम्ही दोघं

टॅक्सीकडे धावलो. 'बेबी अजून मागे फीर' आई-बाबा ओरडले. टॅक्सी चालू झाली. आता आम्ही ह्यांच्या भावाकडे जाणार होतो. आई-वडील नव्हते. पण मोठे भाऊ व वहिनी होती. त्यांच्याकडे गेलो. तेथे रानटीपणा जरा कमी झाला. तरी शिव्यांची लाखोली व येथे राहू नको, नीघ ही धमकी. त्यांच्या वहिनी प्रेमळ पण पतीच्या आधीन. शेवटी पुन्हा टॅक्सीत जाऊन बसलो. त्या जवळ आल्या. पाठीवर प्रेमाने हात फिरवून एक शंभराची नोट गुपचुप माझ्या हातात देऊन नाहीशा झाल्या. आम्ही दोघं आमच्या दोन छोटया खोल्यांमध्ये आलो.

मधुचंद्र कसचा ? दोघांचे मुखचंद्र जोडे मारल्यासारखे झाले होते. आम्ही हताश होऊन हातात हात घेतले. 'आपण अविचार केला का हो ? ' मी विचारले. 'हो नं ! माझं बी. एजी. चं फायनल वर्ष व्हायला हवं होतं. नोकरी नाही. पैसे कुठले आता ? तू पूर्वाश्रमात व मी भावाच्या बंगल्यात सुखी होतो. ' तो म्हणाला. मी दिलासा दिला, ' नाही आपण दोघं प्रेमानं राहू——काही नको दुसरं आपल्याला ! ' तो शिणलेला दिवस आमच्याबरोबरच एका सतरंजीवर पहुडला. सकाळ झाली. विवाहानंतरचा दुसरा दिवस. मी माझे खूप कपडे हळूहळू मैत्रिणीकडे नेऊन ठेवले होते. पूर्वतयारी जय्यत होती. माहेरचे दागिने अंगावरच होते. एक महिना मधुर मीलनात, काव्यात गेला. डबे रिकामे झाले. ह्यांची कॉलेजची फी द्यायची. अभ्यास तर होतच नव्हता. ह्यांच्या मित्राच्या वडिलांनी थोडे आर्थिक साहाय्य केले. उपकाराचे ओझे दोघांनी शिरावर घेतले. आम्ही रोज फिरत होतो. चांगले कपडे घालीत होतो. लोकांना मजेत दिसत होतो. घरात खरोखर चटणी भाकर खात होतो. चित्रपट कसचा पाहणार ! पैसे कोठले. खरंच अविचार केला होता मी ! बालपणचे सवंगडी जीवनसाथी झालो पण घाई केली. पण नसती केली तर मी एका सुविद्य, श्रीमंत डॉक्टरची पत्नी झाले असते. पण माझा प्रियकर ! आमची मने मिळाली होती. पण तो डॉक्टर आठ दिवसांनी येणार व पसंतीचा कार्यक्रम होऊन साखर पुडा ठरणार होता. म्हणून हे दिव्य करावे लागले. आईचा विरस झाला. माहेर तुटले पण माझा प्रियकर मला मिळाला. अग्रिकल्चरची परीक्षा उत्तीर्ण झाल्या बरोबर नोकरी लागणार होती. पण आठ महिने होते त्याला. काम काम, मनाचा, ताण सहन झाला नाही. मी आजारी पडले. रोजचं जमेना खाणं आणि दुखण्यानं मांडलं ठाणं ! माझा प्रियकर नव्हे यजमान उदास झाले. मी आता त्याला अहो, काहो संबोधू लागले होते. चार महिन्यांची प्रगती—मला ताप येऊ लागला सारखा. अशक्तपणा आला. दूध, फळे, इंजेक्शने शक्य नव्हते. आईकडे फ्रीज फळांनी भरला होता. वडील डॉक्टर. . . मोठे दीर गर्भश्रीमंत पण आम्ही त्रस्त, काळजीत मित्रांचा, त्यांच्या बायकांचा आधार. आईला सारं कळलं. तिला रहावेना. ती गुपचुप नोकराबरोबर धान्य, पैसे पाठवीत होती. पण भेट दुर्मिळ. मित्रांचे भाऊ डॉक्टर होते. त्यांनी सांगितले, 'तुमचा संसार वाढणार आहे. '

आम्ही दोघं रात्री मिठी मारून रडलो. ते संकट वाढलं. कालचक्र फिरत होतं. वर्षाच्या शेवटी एक दिवशी मी रात्री अगदी कमी खर्च पडेल अशा सूतिकागृहात गेले. कन्यारत्न झाले. आम्ही खट्टू झालो. पण कधी कधी दु:खातूनच सुख मिळतं. मोठ्या दीरांना ही वार्ता कळली. त्यांना चार मुलगेच होते. आम्हाला मुलगी झाल्याचा त्यांना आनंद झाला. मागच्या प्रसंगाची कटुता आता लोपली होती. ते गाडी घेऊन आले व मला त्यांच्या घरी घेऊन गेले. आर्थिक समस्या सुटली. मोठा आश्रय मिळाला. पुढे त्यांना नोकरी लागली. पण पहिले वर्ष असे लोटले. त्याचबरोबर आमचे स्वच्छंदी, निर्व्याज प्रेम संपले. आता कर्तव्ये, बंधने, शिष्टाचार, जबाबदारी ! वनवास म्हणावा की अनिर्वचनीय सुखवास म्हणावा तो संपला !

□ □ □

REFBK-0016592

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...५००६५... दि: ...
क्रमांक ...... नों० दि: ...